# जात्युच्छेदक निबंध  भाग १ व २

# समग्र सावरकर वाङ्मय खंड ६

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक प्रकाशन

www.savarkar.org

- **मुद्रक-प्रकाशक**

  **श्री. पंडित बखले, मुंबई.**

  **श्री. नाना गोडसे, पुणे.**

  स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक प्रकाशन

  २५२ स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, शिवाजी उद्यान

  दादर, मुंबई ४०००२८ फोन ४४६५८७७

© सौ. हिमानी सावरकर

- **मुद्रणस्थळ**

  जॉली ओफसेट

  १४, वडाळा उद्योग भवन,

  मुंबई ४०००३१

- मूल्यः रु .५००.००

# अनुक्रम


मनोगत ........ १०

१ जात्युच्छेदक निबंध लेखांक १ ला ........ ११

१.१ प्रस्तुतच्या जातीभेदाचें इष्टानिष्टत्व ........ ११

१.२ जातीभेद नि अध:पात यांचें समकालीनत्व ........ ११

१.३ कोणाचें मत प्रमाण मानावें? ........ १२

१.४ आजचें विकृत स्वरूप ........ १३

१.५ परदेशगमनाचा निषेध ........ १३

१.६ परधार्जिणें विटाळवेड ........ १४

१.७ जात राहिली पण धर्म गेला ........ १४

१.८ पराक्रमाचा संकोच ........ १५

१.९ मराठी साम्राजाच्या क्षय ........ १५

१.१० मुकट्यापायी मुकुट दवडले! ........ १६

१.११ समाजाचा देह पोखरणारें जातवेड ........ १६

१.१२ उपेक्षा केली तर? ........ १७

२ लेखांक २ रा ........ १८

२.१ सनातन धर्म म्हणजे जातीभेद नव्हे ........ १८

२.२ धर्म शब्दाचे अर्थ ........ १८

२.३ धर्म आणि आचार ........ १९

२.४ जातीभेद हा चातुर्वर्ण्याचा उच्छेद आहे! ........ २०

३ लेखांक ३ रा ........ २४

३.१ चार वर्णाच्या चार हजार जाती! ........ २४

४ लेखांक ४ था ........ २९

४.१ ह्या आपत्तीवर उपाय काय? ........ २९

४.२ हा काही मूठभर ब्राह्मणांचा कट नव्हे ........ २९

४.३ किंवा हा ब्राह्मण-क्षत्रियांचा संयुक्त कटही नव्हे ........ २९

४.४ जन्मजात जातीभेदाचा उच्छेद आणि गुणजात जातीभेदाचा उद्धार ........ ३१

५ लेखांक ५ वा ........ ३४

५.१ अनुवांशिक गुणविकासांचें तत्त्व ........ ३४
५.२ प्रस्तुतच्या जातिभेदाचें एक सर्थमन ........ ३५
५.३ एका अर्थी संस्कार हानीकारक आहे ........ ३५
५.४ हिंदू जातीने केलेला महान् प्रयोग ........ ३६
५.५ अनुवंश हें गुणविकसनाचे अनन्य कारण नाही ........ ३७
५.६ बीज हा एक घटक आहे ........ ३७
६ लेखांक ६वा ........ ४०
६.१ अनुवांशिक शास्त्राचा पुरावा ........ ४०
६.२ परिस्थितीचा प्रभाव ........ ४०
६.३ अनुवांशिक गुणविकासाच्या मर्यादा ........ ४१
६.४ बीज आणि क्षेत्रशुद्धी ........ ४२
६.५ रामाची सीता कोण? ........ ४२
७ लेखांक ७ वा ........ ४५
७.१ सगोत्र विवाह निषिद्ध कां? ........ ४५
७.२ संकराची उपयुक्तता ........ ४५
७.३ संकर नव्हेच ........ ४६
७.४ संकराचीं काही उदाहरणें ........ ४६
७.५ आणखी एक कारण : गुप्त संकर! ........ ४६
७.६ अंधनिष्ठा ........ ४७
७.७ पोथीजात बेटीबंदी ........ ४८
८ लेखांक ८ वा ........ ५०
८.१ जातीसंकराच्या अस्तित्त्वाचा साक्षीदार म्हणजे स्वयमेव स्मृतीच! ........ ५०
८.२ पितृसावर्ण्य ........ ५०
८.३ मातृसावर्ण्य ........ ५१
८.४ अनुलोम, प्रतिलोम ........ ५१
८.५ एक पांडवांचे कूळच पाहा ........ ५१
८.६ प्रत्यक्ष अनुभव ........ ५४
८.७ म्हणून प्रत्यक्ष गुणच पाहणें बरें! ........ ५४
८.८ जगातील इतर राष्ट्रांतील अनुभव पाहा! ........ ५६

८.९ अहो हें कलियुग! ........ ५७
९ लेखांक ९ वा ........ ५८
९.१ उपसंहार ........ ५८
९.२ जन्मजात जातीचा उच्छेद आणि गुणजात जातीचा उद्धार ........ ५९
९.३ प्रत्येक मुलाची जन्मजात जात एकच - हिंदू! ........ ६०
९.४ बॅरिस्टर नि मोटारहाक्या ........ ६१
१० पोथीजात जातीभेदोच्छेदक सामाजिक क्रांतीघोषणा! ........ ६४
१०.१ तोडून टाका ह्या सात स्वदेशी बेड्या!! ........ ६४
१०.२ सात स्वदेशी शृंखला ........ ६६
१०.३ जातीभेद मोडण्यासाठी दुसरें काही करावयास नको ........ ६७
११ अस्पृश्यतेचा पुतळा जाळला! ........ ७१
११.१ टोलेजंग सहभोजन! ........ ७४
१२ माझ्या सनातनी नाशिककर हिंदू बंधूंना माझें अनावृत पत्र ........ ७५
१३ मद्रास प्रांतातील काही अस्पृश्य जाती ........ ७८
१३.१ मद्रासमधील काही अस्पृश्य जाती! ........ ८०
१४ हा अनुवंश, कीं आचरटपणा? कीं आत्मघात? ........ ८४
१४.१ ‘कंचोळें’ प्रभूची जात का आणि कशी झाली? ........ ८५
१४.२ भंडारी जातीच्या उत्पत्तीविषयी पोथीपुराणांतील माहिती ........ ८७
१४.३ शिंप्यांच्या पोटजातींची उत्पत्ती ........ ८९
१४.४ अंड्यावर पाय पडला म्हणून पोटजात! ........ ९०
१५ वज्रसूची! ........ ९३
१५.१ श्रीमत्‌अश्वघोषकृत वज्रसूची ........ ९४
१५.२ जातीची भिन्नता म्हणजे वास्तविक कशी असावयास पाहिजे? ........ ९७
१५.३ वैशंपायन-धर्म-संवाद ........ ९८
१६ तौलनिक धर्मविज्ञानदृष्ट्या मुसलमानांतील पंथोपपंथाचा परिचय ........ १०३
१६.१ बुद्धिवादाविरुद्ध आक्षेप ........ १०४
१६.२ पवित्र कुराणाची थोडी रूपरेखा ........ १०८
१६.३ (उत्तरार्ध) ........ ११२
१६.४ हानीफाई (सुनी) ........ ११३

१६.५ शफाई सुनी ............................................................ ११३

१६.६ मालेकी सुनी ............................................................ ११४

१६.७ हानबाली सुनी ............................................................ ११४

१६.८ मोटाझली ............................................................ ११४

१६.९ सेफेशियन ............................................................ ११६

१६.१० खारेजायी ............................................................ ११७

१६.११ शिया ............................................................ ११७

१६.१२ महंमद पैगंबरानंतरचे मुसलमानी पैगंबर ............................................................ ११८

१६.१३ एक अगदी ताजे पैगंबर! ............................................................ १२१

१६.१४ समारोप ............................................................ १२१

१६.१५ खतावियन पंथ ............................................................ १२१

१७ मुसलमानी धर्मातील समतेचा टेंभा ............................................................ १२४

१७.१ गौबांचा पूर्वपक्ष ............................................................ १२४

१७.२ विषमतेचा मुळारंभ ............................................................ १२४

१७.३ समतेचा नि सहिष्णुतेचा अर्क!!! ............................................................ १२५

१७.४ अंत:स्थ विषमता ............................................................ १२६

१७.५ गुलामगिरी ही मानवी समतेचेच प्रदर्शन आहे काय? ............................................................ १२६

१७.६ कट्टर अस्पृश्यता ............................................................ १२७

१८ आमच्या 'अस्पृश्य' धर्मबंधूंना धोक्याची सूचना ............................................................ १३०

१८.१ हिंदू धर्म माझा आहे, तो सोडण्यास सांगणारा तू कोण? ............................................................ १३४

१८.२ स्पृश्यही होईन आणि हिंदूही राहीन ............................................................ १३६

१८.३ बॅ. सावरकरांचे 'समतासंघा'स पत्र ............................................................ १३६

१९ डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव परत हिंदुधर्मातच येतील! ............................................................ १४०

१९.१ हवा तर एक नवा 'बुद्धिवादी संघ' स्थापा! ............................................................ १४०

१९.२ सध्याच्या स्थितीत धर्मांतरानेच अस्पृश्यांची अधिक हानी होणार आहे!! ............................................................ १४१

१९.३ असे धर्मांतर हेही माणुसकीस काळिमाच लावणारे आहे! ............................................................ १४१

१९.४ शुद्धीचा दरवाजा - आता काय चिंता! ............................................................ १४२

१९.५ जसा तो राष्ट्रद्रोह - तसाच हा धर्मद्रोह ............................................................ १४३

२० सावरकरांचे डॉ. आंबेडकरांना आमंत्रण ............................................................ १४४

२१ धर्मांतराचे प्रश्नांविषयी महारबंधूंशी मनमोकळा विचारविनियम................................ १४८
२१.१ लेखांक १ ला................................ १४८
२१.२ लेखांक २रा................................ १५०
२१.३ सामान्यत: महार हा महार धर्मास सोडू इच्छित नाही!................................ १५१
२१.४ लेखांक ३रा................................ १५३
२१.५ ऐतिहासिक पुरावा पाहा! खुश्रूची वीरगाथा................................ १५५
२१.६ सग्यासोयऱ्यांची दु:खद ताटातूट................................ १५७
२१.७ आर्थिक दुर्दशाही तीच राहणार................................ १५८
२१.८ पण महार राहून, हिंदू राहून, अस्पृश्यता जाणे शक्य आहे काय?................................ १५८
२१.९ रत्नागिरीने अस्पृश्यतेची आणि रोटीबंदीची बेडी कशी तोडली?................................ १५९
२१.१० गृहप्रवेश................................ १६३
२१.११ स्त्रियांचे हळदी कुंकू समारंभ................................ १६४
२१.१२ गाड्या, सभा, नाटकगृहे................................ १६४
२१.१३ हिंदू बँड................................ १६५
२१.१४ पुर्वास्पृश्य मेळा नि देवालय प्रवेश................................ १६५
२१.१५ पतितपावनाची स्थापना................................ १६६
२१.१६ अखिल हिंदू उपाहारगृह................................ १६६
२१.१७ साऱ्या जिल्हाभर प्रचार नि मालवणलाही अस्पृश्यतेस मुठमाती!................................ १६७
२१.१८ अस्पृश्यतेच्या मृत्यूदिन! स्पृर्शबंदीचा पुतळा जाळून रोटीबंदीवर चढाई!................................ १६७
२२ महाराष्ट्रभर सहभोजनांचा धूमधडाका! (१९३६)................................ १७०
२२.१ सहा वर्षात रत्नागिरीने रोटीबंदीची बेडी तोडून टाकलीच की नाही?................................ १७१
२२.२ झुणकाभाकर सहभोजन संघ................................ १७३
२२.३ सात वर्षांपूर्वी रत्नागिरीने समाजक्रांतीची केलेली उठावणी आज महाराष्ट्र व्यापीत चालली आहे!................................ १७३
२२.४ शाळा कॉलेज-संमेलने यांच्यातील सहभोजकांची नावे छापा!................................ १७८
२३ जातीभेदोच्छेदक पक्षाचे जातीसंघविषयक धोरण कोणते असावे?................................ १७९
२३.१ जातीभेदाच्या विषारी सर्पाचा मुख्य विषारी दात कोणता?................................ १८१
२३.२ संक्रमणकालात जातीसंघ हे एक अपरिहार्य अनिष्ट आहे................................ १८४
२३.३ जात्युच्छेदकांचे जातीसंघाविषयीचे धोरण कसे असावे?................................ १८७

२४ चित्पावन शिक्षण साहाय्यक संघ नि बॅ. सावरकर ....... १९१
२५ जन्मजात अस्पृश्यतेचा मृत्यूलेख ....... १९५
२५.१ अस्पृश्यता मेली, पण तिचे और्ध्वदेहिक अजून उरले आहे! ....... १९५
२५.१.१ (पूर्वार्ध) ....... १९५
२५.१.२ अमेरिकेतील गुलामगिरीचे उच्चाटन आणि हिंदुस्थानात अस्पृश्यतेचे उच्चाटन १९८
२५.१.३ 'स्पृश्य' हिंदूंप्रमाणेच 'अस्पृश्य' हिंदूंनीही त्यांच्या पापाचे स्वयंस्फूर्तीने प्रायश्चित घेतले! १९९
२५.१.४ प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारा कायापालट करण्याची हिंदुराष्ट्राची क्षमता २०१
२५.२ (उत्तरार्ध) ....... २०३
२५.२.१ आजच्या वस्तुस्थितीची उडती पाहाणी ....... २०६
२५.२.२ महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघ ....... २०८
२५.२.३ अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेस लीग ....... २०९
२५.२.४ जात्युच्छेदक हिंदू महामंडळ ....... २१०
२५.२.५ अस्पृश्यतोच्छेदक, निर्बंधाच्या बजावणीच्या कार्यक्रमाची रूपरेषा ....... २१२
२५.२.६ अस्पृश्यतानिवारक आंदोलनाचे क्षेत्र ....... २१२
२५.२.७ सरकारी स्वतंत्र विभाग ....... २१३
२५.२.८ समाजहितकारक कोणताही धंदा हीन नाही; पण तो सोडलात तरी राग नाही. २१४
२५.२.९ शेवटी, व्यक्तीच्या मन:क्षेत्रातून या अस्पृश्यतेच्या दुष्ट भावनेचे उच्चाटन करा! २१५
२६ बौद्धधर्मस्वीकाराने तुम्हीच असाह्य व्हाल! ....... २१८
२७ बौद्धधर्मातही भाकडकथा, भाबडेपणा, भंगड आचार नि अनाचार इत्यादींचा बुजबुजाट झालेला आहे २२२
२८ सीमोल्लंघन केले, पण हिंदूत्वाच्या सीमाक्षेत्रातच! ....... २२९
२८.१ चिंतनीय पण चिंताजनक नव्हे ....... २२९
२८.२ आंबेडकर ख्रिस्ती किंवा मुसलमान झाले नाहीत, ते काही आमच्यावर उपकार करण्यासाठी नव्हे ....... २२९
२८.३ हिंदूंनी बाटग्यांचे कौतुक करणे हा कोडगेपणा होय ....... २३१
२८.४ पण बौद्ध होताच डॉ. आंबेडकरांची भंगड प्रतिज्ञाही भंग पावली ....... २३१

२८.५ एक सावधानतेची सूचना - बौद्धस्थान नि नागराज्य ..... २३४
२८.६ हिंदूच्या देवळात अहिंदूंना प्रवेशाचा अधिकार नाही! ..... २३४
२८.७ श्री पतितपावन मंदिराची परंपरा ..... २३५
२८.८ मृत्युंगत युसुफ मेहेरअल्ली यांनी श्रीपतितपावन मंदिरास दिलेली भेट ..... २३६
२८.९ हिंदूंच्या देवालयातून आणि देवस्थानांतून अहिंदूंना मुक्त प्रवेश असता कामा नये! . २३९
२८.९.१ आता विनोबा पाकिस्तानातच पदयात्रा का काढीत नाहीत? ..... २४१
२९ हिंदू नागलोक ख्रिश्चन का होतात ? ..... २४४
३० ही खिलाफत म्हणजे आहे तरी काय? ..... २५०
३०.१ शिया धर्मशास्त्री ..... २५३
३०.२ सुनी धर्मशास्त्री ..... २५३
३०.३ धाता यथापूर्वमकल्पयत ..... २५५

# मनोगत

'झाले बहु, होतील बहु परंतु या सम हा' या प्रसिद्ध वचनाचे प्रत्यक्ष प्रारूप म्हणजे विनायक दामोदर सावरकर. आपल्या परमप्रिय मातृभूमीवरील अविचल श्रद्धेपोटी त्यांनी वैराण वाळवंटातून अखंड प्रवास केला. त्यांचे दिव्य दारूण व्रत अढळपणे सुरू असताना भारतीय समाज संघटित करून आपल्या पाठीशी उभा ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. धारदार लेखणी आणि अमोघ वाणी ही त्यांची साधने होती. स्वातंत्र्यासाठी समाज पेटून उठावा असे त्यांना वाटत होते. समाजाला सत्य स्थितीची जाणीव करून देऊन एका निश्चित दिशेने वाटचाल व्हावी असा त्यांचा प्रयत्न होता. स्वातंत्र्याबरोबर समाजाचे सर्वांगीण परिवर्तन व्हावे असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यांचे निबंध, बातमीपत्रे आणि भाषणे या तीन साधनांच्या वाचनातून या गोष्टीचा प्रत्यय येतो.

भारतातील उदारमतवादी नेते ब्रिटिश अधिकाऱ्याच्या आणि संस्कृतीच्या छायेत वावरत होते. आज ना उद्या ब्रिटिश लोक भारताला स्वातंत्र्य देतील यावर त्या नेमस्त नेत्यांचा दृढ विश्वास होता. ब्रिटिशांच्या सहवासामुळे भारतीय समाजाचे सर्वांगीण उत्थापन होईल, अशी त्यांची समजूत होती. सावकरकरांनी ब्रिटिशांचे स्वार्थी, दुटप्पी आणि दुष्ट अंतरंग प्रकाशात आणले. त्याचबरोबर भारतातील भोळसट नेत्यांवर कठोर टीका केली. सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळेल अशी म. गांधींची भूमिका होती. सावरकरांनी म. गांधींच्या विचारातील विसंगती समाजासमोर ठेवली. म. गांधींचा मार्ग व्यवहार-विसंगत असल्याचे कठोर शब्दात दाखवून दिले. सावरकरांनी राष्ट्रीय हिताला सर्वश्रेष्ठ स्थान दिल्यामुळे त्यांच्या दृष्टीने जे जे राष्ट्रहित विघातक होते त्या त्या गोष्टीवर घणाघाती टीका केली.

सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारांत राष्ट्रीय स्वातंत्र्य ही एक बाजू होती तर समाजाचा सर्वांगीण उत्कर्ष ही दुसरी बाजू होती. सावरकरांची आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानावर अपरिमित श्रद्धा होती. अद्ययावतता हा त्यांच्या विज्ञान विचारांचा मूलमंत्र होता. भारतीय मुस्लीम विज्ञाननिष्ठ झाले, तर त्यांच्यातील धर्मवेड कमी होईल. त्यातून त्यांचे नि हिंदूंचे भले होईल असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यांचा अनुभव मात्र वेगळा होता. हिंदूंनी आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान अवगत करावे नि आपला उत्कर्ष साधावा यासाठी त्यांनी विज्ञाननिष्ठेचा आवर्जून पुरस्कार आणि प्रचार केला. तर्काच्या कसोटीवर न बसणाऱ्या हिंदू जीवन पद्धतीतील दुष्ट स्वरूपाच्या रूढी, परंपरा नि प्रथांवर कठोर टीका केली. त्यांच्या निबंधांतून याचा प्रत्यय येतो. हिंदू समाजातील अतर्क्य आणि दुष्ट पद्धती म्हणजे जाति व्यवस्था होय. जन्मधिष्ठित जातिव्यवस्था आणि स्पृश्यास्पृशता यांच्यावर त्यांनी कठोर आघात केला. त्यांच्या जात्युच्छेदक निबंधांतून त्याचा प्रत्यय येतो. सावरकर हे हिन्दुत्वाचा आग्रही पुरस्कार करणारे थोर क्रांतिकारक विचारवंत तर होतेच पण समाजपरिवर्तकही होते. त्यांनी केवळ सामाजिक विचाराचा सिद्धांत मांडला नाही तर त्याचे प्रत्यक्षात उपयोजन केले. सावरकरांचा हा सर्व विचार या खंडद्वयांत समाविष्ट केला आहे. या सहाव्या खंडात विज्ञाननिष्ठ निबंध, अंधश्रद्धा निर्मूलन कथा आणि जात्युच्छेदक निबंध समाविष्ट केले आहेत. त्यातून वाचकाला सावरकरांच्या द्रष्टेपणाची प्रचीती येते. प्रकाशकानी केलेल्या अनमोल कार्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन !!!

*वर्षप्रतिपदा २००१*

*शं. ना नवलगुंदकर*

# १ जात्युच्छेदक निबंध लेखांक १ ला

## १.१ प्रस्तुतच्या जातीभेदाचें इष्टानिष्टत्व

'मला वाटते की, देशाच्या राजकीय, सामाजिकप्रभृती परिस्थितीचें आणि ती सुधारण्यासाठी ठरलेल्या सिद्धान्तप्राय उपायांचें ज्ञान मुलांना लहानपणापासूनच करून देणें अत्यंत आवश्यक झाले आहे. राजकीय सिद्धान्तांचें नि सामाजिक प्रेम यांचें विद्यार्थ्यास लहानपणापासूनच बाळकडू देणें (जसें अवश्य) तद्वतच जातीभेद, जातीद्वेष नि जातीमत्सर यांचे योगाने आमचा देश कसा विभागला जात आहे, कसा भाजून निघत आहे, कसा करपून जात आहे याचेंही ज्ञान राष्ट्रीय शाळेतील मुलांना मिळालें पाहिजे; जातीभेद सोडण्याची आवश्यकता किती आहे हें आमच्या विद्यार्थ्यांना समजलें पाहिजे.'

- लोकमान्य टिळक (बेळगावचें व्याख्यान, १९०७)

आपल्या हिंदू राष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाशी प्रथम चातुर्वर्ण्य आणि नंतर त्याचेंच विकृत स्वरूप असलेली जातीभेद संस्था ही इतकी निगडित झालेली आहे की, आपल्या हिंदू वा आर्य राष्ट्राच्या वैशिष्ट्याची व्याख्या काही काही स्मृतीकारांनी 'चातुर्वर्ण्यव्यवस्थानं यस्मिन्देशे न विद्यते । तं म्लेच्छदेशं जानीयात् आर्यावर्तं ततः परम् ।।' अशीच दिलेली आहे. अर्थातआपल्या हिंदू राष्ट्राच्या उत्कर्षाचें श्रेय जसे या आपल्या जीवनाच्या तंतूतंतूंशी गुंफून राहिलेल्या जातीभेदास असण्याचा उत्कट संभव आहे; तसाच आपल्या राष्ट्राच्या अपकर्षाचेंही तीच संस्था एक बलवत्तर कारण असण्याचाही तितकाच उत्कट संभव आहे. त्यातही मूळचें चातुर्वर्ण्य जे 'गुणकर्म विभागशः सृष्टम्' ते लोपत जाऊन आजच्या जन्मनिष्ठ जातीभेदाचा फैलाव होऊ लागला, त्याच वेळी आणि तसाच आपल्या हिंदूस्थानाचा अध:पातही होत आला; आणि ज्या वेळी बेटीबंद आणि रोटीबंद जातीभेदाने अत्यंत उग्र स्वरूप धारणे केले तोच काळ आपल्या अध:पाताचाही परमावधि करणारा ठरला.

## १.२ जातीभेद नि अध:पात यांचें समकालीनत्व

या समकालीनतेमुळे तर त्या जातीभेदाचा आणि त्या अध:पाताचा संबंध केवळ काकतालीय योगाचा आहे कीं कार्यकारण भावाचा आहे याची शंका अत्यंत उत्कटतेने न येणें केवळ अशक्य आहे. यामुळे आपल्या राष्ट्राच्या अपकर्षाचीं कारणे शोधताना इतर महत्त्वाच्या गोष्टींप्रमाणेच या जातीभेदाच्या प्रस्तुतच्या स्वरूपाच्या इष्टानिष्टतेची छाननी करणे हें भारतीय राष्ट्रधुरीणांचे आजचें एक अत्यंत त्वर्य (Urgent) आणि अपरिहार्य कर्तव्य झालेलें आहे. एखादें उद्यान खळांपुलांनी डवरलेलें, निकोप वृक्षांच्या विस्तीर्ण प्रौढीने नि निरोगी लतावेलींच्या सलील शोभेने उल्हासित असलेलें पाहून तेथील प्रकाश, पाणी आणि खत हीं बहुधा निर्दोष असावीं असे अनुमान जसें सहज निघते; तसेच ते वृक्ष खुरटलेले फळें किडलेलीं, फुलें शिथिललेलीं दिसताच त्या ऱ्हासास आधारभूत असलेल्या प्रकाश, पाणी, खतप्रभृती घटकांपैकी कोणते तरी एक वा अनेक वा सर्वच दोषी झालेली असलीं पाहिजेत हेंही अनुमान तसेच सहज निष्पादित होते.

आणि त्या प्रत्येकाची छाननी करून दोष कशात आणि किती प्रमाणात सापडतो याचें निदान करणे आणि तदनुसार ते ते दोष निर्मूल करणे हेंच त्या बागवानाचें आद्य कर्तव्य ठरते.

परंतु या दृष्टीने पाहता हिंदू राष्ट्राच्या अपकर्षास ही आमची जातीभेद संस्था किती प्रमाणात आणि कशी कारणीभूत झाली आहे किंवा झालीच नाही, याचें विवेचन आवश्यक असूनही आम्हांस व्यक्तीशः ते सांगोपांग करणे आज शक्य नाही. कारण जातीभेदाच्या आजच्या स्वरूपाचे परिणाम विशद करू जाताच आमच्या राजकीय परिस्थितीचा विचार क्रमप्राप्तच होणार आणि प्रचलित राजकारण संन्यासाच्या शृंखलेने जखडलेली आमची लेखणी त्यास तर शिवूही शकत नाही. यासाठी तो भाग तसाच सोडून या जातीभेदाने आमच्या राष्ट्राच्या सुस्थितीवर आणि प्रगतीवर सामान्यतः काय परिणाम झालेले आहेत याचें केवळ दिग्दर्शन करूनच आम्हांस या प्रास्ताविक भागास आटोपते घ्यावे लागले.

## १.३ कोणाचें मत प्रमाण मानावें?

आणि हें दिग्दर्शन करताना या विषयासंबंधी लो.टिळकांवाचून दुसरें कोणाचें मत अधिक अधिकारयुक्त असणार आहे? गेल्या शंभर वर्षांत हिंदुस्थानात आपल्या हिंदू राष्ट्राच्या हिताहिताविषयी उत्कट ममत्वाने, सूक्ष्म विवेकाने आणि स्वार्थनिरेपक्ष साहसाने सर्व बाजूंनी समन्वित विचार केलेला जर कोणी पुरुष असेल तर ते लोकमान्य टिळकच होत. यास्तव आमच्या हिंदू राष्ट्राच्या अपकर्षाच्या कारणपरंपरेविषयीची त्यांचीं मते अगदी सिद्धान्तभूत नसलीं, तरी इतर कोणत्याही मतापेक्षा अधिक आदरणीय, विचारणीय आणि विश्वसनीय असणारच. त्यातही जातीभेदासारख्या धार्मिक संस्था म्हणून, सनातन संस्था म्हणून, साधारण लोक ज्या प्रश्नास समजतात त्या विषयांवर राजकारणात आणि धर्मकारणात सनातनी समजल्या जाणाऱ्या कोटी कोटी लोकांचा विश्वास आणि नेतृत्व ज्यानें संपादिलें, त्या लोकमान्यांच्या मताचें महत्त्व विशेषच असलें पाहिजे. वास्तविक पाहता आजकाल कोण सनातन हे ठरविणें दुर्घटच आहे. जो ज्या वेळी एखाद्या सुधारणेस विरोध करतो आणि एखाद्या रूढीस उचलून धरतो तो त्या वेळेपुरता निदान त्या प्रकरणीं तरी सनातनी म्हणविला जातो, इतकेंच काय ते सनातनीपणाचें सध्याचें लक्षण आहे. यास्तव स्वतः लोकमान्यांवरही जरी बहिष्कार पडलेले होते, अनेक धर्ममार्तंडांनी त्यांनाही जरी प्रच्छन्न सुधारक म्हणून हिणविलें होते; तरीही हिंदू संस्कृतीच्या रक्षणार्थ त्यांनी उभ्या आयुष्यभर जी नेटाची झुंज घेतली आणि अगदी निरूपाय होईतो प्रचलित समाज घटनेला कोणाचाही अनावश्य धक्का लागू नये आणि अंतर्गत यादवी वाढू नये म्हणून सुधारणा विरोधाचा तीव्र आरोप सहन करूनही जी सतत काळजी घेतली; त्यामुळे कोट्यवधी हिंदूंचा सनातन धर्म संरक्षक म्हणून लोकमान्यांवरच विश्वास बसलेला होता; या सर्व कारणांसाठी जातीभेदाच्या स्वरूपाविषयी लोकमान्यांसारखा अग्रगण्य सनातनी राजकीय पुढारी देखील काय म्हणतो हें पाहिलें असता तो जातीभेद आपल्या हिंदू समाजाच्या अपकर्षाला कसा कारणीभूत होत आहे हें त्यांच्या या लेखावर उद्धृत केलेल्या शब्दावतरणाने दिसून येते. 'जातीद्वेष आणि जातीमत्सर यांनी आमचा देश कसा करपून जात आहे, कसा भाजून निघत आहे (आणि म्हणूनच तो जातीभेद मोडण्याची किती आवश्यकता आहे)' याविषयी त्यांचे वरील जळजळीत उद्गार एकिले असता आजचा जातीभेद

आपल्या राजकीय जीवनासही किती घातक आहे ते निराळें सिद्ध करीत बसण्याची आवश्यकता उरत नाही.

## १.४ आजचें विकृत स्वरूप

हा लोकमान्यांसारख्यांचा आप्तवाक्याचा आधार क्षणभर बाजूस ठेवला तरीही, आज आहे या स्वरूपात तरी जातीभेद देशहितास अत्यंत विघातक होत आहे, हें सिद्ध करण्यास एक सर्वसामान्य सबळ पुरावा असा आहे की, चार वर्षांच्या बेटीबंदी रोटीबंदीच्या सहस्रशः हबक्यंात ह्या आपल्या हिंदू जातींच्या जीवनाचा गंगौघ खडंविखंड करून कुजवून टाकणारा हा आजचा जातीभेद तरी घातक आहेच आहे, यात काहीतरी सुधारणा झालीच पाहिजे; याविषयी तरी सनातन्यांतल्या सनातन्यांचाही मतभेद दिसून येत नाही. अगदी पंडित राजेश्वरशास्त्रीदेखील जातीभेदांच्या आजच्या अत्यंत विकृत स्वरूपाचें सर्वस्वी समर्थन करण्याचें साहस करू शकणार नाहीत. मग दुसऱ्याची काय गोष्टी? कारण त्यांच्या सनातन महासभेनेही इग्लंडमध्ये आपला प्रतिनिधी बोलावला असता आपण जाऊ म्हणून ठराव केलाच की नाही? दरभंग्याचे महाराजही बोटीवर चढताच परदेशगमन निषिद्धतेस समुद्रात ढकलून देते झालेच की नाही? त्या प्रकरणात जातीनिर्बंधाच्या बेड्या त्यांनी तोंडल्याच की नाहीत?

## १.५ परदेशगमनाचा निषेध

जातीभेदाचें प्रस्तुतचें विकृत स्वरूप आपणांस हानीकारक होत असून त्यात काहीतरी सुधारणा केलीच पाहिजे याविषयी प्रस्तुतच्या बहुतेक विचारी पुढाऱ्यांचें जसें ऐकमत्य आहे, तद्वतच आपल्या मागच्या वैभवास जे आपण मुकलो, त्यासही ह्या जातीभेदाच्या आणि तदुत्पन्न विटाळ-वेडाच्या भ्रांत समजुतीच पुष्कळ अंशी कारण झाल्या आहेत हेंही कोणी विचारवंत मनुष्यास सहसा नाकारता येणे शक्य नाही. बाकी सर्व भाराभर गोष्टी सोडल्या तरी ह्या एका परदेशगमन निषेधाचाच प्रताप आपणांस केवढा भोवला पाहा! परदेशगमन निषिद्ध कां! तर माझी ‘जात’ जाईल म्हणून... आणि जात जाईल म्हणजे काय? तर जातीबाहेरच्या मनुष्याशी अन्नोदक संबंध घडेल, जातीभेदाच्या प्रवृत्तीमुळे बोकाळलेला, अन्नाचा विटाळ, चिंधीचा विटाळ, अशा विक्षिप्त विटाळ-वेडाने परदेशगमन निषिद्ध होताच परदेशचा व्यापार आणि व्याप ठार बुडाला. इतकेंच नव्हे तर पृथ्वीवरील दूरदूरच्या खंडोखंडी या विटाळ-वेडाच्या रोगाने प्रादुभावापूर्वी हिंदू व्यापाऱ्यांनी आणि सैनिकांनी संपादिलेलीं आणि वसविलेली नगरेंची नगरें, बंदरेचीं बंदरे, राज्येची राज्यें मातृभूमीपासून अकस्मात्विलग झाल्याने आणि स्वदेशातून भारतीय स्वजनांचा जो सतत पाठपुरावा त्यांस होत होता, तो नाहीसा झाल्याने तिकडच्या तिकडे गडप झालीं, अक्षरशः ‘नामशेष’ झालीं. कारण आता त्यांची स्मृती केवळ खंडोखंडी अजून विकृतरूपाने का होईना पण प्रचलित असलेल्या नावावरूनच काय ती अवशिष्ट आहे.

## १.६ परधार्जिणें विटाळवेड

इंडो-चायना (हिंदू-चीन), झांझीबार (हिंदू-बाजार), बाली, ग्वाटेमाला (गौतमालय) अशा नावारूनच काय तो हिंदू वैभवाचा आणि संस्कृतीचा आणि प्रभुत्वाचा त्या त्या खंडी विस्तारलेला व्याप आज अनुमित करता येईल! हिंदुत्व आणि दिग्विजय या शब्दांचा इतका आत्यंतिक विरोधी भाव आला की, जेव्हा अटकेपार होऊन इस्तंबूलवर चढाई करण्याची, अंधुक आकांक्षा मराठी मनात उत्पन्न झाली, तेव्हा तिची संपन्नता हिंदुत्व राखून करता येणें शक्य आहे ही कल्पनासुद्धा मल्हररावासारख्या हिंदूपादशाहीच्या खंद्या वीरालाही न शिवता तो वीर गर्जून उठला - 'हिंदूचे मुसलमान होऊ पण पुढील वर्षी काबुलवर चाल करून जाऊच जाऊ.' हिंदूचे मुसलमान होण्यावाचून मुसलमानांच्या देशावर सत्ता स्थापण्याचा अन्य मार्गच उरला नव्हता काय? हिंदूही राहू आणि काबूल तर काय पण इस्तंबूलवरही मराठी झेंडा आणि मराठी घोडा नाचवू ही गोष्ट तपनतमोवत्अत्यंत विसंवादी जी वाटली ती ह्या विटाळवेडाच्या, या 'माझी जात जाईल,' च्या भीतीमुळेच होय. हिंदू म्लेंच्छदेशी गेल्याने त्याची जात जाईल, पण केवढें आश्चर्य की, म्लेंच्छ स्वदेशी म्हणजे हिंदूदेशी आल्याने मात्र हिंदूंची ती 'जात' जात नसे, तो विटाळ होत नसे. वास्तविक पाहता त्यातल्या त्यात विटाळवेडच हवें होते तर ते असे काही सुचलें असते तरी याहून पुष्कळ बरें होते. ज्या हिंदू गावी वा प्रांती तो म्लेंच्छ व्यापारी शिरला, त्याला त्याला त्या म्लेंच्छाचा विटाळ होऊन त्या त्या हिंदू गावाची जात गेली अशी रूढी पडती तर ती आपत्ती खरीच, पण पुष्कळ अंशी ती इष्टापत्ती तरी होती. पण एखादा कासम किंवा क्लाइव्ह हिंद प्रातांत आला, आणि त्याने त्याचा उभा व्यापार किंवा उभें राज्य घशात घातलें तर त्याचा विटाळ आम्हां हिंदूंना होत नसे. त्याने आमची जात जात नसे. तर ती केव्हा जाईल तर एखादा हिंदुजन म्लेंच्छ देशात जाऊन तिकडचें धन वा सत्ता संपादून त्यायोगे आपली मातृभूमी सधनतर आणि सबलतर करण्यासाठी तो परत स्वदेशी आला म्हणजे!

## १.७ जात राहिली पण धर्म गेला

म्लेंच्छ व्यापाऱ्यास त्याच्या वस्तू स्वदेशी आणण्यासाठी, एखाद्या जावयाला मिळणार नाहीत अशा, कित्येक सवलती हिंदूंनी दिल्या. पण स्वदेशीचे हिंदू व्यापारी परदेशात हिंदवी वस्तू विकावयास आणि हिंदू वाणिज्य प्रसारावयास जाऊ लागले तर, शत्रूसही घालू नयेत अशा विशेष अडचणी, त्यांच्या मार्गात घातल्या. असल्या या आत्मघातक अंधळेपणाची शेवटी इतकी पराकाष्ठा झाली की, मलबारच्या राजास आपले काही विश्वासाचे लोक अरबांच्या सामुद्रिक वाणिज्य व्यवसायात प्रवीण व्हावें असे जेव्हा मनात आलें, तेव्हा त्या जातीच्या हिंदूंनी अशी पोक्त युक्ती काढली की, दरवर्षी हिंदूच्या प्रत्येक कुटुंबामागे एकेकाने मुसलमानी धर्म स्वीकारावा, आणि नौवाणिज्य शिकावें! कारण तो हिंदू आहे तोवर त्यास समुद्रवाणिज्य शिकणें निषिद्धच असणार. समुद्र ओलांडताच त्याची जात जाणार! म्हणून जात राहावी यास्तव धर्मच सोडून दिला! सर्पण हवें म्हणून हातपाय कापून चुलीत घातले! बायकोला दागिने हवे म्हणून बायकोलाच विकून टाकली! जात राखण्यासाठी बेजात केलेले तेच हे 'मोपले' आज त्याच जातीवाल्या हिंदूंचा निर्वंश करण्यास त्यांवर लांड्यासारखे तुटून पडत आहेत! फार काय सांगावें, क्वचित् एखाद्या अद्भुत देवीप्रसादाने दिल्लीचें सिंहासन चूर्ण करणाऱ्या सदाशिवराव भाऊच्या

त्या घरास सकाळी लंडनचे सिंहासन चूर्ण करण्याची शक्ती आली असती आणि त्याने दिल्लीच्या प्रमाणे इग्लंडला जाऊन लंडनच्या सिंहासनावर विश्वासरावास चढवून राज्यभिषेक करवून घेतला असता तर इंग्लंडमध्ये हिंदुपद-पादशाही स्थापन होती; पण ते दोघे हिंदू मात्र विदेशगमनाने त्यांची जात जाऊन, अहिंदू होते!!!

## १.८ पराक्रमाचा संकोच

अगदी इसवीसनाच्या अकराव्या बाराव्या शतकापर्यंत जातीभेदाच्या क्षयाने आमच्या नाड्या आखडत आल्या असताही विदेशगमननिषिद्धतेच्या परमावधीला तो रोग पोचला नव्हता, तोवर मद्राच्या पांड्य वीरांच्या सेना विदेशातही हिंदू राज्यें चालवीत होत्या. शेवटच्या दिग्विजयी पांड्य राजाने त्याच वेळी ब्रह्मदेशाकडे पेगूवर स्वारी केली. नुसते ‘प्रतस्थे स्थलवर्त्मना’ नव्हे तर अगदी मोठें प्रबळ नौसाधन (आरमार) घेऊन ‘जलवर्त्मना’ प्रस्थान केले आणि ब्रह्मदेशाकडे पेगूचा विजय करून येता येता अंदमानादिक त्या समुद्रामधील सारीं बेटें हिंदू साम्राज्यात समाविष्ट करून तो परत आला. पण पुढे जेव्हा तो महासागरसंचारी हिंदू पराक्रम घरच्या विहिरीतला बेडूक होऊन बसला तेव्हा पराक्रम (पर + आक्रम), बाहेरच्या परशत्रूंच्या देशावरच चढाई करणे, हा शब्दच हिंदूंच्या कोशातून लुप्त झाला. शक्यतेचा मूळ उगम आकांक्षेतच असणार. पराक्रमाची, खऱ्या दिग्विजयाची, नवीं राज्यें संपादिण्याची आपली संस्कृती आणि प्रभाव सप्तद्विपा वसुंधरेवर दिग्विजयी करण्याची, आकांक्षाच जेव्हा ‘जातीच्या’ हिंदूस पाप झाली तेव्हा त्यास दिग्विजय करण्याची शक्यताही दिवसेंदिवस नष्ट होत गेली. आकाशात उडण्याची साहसी सवय पिढ्यानुपिढ्या नष्ट झाल्याने ज्यांचे पंख पंगू झाले आहेत असे हें हिंदू पराक्रमाचें कोंबडे आपल्याच ‘जातीच्या’ अंगणास जग मानून त्यातच डौलाडौलाने आरवत बसलें आणि ते केव्हा? तर आततायी पराक्रमासही पुण्य मानणाऱ्या मुसलमानी गिधाडांनी आणि युरोपियन गुंडांनी सर्व जगाचें आकाश नुसते झाकून टाकलें तेव्हा! अशा स्थितीत त्यांच्या झेपेसरशी ते अंगणातलें कोंबडें ठिकाणच्या ठिकाणी फडफडून गतप्राण झाले यात काय आश्चर्य?

## १.९ मराठी साम्राजाच्या क्षय

केवळ अगदी शेवटच्या हिंदू साम्राज्याचा, आपल्या महाराष्ट्रीय हिंदूपदपादशाहीचा, पतनकाल घ्या. आपली पूर्वीचीं साम्राज्यें आणि स्वातंत्र्य जाण्यास केवळ जातीभेदच कारण झाला हें विधान जसें अतिशयोक्तीचें होईल तसेच मराठी राज्य केवळ जातीभेदानेच बुडालें हें विधानही अतिशयोक्तीचें होईल. परंतु हें विधानही तितकेंच विपर्यस्त न्यूनोक्तीचें होणारें आहे की, आपली जी हिंदूपदपादशाही मूठभर इंग्रजी पलटणीच्या पायाखाली तुडविली गेली, ती इतकी निर्बल होण्यास जातीभेदाचा क्षय मुळीच कारणीभूत झालेला नाही! समुद्रगमननिषेध हें या भयंकर क्षयाचें एक उपांगदेखील विचारात घेतलें असता मराठी साम्राज्यकाळीसुद्धा आपलें सामाजिक नव्हे तर राजकीय बलदेखील या भयंकर व्याधीने किती निर्जीव करून सोडलें हें तत्काल ध्यानात येणारें आहे. ज्या वेळी इंग्रजांनी देशातील उभा आयातनिऱ्यात व्यापार हस्तगत केला होता, त्या वेळी त्यांच्या देशात आपल्या व्यापाराची एकही हिंदू पेढी नव्हती. शेवटच्या रावबाजीच्या अंत:पुरात दासी किती, त्यात बोलकी कोण, विश्वासघातक होण्यासारख्या कोण,

येथपर्यंत आपल्या देशाची खडान्खडा माहिती त्यांच्या पुण्याजवळील 'बेटा'मधल्या लेखनालयात टिपलेली असता इग्लंड देश आहे कोठे, इंग्रजांचें राज्य आहे किती, त्यांचे शत्रू कोण, त्यांचें बल किती अशी घाउक माहितीदेखील आम्हांस प्रत्यक्ष पाहून सांगेल असा एकही हिंदू त्यांच्या देशात गेलेला नव्हता! फ्रेंचांची माहिती इंग्रज सांगेल ती आणि इंग्रजांची फ्रेंच सांगेल ती. त्या स्वार्थप्रेरित विपर्यस्त माहितीवर सारी भिस्त!

## १.१० मुकट्यापायी मुकुट दवडले!

एक हिंदू राघोबादादांचा वकील कोठे एकदाचा विलायतेस जाऊन आला तो त्याच्या त्या भयंकर जात गेल्याच्या पापाचें प्रायश्चित्त त्याला 'योनिप्रवेश' करवून आणि पर्वतावरील पाहाडांच्या कडेलाटशेलगतच्या योनीसारख्या आकृतीतून बाहेर येताच तो पुनीत झालासें मानून परत घेण्यात आलें. पाप एकपट मूर्ख आणि त्याचें प्रायश्चित्त शतपटीने मूर्खतर! जसे हजारो इंग्रज हिंदुस्थानात आले, तसे लाखो हिंदू व्यापारी, सैनिक, कारस्थानी युरोपभर जात-येत राहते तर काय त्यांच्या कला, त्यांचा व्यापार, त्यांची शिस्त, त्यांचे शोध आम्हांस आत्मसात्करता आले नसते? काळे, बर्वे, हिंगणे असले पट्टीचे हिंदू राजदूत जर लंडन, पॅरिस, लिस्बनला राहते तर काय आमच्या यादवीचा जसा त्यांनी लाभ घेतला तसा त्यांच्या यादवीचा आम्हांस घेता आला नसता? पण आडवी आली ही 'जात' हें 'सोवळें' - हा मुकटा'! ह्या मुकट्यापायी मुकुट दवडले पण त्यायोगे त्याची जात गेली नाही पण जर का तो वर उल्लेखिलेल्या पांड्य राजासारखा लंडनवर चालून जाता तर मात्र त्याची जात नि:संशय गेली असती.

## १.११ समाजाचा देह पोखरणारें जातवेड

भारताचें स्थलबल असे निर्बल झाले. भारताचें जलबल त्या रणतरी-तीं नौसाधनें, जीं अगदी दहाव्या शतकापर्यंत सागरासागरावर हिंदूध्वज डोलवीत संचार करीत होतीं, तीं तर ठारच बुडालीं; त्या महासागरावर पाण्यात नव्हे, अहिंदू पक्षीयांच्या खड्गाचे पाण्यात नव्हे, तर या हिंदू जातवेडाच्या संध्येच्या पळीतील पाण्यात! आजही हे सात कोटी अस्पृश्य, मुसलमानांच्या संख्याबलाइतकेंच हें संख्याबल, एखाद्या तुटलेल्या हाताप्रमाणे निर्जीव होऊन पडलें आहे या जातवेडाने! कोट्यवधी हिंदू बाटले जात आहेत या जातवेडाने! हे ब्राह्मणेतर, हे सत्यशोधक फुटून निघाले या जातवेडाने! ब्राह्मणाच्या जात्यहंकाराचा केव्हा अगदी ठीक समाचार घेताना जो ब्राह्मणेतर सत्यशोधकपंथ समतेच्या एखाद्या आचाऱ्यासही लाजवील अशा उदात्त तत्त्वांचा पुरस्कार करतो, त्यातील काही लोक तेच समतेचें अधिष्ठान महार-मांग मागू लागताच अगदी मंबाजीबुवासारखे पिसाळून त्यांच्यावर लाठी घेऊन धावतात, या जातवेडामुळे! ब्राह्मण मराठ्यांचे ब्राह्मण बनू पाहतात! हें जातवेड एका ब्राह्मणाच्याच अंगी मुरलेलें नसून अब्राह्मण चांडालापर्यंत उभ्या हिंदूसमाजाच्याच हाडीमासी रुजलें आहे! उभा समाजदेह या जात्यहंकाराच्या, या जातीमत्सराच्या, जातीकलहाच्या, क्षयाचे भावनेने जीर्णशीर्ष झालेला आहे.

## १.१२ उपेक्षा केली तर?

हिंदू राष्ट्राच्या आजच्या आत्यंतिक अपकर्षाचें हें आजचें जातीभेदाचें विकृत स्वरूप जरी एकमात्र कारण नसलें तरी एक अनुपेक्षणीय कारण आहेच हें वरील अत्यंत त्रोटक दिग्दशनावरूनही स्पष्ट दिसून येईल आणि म्हणून अशा स्थितीत आपल्या अपकर्षाच्या त्या बाह्य कारणांचा नायनाट करण्याचा प्रयत्न करणे हें आपणां सर्वांचे एक अगदी अवश्य कर्तव्य होऊन बसलें आहे. जे हिंदूराष्ट्राचें स्वातंत्र्य आपणांस मिळवावयाचें आहें ते जातीभेदाने जर्जर झालेल्या या आपल्या राष्ट्रपुरुषास जरी एक वेळी मिळविता आलें तरी या रोगाचें जोवर निर्मूलन झालें नाही तोवर एका बाजूस ते मिळविताच पुन्हा गमावण्याचाही पाया भरत जाणार आहे.

परंतु जातीभेदाच्या आजच्या विकृत आणि घातक स्वरूपाचे निर्मूलन करण्याचा हा यत्न करीत असता या संस्थेत जे काही गुणावह असेल तेंही नष्ट न होईल अशाविषयी मात्र आपण अर्थातच शक्यतो सावधान असले पाहिजे. आज पाच हजार वर्षें जी संस्था आपल्या राष्ट्राच्या जीवनाच्या तंतूतंतूंशी निगडित झाली आहे, तिच्यात आजही काहीएक गुणावह नाही आणि पूर्वीही काहीएक गुणावह नव्हते असे वैतागासरशी धरून चालणें अगदी चुकीचें होईल. यास्तव या लेखमालेत आम्ही जातीभेदाच्या मुळाशी कोणतीं तत्त्वें होतीं, त्यातला गुणावह भाग कोणता, त्याची प्रकृती कोणती आणि विकृती कोणती आणि कोणच्या योजनेने त्यातील हितावह ते ते न सोडता अनिष्ट ते ते शक्य तो टाळता येईल ह्याचें यथावकाश विवेचन योजिलें आहे.

- **(केसरी, दि. २९-११-१९३०)**

***

# २ लेखांक २ रा

## २.१ सनातन धर्म म्हणजे जातीभेद नव्हे

सर्वसाधारण लोकांचा, जातीभेदाची व्यंगे विवेचून तो सुधारण्यास किंवा समूळ नष्ट करण्यास, जो भयंकर विरोध दृष्टीस पडतो त्याचे मुळाशी बहुधा जातीभेद हाच सनातन धर्म-निदान सनातन धर्माचा अत्यंत महत्त्वाचा घटक- होय ही भ्रांती आणि त्यामुळेच जातीभेद नष्ट झाला, की सनातन हिंदू धर्म नष्ट झालाच पाहिजे ही अवास्तव भीती कळत वा नकळत निवसत असते. यास्तव जातीभेदाचे इष्टानिष्टत्वाची सांगोपांग चर्चा करण्याचे आधी जर ही आमच्या हिंदू समाजात सर्वसाधारणपणे पसरलेली भ्रांती आणि भीती दूर करता आली तर ती चर्चा पूर्वग्रहाने दूषित होण्याचा संभव पुष्कळ कमी होईल; आणि विवेकबुद्धी त्या चर्चेतून निघणाऱ्या अपरिहार्य सिद्धान्तास तोंड देण्यास अधिक निर्भयपणे सज्ज होईल.

## २.२ धर्म शब्दाचे अर्थ

एतदर्थ थोडक्यात प्रथमच हें सांगून टाकणें अवश्य आहे की, सनातन हें विशेषण आपण जेव्हा जातीभेद, विधवाविवाह, मांसाहारनिषेध किंवा अशाच इतर आचारांस व्यक्त करण्यासाठी योजितो तेव्हा त्या वेळेस त्या शब्दाच्या होणाऱ्या अर्थापासून ‘सनातन धर्म’ ह्या शब्दात होणारा सनातन शब्दाचा अर्थ निराळा असतो. इंग्लिशमधल्या Law शब्दाच्या अर्थाचा विकास आणि पऱ्याय होत होत त्याला जसे निरनिराळे अर्थ येत गेले तसेच धर्म शब्दाचेही पर्यायाने भिन्न भिन्न भाव झाले. Nature Law म्हणजे नैसर्गिक धर्म वा गुण वा नियम. जसें पाण्याचा धर्म द्रवत्व, गुरुत्वाकर्षणाचा धर्म म्हणजे नियम (law of gravity) हा एक अर्थ. दुसरा, ह्या नैसर्गिक नियमांच्या, ह्या निसर्गाच्याच मुळाशी असणारा जो नियमांचा नियम आणि तो पाळणारी किंवा त्यालाही कह्यात ठेवणारी जी शक्ती किंवा ज्या शक्ती त्या आदिनियमाचा आणि आदिशक्तीचा शोध, विचार, ज्ञान ज्यात केले जाते, ज्याने संपादिलें जाते, तोही धर्मच; पण तेथे त्याचा अर्थ तत्वज्ञान असा होता. त्या आदीशक्तीच्या आणि आदीनियमाच्या प्रकाशात मनुष्याचें ध्येय ठरवून त्याच्या प्राप्तीस्तव मनुष्याने आपली ऐहिक आणि पारलौकिक यात्रा कशी करावी याचें विवरण करणारा तोही धर्मच. पण तेथे त्याचा अर्थ पंथ, मार्ग, (A religion, a Sect, a School) असा काहीसा होतो. त्या सामान्य आणि प्रमुख नियमांचा आणि सिद्धान्तांचा निर्वाह करताना जीवनातील नाना प्रसंगांचे आणि संबंधाचेविषयी जे अनेक उपनियम केले जातात तोही धर्मच. पण तेथे त्याचा अर्थ कर्मकांड, विधी, आचार (Religious rites, Religious laws) असा होते. बायबलमध्ये जेव्हा म्हणून The law, the book of the law शब्द येतो तेथे law चा अर्थ हाच असतो. पुढे या ईश्वरकृत म्हणून समजल्या जाणाऱ्या किंवा ईशप्रेषितांनी घालून दिलेल्या म्हणून मानल्या जाणाऱ्या धर्मनियमांवाचून अंशतः तरी स्वतंत्र असणाऱ्या आणि सापेक्षतः अधिक परिवर्तनशील ठरणाऱ्या मनुष्यकृत नियमांचा उल्लेख करावा लागतो तेव्हा त्यांनाही धर्म-law म्हटले जाते. पण त्याचा तेथे निर्बंध (कायदा) Political laws असा अर्थ होतो. धर्म शब्दाच्या या भिन्न भिन्न अर्थातील फरक ध्यानात न धरल्याने सनातन

धर्म म्हणजेच जातीधर्म आणि जातीधर्म म्हणजे सनातन धर्म असा समजुतीचा घोटाळा उत्पन्न होतो.

## २.३ धर्म आणि आचार

परंतु जेव्हा आचारधर्म शब्दास सनातन हें विशेषण लावतो, तेव्हा त्याचा अर्थ ईश्वर, जीव आणि जगत्यांच्या स्वरूपाविषयी आणि संबंधाविषयी विवरण करणारें शास्त्र आणि त्यांचें सिद्धान्त, तत्त्वज्ञान असा असतो. कारण आदिशक्तीचें स्वरूप, जगताचें आदिकारण आणि आदीनियम हे मात्र खरोखरच सनातन, शाश्वत आणि त्रिकालाबाधित आहेत. भगवद्‌गीतेत किंवा उपनिषदांत याविषयीचे जे सिद्धान्त प्रकट केले आहेत ते काय ते सनातन असू शकतील. कारण जगताचें आदिकारण आणि त्याची इच्छा वा शक्ती हें बदलणें ही मनुष्यशक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे. ते जे आहेत ते आहेत, आणि ते तसेच निरवधी राहणार. मनुष्य जातची जात जरी नष्ट झाली तरी ते नष्ट होणार नाहीत. मनुष्य तर काय, पण ही उभी पृथ्वीची पृथ्वी जरी एखाद्या आडदांड धूमकेतूने आपल्या जळत्या दाढांत एखाद्या सुपारीसारखी कडकड दळून गिळून टाकली तरीही त्या महान्‌धर्माचे अस्तित्वास रेसभरही धक्का लागणारा नसून उलट ती घटना त्याच्या त्या सनातन अस्तित्त्वाची आणखी एक साक्षच होईल. यास्तव धर्माच्या ह्या अर्थासच काय ते सनातन हे विशेषण यथार्थाने आणि साकल्याने लागू शकते. अर्थातच ज्याचें जीवित अत्यंत अशाश्वत आहे त्या मनुष्यजातीच्या जीवितावरच अवलंबून असणाऱ्या, ज्यांची रूपें आणि रंग त्या अत्यंत अशाश्वत अशा मनुष्यजातीच्या अल्पकालीन इतिहासातही अनेकवार बदललेली धादांत दिसत आहेत, ज्या जवळजवळ मनुष्यनिर्मित, कृत्रिम आणि मनुष्याच्या इच्छेसरशी भंग पावणाऱ्या आहेत, त्या जातीभेद किंवा अस्पृश्यता किंवा वर्णाश्रम व्यवस्था अशा संस्थांना आपण जेव्हा धर्म म्हणून म्हणतो तेव्हा त्या धर्मास त्या अर्थी सनातन, शाश्वत, अनश्वर हें विशेषण लावणें केव्हाही संपूर्णतया अन्वर्थक होणारें नसते. कारण तेथे धर्म शब्दाचा अर्थ आचार असा असतो. त्रिकालाबाधित आदीतत्त्वाचे आदी नियम असा तेथे अर्थ नसतो. आचार मनुष्यप्रीत्यर्थ आणि मनुष्यकृतच असल्याने ते नश्वर आणि अशाश्वत असलेच पाहिजेत, आणि म्हणूनच नुसता जातीभेद तर काय पण उभे जुनें कर्मकांडचें कर्मकांड जरी बदललें गेलें तरी सनातन धर्म बुडणें शक्य नाही. सनातन धर्म बुडविणें मूठभर सुधारकांच्या तर काय; पण मनुष्याजातीच्याही हातचें नाही. प्रत्यक्ष देवाच्या हातचें आहे कीं नाही याचीही वानवाच आहे!

आणि हा विश्वाचा जो सनातन धर्म त्यालाच आम्ही हिंदू लोक सनातन धर्म म्हणतो. आम्ही त्याचेच अनुयायी आहोत की जो प्रलयानंतर असतो, नि जो प्रभवापूर्वीही असतो. जो त्रैगुण्यविषय वेदांच्या पलीकडच्या निस्त्रैगुण्य प्रदेशासही ‘विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठद्दशांगुलम्’ तो आम्हां हिंदूंचा सनातन धर्म होय! बाकी सगळे आचार, मनुष्य-सापेक्ष धर्म, मनुष्याच्या धारणार्थ योजलेल्या युक्त्या होत. ते धारण जोपर्यंत त्यांच्या योगे होईल तोपर्यत ते धर्म-ते आचार आम्ही पाळू, नाहीतर बदलू, नाहीतर बुडवू, नाहीतर नवे स्थापू. त्यांच्या बदलण्याने वा बुडवण्याने तो आम्हां हिंदूंचा सनातन धर्म बदलेल वा बुडेल ही भीती आम्हांस त्रिकालीही स्पर्श करू शकत नाही.

धर्माचीं जी मूलतत्त्वें आहेत ती स्वभावतःच सनातन आहेत. जे आचार आहेत तो आचारधर्म स्वभावतःच परिवर्तनशील आहे - असलाच पाहिजे, कारण-

न हि सर्वहितः कश्चिदाचारः संप्रवर्तते ।

तेनैवान्यः प्रभवति सोऽपरो बाध्यते पुनः ।

आज जातीभेदाच्या आचारास आम्ही बदलू पाहतो. असा आचार बदलण्याचा हिंदू समाजावर हा काही पहिलाच प्रसंग आलेला नाही. तसे असते तर सनातन धर्मास धक्का लागतो कीं काय ही शंका काही तरी विचारार्ह ठरती. पण असे शेकडो प्रसंग आजवर येऊन गेले आणि क्वचित्म्हणूनच हिंदूसमाज जिवंतच्या जिवंत आहे. इतर सर्व गोष्टी सोडल्या तरी नुसत्या एकट्या 'कलिवर्ज्य' प्रकरणाचा उल्लेखदेखील हें सिद्ध करण्यास पुरेसा आहे. संन्यासासारखे, नियोगासारखे आपल्या पूर्वयुगातील आचारधर्माचे अत्यंत महत्त्वाचे अंगभूत असलेले आचार एका श्लोकाच्या फटक्यासरशी या युगात वर्ज्य ठरविले, कारण समाजाचें धारण करण्याचे कार्य त्यांच्याकडून बदललेल्या परिस्थितीत यापुढे होणें शक्य नाही, असे स्मृतीकारांस वाटलें. पण त्यायोगे सनातन धर्म बुडाला म्हणून सनातन म्हणविणाऱ्यांना देखील वाटत नाही. उलट हे कलिवर्ज्यच सनातन धर्माच्या मुख्याचारातील एक सनातन आचार म्हणून समजतात. वास्तविक पाहता चातुर्वर्ण्य हा सनातन धर्म आहे म्हणून म्हणणारे लोकच त्या चातुर्वर्ण्याचा जवळजवळ उच्छेद करून टाकणाऱ्या ह्या जातीभेदाचे कट्टर शत्रू असावयास पाहिजेत. पण आश्चर्य असे की, हे लोक चातुर्वर्ण्यास आणि जातीभेदास दोघांसही सनातन धर्म समजतात. आणि जातीभेदाच्या आजच्या अत्यंत विकृत स्वरूपासही ते पालटलें असता सनातन धर्म बुडेल म्हणून, उचलून धरू पाहतात या घोटाळ्याचें कारण धर्म आणि आचार यांतील आरंभी दाखविलेला फरक लक्षात न येणें हें होय. चातुर्वर्ण्य काय आणि जातीभेद काय दोनही आचार आहेत. सनातन धर्म नव्हत. चातुर्वर्ण्याच्या आचारात आकाशपाताळचा भेद होऊन जातीभेदाचा आचार चालू झाला; त्यामुळे जसा सनातन धर्म बुडाला नाही तसाच जातीभेदाचें हें आजचें विकृत रूप नष्ट केल्यानेही खरा सनातन धर्म, ते ईश्वरजीव-जगत्यांच्या स्वरूपाचे आणि आदीतत्त्वाचे आणि नियमाचे सत्य सिद्धान्त बुडू शकणार नाही.

## २.४ जातीभेद हा चातुर्वर्ण्याचा उच्छेद आहे!

हें वर सांगितलेलें विधान जातीभेदाच्या इष्टानिष्टतेची मीमांसा करण्याच्या प्रस्तुत लेखमालेच्या मुख्य विषयाच्या उपक्रमातच किंचित् विशद करून सांगितले असता पुढील विवरणाविरुद्ध वाचकांच्या मनात असू शकणाऱ्या आणखी एका दूषित पूर्वग्रहाचा आणि पूर्वभयाचा निरास होणारा असल्यामुळे चातुर्वर्ण्यात आणि जातीभेदात जे महदंतर आहे त्याची आणखी थोडी फोड केली पाहिजे. चातुर्वर्ण्य म्हणजे चार वर्ण. तें चातुर्वर्ण्य गुणकर्मविभागशः सृष्ट केलेले, जन्मजात नव्हे. कारण सृष्टम्पदाचा संबंध चातुर्वर्ण्य शब्दाशी आहे. 'चातुर्वर्ण्य मया सृष्टम्' म्हणजे मी चातुर्वर्ण्य ही संस्था उत्पन्न केली. त्यात गुणधर्माप्रमाणे लोकांस जन्म देतो आणि तोही वंशपरंपरा देत राहतो या अर्थाचा मागमूसही त्या श्लोकात नाही. लोकमान्यांनी केसरी निक्षेप (Trust) उत्पन्न केला. असे म्हणताना त्यातील विश्वस्त मंडळाचे मंडळही (Board of trustees) त्यांनी जन्मजात उत्पन्न केले किंवा वंशपरंपरा नेमून दिलें असा

लवलेशही अर्थ निघत नाही. उलट प्रत्येकजण ‘जन्मना जायते शूद्रः’- जन्मतः केवळ शूद्रच असतो, पुढे संस्कारादिकांनी द्विजत्वादिक अधिकार पावतो असे स्मृतीकार स्पष्टपणे सांगतातच. परंतु तोही वाद क्षणभर बाजूला ठेवून मान्य केले की चार वर्ण म्हणून कोणी राहतच नाही! मग हिंदू समाजात चातुर्वर्ण्य तेवढे आम्ही पाळू, प्रस्थापू असे म्हणणारे माझे सनातन धर्माभिमानी बंधू सात कोटी अस्पृश्य हिंदूंना एकदम शूद्रांचे तरी अधिकार देऊन टाकण्यास सिद्ध आहेत का? - ‘ब्राह्मणः क्षत्रियी वैश्यःत्रयो वर्णाः द्विजातयः । चतुर्थरेकजातीस्तु शूद्रो नास्ति तु पंचमः ।।’ अशीं पुरातन वचनें आहेतच. मग हा पंचम वर्ग साफ मोडणें हें चातुर्वर्ण्याचा अभिमान बाळगणाऱ्यांचें कर्तव्य नाही काय? निदान एवढें जरी होईल तरी जातीभेदाने हिंदू राष्ट्राची चालविलेली हानी फारच मोठ्या प्रमाणात भरून निघेल. परंतु अस्पृश्यता ठेवलीच पाहिजे. सात कोटी हिंदूंस, म्लेच्छांना आम्ही वागवितो त्याहीपेक्षा नीचंतर पद्धतीने, वागविलेंच पाहिजे! जो हात कुत्र्याच्या स्पर्शाने विटाळत नाही तो हात आंबेडकरांच्या सारख्या शुचिर्भूत विद्वानाच्या स्पर्शाने विटाळतो असे म्हणून जे हा पंचमवर्ग निर्माण करून चातुर्वर्ण्यास हरताळ फासतात तेच चातुर्वर्ण्याचें सरंक्षक म्हणून मिरवतात आणि जे आम्ही त्या पंचम वर्णास न जुमानता अस्पृश्यता नष्ट करून आमच्या सात कोटी धर्मबंधूंना हिंदूंप्रमाणे चातुर्वर्ण्यात समाविष्ट करून घेतो आणि ते चातुर्वर्ण्य त्या प्रमाणात तरी पुनः प्रस्थापित करू पाहतो त्या आम्हांसच चातुर्वर्ण्याचे द्वेष्टे, चातुर्वर्ण्य बुडवून सनातन धर्म बुडविण्यास निघालेले पाखंड म्हणून संबोधितात! हा केवढा मतिविभ्रम आहे! तीही गोष्ट क्षणभर बाजूस ठेवू. चार वर्ण हे जन्मजात होते, हें जसे वर वादासाठी गृहीत धरले, तसेच हेंही गृहीत धरू की, हा पंचम वर्ण- हे कोट्यवधी अस्पृश्यही - चातुर्वर्ण्याच्या संस्थेस धरून आहेत. पण निदान ते जे मुख्य चार वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे तरी चारच होते ना? जन्मजात का होईनात पण हिंदू समाजाचे हे चारच विभाग काय ते होते ना?

त्यांच्या परस्परांमध्ये विवाहादी होत ही गोष्ट पितृसावर्ण्य, मातृसावर्ण्य इत्यादी आचारांच्या स्मार्त व्यवस्थेनेच सिद्ध होत असता तीही गोष्ट डोळ्याआड करून नुसते इतकें तरी खरें ना की चार विभागातील प्रत्येकात तरी बेटीबंदी आणि रोटीबंदी नव्हती? सर्व ब्राह्मण एकत्र बसू शकत, आपसांत विवाह करीत. पण या जातीभेदाची आजची स्थिती काय आहे? एका ब्राह्मणात शेकडो जाती, क्षत्रियात शेकडो जाती, वैश्यांत शेकडो जाती. शूद्रांत तर हजारो जाती, पंथ तितक्या जाती. प्रांत तितक्या जाती. व्यवसाय तितक्या जाती. पापें तितक्या जाती. अन्नें तितक्या जाती आहेत! निदान ज्या आहेत त्यांचें समर्थन ज्या तत्त्वांनी केले जाते त्या तत्त्वांनुसार तितक्या असावयास पाहिजेत. त्या सर्व बेटीबंदी केल्या या जातीभेदाने! या चातुर्वर्ण्यात बेटीबंदी होती असे गृहीत धरलें तरी रोटीबंदी नव्हतीच नव्हती. राम भिल्लिणीचीं बोरें खात, कृष्ण दासीपुत्राच्या घरी कण्यांचा भात खात, ब्राह्मण ऋषी द्रौपदीच्या स्थालीतील भाजी खात, आणि सूत्रकार ‘शूद्राः पाककर्तारः स्युः’ म्हणून आज्ञा देत. पण भागाचे विभाग, विभागाचीं शकलें, शकलांचे राईराईएवढे तुकडे रोटीबंद, लोटीबंद, बेटीबंद, संबंधशून्य, सहानुभूतिशून्य तुकडे तुकडे करून टाकले या जातीभेदाने! आणि अशा या जातीभेदाचें पालन करण्यात आम्ही चातुर्वर्ण्याचेंच परिपालन करीत आहोत असे आम्ही समजतो! खरोखरच चातुर्वर्ण्याचा आणि त्यासच जर सनातन धर्म म्हणावयाचा असेल तर सनातन धर्माचा - जर कोणी कट्टर शत्रू

असेल तर तो जातीभेदाचें निर्मूलन करू निघालेला सुधारक नसून जातीभेदासही सनातन म्हणून उचलून धरणारा ‘सनातन धर्माभिमानीच’ होय.

- (केसरी, दिनांक २-१२-१९३०)

***

# ३ लेखांक ३ रा

## ३.१ चार वर्णाच्या चार हजार जाती!

ही वर वर्णिलेली स्थिती जर कोणास असह्य अतिशयाक्ती वाटत असेल तर त्याने जातीभेदाच्या आजच्या अगदी नाकारताच न येणाऱ्या वस्तुस्थितीचें नुसते खालील कोष्टक तरी एकदा विचारपूर्वक पाहावें. ज्या तत्त्वानुरूप आणि कारणानुरूप आपल्या हिंदू समाजाचीं शकलें उडालीं आहेत त्यांपैकी दिग्दर्शनापुरताच काहींचा उल्लेख खाली करीत आहो. त्यावरून पूर्वीच्या केवळ चार किंवा फार तर पाच वर्गांचे आणि जातींचे आज हजारो वर्ण आणि जाती कशा झालेल्या आहेत, जर तो पूर्वीचा जातीभेद सनातन धर्म असेल तर हा आजचा जातीभेद त्या सनातन धर्माचा किती बीभत्स विपर्यास झाला आहे आणि त्यासही सनातन धर्म मानणें म्हणजे कसा 'वदतो व्याघातः' होणारा आहे हें शक्य तितकें विशद केल्यासारखे होईल. हिंदू राष्ट्राचे मुख्य चार तुकडे ज्या कल्पनेने पाडले तिचा वर्ग पहिल्याने उल्लेखिण्यासाठी त्या जातीभेदास -

**(१) वर्णविशिष्ट जातीभेद म्हणू** - ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, फार तर पाचवा पंचम वा अतिशूद्र. पण या चार वर्णांच्या अस्तित्वाविषयी आणि व्यवस्थेविषयीही आज तरी मुळीच एकवाक्यता नाही. 'कलावाद्यन्तयोः स्थितीः' म्हणून एक बाजूस क्षत्रिय वैश्य वर्ण सध्या मूळीच अस्तित्वात नाहीत म्हणून काही मानतात. तर छत्रपती शिवाजीपासून तो सोमवंशीय महारसंघापर्यंत इतर अनेक जाती आणि व्यक्ती आपलें क्षत्रियत्व स्थापन करतात. या मुख्य वर्णविशिष्ट भेदात पुनः ज्याने उपभेद झाले तो दुसरा -

**(२) प्रांतविशिष्ट जातीभेद** - एका ब्राह्मणात पंजाबी ब्राह्मण, मैथिली ब्राह्मण, महाराष्ट्रीय ब्राह्मण, एका महाराष्ट्रीयात पुनः कऱ्हाडे, पळशे, देवरुखे, देशस्थ, कोकणस्थ, गौड, द्राविड, गोवर्धन. इकडच्या सारस्वतांची तिकडच्या सारस्वतांशी रोटीबंदी, बेटीबंदी, तीच स्थिती क्षत्रियांची, तीच वैश्यांची, तीच शूद्रांची, कोकणस्थ वैश्य निराळे, देशस्थ निराळे. कोकणस्थ कासार निराळे, देशस्थ निराळे, कोकणस्थ कुणबी निराळे, देशस्थ निराळे. फार काय महार, चांभार, डोंब यांच्यातही पंजाब वा बंगाल वा मद्रास वा कोकण वा देश अशी भिन्नता आणि ती रोटीबंदी, बेटीबंदी उनल्लंघ्य तटांनी चिरेबंद करून टाकलेली! हरेळी चांभार आणि दाभोळी चांभार यांच्यातही रोटीबंदी-बंदीची अनुल्लंघ्य चिरेबंदी, त्यांत पुन्हा -

**(३) पंथविशिष्ट जातीभेद** - वर्ण एकच ब्राह्मण; प्रांत एकच, उदाहरणार्थ, बंगाल पण एक वैष्णव, दुसरा ब्राम्हो, तिसरा शैव तर चौथा शाक्त! वर्ण एकच वैश्य; प्रांत एकच, गुजरात वा महाराष्ट्र वा कर्नाटक वा मद्रास या पंजाब, पण एक जैन वैश्य तर दुसरा वैष्णव वैश्य तर तिसरा लिंगायत. रोटीबंदी, बेटीबंदी चिरेबंद! बौद्ध, जैन, वैष्णव, शीख, लिंगायत, महानुभाव, मातंगी, राधास्वामी, ब्राह्मो जो जो पंथ निघे त्याची त्याची पहिली महत्त्वाकांक्षा ही की, त्यांचा पंथ ज्या समाजाचा एक सलग अवयव होता त्यापासून रोटीबेटीबंदीच्या दोहाती तरवारींनी साफ कापून निराळा फेकला जावा. आणि नवीन पंथांनी जर कोठे ही सिद्धी मिळविण्यात कसूर केली

तर जुन्या 'सनातनीं'नी बहिष्काराची तिसरी तरवार आपण होऊन हाणून तो अवयव मुख्य देहापासून तोडून टाकावा. पण अशा रीतीने तो विच्छिन्न अवयव आणि हा विच्छिन्न देह दोघेहीं घायाळ होऊन दोघांचीही जीवनशक्ती क्षीणतर झाल्याची जाणीव एकासही येईना. या वर्ण, प्रांत, पंथविशिष्ट भेदांसहच या तिघांहून हानीकारक असा एक जो चौथा -

**(४) व्यवसायविशिष्ट जातीभेद** - त्याची धाड कोसळली. या व्यवसायविशिष्ट जातीभेदाने तर केवळ कहर उडवून दिला. वर्णाप्रमाणे हिंदू राष्ट्राचा कमीत कमी नऊ-दहा कोटींचा शूद्र गट तरी एक असावयास पाहिजे होता. पण दुर्दैवास ते न साहून त्याच गटाचे व्यवसायविशिष्ट, कर्मनिष्ठ जातीभेदाने तुकडे तुकडे पाडून टाकले. या एका शूद्र वर्णाच्या प्रांताप्रमाणे निरनिराळ्या जाती झाल्याच होत्या. पंथाप्रमाणे त्यातही पुनः विभाग झाले. तांबट, कासार, कुणबी, माळी, न्हावी, धोबी, विणकर, लोहार, सुतार, रंगारी, शिंपी कोण कोण म्हणून सांगावें! आणि त्या जाती केवळ दुकानापुरत्या नव्हत तर जन्मोजन्म, वंशपरंपरा, रोटीबंद, बेटीबंद, चिरेबंद! बरें, मुख्य मुख्य व्यवसायपुरत्याही नव्हेत तर एका मुख्य व्यवसायाची अशी स्वतंत्र जात तशीच आणि त्याच तत्त्वाने आणि क्रमाने त्या व्यवसायाच्या उपांगाच्याही तितक्याच रोटीबंद, बेटीबंद निराळ्या जाती! केवळ उदाहरणार्थ, कटक प्रांतातील कुंभाराची जात पाहा. त्यात काही बसून चाक फिरवितात आणि लहान मडकी करतात तर काही उभ्याने चाक फिरवितात आणि मोठालीं मातीचीं भांडीं करतात. झाले, या फरकासरशी त्यांच्या दोन भिन्न भिन्न जाती झाल्या आणि जाती म्हणजे जन्मजात, बेटीबंद, संबंध साफ तुटलेला. काही गवळी कच्च्या दुधापासून लोणी काढू लागताच त्यांची स्वतंत्र जात होऊन, तापलेल्या दुधाच्या लोण्यास काढणाऱ्या सनातन गवळ्याशी त्यांच्या बेटीव्यवहार बंद! एक कोळ्याची जात आहे. तिच्यात जे कोळी उजवीकडून डावीकडे त्याचें जाळें विणतात त्यांची जात जे डावीकडून उजवीकडे विणतात त्यांच्या जातीहून भिन्न झाली. बेटीबंद भिन्न झाली!!!

हा सर्व ब्रह्मघोटाळाही जर कोणास सनातन धर्माचा केवळ आधार आणि विकास आहे असे खरोखरच वाटत असेल तर त्यांनी सुसंगतपणासाठी तरी ते सनातनत्व आज निर्माण होत असलेल्या नव्या जातींनाही लागू करून सनातनी धर्माची बाजू अधिक उज्ज्वल करावी! नुसत्या लेखणीने लिहिणाऱ्या ब्राह्मणाची एक जात करून टंकलेखकाने (Typewriter) लिहिणाऱ्या ब्राह्मणांची दुसरी जात करावी आणि जात म्हणजे अर्थातच बेटीबंद, रोटीबंद, चिरेबंद! 'आगगाडी'य ब्राह्मणांची एक जात आणि 'मोटारी'य ब्राह्मणांची दुसरी. न्हाव्यांतही जुन्या स्थिर-पाती वस्तऱ्याने श्मश्रू करून, नवीन विलायती वस्तऱ्याने आणि केशकर्तक यंत्राने श्मश्रू करणारांची दुसरी जात करावी!

जाता जाता हें लगेच सांगून टाकतो की वरील छेदकात (पॅरिग्राफात) आम्ही ज्या अनेक जातीस शूद्र म्हणून उल्लेखिलें ते केवळ जुन्या धर्ममार्तंडीय परंपरेची भाषा अनुवादून होय. त्यांच्यातील काही स्वतःस क्षत्रिय मानीत आहेत आणि ते सर्व निर्भेळ ब्राह्मण म्हणवू लागले तरी आमची त्यास हरकत नाही. कारण गुणावाचून नुसत्या बापाचे वशिल्याने कोणासही ब्राह्मण वा शूद्र म्हणून आम्ही मानीत नाही. आणि ते ते गुण असतील तर भंग्याच्या मुलासही ब्राह्मण म्हणण्यास आम्ही सिद्ध आहोत. कर्माविषयी तर सर्व कर्मे समाजधारणार्थ अवश्य असल्याने आम्हांस सन्माननीयच वाटतात. आपल्या या हिंदू राष्ट्राच्या विराट् शरीराचे हे उभे

आडवे असे शतधा तुकडे पाडूनही समाधान न पावल्याने या भेदासुराने पुनः त्यावर तिरकस वार करण्यास जो प्रारंभ केला आहे तो पाचवा -

**(५) आहारविशिष्ट जातीभेद** - होय. वर्ण, प्रांत, पंथ, व्यवसाय एक, पण शाकाहार त्यांची एक जात; मांसाहार करतात त्यांची दुसरी! मग त्या मांसाहारीय कुटुंबात कोणी शाकाहार केला तरी त्यांची एकदा जी जन्मजात जात भिन्न झाली ती वंशपरंपरा भिन्नच राहणारी. मांसाहारी ब्राह्मण, शाकाहारी ब्राह्मण, मांसाहारी आर्य, शाकाहारी आर्य. पुनः मांसाहारातही मासे खाणाऱ्या ब्राह्मणांची एक जात तर कोंबडी खाणाऱ्यांची दुसरी, बोकड खाणाऱ्यांची तिसरी! त्याच क्रमाने आणि तत्त्वाने कांदे खाणाऱ्या सुनेची एक, बटाटे खाणाऱ्या सासूची दुसरी आणि लसूण खाणाऱ्या मुलाची तिसरी झाली नाही एवढेंच सुदैव! आपल्या इकडच्या ब्राह्मणाचे शिध्यावर आपण काकडीची फोड जशी अगदी निष्पाप सरळपणे ठेवतो तशी बंगाली ब्राह्मणाचे शिध्यावर एक लांब मासळीची फोड निष्पाप सरळपणे ठेविली जाते; पण स्वयं 'विष्णुना धृतिविग्रहः' अशा मत्स्यास खाणें हें महत्पाप समजणारा कनोजी ब्राह्मण त्यापासून उद्वेजित होत्साता त्या मत्स्याहारी ब्राह्मणाच्या जातीशी रोटीबंदी संबंध तोडून केवळ बकऱ्याचें मांस तेवढें वैदिक धर्म म्हणून स्वीकारतो. पण या सर्व भेदोत्पादक तत्त्वावरही अगदी कडी करणारा जातीभेदाचा प्रकार अजून उरलाच आहे. तो म्हणजे -

**(६) संकरविशिष्ट जातीभेद** - निसर्गाच्या विक्षिप्त लहरीने एखाद्या स्त्रीला आपल्या पोटी साप उपजलेला पाहताच जसें त्या आपल्या अपत्याचेंच आपल्या शत्रूहूनही भय वाटते तसे ज्या स्मृतींनी या संकरविशिष्ट जातीभेदास जन्म दिला त्या स्मृतीदेखील या स्वतःच्या भेसूर प्रसवास पाहून थरथर कापू लागल्या! मूळ चार वणर्र्; त्यांचे अनुलोम-प्रतिलोम पद्धतीचे पहिल्या प्रतीचे संकर त्यांनी कसेबसे मोजून त्यांस नावेंही शोधून काढलीं. ब्राह्मण स्त्री-शूद्रपुरुष यांच्या संकराने चंडाल झाला. पुनः चंडालपुरुष आणि ब्राह्मण स्त्री यांपासून अतिचंडाल झाला. पुनः अतिचंडाल पुरुष आणि ब्राह्मण स्त्री यांचा संकर - त्यांचा त्यांचा पुनः संकर, त्यांचा पुनः संकर; अति- अति- अति चंडाल! पण पुनः संकर आहेच! हें अनंत भेद, नुसते ब्राह्मण प्रतिलोमाचे! तितकेच 'अनंत' क्षत्रिय प्रतिलोमाचे, तितकेच वैश्य प्रतिलोमाचे, तितकेच शूद्र प्रतिलोमाचे, त्यांत जर का या एका 'अनंताचें' पुनः दुसऱ्या, तिसऱ्या चौथ्या, 'अनंताशी' झालेले प्रतिलोमी संकर धरले, त्यात जर का अनुलोमी संकराचे तितकेच 'अनंत' मिळविले तर नुसती चार वर्णाच्या या संकराच्या संख्येचेंही मापन स्वतः अंकगणिताच्याच आवाक्याबाहेरचें होईल ! त्यांत त्या वर्णाच्या नंतर उत्पन्न झालेल्या व्यवसायादिक वरील जातींचे परस्पर संकर मिळविले तर मनुष्य संख्येहूनही ही मनुष्याच्या जातींची काल्पनिक संख्या अनंत पटींनी भरू लागेल! हा विचार करता करता हात टेकून स्वतः स्मृतीच म्हणतात की संकरोत्पन्न जातींची 'संख्या नास्ति! संख्या नास्ति! संख्या नास्ति!' सुदैव एवढेंच की अशी ही व्यवस्थेची अनवस्था केवळ स्मृतीकारांच्या कल्पनेतच तरंगत राहिली आणि व्यवहारात तितकी उतरू शकली नाही.

तरी प्रस्तुतच्या जातीभेदाच्या मुळाशी असलेल्या भेदतत्त्वांपैकी अगदी प्रसिद्ध, प्रमुख आणि प्रचलित अशी दिग्दर्शनापुरती हीं वर्ण, प्रांत, पंथ, व्यवसाय, आहार, संकरादिक काही तत्त्वें वर

सांगितली. त्याहून जातीभेदाचे पापविशिष्ट जातीभेद-जसें महापापें करणाऱ्या बहिष्कृतांची जात-वंशविशिष्ट जातीभेद-जसे यक्ष, रक्ष, पिशाच्च, इत्यादी अवांतर प्रकार सोडूनच दिले आहेतः

जातीभेदाच्या प्रस्तुतच्या स्वरूपाची ही अशी भेसूर रूपरेखा आहे. आम्ही आमच्या यच्चयावत हिंदू बंधूंना अशी साग्रह विनंती करतो की, पूर्वीच्या चातुर्वर्ण्याचा हा प्रस्तुतचा जातीभेद मूर्तीमान्उच्छेद आहे. म्हणून आम्ही जे म्हणतो ते कां, हें समजण्यास या रूपरेखेचें त्यांनी एकदा तरी लक्षपूर्वक निरीक्षण करावे. आपल्या राष्ट्रदेहाचे हे रोटीबंद,बेटीबंद, तटबंद असे सहस्रशः तुकडे पाडणारा हा जातीभेद; ही चातुर्वण्याची मारक विकृती-हा सामाजिक क्षयरोग-अशाचा असाच भरभराटू देणें हें आपल्या राष्ट्रीय शक्तीस पोषकच आहे असे आपणशंस अजूनही खरोखरच वाटते का? नसेल तर बाह्य शक्तींनी आणि संकटांनी आपल्या पायांत आधीच ज्या परवशतेच्या अवजड बेड्या ठोकल्या आहेत त्यांचे जोडीसच ह्या जन्मजात बेटीबंद-रोटीबंद-तटबंदीच्या जातीभेदाच्या आपणच होऊन ठोकलेल्या बेड्याही आपली प्रगती अधिक च अवरुद्ध करीत नाहीत का? आपणांस अधिकच पंगू करीत नाहीत का? मग ह्या बेड्या तरी तत्काळ तोंडणें, ते काम तरी सर्वस्वी केवळ कर्तव्य नाही का? त्या बाह्य संकटाच्या बेड्या तोंडीत असताच आणि तोंडण्यासाठीच जर ह्या स्वतःच ठोकलेल्या बेड्या, ही स्वतःच गळ्यात बांधून घेतलेली भयंकर धोंड, आपण तोडून फोडून टाकून दिली, तर आपलें हिंदू राष्ट्र, ही आपली हिंदू जाती, या वा अंतर्गत यादवीच्या आणि क्षयाच्या कचाट्यातून त्या प्रमाणात तरी मुक्त होऊन जगातील इतर संघटित जातीच्या आणि राष्ट्राच्या धकाधकीच्या रणघाईत टिकाव धरण्यास आणि चढाव करण्यास अधिक शक्त होणार नाही का?

- (केसरी, दि. ९-१२-१९३०)

* * *

# ४ लेखांक ४ था

## ४.१ ह्या आपत्तीवर उपाय काय?

जातीभेदाच्या ह्या जन्मजात बेड्या तोंडण्याने जर ही हिंदू जाती अंशतः तरी, पराक्रमशाली बनलेल्या अहिंदू नि आक्रमणशील विपक्षांशी तोंड देण्यास अधिक समर्थ होणार असेल तर हा जन्मजात जातीभदे तोडण्याचा मुख्य उपाय कोणता? आमच्या मते तो उपाय एका सुत्रात सांगावयाचा म्हणजे, केवळ कृत्रिम संकेताने मानलेल्या या 'जन्मजात जातीभेदाच्या उच्छेद आणि गुणजात जातीभेदाचा उद्धार, हाच होय. कारण हा जन्मजात जातीभेद मुळी जन्मजात नाहीच. तो एका भावनेचा, वेडगळपणाचा खेळ आहे. तेवढीं भावना बदलली की, हा पर्वतप्राय दिसणारा डोलारा आपण होऊन खाली कोसळल्यावाचून राहणार नाही.

### ४.२ हा काही मूठभर ब्राह्मणांचा कट नव्हे

परंतु ही भावना बदलताना आपण प्रथम हें ध्यानात धरलें पाहिजे की, ती कोण्या चार-पाच दुष्ट वा कुटिल माणसांनी वा कोण्या एका वर्गाने आपली तुंबडी भरण्यासाठी जाणून-बुजून योजलेली एक लबाड युक्ती आहे असे मुळीच नाही. कोण्या एका दुष्ट दिवशी, सर्व जगास लुबाडण्यासाठी हा जातीभेदाचा गुप्त कट केला आणि सर्व जगाच्या पिढ्यानु-पिढ्यांच्या माना त्यांच्या दोन-चार श्लोकजालांत पक्क्या जखडून टाकल्या, असे घडणें हें जितके अशक्य तितकेंच असे समजणें हें मूर्खपणाचें होय. केवळ ब्राह्मणांचीच ही क्लृप्ती असती तर श्रीराम आणि श्रीकृष्ण हे तर ब्राह्मण नव्हते ना? मग त्यांनी तेच चातुर्वर्ण्य का उचलुन धरलें? जर म्हणाल की, क्षत्रियादिक वर्ग बिचारे भोळसर म्हणून सहज ब्राह्मणी काव्यात फसले तर - श्रीकृष्ण का भोळा होता? का समुद्रगुप्त भोळा होता? का शिवाजी भोळा होता? मी कोणास सांगितलें की, 'टाक उडी या विहिरीत नि दे जीव की झालासच तू मुक्त!' तर ते सांगणारा मी जितका लुच्चा तितकाच त्याप्रमाणे डुबदिशी उडी घेऊन मरणाराही मूर्ख! मग ब्राह्मणाचे पदरी लुच्चेगिरीचा दोष जर बांधावयाचा तर आपल्या सूर्य-चंद्र वंशातील सहस्रावधी राजर्षींच्या परंपरेस मूर्खात काढण्यास आपणांस सिद्ध व्हावयास नको काय? तो कावेबाजांचीही कावेबाज आणि प्रत्यक्ष कणिकशिष्य दुर्योधनाचीही कणीक तिंबवणारा श्रीकृष्ण तर चातुर्वर्ण्याचें उत्पादकत्व स्वत:कडेच असल्याचें सांगतो. आणि स्वतः मनू कोण? क्षत्रिय! असल्या कुशाग्र राजर्षींच्या खड्गाची आणि बुद्धीची धार भटांच्या कुशाच्या अग्रापुढे बोथट झाली असे म्हणताना भटांस अपशकून करण्यासाठी आपण आपल्याच वर्णाच्या पुरुषश्रेष्ठ पूर्वजांच्या थोरवीची नाकें कापीत आहोत हें अशा आक्षेपकांच्या लक्षात कसें येत नाही याचें राहून राहून आश्चर्य वाटते.

## ४.३ किंवा हा ब्राह्मण-क्षत्रियांचा संयुक्त कटही नव्हे

जातीभेदाची कल्पना म्हणा, कावा म्हणा, ब्राह्मणांनीच केला असेही क्षणभर मानिले तरी ब्राह्मण या अफाट हिंदू समाजात केव्हाही मूठभर असल्याने त्या मूठभरांच्या शब्दास निर्बंधाचे (कायद्याचें) कर्तुम्अकर्तुम्सामर्थ्य देणारी राज शक्ती, दंडशक्ती - The sanction behind the law

- ती कोणाची होती? क्षत्रियांचीच! बरें, ब्राह्मणांचा शब्द आणि क्षत्रियांची शक्ती, याच्या संयोगामुळेच जातीभेदाची प्रथा दीर्घायुषत्व पावली म्हणून तिचा सर्व दोष ब्रह्मक्षत्रांवरच आहे असे म्हणून वैश्यास वा शूद्रासही कानावर हात ठेवून आपले निर्दोषत्व स्थापता येणें शक्य नाही. कारण ज्या ज्या काळी तो ब्राह्मणाचा शब्द आणि क्षत्रियांची शक्ती निर्माल्यवत् झाली - जशी या आजच्या काळी - त्या काळीही वैश्य, शूद्र तर काय पण अतिशूद्रही आपआपल्या जातीस जे कवटाळून बसत आले आहेत ते कां? ते ब्राह्मणांच्या शब्दाकरिता नव्हेत, क्षत्रियांच्या शक्तीकरिता नव्हेत, तर अर्थातच स्वतःच्याच इच्छेकरिता होत! जातीभेदाच्या प्रथेने प्रत्येक जातीस आपल्या खालच्या जातीवर वर्चस्व गाजविण्याची संधी अनायासेंच मिळत असल्याने ती प्रथा सर्वांसच त्या त्या थोड्याबहुत प्रमाणात हवीशी वाटली म्हणून आपली जाती सर्वश्रेष्ठ म्हणून कोणी कितीही धडपड केली तरी जातीभेदाचेंच निर्मूलन करण्यास कोणीही इच्छीत नव्हते; तर उलट आपल्या जात्यहंकाराचें स्तोम माजविण्यातच त्या संस्थेचा ज्याने त्याने उपयोग केला आणि त्या उपयुक्ततेकरिता तिला ज्याने त्याने या वा त्या प्रमाणात उचलूनच धरलें ही खरी वस्तुस्थिती आहे. प्रत्यक्ष बुद्धकालातही जातीभेद चुकीचा आहे असे न म्हणता जातीश्रेष्ठत्वाचा, अग्रवर्णाचा, मान हा ब्राह्मणांचा नसून क्षत्रियांचा आहे एवढाच वाद कित्येत लिखाणात घातलेला आढळतो. तेव्हा आजवर जातीभेदाच्या प्रस्तुतच्या अत्यंत विकृत स्वरूपाने आपल्या हिंदू राष्ट्राची अत्यंत भयंकर हानी होत असेल तर जन्मजात जातीभेदाच्या त्या हानीचा दोष हा कोणाही एका वर्णाचे वा व्यक्तीचे माथी मारण्यापेक्षा त्या दोषाचे वाटेकरी आपण आब्राह्मणचंडाल सर्व जाती, सर्व वर्ण, सर्व व्यक्ती आहोत असेच मानणें योग्य आणि इष्ट होणारें आहे. जातीभेदाने जे कल्याण पूर्वी नि आज होत असेल वा झाले असेल त्याचें श्रेयही आपणां सर्वांचें आहे. आणि आपण सर्वांनी मिळूनच ती संस्था जर आज टिकवून धरली असेल, तिच्यापासून लाभापेक्षा आपल्या हिंदू जातीची हानी जर शतपटींने अधिक होत असेल, तर तो दोष सुधारून वा साफ उखडून टाकावयाचा असेल तर तो यत्न करणे हें कर्तव्यही आपणां सर्वांचेंच आहे. ते उत्तरदायित्व (जबाबदारी) आपणां सर्वांवर पडत आहे. एकमेकांच्या डोक्यावर चढण्याचे लठ्ठालठ्ठीत आपणां सर्वांसच ह्या सहस्रबाहुभेदासुराने अधोगतीच्या गर्तेत ढकललें. आता तीतून वर येण्यासाठी मागील उखाळ्यापाखाळ्या काढीत न बसता एकमेकांस हातभार देऊन ह्या भेदासुराच्या निर्दालनार्थ आपण सर्वांनीच एकवटून चारही बाजूंनी त्यावर घावामागे घाव घातला पाहिजे आणि त्या वेळी हेही ध्यानात धरिले पाहिजे की, चातुर्वर्ण्याचा किंवा जाती-भेदाचाही प्रादुर्भाव आणि प्राबल्य हें मूलतः समाजधारणेच्या सद्बुद्धीनेच प्रेरित झालेलें असून त्या पूर्वपुण्याईचे जोरावरच त्या संस्थेत आजपर्यंत इतका चिवट जिवंतपणा राहिला आहे.

जोवर तिच्यापासून होणाऱ्या हानीपेक्षा समाजाचा एकंदरीत लाभच अधिक होत होता तोवर आणि त्या त्या परिस्थितीत तो श्रेयस्कर असेलही. हिंदुस्थानातच नव्हे तर आऱ्याबाहेर - सुदूरवर्ती अशा इकडच्या 'प्यारेहो' च्या मिसर देशापासून तो तिकडच्या इंकांच्या मेक्सिकोपर्यंत एकाकाळी हें चातुर्वर्ण्य वा हा जातीभेद जगभर रूढ होता, पूज्य होता. काही प्रमाणात लोकहितकारकही होता. पण पूर्वी केव्हा तरी तो एकंदरीत लाभकारक होता म्हणून आज तो एकंदरीत अत्यंत हानीकारक ठरत असतानाही तो चालविणें योग्य नव्हे. 'तातस्य कूप्रोऽयम्' म्हणूनच केवळ ते क्षार जलच पीत राहणें जसें कापुरुषत्वाचें लक्षण होणारें आहे, तसेच आज

एकंदरीत त्या संस्थेपासून लाभापरीस शतपटीने हानीच अधिक होत आहे म्हणून ती संस्था सर्वथा आणि सर्वदा तशीच हानीकारक होती हें गृहीत धरणें हेंही अंध अज्ञानाचें द्योतक होणार आहे. चातुर्वर्ण्यापासून किंवा जातीभेदापासून कोणत्या काळी कोणत्या परिस्थितीत आपल्या हिंदू जातीचा किती लाभ झाला किंवा किती हानी झाली ह्याविषयीची या संस्थेची भूतकालिक चर्चा ही ह्या लेखमालेच्या कक्षेबाहेरची असल्यामुळे तिचें सविस्तर विवरण करणे येथे अप्रस्तुत होणारें आहे, तरीही जातीभेदाच्या आजच्या विकृत स्वरूपाचें विवरण करून त्या विकृतीपासून, त्या क्षयापासून आपल्या जातीच्या प्रकृतीस कशी मुक्त करता येईल हा जो ह्या लेखमालेचा मूळ हेतू आहे त्याचें विवरण करताना जातीभेदांच्या मुळाशी असलेल्या अनेक समाजहितसाधक तत्त्वांना शक्य तो धक्का न लावता त्यांतील जे हितावह ते ते शक्यतो परिपालित आणि जे जे हानीकारक ते तेच यथासाध्य त्यागण्याची आपण सावधगिरी बाळगणें अत्यंत आवश्य आहे.

विकृती म्हटली की, ती प्रकृताचाच अंशतः वा पूर्णतः असणारा कुपरिपाक होय. त्या विकृतीचा नायनाट करण्यासाठी शस्त्रक्रिया करू निघणाऱ्या शस्त्रवैद्याने त्या विच्छेदनाचे समयी (ऑपरेशनचे वेळी) मूळ प्रकृतीस कमीत कमी धक्का कसा पोचेल याविषयी पराकाष्ठेची चिंता बाळगलीच पाहिजे. जातीभेदाच्या आजच्या अत्यंत हानीकारक स्वरूपाचें जे वर्णन वर्णविशिष्ट इत्यादी प्रकारांनी केले त्यातील मुळाशी सर्वसाधारण आणि विशिष्ट अशी जी काही लोकहितकारक मूलतत्त्वें आहेत किंवा होतीं त्यांपासून होणाऱ्या बहुतेक लाभांना ज्या योजनेत आपण अंतरणार नाही किंवा त्या तत्त्वाच्या अतिरेकाने किंवा विपऱ्यासाने किंवा तदितर घातक तत्त्वाभासाने जी हानी होत आहे वा झाली ती बहुतांशी ज्या योजनेने आपणांस टाळता येणारी आहे अशीच योजना, असाच नवा आचार आपण उद्भविला पाहिजे.

आमच्या मते वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे ती योजना म्हणजे जन्मजात जातीभेदाचा उच्छेद आणि गुणजात जातीभेदाचा उद्धार ही आहे. ही आमची या वादाच्या आरंभीची प्रतिज्ञा आहे. त्या प्रतिज्ञेस सिद्धान्तत्त्व देण्यापूर्वी आता या लेखमालेच्या उत्तरार्धात वर वर्णिलेल्या जातीभेदाच्या मुख्य प्रकारात असलेलीं लाभक तत्त्वें आमच्या योजनेत कशीं प्रतिपाळलीं जातात आणि ते ते हानीकारक विपर्यास कसे टाळले जातात हे संक्षेपतः तरी दाखविण्याचा आम्ही प्रयन्त करणार आहो.

## ४.४ जन्मजात जातीभेदाचा उच्छेद आणि गुणजात जातीभेदाचा उद्धार

तो प्रयत्न करताना चातुर्वर्ण्याचा किंवा जातीभेदाच्या सर्व मुख्य प्रकारांच्या मुळाशी जे एक सर्वसामान्य असे मुख्य तत्त्व आहे त्या अनुवांशिक गुणविकासाच्या तत्त्वाची छाननी प्रथम करू, आणि नंतर त्या त्या प्रकारच्या बुडाशी जीं तदितर भिन्न भिन्न विशिष्ट तत्त्वें आहेत त्यांचेंही अनुक्रमानेंच निरीक्षण करू आणि असे दाखवून देऊ की, चातुर्वर्ण्याच्या किंवा जातीभेदाच्या संस्थेपासून झालेले वा होण्यासारखे असणारे बहुतेक लाभ जन्मजात जातीभेदापेक्षा गुणजात जातीभेदानेच अधिक प्रमाणात आपल्या पदरात पडू शकतात आणि त्या संस्थेपासून आज होणारे बहूतेक तोटे अधिक प्रमाणात टाळता येतात.

- (केसरी, दि. १३-१२-१९३०)

* * *

# ५ लेखांक ५ वा

## ५.१ अनुवांशिक गुणविकासांचें तत्त्व

मूळच्या चातुर्वर्ण्याच्या किंवा त्याचें विकृत आणि विपर्यस्त झालेलें आजचें स्वरूप जो जातीभेद त्याच्या मुळाशी जनहितकारक अशीं जीं काही तत्त्वें होतीं किंवा असावीत आणि ज्यांच्या उपकारक प्रवृत्तींच्या वशिल्यावरच आजवर ही संस्था जगत आली, त्या सर्वात अनुवंशिक गुणविकासाचें तत्त्व किंवा ज्यास थोडक्यात आपण अनुवांश (हेरिडिटी) हा शब्द आटोपसरपणासाठी योजू शकू, ते खरोखरच महत्त्वाचें आहे. पूर्वी चातुर्वर्ण्याचें रूपांतर जन्मजात जातीभेदात जेव्हा होत गेलें तेव्हा गुणजाताचें ते रूपांतर अगदी त्या तत्त्वासाठीच आणि जाणूनबुजून ह्या जन्मजाततेत झाले की काय आणि असेल तर ते एकंदरीत भूतकाळी किती उपकारक आणि व्यवहार्य झाले याविषयीची चर्चा आपण एक वेळ बाजूला ठेवू. कारण या जातीसंस्थेच्या भूतकाळातील इतिहासाचे ग्रंथन वा विवरण हा या लेखमालेचा मुख्य उद्देश नसून सध्या तिचें जे स्वरूप आढळत आहे, जो जन्मजात जातीभेद आपण पाळीत आहो, त्या प्रथेत हें अनुवंशाचें तत्त्व किती प्रमाणात आणि कशा प्रकारे पाळलें जाते आणि ते ज्या प्रकारे पाळलें जाते त्या प्रकारे ते जनहितास उपकारक होते कीं नाही आणि जर ते तसे होत नसेल तर या आजच्या जन्मजात जातीभेदाहून अन्य अशा कोणत्या प्रकारे आपण पाळलें असता ते आपणांस अधिक उपकारक होईल हें मुख्यतः पाहावयाचें आहे.

अनुवांशिक गुणविकासाच्या तत्त्वाचा किंवा अनुवंशाचा अर्थ पारिभाषिक अवडंबरास टाळून आणि प्रस्तुतच्या विषयापुरता थोडक्यात असा सांगता येईल की, एखाद्या मनुष्यात जर एखादा गुण नि प्रवृत्तीचा नि कर्माचा व्यासंग त्याने सतत चालविला असता त्याच्या संतानांतही इतर घटक समान असता तो गुण नि ती कर्मक्षमता अधिक उत्कटपणे प्रकटणें अपरिहार्य आहे. आता त्या संतानानेही जर तोच गुण पुनः पुढे वाढवीत नेला आणि तशाच गुणाच्या स्त्रीशी संबंध केला आणि ही परंपरा त्या कुळात पिढ्यान्‌पिढ्या अशीच अविच्छिन्न चालली तर तो गुण, तो स्वभाव नि ती विशिष्ट कार्यक्षमता त्या कुलात, इतर घटक समान असता, अत्यंत उत्कटपणे येऊ शकेल. हा नियम सर्व प्राणिमात्रांसही लागू आहे. हत्तीच्या पिलाची सोंड अनुवंशाने डुकराच्या पिलापेक्षा जन्मतःच आणि अनुवांशिकतःच अधिक लांब होत जाते. रूक्ष प्रदेशातही उंच उंच झाडांवरचीं तुरळक पानें खाणाऱ्या आणि त्यावरच जगणाऱ्या पशूंच्या माना अनुवंशाने जन्मतः फार लांब आणि उंच होत जातात. गोऱ्या आईबापाचीं मुलें बहुधा गोरी आणि काळ्यांची बहुधा काळी होतात. तशींच उंचांचीं बहुधा उंच, स्वरूपवानांचीं बहुधा रूपवान, धष्टपुष्टांचीं धष्टपुष्ट. एकाच वारुळात राहणाऱ्या मुंग्यांच्या राष्ट्रातही ज्या मुंग्यांस सदोदित शक्तीचीं कामें करावीं लागतात त्यांची शरीरें मुंग्यातील क्षत्रियांस शोभतील अशींच धष्टपुष्ट असतात आणि त्यांचा डंख विषारी असतो. तो अनुवंशाने जन्मतःच तसा होत जातो. प्रजननाचें काम सोपविलेल्या मुंग्यांची प्रजननेंद्रियें जन्मतःच अधिक कार्यक्षम होतात; पशूप्रजननात आपणांस हवा त्या गुणांचा घोडा वा बैल वा कुत्रा उत्पन्न करण्यासाठी आपण त्या त्या गुणांची नरमादी

निवडतो आणि त्यांच्यापासुन त्या त्या गुणांची संतती आपल्या अपेक्षेप्रमाणे बहुधा उत्पन्न होते.

प्राणिमात्रास लागू असणाऱ्या या नैसर्गिक नियमाचें बुद्धिपूर्वक अवलंबन करून, आपल्या समाजास ज्या अनेक गुणांची आवश्यकता आहे त्यांपैकी जे जे गुण ज्या ज्या व्यक्तींत उत्कटपणे आढळून येतील त्यांच्या त्यांच्यातच त्याचें शरीरसंबंध केले असता या परंपरेने त्यांच्या संतानात, कुलात आणि जातीत ते ते गुण अधिक उत्कटपणे स्थिर आणि विकसितही होत जातील अशा धोरणाने बुद्धी, शक्ती इत्यादी काही ठळक ठळक गुण निवडून त्यांचें उत्कट अस्तित्त्व असलेल्या व्यक्तीत, कुलात आणि जातीत त्यांचेच विकसन केले जावें, बीजानुबीजाने ते तेच वाढवीत जावें, त्यांना पोषक असेंच अन्न, विचार, व्यवसायादिकाविषयीचे विशिष्ट आचार त्यांस पिढ्यान्‌पिढ्या लावून घ्यावे, या सदुद्देशाने आणि शास्त्रशुद्ध तर्काने ही जातीसंस्था प्रस्थापिली गेली अशी ब्राह्मण-क्षत्रियादिक भिन्न वर्णांची आणि त्यानंतरच्या सहस्रावधी जन्मजात जातींची जी उपपत्ती लावण्यात येते ती सर्वस्वी निरर्थक आहे असे मुळीच म्हणता यावयाचें नाहीं.

## ५.२ प्रस्तुतच्या जातिभेदाचें एक सर्थमन

जातीभेदाचें जे प्रस्तुतचें स्वरूप आहे त्यात तर या अनुवंशाचें प्राबल्य निर्विवादपणे दिसून येत आहे. प्रस्तुतच्या जातीभेदाचें अत्यंत अव्यभिचारी लक्षण जर कोणचें असेल तर ते जन्मजातपणा हेंच. त्याचे जे अनेक प्रकार आम्ही गेल्या लेखांकात दिले आहेत त्या प्रत्येकाचें समर्थन काही मऱ्यादेपर्यंत या अनुवंशाचे तत्त्वाने होऊ शकते. पहिला वर्णविशिष्ट जातीभेदाचा. त्यातील वर्ण शब्दाचा अगदी उत्तान अर्थ जरी घेतला तरी ज्यांचा वर्ण अगदी 'हंसा'सारखा शुभ्र आणि रूपसुंदर असे अशा लोकांनी अगदी 'कृष्ण आणि राकट' लोकांच्या जातींशी सरसकट विवाह करून आपलें गोरेपण आणि सौंदर्य गमावणें त्यांच्या किंवा एकंदर मानवजातीच्या शरीरविकसनाच्या दृष्टीनेही अश्लाघ्यच होते. आजही, अमेरिका, आफ्रिका इत्यादी खंडांत गौर आणि सुस्वरूप युरोपियन जाती या कृष्ण आणि कुरूप जातींबरोबर सरसकट विवाह करून आपलें शारीरिक आणि मानसिक श्रेष्ठत्व बिघडवून घेत नाहीत हें केवळ स्वाभाविकच नसून आंशिकतः तरी मनुष्यविकसनाच्या दृष्टीनेही हितावहच आहे.

## ५.३ एका अर्थी संस्कार हानीकारक आहे

अशा परिस्थितीत संकर हानीकारक असून अनुवंशच हितावह असणार. वर्णाचें गुणानुरूप वर्गीकरण हा रूढ अर्थ घेतला तरी बुद्धीप्रधान बीजाचा निर्बुद्ध संकर झाला असता, इतर घटक समान असतील तर, बीजातील बुद्धीचा अपकर्ष होईलच होईल. म्हणून शक्यतो बुद्धीवंतांचें बुद्धीवंतांशीच शरीरसंबंध होणें मनुष्यजातीच्या बुद्धीविकासास हितावह होणारें आहे. जी गोष्ट रूढ भाषेत बुद्धीप्रधान ब्राह्मणवर्गाची, तीच शक्तीप्रधान क्षत्रिय वर्गाची; इतकेंच काय पण एका शूद्रवर्णात ज्या व्यवसायनिष्ठ जातीभेदामुळे अनेक तुकडे पडले त्या व्यवसायांना जन्मजात करण्यातही अनुवंशाचें हितकारक तत्त्व काही अंशी तरी पाळण्याचाच हेतू होता आणि तसे ते अगदी पाळलें जात नाहीत असेही नाही. प्रत्येक व्यवसायात कोणच्या तरी मानसिक आणि

शारीरिक ज्ञानतंतूंनी पेशीवर विशिष्ट परिणाम घडत असतो. सुताचें उदाहरण पाहा. ज्यांना लहानपणापासून सुताच्या जाती ओळखण्याचें काम करावे लागते त्याच्या बोटांनी चाचपून कळण्याइतकी तेथील स्पर्शतंतूंची जाणीव वाढलेली असते. तेच आपणास नुसत्या स्पर्शाने तितके सूक्ष्म फरक कळत नाहीत. आता तर एका पिढीत ते स्पर्शतंतू इतके विकसित होतात तर त्यांचे संततीत ते स्पर्शज्ञान उतरून ते पिढ्यान्पिढ्या तोच धंदा करीत चालल्यास त्या कुलात ते स्पर्शज्ञान उत्कटत्व पावण्याचा - इतर घटक समान असता - पुष्कळ संभव आहे.

तांबटाचे हात कणखर, सोनाराचे कुशल, लेखकाचे हलके होत जातात. तोच व्यवसाय तेच कुल वंशानुवंश करीत गेल्यास त्या गुणांचा अनुवांशिक विकास जन्मत:च होत होत त्या कलेस ते कुल अधिकाधिक सहज प्रावीण्याने उत्कर्षाप्रत नेऊ शकेल. आहारनिष्ठ जातीभेदाचें समर्थनही याच तत्त्वाने काही मऱ्यादेपर्यंत करता येईल. एकच आहार जन्मभर केल्यास त्याचे विशिष्ट गुण मनात आणि शरीरात विशिष्ट फरक करणारच. तेच संतानात संक्रमित होणार. पिढ्यान् पिढ्या तोच आहार तशाच निष्ठेने चालला तर इतर घटक समान असता त्या कुलात ते विशिष्ट गुण प्रबलत्व पावतील. शाकाहारी कुळांची किंवा जातींची मानसिक आणि शारीरिक रचनाही पिढ्यान्पिढ्या मांसाहार करणाऱ्या जातीहून विभिन्न होण्याचा उत्कट संभव आहे. शाकाहारी आणि मांसाहारी प्राण्यांत असा फरक काही अंशी आढळूनही येतो.

## ५.४ हिंदू जातीने केलेला महान् प्रयोग

अनुवांशिक गुणविकसनाच्या नैसर्गिक नियमाच्या अनुरोधाने जन्मजात जातीभेदाच्या संस्थेविषयीचें जे जें समर्थन करता येते वा करण्यात येते ते या लहानशा लेखामालेपुरते तरी आम्ही वर संक्षेपत: पण यथावत्दिग्दर्शिले आहे. खरोखरीच या जन्मजात जाती-संस्थेने अनुवंशाच्या नैसर्गिक नियमाचा लाभ मनुष्य जातीस किती प्रमाणात घेता येणें शक्य आहे याविषयीचा हा जो महान्प्रयोग ज्या आश्चर्यकारक चिकाटीने इतक्या मोठ्या प्रमाणावर, इतक्या स्फुटतेने युगानुयुगें करून पाहिला, त्याविषयी त्या प्रमाणात मनुष्य जातीने तिचें शेवटी तो प्रयोग तात्पुरता तरी फसला असे जरी मानलें, तरी देखील असा प्रयोग अशा स्वरूपात अशा कारणासाठीं असा फसतो सिद्ध करणे हेंही काही लहानसहान काम झाले असे नाही. आपल्या हिंदू जातीने ह्या जातीसंस्थेच्या महान्जातीच्या प्रयोगात जे अपयश संपादन केले त्यानेही मनुष्य जातीच्या अनुभवात एक महनीयभर टाकून तिला उपकृत करण्याचे यश संपादन केले आहे; इतकी त्या प्रयोगाचे मुळाशी असलेली शास्त्रीय दृष्टी आणि सद्बुद्धी आणि त्याचे प्रवर्तनात दाखविलेलें धाडस आणि सातत्य आश्चर्यकारक होते.

आणि म्हणूनच तो प्रयोग कां फसला आणि किती अंशाने फसला ते निश्चितपणे निरीक्षून तिची फसगत यापुढे टाळण्यासाठी समाजरचनेची पुनर्घटना करण्यातही आपण आता तसेच धाडस, तशीच शास्त्रीय दृष्टी आणि तशीच लोकहितत्परता दाखविली पाहिजे. अनुवंशाच्या मूळ तत्त्वाचीच पुन: एकदा छाननी करून त्याच्यातील उपकारक शक्तीप्रमाणेच विघातक शक्ती ही कोणची आणि त्याचप्रमाणें त्यांचें दौर्बल्य कोणचें तेही निरीक्षिलें पाहिजे.अनुवंश अनुवंश

## ५.५ अनुवंश हें गुणविकसनाचे अनन्य कारण नाही

हें निरीक्षण करू जाताना पहिली गोष्ट जी आपणांस आता शिकली पाहिजे ती ही की अनुवंश हें गुणविकासाचें एकच कारण नसते. सृष्टीची वा समाजाची रचना आणि प्रगती ही अनुवंशाच्या एकाच तंतूने पटविलेली नाही; तर या अनुवांशिक गुणविकासाचे नैसर्गिक नियमांसहच इतरही अनेक नियमांचे उभे आडवे तंतू त्या रचनेत गोवलेले आहेत. अनुवंशाने गुणविकास होतो, पण तो इतर सर्व घटक समान असले तर. यास्तव वर आम्ही आनुवंशाचे तत्त्व स्पष्ट करताना प्रत्येक स्थली 'इतर सर्व घटक समान असता' हें पालुपद घालीत आलो. पितरांचे गुण संततीत यथावत्उतरण्यास केवळ अनवंशावरच, केवळ पितरांचे बीजातील अंतर्हित गुणांवरच अवलंबून राहता येत नाही. यास्तव एकाच आईबापाचीं मुलें, अगदी जुळीं मुलेंदेखील, सर्वदा आणि सर्वांशी सारखी असत नाहीत. बीज तेच असलें तरी गर्भाचे धारणेवेळची मन:स्थिती, शरीरस्थिती, परिस्थिती, गर्भवृद्धीच्या काळातील अन्नाचे प्रकार, प्रदेशाचें वायुमान, प्रकाशाचें प्रमाण अशा कित्येक घटकांवरच गर्भजात मुलाची मानसिक आणि शारीरिक घडण अवलंबून असते. एकाच पुरूषाच्या बीजापासून दोन्ही गर्भ; एकाच स्त्रीचें उदर; पण पहिल्या गर्भाचे वेळेहून दुसऱ्या गर्भाचे वेळी नुसती मन:स्थिती बदलली तर, दुसऱ्या गर्भाची मन:स्थितीच नव्हे, तर शरीरचनाही बदलते. सूक्ष्म फरक दाखवीत बसण्यापेक्षा एखाद्या अपघातात्मक घटनेचाच उल्लेख अशा प्रसंगी अधिक परिणामकारक होत असल्यामुळे मानसिक शास्त्रसंशोधक मंडळाने प्रसिद्ध केलेल्या अनेक उदाहरणांपैकी ही एक गोष्ट सांगणें देखील पुरेशी होईल की, एका बाईस झालेल्या एका मुलाचे गालावर जन्मच: पाचही बोटांचे वळ उमटलेले होते. तिच्या दुसऱ्या कोणच्या मुलावर तसे काही एक चिन्ह नव्हते. तो असे कळलें की ती बाई गर्भवती असता तिला एकाने अकस्मात्एक गालफडात मारली होती. तिच्या गालावर तीं पाचही बोटें उठलीं होतीं आणि त्या धक्क्याने तिचें मन कित्येक दिवस हादरून गेलें होते. अर्थात्त्या मन:स्थितीचा परिणाम त्या गर्भावर इतक्या उत्कटपणे झाला की त्या गालावरील वळाचें प्रतिबिंब एखाद्या आरशासारखें त्या गर्भाच्या गालावर नित्याचें उमटून निघालें.

## ५.६ बीज हा एक घटक आहे

बरें, अन्नपाणी, प्रकाश, परिस्थिती, मन:स्थिती, शारीरस्थिती हे सर्व घटक समान राहिले आणि मूल उपजेतो बीजातील मूळ बुद्धीप्राधान्यादिक गुण जसेच्या तसेच घेऊन जन्मास आलें तरी काय? त्याच्या उपजत गुणांचा विकास नुसत्या उपजण्याने होणार नाही. त्याचें जीवन जसें नुसत्या जिवंत जन्मण्याने जगत नाही तसाच त्याच्या बीजानुगत गुणांचा विकास वा संकोच हा केवळ बीजावर अवलंबून नसून जन्मल्यानंतरच्या बाह्य परिस्थितीवरही अवलंबून असतो. मोठा दशग्रंथी ब्राह्मणाचा मुलगा. पण काही उपजत 'हरी ॐ' म्हणून वेदपठण करू लागत नाही. समजा त्याला जन्मभर काही शिक्षणच दिलें नाही किंवा अकबराने केलेल्या काही दुदैवी मुलांवरील प्रयोगात तो सापडून जन्मभर मनुष्यप्राण्याचा ध्वनी म्हणून त्याचे कानावर पडला नाही, तर तो मुलगा अगदी अक्षरश: निरक्षर भट्टाचार्यच राहणार. जन्मभर मुकाच मुका. तेच एखाद्या शूद्र 'ढ'चा मुलगा उपजत शंख, पण त्याला काहीतरी शिकवीत राहिलें तर तो त्या दशग्रंथी ब्राह्मणाच्या मुलापेक्षा निदान अधिक बोलका तरी निघेल. तसाच अगदी

एखाद्या शिवाजीचा लेक, अस्सल क्षत्रिय, पण जन्मापासून जर त्यास खायला, प्यायला केवळ मरतुकड्या अहिंसावादाचें गवत घातलें, शस्त्रास एखाद्या शापाप्रमाणे त्यास उभ्या जन्मात स्पर्शही  करू दिला नाही, आणि उपासमारीच्या सात्त्विक खुराकावाचून त्यास दुसरा खुराकच चारला नाही, तर खड्र्याच्या चढाईत ज्याची तलवार खंबीर ठरली तो हंबीर शिरूनाक महार, ढोरे ओढून महाराचे बीजाचा असताही, त्या क्षत्रिय कुलावतंसास झोंबीच्या पहिल्या पवित्र्यासच टांग मारून लोळविल्याविना कधी राहणार नाही. गुणाविकासाच्या कार्‍यात बीज हा एक घटक आहे. अनन्य घटक नव्हे.

- (केसरी, दि. २४-१-१९३१)

***

# ६ लेखांक ६वा

## ६.१ अनुवांशिक शास्त्राचा पुरावा

गर्भशास्त्रज्ञ सांगतात की, जर अखादे स्त्रीचे पोटी प्रथम संबंधापासून एक संतान उत्पन्न झाले तर तेव्हा केव्हा तिच्या गर्भाशयादि अवयवांवर नि मनावर संस्कर इतका उत्कट होतो की, तिच्या गर्भाचा तो साचा स्थिरटंकी (स्टीरिओटाइप) बळकटी पावून पुढे काही केल्या सहसा बदलत नाही आणि जरी तिचा पुढे दुसऱ्याशी विवाह झाला तरी त्या दुसऱ्याच्या संततीचें रूपरंग देखील त्या पहिल्या संबंधाच्या पुरुषाप्रमाणेच होतात. काही लोक आजच्या जन्मजात जातीभेदाचे समर्थनार्थ चटकन बोलून जातात की, अहो ते पाहा ते पाश्र्चात्य शास्त्रज्ञ देखील, ते एव्होल्युशनिस्ट देखील अनुवंशाचे, ह्या 'हेरिडिटी'च्या तत्त्वाचे कसे भोक्ते बनत आहेत ते! ते लोक हें विसरतात की, तेच गुणविकासवादी (एव्होल्युशनिस्ट) त्या अनुवंशाच्या तत्त्वाचें विवरण करताना बीजाला परिस्थितीच्या हातची केवळ ओली माती म्हणून समजतात - जर बीजानुगत गुण हे काही केल्या बदलतेना आणि त्यांचे अनुवांशिक संक्रमण केवळ बीजशुद्धीवरच अवलंबुन असते तर 'उपजातीच्या उत्पत्ती (ओरिजन ऑफ स्पेसीज) हा शब्दच उच्चारावयाची सोय नव्हती. वाघ वाघच राहता. पण परिस्थिती त्याची बिल्ली करून सोडते! घोडा घोडाच राहता, पण परिस्थिती त्याचें गाढव करून सोडते!

## ६.२ परिस्थितीचा प्रभाव

बीजाचा अगदी प्रबळ असा जो गुण, रंग, वर्ण तोदेखील स्वयमेव सिद्ध राहू शकत नाही. आर्य ब्राह्मण, वर्णाने बीजानुगत हंसासारखा गोरा, पण परिस्थिती त्यास आयर्लंड (आर्यभू) मध्ये केतकीसारखा, इराणात गुलाबासारखा, आर्यावर्तात लिंबासारखा आणि मद्रासच्या अय्यर-आयंगारांत काळा कुळकुळीत करून सोडते. केवळ सूर्यप्रकाशाच्या आणि उष्णतेच्या भिन्नतेने, जर रंगासारखे, उंची, आकार आदी देहगठनासारखे, बीजात अत्यंत दृढतेने अंतर्हित असणारे स्थूल गुण परिस्थितीने इतके बदलतात तर दया, शील, विद्या, पराक्रम इत्यादी मानसिक गुणांचें माणसामाणसांतील भिन्नत्व - जे सहसा बीजात उत्कटपणे दृढीभूत झालेलें नसते ते - परिस्थितीने किती बदलते ते सांगणेंच नको. सारांश, गुणविकास करण्याचेंअनुवंश हें संपूर्ण वा एकमेव साधन नसून तो गुणविकसनाचे कार्यातील अनेक घटकांपैकी एक घटक आहे. इतकेंच नव्हे तर त्या गुणविकासाचा दुसरा एक घटक जो संस्कार (शिक्षण), वायुमान, भौगालिक भिन्नता प्रभृती प्रकारांची परिस्थिती, तीपैकी नैसर्गिक भागास बदलण्याचें सामर्थ्य त्या बीजात इतकें अल्प असते की, त्याला जिवंत राहण्यासाठीदेखील त्या परिस्थितीशी मिळते - नमते घेण्यापुरते स्वत:च बदलण्यावाचून गत्यंतर नसते.

## ६.३ अनुवांशिक गुणविकासाच्या मर्यादा

परंतु अनुवांशिक गुणविकासाच्या नैसर्गिक नियमांच्या ह्या दोनही मर्यादांकडे दुर्लक्ष करून आजच्या जन्मजात जातीभेदात अनुवंश हा एकमेव, स्वयंपूर्ण आणि प्रबळतम घटक समजला जात आहे. आणि हीच भयंकर चूक त्या संस्थेचा इतका विचका करण्यास मुख्यतः कारणीभूत आहे. गुणविकास व्हावा म्हणून अनुवंश अवलंबिला; पण आता तो गुण विकसित तर राहोच पण मृतप्राय झाला तरी त्याची क्षिती न बाळगता, अनुवंश तेवढा असला म्हणजे गुणाचें काय काम, असे आव्हानच करणारी विचित्र भोके पडली. पण आता काप गेले याचें भान न राहता आम्ही भोकांनाच काप समजू लागलों. भोकेच कानांची भूषणें होऊन बसलीं. अनुवंश असला, जन्म त्या जातीत झाला म्हणजे तो तो गुण त्या मनुष्यात असलाच पाहिजे ही धारणा! किंबहुना तो गुण आहे कीं नाही हा प्रश्नच नाही. जन्म त्या जातीत आहे कीं नाही हा मुख्य प्रश्न! ज्याच्यामध्ये ब्राह्मणाचा लवलेश गुण नाही, जो आततायी, चोऱ्या, लबाड्या, जाळपोळी करीत अनेकवार तुरुंगाची वारी करीत आहे, ज्याच्या साती ज्ञात पिढ्यांत ब्राह्मण गुण असल्याचें ऐकिवात नाही, त्याच्या अज्ञात अशा कोण्या सतराव्या पिढीच्या पूर्वजात ते ब्राह्मण होते. म्हणून त्याचें नाव जे एकदा ब्राह्मण पडलें ते पडलें. त्या कुळात तो जन्मला एवढ्यासाठीच त्याला ब्राह्मणाचा अधिकार. गंध पाहिल्याने त्याला. 'देवा! दंडवत' त्याला. देवास शिवण्याचा अधिकार त्याला. वेदांचा अधिकार त्याला. दक्षिणा त्याला आणि ते ब्राह्मण्याचे गुण प्रत्यक्ष ज्याच्या अंगी दिसत आहेत त्याचा सत्तरावा पूर्वज केव्हातरी परिचर्यात्मक कर्म करीत असे म्हणून त्याचें नाव जे एकदा शूद्र म्हणून पडलें त्यासरशी, आणि त्या कुळात तो जन्मला म्हणूनच तो शूद्र, हीन, तो अतिशूद्र, अस्पृश्य; मग तो अरविंद घोष असला तरी आम्ही त्यास वेदघोष करू देणार नाही. महात्मा गांधी असला तरी गंधाचा अग्राधिकार त्याचा नाही. विवेकानंद असला तरी त्रिंबकेश्वराच्या जोतिर्लिंगास त्याने स्पर्शता कामा नये. चोखामेळा असला तरी त्या उपरोक्त त्याची सावली पडताच तो ब्राह्मण विटाळावा इतका तो नीचचा नीच! ज्या नंदाच्या साम्राज्याचे छातीवर नाचत म्लेंच्छ ग्रीकांनी आर्यावर्त आपल्या घोड्याचे टाचेखाली तुडविला तो नंदही एक वेळ क्षत्रिय. पण त्या वादग्रस्त सूर्यचंद्रवंशीय क्षत्रियांच्या सात पिढ्यांत जेवढें बलिष्ठ साम्राज्य कोणी स्थापलें नाही तेवढें साम्राज्य स्थापून त्या शिकंदराच्या जगज्जेत्या म्लेंच्छ सेनेचाही जो विजेता झाला तो चंद्रगुप्त क्षत्रिय नव्हे! – 'नंदान्तं क्षत्रियकुलं!' त्यास वेदोक्त राज्यभिषक होणार नाही. त्याने पराक्रमांची मात कशी केली हा प्रश्न गौण - त्याच्या पणजीची जात कोणती हा प्रश्न मुख्य! आणि असा बखेडा केवळ ब्राह्मणच घालीत, असे नव्हे. हिंदूच्या देवांच्या मूर्ती पालथ्या घालून त्यास ज्यांनी मशिदीच्या पायऱ्या केल्या त्या मुसलमानी पातशहाचे ज्यांनी पाय चाटले त्या जातीच्या क्षत्रिय बुवांनीही! त्या पातशाहीस पालथी घालून आपल्या सिंहासनाच्या पायऱ्या ज्याने केल्या आणि हिंदूपदपादशाहीचा मुकुट हिंदू जातीच्या मूर्धाभिषिक्त मस्तकी मिरविला त्या छत्रपतीस तो जातीचा क्षत्रिय नव्हे म्हणून शेवटपर्यंत हिणविण्यास कमी केले नाही. शिवाजीपुढे या जातीच्या क्षत्रियांची मान ताठ! 'तू जातीचा क्षत्रिय नव्हेस, तुझ्या विजयावळी आम्ही विचारीत नाही; तुझी वंशावळ काढ!' म्हणून यांची मागणी! पण त्या दिल्लीश्वराच्या चरणांवर यांची मानच

काय पण यांच्या मुलींचा मानही अर्पण करण्यात अस्सल क्षत्रियांची जात गेली नाही! जणू काय हे मुसलमानी दिल्लीश्वर अगदी कौसल्येच्या उदरी प्रत्यक्ष रामचंद्रासह जन्मास आले होते!

## ६.४ बीज आणि क्षेत्रशुद्धी

आनुवंशाचें असे विक्षिप्त खूळ माजण्यास त्याच्या वर उल्लेखिलेल्या मर्यादांकडे झालेलें आपलें अक्षम्य दुर्लक्षच मुख्यतः कारणीभूत झालेलें आहे. अनुवंशाच्या नियमाचा मानवहितार्थ उपयोग कोठपर्यं करून घेता येतो याचा विचार करताना वर दिलेल्या दोन गोष्टींप्रमाणेच तिसरी जी एक गोष्ट महत्वाची ध्यानात धरली पाहिजे, ती ही की, अनुवंशाने गुणविकसन होते याचा अर्थ असा असतो की, सद्‌गुणाप्रमाणे दुर्गुणाचेंही दृढीकरण किंवा विकसन होते. मनुष्याला हितावह तेवढेच गुण दृढ किंवा वृद्धिंगत करण्याचें कार्यअनुवंशाचा नियम करीत राहता तर केवढी सोय होती! पण निसर्गाच्या बहुतेक नियमांप्रमाणे, मनुष्याला जसे हे सर्व नियम माझ्याच बऱ्याकरिता देवाने निर्माण केले असे भाबडेपणाने बहुधा वाटते तसे त्या अनुवंशाच्या नियमास काही वाटतेसें दिसत नाही. तो नियम मनुष्याला मारणारे भयंकर विषारी दांत सापलाही जन्मजात देत राहतो. आरोग्याप्रमाणे आईबापात आढळणारे महारोगही संतानात उतरतात. या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्याने कित्येक मनुष्यांस कित्येक प्रसंगी मोठमोठाले अपघातही सहन करावे लागतात, लागले आहेत. अनुवंशाने सद्‌गुणच वृद्धिंगत होतात असे गृहीत धरल्याने मनुष्याने केव्हा केव्हा त्या अनुवंशावरील आपल्या निष्ठेचा इतका भयंकर अतिरेक केला की बीजशुद्धी आणि क्षेत्रशुद्धी अगदी शंभर टक्के सांभाळली जावी यास्तव बहीणभावांची लग्नें हींच अत्यंत श्रेष्ठ विवाहपद्धति होय असे मानून तोच शिष्ट कुलाचार तो पाळीत राहिला!

## ६.५ रामाची सीता कोण?

क्षत्रियात क्षात्रतेज उत्कटण्यास्तव क्षत्रियाने क्षत्रिय जातीतच विवाह केला असता ते तेज अनुवंशाने अधिक उत्कट होई, याच विचारसरणीस एक पाऊल पुढे नेलें तर हेंही मानावें लागणारच की, त्या क्षत्रिय जातीतही काही कुलें जी अधिक शूर असतात, विशेषतः राजकुल जे जवळजवळ दैविक राजतेजाचें अधिष्ठान, त्याचा जर त्याच कुळाशी लग्नसंबंध जुळत राहिला तर इतर हिणकस क्षत्रियांपेक्षा ते कुल नेहमीच अधिक शूर, आणि ते राजकुल तर दैवी संपत्तीच्या राजगुणांनी जन्मतःच संपन्न होणार! पण राजाच्या बरोबरीचा क्षत्रिय दुसरा कोण असणार? त्या अद्वितीय राजाचे गुण त्याच्या पुत्रांत आणि त्याच्या पुत्रीतच काय ते पूर्णांशाने प्रगटणार. अर्थातच त्या राजाच्या पुत्राला त्याच्या इतकीच दैवी राजगुणांनी युक्त अशी वधू त्या राजाच्या पुत्रीवाचून दुसरी कोठे आढळणार! पुरातन नील देश, मेक्सिको, ब्रह्मदेश आणि इतरही अनेक देश यांतील राजवंशात याच विचारसरणीने बहीण भावंडांचीं लग्नें प्रचलित असत. कारण राजा आणि राज्ञी ह्या मनुष्य जातीत अद्वितीय, त्यांचे ते दैवी गुण त्याच अद्वितीय बीजाने आणि त्याच अद्वितीय क्षेत्रात उत्पन्न झालेल्या त्यांच्या कुमारात आणि कुमारीत काय ते अवतरणार. अर्थात् जर बीज आणि क्षेत्रशुद्धी अगदी निर्भेळ ठेवावयाची आणि त्यायोगे ते दैवी गुणांचें अनुवांशिक विकसन करावयाचें तर त्या राजकुमाराचें लग्न त्याच्या सख्ख्या बहिणीशी लावण्यावाचून गत्यंतर नव्हते. लाट नावाच्या एका प्रेषितांचे बीज व्यर्थ जाऊ नये म्हणून

त्याच्या दोघी मुलींनी त्या आपल्या पित्याशीच संबंध केल्याची कथा बायबलात प्रख्यात आहे! बुद्धाचें कुलही सख्ख्या बहीणभावंडांच्या संबंधापासूनच आपली उत्पत्ती झाली असे मानी, आणि क्वचित् बुद्धाच्या या उत्पत्तीचें अप्रत्यक्ष समर्थन करण्यासाठी की काय बुद्धाच्या रामायणात राम आणि सीता हीं सख्खी बहीणभावंडें असून त्यांचा प्रीतिसंबंध पुढे विवाहसंबंधात परिणीत झाला असे वर्णन दिलें आहे! आणि अनुवंशाने मनुष्यास हितावह असे गुण तेवढेच जर उतरत राहते तर वरील विचारसरणी त्या प्रकारापुरती तरी जवळजवळ बिनतोंडच ठरती. आजच्या परंपरेच्या भाषेत बोलावयाचें म्हणजे समाजात ब्राह्मण जात जशी बुद्धीप्रधान तसेच त्या जातीतही एखादे नाना फडनविशी किंवा चाणक्य कुल अत्यंत बुद्धीमान ठरणारच. मग ह्या जन्मजात गुणांच्या कल्पनेपायी त्या अत्यंत बुद्धीमान् कुलांचे लग्न, बीज आणि क्षेत्र यांची अत्यंत शुद्धी राहावी म्हणून, ह्याच कुलात आणि शेवटी आपल्याच औरस संतानांत करणे अत्यंत इष्ट ठरणारच. परंतु शेवटी या विचारसरणीतील अनुवंशाच्या नियमावरील अतिरेकी निष्ठेचा त्या अनुवंशाच्या नियमानेच कसा बोजवारा उडविला, हें पुढे पाहू.

- (केसरी, दि. १३-२-१९३१)

***

# ७ लेखांक ७ वा

## ७.१ सगोत्र विवाह निषिद्ध कां?

एकाच आईबापांच्या मुलांमुलींत जशीं लग्नें होत गेलीं, तशी त्या आई बापांच्या अंगातील गुणांच्या संक्रमणाप्रमाणेच आणि केव्हा तर त्या गुणांहूनही उत्कटपणे त्या पितरांतील अवगुणही संतानांत संक्रमित होत गेले. प्रथम एकट्या बापाचाच उजवा डोळा थोडा अधू होता. तो अधूपणा त्याच्या मुलांमुलींत उतरला. आता त्यांचें बहिणभावंडांचें लग्न होताच त्या उभय वधूवरंच्या उजव्या डोळ्यातील अधूपणा त्यांच्या संतानांत, त्या नातवांत, दुप्पट प्राबल्याने संक्रमित झाला. आणि पणतू तर उजवा डोळा मुळी नित्याचा मिटूनच जन्मास आला! एकाच कुलात लग्नें झाल्याने त्या कुलातील अवगुण असे वाढीस लागतात, इतकेंच नव्हे तर कुष्ट, रक्तपिती, उपदंश, अपस्मार आदी भयानक रोग एका पिढीस होताच ते कुलचें कुल उत्सन्न होण्याच्या मार्गास कसें लागते ह्याचा अनुभव आल्यानेच सहोदर आणि सगोत्र विवाह या किंवा त्या प्रमाणात पृथ्वीवरील बहुतेक सुसंघटित समाजात निषिद्ध ठरू लागले. आता जी गोष्ट कुलाची तीच विस्तृत प्रमाणात जातीची. व्यवहारातही ब्राह्मण जात बुद्धीमान् म्हणून जशी लौकिकोक्ती तशीच किंबहुना तिच्याहूनही अधिक लोकप्रिय लौकिकोक्ती हीही आहे की, ब्राह्मण म्हणजे भित्रा नि खादाड! जातीचा बनिया व्यापारकुशल म्हणून जितका लौकिक त्याहून अधिक लौकिक हाच कीं, ‘अरे तो बनियाचा बेटा!’, जातीचा कवडीचुंबक!’ ह्या दोन्हीही लोकोक्ती जरी सारख्याच भ्रान्त आहेत, तरी अनुवंशाने सद्गुणांप्रमाणेच दुर्गुणही संतानांत उतरतात ही जाणीव जी त्यांत व्यक्त होते ती काही खोटी नाही.

## ७.२ संकराची उपयुक्तता

जातीयअनुवंशाचा कट्टर विरोधी ‘संकर’ तोच केव्हा केव्हा हितावह ठरतो. कारण अनुवंशाच्या नियमाचें परीक्षण करताना असे आढळून येतेक की, केव्हा केव्हा पितरांचे गुण संतानांत विकसित होत होत शेवटी ते ऱ्हास पावू लागतात. जणू काय व्यक्तीच्या देहाप्रमाणेच गुणांच्या देहालाही वृद्धीची एक ठराविक मर्यादा उल्लंघिताच क्षयाची बाधा होण्याचा नियम लागू आहे. अशा वेळी त्या दुर्बळ झालेल्या बीजक्षेत्रात इतर प्रबळ बीजक्षेत्रांचा संकर करणेच हितावह ठरते. संकर म्हणजे बुद्धिपूर्वक भिन्नकुलीन बीजक्षेत्रांची निवड आणि संमिश्रण असा अर्थ घेतला तर अशा संकरानेच कितीतरी इष्ट सृष्टी मनुष्य निर्माण करीत आला आहे - करू शकणार आहे. रायवळ आंब्यापासून रायवळ आंबेच होतात. हपूसच्या आंब्याच्या बीजाला बीजशुद्धीचे सात्विक कुलाचार जर घालून दिले तर त्याचें बीज मुळी निष्फळच राहते. पण हपूसचें कलम जर रायवळ आंब्यावर बांधलें, जर त्या दोन जातींचा हा संकर केला, तर त्याचा रायवळ आंब्याहून एक अत्युत्तम आंबा उत्पन्न होतो. टोमॅटोपासून टोमॅटोच होतो. बटाट्यापासून बटाटा. पण अलीकडेच त्या दोन जातींचा यथाप्रमाण संकर करून एका शास्त्रज्ञाने एक अत्यंत उपयुक्त शाकभाजी निर्माण केली आहे. तिला खाली बटाटे आणि वर टोमॅटो लागतात. तिचें नाव बटाटा-टोमॅटो!

## ७.३ संकर नव्हेच

मग ज्या जातीभेदासाठी आपण येथे विचार करीत आहो त्या आमच्या हिंदूंच्या विषयी तर बोलावयास नको. कारण या आपल्या हिंदूसमाजातील माणसामाणसांत बटाटा आणि टोमॅटो यांच्याप्रमाणे किंवा हत्ती आणि गाय यांच्याप्रमाणे, फार काय जपानी आणि नीग्रो यांच्याइतका देखील खरा नैसर्गिक जातीभेद मुळी उरलेलाच नाही. ब्राह्मण, वैश्य, शूद्र, बंगाली, पंजाबी, शिंपी, सोनार या जाती जन्मजात म्हणून केवळ मानल्या गेल्या आहेत. त्यांत जन्मजात स्वतंत्र वा नैसर्गिक अशी जातीय विभिन्नता लवलेशही नाही. त्या बव्हंशी जन्मजात जाती नव्हत्याच. त्या केवळ व्यवहाराजात, केवळ संकेतजात आहेत आणि म्हणूनच नैसर्गिक अर्थी जी एकच जात आहे तीत संकर होतो असे म्हणणें हा ‘वदतो व्याघात’च होणार!

## ७.४ संकराचीं काही उदाहरणें

पण त्या भ्रांत भाषेतच बोलल्याने ती भ्रांती निस्तरणें अधिक सोपें होणार असल्याने तेच ‘जाती’ आणि ‘संकर’ हे शब्द येथे योजून असे म्हणू की, एकाच जातीच्या पितरंच्या औरस संततीपेक्षा भिन्न जातींच्या पितरांच्या संकराची प्रजा बहुधा सबळ आणि केव्हा केव्हा तर अधिक प्रबळ निघाल्याचीं उदाहरणें आपल्यास आपल्या हिंदू इतिहासात सहस्रावधी दिसून येतील. विदुर दासीपुत्र. संकरजात प्रजा; पण औरस अशा समजल्या गेलेल्या त्याच्या त्या धृतराष्ट्र वा पंडू ह्या क्षत्रिय भावंडांहून तो किती ज्ञानी, किती सात्त्विक निघाला! त्याच्या शूद्र मातेच्या शूद्रत्वाची कुशी त्याच्या समकालीन ब्राह्मणींच्या आणि क्षत्राणींच्या कुशीहून कोणत्याही प्रकारे कमी सात्त्विक वा कमी शुद्ध वा कमी सद्‌गुणसंपन्न नव्हती. उलट कुरुराजवंशीय रावांहून ती दैवी संपत्तीने अधिकच संपन्न ठरली. चंद्रगुप्त दासीपुत्र. अस्सल बीजाच्या क्षत्रिय नंदाहून तो संकरज पुत्रच क्षात्रगुणांनी सहस्रपट श्रेष्ठ ठरला. सनातनी भविष्य पुराणातच वर्णिल्याप्रमाणे एका व्याधाच्या वीर्याने एक्या ब्राह्मण स्त्रीचे पोटी जन्मलेल्या विक्रमादित्याच्या मुख्य यज्ञाचार्यापासून तो थेट आमच्या मराठी साम्राज्याची पाटिलकी दिल्लीच्या राजपटावर गाजविणाऱ्या महादजीपर्यंत संकरोत्पन्न संतानही केव्हा केव्हा जातीच्या संतानापेक्षा अधिक तेजस्वी आणि मानवी गुणांचा अधिक विकास ज्यात झालेला आहे असे निपजते हेंच सत्य सिद्ध होत आलेलें आहे.

## ७.५ आणखी एक कारण *: गुप्त संकर!*

अमुक जातीच्या विवाहिताच्या पोटी जन्मलें म्हणजे त्या मुलाची ती जात असलीच पाहिजे किंवा त्यात त्यांच्या लौकिक पितरांचे सद्‌गुण अवतरलेच पाहिजेत हा जो आजच्या या जन्मजात जातीभेदाचा अढळ विश्वास आहे, तो आणखीही एका बलवत्तर कारणासाठी मूलतःच संशयास्पद ठरतो. ते कारण हें की या केवळ मानवी जातींचा जातीय अनुवंश पिढ्यान्‌पिढ्या शुद्ध राखणें हें अगदी दुर्घट आहे. ज्या जाती आज तरी जवळजवळ निसर्गभिन्नत्व पावलेल्या आहेत त्या कीट, कृमी, पक्षी, मानव अशांमध्ये जातीय अनुवंश विजातीय संकरापासून शुद्ध ठेवण्यासाठी स्वतः निसर्गच पाहारा देत असतो. परंतु निसर्गजात जातींच्या प्रकरणी संकरास

कट्टर विरोध करणारा हा प्रामाणिक पाहारेकरी जो निसर्ग तो स्वतःच ह्या केवळ पोथीजात असलेल्या मनुष्यामनुष्यातील जातींच्या अंतःपुरात संकराचा प्रवेश व्हावा म्हणून उलट एखाद्या सुहृदासारखा सारखी कारस्थाने करीत असतो! निसर्गाचा दंडक तरी हा आहे की -

मत्स्य प्रसवे न खगा, प्रसवें खग ना जसा कुणा पशूला

कीं, एक जाती पशूची जन्म न दे अन्य जातीच्या शिशुला ।१।।

मनूजीं न भेद तो! स्त्री असवर्णही गर्भधारणा परि ते ।

वर्णाच्या कवणाही पुरुषी संलग्न होऊनी धरिते ।२।।

आणि म्हणूनच निसर्ग आमच्या ह्या जातीभेदातील पोथीजात जातींना जात म्हणूनच मानीतच नाही. कारण जातीची मूळ व्युत्पत्तिच सांगते की, जन्मानें येतें तीच काय ती जात; पोथीने येते ती नव्हे. आमच्या त्या वैश्य, शूद्र, शिंपी, सोनार, कच्च्या दुधाचें लोणी काढणारे गवळी, तापलेल्या दुधाचें लोणी काढणारे गवळी इत्यादी केवळ आडनावें ठेविलेल्या मानीव जातींचें ते बेटीबंद अंतःपूर सुरक्षित ठेवण्यासाठी आम्ही त्या भोवती आमच्या पोथ्यापुस्तकांची चीनच्या भिंतीएवढी जरी प्रचंड तटबंदी उभारली, तरी तीस न जुमानता संकर हा लैंगिक आकर्षणाच्या पुष्पक विमानातून मनात येताच त्या तटबंदीच्या अंतःपुरात अलगद उतरल्यावाचून राहत नाही.

## ७.६ अंधनिष्ठा

समाजव्यवस्थेसाठी केलेले हे आमचे मानवी नियम आम्हांस उपयुक्त वाटतात म्हणून ते निसर्गाच्या नियमांस साफ उलथून पाडण्याइतके सदासर्वदा प्रबळ असलेच पाहिजेत अशी निश्चिती बाळगणारी निष्ठा ही आत्मवंचना आहे. ही अंधनिष्ठा समाजव्यवस्थेपुरती जरी एकवेळ अपरिहार्य असली तरी प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या अखंडनीय अशा विरोधी पुराव्यामुळे कोणत्याही वैज्ञानिक (Scientific) चर्चेत तरी ती भ्रामक म्हणूनच बाजूला सरली गेली पाहिजे. अमेरिका, युरोप, आशिया अशा सभ्य जगतांतील न्यायालयात प्रत्यही जे सहस्रावधि वैवाहिक अभियोग होतात आणि निर्णय दिले जातात ते डोळ्याआड करणे केवळ अशक्य आहे.

संसारात सर्वत्र जो पदोपदी प्रत्यक्ष अनुभव येतो, त्यावरून तर असेच म्हणावें लागते की, कोणत्याही वंशाविषयी वा कुलाविषयी किंवा घराण्याविषयी, मग ते यहुदी असो, मुस्लिम असो, ख्रिश्चन असो, वा हिंदू असो, शास्त्रीय निश्चितीने प्रतिज्ञेवर असे सांगणें हें केवळ साहसच होणारें आहे की त्या कुलात गेल्या सात वा सत्तर पिढ्यांत प्रकटपणे किंवा गुप्तपणे कुलसंकर वा जातीसंकर असा काही झालाच नाही. अशा स्थितीत अमक्या एका घरावर कधी हजार वर्षांपूर्वी ब्राह्मण वा महार वा शिंपी वा सुतार म्हणून क्रमांक पडला ह्यास्तव त्या घरात जो जो जन्मतो तो ब्राह्मण वा महार वा शिंपी वा सुतार असलाच पाहिजे; नव्हे, त्यात ते ते भटगिरीचे, महारकीचे, सुईबाजीचे, वा बाकसबाजीचे गुण उतरले पाहिजेत, नव्हे, त्याहुनही पुढे जाऊन ते तेथे दिसत नसले तरी दिसतात म्हणून मानलेच पाहिजेत अशी बळाबळाने स्वतःची समजूत करून घेणें ही किती गैरसमजुतीची गोष्ट आहे? आणि या आजच्या जातीभेदाचा जन्मजातपणा अशा या आंशिकतः तरी निराधार असणाऱ्या समजुतीवरच मुख्यतः आधारलेला नाही काय?

म्हणून पोथीजात बेटीबंदीवर उभारलेल्या या मानीव जाती निसर्गजात बेटीबंदीने निर्माण केलेल्या नैसर्गिक जातीइतक्याच परस्परांशी सर्वथैव विलग्न राहू शकतात कीं काय याची शास्त्रीय चर्चा करतेवेळी गुप्त संकराच्या अस्तित्त्वाकडेही कानाडोळा करून मुळीच चालावयाचें नाही.

## ७.७ पोथीजात बेटीबंदी

कोण्या उथळ वाचकाचा चटकन गैरसमज होऊ नये म्हणून येथे जाता जाता हें सांगून ठेविलें पाहिजे की, या चर्चेत संकर हा शब्द विवाह शब्दाचा प्रतियोगी म्हणूनच काय तो योजलेला आहे असे नाही. येथे विवाहसंस्था चांगली कीं वाईट हा प्रश्नच नाही. प्रश्न एवढाच आहे की, कुल आणि जात यांतील पोथीजात बेटीबंदीने संकर सर्वस्वी टाळता येतो की काय? जो संकर विवाहित दांपत्यांच्या व्रतभंगानेच होतो तो तर संकर आहेच; पण विवाहाचें व्रत अत्यंत अभंगपणे त्या दांपत्याने पाळलेलें असताही केवळ वधूवरांची जाती मूळचीच भिन्न होती एवढ्यासाठी तो विवाहही या प्रस्तुतच्या जातीभेदाचे भाषेत संकरच. आणि तो जातीसंकरही आजच्या या मानीव जन्मजात जातींच्या शुद्धतेस बाधच आणतो.

त्याचप्रमाणे कोण्या तात्त्विक किंवा तार्किक वाचकांचाही गैरसमज होऊ नये म्हणून हेंही सांगून टाकणें इष्ट आहे की, येथे नैसर्गिक हा शब्दही मनुष्यकृत या शब्दाचा प्रतियोगी म्हणून त्या मर्यादित अर्थीच वापरला आहे. नाहीतर निसर्गाच्या तात्त्विक नि व्यापक अर्थी हे कृत्रिम आणि हे स्वाभाविक असा भेदच उरत नाही. जें कृत्रिम, जे मनुष्यकृत, फार काय तर जे जे घडू शकते ते ते वास्तविक नैसर्गिकच आहे! तत्त्वतः अनैसर्गिक असे काही असूच शकत नाही!

- (केसरी, दि. १०-३-१९३१)

***

# ८ लेखांक ८ वा

## ८.१ जातीसंकराच्या अस्तित्त्वाचा साक्षीदार म्हणजे स्वयमेव स्मृतीच!

मानीव आणि केवळ पोथीजात जाती परस्पर संकरापासून अगदी निर्भेळ राखणें वर दाखविल्याप्रमाणे दुर्घट आहे हें सामान्यतः मान्य करूनही आमचे पुष्कळ हिंदू लोक पुनः असेच म्हणत राहतात की तो नियम साधारणपणे कितीही खरा असला तरी आमच्या चातुर्वर्ण्याच्या प्रकरणी तरी तो आम्ही खोटा पाडला आहे. ब्राह्मणक्षत्रियादिक आमच्या भिन्न जाती परस्पर संकरापासून अगदी अलिप्त अशाच आहेत; कारण त्या तशा ठेवण्यासाठी आम्ही तसाच असाधारण प्रबंध आज शतकानुशतकें ठेवीत आलों आहोत. त्यांची अशी अक्षरशः समजूत असल्याचें ते दाखवितात की ज्या कोण्या शुभ पुरातन मुहूर्ती विराट पुरुषाच्या विजृंभित मुखातून ब्राह्मण जातची जात अकस्मात्‌टपकन खाली पडून उभी राहिली आणि छाप्याचेवेळी झुडपाझुडपातून लपून बसलेले सैनिक जसे प्रकट होतात तसे त्या विराटाच्या बाहूंच्या रोमारोमांतून शस्त्रास्त्र सज्जित क्षत्रिय पटापट उड्या टाकते झाले, त्या आदीसंभवापासून आजपावेतो ह्या चार वर्णांचें रक्त, बीज अगदी निर्भेळ आणि संकररहित असेच राहात असल्याने ब्राह्मणाच्या मुलात ब्राह्मणाचे गुण उपजतच असले पाहिजेत, क्षत्रियाच्या मुलात क्षत्रियाचे नि शूद्राच्यात शूद्राचे!

पण ज्यांची अशी खरोखरच समजूत असेल त्यांचा तो अपसमज किती काल्पनिक आहे हे सर्वसामान्य अशा श्रृती, स्मृती, पुराण ग्रंथांचें पान पान सिद्ध करू शकेल. वैयक्तिक उदाहरणांचें भारूडचें भारूड सोडून दिलें तरी नुसत्या दोन चार पुरातन रूढींचा आणि श्रौतस्मार्त प्रथांचा केवळ निर्देशही आमच्या या चार जाती संकरापासून केव्हाही अलिप्त नव्हत्या हें सिद्ध करण्यास पुरेसा आहे. कारण त्या सुप्रतिष्ठित आणि शास्त्रोक्त प्रथांच्या एकेका नावात सहस्रशः वैयक्ति उदाहरणें आपण होऊनच निर्दिष्ट होतात.

आमच्या चारी वर्णात संकर हा अगदी शास्त्रोक्तपणे होत आलेला आहे. आणि आमच्या शेकडो जाती तरी मुळी संकरोत्पन्नच आहेत.

## ८.२ पितृसावर्ण्य

अगदी उद्दालक ऋषींचा संगमस्वातंत्र्याचा काळ, की जेव्हा विवाहसंस्थेचा जन्मच झाला नव्हता, तो जरी सोडून दिला तरी पुराणकथेप्रमाणे ज्या श्वेतकेतूने विवाहप्रथा प्रस्थापित केली त्यानंतरच्या काळीदेखील ब्राह्मण हे सर्व जातीच्या स्त्रियांशी अगदी शास्त्राच्या अनुज्ञेनेच लग्नें करीत; इतकेंच नव्हे तर तिन्ही वर्णाच्या स्त्रियांच्या पोटी झालेली त्यांची संतती ब्राह्मणच मानली जाई. 'त्रिषु वर्णेषु जातो हि ब्राह्मणो ब्राह्मणात्भवेत्' आणि हे भिन्नवर्णजात ब्राह्मण संतान ब्राह्मणांच्या कन्यांशी अभिन्नपणे विवाह करी. शेकडो वर्षे ही पितृसावर्ण्य प्रथा शास्त्रशुद्ध रीतीने आपल्यात चालत आल्यामुळे आम्हा ब्राह्मणांत या तिन्ही वर्णांचे रक्त पिढ्यान्‌पिढ्या संचलित होत आलेलें आहे. क्षत्रियात आणि वैश्यांतही हीच पितृसावर्ण्य प्रथा असल्यामुळे

त्यांच्यातही सर्व वर्णाचें रक्त तसेच खेळत आहे. ब्राह्मणाची आई शूद्र, मावशी वाणी आणि चुलती क्षत्रिय असे. बेटीबंदीच जिथे अशी संकीर्ण होती, तिथे रोटीबंदीची तर गोष्टच बोलावयास नको.

## ८.३ मातृसावर्ण्य

पुढे जेव्हा मातृसावर्ण्य प्रथा चालू झाली आणि आईची जात तीच मुलाची जात ठरू लागली तेव्हादेखील 'शूद्रैव भार्या शूद्रस्य सा च स्वा च विशःस्मृते । ते चं स्वा चैव राज्ञश्च स्वा चाग्रजन्मनः।।' हा मिश्रविवाहाचा प्रबंध चालू होताच. पितृसावर्ण्यमुळे ब्राह्मणात तिन्ही वर्णाचें रक्त संक्रमित झाले तर मातृसावर्ण्यात ब्राह्मणांचे रक्तबीज तिन्ही वर्णात आणि तिन्हींचे पुन्हा परस्परांत संक्रमित झालें. मातृसावर्ण्यामुळे एकाच ब्राह्मणाचा एक पुत्र ब्राह्मण, तर दुसरा क्षत्रिय, तर तिसरा वैश्य आणि चवथा शुद्र असू शके!

अशा रीतीने आमच्या समाजाचे चारी वर्ण नुसत्या लक्षणेने नव्हेत तर अगदी रक्तबीजाचे भाऊ भाऊ असत. आणि त्यातच गुणकर्मप्रभावाने एका वर्णाचे लोक अन्य वर्णात वेळोवेळी घेतले जात असल्याने, जसे विश्वमित्र ब्राह्मण होऊन किंवा सूतपूत्र कर्ण मूर्धाभिषिक्त अंगराज क्षत्रिय होऊन त्या त्या वर्णात लग्नें करून जात असल्याने चारी वर्णांत परस्परांच्या रक्तबीजांचा जीवनैघ सारखा संचलित झालेला असे.

## ८.४ अनुलोम, प्रतिलोम

त्याचप्रमाणे अनुलोम आणि प्रतिलोम प्रथा केव्हा अस्तित्त्वात आल्या हा वाद जरी बाजूस सारला तरी त्या प्रथांमुळे चातुर्वर्ण्यातील संकरापासून अनेक उपताजी उत्पन्न झाल्या, म्हणूनच सूतमगधादिकांपासून तो शूद्रपुरुषसंबंधाने ब्राह्मण स्त्रीस झालेल्या आणि चांडाळ म्हणून मानलेल्या आमच्या पूर्वास्पृश्य बांधवापर्यंत ब्राह्मणादिक वर्णांचे रक्तबीज संकीर्ण झालेलें आहे. आम्हा सर्व जातींच्या नसानसातून परस्परांचे रक्त प्रवाहत आहे ही गोष्ट काही कोणासच नाकारता येणें शक्य नाही.

श्रृतीस्मृतीपुराणोक्त अशी अगदी निर्भेळ सनातनी मुद्राच ज्या प्रथांवर मारलेली आहे त्या पितृसावर्ण्य, मातृसावर्ण्य, अनुलोम आणि प्रतिलोम ह्याच प्रथांवरूनदेखील हें निर्विवाद सिद्ध होऊ शकते की चारी वर्णांत काय किंवा संकरोत्पन्न चारशे जातींत काय अगदी निःसंकीर्ण अनुवंश असा कुठेच राहिलेला नसून अगदी शास्त्रोक्त विवाहांचे आणि संगमाचे द्वारेच रक्तबीजांचा परस्परसंकर पिढ्यान्‌पिढ्या होत आला आहे. आणि म्हणूनच अनुवांशिक गुणविकासाच्या नियमान्वयेच आमच्यांत परस्परांचे गुणवगुणही संकीर्ण झालेले आहेत.

## ८.५ एक पांडवांचे कूळच पाहा

उदाहरण हवें असेल तर पांडवाचेच कूळ घ्या. ते कूळ म्हणजे धर्मसंरक्षक आर्योत्तंस प्रत्यक्ष सम्राट भरताचें-कोणी एखादें हीन, अमंगळ कूळ नव्हे! आणि तो काळ म्हणजे 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं' म्हणून घोषणा करून चातुर्वर्ण्याची हमी घेतलेल्या पूर्णावतारी श्रीकृष्णाचा-कोणचा एखादा

'ह्या मुसलमानांनी सारा घोटाळा केला हो'- किंवा 'ह्या बुद्धाच्या पाखंडाने ही अनवस्था माजली हो' -म्हणून रडत दुसऱ्याच्या माथी सर्व दोष मारणारा धर्मऱ्हासाचा दुबळा काळ नव्हे! अशा त्या काळीच विशुद्ध चातुर्वर्ण्याचे वाळवंटी बंधारे फोडून आमचा जीवनौघ वाहत होता! प्रतीपाने शंतनूस सांगितले, 'राजा, ही स्त्री कोण, कुठली, काय जात, असे काही एक न विचारता तिच्याशी लग्न कर' त्यावरून अज्ञात जातीच्या गंगेशी शंतनूने लग्न केले. त्याचा मुलगा भीष्म, अभिषेकार्ह क्षत्रिय झाला. पुढे शंतनूने, तिची जातगोत माहित असूनही उघडपणे एका कोळ्याच्या मुलीशी, सत्यवतीशी विवाह करून तिला पट्टाभिषिक्त राणी केली तरी शंतनूची जात गेली नाही. इतकेंच नव्हे, तर त्या कोळ्याच्या मुलीचे मुलगे चित्रांगद आणि विचित्रवीर्य दोघेही भारतीय ब्राह्मणांचे शास्त्रोक्त सम्राट झाले. पुढे त्या कोळ्याच्या मुलीचे मुलगे विचित्रवीर्याने, अंबिका नि अंबालिका या क्षत्रिय राजकन्यांशी लग्नें लावलीं. परंतु तो निपुत्रिक मरण पावल्याने त्या राण्यांपासून नियोग पद्धतीने संतती उत्पन्न करण्यासाठी त्यांची ती सासू, कोळ्यांची मुलगी, देवी सत्यवती, श्रीमान् व्यासास प्रार्थना करती झाली.

परंतु व्यास कोण? ब्राह्मणश्रेष्ठ पराशरपुत्र; आणि ते ब्राह्मणश्रेष्ठ पराशर कोण? 'श्वपाकाच्च पराशरः।।' एका अस्पृश्य श्वपाकाचा पुत्र. त्या अस्पृश्याचा हा पुत्र पराशर ब्राह्मणश्रेष्ठ ठरला. त्या ब्राह्मणश्रेष्ठ पराशरास कोळीण कुमारीपासून जो पुत्र झाला तोच महाज्ञानी, महापती, महाभारतकार व्यास होय!

बरें झाले! कोण्या ब्राह्मण, क्षत्रियापेक्षा श्वपाकापासूनच ब्राह्मणश्रेष्ठ पराशर मुनी उत्पन्न झाला. बरें झाले! कोण्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य ज्ञातीतील कोण्या कुमारिकेशीच पराशराने संबंध केला नाही! नाही तर क्वचित्आम्हांस व्यासासारख्या लोकोत्तर पुरुषास आंचवावें लागते. पण पराशराहून सवाई पुत्र जींत निपजावा अशी ती धीवरकन्या त्या महाऋषीस मोहिती झाली म्हणून बीजक्षेत्रांची अशी अलौकिक निवड झाली की त्या संबंधापासून व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं अशी सार्थ गर्वोक्ती ज्याच्या अलौकिक प्रतिभेमुळे आज आम्हांस करता येते तो व्यासासारखा भारतकुलावतंस पुत्र निर्माण झाला! कृष्णद्वैपायनासारखा, श्रीकृष्णाने देखील ब्राह्मण म्हणून वंदावा आणि भारतीय सम्राटाच्या मुकुटाने ज्याची चरणधूली मस्तकी धरावी, असा पुत्र जो संकर प्रसवतो तो संकरच खरा शास्त्रोक्त विवाह होय! ज्याने संतती हीनतर होते तोच संकर - मग तो सवर्ण विवाह का असेना! 'संकरो नरकायैव' असे त्या संकरास काय ते म्हणता येईल! संतती उच्चतर प्रसवतो तो संबंध असवर्ण असला तरी खरा विवाह! असा संकर 'नरकाय' नसून 'स्वर्गाय' कल्पिला जातो.

त्या महर्षि व्यासांनी वरील क्षत्रिय राण्यांशी नियोगाधारे संलग्न होऊन पांडू आणि धृतराष्ट्र यांना जन्म दिला आणि त्यांच्या शुद्र दासीपासून विदुरास उत्पन्न केलें. हे तिघेही भावांप्रमाणेच त्या राजकुलात वर्तत होते. पुढे पंडूच्या अनुज्ञेने त्याच्या दोघी स्त्रियांनी कुंतीने आणि माद्रीने कोण्या अज्ञात पाच पुरुषांशी संलग्न होऊन पाच पांडवांना जन्म दिला. त्या कुंतीदेवीलाही पूर्वी कौमार्यातच सूतपुत्र कर्ण झाला होता. त्या सूतपूत्र कर्णास दुर्योधनाने क्षत्रियांचा मुख्य गुण, कुल हा नसून, शौर्य हा आहे अशी घोषणा करीत गुणकर्मानुसार क्षत्रिय ठरवून अंग राज्याभिषेक केला. भीमाने तर राक्षस जातीच्या हिंडिबेशीदेखील लग्न लावलें.

श्रीकृष्णानेही जांबुवन्तीशी आणि कुब्जेशी लग्नें लाविलीं होतींच. अर्जुनाने नागकन्येशी गांधर्व विवाह केला. पण त्यांचेपैकी कोणीही जातीच्युत झाला नाही.

पुरें झाले! या एका आर्यश्रेष्ठ पांडव कुलाच्या ग्रथित इतिहासावरून त्या काळची सहस्रशः अग्रथित उदाहरणें सहजच अनुमित होत असल्याने आजकाल आपलें हिंदुराष्ट्र जसें बेटीबंदी, रोटीबंदी, लोटीबंदीच्या चिरेबंदीने चिणून टाकलेलें आहे तसेच त्या काळी ते मुळीच नव्हते, हें कोणासही नाकारता येणार नाही. बुद्धकालात तर जातीसंस्था बोलून चालूनच तुच्छ झालेली होती. अशोकाची आई ब्राह्मणी! वैश्यसम्राट श्री हर्षाची मुलगी क्षत्रियास दिलेली. यक्ष, तक्षक नागादी राजकुलेंही क्षत्रियच समजलीं जाऊ लागल्यापासून तर आर्य क्षत्रियांचे त्यांच्याशीही बेटीव्यवहार होत गेले.

जातीवर्णात अगदी शास्त्रोक्त रक्तबीज संबंध जिथे असे होत होते तिथे जातीजातींतील स्त्रीपुरुषांच्या लैंगिक आकर्षणाने ते गुप्तपणे ह्याहून कितीतरी पटीने होत असले पाहिजेत. आज जातीजातीत बेटीबंदी इतकी कडकपणे पाळण्याची इतकी पराकाष्ठा होत असतानाही लैंगिक आकर्षणाने जर वर्णसंकर इतक्या मोठ्या प्रमाणात धडधडीत चालू आहे तर ज्या वेळी ती बेटीबंदी शास्त्रतःच आणि व्यवहारातःच इतकी सैल होती त्या वेळी जातींजातींतील रक्तसंबंध किती अधिक प्रमाणावर चालू असेल हें निराळें सांगावयास नको.

आतापर्यंत केलेल्या अनुवंशाच्या छाननीचा सारांश असा आहे की, अनुवंश शुद्ध राखला असता गुणविकास किंवा गुणदृढीकरण होते, हा नैसर्गिक नियम जरी अंशतः खरा असला तरी त्याच्या आधारावरच आजच्या बेटीबंदीचे आणि जातीभेदाचे समर्थन करताना आपण खालील मर्यादा ध्यानात धरल्या पाहिजेत.

(१) गुणविकासाचा अनुवंश हा एकच घटक नसून तो अनेक घटकांतील एक घटक आहे.

(२) अनुवंश शुद्ध ठेवला तरीही प्रकाश, अन्न, पाणी, वायुमान, पितरांची मनःस्थिती, त्यांचेवरील संस्कार, शिक्षण, संधी, साधनें इत्यादी प्रकाराची परिस्थिती जशी बदलते तसे संतानाचे बीजभूत गुण भिन्न भिन्न प्रमाणात विकास वा संकोच पावतात किंवा पालटतात.

(३) अनुवंश शुद्ध राखला तरीही सद्‌गुणप्रमाणेच दुर्गुणही वर्धन वा दृढीकरण पावतात, आणि म्हणूनअनुवंश हा केव्हा केव्हा अत्यंत हानीकारक ठरून संकरच दोष वा दुर्गुण संतानांतून काढून टाकण्याचे कामी समर्थ नि हितकारक ठरतो.

(४) अनुवंश शुद्ध राखला तरीही पितरांचे सद्‌गुण काही वेळ विकास पावत जाऊन पुढे आपण होऊनच क्षीण होत जातात किंवा विकृत होतात. अशा वेळीही संकर प्राण्यांना हितकारक ठरतो.

(५) निसर्गजात जातीतअनुवंश शुद्ध राखणें सुकर आहे; केवळ मानीव, केवळ पोथीजात जातीत अनुवंश एकसारखा निर्भेळ राखणें जवळजवळ अशक्य आहे.

(६) आणि ब्राह्मणादिक ज्या जातीत आज परस्पर बेटीबंदी अत्यंत कडक आहे त्या आपल्या हिंदू जातीजातींतही शास्त्रानुरोधानेच पूर्वी पिढ्यान्‌पिढ्या अन्योन्य रक्तबीजाचा ओघ अखंड वाहात असल्याने आणि लैंगिक आकर्षणाने होणारा गुप्त संकर सदोदितच या किंवा त्या

प्रमाणाने प्रवाहित राहात आला असल्याने आणि पुढेही राहणारच असल्याने आता केवळ विवाहापुरती बेटीबंदी कितीही कसून चालू ठेवली तरी ब्राह्मणाचा मुलगा उपजतच ब्राह्मणगुणसंपन्न वा क्षत्रियाचा क्षत्रियगुणसंपन्न असलाच पाहिजे असा समज मूलतःच त्याज्य ठरतो आहे. कारण आमच्या सर्व जातींचा अनुवंश पिढ्यान्‌पिढ्या संकीर्ण होत आल्यानेअनुवंशाच्या नियमांप्रमाणेच आणि त्या नियमापुरते तरी कोणच्याही जातीस कोणातरी विशिष्ट गुणांचे एकस्व (Monopoly) मिळणे असंभव आहे.

## ८.६ प्रत्यक्ष अनुभव

या तात्त्विक तर्काने अनुमित झालेल्या सिद्धान्तास व्यावहारिक अनुभवाचाही पाठिंबा एकसारखा मिळत आलेला आहे. आईबापाप्रमाणेच मुलें निघत नाहीत हा अनुभवही सार्वत्रिक आहे. श्रीकृष्णाचा एकही पुत्र श्रीकृष्ण निघाला नाही. डोळस व्यासांचा मुलगा अंधळा धृतराष्ट्र आणि सच्छील व्यासांचे नातू दुर्योधन, दुःशासन. शुद्धोदनाचा पुत्र बुद्ध आणि बुद्धाचा पुत्र राहुल! आपल्या कन्यकांचे बळाने नुसते मुखावलोकन करू इच्छिणाऱ्या म्लेंच्छास, रक्तस्नान घालणारे चितोंडचे प्रतापी महाराणे आणि त्यांचे पोटी, आपल्या कन्यका कोणी बळाने हरण करील म्हणून आपल्या पोटच्या कुमारींनाच विषाचे घोट पाजून ठार मारणारे नंतरचे भीमसिंगी महाराणे! शिवाजीचा पुत्र संभाजी आणि संभाजीचा शाहू! पहिल्या बाजीरावाचा पुत्र राघोबा आणि नातू दुसरा बाजीराव! किंबहुना उभ्या पृथ्वीचे इतिहासात कोणी शककर्ता म्हटला की त्याच्या चार, पाच पिढ्यांचे आतच कोणीतरी दुबळा राज्यविनाशक पुत्र निपजावयाचाच, असा प्रकार जवळजवळ एखाद्या सिद्धान्तसारखा आढळून येतो. कारण केव्हा केव्हा एखाद्या बीजातील अन्तर्हित शक्ती एखाद्या पुरुषात परम उत्कर्ष पावून खर्चून गेली की ते बीज एखाद्या भारतीय युद्धात रिक्त झालेल्या भात्याप्रमाणे नित्याचेंच क्षीण होऊन जाते आणि पुढील पिढीत त्यातील पहिलें तेज संक्रमित होत नाही.

## ८.७ म्हणून प्रत्यक्ष गुणच पाहणें बरें!

आईबापांप्रमाणे संतती होत नाही हा अनेक वेळा व्यवहारात येणारा अनुभव, अनुवांशिक गुणविकासाचा नियम खरा असताही कां येतो हें त्या नियमांच्या वर केलेल्या छाननीवरून आता जातीभेदाला अवश्य तितकें तरी विशद झालेलें असल्यामुळे आपल्या प्रस्तुतच्या जातीभेदाची उभारणी जवळजवळ सर्वस्वी याअनुवंशाच्या तत्त्वावरच करण्यात आपली काय चूक होते आहे आणि ती सुधारण्यास आपण त्यात काय फेरफार केला पाहिजे हें आपोआपच सूचीत होणारें आहे. आपण बेटीबंदीचें आणि म्हणूनच तज्जन्य प्रस्तुतच्या शतशः जातींचें समर्थन कां करतो तरअनुवंशाने ते ते गुण त्या त्या जातीत विकास वा दृढीकरण पावतात आणि संकराने ते गुण गढुळ होण्याची आपत्ती येते म्हणून. म्हणजे आपणांस चातुर्वर्ण्यात बुद्धी, शक्ती प्रभृती विशिष्ट गुणांचा विकास हवा म्हणून. तर मग वधूवरांत ते गुण प्रत्यक्षपणे आहेत कीं नाहीत हें आपण विशेषतः पाहिलें पाहिजे. तीं वधूवरें अमुक जातींतली आहेत वा अमुक कुलांतली आहेत एवढेंच पाहून चालणार नाही. कारण वर दिलेल्या सहा, सात कारणांमुळे आणिअनुवंश हा गुणविकसनाचा एकमेव घटक नसल्यामुळे अमुक जात किंवा अमुक आईबाप असले की

संतानात अमुक गुण असलेच पाहिजेत, असे निश्चिपणे केवळ अनुवंशाच्या आधाराने मुळीच तर्किता येत नाही. त्यातही केवळ पोथीजात, केवळ मानीव, केवळ काल्पनिक विभिन्नतेवर उभारलेल्या आमच्या ह्या प्रस्तुतच्या जातींविषयी तर असे मानणें ही अगदी आंधळी समजूत आहे. एवढ्यासाठी तर असे मानणें ही अगदी आंधळी समजूत आहे. एवढ्यासाठी सध्या केवळअनुवंशावरच अवलंबून राहणारी बेटीबंदी तोडून टाकून प्रत्यक्ष गुणावर अवलंबून असणारी बेटीबंदी जर आपण अनुसरू लागलो तर आपला मुख्य उद्देश जो सद्‌गुणविकास तो अधिक निश्चितीने आपण साधू शकू. वधूवरें अमक्या जातीचीं असलीं की त्यात त्या जातीचा मानीव गुण असतोच असे नाही. कारण गुण हे केवळअनुवंशाने उतरत नाहीत, वाढत नाहीत; आणि आपणांस मुख्य काम तर गुणांशी आहे,अनुवंशाशी नाही. तेव्हा ज्या वधूवरांस तो इष्ट वा अपेक्षित गुण प्रकट झालेला असेल - मग तो केवळअनुवंशाने उतरलेला असो वा परिस्थितीने असो - त्या वधूवरांचें लग्न लावल्यानेच आपल्या जातीभेदाच्या मुळाशी असलेला गुणविकासाचा हेतू साध्य होण्याचा संभव अधिक. मग त्या वधूवरांची मानीव जात कोणची का असेना. लग्न ठरविताना मंगळ वा शनी त्या वधूवरांस कोणच्या स्थानी आहे ह्या नसत्या भानगडीकडे आपण जितकें लक्ष देतो तितकें जरी वधूवरात आपण त्यांच्या संतानात अपेक्षा करतो तो गुण प्रकटलेला आहे की नाही हें पाहण्यात लक्ष देऊ, तरी अनुवांशिक गुणविकास करण्यात आपण आजच्यापेक्षा पुष्कळ अंशीं समर्थ होऊ. बीजाला अनुरूप फळ लागेलच हें जितक्या निश्चितपणे सांगता येते त्याहून शतपट निश्चितपणे फळ लागल्यावर ते अनुरूप बीजाचें होते असे सांगता येते. तसेच एक वेळ व्यक्तीत गुण प्रकट झाला की त्याचाअनुवंश वा जाती अमुक असलीच पाहिजे हें ठराविणें तितकें धोक्याचें नाही की जितकें ती व्यक्ती अमुक पिढीजात जातीची आहे एवढ्यावरून त्या व्यक्तीत त्या जातीचा तो मानीव किंवा पोथीजात गुण असलाच पाहिजे हें सांगणें धोक्याचें आहे. जर तो गुण प्रकट झाला तर त्याची अनुवंश, परिस्थिती इत्यादी कारणे  ठीक जुळलीं असलींच पाहिजेत हे प्रत्यक्ष सिद्ध होते, आणि जर गुण प्रकट झालेला नसेल तर त्या नुसत्याअनुवंशाला काय चाटायचें आहे? गुण प्रकट नसेल, तर त्या प्रमाणातअनुवंशे ठीक असली तर परिस्थिती ठीक नसेल. त्याशी कर्तव्य! संतानात गुणविकास हवा, तर तो गुण प्रत्यक्षपणें त्यात दिसत असेल त्या वधूवरांचे संबंध करावे, मग तो गुण त्या वधूवरांत अनुवंशबळे एकवटलेला असो वा परिस्थितीमुळे असो. आजच्या आमच्या हिंदूसमाजात ज्यांच्यामध्ये केवळ पोथीत तसे लिहिलें आहे ह्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही सहज लक्षणाने विभिन्नत्व दिसून येत नाही अशा ब्राह्मण, शूद्र, शिंपी, सोनार, वाणी, लिंगायत, गवळी, माळी आदी सहस्रश: उपजतच भिन्न असणाऱ्या जाती मानणें ही मूळ चुकी! त्यात त्या प्रत्येक जातीविषयी महादेवाच्या जटेपासून अमुक जात निघाली, ब्रह्मदेवाच्या बेंबीपासून तमुक निघाली अशा काल्पनिक भाकड उपपत्त्या अक्षरशः खऱ्या मानून त्या उपत्त्यांप्रमाणे त्या त्या जातीच्या अंगी एकेक विशिष्ट गुण उपजतच असतात, असे ठाम ठरवून टाकणें ही घोडचुकी!! आणि तो गुण त्या जातीच्या संतानात प्रकट झाला नसला तरी तो असेलच असे समजून, त्या गुणानुरूप मानपान, सोयीगैरसोयी, उच्चता-नीचता त्या जातीतील त्या संतानात उपजत भोगावयास लावणें ही पाहाड चुकी!!! आणि म्हणे हेंच ते आमच्या ऋषींनी शोधून काढलेल्या अनुवांशिक गुणविकासाचें सनातन रहस्य!!!

जर एखाद्या मुलीचें नाक नकटें असलें तर तिच्या पडपणजीचें नाक अगदी चाफेकळीसारखें सुंदर होते म्हणून आम्ही हिचेंही सुंदर म्हणत नाही; तर त्या अनुवांशिक गुणविकसनाच्या त्या सनातन रहस्याची लवलेश पर्वा न करता तिच्या प्रत्यक्ष दिसणाऱ्या नकट्या नाकामुळे तिला नकटीच म्हणतो आणि तिच्या लग्नाला सतराशे विघ्नें उपस्थित करतो. जर एखाद्या मुलाचा डोळा उपजतच गेलेला असला, तर त्याच्या एखाद्या पणजाचे दोन्ही डोळे अगदी कमलासारखे प्रफुल्ल होते म्हणूनच त्या मुलास कमललोचन न मानता आपण काणाच मनातो; मग तोच न्याय चातुर्वर्ण्याच्या पोथीत नोंदलेल्या (रजिस्टर) गुणांस का लागू नये? जर ब्राह्मणवंशात एखादा 'ढ' निघाला तर त्याला 'ढ'च म्हटले पाहिजे आणि शूद्रात 'ज्ञ' निघाला तर त्याला 'ज्ञ'च म्हटले पाहिजे, मग त्याचा बाप वा आजा वा पणजा 'ढ' असो वा 'ज्ञ' असो.अनुवंश बरोबर उतरला असेल तर तो गुण प्रकट होईलच. आणि गुण प्रकट झाला नसेल तरअनुवंश वा परिस्थितीच्या  वा इतर कोणच्या तरी गुणविकासाच्या घटकात घोटाळा झालेला असलाच पाहिजे.

कोणी म्हणतात व्यक्तीचे गुण नेहमी मुलात उतरतातच असे नाही. ते तिसऱ्या चौथ्या पिढीतही प्रादुर्भूत होतात. होय, होतात! पण केव्हा, केव्हा! आणि मुळी होतही नाहीत केव्हा, केव्हा! ते जेव्हा प्रकट होतील तेव्हा त्यांना मानूच मानू - पण कोण्या गवयाचा सुरेल आवाज त्याच्या पणतूत सनईसारखा गोड होणार आहे अशी अगदी हमी जरी देता आली तरी तेवढ्यासाठी त्याच्या मुलाला आणि नातवाला गवई म्हणून संगीताची मुख्य कामे सांगून नि त्याच्या आवाजाच्या भोंग्यांसही सुरेल सनईसारखें वाखणीत पुनश्च! पुनश्च! (once more) म्हणावयाचें का काय? एक शूर पुरुष निपजला त्याला आम्ही आमचा सेनापती केला. त्याचा पुत्र भ्याड निघाला, घोड्याला पाहताच हा अडखळतो! पण त्याचें शौर्य त्याच्या नातवात पुन्हा प्रकट होईल या आशेने त्या भ्याड मुलासही दाभाड्यांच्या कुळातील नामधारी सेनापतीसारखें पिढीजात सेनापतित्त्व देऊन घोड्यावर बांधून एखाद्या पानपतावर पाठवावयाचें की काय? तिसऱ्या चौथ्या पिढीत पितृगुण उतरतात पण तुकारामांना आज १०/२० पिढ्या होऊन गेल्या पण त्या वंशात एकही तुकाराम झाला नाही. किंवा अनुवंशाच्या गुणाची कीव करून पांडुरंगाने त्याच्या मुलानातवांसाठी पुन्हा आजवर एकदाही विमान धाडलें नाही. गेल्या सात पिढ्यांत रामदासाच्या घरात दुसरा रामदास नाही, न बोनापार्टच्या घरात बोनापार्ट.

## ८.८ जगातील इतर राष्ट्रांतील अनुभव पाहा!

मानीव जातीचें गौडबंगाल झुगारून गुणविकसनाच्या प्रत्यक्ष विज्ञानाचें आधारे जे समाज आज जगात वावरत आहेत त्यांच्यातील बहुतेकांत ज्ञातीची प्रत्येक पिढी एकंदरीत पूर्वीपेक्षा उंच, विशाल, सुंदर, सुबुद्ध, शूर आणि परोपकारनिरत अशी निपजत आहे. उदाहरणार्थ ती अमेरिका पाहा! प्रत्येक पिढीस त्यांचे पुरुष 'दीर्घोरस्को वृषस्कंधो शालप्रांशुर्महाभुजः' अशा पौरुषीय लक्षणांनी अधिकाधिक संपन्न होत चालले आहेत. त्यंाच्या स्त्रिया सुंदरतेत, सुजनक्षमतेत, सुभगतेत आणि अपत्यसंगोपनातही अधिकाधिक क्षमतर होत आहेत. आणि आमच्या इकडे प्रत्येक पिढी ही पूर्वीहून खुरटी, पूर्वीहून किरटी, पूर्वीहून करंटी निपजत आहे. आमच्या मते यास अनेक कारणे  आहेत. जातीभेद हें एकच कारण नव्हे.

जातीभेदामुळेच काय तो अनुवांशिक गुणविकास खरोखर होत असता तर वस्तुस्थिती याच्या अगदी उलट असावयास पाहिजे होती. कारण ते अमेरिकन या दुधखुळ्या पोथीजात जातीभेदाच्या वाऱ्यासही उभे राहत नाहीत आणि आमच्या अंगात तर त्याचें वारें भरल्यासारखें झाले आहे. कोणी म्हणेल हें असेच व्हायचें!

## ८.९ अहो हें कलियुग!

हें कलियुग, माणसें खुजटणार, गाई आटणार, शेती निकसणार, पाऊस पळणार! आमच्या त्रिकालदर्शी ऋषींनी हें आधीच सांगून ठेवलें आहे. तर त्यास आम्ही असे विचारतो की, ह्या कलियुगाची ही ब्याद सर्व मनुष्यजातीवर आणि सर्व पृथ्वीवरच कोसळणार म्हणून सांगितलें आहे ना? मग अमेरिकेत त्याच्या अगदी उलट स्थिती का होत आहे? त्यांच्या माणसांची छाती, उंची, प्रतिभा प्रतिपिढी वाढत आहे. त्यांची एक गाय आमच्या दहा, दहा गाअींइतकें दूध देत आहे. शेती, नारळाएवढे बटाटे, बियांवाचून द्राक्षें आणि माणूस इच्छिल तेव्हा आणि इच्छील तेथे इंद्र बनून पाऊस पाडण्याची कला आटोक्यात आणीत आहे.

हां, जर त्रिकालज्ञ ऋषींनी ते कलियुगाचें करंटें भविष्य केवळ भारतापुरतेच वर्तविलें असेल तर मात्र ते त्रिकालज्ञ होते खरेच. कारण ज्या अनेक कारणांनी आमची ही दुर्दशा झाली आहे त्यांत प्रत्यक्षावलंबी सुजनन शास्त्राच्या नियमांना लाथाडून अंधळ्या अनुमानावर उभारलेल्या जातीभेदाची लस पिढ्यान्‌पिढ्या अंगात टोचून घेणें हें एक महत्त्वाचें कारण आहे. त्याचा परिणाम आमच्यात शेवटी मुंग्यांसारखी खुरटी, किडकी, सडकी, माणसें उत्पन्न करण्यातच होणार हे त्या ऋषींसही कळले असावे. असे असेल तर मात्र जी कारणे त्यांच्या डोळ्यासमोर होती त्यांचीं फळें त्यांनी बरोबर वर्तविली!

# ९ लेखांक ९ वा

## ९.१ उपसंहार

या लेखमालेचा प्रस्तुतचा लेखांक हा शेवटचा आहे. वर्तमानपत्रीय कक्षेत जितकी आणवेल तितकी या विषयाची सांगोपांग चर्चा मागील लेखांकांत झाल्यानंतर आता या लेखांकात तिचा उपसंहार करून आणि या लेखमालेतल्या आरंभी सांगितलेल्या मूळ हेतूप्रमाणे जन्मजात जातीभेदाच्या उच्चाटनाची एक योजना थोडक्यात आखून ही लेखमाला आम्ही आज पुरी करणार आहोत.

आजच्या जातीभेदाचें अत्यंत प्रमुख लक्षण जन्मजातपणा आणि जन्मजातपणाचें समर्थन करू शकणारें अत्यंत प्रमुख तत्त्व नि हेतू म्हणजे अनुवांशिक गुणविकासाचा नैसर्गिक नियम. यास्तव आम्ही गेल्या दोन तीन लेखांकांत त्याअनुवंशाचें (Heredity) यथास्थल सांगोपांग विश्लेषण केले आणि त्याच्या खालील मर्यादा दिग्दर्शिल्या -

(१) अनुवंश हा गुणविकासाचा एक घटक असतो म्हणून जे गुण आपल्याला सामजहितकारक वाटतात ते ज्यात प्रकट होतील अशा वधूवरांचे विवाह केले असता ते गुण विकसित वा दृढ होण्याचा, इतर परिस्थिती समान असता, संभव अधिक हे खरे आहे.

(२) पण गुणविकासाचा अनुवंश हा अनन्य घटक नसतो. तर गर्भकालातील मातेची परिस्थिती ही त्या संतानात तो बीजातील गुण विकसित होण्यास किंवा नष्ट होण्यास फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत होते.

(३)अनुवंशाने सद्‌गुणविकास होतो तसाच दुर्गुणविकासही होतो. यास्तव जातीय बीजशुद्धतेच्या जोडीस त्या दुर्गुणांचें उच्चाटन करण्यास समर्थ अशा संकराची जोडही केव्हा केव्हा हितावहच ठरते.

(४) एक गुण कितीही उत्कट असला तरीही प्रत्येक व्यक्तीत वा जातीत त्याला उपकारक अशा इतर गुणांचें पाठबळ नसलें तर तो गुण लुळा बनतो. नुसते डोकें कितीही उत्तम असलें, पण हातपाय समर्थ नसेल तर ते डोकें पंगूच! यास्तव उत्कट बुद्धीला शक्तीची आणि उत्कट शक्तीला बुद्धीची जोड हवीच! म्हणून बुद्धीप्रधान, शक्तीप्रधान, इत्यादी कुलांत वा जातीत तदितर अनुकूल-गुणप्रधान कुलांचा किंवा जातींचा संकरही केव्हा केव्हा हितावहच ठरतो. म्हणून सर्व जातींचा यथाप्रमाण यथावश्यक संमिश्र बेटीव्यवहार चालू राहणें हें त्यांच्या विशिष्ट उत्कर्षास आणि कार्यक्षमतेस हितावहच होईल.

(५) आमच्या आजच्या जाती ह्या नैसर्गिकत:च भिन्न नसल्यामुळे त्या केवळ मानीव, केवळ पोथीजात असल्यामुळे; त्यांचाअनुवंश, त्यांची जातीय बीजशुद्धी, निर्भेळ राखणें दुर्घट असणारच.

(६) व्यावहारिक अनुभवही हेंच सिद्ध करतो. ब्राह्मणातही परशुराम-द्रोणाचार्य-दुर्वासापासून तो थेट मराठी साम्राज्यातील पटवर्धनापर्यंत किंवा चाफेकर, राजगुरूपर्यंत क्षत्रियाहूनही पराक्रमी,

कोपिष्ट आणि शूर अनेक पुरुष निर्माण झाले. उलट क्षत्रिय-वैश्यांदिकांतही जनक -बुद्धापासून तो तुकारामापर्यंत अनेक सत्त्वशील, शांतिप्रधान तपस्वी निर्माण झाले. या व्यावहारिक अनुभवावरूनही आमच्या ह्या मानीव जातीत अमका गुण अमक्या जातीत असतोच आणि इतरांत नसतोच असे गृहीत धरून त्या जातींना त्या गुणावर आणि मनावर जन्म जात स्वत्व सांगण्याचा अधिकार देणारी जातीभेदाची प्रथा अतथ्य नि अन्याय्य आहे.

(७) आपल्या इतिहासाकडे पाहिले तरी आज ज्या जाती रक्तबीजाने विभिन्न आहेत म्हणून आपण समजतो, त्या मूलतःच संमिश्र होत्या हें स्पष्ट दिसते. पूर्वी निदान चार वर्णांच्या चार हजार उपजाती नव्हत्या. म्हणजे त्यांचे प्रत्येकी अंतर्गत विवाह होत होते. आणि त्या चारांत परस्पर बेटीव्यवहारही निषिद्ध नव्हता. पितृसावर्ण्य, मातृसावर्ण्य, अनुलोम आणि प्रतिलोम ह्या चार स्मृती-प्रतिपादित प्रथांची हीं चार नावेंच हें निर्विवाद सिद्ध करतात की, चारी वर्णात रक्तबीज परस्पर संमिश्र आहे. म्हणूनच अमुक गुण जन्मतः असतोच असें आपल्या अनुभवास येत नाही.

अनुवंशाच्या नैसर्गिक नियमांच्या या सर्व मर्यादा आणि व्यंगें लक्षात घेतली असता जन्मजातपणा राखला किंवा राखलासें मानीत गेलें की त्या जातीत तो तो गुणविकास झालाच पाहिजे हें समजण्यात आपली केवढी चूक होत आहे हें ध्यानात येईल. यास्तव जातीवरून गुण न ओळखता गुणावरून जात ओळखणें अधिक युक्त आहे, अमका क्षत्रियाचा मुलगा म्हणून तो शूर आहेच असे न समजता आणि शूरपणाचीं पदके त्याचा जन्मजात अधिकार म्हणून त्याच्या बारशासच त्याच्या छातीवर न लटकवता, अमका शूर आहे असे प्रत्यक्ष दिसून आल्यावर, मग त्यास क्षत्रिय समजून शूरपणाचें पदक देणेंच युक्त, मग तो शूरपणा त्यात बीजशुद्धीने आलेला असो वा संकराने आलेला असो.

त्याचप्रमाणे एखाद्या गुणाचें विकसन वा दृढीकरण करण्यासाठीही ज्या व्यक्तीत तो गुण प्रकटपणे व्यक्त असेल त्यांचा शरीरसंबंध जुळविण्याचा अधिक उपयोग होण्यासारखा आहे. गोरा मुलगा हवा असेल तर वधूवरांचा रंग गोरा आहे कीं नाहीं हें पाहूनच निवड केली असता मुलगा गोरा होण्याचा बराच संभव आहे. पण ब्राह्मण जातीचीं म्हणून धडधडीत काळीकुट्ट दिसणारी वधूवरेंही गोरीं समजून त्यांचें लग्न लावणें हा काही गोरे संतान उत्पन्न करण्याचा बिनधोक मार्ग नव्हे. तीच स्थिती इतर गुणांची. एक वेळ प्रत्यक्ष गुणावरून अनुवंश अनुमानिता येईल, पण केवळ मानीव अनुवंशावरून गुण निश्चितपणे अनुमानिता येणार नाही.

## ९.२ जन्मजात जातीचा उच्छेद आणि गुणजात जातीचा उद्धार

या आणि येथे अनुल्लेखित अशा इतर कारणांचा विचार करून जातीभेदाचें प्रस्तुत विकृत स्वरूप टाळणारी एक स्थूल योजना आम्ही खाली देत आहो. आमची अशी निष्ठा आहे की, या योजनेइतकें जरी कार्य झाले तरी प्रस्तुतच्या जातीभेदाच्या विषारी किडीपासून आपणांस आपला समाज मुक्त करता येईल जन्मजात जातीचा उच्छेद आणि गुणजात जातीचा उद्धार हें सूत्र कार्यपरिणत करणे दुर्घट नाही. जातीभेदाचा मुख्य आधार केवळ भावना आहे.

आज तरी त्याच्या मागे दुसरी कोणचीही शक्ती उभी नाही. आपल्या मानण्यात त्याचें खरें जीवन आहे. आणि त्याचें खरें मरण आपल्या न मानण्यात आहे. यास्तव ती जात्यहंकारी भावना आपण प्रत्येकाने सोडली की त्याचें मरण ओढवलेंच. यास्तव ज्यास आजच्या या विकृत जातीभेदाची अनिष्ट ब्याद नको असेल त्याने निदान खालील योजनेप्रमाणे तरी स्वत:चें आचरण ठेवलें की पुरें आहे. म्हणजे तो जन्मजात जातीभेद वाटतो त्याहून किती तरी सहज उच्छेदिता येईल. ज्या जातीभेदाची आपण चर्चा करीत आहोत तो हिंदूसमाजातील जातीभेद असल्याने खालील चर्चेचा संबंध हिंदूंशीच काय तो पोचतो हें उघड आहे.

## ९.३ प्रत्येक मुलाची जन्मजात जात एकच - हिंदू!

(१) प्रत्येकाने अमुक हिंदू जात जन्मत: उच्च आणि अमकी जन्मत: नीच ही भावना मनास केव्हाही शिवू देत कामा नये. उच्चनीचता ही व्यक्तीत प्रकट झालेल्या प्रत्यक्ष गुणांवरून ठरेल. जर त्या व्यक्तीचाअनुवंश उच्च असेल तर उच्च गुण तीत प्रगट होतीलच. जर गुण प्रकट नसतील तर त्याअनुवंशात वा परिस्थितीत काही तरी दोष असलाच पाहिजे.

(२) प्रत्येक हिंदू मुलाची जन्मजात जात अशी एकच- हिंदू! त्यावाचून दुसरी कोणतीही पोटजात मानू नये. 'जन्मतो जायते हिंदू:' (वास्तविक पाहता मनुष्याची खरी जन्मजात जात मनुष्य हीच तेवढी! पण जोवर मुसलमान-ख्रिश्चनादिक विधर्मीय लोक त्या उच्च ध्येयास सोडून आपणांस मुसलमान वा ख्रिश्चन मानतात आणि हिंदूंस गिळू पाहतात तोवर तरी स्वसंरक्षणार्थ इतका जात्यहंकार सापेक्षतया आपणही धरलाच पाहिजे. प्रत्येक वेळी आणि विशेषत: शिरगणतीत हिंदू हीच एक जात लिहावी, इतर सर्व धंदे व्यवसाय समजावे.)

(३) प्रत्येक हिंदूमात्रास वेदासुद्धा सर्व हिंदू धर्मग्रंथ वाचण्याचा आणि शिकण्याचा आणि इच्छा असल्यास आपले संस्कारही वेदोक्त करण्याचा आणि करविण्याचा समान अधिकार असावा. पुरोहितत्त्व हें कोणत्याही जातीचा जन्मजात ठेवा नसून जो हिंदू पुरोहितत्त्वाची योग्यता संपादन करील किंवा ती परीक्षा उतरेल तो पुरोहित होऊ शकेल. जातीने नव्हे, तर 'तस्माच्छीलगुणैर्द्विज:'

(४) हिंदूंची विशिष्ट महत्त्वाची तीर्थक्षेत्रें, देवालयें आणि पवित्र ऐतिहासिक स्थलें (जसा पंचवटीचा राम, सेतुबंध रामेश्वर इत्यादी) जातीवर्ण-निर्विशेषपणे पूर्वास्पृश्यांसुद्धा सर्व हिंदूमात्रास समान नियमांनी उघडी असावींत.

(५) प्रत्यक्षावलंबी अशा सुजननशास्त्राच्या (Eugenics) दृष्टीने योग्य असेल तर कोणाही हिंदू वधू-वरांचा विवाह, तो केवळ जन्मजात भिन्न मानलेल्या जातीजातीत झाला म्हणूनच, निषिद्ध आणि बहिष्कार्य समजला जाऊ नये. (हा नियम निषेधात्मकच काय तो आहे. म्हणजे ब्राह्मण व्यक्तीने महाराशी किंवा महार व्यक्तीने ब्राह्मणाशी विवाह केलाच पाहिजे असे नव्हे. तर गुण, शील, प्रीती इत्यादी दृष्टीने परस्पर-अनुकूल असलेल्या त्या हिंदू वधूवरांनी विवाह केला तर केवळ त्यांच्या जाती भिन्न आहेत एवढ्याच करणासाठी तो विवाह निषिद्ध मानू नये.)

(६) वैद्यकशास्त्रदृष्ट्या जे शुद्ध आणि आरोग्यप्रद ते, वैद्याशास्त्रदृष्ट्या योग्य अशा कोणत्याही माणसाबरोबर, म्हणजे एका ताटात नव्हे तर एका पंगतीस, खाण्यास हरकत

नसावी, शेजारी जेवल्याने जातची जात पिढ्यान्‌पिढ्या बदलते ही समजूत वेडगळ आहे. मांसाहाऱ्यांची मांसाहाऱ्यांशी पंगत होण्यास हरकत नाही. ज्या दिवशी शाकाहार असेल त्या दिवशी सर्वच एका पंगतीत बसू शकतील. जे रुचेल आणि पचेल ते अन्न सहभोजनात खाण्यास हरकत नाही. पूर्वी महाभारतकालापर्यंत तरी चारही वर्णांत सहभोजनें होतच. 'शूद्राः पाकर्तारः स्युः (आपस्तंब) किंवा 'दासनापितगोपालाः कुलमित्रार्धसीरिणः।। एते शूद्रेष भोज्यान्नाः।।' अशीं शेकडो वचनें आहेतच.

शाकांतही अत्यंत तामसी गुण असणाऱ्या शाका आहेतच. स्वतः मांसाहार करणाऱ्यांना, जर सर्व पंगत केवळ शाकाहाराचीच असेल तर त्या वेळी इतरत्र मास न खाणाऱ्याबरोबरही त्या पंगतीत बसण्यास काही एक हरकत नाही.

(७) प्रत्येक हिंदू मुलास प्राथमिक शिक्षण व्यावहारिक आणि धार्मिक समानतेने दिल्यावर पुढे त्यात जो गुण वा प्रवृत्ती प्रकट होईल त्याप्रमाणे तो आपला व्यवसाय करील. आज सर्वांत व्यवसायस्वातंत्र्य आहेच. ब्राह्मण पुणेरी जोडे विकतात. चांभार उत्तम शिक्षक होतात. आता सुधारावयाचें ते इतकेंच की, प्रत्यक्ष व्यवसाय दुसरा असताही मूळच्या व्यवसायाची जी एक मानीव रोटीबेटीबंद जात त्याच्या मागे हात धुऊन लागते तिची ब्याद मात्र टाळावयाची. म्हणजे जात शिंपी - धंदा सोनार; जात ब्राह्मण - धंदा दुकानदारी, हा जो आज ब्रह्मघोटाळा झाला आहे तो मोडेल. सर्वांची जात हिंदू, धंदा जो कोणता असेल तो.

## ९.४ बॅरिस्टर नि मोटारहाक्या

आता या सर्व चर्चेचा मथितार्थ थोडक्यात चटकन ध्यानात यावा म्हणून एक दोन उदाहरणें देऊन ही लेखमाला संपवू. ज्या गोष्टी लहानपणापासून चांगल्या म्हणून आपणांस सांगण्यात येतात त्यांचा हास्यास्पदपणा चटकन ध्यानात येत नाही. म्हणून ह्या उदाहरणात जुनी जात न घेता त्या जुन्या तत्त्वास काही अर्वाचीन बिनजात व्यवसायांना लावून दाखविलें असता ती हास्यास्पदता चटकन दिसू लागेल. म्हणून नवीन अशा बॅरिस्टरीचें वा मोटर हाकण्याच्या व्यवसायाचें उदाहरण घेऊं. समजा, एक मनुष्य बॅरिस्टर झाला किंवा दुसरा मोटारहाक्या झाला. आता नुसत्या रोटीबेटीबंदीने त्यांच्या वंशात तो गुण विकसतो या जुन्या कल्पनेप्रमाणे त्यांची लगेच व्यवसायनिष्ठ अशी एक स्वतंत्र जात केली पाहिजे. त्या बॅरिस्टराच्या मुलाला जन्मतःच बॅरिस्टर मानलें पाहिजे, जसें ब्राह्मणाच्या मुलास ब्राह्मण! मग त्या बॅरिस्टराच्या मुलानातवांत कोणीही बॅरिस्टरीचा अभ्यास न केला तरी त्यांना 'बॅरिस्टरचे झगे, जागा, मान दिले पाहिजेत. त्या 'बॅरिस्टरी' ब्राह्मणांची, वा 'मोटारवाले' ब्राह्मणांची लग्नें इतर 'बॅरिस्टरी' वा 'मोटारे' ब्राह्मणांशीच लावलीं पाहिजेत. नव्हे त्यांनी जेवणखाणदेखील त्यांच्या 'मोटारे' जातीशीच केले पाहिजे. मग पुढे त्यांच्या वंशांत कोणी दुकानदारी वा कारकुनी केली तरी त्यांची रोटीबंद बेटीबंद जात 'बॅरिस्टरे' वा मोटारे' ब्राह्मण हीच!!

डॉक्टरच्या मुलानातवांची जन्मजात डॉक्टर. मरणासन्न मनुष्याची नाडी पाहण्यात पहिला जन्मजात अधिकार त्या जातीच्या डॉक्टरचा; मग त्यास डॉक्टरी विद्येचा ओनामा का माहित नसेना! आज जे नवीन व्यवसाय प्रचारात येत आहेत त्यांच्या जर रोटीबंद बेटीबंद जन्मजाती

पाडल्या तरी अगदी 'वचनात्प्रवृत्तीर्वनान्निवृत्तिः' म्हणून गर्जणारे वर्णाश्रमसंघवाले पंडितदेखील त्यास हास्यास्पद पाखंड म्हणून म्हणतील! मग आज ज्या लोकांच्या जुन्या शिंपी, सोनार, तांबट, सुतार, लोहार, इत्यादी जन्मजात जाती आहेत, आणि जे व्यवसाय मात्र हवे ते करतात त्यांची ती अनवस्थाही तसेच एक हास्यास्पद पाखंड नव्हे काय? पण आम्ही म्हणतो त्या नव्या व्यवस्थेत जर कोणी बॅरिस्टरीची परीक्षा उतरला तर तो बॅरिस्टर ठरेल, त्या वर्गाच्या संघांत - बाररूममध्ये - तो सभासद होईल. अनुवांशिक गुणविकासाने जर त्याच्या मुलांत तो गुण उतरेल आणि तोही बॅरिस्टर झाला तरच त्या संघात तोही जाईल. पण जर तो एखादा झाडूवाला, तर त्याचा पणजा बॅरिस्टर वा लढवय्या क्षत्रिय, म्हणून बॅरिस्टर वा क्षत्रिय मानला जाणार नाही. किंवा व्यवसाय अमका म्हणून इतर व्यवसायवाल्यांशी त्याचा रोटीबेटीव्यवहार केवळ मानीव जातीभिन्नतेमुळे बंद पडण्याचेही कारण उरणार नाही. ह्या प्रत्यक्ष गुणनिष्ठ वर्गीकरणांमुळे आजच्या जन्मजात वर्गीकरणाने केलेला सबगोलांकार मोडतो असे होत नाही. पण आश्चर्य हें की ज्यांनीं आज त्या पोथीजात जातीचा सबगोलंकार केला आहे तेच तो सबगोलंकार मोडणारास सबगोलंकार करणारे म्हणून म्हणण्यास धजतात!!

यावरही कोणास अशी भीती वाटलीच, की हा पोथीजात जातीभेद सोडला तर समाजाची भयंकर अवनती तर होणार नाहीना! त्यांनी मनात इतकाच विवेक करावा, की ही पोथीजात जातीभेदाची ब्याद पृथ्वीवरील इतर कोणत्याही धुरंधर राष्ट्रात रूढ नाही. जपान, रशिया, इराण, तुर्कस्थान, इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या सर्वांचें या जातीभेदावाचून काही अडलें आहे का? त्यांचे धंदे ते जन्मजात नाहीत म्हणून किंवा त्यांचें ज्ञान, बळ, संघटना त्यांच्यात जन्मजात जातीभेद नाही म्हणून रोडावले आहेत का? उलट ते आज ह्या सर्व गुणांत आमच्यापेक्षा हजारो पटींनी श्रेष्ठ, उन्नत, संपन्न, प्रबळ आहेत आणि समाजोन्नतीचा सनातन मंत्र म्हणून ह्या जातीवेडास कवटाळून बसलेल्या आम्हांसच चारीमुंड्या चीत करून आमच्या छातीवर चढलेले आहे! तेव्हा या एका सकृद्दर्शनी (Prima facie) गमकाने देखील समाजाच्या इभ्रतीचा जातीभेद हा एवढाच बीजमंत्र नव्हे हें स्पष्ट होऊ शकते. अवनतीच्या मंत्रांपैकी मात्र तो एक बीजमंत्र असावा अशी साधार शंका येऊ शकते. कारण आजच्या ज्ञात राष्ट्रांत आम्हीच तेवढे सगळ्यांच्या खाली आणि सगळ्यांच्या पदतली कुबलले जात आहोत.

शेवटी, लोकहितार्थ अपरिहार्य म्हणून वाढलेली ही लेखमाला लिहिण्याचें हें कटुकर्तव्य करताना ज्या केसरीकारांनी आमची बाजू मांडण्यास निःपक्षपातीपणाने स्थल दिलें त्यांचे आभार मानून आणि या लेखांची शक्य तर एक निराळी पुस्तिका लवकरच प्रसिद्ध करण्याचा मानस आहे, इतकें वाचकांस कळवून ही लेखमाला पुरी करतो.

- (केसरी, दि. ५-५-१९३१)

***

# १० पोथीजात जातीभेदोच्छेदक सामाजिक क्रांतीघोषणा!

## १०.१ तोडून टाका ह्या सात स्वदेशी बेड्या!!

तस्तान्न गोऽश्ववत्कश्चिज्जातिभेदोऽस्ति देहिनाम्।

कार्यभेदनिमित्तेन संकेतः कृत्रिमः कृतः।।१।।

नव्या-जुन्या मताच्या अनेक लोकांकडून वारंवार असे विचारण्यात येते की अहो, ह्या तुमच्या जन्मजात जातीभेदोच्छेदक आंदोलनाचे घटक तरी कोणचे, कार्य करायचें तरी काय काय ह्या जाती मोडायला, जाती मोडणें म्हणजे तरी नक्की काय मोडणें नि काय ठेवणें, सूत्र काय, कार्यक्रम काय?

अशा अगदी योग्य, सहज नि अपरिहार्य शंकांचे वा आक्षेपाचे समाधानार्थ ह्या लेखात आम्ही आज आपल्या हिंदुराष्ट्रास छिन्नविछिन्न करून टाकण्यास कारणीभूत झालेल्या आणि होणाऱ्या या आजच्या पोथीजात जातीउच्छेदिण्यास्तव आपण हिंदूंनी जे आंदोलन केले पाहिजे, जी एक सामाजिक क्रांती घडवून आणली पाहिजे, तिचीं मुख्य सुत्रे नि कार्यक्रम यांची केवळ रूपरेखा 'निर्भीड'च्या वाचक वृंदासाठी देत आहो.

(अ) आज आपल्या हिंदूंत जो जन्मजात म्हणून म्हणविला जातो, तो जातीभेद निव्वळ पोथीजात आहे. मद्रासी ब्राह्मणापेक्षा महाराष्ट्रीय चांभार गोरे असतात. महारांत चोखामेळ्यासारखे संत नि डॉ. आंबेडकरांसारखे विद्वान्‌निपजतात तर उत्तर हिंदुस्थानातील शेकडो ब्राह्मण पिढीजात शेतकीचा धंदा करता करता निरक्षरचे निरक्षर राहतात. ब्राह्मण शिंप्याचीं, सोनाराचीं, कातड्याचे बूट विकण्याचीं दुकानें चालवितात तर शिंपी-सोनार-वाण्यात आय.सी.एस., एम.ए. पदवीधर होतात. जाट लोकांस रजपूत अजूनही इतके हीनजाती मानतात, की जाटाने क्षत्रियाचा घोड्यावर बसणेचा हक्क छिनावल्यास जातीबहिष्कार्य पाप समजून हाणमार होते; पण त्याच जाटांची शेकडा पन्नासवर भरती होऊन जो शीख समाज बनला तो आज क्षत्रियांतील तिखट क्षत्रिय म्हणून गाजत आहे; पठाणासारख्यांची रग रजपुतांनी कधीही जिरविली नाही अशी जिरवून काश्मीर-काबूलपर्यंत राज्यें तो चालवून राहिला आहे. जाटच नव्हेत, तर पंजाबातील अनेक खालच्या शूद्रवर्णीय जातींतूनही हजारो लोक शीख समाजात शिरले आणि सिंग -'सिंह' झाले! निदान तत्वतः तरी जातपात नाही. तरीही आमच्या 'छापा'च्या क्षत्रियांहून त्यांचें बळ, तेज नि पराक्रम कमी नाही. कायस्थ 'शूद्र', पण बंगाल्यातील विवेकानंद, अरविंद, सारे पाल, घोष, बोस, कायस्थ; बुद्धीत, विद्येत, बंगाली ब्राह्मणांच्या रेसभर पुढेच! पानपतचा सेनानी भाऊ ब्राह्मण; 'यातिशूद्र वंश' तुकाराम परम संत. या सर्व प्रतिपदीच्या अखंडित पुराव्यावरून हे सिद्ध होत आहे, की पूर्वी पाच हजार वर्षांचे आधी काय होते नि नव्हते, ते असो वा नसो, आज ज्या जाती विभिन्न म्हणून मानल्या जातात त्यांत वर्ण वा गुण वा कर्म ह्यांच्या कसोटीत संघशः असा कोणचाही ठाम 'जन्मजात' भेद आढळत नाही. त्या जाती 'जन्मजात' नसून आज निव्वळ 'पोथीजात' काय त्या झालेल्या आहेत. कोणतीही जन्मजात खरीखरी अशी विशिष्ट उच्चता अंगी नसताही, पोथीने 'उच्चजात' म्हणून एक जुनाट पाटी ठोकलेल्या घरात जन्मला

म्हणून हा ब्राह्मण, हा क्षत्रिय! ही वस्तुस्थिती यथार्थपणे व्यक्तविण्यास्तव आम्ही 'पोथीजात' हा शब्द बनविला. आजचा जातीभेद हा जन्मजात म्हणविला जात असला तरी तो जन्मजात नसून; आहे निव्वळ पोथीजात! निव्वळ मानीव, खोटा!

(आ) यास्तव कोणतीही जात वा व्यक्ती केवळ अमक्या पोथीजात गटात गणली वा जन्मली एवढ्यासाठी उच्च वा नीच मानली जाऊ नये. ज्याची त्याची योग्यता त्याच्या त्याच्या प्रकट गुणावरूनच काय ती ठरविली जावी. आणि त्या स्वभावाचा गुणविकास होण्याची नि करण्याची संधी सर्वांस समतेने दिली जावी. गुणविकासाचा अनुवंश (Heredity) हा एकच घटक नसून परिस्थिती (Environments) हाही एक महत्त्वाचा घटक आहे, अमक्याचा पडपणजा बुद्धीमान्नि शुर होता म्हणूनच केवळ त्याचा पडपणतू, प्रत्यक्षपणे मूर्ख वा भ्याड असताही, तो बुद्धीमान वा शूर असलाच पाहिजे असे गृहित धरून, त्यास पंतप्रधान वा सरसेनापती नेमीत राहणारें राष्ट्र धुळीस मिळालेंच पाहिजे. मोटारीत बसायचें तर त्या मोटारहाक्यास मोटारीचें प्रमाणपत्र मिळालें आहे का हेंच विचारलें पाहिजे. त्याच्या पणजाला मोटार हाकता येत होती म्हणूनच केवळ,अनुवंशाने तो मोटारहाक्या असलाच पाहिजे असे गृहीत धरून नि त्या मनुष्यास मोटार हाकण्याची कला स्वतः प्रत्यक्षपणे येत नसताही त्याला मोटारीवर हाकण्यास बसवून तीत प्रवासास निघणे हा जसा आत्मघातक मूर्खपणा आहे, तसाच अमक्या पोथीजात जातीत जन्मला म्हणूनच अमुक उच्च नीच मानणें आणि त्याला त्याला ते ते जन्मजात विशिष्टाधिकार देणें हाही राष्ट्रघातक मूर्खपणा आहे. प्रकट गुणावरूनअनुवंश अनुमानला जावा. केवळ मानीव अनुवंशावरूनच गुण गृहीत धरला जाऊ नये.

(इ) मनुष्यकृत, परिवर्तनीय, नि प्रसंगी परस्परविरोधी ग्रंथांत काय सांगितलें आहे त्यावरूनच काय ती कोणतीही सुधारणा योग्य कीं अयोग्य हें ठरवीत न बसता 'ती विशिष्ट सुधारणा त्या विशिष्ट परिस्थितीत राष्ट्रधारणास हितकर आहे कीं नाही' हे प्रत्यक्ष प्रमाणच काय ते विचारात घेतलें जावें, आणि परिस्थिती बदलेल तसे निर्बंधही (कायदेही) बेधडक बदलीत जावें.

(उ) ह्या जुन्या धर्मग्रंथांतील काही किंवा सारे निर्बंध वा विचार आजच्या परिस्थितीत जरी त्याज्य वाटले तरी देखील मागच्या त्या त्या परिस्थिती राष्ट्रधारणाचें उपयुक्त कार्य करण्यास त्यांपैकी कित्येक आचार नि विचार कारणीभूत झाले असल्यामुळे, ती राष्ट्रीय ग्रंथसंपत्ती आम्ही ऐतिहासिक कृतज्ञतेने नि साभिमान ममत्वाने आदरणीय नि संरक्षणीयच मानली पाहिजे. इतकेच नव्हे तर जगातील त्या काळच्या राष्ट्रांशी तुलना केली असता आमच्या राष्ट्राने संपत्तीचें, सामर्थ्याचें नि संस्कृतीचें अत्युच्च शिखर जे गाठलें त्या आमच्या राष्ट्रीय पराक्रमाचें नि यशाचें हे श्रृतीस्मृतीपुराणेतिहास प्रभृती प्रचंड संस्कृत वाङ्मय एखाद्या हिमालयासारखें मूर्तीमंत स्मारकच असल्याने त्यास त्या दृष्टीने आम्ही पूज्य नि पवित्रही मानिले पाहिजे.

(ए) एतदर्थ आपल्या श्रृतीस्मृती प्रभृती मागील सर्व शास्त्रांचा अगाध अनुभव नि विविध प्रयोग यांचें तात्पर्य जमेस धरून परंतु त्यांच्या बेड्या पायात ठोकून न घेता या पोथीजात जातीभेदास तोंडण्यासाठी आजच्या परिस्थितीच्या विज्ञानाच्या कसोटीस उतरतील त्या समाजसुधारणा आपण तत्काळ घडवून आणल्या पाहिजेत. अमक्या सुधारणेस 'शास्त्राधार' आहे का? हा प्रश्न दुय्यम. आपल्या हिंदू राष्ट्राच्या संघटनास नि अभ्युदयास अमकी सुधारणा

आजच्या परिस्थितीत अवश्य आहे ना? - हा प्रश्न मुख्य; मग त्यास शास्त्राधार असो वा नसो. मागील भूतकालचा राष्ट्रीय अनुभव ध्यानी घेता नि शक्यतो भविष्यकालच्या क्षितिजाची छाननी करता, आजच्या परिस्थितीत विज्ञानाच्या कसोटीस उतरतील त्या त्या समाजसुधारणा आपण तत्काळ घडवून आणल्या पाहिजेत. ज्या अर्थी ह्या पोथीजात जातीभेदाने आपल्या हिंदुराष्ट्राची हानीच हानी होत आहे, ज्या अर्थी या पोथीजात जातीभेदाने मंदिरांतून, मार्गांतून, घरांतून-दारांतून, नोकऱ्यांतून, ग्रामसंस्थातून, नगरसंस्थांतून, विधीसमितींतून (कौन्सिलांतून, असेंब्लींतून), हिंदूजातींची शकलें शकलें उडवून, आपसांत कलहच कलह माजवून अहिंदू आक्रमणास तोंड देण्याची संघटित शक्ती हिंदुराष्ट्रात उत्पन्न होणेंच दुर्घट करून सोडलें आहे; आणि ज्या अर्थी ह्या कुजलेल्या पोथीजात जातीभेदापासून जे कोणते तथाकथित लाभ आजही होत आहेतसे वाटते ते एरवी होणाऱ्या अमर्यादित राष्ट्रीय प्रगतीच्या मानाने अगदी तुच्छ आहेत, त्या अर्थी हा पोथीजात जातीभेद आमूलाग्र उच्छेदिणें हेंच आजच्या आपल्या खऱ्या हिंदुराष्ट्राच्या उद्धाराचें एक अपरिहार्य साधन होऊन बसलेलें आहे. सारा युरोप, सारी अमेरिका या पोथीजात जातीभेदाच्या ब्यादीपासून मुक्त असताही किंवा मुक्त आहे म्हणूनच एकसारखी समर्थ, स्वतंत्र, सबल अशी भरभराट पावत आहे. आणि आम्ही त्यास कवटाळून बसलो असताही, किंबहुना कवटाळून आहोत म्हणूनच एकसारखें विघटित, परतंत्र, दुर्बल होत चाललो आहोत! यावरून राष्ट्रीय बलसंवर्धनास नि अभ्युदयास त्या ब्यादीची अपरिहार्य आवश्यकता नसून उलट आडकाठीच येते हेें उघड आहे. यास्तव मागचे शास्त्राधार असोत वा नसोत, आजची आवश्यकता म्हणूनच हा पोथीजात जातीभेद अजिबात उच्चटिलाच पाहिजे.

## १०.२ सात स्वदेशी शृंखला

तो उच्चाटिण्यास्तव आपणांस सात बेड्या तोंडल्या पाहिजेत. आपल्या राष्ट्राच्या पायात ज्या बाह्य विदेशी आपत्तींच्या बेड्या आहेत त्या तोंडण्याचें सामर्थ्य, ह्या आपल्या पायात आपणच हौशीने, धर्म म्हणून ठोकून घेतलेल्या ‘स्वदेशी’ बेड्या तोंडल्याने अधिकच संचरणारे आहे. त्यांतही ह्या सात स्वदेशी बेड्या तोंडणें हें सर्वस्वी आपल्या स्वतःच्याच हाती आहे. ‘तूट’ म्हटले की त्या तुटणाऱ्या आहेत. ह्या पायात आहेत तोवर आपणांस चालता, चढता, ठोकरीमागून ठोकरी खाण्यास विपक्षला लावता येते. पण आपण त्या तोडून टाकू निघालो तर त्या बळेच आपल्या पायास डांबून टाकण्याचें सामर्थ्य मात्र विपक्षात नाही. अस्पृश्यता आम्ही ठेवीत आहोत तोवर आमच्या हिंदुराष्ट्रात स्पृश्य नि अस्पृश्य हे भेद विकोपास नेऊन जातवार प्रतिनिधीत्व देऊन परस्पर कलह पेटवून राष्ट्रशक्तीचीं छकलें विपक्षीय उडविणारच. पण जर आम्ही, जे बोट कुत्र्यास विटाळ न मानता लावतो तेच आपल्या स्वतःच्या बीजाच्या, धर्माच्या, राष्ट्राच्या सहोदरांस, त्या अस्पृश्यांना लावून ह्या अत्यंत सोप्या युक्तीने ती अस्पृश्यताच काढून टाकली नि स्पर्शबंदीची बेडी तोडून टाकली, तर ते तीन चार कोटी धर्मबंधू आपणापासून कोणचा विपक्षीय विलगवू शकले? स्पृश्य अस्पृश्य हा एक विघटक विभाग तरी चुटकीसारखा बोट लागताच नामशेष होऊ लागले. तीच गोष्ट इतर विघटक ब्यादींची होय!

## १०.३ जातीभेद मोडण्यासाठी दुसरें काही करावयास नको

ह्या सात बेड्या तोंडल्या पाहिजेत. पण त्या बेड्या आपल्या आपणच आपल्या पायात ठोकून घेत आलो. कोण्या, विदेशीय शक्तीने त्या ठोकलेल्या नाहीत. तसे असते तर त्या तोंडणें कठीण गेलें असते. पण त्या आपणच केवळ हौशीने पायांत वागवीत आहोत, म्हणून तर त्यांस 'स्वदेशी' बेड्या म्हणावयाचें. ती हौस आपण सोडली की त्या तुटल्याच. ज्याने त्याने आपापल्यापुरता तरी 'मी खालील सात बेड्या माझ्या राष्ट्राच्या पायातून तोडून टाकीन' इतका निर्धार केला आणि त्या निर्धाराप्रमाणे आपापल्या व्यवहारात या सात बेड्या जुमानल्या नाहीत की झाले! पोथीजात जातीभेद एक मनाचा रोग आहे. मनाने तो मानला नाही की झटकन बरा होतो. ज्या सात स्वदेशी बेड्या तोंडताच ह्या पोथीजात जातीभेदाच्या ब्यादीपासून, भूतबाधेपासून, हें हिंदुराष्ट्र मुक्त होऊ शकते त्या सात बेड्या अशा -

**(१) वेदोक्तबंदी** - ही पहिली बेडी तोडली पाहिजे. सर्व हिंदूमात्रांस वेदादिक यच्चयावत् धर्मग्रंथांवर समान हक्क असला पाहिजे. वेदांचें अध्ययन वा वेदोक्त संस्कार ज्यास इच्छा होईल त्यास करता आले पाहिजेत. म्लेंच्छ लोक जर वेद वाचतात तर स्वतःच्या क्षत्रियादिक धर्मबंधूंसुद्धा वेदोक्ताचा अधिकार नाही असे म्हणणारी भटबाजी यापुढे चालता कामा नये. तशीच क्षत्रियादिक 'स्पृश्यांची' 'अस्पृश्यां'वर चाललेली दंडेबाजी बंद झाली पाहिजे. उलट वेदादी ग्रंथ मनुष्यमात्राला उघडे करून आधुरवध्रुव वैदिक अध्ययन चालू करण्यात 'वैदिक' धर्माचा धार्मिक दृष्टीनेदेखील, खरा विजय आहे!

**(२) व्यवसायबंदी** - ही दुसरी बेडी तोडली पाहिजे! ज्या व्यक्तीस जो व्यवसाय करण्याची धमक नि इच्छा असेल त्यास तो करता आला पाहिजे. अमक्या पोथीजात जातीत जन्मला म्हणून त्याने अमका धंदा केलाच पाहिजे, नाही तर ते जातीबहिष्कार्य पाप होय अशी सक्ती चालता कामा नये. चढाओढीची भीती नसली की जन्मानेच पटकावले जाणारे राखीव धंदे नि कार्ये ते ते वर्ग योग्य दक्षतेने पार पाडीनासे होतात. जसे भट, पुजारी, भंगी, राजे प्रभृती. यापुढे पुरोहितही, पौरोहित्यास योग्य ती विद्या नि परीक्षा पारंगतेल तर, वाटेल त्या जातीचा असला तरी चालला पाहिजे. जो भट-कामाची परीक्षा उतरेल तो भट, जो भंगी-कामाची उतरेल तो भंगी. समाजोपयोगी सारे धंदे निर्दोष आहेत. आज व्यवसायबंदी तुटलेलीच आहे. केवळ भट नि भंगी हे मात्र मुख्यत्वें जातीबद्ध धंदे आहेत. तीही बंदी तुटली पाहिजे. व्यवसाय हे जातीच्या मानीव योग्यतेवर न ठेवता त्या त्या व्यक्तीच्या प्रकट गुणांवर सोपविले म्हणजे योग्य मनुष्य योग्य कामी लागून राष्ट्रकार्ये अधिक दक्षतेने पार पाडण्याचा अधिक संभव असतोे. डॉ. आंबेडकर महार म्हणून जर त्यांना महाराचें ढोरें ओढण्याचेंच काम करणे भाग पाडलें असते तर आपलें राष्ट्र एका उत्कृष्ट निर्बंध-पंडिताला नि राज्यकारणधुरंधाराला आंचवलें असते. उलटपक्षी ज्या भटाची वा मराठ्यादिक स्पृश्याची योग्यता ढोरें ओढण्याचीच त्याला पुरोहित वा सैनिक नेमणें म्हणजे त्या कार्‍याची धुळधाण उडविणें होते. राष्ट्रीय शक्तीचा मितव्यय नि क्षमता वाढविण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजे ज्याच्या त्याच्या प्रकट गुणानुरूप ज्याचे त्याचेकडे ते काम सोपविणें हेंच होय. आजच्या चांभाराचा मुलगा गुणोत्कर्षाने उद्या मुख्य प्रधान होऊ शकेल; जसा स्टॅलिन रशियाचा झाला. उलट आजच्या मुख्य प्रधानाचा मुलगा उद्या चामड्यांचा मोठा कारखाना चालवू शकेल - चांभार होईल.

**(३) स्पर्शबंदी** - ही तिसरी बेडी तोडून जन्मजात अस्पृश्यतेचें समूळ उच्चाटन झाले पाहिजे. विटाळ केवळ त्याच स्पर्शाचा मानला जावा की ज्यायोगे आरोग्यास हानी पोचते. सोवळें ते की जे वैद्यकाच्या प्रत्यक्ष नि प्रयोगसिद्ध पुराव्याने आरोग्यसाठी अवश्य आहे. नुसते अमक्या पोथीत अमुक शिवू नये, अमक्याचा विटाळ मानावा असे सांगितलें आहे म्हणूनच काय ते वैज्ञानिक पुरावा ओरडणाऱ्या धार्मिक कोलाहलास जुमानू नये; अस्पृश्य जातीची अस्पृश्यता ही तर निव्वळ मानीव, पोथीजात माणुसकीचा कलंक. ती तर तत्काळ नष्ट झाली पाहिजे. ह्या एका सुधारणेसरशी कोटीकोटी हिंदूबांधव आपल्या राष्ट्रात एकजीव होऊन सामावले जातील. आपल्या गोटात इतके एकनिष्ठ सैनिक वाढून हिंदुराष्ट्रात चढाईत नि लढाईत झुंजू लागतील.

**(४) सिंधुबंदी** - ही चौथी बेडी तोंडून परदेशगमनाची अटक साफ काढून टाकावी. परदेशगमन जातीबहिष्कार्य पाप ठरविण्याची अवदसा ज्या दिवशी वा काली आम्हांस आठवली त्याच काली आमचें हिंदुराष्ट्र मेक्सिकोपासून मिसरपर्यंत पसरलेल्या आपल्या जागतिक हिंदूसाम्राज्यास आंचवलें. परदेशीय व्यापार ठार बुडाला, नाविक बळ बुडालें, परदेशीय शत्रूंच्या मुळावरच, ते सिंधू ओलांडून इकडे स्वाऱ्या करण्याइतके बलवत्तर होण्याच्या आधीच, तिकडे जाऊन कुऱ्हाड घालणें अशक्य झाले; परदेशीय विद्यांचें संजीवनीहरण दुर्घट झाले. आजही जे लक्षावधी हिंदू लोक देशोदेशी वसाहत करून आहेत, त्यांच्याशी संबंध अभंग न ठेवला तर हिंदू संस्कृती नि हिंदू धर्म यांचीं बळकट बंधनें तुटून तेही आपणांस अंतरतील नि अहिंदूंच्या पोटात गडप हाऊन विपक्षाचें बळ वाढवितील. हजारो धर्मोपदेशक, हिंदूसंघटक, हिंदू व्यापारी, योद्धे, विद्यार्थी यांचे तांडेच्या तांडे परदेशात आले-गेले-बसले पाहिजेत.

**(५) शुद्धीबंदी** - ही पाचवी बेडी तोडून पूर्वी परधर्मात गेलेल्या किंवा जन्मत:च परधर्मी असलेल्या अहिंदूंना हिंदुधर्मात घेता आलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर त्यांस हिंदुराष्ट्रात ममतेने नि समानतेने संव्यवहार्य करून आत्मसात्करून सोडलें पाहिजे. मुसलमान-ख्रिश्चनांत हिंदू स्त्रीपुरुष बाटून जाताच जसा पाण्यासारखा मिसळून जातो तसे आपण शुद्धीकृतांना समाजात आत्मसात्करून सोडू तर एका दहा-वीस वर्षांचे आत एक कोटी अहिंदू लोक तरी शुद्ध होऊन हिंदुधर्मात येऊ शकतील. ही गोष्ट वसई, राजपुताना, आसाम, कान्हदेश, बंगाल प्रभृती ठिकाणी शुद्धीकार्य करणाऱ्या थोर थोर कार्यकत्यार्ंंनी वारंवार सांगितलेली आहे, मंदिरबंदी, रोटीबंदी, बेटीबंदीच्या अडसरामुळेच त्या परधर्मात अडकलेल्या हिंदूंच्या मनात असताही अहिंदूंच्या गोटातून फुटून एवढें मोठें संख्याबळ आपल्या शिबिरात येऊ शकत नाही.

**(६) रोटीबंदी** - यासाठीच रोटीबंदीची सहावी बेडीही तत्काळ तोडली पाहिजे. किंबहुना ही एक बेडी तोडली, खाण्याने जातच जाते, धर्मच बुडतो, ही अत्यंत खुळचट राष्ट्रघातक नि मळमळी भावना सोडून दिली, म्हणजे बाकीच्या वरील सर्व बेड्या एकदमच तुटल्या जातात. कारण ह्या रोटीबंदीच्या पायीच कोट्यवधी हिंदू लोकांना, दुष्काळात मिशनऱ्यांच्या हातचे खाल्लें म्हणून, घरावर गोमांसाचा तुकडा फेकला म्हणून, मुसलमानांनी बळेंच दंग्यात, शेकडो लोकांच्या तोंडात अन्न कोंबलें म्हणून जो तो हिंदू बाटले! बाटले! म्हणून बहिष्कारता झाला - वंशपरंपरा हिंदूत्वास ते कोटी कोटी लोक मुकले!! शुद्धीबंदी, सिंधुबंदी, हीं या रोटीबंदीचींच राक्षसी अपत्यें होत! अशी ही रोटीबंदीची ब्याद सहभोजनाच्या टोल्यासरशी हाणून पाडलीच

पाहिजे. खाणेंपिणें हा वैद्यकशास्त्राचा प्रश्न. वैद्यकदृष्टीने जे आरोग्य देते ते ते, वैद्यक दृष्टीने भोज्यान्न अशा कोणत्याही मनुष्याबरोबर खाण्यास नि पिण्यास हरकत नाही, त्याने जात जात नाही. धर्म बुडत नाही. जात ही रक्तबीजात असते, भाताच्या पातेल्यात नव्हे! धर्मांचें स्थान हृदय, पोट नव्हे! ! जे रुचेल नि पचेल ते जगात कोणचेंही कुठेही नि कोणाबरोबरही खुशाल खा. मुसलमानाबरोबर हिंदू जेवल्याने हिंदूंचाच मुसलमान कां व्हावा? मुसलमानाचा हिंदू का होउ नये? साऱ्या जगाने हिंदूंचे अन्न खाऊन टाकलें. ते 'बाटले' नाहीत, हिंदू होत नाहीत!! म्हणून आता यापुढे तरी त्याच न्याये हिंदूंनो, आपलें अन्न वाचवा! आता पराक्रमे जिंकून जगाचें अन्नही खा नि हिंदूंचे हिंदूही राहा!! तर आता जगाल!!!

**(७) बेटीबंदी** - हिंदुराष्ट्राचीं शकलें शकले पाडण्यास कारण झालेली ही सातवी स्वदेशी बेडी आहे. ही बेटीबंदीही तोडून टाकली पाहिजे. म्हणजे प्रत्येक ब्राह्मण-मराठ्याच्या वधूने वा वराने महार मांग वराशी वा वधूशीच लग्न केले पाहिजे किंवा महार मांग वधूने वा वरानें भंगी वराशी वा वधूशीच लग्न केलें पाहिजे असा ह्याचा विपर्यस्त अर्थ नव्हे. तर गुण, शील, प्रीती ह्यांही अनुरूप असेल तर नि सृजनदृष्ट्या अनुन्नततर संततीस बाध येत नसेल तर, वाटेल त्या हिंदूजातीच्या वरवधूशी विवाहबद्ध होण्यास जन्मजात जातीची अशी कोणतीही आडकाठी नसावी. असा विवाह बहिष्कार्य न मानता हिंदूसमाजात ते दांपत्य पूर्णपणे संव्यवहार्य समजलें जावें. पण अहिंदूंशी विवाह करणे तर मात्र, प्रस्तुत परिस्थितीत, त्या अहिंदूव्यक्तीस हिंदू करून घेतल्यानंतरच काय तो विवाह व्हावा. ही मर्यादा मात्र हिंदुराष्ट्राचे हितार्थ आज अपरिहार्य आहे. जोवर मुसलमान मुसलमानच राहू इच्छितात, ख्रिस्ती ख्रिस्ती, पारशी पारशी, ज्यू ज्यू, तोवर हिंदूनेही हिंदूच राहणें भाग आहे, उचित आहे, इष्ट आहे. ज्या दिवशी ते विधर्मीय गट आपलीं आकुंचित कुंपणें तोडून एकाच मानवधर्मात वा मानवराष्ट्रात समरस होण्यास समानतेने सिद्ध होतील, त्या दिवशी हिंदुराष्ट्रही त्याच मानवधर्माच्या ध्वजाखाली मनुष्यमात्रांशी समरस होईल, किंबहुना असा 'मानव' धर्म हीच हिंदुधर्माची परमसीमा नि परिपूर्णता मानलेली आहे.

वरील सात 'स्वदेशी' बेड्या - म्हणजे आपणच ज्या आपल्या पायात हौशीने ठोकून घेतल्या आणि ज्या तोंडणें हें आजही आपल्याच हाती आहे, त्या तेवढ्या तोंडल्या की ह्या पोथीजात जातीभेदाचा विषारी दात तेवढा तरी उपटून काढला गेलाच म्हणून समजा. प्रकट गुण अंगी नसता, केवळ जातवार जन्मावरीच काय ते, विशिष्ट अधिकार वा विशिष्ट हानी कोणच्याही वाट्यास आली नाही म्हणजे झाले. मग हीं जातींचीं नावें उपनावाप्रमाणेच वा गोत्रांप्रमाणे आपापल्या घरकुल्यातून आणखी काही काल चालत राहिली तरी राहोत!

ह्या पोथीजात जातीभेदाच्या प्राणघातक विळख्यांना तोडून फोडून एकदा का आपल्या हिंदुराष्ट्रात संघटित सामर्थ्याचे हातपाय मोकळे झाले म्हणजे ज्या बाह्य आपत्तीने, ज्या विदेशी बेड्यांनी, आज आपणांस चीत केले आहे. डांबून टाकलें आहे, त्या संकटाशीही उलट खाऊन पुन्हा एकदा टक्कर देण्यात आपलें राष्ट्र आज आहे त्याहून शतपटीने अधिक शक्त झाल्यावाचून राहणार नाही हें नक्की!

- (निर्भीड)

* * *

# ११ अस्पृश्यतेचा पुतळा जाळला!

रत्नागिरीतील जन्मजात अस्पृश्यतेचा मृत्यूदिन!

पुण्याचे कर्मवीर अण्णाराव शिंदे यांचे भाषण

पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणे दिनांक २५-२-३३ च्या शिवरात्रीचा दिवस हा रत्नागिरीच्या संघटनाभिमानी हिंदूसमाजाने मोठ्या धुमधडाक्याने साजरा केला. दि. २१ ला संध्याकाळच्या बोटीने पुण्याचे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, मुंबईचे प्रसिद्ध हिंदू पुढारी डॉ. सावरकर, श्री. पुप्पाला, श्री. राजभोज प्रभृती दीडशे दोनशे पाहुणे मंडळी बंदरावर उतरताच श्रीमंत कीरशेटजींनी त्यांस हार घातले, आणि लगेच त्यांच्या स्वागताची मोठी मिरवणूक निघून त्यांस पतितपावनात आणण्यात आलें. तिथे चांभार पुढारी श्री. राजभोजासुद्धा पाहुण्यांनी थेट गाभाऱ्यात जाऊन देवदर्शन केल्यावर सभा झाली. स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकरांनी विठ्ठल रामजी शिंदे प्रभृती पुढाऱ्यांचे रत्नागिरी हिंदूसभेचे वतीने स्वागत करणारे भाषण केल्यानंतर डॉ. सावरकर हे पुढाऱ्यांची रत्नागिरीकरांस ओळख करून देताना म्हणाले, 'हिंदूसंघटन हें प्रत्येक हिंदूचें धार्मिकच नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्यही आहे आणि त्या दृष्टीने हिंदूंच्या रक्षणार्थ श्री. पुप्पाला यांनी मुंबईत केलेली कामगिरी सर्व हिंदूवीरांस साजेशीच होती.' कर्मवीर अण्णाराव शिंदे म्हणाले की, 'अस्पृश्यता निवारणार्थ रत्नागिरीने केलेली उत्कट कामगिरी प्रत्यक्ष पाहण्यास आपण आलो असून अस्पृश्यतेच्या पुढे जाऊन जन्मजात जातीभेदाचाच उच्छेद करण्यासाठी आपण इतक्या निधड्या छातीने झटत असलेले पाहून मला आश्चर्य वाटते. ही विलक्षण मन:क्रांती रत्नागिरीसारख्या पुराणप्रियतेच्या निशेत गुंग असलेल्या नगरात झाली तरी कशी यातील किल्ली मला या आंदोलनाच्या धुरंधर वीरापासून, बॅ. सावरकरांपासून घ्यावयाची आहे!'

महाशिवरात्रीचे दिवशी सकाळी श्री. विठ्ठलराव शिंदे, राजभोज प्रभृती मंडळी समाजाची मन:स्थिती प्रत्यक्ष बारकाईने पाहाण्यासाठी महारवाड्यात, चांभारवाड्यात आणि इतरत्र जाऊन चर्चा करून आली. दुपारी दोन वाजता अस्पृश्यता मृत्यूदिनानिमित्त पतितपावनात सभा झाली. एक भुशाने भरलेला काळाकुट्ट भला थोरला पुतळा मध्ये ठेवण्यात आला होता. हाच तो अस्पृश्यता रूढि-राक्षसिणीचा पुतळा (effigy), ज्याला तरुण हिंदूसभा जाळून भस्म करण्यास तरवारली होती! सारे पुढारी येताच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तरुणांना संबोधून भाषण केले की 'हा पुतळा जाळण्याचे आधी तुम्ही अस्पृश्यतेस तुमच्या अंत:करणातूनच नव्हे तर आचरणातूनही खरोखरीच नष्ट केलेली मी गेलीं दोन वर्षे पाहात आहे. म्हणूनच मी तुम्हांला हा पुतळा जाळण्यास संमती देत आहे. अस्पृश्यता म्हणजे, हिंदू लोकांत स्पृश्याहुन एक अधिक जन्मजात 'न शिवण्याचा' प्रबंध जो काही जातीच्या बोकांडी लादला गेला आहे, ती रूढी, ज्या अर्थी सन १९३० मध्ये महार, चांभार, भंगी, प्रभृती, 'न शिवले जाणाऱ्या' हिंदूबंधूना तुम्ही रत्नागिरीच्या सार्वजनिक नव्हे तर शेकडा ९० घरांतूनही सरमिसळपणे इतर स्पृश्यांप्रमाणे प्रवेश देऊन जन्मजात अस्पृश्यतेस मरू घातली होतीत, त्याच वर्षी रत्नागिरीच्या जन्मजात अस्पृश्यतेच्या उच्छेदक चळवळीचे रूपांतर जन्मजात जातिभेदाच्याच उच्छेदक आंदोलनात झाले. अस्पृश्यांत नि स्पृश्यांत जो विटाळ आडवा होतो तो तोडून अस्पृश्यांचे 'पूर्वास्पृश्य' १९३०

त तुम्ही केलेत. आता ज्या जन्मजात जातीभेदाच्या विषारी वृक्षाची अस्पृश्यता केवळ एक शाखा होती त्या जातीभेदाच्या मुळावरच सामाजिक क्रांतीची कुऱ्हाड तुम्ही तुमच्यापुरती तरी घालीत आहा; निदान रत्नागिरीच्या तरुण हिंदूंत तरी शेकडा ९० वर तरुण सहभोजनांत प्रत्यक्ष भाग घेणार आहेत. महार, भंगी बंधूंबरोबर नुसती शिवाशिवच काय पण प्रत्यही खाणेंपिणेंही करणारे, तत्त्वतःच नव्हे, तर आचरणात रोटीबंदी तोडून दाखविणारे आहेत, ही गोष्ट मी पारखून घेतली आहे. जीमुळे मालवीयजी केळकरांचे पाणी पीत नाहीत ती स्पृश्यांतील जन्मजात अस्पृश्यताही - हा पोथीजात जातीभेदच जे तुम्ही रत्नागिरीचे तरुण हिंदूमंडळ प्रत्यही मोडीत आहांत, त्या तुम्हांस अस्पृश्यतेचा हा पुतळा जाळून त्या दुष्ट रूढीचा रत्नागिरीपुरता तरी मृत्यूदिन पाळण्याचा पूर्ण अधिकार आहे. तुम्ही आधी करून मग सर्व देशास सांगत आहात की, 'रत्नागिरीने हा एक राष्ट्रीय प्रश्न तरी आपल्यापुरता सोडविला आहे. रत्नागिरी नगरी अशी - या अस्पृश्यतेच्या पापापासून मुक्त झाली आहे!' ही उद्‌घोषणा, या पुतळ्यास लागणारी आग साऱ्या देशभर कळवो! त्या आगीत हा पुतळा नव्हे तर तुमच्या अंतःकरणांतील सात हजार वर्षांचा तो दुष्ट संस्कारदेखील जळून खाक होवो!' अशा आशयाचें बॅ. सावरकर यांचें उद्दीपक भाषण होता, एक भंगी, एक ब्राह्मण, अशा दोघा मुलांकडून त्या पुतळ्याच्या दोन्ही पायांना आग लावण्यात आली. किती अर्थपू्र्ण विधी होता तो! अस्पृश्यता ही 'उच्चांनीच' नव्हे तर 'नीचांनीही' चालविली; तिचें अस्तित्व दोघांचाही दोष - तिचा उच्छेद दोघांनीही सहकार्य करून केलात तरच होईल!'

जन्मजात अस्पृश्यता राक्षसिणीचा पुतळा पेटत असता बँड, ताशे, ढोल वाजत होते. भोवती वेढा घातलेल्या ब्राह्मणापासून भंग्यापर्यंत हजारो हिंदू नागरिकांतून 'हिंदू धर्म की जय' चे निनाद झडत होते! तो देखावा कधी न विसरता येणारा होता!

नंतर मोठी थोरली मिरवणूक निघाली. पालखीत देवाच्या पादुका भंगी पुढाऱ्याने आणि ब्राह्मण मंडळींनी एकत्र उचलून ठेवल्या. मिरवणूकीत कुण्डलिनीकृपाणांकित भगवा हिंदूध्वज घेऊन चालण्याचा मान एका कणखर भंगी बंधूस देण्यात आला होता! अग्रभागी महारांचा हिंदू बँड नि एक भलें मोठें चित्र गाडीवर बांधलेलें मिरवत होते. त्याचें नाव 'अस्पृश्यता हनन'. त्यात एका बाजूस एक स्त्री एका प्रचंड नागिणीने पायापासून कंठापर्यंत वेढून विव्हल केलेली दिसत होती! ती म्हणजे 'सात वर्षापूर्वीची रत्नागिरी' अस्पृश्यता नागिणीने ग्रासलेली! आणि शेजारीच ती स्त्री त्याच नागिणीचे वेढे तोडून फोडून भाल्याने तिची फणा ठेंचीत आहे अशी होती- ही 'आजची रत्नागिरी'!!

मिरवणूक किल्ल्यावर येताच ब्राह्मणांपासून भंग्यापर्यंत सरमिसळ पाच हजार समुदाय दाटलेल्या त्या भागेश्वराच्या पटांगणात अखिल हिंदूंची सभा भरली. प्रथमतः भंगी मुलींनी स्पृश्य हिंदू समाजास देवालयें उघडीं करण्याविषयीच्या प्रार्थनेचें एक पद म्हटले. त्याचें ते धृपद 'मला देवाचें दर्शन घेऊ द्या।।' हें त्या मुली करुणपूर्ण गोडव्याने म्हणत असता ज्याचें अंतःकरण द्रवलें नाही असा मनुष्य विरळा! नंतर एका महार कुमाराने गीताध्याय संस्कृत वाणीत म्हणून दाखविला. त्यानंतर ज्या पुरुषाने लक्षावधी रूपये खर्चून नि पतितपावनाचें अखिल हिंदू मंदिर बांधून रत्नागिरीच्या हिंदू संघटणास अक्षरशः 'आकारा'स आणले आणि आपले भागेश्वर मंदिरही पूर्वास्पृश्य हिंदू बंधूंना उघडें करून 'जे कां रंजले गांजलें' त्यांसी

आपले म्हटले, त्या साधुशील श्रीमंत भागोजीशेट कीरांना, रत्नागिरीच्या प्रौढ नि प्रमुखतम नागरिकांपासून तो विद्यार्थ्यांपर्यंत दीड हजारांवर लोकांनी सह्या केलेलें अभिनंदनपत्र अध्यक्ष कर्मवीर श्री. अण्णाराव शिंदे यांचे हस्ते समर्पण्यात आले. श्रीमंत कीरशेटजींनी ‘आपण जे केले ते देवाचें कार्य म्हणूनच केले. माझ्या हातून हिंदूजातीची सेवा जी काय घडते ती आपण गोड करून घ्यावी. ह्या झालेल्या सुधारणा चिकाटीने सांभाळाव्या. तात्याराव रत्नागिरीतून गेले तरी, मागे पाऊल पडू देऊ नये.’ असे सांगितलें समारोपाच्या भाषणात अध्यक्ष श्री. अण्णाराव शिंदे म्हणाले, ‘रत्नागिरीतील सामाजिक मतपरिवर्तनाची बारीक रीतीने जी पाहणी केली तीवरून मी नि:शंकपणे असे सांगते की येथे घडत आलेली सामाजिक क्रांती खरोखर अपूर्व आहे. सामाजिक सुधारणेंचे कार्य मी जन्मभर करीत आलो. तें किती कठीण, किती किचकट, मीदेखील मधूनमधून निरुत्साह व्हावें असे चेंगट. असे हें कार्य अवघ्या सात वर्षांत रत्नागिरीसारख्या, अगदी रेल्वेटेलिफोनचें तोंड न पाहिलेल्या सोवळ्याच्या बालेकिल्ल्यात तुम्ही हजारो लोक जन्मजात अस्पृश्यतेचें उच्चाटन करण्यास सजला आहात आणि भंगी प्रभृती धर्मबंधूंबरोबर बेखटक, सहासन, सहपूजन, सहभोजन सारे सामाजिक व्यवहार प्रकटपणे करीत असताना मी पाहात आहे. याचा मला इतका आनंद झाला होता, की हे दिवस पाहण्यास मी जगलो हें ठीक झाले असे मला वाटते. मी कुणाचा भाट होऊ इच्छीत नाही. पण ज्या स्वातंत्र्यवीराने आपल्या अज्ञातवासाच्या अवघ्या सात वर्षांत ही अपूर्व सामाजिक क्रांती घडवून आणली त्या बॅ. सावरकरांचा किती गौरव करू, असे मला झाले आहे. कालपासून तुम्ही हजारो नागरिक विशेषत: ही तरुण पिढी त्यांचेवर जो नि:सीम विश्वास ठेवीत आहा तो मी पाहात आहे. पण त्या तुम्हा साऱ्या तरुणांमध्ये खरा तरुण जर कोण मला दिसत असेल तर तो निघड्या छातीचा वीर सावरकर होय! मला असे म्हटल्यावाचून राहवत नाही की, बरें झाले हा अज्ञातवास आला ! नाही तर ही सामाजिक सेवा करण्यास ही स्वारी उरली असती कीं नाही हीच शंका आहे. सावरकरबंधूंविषयी आम्हांस प्रथमपासूनच फार आदर वाटे. म्हणून त्यांना भेटण्यासाठीच मुख्यत्वेकरून इथे आलो. आणि त्यांनी चालविलेली ही सामाजिक क्रांतीची यशस्वी चळवळ पाहून इतका प्रसन्न झालो आहे की, देवाने माझें उरलेले आयुष्य त्यांसच द्यावें! कारण माझे अपुरे राहिलेले हेतू पुरवील तर हा वीरच पुरवील असे मला वाटत आहे. सरकारने त्यांस ह्या सामाजिक कार्यापुरते तरी मोकळें सोडावें अशी खटपट सर्व स्पृश्यास्पृश्यांच्या नि सुधारकांच्या वतीने करावी असे श्री. राजभोजांचे नि माझें ठरलेंच आहे.’ शेवटी स्वातंत्र्यवीरांनी एका उत्स्फूर्त भाषणात सांगितलें की ‘मुळीच काही होत नव्हते त्या मानाने जे झालें ते ठीकच झाले. पण जे व्हावयाचें आहे त्या मानाने हें काहीच नाही. हीं नुसतीं साधनें आहेत! महार अगदी ब्राह्मण केले पण ब्राह्मणच जगाचा महार झालेला आहे! हिंदू हाच शब्द जगांत ‘कुली’ ह्या अर्थी वापरला जातो आहे - त्याचें काय? श्रीरामचंद्राच्या किंवा श्रीकृष्णाच्या काळात जगात जो मान, जो गौरव, जी सांस्कृतिक शक्ती आपल्या भारतभूमीची होती ती सांस्कृतिक शक्ती आणि उच्चतम स्थान जगात पुन्हा प्राप्त करून घेतल्यावाचून हिंदूसंघटनाच्या आंदोलनाने हुश्श करून थकता कामा नये! जे लेशमात्र कार्य झाले, तेही रत्नागिरीच्या सुबुद्ध आणि सत्प्रवृत्त हिंदूसमाजाचें आहे. माझ्या सनातनी आणि सुधारक दोघांही धर्मबंधूंनी हिंदुराष्ट्राच्या गौरवार्थ आपापल्या क्षुद्र वर्णाहंकाराचा बळी देण्यास या वा त्या प्रमाणात तत्परता दाखविली, निदान कोठचाही हलकट हट्टाचा विरोध केला नाही म्हणून हें

कार्य झाले. यास्तव श्रेयाच्या प्राप्तीचा अर्ध्याहून अधिक वाटा मी माझ्या नव्या नि जुन्या पक्षांच्या धर्मबंधूंस-अखिल हिंदू समाजास देत आहे. नाही तर मी एकटा काय करून शकतो!' बॅ. सावरकरांचे भाषण संपताच 'तुम्ही आम्ही सकल हिंदू! बंधू बंधू' हे एकता गीत सर्व सभेने एकस्वराने म्हटल्यावर पूर्वास्पृश्यांसुद्धा सारा समाज मंदिरात देवदर्शनार्थ शिरला. जिकडून तिकडून 'हिंदू धर्म की जय' सावरकर बंधू की जय' चे जयघोष झडू लागले. समाजाच्या उत्साहास नुसती भरती आली.

## ११.१ टोलेजंग सहभोजन!

दुसरे दिवशी दिनांक २३ ला पतितपावनात टोलेजंग सहभोजन झाले. सकाळी ११ वाजल्यापासून तो दुपारी ४ वाजेतो पंगतीमागून पंगती चालल्या होत्या. महार, भंगी, मराठे, ब्राह्मण, चांभार, भंडारी झाडून साऱ्या जातींचे आणि वकील, विद्यार्थी, अधिकारी, व्यापारी, शेतकरी वगैरे सर्व वर्गांचे लहानथोर एक हजारावर नागरिक सहभोजनात सरमिसळ जेवून गेले. प्रत्येक पंगतीचे आरंभी आपण रोटीबंदीची बेडी का तोंडीत आहो, हें स्पष्टपणे सांगून बॅ. सावरकर प्रकट संकल्प सोडीत की 'जन्मजातजात्युच्छेदनार्थम्अखिल हिंदूसहभोजनम्करिष्ये.'

संध्याकाळी मुंबईचे व्यायामाचार्य श्री. रेडकर नि हरिश्चंद लरकर यांच्या मंडळीची अचाट शक्तीचीं कामें दाखविण्यात आलीं. रात्रौ श्री. गोधडेंबुवांचे शिष्य चंद्रभानबुवा यांचें कीर्तन झालें. त्या वेळी मनस्वी दाटी झालीं होती. महोत्सवाचा सर्व व्यय एकट्या श्रीमान्भागोजीशेट कीर यांनीच केला.

- (सत्यशोधक, रत्नागिरी, दि. ५-३-१९३३)

***

# १२ माझ्या सनातनी नाशिककर हिंदू बंधूंना माझें अनावृत पत्र

माझ्या सर्व हिंदू बंधूंनो, आणि विशेषतः माझ्या नाशिककर धर्मबंधूंनो, माझी तुम्हांस अत्यंत नम्र पण अत्यंत आग्रहाची विनंती आहे की, अगदी पूर्वास्पृश्य हिंदू बंधूंना पंचवटीच्या श्रीराममंदिराचें देऊळ इतर स्पृश्य हिंदूबंधूंप्रमाणेच उघडें करावे.

या विषयीची सांगोपांग चर्चा मी आता इथे करीत बसत नाही. ती चर्चा यथेच्छ झाली आहे. युक्तीवादाच्या किंवा शास्त्राधाराच्या बळावर मी हें पत्र लिहीत नाही तर केवळ हिंदूहिताच्या आणि प्रेमाच्या बळावर मी हें पत्र लिहीत आहे.

दुसऱ्या एखाद्या देवळाविषयीच्या वादात मी हें पत्र खचित् लिहिलें नसतें. अखिल हिंदू देवालयें नवीं निर्माण करून तसे प्रश्न काही अंशी सुटतील. पण पंचवटीचा राम, सीतागुंफा किंवा सेतुबंध प्रभृती स्थानें यांचे एक पवित्र ऐतिहासिक महत्त्व आहे. ते इतर कोणत्याही देवळाला येणें अशक्य आहे. यास्तवच या पवित्र ऐतिहासिक स्थानावर सर्व हिंदूंचा सारखाच विशिष्ट वारसा आहे. रायगड ही शिवरायांची राजधानी. तिथे ती अवलोकन करू इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांस जर आपण म्हणू लागलो की ‘तुला नवा किल्ला बांधून देतो. तू तिथेच रायगड अशी कल्पना कर आणि समाधान मान.’ तर ते हास्यास्पद होईल. कारण ते स्थानमाहात्म्य अप्रतिम आहे. तसेच जिथे राम वनवासी राहिले, जिथे सीता वनवासी निवसे, जिथे कौरव-पांडव लढले, गीता उपदेशिली तीं तीं ऐतिहासिक देवस्थानें, तीर्थे, क्षेत्रें, ही अप्रतिमच - ज्यांचें वैशिष्ट्य त्यांच्या कोणत्याही प्रतिलिपीस (Copy स) येणें शक्य नाही, तशींच सदोदित राहणार. तेव्हा आपल्या तीर्थमहात्म्यादिक ग्रंथांनी त्यांस जे अनन्य पुण्यप्रदत्व दिलें आहे त्यामुळेच हीं स्थानें अखिल हिंदूंना आपण मुक्तद्वारे केली पाहिजेत. त्यास दुसरी तोंडच नाही.

यास्तव काय होईल ते होवो, आपण होऊन आम्हीं तीं स्थानें आणि या प्रसंगापुरते ते श्रीराममंदिर आपल्या पूर्वास्पृश्य हिंदू बंधूंना मोकळें करावेच.

मी मूळचा नाशिकचा म्हणून मला नाशिकवीषयी जे अल्लड ममत्व आजन्म वाटत आलें आहे, आणि मजविषयी नाशिकनेही आजवर अनेकदा जे आपुलकीचें विशेष प्रेम आणि आदर व्यक्तविला आहे, त्या प्रेमाचा आणि ममत्वाचा वशिला लावून आणि मी आबाल्य हिंदू जातीस्तव आणि हिंदूस्थानास्तव जी अल्पस्वल्प सेवा करीत आलो, कष्ट सोशीत आलो, आणि आज तीस वर्षे ती सेवा करताना आपणां हिंदूंचें हिताहित कशात आहे याचें जे अनुभवजन्य ज्ञान मला झाले आहे, त्या सेवेची, त्या कष्टांची आणि त्या अनुभवाची हमी देऊन मी आपणांस ही विनंती करीत आहे, हें आश्वासन देत आहे की, पंचवटीचें श्रीराममंदिर अप्रतिबंधपणे उघडे करताच आपल्या हिंदू जातीची शक्ती, प्रभाव आणि जीवन अनेक पटींनी अधिकच प्रबल होईल - लेशमात्रही दुर्बळ तरी होणार नाहीच नाही!!

पूर्वास्पृश्यांची मंदिरप्रवेशाची मागणी अत्यंत धर्म्य, न्याय्य आणि ते ज्या सत्याग्रहाच्या निकरावर आले आहेत, तो सत्याग्रह आपल्या पिढ्यान्पिढ्याच्या दुराग्रहाचाच केवळ अपरिहार्य पडसाद आहे! साठ- सत्तर पिढ्या त्यांनी वाट पाहिली. आणखी वाट ती त्यांनी किती पाहावयाची? आता आपणच ती वाट त्यांना मोकळी करून देणे एवढेंच बाकी उरलें आहे.

यास्तव पूर्वास्पश्य हिंदूबंधू मंदिराशी येताच तुम्ही त्यांचे उत्कंठ प्रेमाने स्वागत करा आणि पतितपावन रामचंद्रासमोर एकत्र जाऊन आपण सर्व स्पृश्यास्पृश्य पतित दोन्ही कर जोडून झाल्या गेल्याची क्षमायाचना करा की पाहा तर खरे, जातीय प्रेमाची केवढी लाट हिंदुस्थानभर उसळते ती! अखिल हिंदूंच्या कंठातनू निघालेल्या 'हिंदूधर्मकी जय'च्या अपूर्व गर्जनेने ते राममंदिर कधी दुमदुमलें नव्हते तसे दुमदुमते ते आणि त्या गर्जनेसरसे अहिंदू शत्रूंचे मानभावी जाळें तुटून त्यांच्या दुष्ट आशांचीं तोंडें कशीं काळीं ठिक्कर पडतात तीं!!

प्रत्यक्ष राक्षस कुळातील बिभीषणादिकांना त्यांच्यात भक्ती उदय होताच अयोध्येचा आपला राजवाडा मुक्तद्वार करणारा श्रीराम त्यांच्याच जातीच्या, धर्माच्या आणि राष्ट्राच्या या परंपरागत भक्तांस या पूर्वास्पृश्य हिंदू बंधूंस, आपल्या देवालयाचीं द्वारेंही मुक्त करण्याची सद्बुद्धी आम्ही स्पृश्य हिंदूंना देवो ही मनोभावें करूणा भाकणारा.

आपला,

रत्नागिरी — ज्ञातिबंधू नि धर्मबंधू

दि. १३-३-१९३१ — वि. दा. सावरकर

* * *

# १३ मद्रास प्रांतातील काही अस्पृश्य जाती

जातीभेदाचें आजचें तिरस्काराई स्वरूप किती भयंकर आहे आणि त्यायोगे आपल्या हिंदू राष्ट्राची कशीं छकलें छकलें उडलीं आहेत हें विशदिण्याच्या कार्यी नुसत्या तात्त्विक वा सामान्य विवेचनाने मनावर जो परिणाम होतो त्यापेक्षा शतपटीने अधिक परिणाम त्याच्या स्फुट विवरणाने होतो. काश्मीरपासून रामेश्वरपर्यंत किती भिन्नभिन्न जाती, त्यांच्या उपजाती, पुन्हा त्या उपजातींच्या पोटजाती, त्या जाती-उपजाती-पोटजातीतील प्रत्येक जात, इतरांपासून बेटीबंद, रोटीबंद, लोटीबंद झालेली! 'जातीभेद' म्हणताच बहुतेकांस त्यांच्या ह्या 'बहुशाखाह्यनंताश्च' अशा विषारी विस्ताराची काही एक कल्पना येत नाही आणि त्यामुळे जातीभेदाने आपल्या हिंदू राष्ट्राची किती अपरिमित विघटना केली आहे, किती तुकडेतुकडे पाडले आहेत आणि त्याचे परिणाम किती भयावह होत आहेत, याची पुसट अशीसुद्धा कल्पना येत नाही. 'जातीभेद' म्हणताच बहुतेकांच्या दृष्टीपुढे नुसते चातुर्वर्ण्य एवढाच अर्थ उभा राहतो आणि ते म्हणतात, 'त्यात हो काय! बुद्धीशाली वर्ग, शक्तीशाली, वर्ग, धनिक नि श्रमिक, बस्स, चारच वर्ग! आणि तो किती सोयिस्कर श्रमविभाग! प्रत्येक राष्ट्र ह्या चार विभागांत विभक्त नसते का?' पण प्रथमतः प्रत्येक राष्ट्रात ह्या चार विभागांना, रोटीबंद-बेटीबंदीच्या दुर्लंघ्य तटांना मध्ये उभारून जन्मजातपणे पृथक्‌केलेलें नसते. कामापुरते ते वेगळे, पण संध्याकाळी पुन्हा घरी येताच एकत्र राहणारे, एकत्र जेवणारे, एका कुटुंबात मिसळून एकजाती होणारे कुटूंबीय असतात. श्रमविभाग सर्वत्र असेल; पण श्रमविभागाने तिकडे जातीविभाग पडून राष्ट्राचीं चार बेटीरोटीलोटीबंद छकलें उडालेलीं नाहीत!

पण 'जातीभेद' म्हणताच - 'चातुर्वर्ण्य' चारच काय तीं छकलें - हा अर्थ जो बहुतेकांच्या मनात येतो तोच किती चुकीचा आहे ही गोष्ट जातीभेद या सामान्य नावाचें फुटकळ विवरण, नुसते परिगणन करताच स्पष्ट होते! चातुर्वर्ण्य म्हणजे चार वर्ण आणि जातीभेद म्हणजे कमीत कमी चार हजार जाती! 'ब्राह्मणजात' या सामान्य नावाने, नुसत्या ब्राह्मण या जातीच्या तात्त्विक चर्चेने ती एकच जात असा बोध वरवर होत राहतो; पण तिचें फुटकळ वर्णन करू लागताच, नुसती कोणकोण ब्राह्मण तीं नावें सांगू लागताच, ब्राह्मणांच्याच पाचशें पोटजाती बेटीबंद, रोटीबंद कशा आहेत याचा एक निराळाच संस्कार मनावर झटपट होतो. तीच गोष्ट क्षत्रिय ह्या एका शब्दाची, वैश्य ह्या शब्दाची, शूद्र ह्या शब्दाची. म्हणजे जातीभेद ह्या सामान्य शब्दाने वा त्याच्या तात्त्विक चर्चेने जो एकपणाचा वा फार फार तर चारपणाचा पुसट बोध होतो तो त्या जातीभेदाचें फुटकळ विवरण करू लागताच नाहीसा होऊन, चार जातींच्या चारशे मोठमोठ्या जाती, त्यांच्या उपजाती-पोटजाती चार हजार होऊन पडतात!

तीच गोष्ट 'अस्पृश्य' ह्या शब्दाची. अस्पृश्य वर्ग असा सामान्य उल्लेख केला म्हणजे मनाची कशी फसगत होते पाहा! तो जसा काही एक गट आहे. स्पृश्य नावाच्या दुसऱ्या एका गटाने काय तो त्यांचा अस्पृश्यतेचा भयंकर छळ चालविला आहे, इतकाच अर्थ भासमान होतो. पण अस्पृश्य कोण कोण, त्या एका शब्दाच्या पोटात किती जाती, उपजाती-पोटजाती भरलेल्या आहेत आणि एक अस्पृश्यही दुसऱ्या अस्पृश्यास कसा अस्पृश्यच लेखतो, या पापाचा अधिकारी 'स्पृश्य' तेवढा नसून अस्पृश्यही कसा असतो, हें त्या अस्पृश्य जातीच्या विवरणाने, फुटकळ

वर्णनाने जसें ध्यानी येते तसे त्या शब्दाच्या नुसत्या सामान्य उच्चाराने वा तात्त्विक चर्चेने येत नाही.

जातीभेद वा अस्पृश्यता प्रभृती सामान्य शब्दाच्या उच्चारासरशी जो अर्थ वा अनर्थ मनुष्याच्या मनाला साधारणतः प्रतीत होतो, त्याहून त्याच्या फुटकळ वर्णनाने वा परिगणनाने किती उत्कटपणे मनावर ठसतो, ते एका दुसऱ्या उदाहरणाने दाखवू. 'जातीभेदाने हिंदू राष्ट्राचीं छकलें केलीं' हें सामान्य नि तात्त्विक विधान वाचताच कोणाच्याही मनावर हिंदू राष्ट्राच्या जातीभेदाने उडालेल्या त्या छकलांचा आणि त्यायोगे झालेल्या भयंकर हानीचा जो पुसट ठसा पडतो तो पाहा आणि तीं छकलें किती, त्यांचें नुसते महाराष्ट्रापुरते ओझरते विवरण, नुसतीं जातींचीं नावें उच्चारताच जो यथातथ्य ठसा उमटतो नि त्या हानीची बिनबोलता किती भयंकर कल्पना येते ती पाहा. महाराष्ट्रातील जाती - देशास्थ, चित्पावन, कऱ्हाडे, गोवर्धन, सामवेदी, पळसे, सारस्वत, शेणवी, कुडाळकर, भंडारी, मराठे, दैवज्ञ, कासार, लिंगायत, संगमेश्वरी, वाणी, नामदेवशिंपी, भावसार शिंपी, कोकणस्थ वैश्य, देशस्थ वैश्य, पातारे प्रभू, साळी, माळी, कोष्टी, तांबट, सोनार, धनगर, जिनगर आणि प्रत्येकी पुन्हा पोटजाती! एका 'मराठा' जात शब्दाचें विवरण केले तर शंभर पोटजाती! अस्पृश्य जात या एकेरी शब्दाचें विवरण करताच, एकेरी पेव फोडताच अळ्याच अळ्या निराळ्या बाहेर पडाव्या तशाच जातीच जाती बाहेर पडतात. महार, चांभार, मांग, वडार. त्यांच्यात पुन्हा पोटजाती कोकणस्थ महार, देशस्थ महार, कोकणे चांभार, इतर चांभार! वऱ्हाडातदेखील पुन्हा पोटजाती असून त्या एकमेकात 'उच्च जाती' आणि 'नीच जाती' म्हणून पृथक्पृथक्! त्या अस्पृश्यातील एक जात दुसरीस अस्पृश्य मानणारी! या साऱ्या जाती बहुधा एकमेकांपासून बेटीबंदीने नि रोटीबंदीने जन्माच्या पिढ्यान्पिढ्या कधीही एकजात होण्याचा संभव नसलेल्या!

जातीभेदाने आपल्या हिंदू राष्ट्राच्या पाडलेल्या ह्या अनेक तुकड्यांपैकी कोणतेही दोन तुकडे एकात सांधणें अधर्म - पण त्या पडलेल्या जातींच्या शतशः तुकड्यांपैकी प्रत्येक पिढीत पुन्हा पोटतुकडे पाडण्यास पूर्ण स्वातंत्र्य - तो धर्म! प्रभूजातींत एकाच्या हातून गंधाचें कंचोळें पडलें ते जातिबहिष्कार्य पाप ठरले. त्या पडलेल्या कंचोळ्याचा पक्ष उचला ते निराळे पडले - 'कंचोळे प्रभु' म्हणून नवीन जात झाली! अशा जातींच्या नुसत्या नावानिशी, फुटकळ वर्णनास ऐकताच या जातीभेदराक्षसाच्या हिडीस स्वरूपाचा जो बोध होतो, तो त्याच्याच नुसत्या 'जातीभेद' अशा एकेरी सामान्य उल्लेखाने कधीही होत नाही!

ही झाली नुसत्या महाराष्ट्राची गोष्ट. पण हिंदू राष्ट्राची ह्या जातीभेदाने कशी दुर्दशा उडविली आहे याची कल्पना करायची तर हिंदुस्थानातील जातींचाही नामोच्चार केला पाहिजे. साधारणतः महाराष्ट्रीय वाचकांस त्याची कल्पना नसते. जातिभेदाच्या विरुद्ध पाचशे पृष्ठें सामान्य नि तात्त्विक चर्चेचा ग्रंथ लिहूनही जो धक्का महाराष्ट्र वाचकांस बसणार नाही तो त्यास साऱ्या हिंदुस्थानातील हिंदूंमध्ये नुसत्या मोठमोठ्या अशा किती जाती आहेत त्यांची नुसती नामावळी ऐकून बसेल! नुसते ब्राह्मण पाहा - काश्मिरी ब्राह्मण, पंजाबी, कनोजी, मारवाडी, गुजराथी, बंगाली, तेलगू, तामीळ, ओरिसा, आसाम, मलबारी, कानडी असे अनेक प्रांतिक भेद! त्यांत पुन्हा शैव- वैष्णव कुलीन-अकुलीन, शाकाहारी, मांसाहारी ब्राह्मण; त्यात पुन्हा अंडी न खाणारे नि खाणारे ब्राह्मण, बोकड खाणारे पण कोंबडी न खाणारे, मासे खाणारे पण बोकड न खाणारे

ब्राह्मण! यांच्या भिन्न जाती - रोटीबंदी, बेटीबंदी! क्षत्रियांची तर गोष्टच नको! तीच वैश्यांची गत. जातीभेद म्हणतात चातुर्वर्ण्य- चार तुकडे तेवढे समजणारांची केवढी भयंकर चूक होते ती पाहा! चातुर्वर्ण्य म्हणजे ब्राह्मण एक गट, एकच तुकडा, पण त्या ब्राह्मण शब्दाची फोड करू जाताच पाचशे मोठमोठ्या मुख्य जाती! प्रांत तितक्या जाती, पंथ तितक्या जाती, भाषा तितक्या जाती, धंदे तितक्या जाती - रोटीबंदी-बेटीबंदी याचें नाव आजचा जातीभेद! कसलें घेऊन बसला आहात चातुर्वर्ण्य! ते कधीच मेलें! जे आहे ते चतुष्कोटीर्ण्य!

ह्या जातीभेदराक्षसाने आपल्या हिंदू राष्ट्राच्या विराट शरीराचे हे शेकडो तुकडे कसे उडविले आहेत ते नुसत्या तात्त्विक चर्चेपेक्षा ते तुकडे कसे एकेक मोजून फुटकळपणे दाखविल्यानेच खरी कल्पना येण्यास सुलभ जाते, म्हणून मधूनमधून महाराष्ट्रास अपरिचित अशा अन्य प्रांतांतील जातींची नावें नि थोडी माहिती देणें जितकें मनोवेधक तितकेंच हृदयविदारकही होईल, जातीभेदाचा यावा तसा तिटकारा येऊ लागेल, यास्तव तशी माहिती देण्याचा यत्न होणें अवश्य आहे. त्या दिशेने आज थोडी माहिती देत आहो. त्यातही मी मद्रासच्या अस्पृश्य जातींचीच प्रथमतः निवडण्यात हेतू हा की, जातीभेदाची जशी शिसारी यावी तशीच त्यातल्या त्यातही जी अत्यंत अन्याय्य नि आत्मघातक अस्पृश्यता तिचेही घातक रूप नि तिच्या योगे होणारी हिंदू राष्ट्राची जी भयंकर हानी तिची तर ओकारीच यावी! स्पृश्यांनाच नव्हे तर, अस्पृश्यांनाही पटावें की, अस्पृश्यतेच्या पापाचे तेही वाटेकराची आहेत, त्यांना इतर स्पृश्य जसे कुत्र्यासारखे हडहड करतात तसेच तेही स्वतः स्पृश्य बनून त्यांच्या खालच्या जातींना शिवत नाहीत, कुत्र्यासारखे हडहड करण्यास सोडीत नाहीत! दुसऱ्याच्या नावाने खडे फोडताना त्या अस्पृश्यांनी स्वतःच्या नावेही खडे फोडावे. दोषी सारे-सारे मिळून तो दोष दूरवावा हेंच उचित. जी जी शिवी अस्पृश्य स्पृश्यांना देतात ती ती त्या अस्पृश्यांना स्वतःलाही दिली जाते हें त्यांनीही विसरू नये!

## १३.१ मद्रासमधील काही अस्पृश्य जाती!

**चेरुम (पुलिया)** : ही अस्पृश्य जाती मलबारात राहते. उत्तर मलबारात राहतात त्यांना पुलिया म्हणतात आणि दक्षिण मलबारात वसतात त्यांस चेरुमा. म्हणजे एका चेरुमा जातीच्या स्थानपरत्वें दोन मुख्य जाती झाल्या. पण एवढ्यानेच संपत नाही. त्या दोन उपजातींपैकी चेरुमा जातीत २९ चेरुमा, पल्ला चेरुमा, एलारेन, रोलन, बुडान प्रभृती पडल्या आहेत आणि पुलियात १२ पोटजाती आहेत! ह्यांपैकी चेरुमाइरया हे स्वतःस पुलिया जातीहून उच्च समजतात ते सारे चेरुमा लोक ब्राह्मण-क्षत्रियांकडून अस्पृश्य मानले जातात; शूद्रही त्यांना शिवत नाहीत. ती अस्पृश्यता इतकी कडक आहे की, परंपरेप्रमाणे नियम म्हटला की चेरुमा अस्पृश्याने ब्राह्मणांपासून ९० फूट अंतरावर आणि नायर प्रभृती अब्राह्मणांपासून ६४ फूट अंतरावर उभें राहिलें पाहिजे. त्या अंतराच्या आत वाटेनेदेखील त्याने ब्राह्मणशूद्रादिकांजवळ येता कामा नये, नाहीत तर विटाळ होतो! आपल्या इकडे सावली तेवढी पडू देऊ नये इतकी ढिली झालेली अस्पृश्यता म्हणजे या मद्रासी अस्पृश्यतेच्या मानाने एक वरदानच म्हणावयाचें. जर कोणी चेरुमा अस्पृश्याजवळ ह्या अंतराच्या आत बोलला तर त्या ब्राह्मण-शूद्रास स्नान करून प्रायश्चित घ्यावें लागते. काही स्थली त्यांना बाजारातदेखील प्रवेश नाही, मग तलावाची नि गावाची गोष्ट दूर!

ब्राह्मण शूद्र प्रभृती स्पृश्यांकडून ह्या चेरुमांचा चाललेला हा अपमान नि पीडा ऐकून ह्यांचा दलित म्हणून जितकी दया करावी तितकी थोडीच आहे! मग स्वतः इतके नीच नि दलित झालेले हे चेरुमा अस्पृश्यसुद्धा ज्या पुला, परिया, नबादी आणि उल्लदन जातीच्या लोकांना अस्पृश्य मानतात, त्यांची दया किती करावी! क्षत्रिय प्रभृती ‘स्पृश्य’ जसें चेरुमांना पीडतात नि त्यांना शिवणेंही पाप समजतात तसेच वरील परिया, पुलादी प्रभृती जातींना तेच चेरुमा पीडतात नि त्यांना शिवणेंही पाप मानतात! वरचे जी पीडा नि नीचता त्यांच्यावर लादतात त्याच पीडेचा नि नीचतेचा बोजा हे चेरुमा खालच्यावर लादून स्वतःच्या वरच्याकडून होणाऱ्या अपमानाची भरपाई खालच्यांचा अपमान करून भरून काढतात! त्यामुळे ब्राह्मणक्षत्रियांनाच तेवढे प्रपीडक म्हणण्यास त्यांस तोंड नसते; कारण त्याच शासनाच्या आधारे ते अस्पृश्य स्वतःस उच्च समजून त्यांच्या खालच्या जातीचे ब्राह्मण क्षत्रिय बनतात; त्यांस शिवणेंही पाप मानतात! अस्पृश्यतेच्या क्रूरतेसाठी जी जी शिवी अस्पृश्य स्पृश्यास देतो, ती ती अशी परत त्यांच्याही डोक्यावर येऊन आदळते; कारण प्रत्येक अस्पृश्य जात दुसऱ्या कोणत्यातरी खालच्या जातीस अस्पृश्य मानीत असते. अगदी सगळ्यांच्या खालची जात कोणची ते सापडून काढण्याचें काम तर शेषाची टाळच शोधून काढणारे एखादें पाताळयंत्र काय ते करू जाणे!

हे चेरुमा लोम उच्चवर्णीयांच्या शेतीचें सारें काम करतात. ज्या स्वामीच्या पदरी हे असे राहतात त्यांचे ते वंशपरंपरा कृषक होऊन पडतात. दुसऱ्याच्या शेतावर वाटेल तेव्हा नोकरी करणे त्यांना दुर्घट. ते शेतीत बांधलेले असतात. त्या चेरुमाचें लग्न व्हावयाचें तर त्याला दहा रूपये आपल्या स्वामीस देऊन अनुज्ञा मिळवावी लागते. हे चेरुमा आपल्या स्त्रीस विकूही शकतात. सन १८४१ पर्यंत तर मुलगा साडेतीन रूपयांना नि मुलगी तीन रूपयांपर्यंत ह्यांच्यांत विकली जाई.

हे चेरुमा लोक अगदी प्राचीन काळी मलबारमध्ये लहानमोठीं राज्यें करीत असावे असा इतिहासज्ञांचा अभिप्राय आहे, चेरनाद्र ही अशीच एका राजाची राजधानी होती. पुढे ते पराभूत होऊन जेत्याशीं त्यांचें हाडवैर जुंपलें नि त्याचा परिणाम त्यांची अस्पृश्यता ही असावी. त्यांच्या पुला, चेरुमा प्रभृती काही पोटजाती गोमांस खातात. त्यांना अस्पृश्य चेरुमाच्या इतर जातीही अस्पृश्य मानतात. चेरु शब्दाचा अर्थ शेत असाच आहे. त्यांचे आजचे मुख्य धंदेही शेतीचेच यावरून पूर्वी हेच ह्या भूमीचे धनी असावे. पुढे भूमिचें स्वामीत्व दुसऱ्याकडे जाऊन हे केवळ भूदास (Serfs) होऊन बसले असावे असा एक तर्क आहे.

चेरुमा नि पुलिया हिंदूधर्मीय, देवीदेवपूजक, परकुट्टी, कमरकुट्टी, चयन प्रभृती त्यांच्या विशिष्ट देवतापूर्वज यांचीही पूजा ते करतात. कर्क आणि मकर संक्रान्तीस ते ओनम्(ॐ?) नि विष्णुभगवानांचे चरणी प्रसाद वाहतात. त्यांच्या विवाहविधीत वृद्धांवर तांदुळांचा मारा करतात. आणि ‘मंगलम्’ नावाचा संस्कार झाला की लग्न लागते. चेरुमाची स्त्री त्यांच्याहूनही नी ज्यांना तेही अस्पृश्य समजतात त्या परिया प्रभृती जातींशी संबंध ठेवताना आढळली, की जातीतबहिष्कृत होते - आणि अर्थातच इसाई नि इस्लाम यांच्या पंजांत अचानक सापडते! सन १९२१ च्या शिरगणीप्रमाणे ह्यांची संख्या - चेरुमा अडीच लक्ष नि पुलिया पावणेतीन लक्ष होती. हे चेरुम लोम आपलीं प्रेते गाडतात.

**होलिया** - हे मलबारच्या वर दक्षिण कानडात मुख्यत्वे राहतात. होला शब्दाचा अर्थ भूमी, त्यापासून त्यांचे होलिया हें जातीवाचक नाव पडलें. चेरुमा या शब्दाचा अर्थ जसा भूमिधर तसाच या होलीयांचाही. इतकेंच नव्हे तर, चेरुमांचीं प्राचीन राज्यें मलबारमध्ये होतीं, तशींच होलियांची दक्षिण कानडांत होतीं. अर्थात्त्यांची भूमि विजयी लोकांच्या हाती गेली, तेव्हा हे केवळ भूमिदास होऊन बसले. हेही आपली प्रेते गाडतात. हेही अस्पृश्य. हेही उच्चवर्णीय भूस्वामींच्या कृषीचें काम करतात. क्वचित्पोटधंदे म्हणून कपडे विणतात, मासेमारी करतात. यांचें मुख्य दैवत शिव नि ग्रामदेवता. एक आश्चर्यकारक चाल यांच्यात आहे. ती अशी कीं होलियांचा स्पर्श वा प्रवेश ब्राह्मणवस्तीत झाला तर जसे ब्राह्मण अपवित्र होऊन प्रायश्चित्त घेतो, तसेच जर ब्राह्मण चुकून होलियावस्तीत शिरला तर होलिया लोकही आपली वस्ती बाटली असे समजून ती शुद्ध करण्याचा एक संस्कार करतात! यांच्या एकंदर रीतिभाती, अंगलट, इतिहास यावरून हे कानडांतील होलिया, मलबारांतील चेरुमांच्याच जातीचे असून प्राचीन काळी त्यांचे पूर्वज एकच असावेत असे अनुमानणें भाग पडते. त्यांची संख्या सन १९२१ च्या शिरगणतीप्रमाणे पावणेसात लक्ष होती.

**पल्ला** - ही अस्पृश्यांतील तिसरी मोठी जात. तंजोर, त्रिचनापल्ली, सालेम नि कोइमतून जिल्ह्यांतून वसलेली आहे. पल्ला शब्दाचा अर्थ खोल भूमी. ह्यांचा धंदाही खोलगट भूमीत तांदुळादिक शेती करणे. ह्यावरून कानडातील होलिया नि मलबारातील चेरुमाप्रमाणे हेही पूर्वी ह्या भूमीचे धनी नि नंतर त्यांचे विजेते भूस्वामी झाल्यावर त्यांचे भूदास झालेले असावे असे तर्किले जाते. स्पृश्यांच्या गावात हे राहू शकत नाहीत. गावाबाहेर यांची वाडी झोपड्यांची असते. तीस पल्लाचेरी म्हणतात. त्यांची जातीसंस्था चिवट नि आश्चर्य वाटण्यासारखी संघटित आहे. प्रत्येक गावी तीनचार जण 'मुखिया' असतात ते पंच. त्यांच्यात एक अध्यक्ष तो 'नात्तुमुप्पन.' एक 'अडुमपिल्लची' चपराशासारखा पंचायतीच्या वेळी सर्वांस जमविणारा, आजच्या भाषेंत 'प्रतोद' (Whip). यांच्या जातीचेच न्हावी, धोबी स्वतंत्र असतात. जातीनियम मोडील त्यास जातीच्युत करतात नि त्याचें काम हे न्हावी, धोबी कोणी करीत नाहीत. हे लोक शिव नि ग्रामदेवता भजतात. सन १९२१ त यांची शिरगणती नऊ लक्षांजवळ होती.

**पारिया, माल आणि मादिगा** - ह्या मद्रासमकडील अस्पृश्यांच्या उरलेल्या दोन मोठ्या जाती. पारियात काही नगारा वाजवितात. पण बहुतांश लोक चेरुमा, होलिमा नि पल्ला या वरील जातींप्रमाणेच शेतकी करून शेताच्या धन्याची बांधलेली नोकरी पिढ्यान्पिढ्या करतात. माल नि मादिगा हे तेलगु प्रांतांत नि पारिया हे तामील प्रांतात बसतात. ह्यांच्या अपासात रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृती जातबंद्या आहेतच हें सांगणें नकोच. हे काली, शिव, विष्णू, आणि ग्रामदेवता पुजतात. गेल्या शिरगणतीत पारियांची संख्या चोवीस लक्ष, माल चौदा लक्ष, मादिगा सात लक्ष अशी होती!

दक्षिण कानडातील होलिया, मलबारातील चेरुमा, तंजोरकडील पल्ला, तामील प्रांतांतील पारिया नि तेलगू भागांतील माल-मदिगा ह्या पाच जाती म्हणजे 'पंचम' जात! ह्या पाच मोठमोठ्या अस्पृश्य जातींची एकंदर संख्या साठ लक्षांवर जाते! युरोपातील तीनचार पोर्तुगीज, डेन्मार्क, स्वित्झर्लंड राष्ट्रांइतकें हें संख्याबळ! अर्धी इटली! इतकें हें आपल्या हिंदू राष्ट्राचें संख्याबळ आज आपल्यापाशी असून नसून सारखें झाले आहे! या अस्पृश्यतेच्या महारोगाच्या

खाईत आम्हीच आपण होऊन त्यांना पिचत ठेवीत आहोत, मृतप्राय करून ठेवीत आहोत! ते अस्पृश्य आहेत इतकेंच नव्हे, तामील प्रांतातील चोवीस लक्ष पारियांपैकी बहुतेक जाति मद्रासीय सनातन्यांमध्ये अस्पृश्यच नव्हे, तर अदृश्य!! समजल्या जातात. त्यांच्या स्पर्शानेच नव्हे, सावलीनेच नव्हे तर नुसत्या दुरून दिसल्याने विटाळ होतो! स्नान करावे लागते. त्यांचा शब्द कानावर पडताच जेवण विटाळते! मार्गाने जर क्वचित्दूरवर पारिया उच्चवर्णीयासमोर येत असला तर तो पारिया चट्कन आपलें तोंड पदराने झाकून घेईल; कारण तो अदृश्य! केवळ अस्पृश्यच नव्हे! तो दिसताच उच्चवर्णीय विटाळतील, त्या पारियास बहुधा गांवातून हाणमारही होई!

ह्या पाची अस्पृश्य नि अदृश्य जाती मूळ एकजात  होत्या हें बहुतेक इतिहासज्ञ समाजशास्त्रांचें मत! त्या एका कृषक जातीच्या पाच जाती, प्रांत नि भाषापरत्वे झाल्या. त्या पाचाच्या पन्नास नि पन्नासांच्या पाचशे! अस्पृश्यांतही अनुलोम, प्रतिलोमाच्या सुर्‍यांनी बोकडाचा बळी कापावा तसा - समाज, राष्ट्र कापून कापून तुकडे तुकडे उडविले! स्पृश्य अस्पृश्यांस शिवणार नाही, तोंड बघणार नाही. ह्या सार्‍या पाचशे जाती जन्मजात पृथक्, रोटीबंद, बेटीबंद!

हाय हाय! अशा आमच्या या लोकांत कसली संघटना नि कसलें ऐक्य होणार! छेः छेः! हिंदुराष्ट्राची संघटना जर हवी, आजच्या परिस्थितीशी टक्कर देण्यास समर्थ असे जातीवंत ऐक्य हवें, तर हा जन्मजात जातीभेदाचा राक्षस प्रथम मारलाच पाहिजे आणि त्यास मारणें इतकें सोपेंें की, 'मर' म्हणताच तो मरतो! केवळ आमच्या इच्छेत त्याचें जीवन आहे! ह्याच्याच उलट सिद्धान्त म्हणजे केवळ आमच्या इच्छेत आमचें मरण आहे! नुसती अस्पृश्यता काढून भागणार नाही त्या विषारी शाखेचें मूळ जो जन्मजात जातीभेदाचा विषवृक्ष तोच मुळासुद्धा उखडून टाकला पाहिजे.

जोवर ह्या जातीभेदांस आम्ही आमच्याच इच्छेने आमच्या राष्ट्राच्या कंठास नख लावू देत आहो, तोवर आम्हांस मारण्याचें काम शत्रूला करावयास नकोच; आम्ही आपण होऊनच मरत आहोत. मद्रासमधल्या ह्या पाची अस्पृश्य जातीं इस्लाम नि इसायी मिशनें दोहो हातांनी आमचें संख्याबळ लुटीत आहेत यांत काय आश्चर्य! नुसत्या इसायी लोकांनी पन्नास हजारांवर अस्पृश्यांस दोन-चार वर्षांत ख्रिस्ती केले! मोपला मुसलमानंसारख्या अडाणी जातीही अस्पृश्यांना धडाधड बाटवीत आहेत. त्या विपक्षाच्या नावाने रडून आता काहीही होणार नाही. जी दुःस्थिती मद्रासची तीच सर्वत्र!

जर आम्ही हिंदू ह्या जन्मजात जातीभेदाचा आमूलात उच्छेद करू तरच तरू! राष्ट्र म्हणून, धर्म म्हणून यापुढे जगू शकू! दुसरा उपाय नाही!!

***

# १४ ह्या अनुवंश, कीं आचरटपणा? कीं आत्मघात?

आपल्या हिंदू राष्ट्रात आज ज्या सहस्रावधी जाती-ऊपजाती-पोटजाती पोटपोटजाती पडलेल्या आहेत, त्या साऱ्या जणू कायअनुवंशाच्या (Heredity) सृष्टीनियमांचा अत्यंत सखोल अभ्यास करून कोण्या महान्समाजशास्त्रज्ञ पुरुषाने गणितागत कोष्टकात आखून, रेखून मग पाडलेल्या आहेत; त्यांच्या प्रत्येक गटाचे रक्तबीजगुण हे अन्य गटशच्या रक्तबीजगुणापासून भिन्न आहेत, असे जणू काय अगदी अद्ययावत्प्रयोगशाळेत ते रक्तबीजगुण थेंब थेंब परीक्षून ठरविलें आहे. ज्याचें ज्याचें रक्तबीजअनुवंशविज्ञानाच्या कसोटीने संकीर्ण झालें असता संतती निकृष्ट निकृष्टतरच होणार असे प्रयोगान्ती ठरलें, त्यांचे त्यांचेच गट निरनिराळे केले आहेत आणि यास्तव आजच्या या सहस्रावधी जाती-उपजाती-पोटजाती-पोटपोटजाती मोडल्याने समाजशास्त्राचें कंबरडेंच मोडून जाणारें आहे असा आभास काही लोक आजकालच्य शास्त्रातील मोठमोठे Heredity Eugenics प्रभृती गालफुगाऊ शब्द वारंवार उच्चारून उत्पन्न करीत असतात!

पण हा आभास किती खोटा आहे याचा अगदी निर्विवाद पुरावा आज ज्या हजारो जातीपातींची वीण वाढलेली आपणांस दिसत आहे; त्यांपैकी कित्येकांची पृथक्पृथक्उत्पत्ती पाहिली असता सहज मिळू शकतो. कोणत्याही रक्तबीजाची थेंब थेंब परीक्षा प्रयोगशाळेत होऊन अमुक कुळाचें रक्तबीज हीन ठरत आहे म्हणून त्याची जात आम्ही निराळी करतो, असा उल्लेख एखाद्या समाजशास्त्रज्ञाच्या वा अनुवंशविज्ञानाचा असलेला पुराणात ज्यांच्या प्रकरणी मुळीच सापडत नाही, अशाच हजारो पोटजाती आहेत; इतकेंच नव्हे, तर त्या पोटजाती वा जाती कशा झाल्या त्यांची जी उपपत्ती वा उत्पत्ती पुराणात दिलेली आहे, तीत वरील प्रकारच्या शास्त्रोक्त परीक्षेची लवलेश सूचनासुद्धा नसून दिलेलीं कारणे  निव्वळ भाकडकथाच काय त्या आहेत!

त्यापेक्षा निर्णायक पुरावा असा. पुराणांची पानें मुद्रणकलेने मोजून वरचा पुठ्ठा त्या पोथीवर जेव्हा इतका पक्का बांधला की, त्यापुढे एकदेखील अनुष्टुप त्या पुराणात घुसडण्यास जागाच उरू नये, त्या पुराणरचनेच्या इतिश्री काळानंतर अगदी अर्वाचीन काळापर्यंत ज्या जातीचीं पुन्हा शकलें उडत राहिलीं नि ती शकलें स्वतंत्र नव्यानव्या उपजाती बनत चाललीं, त्यांच्या उत्पत्तीची माहिती अगदी साधार नि बहुधा सरकारी कागदपत्रांतूनच नोंदविली गेलेली आहे. त्या अगदी ऐतिहासिक माहितीवरून तर हें स्पष्टच होत आहे की, रक्तबीजांची शास्त्रोक्त परीक्षा होऊन अनुवंशाच्या दृष्टीने समाजात उत्तम संततीची भर पडावी अशा कोणत्याही हेतूने ह्या आजच्या जातीपाती वेगवेगळ्या केलेल्या नसून त्यांच्या फाटाफूटी 'तू मांस खातोस कीं नाही?' 'तू शैव कीं वैष्णव? 'तू उभ्याने विणतोस की बसल्याने?' 'ताज्या दुधाची साय काढतोस का तापविलेल्या?' 'तू नाशिक जिल्ह्यात राहतोस की नागपूर?' अशा अत्यंत हास्यास्पद मतभिन्नतेने एकमेकांवर बहिष्कार पडून त्या होत आल्या आणि एकेक जातीचे तुकडे उडत नव्यानव्या काय त्या जाती पडत चालल्या.

हातच्या काकणास आरसा कशाला? आज चालू असलेल्या या हजारो भिन्नभिन्न रोटीबंद, बेटीबंद जातीपातींच्या उत्पत्तीविषयीची काहींची जी माहिती पुराणांतील भाकडकथांत दिली आहे आणि काहींची जी अगदी ऐतिहासिक कागदपत्रांत नोंदली आहे, त्यांचीच काही उदाहरणें खाली

देऊ. त्यावरून हें अनायासेंच उघड होईल की, अशा शेकडो जातीपातींचा उगम कोणच्याहीअनुवंश, रक्तबीजादी शास्त्रीय परीक्षा प्रभृती वैज्ञानिक तत्त्वात झालेला नसून तो झालेला आहे निव्वळ भाकडकथात नि आचरटपणात!

हो, निव्वळ आचरटपणात! त्या शब्दापेक्षा दुसरा योग्य शब्दच तीं कारणे एकत्र उल्लेखावयास सापडणार नाही. आचरटपणा म्हणजे आचारांचे बाष्कळ स्तोम! उभें गंध का आडवें गंध! कोणी उभ्या गंधाच्या वैष्णवाने आडवें गंध लावलें की, झालाच तो एकदम जातीबहिष्कृत! त्याच्याबरोबर त्याचें घर, जो जो त्याच्याशी खाईल, पिईल तो तो, की त्यांची बनली एक नवीन पोटजात! आणि जात म्हणजे रोटीबंद, बेटीबंद. राष्ट्राच्या एकसंधी, एकजीवी देहाचा आणखी एक तुकडा टाकलाच ताडकन्‌वंशपरंपरा तोडून! केवळ गंध लावणयात पन्नास पिढ्यांपूर्वी कोण दहापाच व्यक्तींची चूक झाली म्हणून! शेकडो जातींचे तुकडे पडून आजच्या शेकडो भिन्न पोटजाती उत्पन्न झालेल्या आहेत - अगदी अशाच आचरटपणापायी!

कोणाला ही अतिशयोक्ति वाटत असल्यास ही एक अगदी अर्वाचीन नि कागदोपत्री पुराव्यातही सापडणारी, एका उपजतीच्या जन्मपत्रिकेची नोंद पाहा!

## १४.१ 'कंचोळें' प्रभूची जात का आणि कशी झाली?

ती गम्मत अशी! सरासरी दीडशे वर्षांपूर्वी पाठारे प्रभू जातीत एक लग्नसमारंभ होता. पाठारे प्रभू जातीची एकजात सर्व वऱ्हाडी मंडळी मंडपात जमली. जातीचा एकजीवीपणा वाढून अधिक संघटित व्हावी अशासाठीच हे सामाजिक नि धार्मिक समारंभ योजिलेले असतात. मंडपात जातीचे इष्ट सगेसोयरे जमताच रीतीप्रमाणे गंध लावण्यासाठी एक तरुण गृहस्थ कंचोळें (गंधपात्र) घेऊन सभेत आला. गंध आधी कोणास लावावें हें नक्की न कळल्यामुळे त्याने ज्या पहिल्या गृहस्थास गंध लावलें त्याच्याविरुद्ध अग्रमान सांगणाऱ्या गृहस्थाने प्रतिपादन करताच गंधाच्या अग्रमाना-विषयी कडाक्याचें भांडण जुंपून गोंधळ माजला. त्यात त्या गंध लावणाऱ्या तरुणाचीही ओढाताण होत राहिल्यामुळे तो वैतागला नि गंधाचें ते कंचोळे तसेच खाली फेकून देऊन संतापाने मंडपाबाहेर निघून गेला.

एका लग्नाच्या एका मंडपात जमलेल्या एका वऱ्हाडी मंडळींतील हें य:कश्चित् भांडण - गंध सोम्याला सोडून गोम्याला लावलें, गंधपाळें, ते कंचोळें, एका तरुण मनुष्याने खाली फेकलें. ही दीडशे वर्षांपूर्वी घडलेली एका तरुणाची एक अतिक्षुल्लक चुकी! आणि तिचा परिणाम? एका एकगटी पाठारे प्रभू जातीचे दोन तुकडे होणें! वंशपरंपरा रोटीबंद, बेटीबंद! एक नवीन जात फुटून निघणें!!

त्या गंधपाळें फेकून गेलेल्या तरुणास नि अग्रमानासाठी भांडणाऱ्या त्यांनी गंध न लावलेल्या मंडळीस उलट पक्षाने दंड केला. कसला? त्यांच्या वैयक्तिक अपराधासाठी काही देहदंड वा द्रव्यदंड? नव्हे! दंड म्हटला की जातीबहिष्काराचा! जातीबहिष्कार म्हटला की त्यांच्याशी कोणी जेवू नये, कोणी विवाहू नये! रोटीबंदी, बेटीबंदी! बरें ती तरी त्या व्यक्तीपुरती नव्हे. त्यांच्या यच्चयावत्‌वंशजांच्या पिढ्यान्‌पिढ्या चालणारी! एकाने दीडशे वर्षांपूर्वी एक गंधाचें कंचोळें फेकलें ह्या एकाच्या अपराधासाठी दंड, त्याच्या पिढ्यान्‌पिढ्यांस! त्याच्याबरोबर

खाणाऱ्यापिणाऱ्या सर्वांस!! त्यांच्या जन्मलेल्या मुलाबाळांस; न जन्मलेल्या सतराव्या भावी पिढीच्या मुलाबाळांना!!! हा खाक्या आमच्यात शतकोशतकें चालत आलेला आहे! शेकडो उपजाती, पोटजाती, पोटपोटजाती अशा पडत आलेल्या आहेत!

त्या गंधाचें कंचोळें फेकलेल्या तरुणावर नि त्याचा पक्ष घेणाऱ्यांवर त्या लहानशा मंडपात जो बहिष्कार पडला, त्याची बातमी पाठारे प्रभूंच्या निरनिराळ्या गावी जसजशी पोचत गेली, तसतशी गावोगाव ती बहिष्कार - प्रतिबहिष्काराची ब्याद पसरत गेली. शेवटी त्या बहिष्कृतांची एक ‘कंचाळे’ प्रभू नावाची पोटजात बनली! ते आपसात जेवतात, आपसात मुली देतात घेतात. त्या दोन जातींना पुन्हा एकवटण्याचे यत्न करण्यात आले; पण काही उपाय चालेना. बॅ. जयकर प्रभृतींनी अगदी अलीकडे देखील हे प्रयत्न करून पाहिले, पण फुकट.

आज जर कोणी एका मनुष्याने एखाद्या संघाचा, मंडळाचा वा नगरसंस्थेचा एखादा नियम मोडला, तर त्या व्यक्तीस फार तर दंड होईल; पण जर कोण्या न्यायाधीशाने अगदी चोरीसारखे अपराधसुद्धा पुन्हापुन्हा करणाऱ्या चोराला शिक्षा दिली की, त्यालाच नव्हे तर त्याच्या जन्मलेल्या मुलांना, त्याच्या न जन्मलेल्या नातवापणतवा-पडपणतवांना सत्तर पिढ्यांपर्यंत तुरुंगात टाकावें वा दंड करीत राहावें, तर आपण त्या न्यायाधीशास भ्रमीष्टालयातच (Lunatic Asylum) बंद करू.

परंतु अगदी तशीच रानटी पद्धत आपण आपल्या जातपंचाइतीतील आडदांड न्याय-निवाड्यातून शतकोशतके चालविलेली असून त्या अन्यायी विक्षिप्तपणालाच ‘सनातन धर्म’ ‘शिष्टाचार’ प्रभृती नावांनी गौरवीत आलो आहोत.

काहीही क्षुल्लक गोष्ट जातीपातीच्या रूढीविरुद्ध घडली की, लगेच जातीबहिष्काराची शिक्षा त्या व्यक्तीला वा पक्षाला देण्यात येते आणि जातीबहिष्काराची ही शिक्षा त्या व्यक्तीपुरतीच न ठेवता वंशपरंपरा चालत राहते. त्यामुळे त्या एका जातीच्या हटकून दोन जाती होतात! जातीचें संघटित बळ कमी होते आणि जातीबहिष्कार म्हणजे रोटीबंदी नि बेटीबंदी हाच असल्याने, राष्ट्राच्या अखंड जीवनाच्या सतत ओघाचीच खंडविखंड तुटक डबकीं होऊन पडतात! व्यक्तीच्या अपराधासाठी राष्ट्रास दंड पडतो! त्या मूळच्या क्षुल्लक वा मोठ्या वैयक्तिक अपराधामुळे राष्ट्राची हानी होते, त्याहून शतपट अधिक हानी त्या अपराधभरपायीसाठी केलेल्या दंडामुळेच होते! ती कशी याचें हें वर दिलेलें कंचोळे प्रभूच्या पोटजातीच्या उत्पत्तीचें अगदी अर्वाचीन उदाहरण स्पष्ट करीत नाही काय?

कंचोळें फेकलें तेव्हा त्यातील गंध सांडलें, एकदोघांचा अपमान झाला हा अपराध! त्या अपराधापायी सांडलेल्या शिंपलीभर गंधाने वा कोण्या यःकश्चित्‌एकादोघा गावठी मानकऱ्यांच्या अपमानाने राष्ट्राची काय  हानी झाली होती याचा विचार करा आणि तो अपराध घडू नये म्हणून जातीबहिष्काराच्या दंडापायी एका जातीच्या रक्तबीजाच्या भाऊबंदांत वंशपरंपरेचा संबंधविच्छेद, ममत्वविच्छेद होऊन दोन भिन्न जाती झाल्यामुळे राष्ट्राची जी हानी झाली तिचा विचार करा! म्हणजे उठल्या बसल्या जातीबहिष्काराची, रोटीबंदी, बेटीबंदीची शिक्षा देणाऱ्या आमच्या बाष्कळ सवयीचे घातक परिणाम चटकन् ध्यानात येतील!

आता गंधाचें कंचोळें दीडशे वर्षांपूर्वी एका तरुणाने फेकलें ह्यापायी पाठारे प्रभूच्या एकसंध जातीचे दोन तुकडे पडले. त्यात रक्तबीजाच्या वैज्ञानिक परीक्षेचा वाअनुवंशाच्या कसोटीचा लवलेश तरी संबंध येतो का? पाठारे प्रभूंतून फूटल्यानंतरही कंचोळे प्रभू अजूनही, अतिशय अडचण पडते तरी, आपलीं लग्नें आपसातच करीत आलेले आहेत! भिन्न रक्तबीजाचा प्रश्नच काढणें शक्य नाही. केवळ गंधाचें कंचोळें एकाने दीडशे वर्षांपूर्वी फेकलें, एवढेंच कारण! आणि परिणाम एका जातीच्या रोटीबंद, बेटीबंद अशाच वंशपरंपरा दोन जाती पाडणें! आता सांगा, हा अनुवंश कीं, निव्वळ आचरटपणा कीं, भ्रमिष्ट आत्मघात?

अशाच अत्यंत क्षुल्लक मानपानादी गावंढळ कल्पनावारी तंटे होऊन आणि जातीबहिष्कार एकमेकांवर पडून एका जातीच्या दोन जाती, त्यांच्या चार जाती कशा पडत गेलेल्या आहेत याची साधारण माहिती रिसले, एन्थोवेन प्रभृती लेखकांनी दिलेली आहे. शिरगणती करणाऱ्या अभ्यासू  अधिकाऱ्यांची ही माहिती कोणीही उघड्या डोळ्यांनी जर वाचली, तर त्याची निश्चित पटेल की, हिंदू राष्ट्राचे जातीपातीपायी हे जे हजारो रोटीबंद, बेटीबंद तुकडे तुकडे पडलेले आहेत, त्यांतील शेकडो जाती अशाच निव्वळ आचरटपणामुळे पडल्या. अनुवंशादिक कसल्याही वैज्ञानिक कसोटीने कोणी बुद्धया आखून-रेखून त्या पाडल्या असा आभास उत्पन्न करणे निव्वळ कुभांड होय!

कोणी म्हणेल की, ही गोष्ट हिंदूंच्या ह्या अर्वाचीन पाखंड कालात पडलेल्या जाती-पातीविषयी खरी असली तरी आमच्या पोथीपुराणांच्या कालाविषयी खरी नाही. त्या वेळी जाती पडत त्याअनुवंशादी समाजशास्त्रीय कसोटीने, रक्तबीज पारखूनच पाडल्या जात असल्या पाहिजेत, असे जर कोणास वाटेल, तर त्याने एकदा पुराणांतून नि पोथ्यांतून अनेक जातींच्या दिलेल्या उपपत्त्या पाहाव्या! त्या तर इतक्या भाकड नि मूर्खपणाच्या आहेत की, त्यापेक्षा वर दिलेली ऐतिहासिक माहितीच कमी मूर्ख नसली, तर निदान अधिक प्रामाणिक तरी असतेच असते! उदाहरणार्थ, एक हजार वर्षे तरी जातीच्या अस्तित्त्वाचा उल्लेख सापडतो; तिच्या उत्पत्तीविषयी संस्कृत पोथीपुराणांच्या कालात काय वर्णन दिलेलें आहे ते पाहा!

## १४.२ भंडारी जातीच्या उत्पत्तीविषयी पोथीपुराणांतील माहिती

भंडारी जातीविषयी ब्राह्मोत्तरखंड नि कथाकल्पतरु या पोथ्यापुराणांत असे सांगितलें आहे की पूर्वी एकदा तिलकासूर नावाचा दैत्य फार मातला. महादेवासही फार पीडा झाली. तेव्हा महादेवाने त्यास दडून घाण्यात घातला नि नंदीस आज्ञापिलें ‘फिरव तो घाणा नि पिळून काढ त्या दैत्याला!’ नंदी घाण्यास त्याप्रमाणे फिरवीत असता इकडे महादेव थकल्यामुळे ‘हुश्श’ करून जो खाली बसतात तो त्यांच्या कपाळावरून एक घामाचा बिंदू खाली गळला आणि त्यातून तत्काल एक पुरुष उत्पन्नला! त्यास पाहताच शंकर म्हणाले, ‘तुझें नाव भावगुण! कारण तू माझी स्तुती करीत उभा आहेस! जा, मला तहान लागली आहे, प्रथम पाणी आणून दे!’ (शंकराच्या जटेत असणारी पतिसेवानिरत भागीरथी या प्रसंगी तीर्थयात्रेस कुठे तरी गेली असावी; नाही तर पाण्याची इतकी टंचाई महादेवास भासती ना, हें उघड आहे!) भावगुण म्हणाला, ‘देवा, शीतोदक कुठून आणू? इथे तर कुठेदेखील ते नाही.’ असे ऐकताच शंकराने इच्छामात्रेकरून एक झाड उत्पादिलें. तेच हें नारळाचें झाड! (वनस्पतिशास्त्रज्ञांनी नारळीच्या

झाडाची ही उत्पत्ती ध्यानात ठेवावी. ह्या कथेने अनुवंश विद्येतच काय पण वानस्पत्य विद्येतही ही भंडाऱ्यांची उत्पत्ती सांगून भर टाकली आहे.) आणि नारळीच्या झाडावर इच्छामात्रेकरून सुरामधुर फळें उत्पादिली. तेव्हापासून नारळीला 'सुतातरु' म्हणतात. भावगुण लगेच त्या झाडावर चढला आणि त्याने तीं सुराफळें आणून, सोलून, तोंडावर कोयतीचा टवचा मारून तीं महादेवास प्यावयास दिलीं. (मनुष्य-झाड-फळें इच्छामात्रे उत्पन्न करणाऱ्या महादेवाला तहान लागताच तोंडातच सुरा का उत्पादिता आली नाही वा झाडावरच्या फळाला भावगुणाने वर चढून तोडण्याच्या आधी, खाली का आणता आले नाही, देवच जाणें!') प्रसन्नचित्ते महादेव भावगुणास म्हणाले, 'जा अलकावतीच्या भांडारावर तू अधिकारी हो, जा! तेव्हापासून त्यास 'भांडारी' म्हणून लागले! आणि शंकर सुरातरूचीं सुराफलें पिऊ लागलें. (त्या दिवसापर्यंत भांग प्रभृती पदार्थच काय ते भगवान सेवीत असत; पण भंडारी भावगुणाची ओळख होताच भगवान्सुराही पिऊ लागले. संगतीचा परिणाम! दुसरे काय!)

पण इतक्यात त्या सुदैवाच्या झाडावरून घसरून, नारळीच्या झाडावरून मनुष्य आपटावा तसा, भावगुण भांडारी खाली दुर्दैवाच्या दगडावर आपटला. कारण पार्वतीदेवी त्याला भांडारातील सोनें पारितोषिक द्यावयास आत गेली असता, एक ब्राह्मण तिथे आला. त्यास पाहताच भावगुण भांडारी आपला पाट त्या ब्राह्मणाला बसावयास देऊन उभा राहिला. पार्वती सोनें घेऊन आली नि पाटावर पूर्वीप्रमाणे भावगुणच बसला आहे असे समजून त्या आगंतुक ब्राह्मणालाच सोनें देऊन चुकलीं. ब्राह्मण लगेच उठून गेला. (पार्वतीदेवींना साध्या गुप्तपोलिसाइतकेंही अंतर्ज्ञान वा व्यवहाराचें भान या वेळी राहू नये नि त्या ब्राह्मणास अटक न होता तो सुटावा अं!) थोड्या वेळाने पार्वती वळून पाहतात तो भावगुण भांडारी पाठीशीच उभा. तेव्हा त्या म्हणाल्या, 'अरे, तुला सोनें दिलें तरी रेंगाळतोस कां?' तेव्हा तो बिचारा म्हणाला, 'सोनें ब्राह्मणास दिलें, मला नव्हे! मी धर्माचाराप्रमाणे ब्राह्मण पाहताच त्यास माझा पाट देऊन उभा राहिलो; त्याच्या दक्षिणेत व्यत्यय येऊ नये म्हणून मध्येच तोंड घातलें नाही. आपण देवता! तो ब्राह्मण हें आपणांस कळणार नाही असे माझ्या स्वप्नातही आलें नाही!' हें ऐकताच आपण फसलो याचा पार्वतीदेवींना राग आला आणि त्यांनी काय केले म्हणता? - तर त्या ब्राह्मणाने त्यांना फसविलें म्हणून त्या न फसवणाऱ्या शिष्टाचारशील बापड्या भावगुण भांडाऱ्यास शाप दिला की, जा ! तुझ्या जातीस नारळीची माडी नि ताडी विकूनच पोट भरावें लागेल. दरिद्री राहील तुझी जात सदैव! सोनें असे भांडाऱ्यास मिळणार नाही! तेव्हापासून भांडारी जात नारळीच्या माडीस विकून उपजीविका करते. दरिद्रीपणामुळे सोनें गाठी साचत नाही! (समाधानाची गोष्ट इतकीच की आमच्या ओळखीपैकी एका चलाख भांडारी गृहस्थांनी तरी महादेवाचीं दोन चार देवळें बांधून त्या वशिल्याने पार्वतीदेवीच्या शापाची नांगी ढिली पाडली आहे. श्रीमंत भागोजीशेट कीर भांडारी असताही त्यांच्या हाती, खिशात, बँकेत सोन्याच्या नाण्यांचे ढीगच्या ढीग खुळखुळत असून आम्ही त्या पाटावर बसलेल्या ब्राह्मणांचे वंशज असताही आंगठीइतक्यादेखील सोन्यास पारखे झालेलो आहोत!)

जात कशी उत्पन्न होते त्याच्या अशा पौरोणिक कथा शेकडो आहेत; पण कुठेही रक्तबीजाच्या परीक्षेनंतरअनुवंशादृष्ट्या सुप्रजनन साधेल अशी कसोटी लावून मग ही जात नीज नि उंच, ही निराळी ती निराळी तशी आखणी केल्याची लवलेश सूचनादेखील सापडत नाही!

जातीपातीच्या उत्पत्तीच्य बहुतेक साऱ्या कथा अशाच साच्याच्या, निर्भेळ भाकडपणाच्या येथून तेथून बाष्कळ!

वास्तविक पाहता भांडारी जात ही भट्टारक रजपुतांतून झालेली. भांड म्हणजे मोठी नौका. संस्कृतात काय, किंवा पेशवाई कागदपत्रांत काय, भांडें हा शब्द तारवांस लावलेला आहे. (भांडें याचें आपल्यात जसें पात्र नि तारू असे दोन अर्थ होतात, अगदी तसेच ह्या Vessal इंग्लिश शब्दाचेंही भांडें आणि तारू असे दोन अर्थ होतात. हें गमतीचें साम्य जाताजाता उल्लेखनीय आहे.) मौर्य कालापासून भांडारी जातीचे पूर्वज सामुद्रिक सैनिक; ते पेशवाईच्या अंतापर्यंत तसेच गाजत आले. त्या मौर्य कालापासून 'भांड, सेनेचे अधिप आणि 'भांडी' बनविणारेही असल्याने त्यांच्या जातीस भांडारी हा शब्द लागला. ही उत्पत्ती विचारणीय की, ती पुराणातील महादेवाच्या घामाच्या थेंबाची नि घाण्याला जुंपलेल्या नंदीची? कोकणात भंडारी यांचा तारवांचा धंदा मुख्य, दुय्यम धंदा नारळीची माडी ताडी काढणें, - विकणें, त्याला अनुलक्षून कोण्यातरी पुराणिकाने ही वरील भाकडकथा संस्कृतात दडपून दिली. कारण पुराणिक जितका भाबडट तितकेच त्याचे ते भंडारी. घरोघर ती टिकली नि खरीखरी उत्पत्ती सांगणारी माहिती लोपली!

गंधाचें कंचोळें एकाने फेकताच त्याच्या नि त्याच्या पक्षाच्या सर्वांवर वंशपरंपरा जातीबहिष्कार टाकणारी ती पाठारे प्रभू पंचाईत आणि एका भावगुण भंडाऱ्यावर रागावताच त्यालाच नव्हे, तर त्याच्या पिढ्यान्पिढ्यांना, जातीच्या जातीला, 'नित्याचें दरिद्री रहाल!' म्हणून ह्या कथेतला शाप देणारी पार्वती ह्या दोघांचाही अन्याय सारखाच असह्य, अदूरदर्शीपणाचा आहे! मूर्ख भक्तांच्या संगतीने देवही मूर्ख बनतात ते असे! धांदलीत ब्राह्मण ओळखला नाही ही चुकी पार्वतीची, रागावली भावगुण भांडाऱ्यावर आणि शापिली भांडारी जातची जात जन्मोजन्म! अयोध्याच्या कैकेयने किंवा पुण्याच्या आनंदीबाईने देखील इतका आततायीपणा सहसा केला नसता!

## १४.३ शिंप्यांच्या पोटजातींची उत्पत्ती

सध्या ज्या प्रकरणी शिंपी समाजात खूप खल चालला आहे त्या भावसार क्षत्रिय जातीच्या उडालेल्या तुकड्यांची उत्पत्ती आणखी एक गंमत म्हणून देऊ. भावसार क्षत्रिय अगदी नामदेवांच्या काळापर्यंत रोटीबेटी सर्व प्रकरणी एकजात, एक रक्त, एक बीज, मूळ हिंगला देवीचे शाक्तपंथीय. पुढे नामदेवांच्या शिष्यांत जे मोडले त्या भावसारांनी भक्तिमार्ग स्वीकारला. त्यासरशी नामदेव शिंपी ही उपजात झाली. शाक्तांनी भक्तांवर बहिष्कार टाकून रोटीबंदी बेटीबंदी केली म्हणून! त्यांच्यापैकी कोणाच्या रक्तबीजाची वैज्ञानिक परीक्षा होऊन ते सुप्रजननास कमी योग्य ठरले म्हणून नव्हे! केवळ दैवत निराळे झाले म्हणून! पुढे त्या नामदेव शिंप्यात काही नाशिककडे, काही कोकणात, काही नागपुरात, गटागटांनी फार दिवस राहिल्यामुळे एकमेकांशी जातीव्यवहार घडू शकला नाही. कारण, एखादी वैज्ञानिकअनुवंशाची कसोटी नव्हे - तर त्या काळी आगगाडी, मोटार नव्हती एवढेंच! दळणवळण नव्हते. त्यामुळे त्या नामदेव शिंप्यात तीन पोटजाती पडल्या. रोटीबंद, बेटीबंद! अगदी ऐतिहासिक कालातील कागदोपत्रांत गोवलेल्या ह्या गोष्टी. त्यामुळे पुराणिकाला त्यांना शंकर, पार्वती, नंदी ह्यांच्या ठराविक चौकटीत बसविण्यास संधी सापडली नाही. नाही तर त्या शिंपी लोकांच्या जातीही महादेवाच्या अंगावरील

कफनी पार्वतीने लगडझगड्यात फाडून टाकली त्या वेळी पडलेल्या फाटक्या चिंध्यांतून निरनिराळ्या अशा अगदी अनादीकालीच उत्पन्न झालेल्या आहेत, अशी पौराणिक भाकडकथा कुणी पंडितजी रचूनही टाकिते. किंवा Heredity, Eugenics प्रभृती गालभराऊ शब्दांचीं पोकळ आवर्तनें करीत, ह्या पोटजाती त्या शास्त्रीय तत्त्वानेच पाडलेल्या अशी अर्वाचीन भाकडकथा कुणी समाजशास्त्राज्ञ गोमाजी टिच्चून सांगू लागते! शिंप्यांतील या सर्व पोटजाती अर्वाचीन. त्यामुळे हा निश्चित पुरावा मिळतो की, त्यांच्यापैकी कुणीही मूळच्या सामाइकपणातील जातीबांधवांबाहेर बेटीव्यवहार केलेले नाहीत. अर्थात्रक्तबीज प्रभृतीतील उच्चनीचत्वामुळे ह्या जाती पाडल्या गेल्या हे धादांत खोटें असून त्या काळी मोटारीसारखीं, अंतर नाहीशी करण्यासारखीं साधनें नसल्याने त्या जाती परस्परांपासून दुरावल्या, - पृथक्झाल्या. भौगोलिक, कोकणस्थ, देशस्थ, पाटणे, संगमेश्वरी प्रभृती नावाचे शिंपी, वाणी, चांभार प्रभृती जातीत, जे पोटजातीभेद पडलेले दिसतात त्यांचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्यातील पोटभेदांपैकी कोणात पडलेला उत्कृष्ट रक्तबीजाचा तुटवडा नव्हे, तर मोटारींचा तुटवडा, हेंच होय!

## १४.४ अंड्यावर पाय पडला म्हणून पोटजात!

अत्यंत क्षुल्लक जातरूढी मोडल्यासाठी जातीबहिष्काराचा दंड देऊन एकदम वाळीत टाकण्याची आणि त्यापायी नवीन जातींचे तुकडे पाडीत चालण्याची ही प्रक्रिया अगदी आजदेखील सारखी चाललेली आहे. लहानसहान उदाहरणें सोडून एका मोठ्या जातीचेंच एक अगदी चटका लावून सोडण्यासारखें प्रकरण दाखला म्हणून देतो.

माळव्यात ओसवाल नावाची एक प्राख्यात नि प्रमुख जात आहे. सन १९३१ मध्ये त्यांच्यात एक मोठी खळबळ उडविणारी गोष्ट घडली. त्या जातीतील एका शेठजीच्या घरात लावलेल्या एका तसबिरीमागे एका चिमणीने दोन अंडीं घातलीं होतीं. त्यांतील एक लहान सुपारीएवढें अंडे खाली घसरलें. घसरलें म्हणून पडलें. पडलें म्हणून फुटलें, फुटताच त्यांतील चिकट रस भुईवर सांडला. तोच शेठजींच्या दहा वर्षांच्या एका मुलाने दार उघडून सप्कन आत घुसण्याच्या धांदलीत त्या फुटलेल्या चिमणीच्या अंड्याच्या चिकावर नकळत पाय टाकला हाच तो भयंकर अपराध की ज्यायोगे ती जातची जात खळबळून उठली! पायास चिकट लागलें म्हणून ते मूल पाहू लागलें, तो वडील माणसांचें लक्ष तिकडें गेलें नि अंड्याच्या वेलदोड्याएवढ्या पांढऱ्या कवच्या, चीक, पाणी, सारे मिळून संध्येच्या पळीभर सामान विखुरलेलें दिसलें! झाले ! जिकडे तिकडे, घरी शेजारी गवगवा होत बातमी फैलावली - ‘अंड्यावर पाय पडला! चिमणीचें अंडे पायाखाली फुटलें! मुलाचा पाय बाटला! शेठ बागमलांचा मुलगा बाटला!’

ओसवाल जैन पक्के शाकाहारी! त्या लेकराला त्याच्या घरच्यांनीच त्या दिवसापासून पंक्तीबाहेर जेवणास बसविलें. एक दोन दिवसांत श्वेतांबर जैनमंदिरात जात पंचायत बोलावली गेली - गंभीरपणे पूर्वोत्तर पक्ष विचार करू लागला! चिमणीच्या अंड्यावर नकळत मुलाचा पाय पडून चीक लागला, ह्या भयंकर हिंसादोषास्तव त्या मुलास जातीबहिष्कृत करावे कीं नाही? खडाजंगी उडाली! दोन पक्ष झाले! जात फुटली! त्या मुलाचे घरच्या घरच वाळीत पडलें! त्यांच्या बाजूचे लोकही वाळीत पडले! ह्या प्रकरणाचा शेवट ठराविक पायऱ्यांनी दोन जाती

पडण्यातच झाला असता; पण शेठ गोपीलाल छापेडावाले यांनी त्यांच्यावर असाच एक बहिष्कार जातीने घातला होता, तेव्हा कोर्टातच ते प्रकरण खेचून तडजोडीतच काढणें भाग पडलें होते; त्याप्रमाणे हेंही प्रकरण कोर्टात नेण्याचा धाक घालतच पंचायतीने मूग गिळून पुढे काही केले नाही. पण कित्येक गृहस्थांनी त्या चिमणीच्या फुटलेल्या अंड्यावर पाय टाकणाऱ्या मुलाशी नि त्याच्या घराशी रोटीव्यवहारादी संबंध नाही तर नाहीच ठेवला!

या दाखल्यापुरता दिलेल्या जुन्यानव्या उदाहरणांवरून हें उघड होत आहे की, आजच्या वैदिक, जैन, लिंगायत प्रभृती अखिल हिंदुराष्ट्रात ज्या हजारो जातीपाती पडलेल्या आहेत, त्या अनुवंश वा सुप्रजनन वा इतर कोणत्याही समाजशास्त्रीय रक्तबीजपरीक्षेच्या कसोटीस लावून पडलेल्या आहेत, असा मोघम भास पसरविणें निव्वळ थापेबाजी आहे! आजच्या जातींतील हजारो पोटजाती केवळ प्रांत, भाषा, धर्ममते, कोंबडी खाणें कीं बकरा खाणें की मासे खाणें, मांसाहार की शाकाहार, लसूण कीं कांदा, तंबाखू ओढणें कीं खाणें, उभ्याने विणणें की बसून, गंधाचें कंचोळें फेकणें, चिमणीच्या फुटलेल्या अंड्यावर नकळत पाय देणें' अशा अगदी बाष्कळ कारणांवरून पडल्या आहेत! एकसंधी, एकजीवी, अखंड अशा राष्ट्रीय देहाचे ह्या 'जातीबहिष्कार'च्या तलवारीने खंड खंड असे हजारो तुकडे उडविले! काही झालें की, घाल जातीबहिष्कार! आणि जातीबहिष्कार म्हणजे रोटीबंदी, बेटीबंदी, जन्मोजन्म पिढ्यान्‌पिढ्या! हा कसला अनुवंश! हा आहे निव्वळ आचरट आत्मघात!

म्हणूनच बडोद्यासारख्या काही संस्थानांतून गावंढळ, अडाणी नि त्यांच्या कृत्यांचे काय राष्ट्रीय परिणाम होतात हें न समजणाऱ्या जातपंचाइतांच्या हातून जातीबहिष्काराचें हें आत्मघातक हत्यार काढून घेण्याचे जे निर्बंध (कायदे) होत आहेत, ते अगदी हवेतच. निव्वळ आचरटपणापायी पडलेल्या ह्या जातीपाती - ही जातीभेदाचीच ब्याद मुळापासून उखडून टाकली पाहिजे. त्याचे तडाख्यात हाती येण्यासारखें साधन म्हणजे रोटीबंदीचा उच्छेद, प्रकट सहभोजनांचा धूमधडाका!!

- (किर्लोस्कर)

* * *

# १५ वज्रसूची!

फलान्यथौदुंबर वृक्षजातेः मूलाग्रमध्यानि भवानि वापि।

वर्णाकृतिस्पर्श रसैस्समानि तथैकतो जातीरिति प्रचिंत्या।।१

तस्मान्न गोऽश्वरत्कश्चित्‌जातीभेदोस्ति देहिनाम्‌।

कार्यभेदनिमित्तेने संकेतः कृत्रिमः कृत।।

- भविष्यपुराण अ. ४०

बुद्धधर्माच्या महान्‌ प्रचारकात अश्वघोष याची मोठी योग्यता मानण्यात येते. त्याने लिहिलेलें संस्कृत श्लोकबद्ध 'बुद्धचरित्र' हें काव्य बौद्ध वाङ्मयातील एक उत्कृष्ट, पूज्य नि प्रासादिक ग्रंथ असून ते संस्कृत वाङ्मयातील काव्यसंपत्तीमध्येदेखील माननीय स्थान पावणारें आहे.

ह्या विद्वान्‌बौद्ध प्रचारकाने, त्या काळी वैदिक नि बौद्ध अशा आपल्या हिंदू राष्ट्रात पडलेल्या धर्मपंथाच्या दुफळीत जो एक अत्यंत वादग्रस्त नि तीव्र मतभेदाचा प्रश्न होऊन बसला होता, त्या जन्मजात जातीभेदाच्या प्रथेवर तर्कमूलक चर्चा करणारा वज्रसूची नावाचा एक प्रबंध रचिलेला आहे.

उपनिषद्‌कालापासूनच स्वतंत्र तत्त्ववादांनी वनोपवनातील आश्रमाआश्रमात भारतीय वातावरण सदोदित निनादलेलें असे. त्यातही श्रुतीस्मृतींच्या मर्यादांचीसुद्धा मंत्ररेखा न जुमानता बुद्धकालात जेव्हा बुद्धिवाद सर्वस्वी स्वतंत्रपणे अकुंठित संचार करू लागला, तेव्हा तर राष्ट्राच्या आणि मानव्याच्या प्रत्येक क्षेत्रात 'हें असे कां' या प्रश्नाच्या अग्निदिव्यामध्ये तत्कालीन यच्चयावत्‌मते, रूढी, आचार, विचार साधकबाधक ज्वालात तावून सुलाखून निघू लागली. वैदिकांनी बौद्धांचीं आणि बौद्धांनी वैदिकांचीं वचनें नि वचनें, मंत्र नि मंत्र, कोटिक्रम नि कोटिक्रम कुशाग्र तर्काच्या पिंजणाखाली नुसता तंतुन्‌तंतू पिंजून काढला. वैदिक वैदिकांशी वा बौद्ध बौद्धांशी जेव्हा वाद घाली, तेव्हा त्यांच्या तर्कशुद्धतेला नेहमी 'इति श्रुतिः' किंवा 'इति बुद्धानुशासनम्‌'च्या दुर्लंघ्य मंत्ररेषेची आडकाठी आडवी येई. कारण श्रुतिवाक्य खोटें हें म्हणणें हें वैदिकावैदिकांच्या तर्कास अशक्य; बुद्धवाक्य खोटे हें म्हणणें हें बौद्धाबौद्धांतील तर्कावादास सर्वत्र निषिद्ध. त्यामुळे श्रुतींची छाननी वैदिक तर्काला अशक्य, बौद्धागमाची छाननी बौद्धतर्कशक्तीला अशक्य. त्यामुळे त्या त्या आप्तवाक्यांच्या कुंपणापर्यंतच काय तो तर्काची गति अकुंठित असे. पण वैदिक आणि बौद्ध यांच्यात जेव्हा तेच उपनिषत्‌कालापासून प्रचलित असलेले 'तद्विद्‌संवाद' झडू लागले, तेव्हा श्रुतिप्रभृती त्या त्या अनुल्लंघनीय नि अशंकनीय मर्यादाही तर्काच्या गतीस खुंटवू शकल्या नाहीत. कारण बौद्धांना 'इति श्रुतिः' चा धाक नसे तिचा मंत्र नि मंत्र ते तर्कमुशीत हेतूवादाच्या सहाणेवर घासून, पारखून टिकला तरच घेणार. वैदिकांना 'इति बुद्धनुशासनम्‌'ची भाडभीड नसे. त्या बुद्धाच्या शब्दानशब्दाचा तर्काच्या माऱ्याखाली धुव्वा उडवून देण्यास ते कचरत नसत. अशा स्थितीत बुद्धकालात श्रुती, स्मृती, आगम-निगम, रीतिरूढी, आचार-विचार या साऱ्यांची छाननी पुरुषबुद्धीच्या अग्निदिव्यात जशी झाली, श्रुतींनादेखील

पुरुषबुद्धीला परीक्षेला बसावें लागूनच काय जे प्रमाणपत्र मिळविता येईल ते मिळविणें भाग पडलें, तसा प्रकार त्यापूर्वी केव्हाही इतक्या मोठ्या प्रमाणावर झाला नव्हता.

यामुळेच बुद्धकालातील धर्माधर्म, कर्माकर्म, आचारानाचार यांची चिकित्सा करणारे निर्भेळ नि स्वतंत्र तर्कांच्याच कसोटीवर पारखले जाणारे वादविवाद आज मोठे मनोरंजक नि बोधप्रदही वाटतात. कुशाग्र बुद्धिवादांची तीं त्या काळच्या मानाने अप्रतिम नि अकुंठित उदाहरणें आजही वाचनीय आणि विचारणीय वाटल्यावाचून राहात नाहीत. अमक्या ग्रंथात अमुक आहे म्हणूनच ते खरे, हे पालुपद त्या वादविवादात तर्कांचें तोंड बंद करताना सहसा आढळत नाही. युक्तीसंगत, हेतूगम्य, बुद्धिनिष्ठ अशा त्या त्या काळच्या वादविवादांचीं जीं काही उदाहरणें आज उपलब्ध आहेत, त्यातच जन्मजात जातीभेदाची खडखडीत भाषेत साधकबाधक चर्चा करणाऱ्या श्रीमत् अश्वघोष यांच्या त्या वज्रवूची नामक निबंधास गणलें पाहिजे. त्यात आजच्या तर्कपद्धतीचा अवलंब सर्वथैवपणें नसणें जरी साहजिकच आहे तरीही त्या काळचे चातुर्वर्ण्य विषयासंबंधी जे अनुकूल प्रतिकूल आक्षेपप्रत्याक्षेप चालू होते. त्यांचा खल आजही अभ्यसनीय वाटावा इतक्या बुद्धिवादाने केलेला आहे. आजच्या जन्मजात जात्युच्छेदनाच्या वादात आधार घेण्यासाठी नव्हे, तर ह्या विषयावर त्या काळी आपल्या राष्ट्रातील धुरीणांचीं काय मतामतं असत तीं समजून घेण्यासाठी उपयुक्त आणि अपरिहार्य असा एक प्राचीन अधिकृत लेख म्हणून आम्ही तो 'स्त्री' मासिकाच्या वाचकांच्या सेवेस सादरवीत आहोत. मराठीच्या जुळणीस आणि स्थलावकाशास धरून भावार्थाची मांडणी करताना मूळ ग्रंथांतील मते नि तर्कपद्धती शक्य तितकी यथावत्अनुसरलीं आहेत.

## १५.१ श्रीमत्अश्वघोषकृत वज्रसूची

जगद्गुरू श्री मंजुघोषास शरीरवाङ्मनांही स्तवून त्याचा शिष्य जो मी अश्वघोष तो शास्त्राधारपूर्वक वज्रसूची नामक ग्रंथ प्रारंभितो.

धर्म आणि अर्थ यांना विवेचिणाऱ्या श्रृती आणि स्मृती ह्यांस मतमतांतरांच्या भागाविषयी जरी मी प्रमाण मानीत नाही, तथापी त्यांच्यातील विश्वसनीय नि सयुक्तीक अशा भागाविषयी प्रामाण्यबुद्धी ठेवली तरीही चातुर्वर्ण्याविषयीच्या तुमच्या कल्पना त्या ग्रंथांच्या आधाराने सिद्धिता येत नाहीत असे मला वाटते.

प्रथम ब्राह्मणास विवेचू. तुम्ही कशास ब्राह्मण म्हणता? जीव, का जात, का जन्म, का आचार, का वेदज्ञान, का ज्ञान? ब्राह्मण्य कशाने येते? ब्राह्मण्य म्हणजे यांपैकी कोणते?

जीव हेंच ब्राह्मण्य असे म्हणाल तर वेदांत तसे समजण्यास मुळीच आधार नाही. ब्राह्मण्ययुक्त अशी जीवांचीच एक स्वतंत्र जात आहे. ती काही झाले तरी ब्राह्मणांची ब्राह्मणच राहणार अशा मतास वेद मुळीच समर्थीत नाहीत. प्रत्यक्ष देवासंबंधी जर वेद म्हणतात की, 'सूर्य ! पशूरासीत् । सोमः पशूरासीत् । इंद्रः पशूरासीत्पशवो देवाः।।' देवतासुद्धा प्रथम पशूच होत्या, नंतर कर्मबळाने देव झाल्या तर ब्राह्मणाचा जीव हा मूलतःच ब्राह्मण होय, अपरिवर्तनीयपणे ब्राह्मण ब्राह्मणच राहणार हें कसें सिद्ध होईल? फार काय, नीचापेक्षा नीच असे जे श्वपाक तेसुद्धा ब्राह्मणच नव्हेत तर देव होऊ शकले. 'आद्यत्ते देवा पशवः श्वपाका अपि देवा

भवन्ति' असे श्रुतीच म्हणतात! तेच महाभारत अनुवादिते. महाभारतात एके ठिकाणी स्पष्ट लिहिलें नाही का की, कालिंजल टेकडीवरील सात शिकारी नि दहा हरिण, मानस सरोवरावरील एक बदक, शरद्द्वीपावरील एक चक्रवाक्हे सर्व कुरुक्षेत्रात ब्राह्मण असे जन्माला आले आणि वेदपारंगत झाले! मनू म्हणतो चतुर्वेद नि त्यांची अंगें-उपागें यांत प्रवीण असलेला ब्राह्मण जर शूद्रापासनू दक्षिणा किंवा इतर दान घेईल तर त्याला गाढवाचे बारा जन्म, डुकराचे सहा जन्म आणि सत्तर जन्म कुत्र्याचे येतील! यावरून हें उघड आहे की ब्राह्मणाचा जीव ब्राह्मणस्वरूपी असून तो केव्हाही अब्राह्मण होऊच शकत नाही, ही कल्पना श्रुतिस्मृतींनाही संमत नाही.

आता जर असे म्हणाल की ब्राह्मण्य हें आईबापापासून म्हणजे रक्तबीजातूनच प्राप्त होतें. ब्राह्मण आईबापांच्या पोटी जो जन्मतो तो आणि तोच ब्राह्मण होतो, तर तीही कल्पना शास्त्राविरुद्ध आहे. स्मृतीतील प्रसिद्ध श्लोकावरून हें उघड आहे. अचलमुनींचा जन्म हत्तीच्या पोटी, केशपिंगलाचा घुबडाच्या पोटी, कौशिक गवताच्या पोटी, द्रोणाचार्य मडक्याच्या पोटी, तैत्तिरी ऋषी पक्ष्याच्या पोटी, व्यास कोळिणीच्या पोटी, कौशिकीचा शूद्रिणीच्या पोटी, विश्वामित्र चांडाळणीच्या पोटी, वसिष्ठ वेश्येच्या पोटी जन्मले, हे श्लोक स्मृतीतील म्हणून तुम्हांस मान्य असलेच पाहिजेत. या सर्वांची आईबापें ब्राह्मण नसताही त्यांना तुम्ही ब्राह्मण्याचे अधिकारी, ब्राह्मण म्हणून मानता त्या अर्थी आता मातापित्यांच्या द्वारेच काय ते ब्राह्मण्य लाभते, ब्राह्मण आईबापांच्या पोटी येतो तोच ब्राह्मण होऊ शकतो हेंही म्हणणें खोटें ठरते.

स्मृतींतील श्लोकांची गोष्ट सोडली तरी प्रत्यक्ष व्यवहारात जे प्रकार आपण ऐकतो नि पाहतो त्याचाही विचार संकोच सोडून केलाच पाहिजे. अनेक उदाहरणें पिढ्यान्पिढ्या घडत आलीं नि प्रत्यक्ष घडतात नाही का की, ज्यात शूद्र पुरुषाशी ब्राह्मण स्त्रियांचा गुप्त संबंध घडून झालेली संतती त्या त्या ब्राह्मण कुलातच मोडत राहते? आई व बाप कोणी तरी वा दोघेही ब्राह्मण नसताही मनुष्याला ब्राह्मण्य प्राप्त झाल्याची स्मृती नि व्यवहार यांतील उदाहरणें ब्राह्मण्य आई-बापांच्यामुळे मिळते या म्हणण्याला खोट्यात काढतात.

बरें, एकदा मिळालेलें ब्राह्मण्य, ब्राह्मण आईबापांच्या पोटी नि:संशय जन्म घेतल्याने लाभलेलें ब्राह्मण, जर ब्राह्मण्याची पैतृक उपत्तीच तेवढी खरी असे मानलें, तर पुन्हा मरेतो नाहीसें होता कामा नये. ब्राह्मण पितरांच्या पोटी आल्यानेच जे मिळते ते तसा जन्म होताच मिळालें ते आजीवन राहणारच. कारण त्याच्या प्राप्तीची जी एकच अट ती प्रथम जन्मत:च पुरी झालेली असते. पण स्मृतीवरून तसे दिसत नाही. मनू म्हणतात की, जो ब्राह्मण मांस खाईल तो तत्काळ ब्राह्मण्यापासून च्युत होतो. मेण, मीठ, दूध विकील तो ब्राह्मण तीन दिवसांत शूद्र होतो! अर्थात् ब्राह्मण आईबापांच्या पोटी जन्म घेणें हेंच काय ते ब्राह्मण्याचें कारण नव्हे, संपादनाचा उपाय नव्हे. जन्मावरच निश्चित होणारे ब्राह्मण्य नीच कर्माने एकाएकी नाहीसें कसें होईल? आकाशात उडणारा घोडा पृथ्वीवर उतरताच डुक्कर बनल्याची कथा कोणी कधी ऐकिली आहे वा विश्वासिली आहे?

आता ब्राह्मण्य हा शरीराचा धर्म आहे, विशिष्ट शरीरात ब्राह्मणपण साठविलेलें असते, असे म्हणाल तर मोठाच घोटाळा होईल. ब्राह्मणचें शरीर प्रेत होताच जे त्यास सरणावर ठेवून अग्नी देतील ते ब्रह्महत्त्येच्या पातकाचे अधिकारी होतील, वधदंडार्ह ठरतील! कारण ब्राह्मणपण जर शरीरात असणार तर ते शरीर जाळणारा ब्रह्महत्याही करणारच! पुन्हा ज्या श्लोकात असे

लिहिलेलें असते की, यजनयाजन, अध्ययन, अध्यापन, दानप्रतिग्रह हीं सारीं कृत्यें ब्राह्मणाच्या देहापासूनच निर्मिली जातात, त्या मतवाद्यांस आम्ही असे विचारतो की, ब्राह्मणाच्या देहापासूनच निर्मिली जातात, त्या साऱ्या कृत्यांचें गुणधर्म नाशतात काय? 'मुळीच नाही' असे तुम्ही ठासून सांगाल! तर मग ब्राह्मणाचें शरीर म्हणजे ब्राह्मण्य नव्हे, ब्राह्मकर्माचें उत्पत्तिस्थानही नव्हे, हें तुम्हीच मानल्यासारखें होत नाही काय!

आता ज्ञानामुळे ब्राह्मण होतो, असे म्हणाल तर ठीकच. पण मग तुम्ही तसे वागावयास हवें. त्या व्याख्येप्रमाणे जो जो ज्ञानयुक्त त्यास त्यास तुम्ही ब्राह्मण्याचे सारे अधिकार अर्पिण्यास हवेत. ज्ञानाने ब्राह्मण येते तर मग असेन शूद्रही ब्राह्मण मानावे लागतील. चतुर्वेद, व्युत्पत्तिमीमांसा, सांख्य, वैशेषिक, ज्योतिष, तत्त्वज्ञानप्रभृतीत पारंगत असे पंडिताग्रणी शूद्रामध्येही असलेले आजही माझ्या स्वत:च्या परिचयाचे आहेत. पण त्यांपैकी एकालाही तुम्ही ब्राह्मण मानून ब्राह्मण्याचे अधिकार अर्पिलेले नाहीत! तेव्हा तुम्ही ज्यास ब्राह्मण्य म्हणता ते केवळ ज्ञानाने मिळते असे तुम्हांस कसें म्हणता येईल?

आचाराने ब्राह्मण्य ठरते असे म्हणाल, तरीही आज तुम्ही व्यवहारात त्या व्याख्येप्रमाणे लवलेशही वागत नाही. भाट, कैवर्तक आणि भांड ह्या लोकांचे आचार किती सोज्ज्वळ असतात पाहा. अनेक कष्ट सोसून ते कडकडीत धर्माचार पाळतात. साधारण ब्राह्मणाहूनही त्यांचे आचार इतके सोज्ज्वळ असता त्यांस तुम्ही चुकूनसुद्धा ब्राह्मण म्हणत नाही!

ज्ञानाच्या इतर विभागात कोणी कितीही पारंगत असला तरी ब्राह्मण्य त्यायोगे मिळत नाही. ते ब्राह्मण्य वेदपठण नि वेदज्ञान ह्यायोगेच काय ते संपादिता येते, असे म्हणाल तर आम्ही विचारतो की रावण वेदांत पारंगत होता, पण त्यास राक्षस म्हणत, ब्राह्मण नव्हे. त्या काळचे राक्षस वेद पठत, मग त्यास तुम्ही ब्राह्मण का म्हणत नाही?

तेव्हा सारांश असा दिसतो की तुम्ही कोणत्या गुणावरून वा कोणत्या धर्मावरून ब्राह्मण्य ठरविता हें तुमचें तुम्हांलाच समजत नाहीं. ब्राह्मण कशाने ठरतो याचा तुम्ही विचारच करीत नाही. कोणतीही एक कसोटी निश्चयून तीवर टिकेल तोच ब्राह्मण असे तुम्ही वागत नाही.

माझ्या मते तर ब्राह्मणाचें लक्षण हेंच की, तो एक निष्कलंक गुण आहे. ज्याच्या योगाने पाप विनष्टते ते ब्राह्मण्य! व्रततपदान, शमदमसंयम यांनी सुसंपन्न असा जो मनुष्य, अविवेक नि अहंकार, राग नि द्वेष यांपासून मुक्त असतो, संग नि परिग्रह यांच्या ठायी जो असक्त, दया हेंच ज्याचें ब्रीद तोच ब्राह्मण! त्या सद्‌गुणाविरुद्ध जो दुर्गुणी नि दुष्ट तोच चांडाळ! वेदांत नि शास्त्रांतही ब्राह्मण्याचें हें सर्वमान्य लक्षण आहेच आहे. शुक्राचार्य तर याही पुढे जाऊन सांगतात की, देवांना जातीची पर्वा नसते. अधमाधम गणलेल्या जातीत जरी जन्म असला, तरी जो सज्जन त्यासच ते ब्राह्मण समजतात.

सज्जन शूद्रासही प्रव्रज्येचा अधिकार नाही, त्यांनी द्विजांची सेवाच करून राहिलें पाहिजे; कारण शुद्र हा नीच, अशा तुमच्या विधानाला आधार काय, तर म्हणे चातुर्वर्ण्याच्या परिगणनात तो शूद्र शब्द शेवटी येत असल्याने तो नीच समजला पाहिजे. हें कारण धडधडीत पुढे मांडताना पोरकटपणाची पराकाष्ठा होते इतकेदेखील तुमच्या कसें ध्यानात येत नाही कोण जाणें! बोलण्याच्या अथवा लिहिण्याच्या ओघात जे शब्द आपण पुढेमागे घालतो, ते काही उच्च

आणि नीच या परंपरेसाठीच घालीत नाही, उच्चारात सुटसुटीतपणा येण्यासाठीच किंवा केवळ व्याकरणप्रथेसाठीच तसे शब्द पुष्कळदा आगेमागे घातले जातात. तशा शब्दक्रमाचा अर्थ जर नेहमी उच्चनीचतेच्या अर्थी घेतला, तर काय हास्यास्पद प्रकार घडतील पाहा! पाणिनीचे एक सूत्र 'श्वानं युवानं मधवानमाह' हें प्रसिद्धच आहे. मग काय श्वान पहिल्याने सांगितला म्हणून कुत्रा हा मधव्यापेक्षा – इंद्रापेक्षा - श्रेष्ठ नि इंद्र कुत्र्याहून नीच समजायाचा? दंतौष्ठ समासांत दंत प्रथम सांगितला म्हणून दात ओठांहून ज्येष्ठ मानायचा? वास्तविक ओठ ज्येष्ठ, दात मागाहून जन्मले! उमामहेश असे म्हटले म्हणून काय उमा ही महेशाहून वरिष्ठ ठरली? मग ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र म्हटले म्हणूनच शूद्र जन्मादारभ्य, कितीही सज्जन असला तरीही नीचतम दुर्जन ठरला असे म्हणणें निव्वळ पोरकटपणाचेंच ठरत नाही काय? अर्थात शूद्राला प्रव्रज्येचा अधिकारही आहेच आहे.

मनूमध्ये शूद्र नीच असल्याविषयी सांगितले आहे म्हणून म्हणता? शूद्रिणीचें स्तनपान केलेला, शूद्रिणीने ज्यावर आपला नुसता सुस्कारा टाकला, किंवा ज्याची आईच शुद्रीण त्या ब्राह्मण कुळाला ब्राह्मण जातीत प्रायश्चित्तानेही येता येणार नाही. जो शुद्रीचें अन्नपाणी घेतो, तो ब्राह्मण ह्याच 'जन्मी शूद्र नि पुढच्या जन्मी कुत्रा होईल;' शूद्रिणीला 'अंगवस्त्र' म्हणूनही बाळगता कामा नयें. तसे करणारा ब्राह्मण 'मेल्यावर नरकात जातो' असले दंडक मनूत आहेत खरेच. पण ते खरे म्हणाल तर ब्राह्मण हा जन्मानेच ब्राह्मण असून काही केल्या ब्राह्मणाचा शूद्र होत नाही, हें तुमचें मुख्य सूत्रच चुकीचें ठरते आणि सदाचारी तो शूद्रही ब्राह्मण होतो, दुराचारी तो ब्राह्मणही शूद्र होतो हें आमचें सूत्र खरें ठरते! पुन्हा त्याच मनूत शूद्रांनी पुण्यशाली आचारांमुळे ब्राह्मण्य पटकाविलें असेही स्पष्ट म्हटलेलें आहे. काठीन मुनि, उर्वशी वेश्येचा पुत्र वशिष्ठ, कुलालणीच्या पोटचा नारद हे शूद्र असताही तपाने, साध्वाचाराने ब्राह्मण झाले नाहीत काय? नीच कुळात जन्मून पुण्याईने स्वर्ग पटकावल्याची हवी तितकी उदाहरणें सापडतात, तीं काय तुम्हांस नाकारता येतील?

ब्राह्मणाविषयी मी जे म्हटले तेच क्षत्रियांनाही तंतोतंत लागू आहे. वंश मोठ्या राजांचा असला आणि सद्गुणांची वाण असली, तर तो क्षत्रियसुद्धा तिस्करणीय होय असे मनू सांगतात. चार जातीवर्णाची ही कल्पना मुळीच खोटी. मनुष्याची जात अशी एक.

तुम्हीच म्हणता सर्व माणसे एका ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालीं आहेत; मग त्यांच्या एकमेकांशी रक्तबीजाचा संबंध नसलेल्या या चार भिन्न जाती कशा निर्मिल्या गेल्या? माझ्यापासून माझ्या पत्नीला चार मुलें झालीं, तीं एकाच जातीचीं नव्हेत काय? मग एकाच ब्रह्मदेवाचीं हीं मुलें जातीचींच भिन्न असतील तरी कशीं?

## १५.२ जातीची भिन्नता म्हणजे वास्तविक कशी असावयास पाहिजे?

जात निराळी मानावयाची म्हणजे भेद कसा असला पाहिजे ते ठरविण्यास प्राणिमात्रांच्या जाती आपण कशा ठरवितो तेच पाहणें इष्ट. इंद्रियादी रचनेच्या मूलत:च असणाऱ्या भेदावरून जात निराळी ठरते. घोड्याचा पाय हत्तीच्या पायासारखा नसतो. वाघाची तंगडी आणि हरणाची तंगडी एकसारखी नसते. अशा प्रकारच्या शरीर नि ऐंद्रिय रचनात्मक मूलभेदामुळेच प्राण्यांची

एक जात दुसरीपासून विभक्त असे आपण ठरवितो. पण तशा अर्थी ब्राह्मण नि क्षत्रिय ह्यांच्या दोन जाती कधीही मानता यावयाच्या नाहीत. त्यांचे पाय काय तशा निरनिराळ्या प्रकारचे असतात? बैल, टोणगा, घोडा, हत्ती, गाढव, माकड, बोकड, मेंढा ह्यांच्या जननेंद्रियें, रंग, आकार, वार, आवाज, मलमूत्रापर्यंत इतका मूलभूत फरक असतो की त्यास भिन्न जाती म्हणून चटकन्ओळखता येते, तशा अर्थी मनुष्यांतीनल ब्राह्मण, क्षत्रिय हे भिन्न जातीचे असे कधी तरी म्हणता येईल काय? पक्ष्यांची तीच स्थिति. कबूतर, पोपट, मोर प्रभृतींचे ध्वनी, रंग, पंख, पिसारे जितके मूलतः भिन्न रचनेचे तितके मूलतः भिन्नत्व कधी तरी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्रांत असणें शक्य आहे काय? वृक्षांत वड, बकुळ, पळस, अशोक, तमाल, नागकेशर, शिरीष, चंपकादी वृक्षांची खोडें, पानें, फुलें, फळें, साली, बिया सर्व काही भिन्न; त्यांची जात निराळी खरी, पण त्या अर्थी जात हा शब्द ब्राह्मण-क्षत्रियादिकात विभेदपणे लावताच येऊ नये इतके हे चारी वर्गांतील लोक अंतर्बाह्य एकजाती हाडेंहडकें, रक्तमांस, अवयव, इंद्रियें, रस, सत्त्व प्रभृती लक्षणांही अभिन्न. हास्यरोदन, भावभावना, रोगभोग, जगण्या-मरण्याची रीतिकृती, भीतीचीं कारणे, कर्माच्या प्रवृत्ती सारे इतके एकसारखे की, प्राणिमात्रांत जातीभिन्नत्व दर्शविण्यास घोडा नि बैल यांच्यातील वैषम्यासारखें जे वैषम्य आपणांस आढळावें लागते तसे वैषम्य या चारी वर्णात लवलेशही आढळत नसल्याने त्यांच्या प्रकरणी त्या अर्थी भिन्न जात हा शब्दच लावता येत नाही, त्या अर्थी ते सारे एकाच जातीचे समजणें भाग आहे.

औदुंबराच्या नि फणसाच्या झाडांना फांद्या, खोड, सांधे, मूळ इत्यादी साऱ्या स्थळीं फळें धरतात. पण म्हणून फांदीवरचें फळ खोडावरच्या फळापेक्षा ज्या अर्थी रंगाकृतिस्पर्शरसांही अगदी समान असते, त्या अर्थी तीं फळें एकच होत म्हणून आपण समजतो, भिन्न जातीचीं मानीत नाहीं. फांदीच्या टोकाला उंबर आलें म्हणून ते ब्राह्मण उंबर म्हणावयाचें काय? तद्वतच तुमच्या म्हणण्याप्रमाणे यद्यापी ब्रह्मदेवाच्या शरीराच्या निरनिराळ्या भागापासून ब्राह्मण-शूद्रादी उपजले असे मानलें तरी तीं सारीं माणसेंच असल्याने केवळ स्थलभेदे, अत्यंत विषम वर्णानेच जी मानली जाते ती भिन्न भिन्न जातीमत्ता त्यांच्या प्रकरणी कशी मानता येणार? ते वेगळ्या वेगळ्या जातीचे कसे असणार?

## १५.३ वैशंपायन-धर्म-संवाद

या प्रकरणी महाभारतातच वैशंपायन-धर्मसंवाद आहे तोही तुम्हांस काय सांगतो ते ऐका. धर्म राजाने प्रश्निलें, 'वैशंपायन ऋषे, आपण ब्राह्मण कोणाला म्हणता नि ब्राह्मणाचें लक्षण काय?' त्या प्रश्नास उत्तरताना वैशंपायन शेवटी म्हणाले, 'युधिष्ठिरा, सत्य, दया, इंद्रियदमन, परोपकार नि तपाचरण हे गुण ज्याच्या ठायी असतात, त्याला मी ब्राह्मण समजतो, ज्याच्या ठायी त्यांचा अभाव तो शूद्र. हे पाच गुण म्हणजेच ब्राह्मण. फार काय, हे गुण एखाद्या चांडाळाच्या ठायी असले तर तोही ब्राह्मणच होय. पूर्वी भूलोकावर एकच जात होती. पुढे आचारकर्मांनी भिन्नत्व वाढून चातुर्वर्ण्याची व्यवस्था झाली. 'एकवर्णमिदं पूर्वं विश्वमासीत् युधिष्ठिर। कर्मक्रियाप्रभेदेन चातुर्वर्ण्यं प्रतिष्ठितम'। हें पाहा, सर्व मानवांची उत्पत्ती स्त्रीपासून एकाच पद्धतीने होते, सर्वांच्या दैहिक आवश्यकता, अंतरिद्रियें सारखीच असतात. अर्थात्जात निराळी नसून ज्याची वागणूक चांगली तो ब्राह्मण, वाईट तो शूद्र. अर्थात् वागणूक सुधारताच

तो शूद्र तत्काळ ब्राह्मण्याचा अधिकारी होणारच. हे राजा, यास्तव इंद्रियमोहापासून अलिप्त नि सच्छील अशा शूद्राला दान देणें हें सत्कृत्यच आहे नि स्वर्ग्यफलप्रदही आहे. जातीचा विचार खोटा, सद्‌गुणावरच ब्राह्मण्य अधिष्ठिते. जो दुसऱ्याच्या कल्याणासाठी अहर्निश सिद्ध असतो तो ब्राह्मण. जो आयुष्य सत्कृत्यांत व्ययितो तो ब्राह्मण. क्षमा, दया, सत्य, शौच, ज्ञानविज्ञान यांही जो युक्त तो ब्राह्मण.'

महाभारतासारख्या धर्मग्रंथातील वैशंपायनासारख्या ऋषीचीं हीं वाक्यें आहेत. त्यांचा तरी अर्थ मित्रहो, तुम्ही नीट ध्यानी घ्या, तो सनातनी धरा.

अज्ञान निरसावें या सदिच्छेने म्या, अश्वघोषाने हें प्रवचन केले. पटलें तुम्हांस तर ठीकच; न पटलें किंवा कोणी त्यास हेतूत:च हेटाळलें तरी आम्ही त्याचाही विषाद मानीत नाही. इति 'वज्रसूची!'

वरील प्रवचनात अश्वघोषांनी त्या प्राचीन काळच्या प्रचलित आक्षेपादिकांचाच ऊह त्या काळच्या तर्कपद्धतीनुसार केला असल्यामुळे त्याचें महत्त्व प्राचीन काळचा लेख ह्या दृष्टीने तत्कालीन मापानेच मोजलें पाहिजे हें सांगावयास नकोच. यास्तवच त्यातील जन्मजात जातीभेदावरून चातुर्वण्याविरुद्ध जे जे कोटिक्रम केलेले आहेत, ते ते आजच्या परिस्थितीत वाचताना त्यातील उणिवांकडेही कानाडोळा होता कामा नये. त्या आणि यांपैकी अगदी अनुपेक्षणीय अशी जी उणीव आपण स्वत:पुरती भरून काढली पाहिजे ती ही की, त्यात ब्राह्मण ज्ञातीसच जरी मुख्यत्वेकरून साऱ्या कोटिक्रमात संबोधिले आहे, तरी तीं ब्राह्मणांना यथायोग्यपणे दिलेलीं प्रत्युत्तरें क्षत्रियांनाही 'पीडक' वर्णाहंकारी म्हणून दूषीत स्वत: शूद्रास्पृश्यादिक खालच्या जातींना मात्र आपल्या 'उच्च' वाणीपणाचें पाणी दाखविण्यास नि खालच्यांचे आपणही 'ब्राह्मण' बनण्यास न सोडणारे लक्षावधी वैश्य आहेतच; शूद्रांतही 'त्रैवर्णिकांनी ज्ञातिभेदाचें ढोंग काढून आम्हांस नागविलें, मनुष्यमात्र समान!' म्हणून घोषिणारे शूद्रच त्यांच्या 'खालच्या शूद्र पोटजातीससुद्धा त्याच जातीभेदाच्या त्याच ढोंगाखाली हीन लेखिण्यास सोडीत नाहीत, बेटीरोटीव्यवहार करीत नाहीत, महारादिक पूर्वास्पृश्यांस तर शिवतही नाहीत. पर्वती-सत्याग्रहात अस्पृश्यांच्या डोक्यात लाठी घालणाऱ्या प्रमुखांत अनेक मराठे होतेच. नाशिकच्या राममंदिर-सत्याग्रहात अस्पृश्यांना मज्जाव करणाऱ्यांतील कट्टरांतील कट्टर विरोधक नुसते भटजीच नसून शेठजी आणि रावजीही होते. अस्पृश्यांची जन्मात घोड्यावर बसू नये, तो अधिकार क्षत्रियांचा म्हणून हुंकारीत अस्पृश्यांस अनेक क्षत्रिय राजांनी पूर्वी कठोर दंड केले आहेत. राजपुतान्यास झांशीस गेल्या दोन तीन वर्षांत अनेक वेळा मारपीट केल्याचीं प्रकरणे घडलीं आहेत. एका शिक्षित मराठा तरुणीने मराठेतर उच्च कुळात प्रीतिविवाह करावयाचें ठरविताच त्यांची जातगंगा भरून दंगाधोपा करण्याच्या धमक्या देण्यापर्यंत पाळी आणलेलीं उदाहरणें हिंदूसभांच्या दप्तरी दाखल आहेत. पांडवप्रतापाची मिरवणूक काढणाऱ्या महारांवर लाठीहल्ला शूद्रांनी नाशिक जिल्ह्यात केल्याचें वर्तमान अगदी आजकालचें आहे, सर्वत्र गाजलेलें आहे. खेडेगावांतील शाळांत आमच्या मुलांशेजारी महारचांभारांच्या मुलास बसू देणार नाही, म्हणून मराठ्यांनी आणि स्वत: शूद्रांनी दांडगाया केलेलीं उदाहरणें तर प्रत्येक संघटक कार्यकर्त्यास पदोपदी आडवीं येतात. द्विजाबरोबर एकासन करणारा शूद्र दंडनीय म्हणून सांगणाऱ्या स्मृतीस कडकडून शिव्या देणारे शूद्र स्वत:बरोबर अस्पृश्यांना एकासन करण्याची

तशीच कठोर बंदी करतात!! फार काय, अस्पृश्यांतदेखील प्रत्येक जात 'खालच्या' जातीवर तेच अन्याय त्याच 'उच्च' जातीमत्त्वाच्या सूत्राने करीत आहे की, ज्या अन्यायास ब्राह्मणांनी केले म्हणून ब्राह्मणेतर नि अस्पृश्य स्पृश्यांस शिव्या देत आले, ब्राह्मण ब्राह्मणेतर भांडले, तसेच ब्राह्मणेतरांत मराठे मराठेतर भांडतात, स्पृश्यास्पृश्येतर एकमेकांस कुचलतात, स्पृश्येतरांतही महारमहारेतर पंथ पडून महारेतरांवर महार फार अन्याय करतात म्हणून बोंबाबोंब चालू आहे. चांभार पुढारी आंबेडकरांवर महारांचा पक्षपाती म्हणून आरोप करतात. फार काय, महारांतदेखील आंबडेकर कोकणस्थ महार म्हणून देशस्थ महारांनी त्याचें पुढारीपण नाकारण्याच्या नि देशस्थ महारांचा सवता सुभा उभारण्याच्या चळवळी केल्या आहेत, करीत आहेत. ब्राह्मणातच कोकणस्थ ब्राह्मण नि देशस्थ ब्राह्मण नाहीत, तर वाण्यांत कोकणस्थ वैश्य, देशस्थ वैश्य; महारात कोकणस्थ महार आणि देशस्थ महार अशा भिन्न जाती आहेत!

फार काय सांगावे, नाशिकला ब्राह्मण, वाणी मराठ्यांनी 'राममंदिरात शिरू' म्हणताच महारांना मारहाण केली त्या असमानतेविषयी सात्त्विक नि न्याय्य संतापाने जळफळणाऱ्या महारांच्या देवळात जर भंगी तशाच अत्याग्रहाने शिरू लागले तर तेच महार तोच असमानतेचा ध्वज संरक्षिण्यास्तव तशाच लाठ्यांनी त्या भंग्यांस झोडपण्यास सोडणार नाहीत! रायगडी गेल्या माहिन्यात शिवोत्सवी महार सहभोजनास आले म्हणून काही मराठे-ब्राह्मण जसे उठून गेले, तसेच महारांच्या सार्वजनिक पंगतीत भंगी मंडळी घुसताच महारही त्या 'बाटाबाटी'स लाठीकाठीनेही विरोधण्यास सोडणार नाहीत.

तेव्हा जातीभेदाच्या खुळाचें खापर ब्राह्मणांवर वा क्षत्रियांवर वा स्पृश्यांवरच फोडणें निव्वळ पक्षपात आहे. ह्या रोगाने भंग्यापर्यंत प्रत्येक जात पछाडली जात आहे. हा जात्यहंकाराचा दोष सर्वांचा आहे. त्याविषयी ज्या ज्या शिव्या ब्राह्मणास वा क्षत्रियास कोणी हासडू इच्छितो त्यांच्या त्यांच्या 'प्राप्तीचा अर्धा वाटा' यच्चयावत् जातींना वाटून दिला पाहिजे.

उलट पक्षी ह्या जन्मजात जातीभेदाच्या रोगास निर्दाळू निघालेल्या सुधारकांत अत्यंत प्रमुख सुधारक ब्राह्मणही होते; बुद्धाच्या मागे त्याने त्याच्या संघाचा सारा भार नि आपला संचालकत्वाचा अधिकार सोपविला एका ब्राह्मणावर! स्वतःचे अधिकार 'पीठाधिष्ठानवसन' बुद्धांनी मरताना ज्या पट्टशिष्यावर घातलें तो महाकाश्यप होता ब्राह्मण, बुद्ध पंथाचे मोठमोठे ग्रंथकार, सूत्रकार, प्रचारक भिक्षू होते ब्राह्मण. संतवैष्णवात अनेक प्रमुख आचार्य होते ब्राह्मण, चैतन्य प्रभू, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामकृष्ण परमहंस सारे ब्राह्मण. आर्यसमाजाचे स्थापक दयानंद, ब्राह्मोसमजाचे अध्वर्यू टागोर, प्रार्थनासमाजाचे रानडे होते ब्राह्मण. त्याचप्रमाणे अनेक क्षत्रिय, अनेक वैश्य, अनेक शूद्र, नव्हे रोहिदास, चोखा, नंद तिरूपेल्लुअरांसारखे अनेक 'अस्पृश्य'ही थोरथोर सुधारक होऊन गेले, होताहेत.

अर्थात् ब्राह्मणांत काय, भंग्यांत काय जात्यहंकारी, वैषम्यवादी, पीडक जसे सापडतात, तसेच त्या त्या प्रमाणात जातीभेदोच्छेदक समतावादी सुधारकही सापडतात, ब्राह्मण वा क्षत्रिय म्हटला की, लुच्चा आणि इतर तेवढे सारे केवळ परोपकारी, केवळ साधु, केवळ समतावादी निरूपद्रवी सज्जन असे म्हणणारा जातीभेदोच्छेदक हा, त्या त्या जात्युच्छेदक गर्जनेनेच जातीद्वेषाचें कार्य साधतो, कळत नकळत जातीभेद खरा आहे असे सिद्ध करतो. कारण ब्राह्मणाची वा कोणचीही जात जन्मतःच आणि सगळी जातची जात वाईट नि इतरांची जातची

जात जन्मतःच हटकून चांगलीं, असे म्हटले की ह्या जाती नुसत्या मानीव, नुसत्या पोथीजात नसून खरोखरीच जन्मजात आहेत, त्यांच्यात जन्मजात असा कोणता तरी विशिष्ट विभेद आहे असेच नाही का सिद्ध होत?

पण ब्राह्मणाच्या वा भंग्याच्या जातीत सारेच वाईट वा सारेच चांगले लोक जन्मतःच वाटले जात नाहीत. तसे म्हणणाऱ्या वेड्या पिरांचा तो आक्षेप समूळ खोटा नि द्वेषदूषित असतो. म्हणूनच ह्या साऱ्या जाती मूलतःच भिन्न नसून हा जातीभेद जन्मजात नसून, निव्वळ मानीव नि पोथीजात आहे असे ठरते.

अश्वघोषांनी लिहिलेल्या वरील वज्रसूचीत हें तत्त्वही गृहीत नि सूचीत असताही स्पष्टीकृत नसल्याने कोणाचाही गैरसमज होऊ नये यास्तव ते आम्ही वर स्पष्टिलें आहे.

- (किर्लोस्कर)

***

# १६ तौलनिक धर्मविज्ञानदृष्ट्या मुसलमानांतील पंथोपपंथाचा परिचय

सध्या हिंदुधर्मात घुसलेल्या जन्मजात जातीभेद, अस्पृश्यता इत्यादी रूढींकडे बोट दाखवून मुसलमानी प्रचारक भोळ्याभाबड्या हिंदूंना सांगत सुटले आहेत की, 'तुम्ही मुसलमान व्हा! आमच्यात जातीभेद, पंथभेद नाही. आमचा धर्मग्रंथ एक, पैगंबर एक, पंथ एक. आमच्या धर्मात सारा मुसलमान एक, समान, उच्चनीचता नाही! हें मुस्लिम मौलवींचे वाग्जाल किती अतथ्य आहे ते दाखविण्यास्तव आम्ही मुस्लिम धर्ममतांची सत्य ती माहिती देणारे एक दोन लेख लिहीत आहोत.

कोणच्याही एकाच धर्माचा पक्षपात किंवा पक्षघात करण्याची अन्याय्य नि अहितकारक दुर्बुद्धि न धरता 'सत्य'- (जे आहे त्यांचे यथावत्ज्ञान) हीच सर्व धर्मांच्या अभ्यासाची न्याय्य नि हितकारक कसोटी समजून ज्याला सर्व धर्मांचा स्वतंत्रपणे अभ्यास करावयाचा असेल, त्याने पहिले सूत्र जे शिकले पाहिजे, पहिली अट जी पाळली पाहिजे, ती ही की, मनुष्यजातीत अगदी अज्ञान युगातील हाटेंटांट अंदमानी बेटांच्या धर्ममतांपासून तो अत्युच्च वेदान्तविचारापर्यंत जी जी धर्ममते प्रचलविलीं गेली किंवा जात आहेत ती ती सारीची सारी अखिल मानव ज्ञातीची सामाईक मत्ता आहे; त्या त्या परिस्थितीत मनुष्याच्या हितार्थच सुचलेली तशी ऐहिक नि पारलौकिक कल्याणाची केलेली ती एकेक योजना असल्यामुळे ते ते यत्र अखिल मानव ज्ञातीच्या कृतज्ञ आदरास पात्र आहेत. अशा ममत्वाच्या नि समत्वाच्या सादर भावनेनेच ह्या सर्व धर्ममतांना अभ्यासावे, त्या सर्व धर्मग्रंथांना सन्मानावे.

त्या प्रत्येक धर्ममतात जे जे चिरंतन सत्य असेल ते ते स्वीकारण्यातच आपणां सर्वांचें हित आहे; जे जे त्या त्या परिस्थितीत सत्य भासलें किंवा त्या त्या मानवी संघास त्या काळापुरते हितावह झाले-परंतु आज जे विज्ञानाच्या शोध-ज्योतींच्या (सर्चलाइटच्या) झगझगीत प्रकाशात सत्याभास ठरत आहे, आजच्या परिस्थितीत मनुष्यहितास बाधक होत आहे, ते ते त्यागिण्यातच आपणां सर्वांचे हित आहे, ते ते त्यागिणें हेंच 'सत्या'च्या शोधकांचे आणि मनुष्याच्या उद्धारार्थ झटू इच्छिणाऱ्या प्रामाणिक साधकांचे कर्तव्य आहे!

कारण काही झाले तरी जो ऐहिक नि पारलौकिक धारण करतो तो धमर्; 'धारणात् धर्ममित्याहु:' हीच धर्माची व्याख्या त्यातल्या त्यात इतकी सुसंगत नि बुद्धिनिष्ठ आहे की, तिला नाकारण्याचें साहस धर्मोन्मादकासही सहसा करवत नाही.

अर्थातच, कोणच्याही धर्मग्रंथात वा मतात हें अमुक  अशा अभ्यासू बुद्धीस पहिल्या पावलीच पंगू करून अभ्यास करू निघालेला विज्ञानवादी स्वत:स बांधून घेणार नाही. ही प्रतिज्ञा म्हणजेच पूर्वग्रह! वेदांच्या अभ्यासाच्या प्रारंभीच जर 'वेद ईश्वरकृत, यास्तवतच अक्षर नि अक्षर सत्य असलेंच पाहिजे, त्यांतील कोणतेही अक्षर लटकें म्हटले की नरकात पडलासच!' ही प्रतिज्ञा स्वीकारली तर अवेस्ता, तौलिद, बायबल, कुराण प्रभृती इतर धर्मरथांना नि:पक्षपाती दृष्टीने अभ्यासिणें शक्यच राहणार नाही! तसेच 'कुराण' हेंच ईश्वरकृत यास्तव त्यातील अक्षर नि अक्षर तेवढेंच सत्य! त्याला लटकें म्हटलेस की, 'मेल्यानंतर पडलासच नरकात! नव्हे,

इथल्या इथेच तुला ठार करून टाकलें पाहिजे!’ अशी प्रतिज्ञा करणे म्हणजे कोटिक्रम नसून निव्वळ लाठीक्रमच होय! जो असे मानील त्यास कुराणेतर ग्रंथ धर्मग्रंथ म्हणून वाचताच येणार नाहीत. अधर्मग्रंथ म्हणूनच काय ते आले तर वाचता येणार!

पण तसे पूर्वदूषित ग्रह करून घेणें साफ नाकारणारा विज्ञानवादी वेद, अवेस्ता, कुराण, पुराण प्रभृती प्रत्येक ग्रंथास नि:पक्षपात दृष्टीने, आणि त्या त्या ग्रंथातील प्रवृत्तीपर निवृत्तिपर लिखाणाने त्या त्या काळी जो मनुष्यजातीची सापेक्ष उन्नति केली असेल ती पारखून तीपुरतें कृतज्ञपणेही अभ्यासिण्यास मोकळा असतो. ॲरिस्टॉटल, प्लेटो, चाणक्य, ह्यूम, हक्सले, हेकेल, मार्क्स या धर्मवेडाच्या कक्षेत न गवसलेल्या जागतिक ग्रंथांना, त्यांतील भिन्न मतवादांनी किंवा आज कच्च्या ठरलेल्या भौतिक विधेयांनी विषण्ण न होता, जसें ममत्वबुद्धीने, समतोलपणे नि बुद्धिवादाच्या कसोटीस निर्भयपणे लावीत आपण सारे मानव वाचतो नि ती मानव जातीची समाईक संपत्ती समजून त्यांना सन्मानितो तशाच वैज्ञानिक दृष्टीने जर आपण सारे जण वेद, अवेस्ता, बायबल, कुराण प्रभृती यच्चयावत्धर्मग्रंथासही वैज्ञानिक नि ऐतिहासिक दृष्टीनेच काय ते वाचू, तर त्यांच्या तशा तुलनात्मक अभ्यासामुळे त्या त्या ग्रंथातील तात्त्विक सत्ये नि उपयुक्त आचार स्वीकारण्यास आपण अधिक मनमोकळे तत्पर होऊ, त्या ग्रंथाच्या नावे धर्मवेडाच्या लहरीत ज्या कत्तली नि रक्तपात झाले ते होण्याचा संभवदेखील उरणार नाही - जसा विज्ञान-ग्रंथास (Scientific Works) वाचताना कितीही मतभेद झाला तरी तुझी विजेची वा रेडियमची उपपत्ती सूत्र नि माझे भिन्न म्हणून आपल्यात रक्तपात होण्याचा प्रसंग सहसा येत नाही.

जगातील मिल्टन, होमर, वाल्मीकी, उम्मर, प्रभृतींची काव्यें; कांट, स्पेन्सर, कपिल, स्पिनोसा, प्रभृतींचे तत्त्वग्रंथ, इतिहास ग्रंथ, विद्युत्प्रकाश - उष्णता प्रभृतींवरील वैज्ञानिक ग्रंथ, यंत्रविद्या, वैद्यक, शिल्पकला, कादंबऱ्या प्रभृती लक्षावधी ग्रंथ जगात कुठेही रचलेले असले, तरी साऱ्या जगाची समाईक संपत्ती म्हणून आपण ममत्वाने नि समत्वाने शांतपणे वाचतो, ते वाचीत वाचीत अवसानात येऊन लोक वाचनालयात एकमेकांची डोकीं अकस्मात् सडकू लागले, असे सहसा घडत नाहीं. तसेच हे ‘धर्मग्रंथ’- हीं दहा-पाच विशिष्ट पुस्तकेंही आपणांस का बरे वाचता येउ नयेत? या दहा पाच पुस्तकांपायीच प्रत्येकी दहा-पाच शतके तरी कत्तली नि रक्तपात, शाप नि शिव्या, यांच्या धुमाकुळीत मनुष्य मनुष्याचा इतका भयंकर वैरी होऊन का बरें उठावा? तसे परिणाम झालेच तर अधर्मग्रंथांचे व्हावे - धर्म-ग्रंथांचे नव्हेत!

## १६.१ बुद्धिवादाविरुद्ध आक्षेप

या सर्व धर्मग्रंथांना ममत्वाने नि समत्वाने सादर वाचून, आपण इतर कोणच्याही विषयावरील ग्रंथसंघांस जसें तर्कशुद्ध बुद्धिवादाने पारखून घेतो तसेच त्यांच्यातील ज्ञान नि अज्ञान, अद्ययावत्विज्ञानाच्या कसोटीस लावावें आणि उत्तम ते मानवी समाईक संपत्ती म्हणून सर्वांनी स्वीकारावें. या आमच्या वरील सूचनेवर एक ठराविक आक्षेप जो शब्दनिष्ठ प्रवृत्तीचा असतो तो हा की, ‘पुरुषबुद्धी ही व्यक्तिपरत्वे विभिन्न, अस्थिर, परिवर्तनशील असल्यामुळे

मनुष्याला कोणचाही ठाम आधार असा तिच्यामागे लागल्याने कधीही सापडणार नाही. पुरुषबुद्धी स्खलनशील, पण ईश्वरीय आज्ञा अस्खलनशील, त्रिकालाबाधित. त्यामुळे कोणत्या तरी अशा ईश्वरोक्त ग्रंथास प्रमाण मानल्यावाचून शीड नसलेल्या नि सुकाणू मोडलेल्या तारवाप्रमाणे मनुष्यसमाज वाटेलतसा वाऱ्यावर भरकटून लागतो; चांगल्यावाइटाचे ठाम माप, गर्व, वाद तोडून टाकणारे अंतिम प्रमाण असे माणसास सापडणे दुर्घट होते.'

जर असे एखादें ठाम प्रमाण ईश्वर खरोखरच देता तर ते अतिशय चांगलें होते यात शंका नाही - पण!

वेद, अवेस्ता, कुराण, बायबल हे ईश्वरप्रणीत ग्रंथ आहेत असे मानलें तरी वरील आक्षेपाची आपत्ती टळत नाही! हीच तर मुख्य अडचण आहे! कारण ईश्वरनिर्मित, अपौरुषय, ईशप्रेषित म्हणून जे कमीत कमी पन्नासपाउणशे ग्रंथ आज देखील भिन्न संघातील मनुष्यांनी मानलेले आहेत, ते अत्यंत परस्परविरुद्ध विधानांनी भरलेले आहेत. फार काय, त्यांतील प्रत्येक ग्रंथ जर काही निर्विवादपणे एकस्वर सांगत असेल, तर हेंच की, तो स्वतः तेवढा ईशप्रेषित परमप्रमाण असून बाकी सारे 'पाखंड' आहेत!

बरें, त्यांतील एक कोणचा तरी ग्रंथ वेद म्हणा, कुराण म्हणा, ईश्वरोक्त समजला तरीही भागत नाही ते नाहीच. कारण हा एकच तेवढा ईश्वरोक्त, बाकी मनुष्यकृत असे ठरविणार कोण? पुरुषबुद्धी! पण ज्या ज्या कोटिक्रमाने ते इतर ईश्वरोक्त नाहीत असे ठरवावें, त्या त्या कोटिक्रमांनी तो एकही ईश्वरोक्त नाही असे ठरते!

अगदी कोटिक्रम म्हणून सारा हाणून पाडून निव्वळ लाठीक्रमाने जरी एकच कोणचा ग्रंथ मनुष्यजातीवर लादला - तो ग्रंथ ईश्वरोक्त, स्वयंप्रमाण; बाकी सर्व झूट! असे मानलेंच पाहिजे म्हणून अगदी लाठीफर्मान सोडलें तरीही पुरुषबुद्धी पुन्हा आपले चाळे चालविण्यास नि त्या स्वयंप्रमाण ग्रंथास स्वतःच्या हातचें बाहुलें बनविण्यास सोडीत नाही! कारण ग्रंथ जरी एकच ठरविला, तरी त्याचे अर्थ अनेक होतात! ती आपत्ती काही केल्या टळत नाही! ती टळती एकाच उपायाने - जर ईश्वर एकच ग्रंथ चहूकडे ईश्वरोक्त म्हणून धाडता आणि त्याचबरोबर त्या ग्रंथातील प्रत्येक अक्षराचा एकच एक अर्थ काय तो मनुष्यमात्रास स्फुरणें अवश्यंभावी करून टाकता, दुसरा अर्थ सुचूच नये अशी पुरुषबुद्धीही एकसाचीच करता, तर मात्र ईश्वरोक्त ग्रंथ एकच एक सर्वत्र नि सर्वदा राहू शकता. पण तशी काही एक व्यवस्था ईश्वराने केलेली नाही. त्यामुळे जरी एकच ग्रंथ अहंप्रमाण, स्वयंप्रमाण, ईश्वरोक्तप्रमाण म्हणून मानला, तरीही त्याचा अर्थ करण्याचे काम शेवटी पुरुषबुद्धीलाच करावे लागल्याने ती जितकी भिन्न, अस्थिर, अप्रतिष्ठ तितकाच तो एक ग्रंथच अनेकपणा, अस्थिरपणा, विविधपणा पावून अप्रतिष्ठितार्थ होऊन बसतो!

उदाहरणार्थ वेद प्रथम घेऊ. वेद अपौरुषेय आहे; परंतु धर्मजिज्ञासूंना 'प्रमाणं परमं श्रुतीः' असे अगदी प्रामाणिकपणे मानणाऱ्या कोट्यवधी हिंदूंमध्ये नावाला जरी वेद हा एकच धर्मकेंद्र असला, तरी त्याच्या प्रत्येक मंत्रागणिक नि शब्दागणिक अर्थदृष्ट्या अनेक वेद होऊन बसतात. पुरुषबुद्धीवाचून त्यांचा अर्थ लावण्याचें दुसरें साधनच मनुष्यास उपलब्ध नसल्यामुळे जितके पुरुष जितके वेद, तितके पंथ, तितकी भिन्न प्रमाणे होऊन बसायची ती बसतातच!

एकाला वेदात पशूयज्ञ आहेसें वाटते, दुसऱ्याला नाहीसें वाटते, तिसऱ्याला विकल्प वाटतो. एकाला मांशासन, जन्मजात अस्पृश्यता, मूर्तीपूजा, केशवपन, वेदांत आहेसें वाटते; त्याच वेदाच्या त्याच मंत्रांच्या आधारे ह्या सर्व आचारप्रथा वेदबाह्य आहेत म्हणून दुसऱ्यास वाटते. फार काय, ईश्वर एक आहे हे वेदांच्या नावे एक पक्ष उच्चस्वरे सांगतो, तर मीमांसकांदिक पंथ भिन्न पुरुषांपलीकडे वा देवतांपलीकडे ईश्वर असा नाहीच म्हणून सांगतात! संन्यासाची निंदा वेदाधारेच कोणी करतो तर 'यदहरेव विरजेत्। तदहरेव प्रव्रजेत्। वनाद्वा गृहाद्वा ।। असे वेदाधारेच इतर पंथ मानतात! बरें, हें अर्थवैचित्र्य नि हे विरोध कोणी अलबतेगलबते संागत नाहीत तर यास्क, कपिल, जैमिनी, शंकर, रामानुजापासून दयानंदापर्यंत मोठमोठे आचार्य सांगतात! कोण खरे, कोण खोटे, कसें निवडणार? निवडल्यावाचूनही कसें राहता येणार? आणि निवड म्हटली की, पुरुषबुद्धीने होणार! शेवट हाच की यद्यपी वेदग्रंथ अक्षररूपाने एकच राहिला तरी अर्थरूपाने जितके टीकाभाष्य अर्थकार, तितके शतावधी वेद होऊन बसतात!

सारांश, पुरुषबुद्धीला बगल देण्यासाठी एक ग्रंथ परमप्रमाणच नव्हे तर ईश्वरोक्तप्रमाण मानला तरी मनुष्याला शेवटी असा ऐहिक नि पारलौकिक वाटाड्या पुरुषबुद्धीवाचून दुसरा कोणताही सापडणें शक्य नाही.

फरक इतकाच होतो की पुरुषबुद्धीने तर्कप्रतिष्ठ वाटते ते घेऊ म्हणून चक्क सांगून इतर ग्रंथांप्रमाणेच वेदकुराणबायबलादिक ग्रंथही वाचले नि पाळले, तर मतभेद झाला तरी तो शिव्याशाप, लाठीकाठी चालण्याइतका विकोपास जाण्याचा फारसा संभव नसतो. वैज्ञानिक ग्रंथ वाचताना आणि परिस्थितीप्रमाणे तिला तोंड देऊन पवित्रे बदलण्याला मनुष्य मोकळा राहतो. पण ईश्वरोक्त वेदांचा मी करतो हाच अर्थ ईश्वरोक्त, असे म्हणत नि प्रामाणिकपणे भावीत वेद वाचण्याचा नि आचरण्याचा दुराग्रह धरला, तर माझें मत तेच ईश्वराचें असा अत्यंत खोडसाळ अहंकार त्या त्या मनुष्यास धर्मवेडाने झिंगवितो आणि वेदाच्या अर्थाचा मक्ता माझा, तुझा नव्हे असे आरडत नि ओरडत मनुष्य मनुष्याचा भयंकर शत्रू होऊन मत देण्याचा शेवट जीव घेण्यात होतो. माझें मत माझ्या मानवी बुद्धीप्रमाणे आहे अशी भावना मनुष्यांना तितकी भयंकर धर्मवेडी केव्हाही करू शकत नाही, की जितकी माझें मत हेंच ईश्वराचें मत आहे ही उन्मादावस्था करून टाकते! सर्वसामान्य मनुष्याला लागू असणारें हें सत्य नाकारता येत नाही.

परंतु ज्यांना ऐतिहासिक नि बुद्धिनिष्ठ दृष्टीने या धर्मग्रंथांना अभ्यासावयाचें असते, त्यांना देखील ज्या मंत्रद्रष्ट्या ऋषींचे वा ईसा, मोझेस, महंमद प्रभृती लहान, मोठ्या शतशः पैगंबरांचें , ईशप्रेषितांचे, संतांचे, साधूंचे त्यांनी त्यांनी दिलेले अंतःस्फूर्त संदेश देवाने स्वतःच सांगितलेले आहेत अशी उत्कट निश्चिति होती, त्या थोर पैगंबर, साधू, संत, ऋषि, महर्षीशी त्यांच्या व्यक्तीपुरता वाद घालण्याचें मुळीच कारण उरत नाही. त्या थोर विभूतींची तशी ती निष्ठा अगदी प्रामाणिक होती, त्यांना ते स्वतःच देवाचे अवतार वा देवाचे प्रेषित, 'पैगाम' आणणारे, असे जे वाटलें ते त्यांच्यापुरते तरी नितांत सत्यच होते, वरपांगी ढोंग नव्हते, हें मानूनही आम्हां विज्ञाननिष्ठ अभ्यासूंना ते धर्मग्रंथ शब्दनिष्ठ दृष्टीने न वाचता आमच्यापुरते, निव्वळ मनुष्यकृत ग्रंथ वाचावे तसे तर्काच्या कसोटीत धरून वाचण्याचें बुद्धीस्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार सांगता येतो.

ते बुद्धीस्वातंत्र्य आम्ही सांगून सवरून उपाभोगू इच्छितो. पुरुषबुद्धीनेच या धर्मग्रंथांना अभ्यासिणे शक्य आहे, असे स्पष्टपणे म्हणतो. पण या ग्रंथांना ईशप्रेषित वा अपौरुषय मानणारे लोक त्यांचा अर्थ लावताना अवशपणें, न सांगता पण समजून उमजून, पुरुषबुद्धीसच शेवटी शरण रिघतात एवढेच काय तो फरक!

ग्रंथच मनुष्यकृत समजून पुरुषबुद्धीच्या स्वच्छ उपनेत्राने वाचला काय किंवा ग्रंथाचे शब्द ईश्वरोक्त समजून त्यांचा अर्थ तेवढा त्याच पुरुषबुद्धीच्या मळकट उपनेत्राने वाचला काय, परिणाम एकच होतो. वेद जरी शब्दापुरता एकच राहिला, तरी अर्थानुरोधे वास्तविकपणे जितके आचार्य, भाष्यकार, स्मृतीकार, वाचक तितके विभिन्न वेद होऊन बसतात. ही झाली वेदांची गोष्ट पण ही गोष्ट एका वेदाचीच नाही. मनुष्यात आजवर जे जे ईश्वरीय ग्रंथ म्हणून प्रख्यातले गेले आहेत वा जातील, त्या साऱ्यांची ही गती झालीच पाहिजे. तर्कतः ते अपरिहार्य आहे. वस्तूतः ते घडलेलें आहे.

त्याचें दुसरें प्रत्यंतर म्हणून या लेखात ‘पवित्र कोराण’ कुराणशरीफ, याच प्रख्यात ग्रंथाचा वा प्रकरणींचा इतिहास पाहू. वेदातून शतवधि पंथोपपंथ निर्मून त्या प्रत्येकाचा वेदाचा भिन्न अर्थ कसा व्यवहारात शतावधी वेदग्रंथ निर्मिता झाला ती कहाणी आपल्याला आपल्या घरचीच असल्यामुळे पुष्कळच परिचयाची आहे. पवित्र बायबल या वेदासारख्या अपौरुषेय, ईश्वरप्रेषित, म्हणून सन्मानिलेल्या ग्रंथाचीही, शब्दश; जरी एकच बायबल असलें तरी, अर्थशः शतावधी बायबलें कशी होऊन पडली तेही युरोपच्या इतिहासाचा बराच परिचय असणाऱ्या आमच्या सुशिक्षित वर्गास अंधुकपणे तरी माहित आहे. पण आमच्या शेंकडा नव्याण्णव हिंदूंना आणि हिंदुस्थानातील लक्षावधी मुसलमानांना हें नक्की ठाऊक नाही, की ईश्वरोक्त म्हणून सन्मानिलेल्या मनुष्यजातीतील आणखी एका प्रख्यात नि सुप्रतिष्ठित ग्रंथाची, कुराणशरीफचीही, तीच गत झालेली आहे. कुराणशरीफ शब्दशः जरी एकच ग्रंथ असला, तरीही, भिन्नभिन्न संप्रदाय त्याच्यातील वाक्यावाक्यांचा नि मथितार्थाचा जो भिन्नच नव्हे तर अन्योन्यविरोधी अर्थ पुरुषबुद्धीच्या अपरिहार्य दृष्टीने करीत आले, त्यामुळे अर्थशः शतावधी भिन्न कुराणें होऊन बसलीं आहेत. त्या भिन्नार्थवादी पंथोपपंथातील कोणाचा अर्थ खरा हा प्रश्न आमच्यापुढे इथे नाही. त्यांच्यातील काही प्रमुख पंथांच्या मते एकाच कुराणीय विधेयाचे किती विभिन्न अर्थ केले गेले आहेत ती निव्वळ वस्तुस्थिती, आहे तशी स्थालीपुलकन्यायाने दाखविणें एवढाच ह्या लेखाचा हेतू आहे.

ती माहिती देताना अगदी पहिल्या प्रतीच्या प्रमाणभूत ग्रंथकारांचाच आधार घेतलेला आहे. इंग्लिशमध्ये कुराणाचें अधिकृत भाषांतर करणारे जॉर्ज सेलल, कुराणाचें मराठी भाषांतरकार, युरोपास पटेल अशा नव्या दृष्टीने कुराणाचे अर्थ लावून अगदी इंग्लिशमध्ये त्यास भाषांतरणारे इंग्लंडमधील प्रख्यात मुसलमानी प्रचारक डॉ. महंमदसाहेब, मुसलमनी संस्कृतीचे मानी नि प्रगाढ अभ्यासक जस्टिस अमीर अल्ली प्रभृती नामांकित मुसलमानी धर्म, इतिहास, नि संस्कृती यांवरील लेखकवर्गाच्या ग्रंथांचें आम्हांस अनेक वर्षे अध्ययन जे घडलें त्याच्याच आधारवर खालील माहितीचा शब्द नि शब्द अवलंबेल अशी सावधानता आम्ही बाळगली आहे. हवें त्यास ती माहिती पडताळून पाहता यावी, यास्तव प्रथमतः आधारांचा हा सर्वसामान्य

उल्लेख करून ठेवतो. माहिती जशीच्या तशीच देताना आमच्या स्वतःच्या टीकटिपणी देणेंच तर अशा ( ) कंसात देऊ.

## १६.२ पवित्र कुराणाची थोडी रूपरेखा

कुराण शब्दाचा अर्थ 'पढण्याचे', 'पाठ्य' असा किंवा 'संचय' असा आहे. वेळोवेळी ईश्वराकडून पाठ्य म्हणून महंमदसाहेबांस जे संदेश आले, ते त्रुटित संदेश ज्यात एकत्र केले तो संचय, संग्रह, म्हणजे कुराण. पैगंबर म्हणजे पैगाम (संदेश) आणणारा, ईश्वरीय संदेश आणणारा, ईशप्रेषित. कुराणाचे अध्याय ११४ आहेत. त्यांस सूरा म्हणतात. प्रत्येक अध्यायात जे श्लोक असतात, त्याला 'आयत' म्हणतात. कुराणाच्या निरनिराळ्या सात मूळ प्रती तरी प्रख्यात होत्या; दोन मदिना पंथी, तिसरी मक्का पंथी, चौथी कूफा येथे प्रचलिलेली, पाचवी बास्त्रा येथे सन्मानिलेली, सहावी सीरियातील, सातवी सर्वसाधारणतः प्रचलित. या प्रतींतील श्लोकसंख्या विभिन्न आहे. एकीत ६००० श्लोक, तर एकीत ६२३६.

ज्यू लोकांप्रमाणेच मुसलमानांनीही कुराणातील शब्द ७७६३९, अक्षरें ३२३०१५ अशीं मोजून ठेवलीं आहेत; इतकेंच नव्हे, तर प्रत्येक अक्षर कुराणात किती वेळ आलें, तेही मोजलेलें आहे. अर्थातच ह्या संख्या विवादास्पद समजणारेही आचार्य आहेतच.

कुराणाच्या काही अध्यायांच्या आरंभी रूढ अर्थ नसलेंली दोनचार अक्षरें असतात. यांच्या हेतूविषयी, ज्यू लोकांच्या धर्मग्रंथांप्रमाणेच मुसलमानी धर्मशास्त्री मतभेदाच्या जाळ्यात सापडलेले आहेत. काही म्हणतात, या अक्षरांचा अर्थ एका ईश्वरासच माहित! किंवा महंमद पैगंबरास!! इतर ते न मानता त्यांचा यथामती अर्थ करतात. प्रत्येक जण आपलाच अर्थ खरा ईश्वरी अर्थ मानतो. उदाहरणार्थ, काही अध्यायांच्या आरंभी 'अ, ल, म' हीं तीन अक्षरें येतात. काही आचार्य म्हणतात यांचा अर्थ मनुष्यांनी करूच नये. एक ईश्वर की पैगंबर तो जाणत! दुसरा पंथ म्हणतो, छट् अर्थ केलाच पाहिजे नि तो हाच की 'अल्लाह, लतीख, मजीद' या शब्दांचीं ती तीन आद्याक्षरें असून अर्थ आहे 'ईश्वर कृपाळू नि गौरवार्ह आहे!' तिसरे म्हणतात, ती आद्याक्षरें 'अनालिमिनी' हें वाक्य सुचवितात - ज्याचा अर्थ 'मला नि माझ्यापासून (सर्व पूर्ण नि शुभ प्रभवते!)' चौथे म्हणतात- ते वाक्य 'अना अल्ला आलम' नि तो अर्थ 'सर्वत्र ईश्वर ते मी!' हाच आहे. पाचवे म्हणतात- तीं सारीं आद्याक्षरेंच नव्हेत! अल्ला-जेब्रियल-महंमद ह्या कुराणाच्या कर्त्या, प्रकटित्या, प्रचारित्या त्रयींचें ते द्योतक असून पाहिलें आद्याक्षर, दुसरें अंत्याक्षर नि तिसरें उपांत्यक्षर त्या त्या शब्दांचें अनुक्रमें घेतलें पाहिजे. म्हणजे अ, ल, म, येतील! सहावे म्हणतात- अ हा मूळ स्वर, ल हा तालव्य, नि म हा ओष्ठ्य मिळून सुचवितात की, ईश्वर सर्व जगाचा नि कर्माचा आदी, मध्य, अंत आहे नि त्या अर्थी आदीमध्यअंतीं सर्व कामी स्मरला जावा! सातवा पंथ म्हणतो- हीं अक्षरें संख्यावाचक, त्यांची बेरीज येते ७१, नि ती सुचवितात, की इतक्या वर्षांत इस्लामी धर्म साऱ्या जगात पूर्णपणे प्रस्थापित होईल. अशीं अनेक मते अनेक अर्थ करतात.

(ईश्वरीय धर्मग्रंथ अक्षरशः जरी एकच असला तरीही अर्थतः पुरुषबुद्धी वास्तविकपणे त्याचे अनेक विभिन्न ग्रंथ कसे करून सोडते, याचें हें किती सुरेख उदाहरण आहे? तीन अक्षरें, तीस अर्थ!)

कुराणाच्या अध्यायांची नावें नि मंगलारंभ - वाक्यें हीं काही धर्मशास्त्रांच्या मते कुराणातील अध्यायांप्रमाणेच थेट ईश्वरोक्त आहेत; तर काही धर्मशास्त्री मुसलमानांच्या मते तीं ईश्वरोक्त नसून मनुष्यकृत आहेत!

मुसलमानी परंपरागत मुख्य शास्त्रोक्त मताप्रमाणे कुराण हा ग्रंथ महंमदाने वा कोणीही मनुष्याने रचलेला नाही. तो अनादी आहे. इतकेंच नव्हे तर ईश्वरानेदेखील रचलेला वा सांगितलेला नसून ईश्वरकृत व्यक्तीत्वातच अंतर्भूत आहे. त्याची पहिली प्रतदेखील नाही, तर ईश्वरमयच आहे. त्याची पहिली प्रत अशी जी लिहिली गेली, ती ईश्वराच्या सिंहासनावरील एका विशाल टेबलावर असून यच्चयावत् स्वर्गात ग्रथिलेलें आहे. त्या ईश्वरीय टेबलावरील कुराणाची एक कागदी प्रत देवदूत जेब्रियलच्या हाती सगळ्यात खालच्या स्वर्गात धाडण्यात आली, त्या रात्रीचें नाव 'शक्तीमती' होय. त्या कागदी प्रतीतील कुराण त्या जेब्रियिल देवदूताने महंमद पैगंबरास भागशः प्रकटविलें. काही मक्केत, काही मदिनेत, जसजसा प्रसंग पडला तसतसे वेळोवेळी लिखित भाग पैगंबरास जेब्रियलकडून स्फुरविले गेले. परंतु ते सर्वच्या सर्व दिव्य पुस्तक बघण्याचें भाग्यही महंमद पैगंबरास जेब्रिलयच्या कृपेने वर्षाच्या काठी एकदा लाभे. रेशमी बांधणी, सोनेरी कलाकुसरीत स्वर्गीय हिरेमाणिकांनी खचलेलें असे ते दिव्य पुस्तक होते!

यद्यपी वरील मताप्रमाणे कुराण अनिर्मित नि अनादी आहे आणि प्रत्यक्ष कुराणात महंमद पैगंबरारने तसे न मानणाऱ्यास पाखंड म्हटलेलें आहे, तरीही प्रत्येक महत्त्वाच्या धर्मप्रश्नाप्रमाणे या प्रकरणीही मुसलमानी धर्मशास्त्र्यात तीव्र मतभेद व्हावयाचा तो झालाच! मोटाझलाइट आणि मोझदोरचे अनुयायी हे दोन्ही प्रबळ इस्लामी पंथ ह्या मताच्या सर्वस्वी विरुद्ध असून त्यांच्या मते कुराणास अनादी, ईश्वरमय नि अनिर्मित मानणें हं भयंकर पाप आहे, पाखंड आहे. या प्रकरणीच्या कुराणवाक्यांचा ते असा वरच्याच्या अगदी उलट अभिप्राय काढतात! हा मतभेद इतका विकोपाला गेला की, अलमामून खलिफांच्या राजवटीत कुराण हें अनादी नसून निर्मित आहे, अशी धर्माज्ञा सुटली नि जो कुराणास अनादी, अनिर्मित मानील त्यास फटके, बंदीवास नि मृत्यूदंडही देण्यात आला. शेवटी अलमोतावक्केले खलिफाने उभयपक्षांस आपापलें मत पाळण्याचें स्वातंत्र्य दिलें.

कुराण ज्या भाषेत लिहिलेलें आहे, ती अरेबी भाषाशैली अरबांत इतकी सर्वोकृष्ट मानण्यात येते की, केवळ त्यावरूनच ते पुस्तक मनुष्यकृत नसून ईश्वरकृत असलेंच पाहिजे, असे सिद्ध करण्याचा ते यत्न करतात. कुराणातच पुन्हा पुन्हा ते गमक पुढे करून अशा अर्थाचीं वाक्यें आलेलीं आहेत की, 'जे प्रतिपक्षी महंमद पैगंबरांना ढोंगी म्हणतात, तोच कुराणवाक्यें रचतो नि तशी वाक्यें अनेक अरबी कवी तशाच भाषाशैलीतही रचू शकतात म्हणून जल्पतात त्यांस आम्ही आव्हानीतो कीं, तुम्ही इतकें सुंदर अरेबी लिहून दाखवा, अशीं काव्यमय वाक्यें रचून दाखवा!' ज्या अर्थी कुणीही असे उत्तम अरेबी लिहू शकत नाही त्या अर्थी हें कुराण ईश्वरोक्तच असलें पाहिजे! कुराण मनुष्यकृत नसून ईश्वरीय आहे, ह्याचा बळकट पुरावा हाच की, त्यातील अरबी भाषाशैली अतुलनीय आहे!

(पण ह्या कोटिक्रमाने महंमद पैगंबर उत्कृष्ट अरबी कवी होते इतकेंच काय ते तर्कसिद्ध होईल. मुसलमानांतील मीटाझलाईट, मोझदोर, नि नोधम हे धर्मशास्त्रीय पंथसुद्धा वरील मतास उपाहासून उघडउघड प्रतिपादितात की, ‘कुराणाइतकीच काय, पण त्याहून उत्कृष्ट अरबी भाषाशैली मनुष्य लिहू शकतो.’ तिसरी गोष्ट अशी की, या कोटिक्रमाप्रमाणेच जर उत्कृष्ट अरब भाषाशैली आहे म्हणून कुराण ईश्वरीय, तर उत्कृष्ट संस्कृत भाषाशैली वा उत्कृष्ट मराठी, बंगाली, तामीळ, जर्मन, ब्रह्मीशैली असलेले ग्रंथही ईश्वरीयच मानावे लागतील.)

कुराण महमद पैगंबरास कसें प्रकटलें? महंमद पैगंबर सरासरी ४०वर्षांचे असता एका गुहेत ईश्वरध्यानी मग्न होते. तो जेब्रियल देवदूत मनुष्यरूपे आला नि म्हणला, ‘जो तुझा धनी, त्या कृपाळू ईश्वराने लिहिलेलें हें वाच!’ महंमद म्हणाला, ‘पण मला तर अक्षरही न लिहिता येते न वाचता!’ तेव्हा महंमद पैगंबरांना अंत:प्रेरणेने ईश्वरी संदेश येऊ लागला. ते जसे येत तसे महंमद उच्चारीत, त्यांचे शिष्य पाठ करीत, काही लिहून काढीत. असे वीस वर्षे चालून जेव्हा ६५ व्या वर्षी महंमद पैगबंर परलोकवासी झाले, तेव्हा त्या वेळेपर्यंत वेळोवेळी आलेले जे संदेश - त्या काळी अरबांत कागद फारसे प्रचलित नसल्याने - कातडी आणि खजुरीची पानें यांवर लिहिले गेले नि अस्ताव्यस्त असे एका जागी होते ते संग्रहण्यात आले. ते नि तोंडी होत ते मिळून एकत्र करून महंमदाचा प्रत्यक्ष शिष्य नि उत्तराधिकारी अबुबकर याने काही व्यवस्थितपणे एका ग्रंथात गोवले, तेच कोराण. महंमदाचे प्रथम शिष्य बहुधार लढायांतून मारले गेल्यामुळे जेव्हा हें कुराण ग्रंथिलें तेव्हा पुष्कळ वाक्यें गळलीं, स्थलकाळांचा अनुक्रम राहिला नाही. या ग्रंथात नसलेली महंमद पैगंबराचीं अनेक वाक्यें त्या इतरांना आठवत ते या ग्रंथास त्या प्रकारात अपूर्ण ठरवू लागले. याविषयी मुसलमानी धर्मशास्त्री मंडळाचें एकमत आहे.

(म्हणजे आपल्या वेदांची जी गत की कित्येक श्रृती लुप्त; मूळ श्रुतींचें संकलन व्यासांनी केले तोच प्रस्तुतचा अनुक्रम, मूळचा नव्हे; ऋषी, देवता, विषय यांचें सुसंगत एकीकरण नाही; तीच स्थिती अति अर्वाचीन असताही या कुराणाची झालेली आहे. कित्येक ईश्वरी संदेश गळलेले असल्यामुळे ईश्वरीय प्रमाणग्रंथ म्हणून त्या कुराणास मानलें तर त्याच्यातील आज्ञा तेवढ्याच ईश्वरी धर्म असे समजणें अशक्य. कारण असलेल्या आज्ञांहून भिन्न अशा आणखी काही आज्ञा ईश्वराच्या नव्हत्याच असे सांगता येत नाही.)

अबुबकरने केलेला हा ‘संग्रह’ (कुराण) महंमद पैगंबराच्या, अनेक पत्न्यांपैकी एक विधवा स्त्री हप्सा, खलिफा उमरची मुलगी, हिच्या हाती सोपवला. परंतु पैगंबराच्या मृत्यूनंतर तीसएक वर्षांच्या आतच वर दिलेल्या नाना कारणांमुळे कुराणाच्या एकास एक न जुळणाऱ्या अनेक आवृत्त्या मुसलमानी साम्राज्याच्या निरनिराळ्या भागात चालू झाल्या. जो तो आपलेंच कुराण खरें मानून दुसऱ्याच्या कुराणातील पाठभेद पाखंड, धर्मबाह्य म्हणून लागला. अबुबकरच्या प्रतीस त्याचे प्रतिस्पर्धी अबुबकरचीच पुरुषकृती म्हणून ईश्वरीय अस्खलनीयतेचा अधिकार त्या प्रतीस नाकारीत. हा सारा घोटाळा मोडून टाकण्यासाठी खलिफा (उस्मान) आथ्मन ह्याने शक्य तितक्या कुराणाच्या प्रती जमवून त्यांत हप्साच्या हातच्या अबुबकरच्याच प्रतीस धरून असेल तेवढें खरें मानावें असा हुकूम काढला! अबुबकरच्या कुराणाच्या हजारो प्रती करवून प्रांतोप्रांती वाटल्या; आणि त्यापासून जी जी वेगळे वा अधिक उणे मंत्र असणारी प्रत ती ती जप्त केली

वा जाळून टाकली! इतक्या प्रयासानंतर आजची कोराणाची प्रतच खरी ईश्वरीय नि सर्वसामान्य प्रत ठरली.

पण तरीही आजदेखील बरेच पाठभेद इस्लामी धर्मशास्त्रांच्याच मते अस्तित्त्वात आहेत.

इतक्याने भागलें नाही. परस्परविरुद्धता टाळण्यासाठी विभिन्न प्रती तितक्या जाळून टाकून प्रत अशी एकच ठेवली तरी देखील तिच्यात वर लिहिल्याप्रमाणे काही पाठभेद आले ते आलेच. पण त्याहीपेक्षा अधिक अडचणीची नि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या ईश्वरीय ठरविलेल्या अनन्य प्रतीतच अनेक परस्परविरुद्ध वचनें महंमद पैगंबरांच्याच तोंडचीं अनिवार्यपणें आलेंली आहेत. पैगंबराने एके दिवशी देवाचा म्हणून संदेश देवाचा म्हणूनच महंमद पैगंबरांनीच सांगावा. प्रामाणिक शिष्यांनी शब्द न्शब्द त्या त्या वेळी टिपावा. पण त्यामुळेच लवकरच, ह्या दोन परस्परविरुद्ध आज्ञा देवाने द्याव्या - सर्वज्ञ देवासही आपलीं मते मनुष्यासारखीं भिन्नभिन्न परिस्थितीत बदलावीं लागावीं - ह्याचें महंमदाच्या प्रतिपक्षासच नव्हे तर अनुयायांसही आश्चर्य नि संदेह वाटू लागला! प्रतिपक्षी तर उघड म्हणत की, ह्यावरूनच हा कुराणग्रंथ  भूतभविष्यवर्तमान जाणणाऱ्या सर्वज्ञ देवाचा नसून त्यावर मनुष्यकृतत्त्वाचा छाप स्पष्ट उमटलेला दिसतो! (एका परिस्थितीत महंमदाच्या सत्तेस नि हितास जे अनुकूल ते त्याने देवाची आज्ञा म्हणून सांगितलें. दुसऱ्या परिस्थितीत तो नियम त्याच्या सत्तेवरील भिन्न संकटांच्या परिस्थितीत अहिताचा होऊ लागताच महंमद पैगंबराने उलट नियम सांगून ती देवाची ताज्यातली ताजी आज्ञा म्हणून प्रचलविली.) सर्वज्ञ देव जर ते कुराण लिहिता तर प्रथमच आपली पहिली चुकीची आज्ञा देता ना किंवा सांगूनच ठेवता की, काही काळाने अमुक परिस्थिती येताच मी उलट आज्ञा देणार आहे, तोपर्यंत ही पहिली पाळावी. म्हणजे परस्पविरुद्धता होती ना, देवपणास ते अधिक साजते. पण ज्या अर्थी तसे न सांगता पहिली आज्ञा त्रिकालाबाधित धर्म म्हणूनच सांगितली, नि नंतर, ते चुकलें हें दुसरें मी सांगतो ते पहिल्याच्या उलट असलेलेंच त्रिकालाबाधित होय असे सांगावें लागलें, त्या अर्थी देवास असा मनुष्यसारखा गोंधळ्या बुद्धीचा किंवा लहरी मानण्यापेक्षा हें सारें कुराण मनुष्यकृतच आहे असे मानणें देवाच्या खऱ्या भक्तांना भाग आहे.' महंमद पैगंबरांनाच प्रतिपक्षाचा हा हल्ला परतविणें स्वतः त्यांच्या विद्यमानतेतच कठीण गेलें. त्याचें प्रत्युतर ते इतकेंच देत की, 'मी त्यास काय करू? देवाला वाटलें अशी उलट आज्ञा आता द्यावी! त्याने दिली! देवाचा हात कोण धरील? तो वाटेल ते सुलट सांगेल, वाटेल ते उलट! कारण खरोखर देव सर्वशक्तीमान्नि स्वतंत्र आहे!' (मुसलमानांतील अत्यंत शब्दनिष्ठ धर्मशास्त्रीही या परस्परविरुद्ध कुराणवाक्यांचें स्पष्टीकरण वरच्या उत्तरावाचून अधिक सुसंगतपणे करू शकत नाहीत.)

कुराणातील प्रत्यक्ष पैगंबराच्याच तोंडचीं परस्परविरुद्ध वचनें जीं वर उल्लेखिलेलीं आहेत तीं तशीं परस्परविरुद्ध आहेत याविषयी बहुतेक इस्लामी आचार्यांचेंच नव्हे तर स्वतः पैगंबरांचेंच ऐकमत्य आहे. बरें, तीं दोनतीन अपवाद म्हणूनच नव्हेत तर इस्लामी धर्मशास्त्री हेच त्या वचनांची संख्या कमीत कमी दोनशेतीसवर आहे असे मानतात. उदाहरणार्थ, पूर्वी मुसलमानास पैगंबराच्या तोंडी देवाने आज्ञा धाडली की, तुम्ही सर्वांनी जेरुसलेम (ज्यू लोकांची काशी) कडेच तोंड करून प्रार्थना म्हणाव्यात. हा नियम अल्पकालिक आहे असेही सांगितलें नाही. इतर सर्व फर्मानांप्रमाणे ही आज्ञाही त्रिकालाबाधितशी, सर्वत्र सर्वथा उनुल्लंघनीय धर्मशी, तशा इतर

आज्ञांच्याच डौलात नि भाषेत प्रथम दिलेली आहे. परंतु त्यापुढे कित्येक वर्षे लोटल्यानंतर देवाने दुसरी आज्ञा अगदी पहिलीच्या उलट दिलीं की 'जेरुसलेमकडे तोंड करून प्रार्थना न करता प्रत्येक सच्च्या भक्ताने, मद्धर्मीयाने मक्केकडे तोंड करून प्रार्थना कराव्यात.' (कुराण देवकृत मानलें की विरोध विसंगत भासतो! ते कुराण मनुष्यकृत मानलें की या दोन प्रार्थनांत काहीच आक्षेपार्ह भासत नाही. कारण प्रथम मक्केत जुन्या अरबी धर्माचे मूर्तीपूजक लोक प्रबळ असत त्यांनी महंमदाचें उच्चाटन करून त्यास देशोधडीस धाडलें होतें. ते जोवर मक्केचे धनी होते तोवर महंमदाच्या धर्माच्या त्या शत्रूंचे ते केंद्र होते. म्हणून मक्ककडे तोंड करून प्रार्थना करणे महंमदास  पसंत नसे. पण पुढे मक्का महंमदाने जिंकली. आधीच क्षेत्र होती, जी मूलभूमी, जन्मभूमी, ती मक्का त्याच्या हातात पडताच तीच त्याच्या इस्लामी धर्माची राजधानी नि पवित्र क्षेत्र झाले. म्हणून मग यच्चयावत्मुसलमानांनी, त्यांच्या धर्मराष्ट्रास एकसूत्री, एकमुखी, एकजीवी करण्यासाठी जी एकरूप प्रार्थना करावी हेंही बंधन घातलें.) ज्या मुख्य धर्मग्रंथाच्या घटनेमध्येही इतक्या संदेहोत्पादक न्यून्यता आहेत, त्यास अविकल, अशंकनीय, नि अनन्य ईश्वरीय ग्रंथ मानणें हें त्यांच्या एकनिष्ठ अनुयायांसही कठीण होऊन ती न्यूनता भरून काढण्याच्या कामी शेवटी पुरुषबुद्धीचें साहाय्य कसें घ्यावें लागलें आणि पुरुषबुद्धी म्हटली की, 'श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना:' जशा होऊन पडणारच, पडतातच, तसेच मूळ कुराण कोणाचें, कोणचे श्लोक खरे, कोणची प्रत पूर्ण, कोणत्या पाठभेदात कोणाचा अर्थ ग्राह्य ह्याविषयी भिन्न निर्णय देणाऱ्या आचार्यांच्या संख्येइतकीच वास्तविक रीत्या कुराणेंही अनेक होऊन बसलेलीं आहेत.

आणि जी स्थिती कुराणाच्या मूळ घटनेची तीच त्यातील प्रत्येक वाक्याच्या अर्थाविषयीची. एकाच वाक्याच्या वा विधेयाच्या अनेक इस्लामी आचार्यांच्या पंथोपपंथातील विभिन्नतेची ती अत्यंत उपयुक्त अशी माहिती या लेखाच्या उत्तरार्धात देऊ.

## १६.३ *(उत्तरार्ध)*

पवित्र कुराणाविषयी सर्वसामान्य हिंदू वाचकांनी आणि मुसलमानांनीही ज्या ऐतिहसिक घटना ध्यानी ठेवण्यासारख्या आहेत त्यांपैकी या लेखात पूर्वार्धात ज्या विशदिल्या त्यांचें लहानसें टाचणें असे -

(१) ईश्वराने जे संदेश आपल्याला धाडले असे महमंद पैगबरांना वाटलें ते सारेच सारे त्या वेळी टिपले गेले नसल्यामुळे आणि अनेक गहाळ झाल्यामुळे पैगंबरांच्या मृत्यूनंतर अबुबकरने संग्रहिलेलें आजचें कुराण हें अपूर्ण आहे.

(२) ह्या अपूर्ण कुराणातही अनेक ईश्वरी आज्ञा परस्परविरुद्ध असून, मागची आज्ञा सांगूनसवरून देवाने रद्द करावी आणि उलट आज्ञा धाडावी अशी दीडशेदोनशे उदाहरणें आहेत. यावरून या अपूर्ण कुराणात ज्या आज्ञा आहेत, त्यांनाही रद्द करणाऱ्या आज्ञा त्या लुप्त झालेल्या नि गाळलेल्या भागात असण्याचा पुष्कळ संभव! यासाठी आहे हें कुराणही काही पंथांच्या मुसलमानी आचार्यांच्या मते विश्वासार्ह नाही.

(३) यामुळेच अबुबकरच्या या प्रतिपासून भिन्न अशीं सातआठ कुराणें प्रचलित होतीं.

(४) या सातआठ कुराणांपैकी अमकीच प्रत खरी हें ईश्वराने प्रत्यक्ष कोटिक्रमाने सांगितलें नाही, तर उस्मान खलिफाने आपल्या दंडशक्तीच्या लाठीक्रमाने शेवटी पुरुषबुद्धीस पटली म्हणून अबुबकरचीच प्रत खरी ठरविली आणि बाकीच्या जाळून वा जप्त करून टाकल्या. ती प्रत सुनीपंथाने स्वीकारली.

(५) पण इतकें झाले तरी ह्या सुनीपंथाचीं तत्त्वें मान्य नसणाऱ्या शियाप्रभृती मोठमोठ्या मुसलमानी पंथांनी तो निवाडा मानला नाही. आजचें सुनीं मुसलमानांचें कुराण हें सुनींनी गाळागाळ केलेलें नि प्रक्षिप्त लिखाणाने भेसळलेलें अतएव अविश्वसनीय प्रत होय असे शियाप्रभृती पंथांचे अनेक मुसलमानी आचार्य उघडउघड म्हणत आले आहेत. उलटपक्षी खरें कुराण आपल्याशी आहे, असे जे शियाप्रभृती पंथातील लोक म्हणाले त्यांचें खरें कुराण हेंच खोटें, त्या पंथांनी भेसळलेलें अतएव अविश्वसनीय होय असे सुनी लोकही त्यांस उलट प्रत्याक्षेपितात. म्हणजे सर्व मुसलमानांस सर्वस्वी ईश्वरप्रदत्त नि ईश्वरोक्त वाटणारें कुराण एकही अस्तित्वात नाही.

(६) सुनींची जी प्रत आज कुराण म्हणून सुनींकडे सन्मानली जाते तीतही अनेक पाठभेद असल्याचें मुसलमानी धर्मशास्त्री निर्विवादपणे मानतात.

सारांश असा की, कुराण हें नाव जरी एक उरलें तरी त्या नावाच्या ईश्वरदत्त ग्रंथाची खरी प्रत कोणती हें पुरुषबुद्धीनेच ठरवावें लागलें. त्यामुळे भिन्न प्रती भिन्न आचार्यांनी खऱ्या ठरविल्या. म्हणजे कुराणें वास्तविकपणे अनेक झालीं. शब्दशः पाहिलें तरी कुराणांची एकवाक्यता नाही.

आता अर्थशः पाहू लागले तर घोटाळा शतपटीने वाढलेला! कारण शब्दशः जी मते एक पंथ मानतो तींतील शब्द जरी सारखे असले तरी त्या प्रत्येक शब्दाचा नि वाक्याचा अर्थ लावण्याचें काम पुन्हा पुरुषबुद्धीकडेच आल्याने एकेका प्रतीचे शेकडो अर्थ होऊन शेकडो उपपंथ झाले. त्यातील प्रमुख असे -

## १६.४ हानीफाई *(सुनी)*

या उपपंथाचें नाव त्याचा प्रमुख आचार्य जो हानीफा त्याच्या अभिधानावरून पडलें आहे. महंमद पैगंबराच्या 'स्मृती' ह्या पंथास जरी अमान्य नसल्या तरी त्यांस हा पंथ शब्द नि शब्द अनुसरत नाही.

## १६.५ शफाई सुनी

हा पंथ शफी ह्या आचार्यांचा अनुयायी. मुसलमानी श्रुती (कुराण) आणि स्मृती (पैगंबराविषयीच्या आख्यायिका नि त्याचीं स्वत:चीं वचनें) यांच्या कक्षेत पुरुषबुद्धीला मुळीच स्वातंत्र्य नाही. शब्द नि शब्द परमप्रमाण असे यांचें मत. आचार्य शफी अमकी गोष्ट खरी वा खोटीं हें सांगतांना देवाची शपथ केव्हाही घेत नसत.

## १६.६ मालेकी सुनी

या पंथाचा आचार्य मालेक. ज्या प्रश्नाविषयी कुराण नि पैगंबराच्या आख्यायिका यांतील शब्दांत स्पष्ट अभिप्राय नाही, त्या त्या प्रश्नाविषयी मालेक काहीच मत देत नसे, इतकी या पंथाची शब्दनिष्ठ प्रवृत्ती आहे. त्याच्या अंतिम रोगशय्येवर तो पडला असता त्यास रडताना पाहून जेव्हा अनुयायांनी विचारलें तेव्हा आचार्य मालेक म्हणाला, 'कुराण वचनें ह्यांच्या बाहेर मी स्वत:च्या मते काही निर्णय केले तर नाहीत? या चिंतेने मी व्याकूळ आहे. शास्त्राज्ञेबाहेर जर मी कधी स्वत:च्या मताने वागलो असेन वा निर्णय दिला असेल तर तशा प्रत्येक स्वैर शब्दासाठी देव मला चाबकाच्या तितक्या फटक्यांनी झोडपून काढो!!'

## १६.७ हानबाली सुनी

पैगंबराच्या वचनादी आख्यायिकांचा हा पंथ अत्यंत अभिमानी. ह्याचा आचार्य हानबाल. ह्याला पैगंबराच्या अशा दहा लक्ष आख्यायिका मुखोद्‌गत असत अशी त्याच्या अनुयायांत प्रसिद्धी आहे! कुराण हें अपौरुषयच नव्हे तर अनादी, अनिर्मित नि स्वयंसिद्ध असून ते ईश्वराने देखील निर्मिलेलें नाही, तर ईश्वरमयच आहे अशी ह्या हानबल आचार्यांची शिकवण होती. कुराणास ईश्वरमयच समजणें हें धर्मबाह्य पाखंड होय अशा मताच्या मोटारास खलिफाने हानबल ह्यास कुराण हें ईश्वरमयच होय असे शिकविण्याची मनाई केली असताही जेव्हा ते मत हानबल सोडीना, तेव्हा त्यास फटके मारून रक्तबंबाळ करून बंदीत घातलें. हानबाली पंथ कट्टर कर्मठ. एकदा तर त्यांनी बगदाद राजधानीत बंड करून जे मुसलमान कुराणातील आज्ञांच्या पालनात कर्मठ नाहीत असे त्यांस वाटलें, त्यांच्या घरोघर घूसून त्यांच्या मद्याचे साठे ओतून टाकले. मद्यपात्रें फोडून टाकिलीं, गाण्यानाचण्यास निषिद्ध ठरविणाऱ्या स्त्रियांना बेदम मार दिला नि वाद्यांचा चुराडा उडविला. मुसलमानी धर्माविषयीचीं ह्या पंथाचीं इतकीं कर्मठ मते मान्य नसलेल्या त्यांच्या मुसलमानी प्रतिस्पर्ध्यांना शेवटी ह्या पंथाविरुद्ध अत्यंत कडक उपाय योजावे लागले आणि अत्यंत कठोर दंड देऊन त्यांना दडपावें लागलें. हा पंथ, त्याचीं मते नि असा कर्मठपणा न मानणाऱ्या मुसलमानांसही पाखंड नि पतित समजून ते सारे नरकात जातील असा शाप देतो नि त्यास शक्य ती शिक्षा करावयास सोडीत नाही.

परंतु या चारी सुनी पंथांत, स्मार्तांत, कुराण नि आख्यायिका यांच्या प्रामाण्याविषयी जी वरकरणी एकवाक्यता आहे तीदेखील यापुढे दिलेल्या पंथास अभिप्रेत नसून तत्त्वत:च ते स्वतंत्र आहेत. सुनी वर्गात न मोडणाऱ्या पंथांतील काही प्रमुख पंथ असे -

## १६.८ मोटाझली

ह्या पंथाचा प्रवर्तक वासेल. ह्याच्या मते ईश्वर एकच असल्यामुळे त्या एकतेस विशेषणांच्या अनेकतेने देखील बांधविणें पाप आहे, ईश्वर आहे, अस्तिसत्, ह्यापलीकडे त्याला चित्प्रभृती इतर गुणधर्म विशेषणे लावता कामा नयेत. त्यांच्या अखंड स्वरूपास त्यामुळे खंड पडतो. चित्प्रभृती भिन्न गुणधर्म एकाच अनंत, अखंड, एकरस पदार्थास कसे लावता येतील! त्यायोगे एकाहून

अधिक असीम पदार्थ मानल्याचा दोष घडतो, एकेश्वरी धर्माच्या हें विरुद्ध आहे. त्यांचें दुसरे विशिष्ट मत असे की, नियतिवाद खोटा आहे. ईश्वर जे चांगलें आहे, त्याचाच काय तो कर्ता; जे वाईट त्याचा तो कर्ता नव्हे. तिसरें मत हें की चांगलें किंवा वाईट म्हणण्याचें इच्छास्वातंत्र्य मनुष्यास आहे. त्यांचे मते प्रलयकाली शेवटच्या दिवशी साऱ्या जगाचा जेव्हा न्याय करण्यात येईल तेव्हा ईश्वर आपल्या चर्मचक्षूंनी मनुष्यास पाहता येईल हें म्हणणें खोटें आहे. ईश्वराला दिलेल्या साकार उपमा ते अवमानितात - मग त्या कुराणात का असेनात! या आणि अशाच प्रकारच्या अनेक मतांचा कुराणांस अक्षरशः प्रमाण नि सत्य मानणाऱ्या धर्मशास्त्राच्या मतांशी भयंकर विरोध आल्यामुळे ह्या पंथाच्या लोकांचें तोंड पाहणें नको, असे कट्टर कर्मठास वाटू लागावें हें साहजिकच होते. हें मोटाझली लोकही तितकेच जहाल नि त्यांच्या मते होणाऱ्या कुराणाच्या अर्थी धर्मनिष्ठूर! त्यामुळे हेही इतर मुसलमानी पंथाचें कट्टर शत्रू बनले. हळूहळू वासेलच्या ह्या नव्या पंथात सुद्धा पुन्हा पोटभेद पडत चालले. त्यातील महत्त्वाचे काही भेद असे -

**(१) हशेमियन** - हे हाशेमचे अनुयायी. यांचें एक मत आहे की, ज्या अर्थी ईश्वर हा वाइटाचा कर्ता होऊच शकत नाही, त्या अर्थी वाइटातली वाईट वस्तू जे काफर, मुसलमानी धर्मावर न विश्वसणारे, त्यांना देव घडवील हेंही संभवत नाही. जे मुसलमान नाहीत तीं सारीं माणसें असलीं तरी कुराणास एकमेव ईश्वरोक्त परमप्रमाण धर्मग्रंथ न मानणारे आणि महंमद पैगंबर हाच अंतिम देवप्रेषित असा विश्वास न ठेवणारे काफर असल्यामुळे अशा अत्यंत पापी पदार्थांस देव कसा निर्मील? देवाच्या देवपणास ते लांछन होईल, यास्तव मुसलमान नसलेल्या साऱ्या काफरांना देवाने निर्मिलें नाही.

**(२) नोधेमियन** - ह्यांचें एक दाखल्यापुरते मत द्यावयाचें तर हें देऊ की, ईश्वर सर्वशक्तीमान जर आहे, तर तो चांगलें तेवढें निर्मितो आणि वाईट निर्मिण्याची शक्तीच त्याला नसेल तर ईश्वर सर्वशक्तीमान ठरणार नाही! यासाठी ते म्हणतात, 'ईश्वरास वाईटही निर्मिण्याची शक्ती होती; पण  इच्छा नव्हती. म्हणून त्याने चांगलें तेवढें निर्मिलें नि वाईट निर्मिलें नाही.

**(३) हेयिटिअन** - ह्यांच्या मते ईश्वर दोन मानले पाहिजेत. एक परमेश्वर नित्य, अनंत. दुसरा ईश्वर, अनित्य, सान्त. ते पुनर्जन्मही काही अंशी मानतात आणि म्हणतात की, जीव हा जन्मापासून देहान्तर पावतो; नाना शरीरें धरता धरता जे जगाच्या अंताच्या वेळचें शरीर असेल त्या शरीरासच काय ते शेवटच्या न्यायाच्या वेळी परलोकातील शिक्षा वा भोग भोगण्यास्तव स्वर्गी वा नरकी धाडण्यात येते.

**(४) मोझदरी** - हे मोझदरी आचार्यांचे अनुयायी. ईश्वरास वाईट करण्याची शक्तीच नाही असे मानणाऱ्या धर्मशास्त्रींच्या हा पंथ इतका विरोधी होता की, सर्वशक्तीमान् ईश्वर असत्यवादी नि अन्यायीही होऊ शकतो असे हा स्पष्ट म्हणतो. त्यांच्या या ईश्वरनिंदेने इतर पंथ इतके चिडतात की, हें मत ऐकणें देखील पाप मानून 'तोबा! तोबा!' म्हणतात. कुराणातील जें वाक्य लाखो मुसलमानांत गायत्रीसारखे पवित्र मानलें जाते, ते – 'त्या एका देवावाचून दुसरा देव नाही' - हें वाक्य उच्चारणेंही हा मोझदर आचार्य धर्मबाह्य, महापाप समजतो. कारण त्यात 'दुसरा देव', हा शब्द निषेधार्थी का होईना पण उच्चारावा लागतो आणि एकेश्वरी ब्रीदाच्या कट्टर अनुयायांस तो उच्चारदेखील असह्य होतो. मोझदर म्हणे की, 'आमच्या पंथाने केलेला

कुराणाचा अर्थच खरा असल्यामुळे मुसलमान नाहीत ते तर काय पण इतर पंथांचे मुसलमान आहेत तेही कुराणाचा वेगळा अर्थ लावीत असल्यामुळे सारेचे सारे पतित, नीच नि धर्मशत्रू समजून नरकातच ढकलले जाणार!' हे ऐकून एका मुसलमानी भिन्नपंथीय आचार्याने उपाहासून मोझदाराला विचारलें की, कुराणात वर्णिलेला पृथ्वी आणि आकाश ह्यातून विस्तृत असा, तो सुविशाल स्वर्ग केवळ मोझदार नि त्याचे दोनचार अनुयायी ह्यांसाठी देवाने निर्मिला कीं काय?

**(५) बाशेरी** - हे म्हणतात, देव सर्वशक्तीमान्. यास्तव लेकराला जन्मतःच दुर्बुद्धी देऊन त्याने नरकांतच पडलें पाहिजे अशी नियति तो घडवू शकतो. पण हें कृत्य देवाने केलें तरी ते अन्यायाचें होय असे मात्र म्हणणें भाग! साऱ्या मनुष्यांस मुसलमान व्हावें अशी सद्‌बुद्धी देणें देवाच्या हाती असल्यामुळे मुसलमान नसणाऱ्या दुष्टांसाठी नरक निर्मिण्याची क्रूरता टाळणें देवाच्या हातचें होते. पण देवाने नरक निर्मिला आणि मनुष्यास इच्छास्वातंत्र्य दिलें. यावरून चांगलें तेच देवास करता येते, वाईट येत नाही, हें इतर मुसलमानी धर्मशास्त्रांचें मत खोटें पडते.

**(६) थमामी** - थमामाचे अनुयायी. हे म्हणतात, पाप्यास अनंत काळ नरकात पडलें पाहिजे. त्या छळाचा काही काळानंतर अंत होतो, हें इतर मुसलमानी आचार्यांचें मत खोटें. शेवटच्या प्रलयदिनी नुसते मुसलमान नाहीत ते मूर्तीपूजक तर भयंकर नरकात पडतीलच पडतील; पण ख्रिश्चन, ज्यू, पारशी, नास्तिक प्रभृती जो जो निर्भेळ मुसलमान नाही त्या सर्वांचा सत्यनाश करून देव त्यांस मातीस मिळवील!

**(७) कादेरियन** - देव हा केवळ चांगल्याचाच निर्माता. वाइटाचा नव्हे, असे त्यांचें म्हणणें. त्यामुळे वाइटाचा निर्माता सैतान ठरतो. म्हणजे दोन निर्माते मानले जातात. यासाठी इतर मुसलमान ह्या पंथास पारशांच्या द्वैताचें पाखंड मानणारे म्हणून पतित समजतात.

## १६.९ सेफेशियन

ह्या पंथाचेही नाना पोटभेद आहेत. विस्तारभयास्तव दोनचारच देऊ.

**(१) आशारियन** - ह्यांच्या मते ईश्वराचे अनेक गुणधर्मच नव्हेत तर रूपवर्णनही सांगणें धर्म्य आहे. ज्या अर्थी कुराणात 'ईश्वर सिंहासनावर बसतो. ईश्वर म्हणतो माझ्या हाताने मी निर्मितो, माझ्या दोन बोटांत विश्वासू लोकांचे हृदय आहे' इत्यादी शेकडो वाक्यें आहेत त्या अर्थी तीं खरी मानलींच पाहिजेत. तें वर्णन केवळ आलंकारिक कसें म्हणावें? तसे असते तर कुराणात तसे स्पष्टपणे सांगितलें असते. यास्तव ईश्वराला हात, बोटें, प्रभृती अवयव आहेत, पण ते कसें ते कोणी सांगू नये, फार काय कुराण पढतेवेळी 'माझ्या हाताने मी त्यास निर्मिलें' हें ईश्वराचें वाक्य वाचताना जर कोणी आपला हात पुढे करून अभिनयिलें तर तेदेखील पाप होय. कारण ईश्वराचा हात मनुष्यासारखाच आहे, असे त्यायोगे सूचीत होते! इतकेंच नव्हे, तर कुराणातील अरबी, शब्द, जे हात, पाय, बोटें प्रभृती ईश्वरी अवयवार्थी योजले त्याचें भाषांतर इतर भाषेत हात, पाय, बोटें असे न करता ते अरबी शब्दच वापरावे. न जाणो त्यांचा दैवी अर्थ प्राकृत परभाषेत चुकेल! देव मनुष्याकृती आहे असे म्हणण्याचें महापाप घडेल!

**(२) मूशाबेही** - यांस वरील मत मान्य नाही. कुराणातील ईश्वराच्या तोंडच्या वाक्यांत जे शब्द येतात ते अक्षरशः सत्य मानावे, देव मनुष्याशी अगदी असदृशच आहे असे मानण्याचें कारण नाही. त्याला अवयव आहेत, वरखाली जाणेंयेणें इतकेंच काय, पण मनुष्यरूप धरणें हेंही देवास शक्य आहे. जेब्रियल हा देवदूत मनुष्यरूप धरी असे स्वतः महंमद पैगंबर सांगतात आणि तसे स्पष्ट म्हणतात की, 'मला देव एका अत्यंत सुंदर स्वरूपात दिसला. मोझेसबरोबरही तो समक्ष येऊन बोलला.' कुराणातील अशा अनेक वाक्यांचा अर्थ अक्षरशः न घेणें हेंच महपाप होय.

**(३) केरामियन** - ह्या पंथातील लोक कुराणातील देवाच्या वर्णनातील अर्थ शब्दशः घेताना इतकें पुढे जातात की, देव हा साकार, सावयव आणि खाली वर, बाजूंनी, समऱ्यादही असलाच पाहिजे. काही जण म्हणतात, तो वर अनंत असला तरी खालच्या बाजूने तेवढा मर्यादित आहे. नाही तर देव खाली आला, बसला, इत्यादी कुराणांतील वाक्यें लटकीं पडतील. देवास मनुष्याला हाताने स्पर्शिता येते, अगदी या चर्मचक्षूंनी पाहता येते. त्याहीपुढे जाऊन ह्या पंथातील काही आचार्य कुराणाच्या आधारे असे ठरवितात की, हात, पाय, डोकें, जीभ, प्रभृती अवयव नि शरीर जरी देवास असले तरी मनुष्याच्या शरीराहून थोडे विभिन्न आहेत. कारण मस्तकापासून वक्षःस्थलापर्यंत ते भरीव नाही, वक्षःस्थलापासून खाली भरीव आहे नि त्याचे केस काळे कुळकुळीत नि कुरळे आहेत. ह्याला आधार कुराणाचा. कारण त्यात महंमद पैगंबर स्पष्टपणे ईश्वराविषयी 'देव बोलला, चालला, बसला, ईश्वराने माझ्या पाठीवर हाताच्या बोटाने स्पर्शिलें तेव्हा तीं बोटें शीळ लागलीं!' अशीं वर्णनें करतात आणि सांगतात की, 'देवाने आपल्या स्वतःच्या मूर्तीप्रमाणेच मनुष्य निर्मिला.' अर्थात् ईश्वराशी मनुष्याचें दैहिक सादृश्य न मानलें तर कुराण खोटें पडेल.

## १६.१० खारेजायी

ह्या पंथाची उत्पत्ती राजकीय प्रश्नावरून झाली. त्यांच्या मते मुसलमानी सत्तेचा नि धर्माचा मुख्य खलिफा वा इमाम असलाच पाहिजे असे नाही; जर इमाम नेमावयाचा तर जो न्याय्य नि उत्कृष्ट तोच असावा. महंमद पैगंबराच्या कोरेश वंशातील मनुष्यच खलिफा वा इमाम होऊ शकतो हें शिया मुसलमानांचें मत यांना मान्य नाही. पुन्हा खलिफा निवडण्याचा हक्क मुसलमानांच्या जमावाच्या बहुमतास नाही. खलिफा अलीचा अत्यंत द्वेष करतात, त्यास प्रार्थनेत शापतात. ह्यांच्या अशा धर्ममतांमुळे अल्लीने ह्यांची भयंकर कत्तल केली. इमाम जर दुर्वर्तनी निघाला तर त्यास पदच्युत करणे वा मारणें ही धर्म्य होय, असेही हा पंथ म्हणतो.

## १६.११ शिया

हा पंथ वरील खारेजायी पंथाच्या अगदी उलट. खलिफा अल्लीचा अत्यंत अभिमानी. यांचें म्हणणें हें की, इमाम हा धर्ममुख्य; तो कोण असावा हें ठरविण्याचा अधिकार जमावाला नाही. मनुष्याच्या मूर्ख बहुमताने त्याची निवड करणे म्हणजे अगदी दुराचारी पण बलिष्ठ माणसेंही इमाम होऊ देणें होय! ते याचा पुरावाही यथेच्छ दाखवितात. इमाम नि खलिफा ह्या पदावर अनेक दुराचारी दारुडे पापी माणसें येऊ शकलीं हें मुसलमानी इतिहासात प्रख्यात, असे त्यांचें

म्हणणें. यास्तव ते अल्लीनंतरच्या सुनी खलिफास महापापी समजून शापतात. सुनी लोक तोच उलट आहेर शियांस करून त्यांस पाखंड आणि काफर म्हणण्यासही कमी करीत नाहीत. अलीचा वंश परम पवित्र यास्तव शिया लोक त्याच्याच वंशात इमामपद देवानेच नेमलें असा विश्वास ठेवतात. पुढे अलीचे मुलगे हसन, हुसेन नि त्याच्या अनुयायांचा उच्छेद झाला करबेलाच्या लढाईत. सुनी लोकांनी त्या शियांची कत्तल केली - तोच प्रसंग ताबुताच्या रूपें आपल्या इकडे मुसलमान शोकदीन म्हणून पाळतात. तरी देखील अलीच्या वंशातील शेवटचा मुलगा अमर आहे - मारला गेलाच नाही - आणि तो परत येणार आहे अशी शियांची धर्मश्रद्धा आजही आहे. त्यांच्यातील काही पंथ अली नि त्यांचे वंशज इमाम ह्यांच्या रूपाने देवच अवतीर्ण झाला, ते देवस्वरूपच होते असे म्हणतात. ईश्वर मनुष्यरूपाचा अवतार घेऊ शकतो. साबाई लोक तर अलीला मूर्तीमंत ईश्वरच मानीत. ईश्वराचें अवतरण, 'अल होलूल' होते आणि मनुष्याच्या देहाने ईश्वर वावरतो. ईशाकी प्रभृती पंथ तर म्हणतात, अली हा स्वर्ग नि पृथ्वी यांच्या आधी अस्तित्त्वात होता; तो महंमद पैगंबरासारखाच पैगंबर होता. या शियांच्याही पुढे जाऊन सुफीपंथी लोक तर इतर अनेक मनुष्यांचें देवत्व मान्य करतात. त्यांच्यात कित्येक साधू स्पष्टच म्हणतात, 'आम्ही देवाशी समक्ष बोलतो, देव पाहतो, मीच देव आहे' अशा प्रकारचीं वाक्यें उच्चारणें हें सुनीप्रभृती एकेश्वरी मुसलमानांस किती असह्य होत होते ही गोष्ट हुसेन अल हिलाज प्रभृती अनेक जणांना - जे अशा देवाच्या साक्षात्काराची वा स्वतःच देवमय होऊन गेल्याची भाषा बोलत त्यांस ठार मारण्यात येई, या गोष्टीवरून दिसून येईल. या सूफी पंथात मोठमोठे साधू होऊन गेले, वेदान्ती होऊन गेले, ब्रह्मवादाकडे याचें तत्त्वज्ञान थोड्याफार अंशी झुकते.

शिया लोकांच्या मते, सुनी लोक जे कुराण वाचतात त्यात त्यांनी अनेक प्रक्षिप्तें घुसडून भेसळ केली असल्यामुळे मूळ सत्य कुराण ते नव्हे; उलट सुनी लोकही, मूळ कुराणात भेसळ केल्याचा आक्षेप शियांवर करतात. म्हणजे शियांचें कुराण स्वतंत्र, सुनीस ते अमान्य; सुनींचें स्वतंत्र, शियांस ते अमान्य. दुसरा अत्यंत विरोधाचा प्रश्न पैगंबरपणाचा. सुनींच्या मते मुसलमानी धर्माचें अपरिहार्य आणि मुख्यातील मुख्य लक्षण हेंच की, महंमद पैगंबर हेच शेवटचे सर्वश्रेष्ठ नि परिपूर्ण पैगंबर! त्यांनी सांगितलेल्या कुराणाबाहेर दुसरा पैगंबर नाही. पण शिया लोक हजरत अल्लीलाही महंमदासमान पैगंबर मानतात. काही पंथ तर महंमद पैगंबराहून अल्लीस श्रेष्ठ आणि काही तर देवमयच समजतात. शिया नि सुनी हे या अत्यंत मूलभूत विरोधांमुळेच एकमेकांस 'काफर' मानतात. सुनींच्या मोठमोठ्या आचार्यांच्या मताप्रमाणे शिया हे मुसलमानच नव्हेत. तोच अहेर शियाही सुनीस अर्पितात.

## १६.१२ महंमद पैगंबरानंतरचे मुसलमानी पैगंबर

वास्तविक पाहता 'माझ्यानंतर कोणताही पैगंबर येणार नाही, माझ्या पूर्वी अब्राहाम, मोझेस, जीजस प्रभृती अनेक पैगंबर - ईश्वरदूत - आले पण त्यांनी देवाचा समग्र संदेश मनुष्यास दिला नाही आणि त्यांच्या अनुयायांना त्यांनी दिले ते संदेशही यथावत्न संग्रहिता त्यांत भेसळ करून बायबल प्रभृती धर्मग्रंथ बनविले. यासाठी समग्र नि सत्य संदेश देऊन देवाने मला धाडलें. आता पुन्हा पैगंबर म्हणून कोणीही माझ्यावाचून दुसरा मानला जाऊ नये.'

असे महंमद पैगंबराने वारंवार सांगितलें असता आणि जो महंमदावाचून दुसरा पैगंबर मानील तो मुसलमन नसून महापापी होय अशी मुसलमानांतील शेकडो धर्मपंथांची प्रतिज्ञा असता, 'महंमदानंतरचे मुसलमानी पैगंबर' हें वाक्य वदतो व्याघाताचें समजलें पाहिजे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, स्वतःस मुसलमान म्हणविणाऱ्या अनेक पंथांत महंमदानंतरही पैगंबर झाले असे मानतात. ज्या पुरुषांनी महंमदानंतरही आपण पैगंबर असल्याचा, देवाने धाडलेले ईश्वरदूत असल्याचा, अधिकार सांगितला त्यांपैकी काहींची माहिती दाखल्यासाठी खाली देत आहोत-

**मोसिलेमा** - हा महंमद पैगंबराचा समकालीन. अरबांच्या एका जमातीत प्रमुख. त्या जमातीच्या वतीने महंमदास भेटावयास गेला नि मुसलमानी धर्म स्वीकारता झाला. पण पुढे आपणही ईश्वरदूत आहो, पैगंबर आहो अशी द्वाही त्याने फिरविली. त्यालाही अनुयायी मिळाले. कारण पैगंबर कोणचा खरें हें ठरविण्यास ज्याच्या त्याच्या तसे हटातटाने सांगण्यावाचून वा भविष्यावाचून कोणचेंही प्रत्यक्ष वा मापनक्षम प्रमाण मिळणेंच अशक्य! पुढे महंमद पैगंबरासारखी हा मोसिलेलमाही अरबी पद्यें रचू लागला नि देव ते मला स्फुरवितो असे प्रतिपादू लागला, महंमद पैगंबर फार चिडले. त्याला 'लुच्चा' 'तोतया' म्हणाले पण त्याचेही अनुयायी वाढू लागल्यामुळे महंमद पैगंबराच्या मृत्यूपर्यंत त्याचें काही वाकडें झाले नाही. पुढे महंमदाच्या मृत्यूनंतर अबुबकरच्या राजवटीत ह्या दोन पैगंबरात खरा कोण याचा निर्णय लागला. कोणत्या कसोटीने? देवाने काही खूण धाडली म्हणून नव्हे, तत्त्वांच्या तुलनेने नव्हे, कोणाच्याही बौद्धिक, आत्मिक वा तार्किक कोटिक्रमाने नव्हे तर निव्वळ लाठीक्रमाने! लढाईत मुसलमानांनी मोसिलेमाच्या दहा हजार सैन्याची कत्तल केली नि मोसिलेमा ठार मारला गेला, म्हणून तो खोटा पैगंबर ठरला आणि लाठी बळकट तो खरा!

**अल आस्वाद** - आणखी एका अरब जमातीचा हा मुख्य. महंमदाचा समकालीन . पूर्वी मुसलमानी धर्म स्वीकारला, पण पुढे आपणही पैगंबर व्हावें, अशी आकांक्षा धरून महंमदाप्रमाणेच दोन देवदूत ईश्वरी संदेश मला देतात असे त्याने प्रसिद्धीलें. ह्या पुरुषाने नाना प्रकारचे आश्चर्यकारक चमत्कारही करण्यास आरंभिलें. ते पाहून हाच खरा पैगंबर असे वाटणारे हजारो लोक महंमदास सोडून ह्याचे उनयायी झाले. जीं काही आश्चर्यकारक कृत्यें महंमद पैगंबर करील. त्यांास 'दैवी चमत्कार' म्हणून जे मुसलमान म्हणत, तींच तशीं नि त्याहून आश्चर्यकारक कृत्यें हा अल आस्वाद जेव्हा करू लागला तेव्हा तो मात्र 'जादू', 'हातचलाखी' करतो म्हणून तुच्छवीत; उलट अल आस्वादचे अनुयायी महंमदाच्या काही चमत्कृती कोणी सांगितल्या की त्यास 'जादू', 'लुच्चेगिरी' म्हणून महंमदावरही आरोप करीत आणि आपल्या पैगंबराने काही चमत्कृती तशाच जरी केल्या तरी त्यांना मात्र खऱ्या पैगंबरपणाच्या दैवी सिद्धी नि खुणा असे गौरवीत. हा गडबडगुंडा पैगंबराच्या प्रकारणी पूर्वीपासून आतापर्यंत सारखा चालू आहे. पुढे अल आस्वाद फारच प्रबळला. महंमदाच्या सुभेदाराला नि त्याच्या मुलाला ठार मारून त्याच्या बायकोशीच त्याने लग्न केले. ह्याच बाईच्या या नवऱ्याप्रमाणेच तिच्या बापालाही अल्आस्वादाने ठार केले होते. त्याचा सूड म्हणून तिच्याशी अल आस्वादाने लग्न लावल्यानंतर तिने एका रात्री महंमदाच्या वतीने मारेकरी महालात गुपचूप आणविले आणि या आपल्या नव्या नवऱ्याचा गळा घोटला. अल्आस्वाद मोठमोठ्याने बैलासारख्या डुरकाळ्या फोडू

लागला. मारेकरी घावावर घाव घालू लागले. तो त्या पैगंबराचे पाहारेकरी दारावर ठोठावून साहाय्यास धावले असे पाहताच त्या बाईने आतून सांगितलें, ‘चूप रहा! पैगंबर अल आस्वाद ह्याच्या अंगात देव संचारला आहे, यास्तव ते हुंकारत आहेत!’ पैगंबराच्या बायकोचेच ते शब्द, ती आज्ञा, म्हणून पाहारेकरी दबले. तिकडे महालात त्या बाईने आधी त्या नवऱ्याचें शिर कापवून ‘अल्आस्वाद पैगंबर तो ठार झाला!’ म्हणून गर्जत महमदाच्या सैन्यास आत घेतलें आणि मुसलमानांच्या हाती सारा प्रदेश पडला. म्हणजे खरा पैगंबर कोण हें पुन्हा एकदा मारेकऱ्यांच्या सुऱ्याने काय ते ठरविलें! ज्याची लाठी बळकट तो पैगंबर!

**तोलीहा** - ह्यानेही ईश्वरदूत म्हणून स्वतःस म्हणवून घेतलें.

पैगंबरीण सेजाज - ही स्त्री परतु पैगंबरीण म्हणून प्रख्यात झाली; हजारो अनुयायी तिला मिळाले. वर दिलेल्या मोसिलेमा पैगंबराशी तिने लग्न केले; पण थोड्या दिवसात पुन्हा स्वतंत्र होऊन स्वतःच्या पैगंबरीणपदास उपभोगू लागली. पण तिचा पंथ पुढे नामशेष झाला.

हाकिम बिन हाशम, अथात्बुरखेवाला - हाही स्वतःस महंमदानंतरचा पैगंबर म्हणवी. तो सोनेरी झग्यात आपदामस्तक झाकलेला असे, कारण त्याचें ईश्वरी तेज मनुष्यास पाहवणार नाही असे त्याचे अनुयायी म्हणत. त्याचे शत्रू म्हणत - तो आपला एक डोळा लढाईत आलेलें कुरूपपण झाकण्यासाठी हें ढोंग करी! ह्याने अनेक चमत्कृती कराव्या! एकदा त्याने एका विहिरीतून चंद्र वर काढून अनेक रात्री प्रकाशत ठेवला असे त्याचे अनुयायी म्हणतात. तेव्हापासून त्यास चंद्रनिर्माता ही अलौकिक पदवी मिळाली. इतकेंच नव्हे, तर देवाचा अवतार म्हणूनच त्याची पूजा चालू झाली. देव मनुष्यास अवतरतो हें आपलें मत तो कुराणातील वाक्यावरूनही स्थापी. मुसलमानीं सुन्नी खलिफांशी याने तुंबळ युद्धें केलीं आणि त्यामुळे आपलें मेलेले सैनिक तो पुनरुज्जीववितो ही प्रख्याति झाली. त्याने घोषिलें की, तो अदृश्य होऊन पुन्हा अवतरणार. त्याप्रमाणे एका किल्ल्यात मुसलमानी सैन्याने वेढिलें असता तो अदृश्य झाला! सुन्नी मुसलमान म्हणतात त्याने शेवटच्या हाल्यात आगीत गुप्तपणे उडी टाकून स्वतःची राख करून घेतली. परंतु हजारो अनुयायांचा विश्वास की, चंद्रनिर्माता देवावतार हाकिम पैगंबर अदृश्यच झाला. त्याच्या अनुयायांचा फार मोठा पंथ ‘श्वेतांबरी’ ह्या अर्थाच्या ‘सफेत जामावाले’ नावाने चालू राहिला. मुसलमानी खलिफाच्या ध्वजाचा काळा रंग म्हणून हे पांढरा वेष करीत. आपला चंद्रनिर्माता पैगंबर पुन्हा अवतारून सारी पृथ्वी त्यांस अर्पिणार हा त्यांचा विश्वास!

बाबेकी करमातियन, इशमेलियन, बाब - प्रभृती अनेक पंथांचे स्थापक आणि महंमदानंतरचे मुसलमानांतून उत्पन्न झालेले पैगंबर किती तरी होत आलेले आहेत. बहुधा दर पन्नास वर्षात एक तरी कोणी मुसलमान स्वतःस पैगंबर म्हणविणारा, स्वतःच्या पैगंबरीस जुळेल अशा अर्थाने कुराणाचे संदर्भ नि श्लोक विशदिणारा किंवा नवें कुराण देवाने मला धाडलें आहे म्हणून सांगणारा, आज हजारो लोक ज्याच्यामागे लागले आहेत असा पुरुष निघतोच निघतो. मुसलमानांच्या इतिहासातील महंमद पैगंबराच्या कालापासून हा क्रम सारखा आजपर्यंत चालू आहे. वर दिलेल्या बाबी, करमातियन आणि इशमेलियन यांनी तर ख्रिश्चनादिक मुसलमानेतरांचा केला नाही इतका मुसलमानांचाच द्वेष केला, हजारो मुसलमानांच्या कत्तली केल्या. हसन सबाह ह्याच्या हाताखाली मानून त्याच्या शब्दासरशी हत्या करण्याचा एक

धर्मसंप्रदायच प्रचलविला. या हसनच्या नावावरून िअंग्लिशमध्ये assassin म्हणजे हत्यारी हा शब्द आला आहे. बाब ह्या पैगंबराने महंमद पैगंबरविषयीचा मंत्रच स्वतःस लावून 'देवावाचून देव नाही आणि बाब हाच देवाचा प्रेषित पैगंबर आहे!' अशी घोषणा निमाजाच्या वेळी म्हणण्याचा प्रघात पाडला.

ह्या वर दिलेल्या सुनी, शिया, बहाबी प्रभृती नाना पंथोपपंथांची गुंतागुंत नि लठ्ठालठ्ठी हिंदी मुसलमानांच्या इतिहासातही आरंभापासून चालू आहे.

## १६.१३ एक अगदी ताजे पैगंबर!

अगदी या पन्नास वर्षांतील ताजे उदाहरण म्हणजे पंजाबातील कादियानी पंथाच्या मुसलमानांचें होय. हजरत अबदुल मिर्झा कादियानी या पुरुषास आपण महंमदानंतरचे अल्ली अकबर, पैगंबर आहोत असा साक्षात्कार झाला. आपल्यापूर्वी जे अनेक पैगंबर झाले, त्यांतच ह्यांनी जीजस, महंमदाबरोबर रामकृष्णादी हिंदू अवतारांचीही गणना केली. वेद हाही ईश्वरप्रणीत ग्रंथ मानला - जसा कुराण. पण पूर्वीच्या सर्व पैगंबरांच्या आणि धर्मग्रंथांच्या द्वारे कार्य पुरते झाले नाही म्हणून ईश्वराने मिर्झा अबदुल कादियानी हा सगळ्यांहून शेवटचा - नि म्हणूनच ते स्वतःस मुसलमान म्हणवितात - परिपूर्ण पैगंबर धाडला अशी त्यांची निष्ठा आहे. परंतु इतर सारे मुसलमान त्यांस 'काफर' मानतात. काबूलकडे मागे त्यांच्या प्रचारकास दगडांनी ठेचून मारण्याची शिक्षा झाली होती.

## १६.१४ समारोप

वरील सर्व उपपंथांची मते मुसलमानांच्याच शब्दांत, त्यात खरेखोटे वा बरे वाईट कोणते त्याचा मुळीच खल न करता जी दिली आहेत त्यावरून 'कुराण' हा यच्चयावत् मुसलमानांचा अनन्य धर्मग्रंथ आहे, ते सारे एकच ईश्वरप्रदत्त पुस्तक मानतात हा लोकभ्रम किती अतथ्य, निर्मूल नि पोकळ आहे हे उघड होते.

कुराण शब्दशः तर एक नाहीच; अर्थशः त्याचा निरनिराळा अत्यंत परस्परविरुद्ध अर्थ लावणारे सातशे पंथ मुसलमानी धर्मशास्त्रीय मोजून देतात. हा प्रत्येक पंथ कुराणाचा आपलाच खरा ईश्वरी संदेश मानून इतर झाडून साऱ्या मुसलमानी पंथांसही बहुधा 'काफर', 'धर्मबाह्य', 'पाखंड' असे शापून ते नरकात पडतील असे बळपूर्वक प्रतिज्ञापितात! म्हणजे वास्तविक पाहता कुराणें कमीत कमी सातशें आहेत; एक नव्हे!

## १६.१५ खताावियन पंथ

एकाच कुराणाचे अत्यंत विरुद्ध असे विभिन्न अर्थ लावण्याच्या परंपरेचा कळस जर पाहावयाचा असला, तर अब्दुल खताव ह्या मुसलमानी आचाऱ्याचा पंथ पाहावा. ह्याच्या मते कुराणाचा अर्थ शब्दशः न घेता लाक्षणिकपणेही कुठेकुठे घेणें योग्य. तसा अर्थ लावता त्याचा खरा ईश्वरी संदेश जो मिळतो तो हा की, स्वर्ग म्हणून जो कुराणात देवाने सांगितला तो म्हणजे या लोकीचीच यच्चावत्सुखें नि उपभोग; नरक म्हणजे दुःखें नि रोग, प्रलयाची गोष्ट

खोटी. जग हें असेच चालणार. यास्तव, ‘मद्यं मांसं च मीनं च मुद्रामैथुनमेव च’ ह्यांस्यथेच्छ उपभोगणें हाच धर्म होय. ज्या ज्या इहलोकी दु:ख देणाऱ्या उपास-तापास प्रभृती गोष्टी तोच अधर्म (Sale's Koran Intoduction Page १३६). ‘दिवसातून पन्नास वेळा निमाज पढला पाहिजे. पाच वेळांनी काय होणार!’ असा ‘करमाती’ पंथ ज्या कुराणाचा अत्यंत कर्मठ अर्थ लावतातच त्याच कुराणाचा ‘खतवियन’ हा अर्थ लावतात!!

पुरुषबुद्धी नि तर्क अप्रतिष्ठ, अस्थिर, यास्तव कोणचा तरी एक अपौरुषेय, उनल्लंघ्य, तर्कातीत, देवदत्त धर्मग्रंथ परमप्रमाण मानणेंच युक्त असे म्हणणाऱ्यांनी कुराणाची गतही वेदासारखीच, बायबलासारखीच कशी झाली ते लेखावरून चित्ती आणावें. ग्रंथ जरी एक ‘कुराण’ हाच ठरविला, तो त्रिकालाबाधित नि अनुलंघ्य मानला, अतिकेंच नव्हे, तर तो धर्मग्रंथ तसा न मानणाऱ्यांच्या बोकांडी, कोटिक्रमाने काम न भागलें तर रक्तबंबाळ लाठीक्रमाने बसविला तरी देखिल त्या कुराणाचा अर्थ लावण्याच्या कामी पुन्हा पुरुषबुद्धीवाचून दुसरें कोणचेंही साधन मनुष्यपाशी नसल्यामुळे त्या एका कुराणग्रंथाचीं सातशें कुराणें व्हावयाचीं तीं होतातच, होणारच! कोणत्याही ग्रंथास ईश्वरप्रदत्त मानलें की मनुष्याच्या प्रगतीच्या नि विज्ञानाच्या पायात बेड्या ठोकून धर्मांधता नि धर्मोन्माद मोकाट सुटलाच म्हणून समजावें!

यापेक्षा हें कुराण, पुराण, वेद, अवेस्ता, बायबल, टालमद प्रभृती सारे ग्रंथ मनुष्यकृत, त्या त्या परिस्थितीतील ज्ञान नि अज्ञान यांही संपृक्त, पण लोकहितबुद्धीने प्रचलविलेले नि म्हणूनच आदरार्ह मानून आपण साऱ्यांनी ते अभ्यासावे; प्रत्यक्ष प्रयोगांती जे त्यात आज अतथ्य ठरते, अहितकारक ठरते, ते त्यागावें. तथ्य नि हित ते साऱ्यांनी सामाईक मानवी संपत्ती समजून स्वीकारावे हेच इष्टतर, तथ्यतर, हिततर होय - नव्हे काय?

- (किर्लोस्कर, जुलै-ऑगस्ट - १९३५)

***

# १७ मुसलमानी धर्मातील समतेचा टेंभा

त्याला जो धर्म प्रिय त्याने तो आचरावा, ज्यास जो धर्मग्रंथ ईश्वरीय वा पवित्र वाटेल त्याने तो मानावा. इतरांनीही तो यथाप्रमाण आदरावा. ही सारी शिष्टाचाराचीं सुभाषिते तंतोतंत पाळण्यास निदान हिंदू तरी केव्हाही अनमान करणार नाही.

‘येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्वितः।

तेऽपि मामेति कौन्तेय यजन्त्यविधीपूर्वकम्’

ही शिकवण हिंदूंच्या अत्यंत थोर अशा भगवद्‌गीतेसारख्या ग्रंथातच दिलेली!

## १७.१ गौबांचा पूर्वपक्ष

परंतु जेव्हा कोणी मुस्लिम वा अन्य अहिंदू धर्मीय आपण होऊनच धर्माच्या तुलनेचा प्रश्न काढील, इतकेंच नव्हे तर हिंदुधर्म विषमतेने ओतप्रोत भरलेला असून आमचा मुस्लिम धर्म त्या माणसा-माणसांत मानल्या जाणाऱ्या विषमतेपासून अगदी अलिप्त आहे. आमच्या देवाचीं लेकरें; समतेचें नि विचारस्वातंत्र्याचें, दयेचें नि परधर्म सहिष्णुतेचें अमृत हवें असेल तर ह्या हिंदूधर्मास झिडकारून आमच्या मुसलमानी धर्मात या! अशीं प्रकट (जाहीर) आमंत्रणें नि आव्हानें देऊ लागले, तर अशा वेळी त्या आक्षेपांना न खोडता, त्या आव्हानास न स्वीकारता ‘रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति’ अशी गुळमुळीत वृत्ती धरून स्वस्थ बसणे म्हणजेही शिष्टाचाराचा भंग करणेच होय, निव्वळ नेभळेपणा होय. डॉ. आंबेडकरादिक काही अस्पृश्य धर्मांतराच्या गोष्टी बोलताच गौबा प्रभृती मुसलमानांनी मुसलमानी धर्माचा वरील प्रकारचा उदोउदो नि हिंदुधर्माची निंदा प्रत्यक्षपणे नि पऱ्यायाने आरंभिली आहे. धर्मतुलनेचा प्रश्न मूळ त्यांनी काढला; त्यांचे आक्षेप निर्भय संयमाने ऐकले. तसेच त्या प्रश्नांची आम्ही देत असलेलीं उत्तरेंही आता त्यंानी ऐकून घेणें भाग आहे.

मुसलमानी धर्मात तत्त्वतः किंवा व्यवहारात : सर्व माणसे समसमान लेखलेलीं आहेत. त्यात धार्मिक उच्चनीचता वा जन्मजात जातीश्रेष्ठता मुळीच नाही ही प्रौढी एक निव्वळ थाप आहे हें उघडकीस आणण्यासाठी मुसलमानी धर्ममतातील नि व्यवहारातील, गौबासारख्या पक्षपाती मुस्लिम धर्मप्रचारकांसही नाकारता येऊ नयेत अशी थोडीं उदाहरणें वानगी म्हणून खाली देत आहोत. त्यावरून हें स्पष्ट होईल की मुसलमानी धर्मतत्त्वांत नि धर्मव्यवहारात नुसती विषमता आहे इतकेंच नव्हे तर ती काही प्रश्नी अत्यंत असहिष्णू नि आततायी विषमता आहे. शक्य वाटल्यास गौबांनी हीं उदाहरणें नाकारावीं!

## १७.२ विषमतेचा मुळारंभ

(१) मुसलमानी धर्माच्या मूळ प्रतिज्ञेमध्येच जगाचे एकदम दोन तुकडे केलेले आहेत. महंमदसाहेबांना शेवटचा पूर्ण नि खराखुरा पैगंबर मानणारे तेवढे मुसलमान नि बाकीची शंभर कोटी मनुष्यजात काफर. जो मुसलमान तोच स्वर्गात जाणार, काफर तो चिरंतन नरकात!

म्हणजे महंमद साहेबांना पैगंबर मानणें हा माणुसकीचा पहिला गुण! सदाचार, परोपकारता प्रभृती सर्व गुण दुय्यम!! जे महंमदांना पैगंबर मानणार नाहीत ते अनंत काळ नरकात पिचत राहणार! म्हणजे बुद्ध, कॉन्फ्युशिअस, चिनी, जपानी, संतमहंत, जीजस, सारे ख्रिस्ती संत, वसिष्ठ, मुनल व्यास, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामानुज, चोखा रोहिदास, चैतन्य, नानक, सारे राष्ट्रभक्त, लोकसेवक, सारे जगातील यच्चयावत् थोर पुरुष नि कोटी कोटी सवगत नि विद्यमान माणसें - त्यांनी महंमद पैगंबर हाच काय तो खरा नि शेवटचा ईशप्रेषित मानला नाही या एकाच अपराधासाठी नरकात पिचण्यासच काय ते योग्य!!! ही शिकवण ज्या धर्माची पहिलीच प्रतिज्ञा आहे तो धर्म केवढ्या भयंकर विषमतेचा पुरस्कारी असला पाहिजे हें काय सांगावयास पाहिजे! 'नीचातील नीच असला तरी महंमद साहेबांना जो पैगंबर मानील तो मुसलमान मनुष्य हा साधूतील साधू अशा काफराहून श्रेष्ठ आहे! देवास प्रियतर आहे!' असे कुराणाच्या पानोपानी उद्घोषणारा धर्म हा सर्व माणसे समान मानणारा धर्म आहे काय किंवा माणसां माणसांत भयंकर नि असमर्थनीय अशा धर्मोन्मादाची विषमता फैलावणारा आहे? जो सुखेनैव अनुसरावा. पण दुसऱ्या धर्मास 'विषमतेचा फैलाव करणारा' असे हिणवीत आमचा मुसलमानी धर्म मात्र सर्व माणसें समान मानणाऱ्या विचार नि आचार यांच्या स्वातंत्र्याचा भोक्ता आहे' अशा थापा मारू नयेत.

## १७.३ समतेचा नि सहिष्णुतेचा अर्क!!!

(२) जे मुसलमान होऊन कुराणांतील प्रत्येक वाक्य, मग ते बुद्धीच्या वा तर्काच्या कसोटीस कितीही हिणकस ठरो, ईश्वर-वाक्यासमान अनुल्लंघनीय सत्य मानणार नाहीत तीं कोट्यनुकोटी माणसें नरकातच पडणार - ते काफर. ह्या मूळ तत्त्वातील विषमता जितकी कठोर आहे त्याहूनही मुसलमानी राजवटीच्या अनुशासनांतील, त्यांच्या स्मृतिनिर्बंधग्रंथातील विषमता शतपट क्रूरता आहे. त्यांच्या अनेक मौलवींनीही असा धर्मदंडक घालून, जे बाटले नाहीत त्यांच्या कत्तली उडविल्या. त्यांच्यावर मुस्लिम राज्यात एक विशेष हीनतेचा कर 'जिझीया' म्हणून बसविला. त्यांना घोड्यावर बसू देऊ नये, शस्त्रें ठेवू देऊ नयेत, त्यांचे धर्माचार अधर्माचार समजून बंद पाडावे, असे मुसलमानी धर्माचें जे व्यावहारिक अनुशासन पर्शिया, अफगणिस्थान, हिंदुस्थान, स्पेन प्रभृती मुसलमानांनी पूर्वी जिंकलेल्या सर्व देशांमध्ये धडधडीत चालू होते, ज्यापायी शेकडो माननीय हुतात्म्यांचे रक्त मुसलमानांनी सांडलें, ते मुसलमानी अनुशासन काय 'सर्व माणसें एकाच ईश्वराची लेकरें समजून त्यांस समसमान मानणारें' होते? महंमद गझनवी, अल्लाउद्दीन, औरंगजेब ह्यांच्या राजवटी मानवी समतेच्या आणि परम सहिष्णुतेचा अर्क च होत्या वाटते! समता तर सोडाच पण मुस्लिमेतर माणसांना माणसासारखें जगण्याचीही चोरी करणाऱ्या भयंकर विषमतेच्या आणि आततायी असहिष्णुतेच्या पायी सांडलेल्या हिंदू रक्ताने मुसलमान राजवटीचे हिंदी इतिहासातील पान नि पान भिजून ओलेंचिंब झालेले आहे! तसेच स्पेनचें, तसेच सिरियाचें नि इराणचें!

(३) आजही मुस्लिम धर्मप्रचारकांनी धर्मशास्त्राप्रमाणे मनुष्यजातीचे तसेच एकदम दोन तुकडे पाडलेले असून मध्ये विषमतेची क्रूर भिंत पाताळापासून स्वर्गापर्यंत उभारलेली आहे.

मौलवी महंमद अल्ली, शौकतअल्ली यांसारखे अगदी 'पीअर्स सोप'ने धुतलेले मुस्लिम प्रचारकही धडधडीत म्हणतात, 'गांधी कितीही सच्छील असला तरी तो जोवर काफर आहे तोवर नीचातील नीच मुस्लिमही मला त्यांच्यापेक्षा श्रेष्ठच वाटणार, अधिक 'पाक' (शुद्ध) वाटणार.'

## १७.४अंतःस्थ विषमता

(४) मनुष्यजातीत मुस्लिम नि काफर असे दोन चिरंतन भेद पाडणारी ही विषमताच तेवढी मुस्लिम धर्मशास्त्रात बोकाळलेली आहे असे नसून मुसलमाना-मुसलमानांतही 'समता' वा 'सहिष्णुता' नांदत नाही. तशी समता धर्मबाह्य आहे! उदाहरणार्थ, पैगंबर महंमदसाहेब ज्या कुरेश जातीत जन्मले ती जात बहुतेक मुसलमानी पंथांच्या नि आचार्यांच्या मते जन्मतः शुद्ध वा श्रेष्ठ वा विशेष माननीय जात मानली जात आहे. सुनी आचार्यांतील देखील बहुतेक आचार्य याच मताचे! हें मत इतकें धर्मानुकूल समजलेलें आहे की मुसलमानांचा खलिफा (शंकराचार्य नि सम्राट) हा त्या कुरेश जातीतीलच असला पाहिजे हा धर्मशास्त्राचा एक बहुमतसिद्धान्तच झाला. इतर मुस्लिम जातींत कितीही योग्य पुरुष असले तरी खलिफा असा जन्मजात उच्च ठरलेल्या महंमदासाहेबांच्या कुरेश जातीतीलच धर्मग्राह्य! यापायी मुसलमानांनी रक्ताचे सडे सांडले. शिया पंथाचे मते अल्लीसाहेबांचा वंश हा जन्मजात उच्चवर्णीय! खलिफा त्या पंथाचा पाहिजे! या वादापायीच करबेलात मुसलमानांनी मुसलमानांची भयंकर कत्तल केली. महंमदाचे प्रत्यक्ष नातू महंमदाच्या अनुयायांनी हालहाल करून ठार मारले!

## १७.५गुलामगिरी ही मानवी समतेचेच प्रदर्शन आहे काय?

(५) आणि गुलामगिरी? मनुष्याला निव्वळ पशूच समजणारी गुलामगिरी ही कुराणाप्रमाणे धर्मबाह्य नाही. स्वतः महंमद पैगंबराचे घरी आणि त्यांच्या अनुयायांतील प्रत्येक जण गुलाम पाळीत असे. ते मुसलमानी धर्माप्रमाणे पशू पाळण्याइतकेंच सहजकृत्य, वैधकृत्य समजलें जाई ही गोष्ट तर अगदी निर्विवाद आहे ना? इतकेंच नव्हे, तर मोठमोठ्या लढायांत हजारो पाडाव केलेल्या शत्रूंना मुसलमानांनी स्त्रीपुरुष बालबालिकांसुद्धा 'गुलाम' करून आपण बाजारात वांगी विकतो तसे विकलेले आहेत! गुलाम म्हणजे एक पशू. त्यांची मुले याची नव्हेत, तर धन्याची. घरच्या कोंबडीची पिले वा गाईची वासरें जशी तिच्यापासून छिनाऊन वाटेल त्यास विकतात तशी ह्या गुलाम केलेल्या माणसांची मुले मुसलमानी धन्याला विकता येत. धनी मेल्यावर इतर 'वस्तूं'सारखी त्यांची वाटणी धन्याच्या वारसंात होई. गुलामाला कौटुंबिक जीवन नाही, बायकोला नवरा हें नाते नाही, गर वा कवडीही स्वतःची म्हणून ठेवता येत नाही. अशी ही मनुष्यामनुष्यांतील समनाताच नव्हे तर मनुष्याची माणुसकीच छिनावून घेणारी भयंकर प्रथा ज्या मुसलमानी धर्मात वैध आहे नि लाखो मुल्ला, मौलवी, खलिफा, बादशहा, अमीर, उमरावांनी आचरलेली आहे त्या मुसलमानी धर्मात समतेचें राज्य आहे असे म्हणणें उलट्या काळजाचें नव्हे काय? गुलामगिरी बंद केली ती ख्रिस्त्यांनी. मुसलमानांना ती बंद करणे भाग पडलें! पुन्हा ख्रिस्ती राष्ट्रांनीही बंद केली तीही मुख्यतः राजकीय कारणपरंपरेने! कारण ख्रिश्चन धर्मात ती धर्मबाह्य नाही. Slaves, obey your masters म्हणून बायबलच सांगते!

## १७.६ कट्टर अस्पृश्यता

(६) जी गोष्ट तत्त्वाची आणि अनुशासनाची, तीच चालू लोकरीतीची. पठाणी मुसलमनांत अमकी जात उच्च नि अमकी नीच हा भेद इतका तीव्र आहे की पठाणी मुसलमानांतील भिन्न जातींत बेटीव्यवहार रूढ नाहीत. इतरही अनेक मुसलमानी जातींची तीच गोष्ट आहे. उच्च जातीचे पठाणी मुसलमान अन्य पंथीय हीन जातीच्या मुसलमानांस आपली बेटी देणें रूढीबाह्य समजतात. मुसलमानांत अस्पृश्यतादेखील रूढ आहे. बंगालमध्ये मुसलमानांत स्पृश्य मुसलमन नि अस्पृश्य मुसलमान हा भेद इतक्या कट्टरपणे मानला जातो की बंगालमध्ये मुसलमानांस मिळालेल्या नोकऱ्या नि प्रतिनिधीत्व स्पृश्य मुसलमन हेच लाटतात, अस्पृश्य मुसलमानांच्या तोंडास पानें पुसलीं जातात; यास्तव अस्पृश्य मुसलमानांसाठी राखीव जागांची व्यवस्था व्हावी अशी विनंती अस्पृश्य मुसलमांनानी केल्यावरून आज बंगाल मुसलमानी विधीमंडळात वाद चालू आहे.

(७) मुसलमानांच्या मशिदीसुद्धा अनेक स्थळी निरनिराळ्या असतात. एका पंथाच्या मशिदीत दुसऱ्या पंथाच्या लोकांना मज्जाव असतो. कारण तो पंथ बहुधा त्या दुसऱ्या पंथालाही काफर म्हणजे ‘देवा, त्यांना नरकात धाड’ म्हणून प्रार्थना करण्यास चुकत नाही. शियांच्या मशिदीत हसन हुसेनच्या वंशातील दैवी इमामांच्या प्रार्थना होऊन सुन्नी मतांच्या खलिफांना ‘खोटे’ म्हणून संबोधण्यात येत असता त्या मशिदीत सुन्नी जाणार तरी कसे? उलट त्याच तीव्र धार्मिक मतभेदाने शिया हे सुन्नींच्या मशिदीत पाऊल टाकणें पाप मानणार! कारण पुढे तेथे इमामांना निषेधून खलिफांच्यावर प्रभूची कृपा असावी म्हणून प्राथिलें जाणार! ज्या मुसलमानी धर्मात एकमेकांची प्रार्थनामंदिरेदेखील एक होऊ शकत नाहीत, त्यांनी ‘आमच्यांत सर्वत्र समतेचें राज्य आहे. माणसांमाणसांत विषमता आम्ही मानीत नाही, जातीभेद नाही, मुसलमान तेवढा एकमती, एकपंथी, एकजाती’ म्हणून शपथेवर सांगत फिरावें ही थापेबाजी नव्हे तर काय? मशिदी तर राहोतच परंतु सुनी प्रभृती मुसलमानी पंथाची ‘कबरस्थानें’सुद्धा बहुधा निरनिराळीं असतात. सुन्नीच्या कबरस्थानात शियांचें प्रेत पुरलें जात नाही, शियांच्या कबरस्तानात सुन्नीचें प्रेत पुरलें जात नाही.

काही अस्पृश्य गृहस्थांनी वर्तमनापत्रांतून नि व्याख्यानांतून असा गवगवा जसा केला आहे की ते हिंदूधर्मातूनच समतेच्या नि सत्याच्या दृष्टीने धर्म शोधण्यास बाहेर पडले असून कुराण अभ्यासीत आहेत त्यांनी हा तुलनात्मक अभ्यास अवश्य करावा. तुलनेच्या दिव्यास भिऊन कोणाच्याही उपेक्षेवर वा दयेवर हिंदू धर्म नि हिंदू संस्कृती जगू इच्छित नाही. तुलनेत टिकूनच ती जगू इच्छिते. पण ती तुलना करताना खोटीं मापें त्या अस्पृश्य बंधूंच्या हाती मुल्ला-मौलवी न देतील अशी त्यांनी सावधानता ठेवावी. गौबा प्रभृती पक्षपाती प्रचारकांच्या मल्लीनाथीवरूनच मुसलमानी धर्माची कल्पना करू नये. त्यांनी निदानपक्षी, मुसलमानी गृहस्थांनीच केलेलें कुराणाचें मराठी भाषांतर आहे ते सारे शब्दशः वाचावें. त्यानंतर Sale ह्यांचे कुराणाचें इंग्लिश भाषांतर नि विशेषतः त्याची विस्तृत नि विशद प्रस्तावना वाचावी. नंतर जस्टिस अमीरअल्लीसारख्या कट्टर मुस्लिमानेच लिहिलेला History of the Sarasins हा मुसलमानी इतिहास वाचावा. आणि नंतर आम्ही किर्लोस्कर मासिकाच्या जुलै नि ऑगस्ट सन १९३५ च्या दोन अंकांत लिहिलेला ‘मुसलमानांचे पंथोपपंथ’ हा निबंध समीक्षक विवेचनाची दृष्टि कशी

असावी हें कळण्यासाठी, अवश्य वाचावा. इतके कमीत कमी वाचल्यावर मग शेवटी स्वामी दयानंदजींच्या 'सत्यार्थप्रकाशातील' 'मुस्लिम मतखंडनादी' उत्तरपक्ष म्हणून वाचावे. म्हणून मुसलमानी धर्मात नि आचारात आणि विशेषतः हिंदी मुसलमानांत अमर्याद विषमता, अस्पृश्यता नि असहिष्णुता किती आहे ते त्यांना आपोआपच कळून येईल.

- (केसरी, दि. १७-१-१९३६)

***

# १८ आमच्या 'अस्पृश्य' धर्मबंधूंना धोक्याची सूचना

आपल्या हिंदू समाजात जी अत्यंत अन्याय्य आणि आत्मघातकी अशी अस्पृश्यतेची रूढी पडलेली आहे तिचा नायनाट करण्यासाठी आम्ही किती तत्परतेने झटत आहो हें 'श्रद्धानंदा'च्या वाचकांस तरी सांगावयास नकोच. अस्पृश्यता जी निघाली पाहिजे ती मुख्यतः आमच्या सात कोटी धर्मबंधूंना निष्कारण पशूहूनही 'अस्पृश्य' लेखणें हा मनुष्य जातीचाच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या आत्म्याचाही घोर अपमान करणे होय म्हणून निघाली पाहिजे असे आमचें स्पष्ट मत आहे. अस्पृश्यतानिवारणाने आज आपल्या हिंदू समाजचें हित आहे, म्हणूनही ती निघाली पहिजे. पण वेळप्रसंगी त्या रूढीपासून हिंदू समाजाचा आंशिक लाभ जरी होत असता, तरीही आम्ही तिच्याविरुद्ध इतक्याच प्रबळपणे खटपट केली असती. कारण माझ्या अस्पृश्य समजलेल्या बंधूस जेव्हा मी, तो केवळ अमक्या जातीत उत्पन्न झाला म्हणूनच स्पर्श करीत नाही आणि एखाद्या कुत्र्यामांजरास स्पर्श करतो, तेव्हा मी मनुष्यत्वाविरुद्धच एक अत्यंत गर्ह्य असा अपराध करीत असतो. केवळ आपद्धर्म म्हणून अस्पृश्यता काढणें अवश्य आहे. इतकेंच नाही तर धर्माचा कोणत्याही दृष्टीने विचार केला तरीही त्या प्रस्तुतच्या अमानुष रूढीचें समर्थन करणे अशक्य आहे. एतदर्थ धर्माची आज्ञा म्हणून ती रूढी नष्ट केली पाहिजे. न्यायाचे दृष्टीने, धर्माचे दृष्टीने, माणुसकीचे दृष्टीने ते कर्तव्य आहे म्हणूनच अस्पृश्यतेचें बंड आपण हिंदूंनी साफ मोडून टाकलें पाहिजे. त्यापासून आजच्या परिस्थितीत लाभालाभ काय आहेत हा प्रश्न दुय्यम आहे. हा लाभालाभाचा प्रश्नच आपद्धर्म होय आणि अस्पृश्यतानिवारण हाच मुख्य आणि निरपेक्ष धर्म होय.

परंतु ज्याप्रमाणे भगवंताची भक्ती करणे हा मुख्य धर्म असला तरीही ज्यास ती उच्च भावना भावता येत नसेल त्यास आपण निःश्रेयसाकरिता निष्काम बुद्धीने नसलें, तर निदान अभ्युदयाकरिता, पुत्रधनदारारोग्यदिक ऐहिक सुखाचें साधन म्हणून तरी ईश्वरभक्ती कर म्हणून आपला मनुष्यपणाचा केवळ न्यायासाठी आणि आपला मनुष्यपणाचा धर्म म्हणून अस्पृश्यता त्याज्य समजण्याइतकी कोणाकोणाची उदारमनस्कता विशाल झाली नसली तरी, धर्म म्हणून नसलें तर निदान आपद्धर्म म्हणून तरी अस्पृश्यतेची रूढी नष्ट कर हें सांगणें इष्ट असते; इतकेंच नव्हे तर न्यायदृष्ट्या आणि नीतिदृष्ट्याही ते कर्तव्यच असते. शाळेत शिकण्याकरिता जात नसशील तर निदान प्रत्यही खडीसाखर देत जाईन तीसाठी तरी जा हें आपण मुलास सांगतो. ते अशा बुद्धीने असते की, प्रथम खडीसाखरेसाठी शाळेत तो गेला तरी हळूहळू त्यास शिक्षणाची रुची लागत तो पुढे शिक्षणासाठी शाळेत जाऊ लागेल. तीच स्थिती धर्माची उदार रहस्यें ज्या हिंदू समाजाच्या असंख्य अनुयायांतून लुप्त होऊन अन्याय्य आणि आत्मघातक रूढीच धर्म म्हणून समजल्या जात आहेत, त्या समुदायाची आहे. न्याय्य म्हणून अस्पृश्यता त्यागावी हें तुला पटत नसेल, तर ते तुला पटेतो थांबण्यास आता वेळ नसल्याने ह्या अमानुष रूढीने राष्ट्रपुरुषाचा प्राण कासावीस होऊ पाहात असल्याने तितका विलंबदेखील आता असह्य होणार आहे. म्हणून निदान ही रूढी आत्मघातक आहे म्हणून तरी तू सोड असे अनेक वेळा सांगावें लागते आणि ते सांगणें अगदी अपरिहार्यच नव्हे, तर अशा प्रसंगी एक पवित्र कर्तव्यच असते. हे कर्तव्य करताना वारंवार सिद्ध करून दाखवावें लागते की, अस्पृश्यता या अन्याय्य

छळाने त्रासून परधर्मीयांच्या गोटात शिरण्याच्या स्वाभाविक परंतु अत्यंत निंद्य मोहास बळी पडतात आणि त्यामुळे आमच्या हिंदू समाजाच्या संख्याबळाची आणि गुणबळाची भयंकर हानी होते. धर्मशास्त्रास अस्पृश्यता ही संमत आहे असे क्षणभर गृहीत घेतलें तरीदेखील त्याच धर्मशास्त्रात आपद्धर्म म्हणून प्रकरण सांगितलें असल्याने आणि त्या प्रकरणात काही प्रसंगी 'राष्ट्राविप्लवे स्पृष्टास्पृषष्टिर्न विद्यते' अशा अनेक स्पष्ट आणि निर्णायक आज्ञा सांगितलेल्या असल्याने, धर्मशास्त्राच्या नसेल तर आपद्धर्मशास्त्र आज्ञेप्रमाणे म्हणूनही अस्पश्यतेची रूढी त्यागिणें हें कर्तव्य ठरत आहे असे सापेक्षतः दुय्यम प्रतीचे कोटिक्रम करावे लागतात. अशा कोटिक्रमाने प्रथमतः हिंदुराष्ट्रतारणास अवश्य म्हणून, धर्म नाही तर आपद्धर्म म्हणून, शेकडो लोेक अस्पृश्यतानिवारणारस उद्युक्त होतात आणि त्याप्रमाणे एकदा त्यांचे पिढ्यान्पिढ्या मुरलेले ते अस्पृश्यतेचे दुष्ट संस्कार उलट सवयीने पुसट होत जातात आणि अस्पृश्यांविषयी जे मूर्खपणाचे पूर्वग्रह झालेले असतात ते अस्पृश्यांच्या संगतीने, अधिक विचाराने आणि सवयीसवयीने खोटे आहेत हें त्यांचे त्यांच्याच लक्षात येऊन ते अल्पावधीत आपद्धर्म म्हणूनच नव्हे तर धर्म म्हणून, लाभकारक म्हणूनच नव्हे तर न्याय्य म्हणून, उपकाराकरता नव्हे तर माणुसकी म्हणून अस्पृश्यतेच्या रूढीचा मन:पूर्वक धिक्कार करू लागतात. अस्पृश्य जातीस अस्पृश्य म्हणणेंदेखील जिवावर येऊन त्यांस'पूर्वास्पृश्य'- आणि तेंही मोठ्या कष्टाने - म्हणू लागतात. हा अनुभव आम्हांस शेकडो ठिकाणी, अगदी प्रामाणिक पण पुराणप्रिय धर्मशास्त्रींपासून तो अज्ञानी आणि म्हणूनच त्या शास्त्राहूनही अधिक रूढ्यंध अशा गावंढळ शेतकऱ्यापर्यंत अनेक समयी आला आहे.

हें विवरण करण्याचा मुख्य उद्देश हा आहे की 'श्रद्धानंद' पत्रात जेव्हा अस्पृश्यतानिवारणापासून अमुक लाभ आहेत म्हणून ते करा, धर्मशास्त्रात तुम्हांस सापडत नसेल पण आपद्धर्मात तरी तुम्हांस आधार सापडतात म्हणून तुम्ही अस्पृश्य बांधवास सन्निध्य करा असे सांगण्यात येत असते हे मर्म विशद व्हावें हा होय. श्रद्धानंदचे लेख नेहमी समग्र न वाचणाऱ्या कोणा कोणा प्रामाणिक मनुष्याचा मधूनच काही छेदक (प्यारिग्राफ) किंवा वाक्यें वाचून भ्रांत समज होण्याचा संभव असल्याने हें स्पष्टपणे आणि वारंवार सांगणें भाग आहे की, प्रस्तुतची अस्पृश्यतेची रूढी ही अत्यंत अन्याय्य आणि म्हणूनच तिचें आम्ही हिंदूंनी निर्दालन केले पाहिजे. इतर सर्व कारणे हीं दुय्यम होत, हेंच आमचें अबाधित मत आहे.

वर उल्लेखिलेल्या आणि व्यावहारिक अशा दोन्हीही दृष्टीने विचार केला असता आम्हांस असे वाटते की जर आमच्या तथाकथित (so called) अस्पृश्य धर्मबंधूंना निर्बंधाप्रमाणेच (कायद्याप्रमाणेच) प्राप्त झालेले अधिकारही उपभोगू देण्यास यापुढेही बजावण्यासाठी अगदीच अपरिहार्य तेथे तथाकथित अस्पृश्यांनी सामसत्याग्रहही केल्यास त्यात त्यांच्याकडे काहीही दोष देता येणार नाही. अर्थातच मन:प्रवर्तनाचे आणि स्पृश्यांचे मन वळवून ते नैर्बंधिक अधिकार पदरात पाडून घेण्याचे सर्व गोडीगुलाबीचे उपाय थकल्यानंतरच निरूपाय म्हणून असे सत्याग्रह केले जावे. अनेक ठिकाणी स्पृश्य लोकांस न्यायतः आणि व्यवहारातः आज अस्पृश्यता सार्वजनिक प्रसंगी तरी त्याज्य मानणें हें अवश्य आहे ही गोष्ट पटविता येते, हें आम्ही स्वानुभवावरू न सांगू शकतो आणि अशा बंधूप्रेमानेच बहुतेक ठिकाणी तो प्रश्न सुटेल ही आमची निश्चिती आहे. परंतु क्वचित्प्रसंगी तो तसा न सुटला तर आपल्या नैर्बंधिक

अधिकाराचे संरक्षणार्थ आमच्या अस्पृश्य बंधूंना सत्याग्रह-साम सत्याग्रह-करण्याचें भागच पडेल हेंही आम्ही जाणून आहो. सत्याग्रह हें नित्य धोरण नाही, पण विशिष्ट आणि अपवादभूत प्रसंगी अवलंबिण्याचा तो एक कडू पण अपरिहार्य असा अंतिम नैमित्तिक उपाय आहे. सार्वजनिक शाळा, पाणवठे, नळ, नगरसंस्था, जिल्हामंडळें, विधीमंडळे, सभा इत्यादी सर्व सार्वजनिक स्थळी - विशेषतः जिथे मुसलमानादिक अहिंदू स्पृश्य समजले जातात तिथे आणि त्यांच्यापुढे एक पाऊल तरी - आमच्या तथाकथित अस्पृश्य बंधूंना आमच्या स्पृश्य बंधूंनी येऊ दिलेंच पाहिजे. तो त्यांचा न्याय्य अधिकार आहे; तो त्यांचा नैर्बंधिक अधिकार आहे. यास्तवच डॉ. आंबडेकर यांची महाडच्या सत्याग्रहाची चळवळ - ही आम्हांस दोषार्ह वाटत नाही हें आम्ही स्पष्टपणे घोषित करू इच्छितो. कारण महाडच्या प्रकरणी ह्या गोष्टी अगदी स्पष्टपणे सिद्ध झालेल्या आहेत की ज्या तळ्यावर मुसलमान लोकही पाणी पितात आणि आपली भांडीही धुतात, त्या तळ्यावर पाण्याच्या दुर्भिक्षतेच्या दिवसांतही आपल्या 'अस्पृश्य' हिंदूबंधूंना पाणी पिण्याचा मज्जाव करण्यात आला. इतकेंच नव्हे तर त्यांनी शांतपणे त्या तळ्यावर येऊन पाणी पिण्यास नगरसंस्थेच्या आज्ञेप्रमाणेच आरंभ केला असता महाडच्या शेकडो स्पृश्य हिंदूंनी त्यांस मारहाण केली. 'अस्पृश्य' देवळात शिरणार अशा भुमकेने ही गोष्ट झाली हें म्हणणें सर्वस्वी विश्वसनीय होऊ शकत नाही. कारण, नाहीतर गोमूत्र शिंपडून त्या तळ्याची शुद्धी करण्यात आली नसती. आपल्या धर्माच्या, रक्ताच्या, बीजाच्या हिंदू मनुष्याचे स्पर्शाने पाणी बाटते आणि ते पशूचें मूत्र शिंपडलें की शुद्ध होते! ह्या अत्यंत तिरस्करणीय प्रकारात ती मनुष्यस्पर्शजन्य भ्रष्टतेची भावना अधिक धिक्कारणीय आहे किंवा ती पशूच्या मूत्राने शुद्ध करण्याची भावना अधिक धिक्कारणीय आहे हें सांगणें कठीण आहे! अशा रीतीने नगरसंस्था आणि विधीमंडळें ह्या दोन्हीही राजसंस्थांनी जे नैर्बंधिक अधिकार अस्पृश्यांस दिलेले होते, ते बजाविण्याची अनुज्ञा शक्य त्या त्या सामोपचाराने मिळण्याची पराकाष्ठा केली असताही ज्या महाडच्या लोकांनी ती बंधूप्रेमाने दिली नाही, आणि मुसलमान तळ्यावर पाणी पीत असता हिंदूंना मज्जाव करून आपल्या हिंदुत्वास कलंक लावला, त्या महाडास जाऊन त्या तळ्यावर सामसत्याग्रहाने अस्पृश्यांस पाणी पिऊ देण्याचा यत्न करणे हें अस्पृश्यांचेंच नव्हे तर सर्व हिंदूमात्राचें कर्तव्य आहे. जर ह्यात काही अतिरेक होत असेल तर तो डॉ. आंबेडकरांच्या सत्याग्रहमंडळाकडून नसून तो महाडच्या धर्मविमूढ स्पृश्यांकडून होय आणि हा अतिरेक जर टाळावयाचा असेल तर डॉ. आंबेडकरांच्या मंडळास 'जाऊ द्या हो' म्हणून सांगितल्याने तो टाळता येणार नाही. आमची आमच्या महाडच्या हिंदूबंधूंस प्रेमाग्रहाची विनंती आहे की, त्यांनी अजून तरी सावध होऊन दुःखद प्रसंग टाळावा आणि तो टाळणें किती सोपें आहे! जर एक पत्र सर्व समाजाचे वतीने किंवा नगरसंस्थेचे वतीने आमचे महाडकर हिंदूबंधू आपल्या हिंदूधर्माचे नावासाठी त्यांचे जे काय अपमान झाले असतील ते विसरून प्रसिद्ध करण्याचा उदारपणा दाखवितील कीं ह्यापुढे ह्या तळ्यावर आमच्या 'अस्पृश्य' बंधूंनी येऊन सुखाने पाणी प्यावें तर आपसांत सत्याग्रह करण्याचा दुःखद प्रसंग आजच्या आज टळेल. हिंदूंनी तहानेल्या हिंदूंस तळ्यावर पाणी पिऊ देऊ नये आणि ती गंमत त्याच तळ्यावर तेच पाणी पीत उभ्या असलेल्या मुसलमानाने आणि ख्रिस्त्याने खो खो हसत बघावीं हें अत्यंत लाजिरवाणें दृश्य आता आमच्या महाडकर हिंदूंनी जगतास पुन्हा दाखवू नये अशी आमची उत्कट प्रार्थना आहे. महाडकरांस एकमुखाने असे पत्र प्रसिद्ध नच करता आलें, तर त्यांनी निदान इतकें तरी करावे

की, जर आणि जेव्हा हे आपले हिंदूबंधू पाणी पिण्यास दळबळासहित येतील तर आणि तेव्हा त्यास लवलेशही विरोध न करता ते पाणी सुखेनैव पिऊ द्यावें, म्हणजे कलहप्रिय परधर्मीय लोकांचा सर्व खटाटोप व्यर्थ जाऊन शिकार न सापडलेल्या व्याधाप्रमाणे ते परधर्मीय शत्रू फजीत पावतील. आणि आपले हे अस्पृश्य, आपले हिंदूधर्माचे बंधू प्रेमाने जिंकले जातील. आपल्या या अस्पृश्य धर्मबंधूंच्या स्वारीस आपल्या स्पृश्य बंधूंनीं स्वतःच पराजय पावून पराजित करावे. इंग्रजांपुढे आणि मुसलमानी गुंडांपुढे पराजय पावू नये - काय धर्माभिमान आणि शौर्य असेल, ते तिथे दाखवावें! ह्या आपल्याच ओठास आपल्याच दातांनी कचकचून चावण्यात काय पुरुषार्थ आहे!

ज्याप्रमाणे आमच्या 'स्पृश्य' धर्मबंधूंना आमची ही एक सूचना आहे त्याचप्रमाणे आमच्या 'अस्पृश्य' बंधूंसही एक धोक्याची सूचना देणें आम्हांस आमचें कर्तव्य वाटत आहे. ती ही की त्यांनी इतर हिंदूंना 'अस्पृश्यता काढा नाही तर आम्ही बाटू' असा धर्मांतराचा धाक घालू नये!

कारण असे नुसते म्हणणें देखील त्यांचें त्यांनाच अत्यंत लांछनास्पद आहे. अस्पृश्यता जो काढणार त्याचा तेवढा हिंदुधर्मावर अधिकार आहे आणि 'अस्पृश्य' तेवढा हिंदुधर्मावर आलेला कोणी एक उपऱ्या आहे की काय? - की ज्याला तो धर्म म्हणजे एखाद्याला वाटेल तेव्हा फेकून देता येणाऱ्या जीर्ण वस्त्राहून किंवा बाजारात सवदा करण्यासाठी आणलेल्या भाजीपाल्याहून अधिक महत्त्वाचा वाटत नाही? हिंदुधर्माची आणि हिंदुसंस्काराची, हिंदुदेशाची आणि हिंदुइतिहासाची आणि हिंदुवाङ्मयाची, थोडक्यात म्हणजे हिंदुत्वाची ही आपली पूर्वार्जित मत्ता ही केवळ वसिष्ठासारख्या ज्ञानी ब्राह्मणांनी किंवा श्रीकृष्णासारख्या गीताद्रष्ट्या क्षत्रियांनी किंवा हर्षादिकासारख्या साम्राज्य चालविलेल्या वैश्यांनी किंवा नामदेवतुकारामादिक वणिग्शूद्रांनी वा शूद्रांनीच उपार्जित केलेली नसून, ती मिळकत मिळवावयास चोखो महारा, रोहिदास चांभार, सज्जन कसायी इत्यादी तुम्हां अस्पृश्य जातीचे अनेक पूर्वजही झटले आहेत. ह्या हिंदुत्वाचे रक्षणार्थ पूर्वी आणि आताही हजारो 'अस्पृश्य' वीर रणांगणावर झुंजत आलेले आहेत. महाभारतातील एका अत्यंत उज्ज्वल अध्यायास उपदेशिणाऱ्या व्याधगीतेच्या त्या 'अस्पृश्य' द्रष्ट्यापासून तो हिंदूत्वाच्या जरिपटक्याचे रक्षणार्थ धारातीर्थी म्लेंच्छांना मारीत मारीत मरणाऱ्या शिदनाईक महारापर्यंत लाखो अस्पृश्य संत, तत्त्ववेत्ते आणि वीर ह्या हिंदूत्वाच्या समाइक संपत्तीची उपार्जना आणि जोपासना करण्यासाठी झटत आलेले आहेत. हिंदूत्वाच्या गावाच्या वेशीवर आज अनेक सहस्रकें जागता पाहारा ज्या 'अस्पृश्य' महारांनी दिलेला आहे ते सर्व महार हे आपल्या राजधानीचे 'येसकर' तुमचेच पूर्वज होते!

नव्हे, पूर्वजांविषयी बोलायचें तर अनुलोम-प्रतिलोमादिक विवाहांनीच अस्पृश्यादिक जातींची उत्पत्ती बहुशः झालेली असल्याने तुमचे पूर्वज आणि ह्या चातुर्वण्यादिकांचे पूर्वज एकच होते ही गोष्ट निदान त्या त्रैवर्णिकांना तरी नाकारता येणार नाही. कारण अस्पृश्यांचें रक्त स्पृश्यांच्या अंगात खेळत आहे आणि स्पृश्यांचें अस्पृश्यांच्या, या विधानाच्या सत्याची साक्ष त्यांची मनुस्मृतीच देत आहे. पंचमादिक वर्णांच्या उत्पत्तींची ही मीमांसा त्यांना मान्य अशा त्याच स्मृतीने सांगितली आहे! मग जर काही काळापूर्वी आजच्या स्पृश्यांचे आणि अस्पृश्यांचे पूर्वज बहुशः एकच होते तर अर्थातच ही हिंदूत्वाची मत्ता जितकी स्पृश्यांची तितकीच अस्पृश्य हिंदुंचीही पितृपरंपरागत स्वायत्त संपत्ती आहे. ती तुमच्या आणि आमच्या पूर्वजांनी ते एकत्र

होते तेव्हा आणि ते पुढे गावातल्या गावात स्पृश्यास्पृश्यादिक वादांनी विभक्त झाले तरीही, समाइक श्रमांनी मिळविली आहे, समाइक शौर्याने संरक्षिली आहे. तीवर जितका स्पृश्यांचा तितकाच अस्पृश्यांचाही वारसा आहे! मग तुम्ही असे कसें विचारता की, 'ह्या हिंदूत्वावर आमचा अधिकार आहे की नाही? हिंदुधर्म आमचा आहे कीं नाही?'

ह्या प्रश्नात तुम्ही तुम्हांसच नकळत हें गृहीत धरता आहा की हिंदुत्व ही जशी काही एकट्या स्पृश्यांचीच मत्ता आहे! तुम्ही होऊन अधिकार असा सोडून कसा देता? एखाद्या राज्याचे दोन वारस असले आणि जर त्या वारसांतील एका वारसाने दुसऱ्यास हीन स्थितीत ठेवलें, तर त्या दलित वारसाने छलकाच्या त्रासास कंटाळून त्या राज्यासच सोडून देणें आणि दुसऱ्याच्या परशत्रूच्या दाराशी तुकडे मोडीत पडणें हें श्रेयस्कर आणि वीरवृत्तीस शोभणारें आहे का? त्या वारसाने सांगितलें की तू राज्याबाहेर चालता हो तरी न जाता, त्याला न जुमानता त्या राज्यातील आपलें न्याय्य स्वामित्व गाजविणें हें खऱ्या वीरवृत्तीचें लक्षण आहे!

तथाकथित अस्पृश्य बंधूहो, तुम्ही या हिंदुत्वाच्या सनातन आणि पूर्वार्जित साम्राज्यावर आपला अधिकार सांगा - दारापुढील भिकाऱ्यासारखे 'भिक्षा द्या, नाही तर चाललो दुसऱ्याच्या दारी' असे कार्पण्य प्रदर्शित करू नका. घराच्या धन्यासारखे घरात बरोबरीने उभे रहा. तुमच्य स्पृश्य बंधूंनी जरी म्हटले, 'तू हीन आहेस; हें हिंदुत्वाचें सांस्कृतिक महान्‌राज्य माझें एकट्याचें आहे, बाहेर जा', तर त्यांनाच उलट सांगा ते एकट्या तुझ्या बापाने संपादिलें नाही! तें संपादण्यास आणि रक्षिण्यास सहस्रकामागून सहस्रकें माझेही पूर्वज झटत आलेले आहेत; मी बाहेर जात नाही, मला बाहेर जा असे म्हणणारा तू कोण? ह्या आपल्या समाईक मत्तेचा आजवर बहुतेक उपभोग तू घेतलास; आता मी तो तुला तसा अन्यायाने घेऊ देणार नाही!

## १८.१ हिंदू धर्म माझा आहे, तो सोडण्यास सांगणारा तू कोण?

असे उलट तुम्हीच स्पृश्यांस म्हटले पाहिजे, हिंदुधर्मात राहू देणारे किंवा न देणारे हे स्पृश्य लोक काय ते अधिकारी आहेत, अशी दरिद्री भावना आमच्या अस्पृश्य बंधूंनी कधीही करून घेऊ नये आणि ती दरिद्री भावना व्यक्त करणारी 'आम्हांस शिवा; नाही तर आम्ही दुसरें घर पाहतो' अशी अत्यंत भिकारडी आणि नेभळ्या कुलकलंकासारखी वाक्यें उच्चारून आपल्याच पूर्वजांच्या घरास सोडून त्यांच्या शत्रूंसच पूर्वज समजण्याचा भ्याडपणा कधीही करू नये. कारण हिंदूत्वावरचा अधिकार सोडणें म्हणजे चोखामेळ्याच्या दैवतास मुकणे होय; सजन कसाई, रोहिदास चांभार, रामानंदाने स्थापिलेले त्यांचे अनेक डोम, मांग इत्यादी जातींतींल संतशिष्य ह्या सर्वांनी, अस्पृश्यांनो, ह्या तुमच्या अगदी प्रत्यक्ष पूर्वजांनी उपार्जन केलेली मत्ता भित्रेपणाने सोडून पळून जाणें होय. जे हिंदुत्व तुमच्या हजारो पिढ्यांनी प्राणापलीकडे - हे अस्पृश्यतेचे हाल सोसूनदेखील - जतन केले, ते हिंदुत्व धिक्कारून आणि त्या तुमच्याच महार, मांग प्रभृती सोमवंशी कुलांतील शतसहस्र पूर्वजांस मुर्खात काढून आपल्या बापाचें नाव बदलणें होय! मग तुम्हांस चोखामेळा आमचा, रोहिदास आमचा, तिरुवल्लुवर आमचा, अजिंठा आमचा, काशी आमची, पंढरी आमची, कालिदास आमचा ही हिंदूसंस्कृती आमची म्हणून अधिकार सांगता येणार नाही. जे तुमचे स्वतःचे वाडवडील हिंदू म्हणून नांदले त्यांना 'काफर'

म्हणावें लागेल. तर आता पुन्हा अशी अमंगल भाषा तुमच्या स्वतःच्या जातीय अभिमानासाठीच बोलू नका.

एके भावाने दुसऱ्यास छळलें तर त्या दुसऱ्याने पहिल्याशी झुंजून आपलें न्याय्य स्वत्व मिळवावें, का त्या भावावरचा राग काढण्यासाठी आपल्या बापासच बाप म्हणणें सोडून देऊन श्राद्धाचे दिवशी कोण्या दुसऱ्याचा त्यातही ज्या दुसऱ्याशी आपले समाईक वाडवडील सारखे लढत आले अशा परशत्रूचा पितृपदी नामोच्चार करावा? एतदर्थ हे धर्मबंधूंनो, ही नीच भावना मनास शिवू देखील देऊ नका.

अशी स्वधर्मत्यागाची भावना ज्याच्या मनात उदय पावते तो मात्र खरा अस्पृश्य होय! त्याने त्वरित पश्चात्तापाचें प्रायश्चित्त घ्यावें. अशा वृत्तीने जरी मुसलमानांच्या दाराशी तुम्ही गेलात, तरी तुम्हांस तुकडेच मोडावे लागतील. त्यांच्यातील हसन निजामीनेदेखील आपल्या 'भयसूचक घंटेमध्ये (The Alarm bell Booklet) स्पष्ट सांगितले आहे की, 'उच्च नि कुलीन मुसलमानांनी हिंदू भंगी, महार इत्यादी जे लोक मुसलमान होतील त्यांच्याशी बेटी व्यवहारादिक व्यवहार करावा असे मी मुळीच म्हणत नाही!' मुसलमान झालेल्या महारादिकांचे पाणी निमाजाचे वेळा न घेणारे कित्येक मुसलमान आम्ही स्वतः पाहिले आहेत. मागे बाटलेल्या अस्पृश्यांच्या अनेक जाती मुसलमानी समाजात अजूनही जशाच्या तशा दूर ठेवलेल्या आहेत, ख्रिस्त्यांमध्ये तर त्रावणकोरास स्पृश्य ख्रिश्चन आणि अस्पृश्य ख्रिस्त्यांमध्ये दंगे वारंवार होतात हें विश्रुतच आहे. तेव्हा मुसलमान होऊन म्हणजे मोठेसें राज्य मिळणार आहे असे थोडेंच आहे? परंतु तसे ते राज्य मिळते तरीही तेवढ्यासाठी तुमच्याच हजारो पूर्वजांच्या संस्कृतीस आणि तत्त्वज्ञानास आणि धर्मास आणि समाजास अंतरून जन्मदात्या आईस आणि बापास सोडून, परशत्रूच्या पायी शरण रिघणें ही अत्यंत नीच प्रवृत्ती होय. अशा नीच प्रवृत्तीस आमचे अस्पृश्य धर्मबधु आजवर बळी पडले नाहीत, एवढा अमानुष छळ सोशीत पिढी पिढी मरणी मेले पण बळी पडले नाहीत. त्यांनी हिंदूत्वाच्या पूर्वार्जित राष्ट्राचा विश्वासघात केला नाही. हें जितकें त्यांचा तसा छळ करणाऱ्या स्पृश्यांना लज्जास्पद आहे, तितकेंच त्या अस्पृश्यांना भूषणावह आहे.

हिंदू धर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक वेळ पडली तर आम्ही आपल्या रक्ताने धुऊन काढू ही डॉ. आंबेडकरांची प्रतिज्ञा खऱ्या हिंदूस शोभण्यासारखी आहे. म्हणूनच त्यांच्या सत्याग्रहासही आम्ही न्याय्यच समजतो. पण त्याचबरोबरच अत्यंत प्रेमाने पण चिंतामग्न मनाने धोक्याची सूचनाही देतो की, 'हिंदुधर्म आमचा आहे की नाही ते सांगा' असे आत्मघातकी प्रश्न करून 'नाही तर आम्ही हिंदुत्व सोडू, अशी अभद्र आणि लाजिरवाणी वाक्यें उच्चारण्याने तत्त्वतः जितका नाश होणार आहे, तितकाच व्यवहारालाही होणार आहे. ती एक युक्ती म्हणून योजणे देखील लज्जास्पद आहे.

कारण सख्खा पण दुष्ट भावाला भिवविण्याकरताच का होईना, पण तुझ्या बापाला मी आजपासून माझा बापच म्हणणार नाही हा धाक घालणें जितकें स्वतःसच लाजिरवाणें आहे, तितकेंच स्पृश्यांस धाक दाखविण्यासाठी तुमच्याही पितृपरंपरेने पूजिलेल्या हिंदुत्वाचे तोंडावरच थुंकणें हे अत्यंत निंद्य आणि तुमच्याच आत्म्यास कलंक लावणारे आहे.

## १८.२ स्पृश्यही होईन आणि हिंदूही राहीन

ही प्रतिज्ञा करा, हिंदुधर्म, हिंदूसंस्कृती, हिंदुत्व एकट्या स्पृश्यांच्या बापाचें नाही; ती दोघांच्याही बापाची समाईक मिळकत आहे. ती सोडून जाऊ का म्हणून स्पृश्यासच काय विचारता? ते का तिचे धनी आणि तुम्ही का चोर आहा आणि जे पापी आणि निर्दय स्पृश्य तुमचे लाखो लोक बाटून गेले, तरी अजून अस्पृश्यता काढण्यास मान्य होत नाहीत ते तुम्ही आणखी काही लाख निघून गेलेत तरी थोडेच घाबरणार आहेत? यासाठी अशी अमंगळ भावना जितकी स्वतःस लज्जास्पद तितकीच परिणामी विफल असल्याने, आमच्या अस्पृश्य बंधूंनी तिच्याशी वरवरदेखील अंगलट करण्याचें पातक करू नये अशी आमची कळकळीची त्यांस विनंती आहे.

- (श्रद्धानंद, दि. १-९-१९२७)

## १८.३ बॅ. सावरकरांचे ‘समतासंघा’स पत्र

(डॉ. आंबेडकरांच्या पक्षाची ‘समतासंघ’ नावाची एक संस्था असे. त्याचे मुखपत्र ‘समता’. त्यात ‘आमचा माणूस’ म्हणून जातीभेदोच्छेद विषयावर काही लेख आहे. त्यातील विधेयांना बॅ. सावरकरांनी खालील उत्तर टाकले ते ‘समते’च्या २४ ऑगस्ट १९२८ च्या अंकात समग्र प्रसिद्धिलें गेलें.)

(१) श्री संपादक ‘समता’ यांस, न. वि. वि. समता संघाचे प्रमुखपत्र जे ‘समता’ त्याचे अंक आपण मजकडे धाडता याविषयी आभारी आहेत.

(२) त्या पत्रात आपण अनेक लेखांतून असे भासविण्याचा यत्न करीत असता की मी जातीभेदाचा मोठा अभिमानी असून त्याचे निर्मूलनार्थ प्रयत्न करण्याच्या कल्पनेचा, निश्चयाचा आणि तदनुरूप आचरणाचा मक्ता जो आपण आपल्याकडेच आहे असे समजता त्यात माझा काही एक संबंध नाही. इतकेच नव्हे, तर त्या सुधारणेचा मी पूर्ण आणि क्वचित्प्रच्छन्न विरोधी आहे.

(३) जर ही गोष्ट खरी असती तर तुम्ही केलेल्या टीकेविषयी ती प्रामाणिक आहे म्हणून मी काहीच दोष दिला नसता. परंतु तुम्हांस प्रत्यक्ष भेटीत माझे मत जातीभेदाच्या निर्दालनास पूर्णपणे अनुकूल असून त्याप्रमाणे मी स्वतः रोटीबंदी व्यवहाराच्या सुधारणा आचरणात येतील तितक्या आणीत असतो आणि इतरांकडून आणवीत असतो, ही गोष्ट माहित झालेली आहे. तरीदेखील ज्याअर्थी तुम्ही ‘समते’त माझ्या नावाचा उल्लेख करून मी त्याविरुद्ध आहे असे भासविता, त्या अर्थी आपल्या टीकेचा हेतू दुसराच काही तरी असला पाहिजे. तसे असेल तर ज्या कार्यावर आपण पे्रम करता, त्या कार्यासाठी तरी निदान आपण यापुढे जाणुनबुजून लोकांत अशी भ्रममूलक समजूत पसरवू नये, असे मी आपणांस देशबंधुत्वाच्या नि धर्मबंधुत्वाच्या नात्याने सुचवितो.

(४) तरीही वृत्तपत्र जर तुमच्या व्यक्तीचे असते तर मी तुम्हांस माहित असलेले जातीभेदाविरुद्धचे माझे मत आणि आचार तुम्हांसच पुनः सांगत बसण्याचे श्रम न घेता तो प्रश्न

तुमच्या वैयक्तिक सत्यनिष्ठेवर सोपवून तिकडे दुर्लक्ष केले असते; पण समता संघाचे मुखपत्र म्हणून 'समता' निघत असल्याने मी हे स्पष्टीकरण करणे अवश्य समजतो की -

(५) हिंदूसमाजातून जन्मजात जातीभेदाचे आमूलात्‌उच्चाटन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचे अस्तित्व कोणच्याही अनुवांशिक स्वरूपात असमर्थनीय आणि राष्ट्रीय शक्तीस हानीकारक आहे. हिंदूसमाजात प्रांतिक किंवा जातीय असे कोणतेच भेद न मानिता पंक्तिव्यवहार आणि विवाहव्यवहार चालू झाले पाहिजेत. अन्नव्यवहार केवळ वैद्यकीय, आरोग्यीय आणि रुचिभिन्नतेनेच काय ते मर्यादित असावेत. शुद्ध, आरोग्यप्रद आणि उचित अन्नपाणी असलें तर ते कोणीही आणि कुठेही शिजविले असले किंवा आणिले असले तरी खाण्यास आणि पिण्यास हरकत नाही. जातीचा म्हणून त्यात कोणचाही प्रश्न नसावा; आणि विवाह केवळ वधूवरांच्या योग्यायोग्यतेवर, आरोग्यप्रदत्वावर आणि परस्परप्रीतिभाजनतेवर अवलंबून असावा. त्यातही जातीपातीचा काही संबंध नसावा.

(६) अर्थात् वरील स्पष्टीकरण केवळ हिंदुराष्ट्रातील अंतर्गत व्यवहारापुरतेच आहे.

(७) जातीभेदाच्या निर्दालनासाठी वरील मताप्रमाणे मी शाळेत होतो तेव्हापासून, प्रकटपणे वागत आलो आहे. कॉलेजामध्ये मी हा उघड उपदेश देई. विलायतेत तर बोलावयासच नको. पुढे अंदमानातही हाच उपदेश देई आणि तो प्रत्यक्ष व्यवहारात आणीत मी शेकडो लोकांच्या जातीभेदमूलक दुष्ट समजुती पालटल्या आहेत. कारागारातून बाहेर येताच मी तीव्र लोकद्वेषास तोंड देऊनही जातीभेदाच्या निर्दालनाचे यत्न प्रकटपणे व्याख्यानांतून, लेखांतून, चर्चेतून करून माझ्या व्यक्तीपुरते तसे आचरण प्रकटपणे केले आहे. याविषयी माझा शब्दाचाही पुरावा पुरे होता; पण त्रोटकपणे दोन चार घटनाही उल्लेखितो. 'अंदमानचीं पत्रें' प्रसिद्ध झाली आहेत. त्यात मी त्या काळीही जातीभेदाचे हानीकारकत्वावर वेळोवेळी लिहिले असून रोटीबेटी व्यवहार सर्वं हिंदूंत चालू व्हावेत म्हणून उत्कट इच्छा प्रकट केलेली आढळेल. 'जन्मठेपे'त प्रकरणेची प्रकरणे या विषयास वाहिली असून हिंदू तेवढा एक, हिंदू ही एकच जात आम्हांस माहित आहे - असा उपदेश आणि आचार यांचा तिकडे कसा सारखा प्रयोग मी चालविला होता हे लिखित आहे. भगूरला मी प्रसिद्धपणे माझ्या पूर्वास्पृश्य बंधूंसह (त्यांस अस्पृश्य म्हणणें देखील मला पाप वाटते - पूर्वास्पृश्यही निरूपाय म्हणून म्हणतो) दूध आणि चहा प्यायलो. नाशिकला हजारो लोकांच्या उघड सभेत ही घटना सांगून मी प्रामाणिकपणे इच्छा प्रकट केली की, माझ्या प्रेतास ब्राह्मण, मराठा, महार आणि डोंब, अशा माझ्या सर्व हिंदू बंधूंनी खांदा देऊन अस्पृश्यता आणि जातीभेद मेला असे दाखविले तर माझा आत्मा सुख पावेल. ह्या गोष्टी तत्कालीन 'स्वधर्म' आदीक पत्रातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'श्रद्धानंद'त लेखणी थकेतो रोटीव्यवहाराविरुद्ध लिहिले जात आहे. 'धर्माचें स्थान हृदय - पोट नव्हे!' हें वाक्य श्रद्धानंदांच्या लिखाणाने मराठी भाषेत म्हणीसारखे परिचित होत आहे. माझ्या घरी एक वेळ नव्हे तर प्रत्यही सहभोजने होतात. रत्नागिरीस शेकडो लोक भंग्यांचे मुलांबरोबर चहा-चिवडा घेतात. मी उघडपणे मराठे, वैश्य, ब्राह्मण इत्यादी माझ्या हिंदू बंधूंकडे जेवतो. आणि अंदमानापासून आतापर्यंत अनेक आंतर्जातीय विवाह घडवून आणण्यात मी उघड आणि यशस्वी खटपट केली आहे.

(८) इतक्या उल्लेखासही अवश्य म्हणून उच्चारणें भाग पडले. अक्षरश: हजारो हजार लोकांस मी जातीभेद मोडण्यास उपदेशिले आहे. शेकडोंची मते त्याला अनुकूल करून घेतली

आहेत. प्रत्यही मी तसा वागत आहे. कोणाचे प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) मिळविण्यासाठी नव्हे, तर प्रामाणिक गैरसमज असल्यास तो राहू नये म्हणून इतके लिहिणे भाग पडले.

(९) जातीभेदाचे आमूलात्निर्दालन करणे आपल्या हिंदुराष्ट्रास हितकर असल्याने मी त्या कार्‍यापुरते समतासंघाचें अभिनंदन करतो.

(१०) केवळ इतकेच बजावितो की मला जातीभेद नको असला तरी आज हिंदुत्व हवे आहे. आणि म्हणून रोटीव्यवहारातील आरोग्यादिक अटीप्रमाणे कोणाही अहिंदूशी तो करण्यास हरकत नाही हे जरी आज मी समर्थितो तरी बेटीव्यवहाराविषयी मात्र आणखी काही काळ हिंदूंनी अहिंदूस मुली देऊ नयेत असे मला वाटते. अहिंदू मुली करण्यास हरकत नाही अशी समजूत आणि रूढी हिंदूंत पुष्कळ अंशाने बद्धमूल झाली की मग तशा मुक्त विवाहासही मी समर्थीन. आज नुसत्या मुली जातील - त्यांच्या वंशास अंतरू ही भीती आहे. शुद्धी, जातीभेद-निर्मूलन आणि अंतर्गत संघटन पक्केपणी बद्धमूल झाले म्हणजे मग बेटीव्यवहारही अहिंदूंशी - ते ज्या प्रमाणात मुक्तपणे वागतील त्या प्रमाणात - करण्यास आपणही सिद्ध होऊ.

(११) इतकेच नव्हे तर जर मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व इत्यादी 'त्वें' इतर सोडीत असतील तर मग माझें हिंदुत्वही मानुषकतेत विलय पावेल. जसे माझे राष्ट्रीयत्वही - हिंदूपणही - मानव राष्ट्रात तेव्हा विलय पावेल की जेव्हा इंग्लिशपण, जर्मनपण इत्यादी'पण' लुप्त होऊन मुनष्यपणा तेवढा जगात मनुष्यमात्रात नांदू लागेल! आजदेखील जो खरा मनुष्यवादी (Humanitarian)असेल त्याच्यापुरते त्याचीशी मी सर्व भेदभाव सोडून वागेन.

(१२) तेव्हा मी 'हिंदुत्व' सध्या राखू इच्छितो हे मत ज्या कोणास मान्य नसेल त्याने त्याविषयी मजवर वाटेल तितकी टीका करावी. ती प्रामाणिकपणाची होईल. परंतु यापुढे मी जातीभेद राखू इच्छितो म्हणून मात्र कोणी आपला समज करून घेऊ नये. तशी टीका अप्रामाणिक ठरेल. समता संघाच्या त्या उद्देशास, मी अनुकूल आहे हे प्रसिद्ध झाल्याने जे थोडे बहुत बळ त्या जातीभेद - निर्दालनास मिळणारे आहे, ते मिळावे म्हणून हे पत्र प्रकटपणे (जाहीर रीतीने) मी लिहीत आहे. हे 'समते' त जसेच्या तसे छापून आपण नि:पक्षपातपणे या स्पष्टोक्तीस स्वीकाराल अशी मला आशा आहे. आपणांस जाता जाता हेंही बजाविलें पाहिजे की, 'श्रद्धानंदा'त माझ्या नावाने आलेल्या लेखातील मतांपुरता मी उत्तरदायी आहे. कळावे लोभ असावा ही विनंती.

रत्नागिरी

आपला

१४।८।१९२८ वि. दा. सावरकर

# १९ डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव परत हिंदुधर्मातच येतील!

**पाहिजे तर बुद्धिवादी निधर्मी व्हा!**

**- पण धर्म असा हिंदूधर्माहून चांगला सापडणार नाही!!**

डॉ. आंबेडकर यांनी हिंदुधर्म सोडण्याचा निश्चय केला आहे. या बातमीचे मला तितकेसे आश्चर्य वाटले नाही की - जितके ते हिंदुधर्मापेक्षा कोणता तरी चांगला धर्म शोधून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत, या बातमीचे वाटले! हिंदुधर्म सोडण्याची कारणे त्यांनी दिलेली जी प्रसिद्ध झालेली आहेत तीं अत्यंत संदिग्ध असल्यामुळे त्यांचा हेतू अमुकच एक आहे, असे सांगता येत नाही. तरी जर ते हिंदू धर्म बुद्धिवादाच्या (Rationalismच्या) कसोटीस पूर्णपणे उतरत नाही, म्हणून धर्मत्याग करीत असतील तर त्या गोष्टीचा अर्थ काही तरी ध्यानात येण्यासारखा आहे. - Ism या अर्थी धर्म म्हटला की, त्यात बुद्धिबाह्य अशी काही विशिष्ट श्रद्धा असणारच! बुद्धीला जे पटत नाही, अशी श्रद्धा ठेवणें ज्यांना आवडत नाही इतकेच नव्हे, तर तर्काला विरुद्ध जाणारीं धर्ममते ही अशा अंधश्रद्धेच्या आज्ञेने धरून ठेवणे हे ज्यांना निव्वळ अप्रामाणिकपणाचे वाटते, धर्म म्हटला की ज्या काही जुनाट आणि आजच्या परिस्थितीत निर्थक नव्हेत तर अनर्थकही झालेले असे आचार आणि संकेतही जे असतातच त्यांना लोकहितासाठी सुधारणें हें ज्यांना आपलें कर्तव्य वाटते, आणि पारलौकिक म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टीवरही जे प्रत्यक्षनिष्ठ तर्काच्या पलीकडे जाऊन विश्वासू इच्छित नाहीत; अशा Positivists किंवा Ratioanalists प्रभृती बुद्धीवाद्यांनी एखादा धर्म सोडला तर त्यांचे कारण सहज ध्यानात येते. त्या अर्थी जर डॉ. आंबडेकर हे सोडीत असतील तर त्यात काही मोठेसें आश्चर्य नाही!

## १९.१ हवा तर एक नवा 'बुद्धिवादी संघ' स्थापा!

परंतु ज्या बुद्धिवादाचे कसोटीने हिंदुधर्म सोडावसा वाटतो, ती कसोटी लावली असता जगातील आजचा एकही धर्म ग्राह्य ठरणें अशक्य आहे. उदाहरणार्थ मुसलमान नि ख्रिस्ती धर्म घ्या. वेद अपौरुषेय आहे, अग्निपूजेने स्वर्ग मिळतो, प्रभृती हिंदूधर्मी मते ज्या बुद्धिवादास निव्वळ अंधश्रद्धेचे थोतांड वाटते, त्या बुद्धिवादास मुसलमान धर्माची जी अगदी मूलभूत प्रतिज्ञा की महंमदसाहेब हे शेवटचे पैगंबर, त्यांच्या कुराणातला शब्द नि शब्द हा ईश्वराच्या टेबलावर जगाचे आधीच लिहून ठेवलेल्या एका प्रचंड पुस्तकातून पानेचीं पानें फाडून देवदूताच्या हस्ते महंमदास धाडण्यात आला; आणि महंमदाला सर्वश्रेष्ठ पैगंबर जो मानणार नाही तो तो नरकात अखंडपणे पिचत राहील; इत्यादी मते मी मानतो असे शपथेवर सांगण्याचा अप्रामाणिकपणा कसा करवेल! किंवा जीझसला कुमारी मेरी देवीच्या उदरी ईश्वरी तेजाने अपौरुषेय संभोगाने जन्मास घातले आणि त्याचा प्रत्येक शब्द ही अनुल्लंघनीय ईश्वरी आज्ञा होय, ही प्रतिज्ञा तरी कशी करता येईल? तेव्हा जर डॉ. आंबेडकर हे बुद्धिवादाच्या कसोटीस उतरत नाही म्हणून हिंदू धर्म सोडीत असतील तर त्यांनी बुद्धिगम्य नसलेल्या, श्रद्धेच्या पायावर उभारलेल्या, धडधडीत पौरुषेय असलेल्या ग्रंथास अपौरुषेय मानणाऱ्या आणि अनेक भाकडकथांनी भरलेल्या कोणत्याही इतर धर्मास, धर्म ही एक टूम (Fashion) घरच्या बंगल्यात असलीच पाहिजे अशा

मोहास बळी पडून स्वीकारू नये. तर आजच्या परिस्थितीत लोकहितास प्रत्यक्षपणे साधणारे असे नियम हाच ज्यांचा आचार, तर्कनिष्ठ आणि प्रत्यक्षागत तत्त्वज्ञान हीच ज्याची उपनिषदे आणि विज्ञान (Science) हीच ज्याची स्मृती, असा बुद्धिवादी संघ स्थापावा आणि त्याच्या अनुयायांस अंधश्रद्धेच्या आणि भाकडकथांच्या पिंजऱ्यातून सोडवून एका झटक्यासरशी अद्ययावत् अशा वैज्ञानिक बुद्धीस्वातंत्र्याचा उच्चतम आणि आरोग्यप्रद वातावरणात नेऊन सोडावें हेंच इष्ट आहे. परंतु हिंदू धर्म हे भोळेपणाचे एक लाकडी लोढणे आहे म्हणून फेकून देऊन त्याचे जागी जर ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्मवेडाची नि धर्मोन्मादाची भली थोरली दगडी धोंड ते स्वतःच्या आणि त्यांच्या अनुयायांच्या गळ्यांत बांधू इच्छित असतील तर त्यायोगे माणुसकीच्या दृष्टीने झाला तर त्यांचा अधःपातच होणार आहे. काही झाले तरी बुद्धिवादाच्या दृष्टीनेही एकंदरीत पाहता धर्मात ग्राह्यतम धर्म असेल, तर तो हिंदुधर्म होय! 'किर्लोस्कर' मासिकात त्या पुस्तकांत समाविष्ट केलेले मुसलमानी धर्मोपपंथांवर आम्ही जे दोन लेख लिहिले आहेत ते धर्मतुलनेच्या प्रश्नी प्रत्येकाने अवश्य वाचावे!

## १९.२ सध्याच्या स्थितीत धर्मांतरानेच अस्पृश्यांची अधिक हानी होणार आहे!!

आता डॉ. आंबेडकर जर केवळ अस्पृश्यांची माणुसकी वाढविण्यासाठी आणि आत्मसन्मान संरक्षिण्यासाठी हिंदूधर्मास सोडीत असतील तर त्यांनी हे ध्यानात धरावे की, येत्या दहा वर्षांत अस्पृश्यता हिंदू समाजातून उच्चाटली गेल्यावाचून कधीही राहणार नाही. आणखी दहा वर्षे त्यांनी दम धरावा, ही गोष्ट एवढी मोठी राष्ट्रीय सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने अगदी कर्तव्यच आहे. कारण आज अस्पृश्यतेचा प्रश्न सर्व बाजूंनी सुटण्याचा समय इतका निकट आला असता, शतकोंशतकांचे हिंदूसमाजाशी निगडित झालेले महारादिकांचे हितसंबंध तोडून परधर्मात जाताना त्यांना जो आर्थिक आणि सामाजिक त्रास आणि हानी भोगावी लागणार आहे त्या मानाने तरी, आहे त्या स्थितीतच दहा वर्षे तरी झुंजत राहून अस्पृश्यतेची बेडी तोडून टाकणे अधिक सुलभ नि मानाचे आहे. काही झाले तरी पूर्वास्पृश्यांतील लाखांत (१०) दहा आणि अगदी महारांतील हजारी (१०) माणसेदेखील डॉ. आंबेडकरांच्या मागोमाग आपला पूर्वपरंपरागत संत रोहिदासाचा नि चोखामेळ्याचा हिंदुधर्म सोडतील ही गोष्ट शक्य दिसत नाही.

## १९.३ असे धर्मांतर हेही माणुसकीस काळिमाच लावणारे आहे!

पुन्हा माणसुकीच्या दृष्टीने पाहिले तरी मुसलमानी वा ख्रिस्ती धर्मात जाताना त्यांस जी अपरिहार्य प्रतिज्ञा करावी लागणारच, की 'महंमदावर किंवा येशूवर विश्वास न ठेवता जे जे केले ते ते चिरंतन नरकातच पडले' ती प्रतिज्ञा करणे तरी माणुसकीस काळिमा लावणारेच नव्हे काय? कोणीही माणुसकी असणारा मनुष्य एखाद्या नोकरीकरता वा लाभाकरिता मातापितरांस भर चौकात १० शिव्या हासडू शकेल काय? मग आपल्या जातीचे सत्तर पिढ्यांतील सारे पूज्य वाडवडील आणि साधुसंत हे, त्यांनी महम्मदावर किंवा येसू ख्रिस्तावर विश्वास ठेवला नाही म्हणून, घोर नरकात पिचत आहेत असे सांगून ज्यांच्या पोटी आपण जन्मलो त्या आईबापाचे पांग फेडण्याचे नीच धाडस डॉ. आंबेडकरांच्या किंवा त्यांच्या अनुयायांच्या हातून घडले तर ते तरी माणुसकीचे कृत्य होईल काय?

मनुष्य मुसलमान किंवा खिश्चनात गेला म्हणजे अस्पृश्यतेपासून एकदम मुक्त होतो असे म्हणणेही खोटे आहे. बंगालमध्ये मुसलमानातही अस्पृश्य मुसलमान (हलाल) आणि स्पृश्य मुसलमान (अश्राफ) यांचा वाद इतका तीव्र झाला आहे की, बंगाल विधीमंडळात अस्पृश्य मुसलमानांनी स्पृश्य मुसलमानांच्या लाटबाजीपासून संरक्षणासाठी राखीव जागा मागितल्या आहेत. इतर प्रांतातही अनेक ठिकाणी सय्यद प्रभृती स्पृश्य मुसलमन जाती अस्पृश्य मुसलमानांबरोबर बेटीव्यवहार करीत नाहीत. आणि त्रावणकोर प्रभृती दक्षिण हिंदुस्थानातील ख्रिश्चनांत अस्पृश्य ख्रिश्चनांस स्पृश्य ख्रिश्चन हिंदू स्पृश्यासारखेच शिवत नाहीत. नाशिकच्या पुजाऱ्याप्रमाणेच स्पृश्य चर्चात येऊ देत नाहीत. अस्पृश्य ख्रिश्चनांनी स्पृश्य ख्रिश्चनांविरुद्ध त्रावणकोरच्या विधीमंडळात स्वतंत्र प्रतिनिधीत्व मागितले आहे ही गोष्ट डॉ. आंबेडकरांचे कानी गेली नाही काय? तेव्हा अस्पृश्यतेच्या आणि समतेच्या दृष्टीने पाहिले असताही महार प्रभृती अस्पृश्यांनी सामाजिक उलथापालथीच्या अत्यंत त्रासदायक खड्ड्यात पडण्यापेक्षा आणखी १०-१२ वर्षांनी आपल्या धर्मबंधू असलेल्या हिंदूतील जात्यूच्छेदक सुधारकांशी सहकार्य करून अस्पृश्यतेचाच नव्हे तर जातीभेदाचाही प्रश्न सोडवावा यातच त्यांचे खरे सामाजिक आणि आर्थिक हित साठविलेले आहे.

आता स्पृश्य हिंदूस एकच शब्द की, त्यांनी असल्या अपरिहार्य आपत्तीने मुळीच न डगमगता जन्मजात म्हणविणाऱ्या पण निव्वळ पोथीजातच असणाऱ्या या अस्पृश्यतेच्याच नव्हे तर आजच्या जातीभेदाच्या दुष्ट रूढीचे मुळावर कुऱ्हाड शक्य तितक्या लवकर घालावी. डॉ. आंबेडकर जावोत वा राहोत! आजवर मोठमोठे पंडित नि राजे हिंदूधर्मास सोडून परधर्मात जाण्याचा धर्मद्रोह करीत आले, या नीचतेचे घाव सहन करूनही या हिंदुराष्ट्राच्या कुंडलिनी कृपाणांकित भगव्या ध्वजाखाली अजूनही वीस कोटी कट्टर अनुयायी प्राणपणाने उभे आहेत. तेव्हा न डगमगता परंतु केवळ सनातनपणाच्या भंगड गुंगीत झोपतही न पडता आपल्या राष्ट्रदेहाच्या अंगात मुरलेल्या या आजच्या जातीभेदाच्या रोगावर शस्त्रक्रिया केली पाहिजे. त्यापायी असले काही रक्ताचे बिंदू किंवा धारा गळून पडणारच. काही मांसाचे तुकडे तुटून जाणारच. परंतु जर ही जात्युच्छेदक सुधारणेची शस्त्रक्रिया आपण कुशलपणे करू तर गळलेल्या रक्तापेक्षा शतपट शक्तीशाली असे नवे रक्त आपल्या नसानसात सळसळू लागेल नि हे झालेले घाव भरून निघतील.

## १९.४ शुद्धीचा दरवाजा - आता काय चिंता!

काही ५०-७५ वर्षांपूर्वी डॉ. आंबेडकर परधर्मात गेले असते तर त्यांची जितकी चिंता वाटावयास पाहिजे होती तितकीदेखील आज वाटावयास नको आहे. कारण आता शुद्धीचा दरवाजा सताड उघडा झालेला आहे. जसे गोमंतकातले ७ पिढ्यांपूर्वीचे दहा हजारा ख्रिश्चन लोक आज परत आले किंवा साठ हजार मलकाना रजपूत परत हिंदू झाले किंवा आता गेल्या महिन्यात दिल्लीस ४०० ख्रिश्चन लोक हिंदुधर्मात शुद्ध करून घेतले, तसेच या संक्रमणाच्या गडबडीत हे धर्मद्रोह करणारे हजार-दोन हजार वा लाख-दोन लाख लोकही बायबलातील उधळ्या पुत्राप्रमाणेच बापाचे घर शोधीत उद्या परत हिंदुधर्मात येतील, शुद्ध करून घेतले जातील! आंबेडकरांचे कुटुंब रत्नागिरी जिल्ह्याकडीलच आहे. जरी आंबेडकर आणि त्यांचे अनुयायी आज

परधर्मात गेले तरीही, हिंदू संघटनेच्या जात्युच्छेदक संजीवनीने नवप्राणित झालेल्या हिंदुधर्मात आपणास पुन्हा शुद्ध करून घ्या अशी विनंती डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव थोडक्या वर्षांनी रत्नागिरी हिंदू सभेकडे करतील असाच संभव अधिक!

## १९.५ जसा तो राष्ट्रद्रोह - तसाच हा धर्मद्रोह

वर आम्ही, काही तात्कालिक लाभासाठी हिंदू त्यागाच्या या कृत्यास धर्मद्रोह म्हटलेले आहे. ते जर कोणास अन्यायाचे वाटत असले तर त्यास आम्ही असे विचारतो की, जर हिंदूस्थानाचे काही नागरिक या भारतराष्ट्रास आज अध:पतित झालेले पाहून आपल्या स्वत:च्या खिशात जार रूपड्या अधिक पडाव्या यासाठी हिंदुराष्ट्राच्या शत्रूस जाऊन मिळाले किंवा रशियाच्या दुर्दिनात आपल्या राष्ट्रासाठी सर्वस्व पणास लावून न झुंजता जर एखादा लेनिन रशियात देशबंधुंशी आपले सारे संबंध सोडून देऊन जर्मनीचे वा अमेरिकेचे नागरिकत्व पत्करून तेथील मोठा अधिकारी झाला असता तर त्या नामर्द मनुष्याच्या स्वार्थी कृत्यास तुम्ही राष्ट्रदोह म्हटले असते की नाही? तो जसा राष्ट्रद्रोह ेतसाच हा धर्मद्रोह. ते जसे माणुसकीचे कृत्य नव्हे, तसे हेही नव्हे.

# २० सावरकरांचे डॉ. आंबेडकरांना आमंत्रण

रत्नागिरी दि. १३-११-१९३५

श्रीयुत डॉ. आंबडेकर यांसी,

महाशय,

गेली पाच-सहा वर्षे रत्नागिरी नगरात पोथीजात जातीभेदोच्छेदक आंदोलन बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालू आहे. आपल्या हिंदूधर्माच्या नि हिंदू राष्ट्राच्या मुळासच लागलेली ही जन्मजात म्हणविणाऱ्या पण पोथीजात असणाऱ्या जातीभेदाची कीड मारल्यावाचून तो संघटित नि सबळ होऊन आजच्या जीवनकलहात टिकाव धरू शकणार नाही, याविषयी मलाही मुळीच शंका वाटत नाही. आपल्याप्रमाणेच नि आपल्या इतक्याच स्पष्ट शब्दांत मी अस्पृश्यता प्रभृती अन्याय्य, अधर्म्य नि आत्मघातक अशा अनेक रूढींची ब्याद प्रसविणाऱ्या या जन्मजात जातीभेदास निषेधीत आलो आहे. सोबत माझे दोन तीन लेखही धाडीत आहे. वेळ झाल्यास पाहावेत.

परंतु हे पत्र मी जातीभेदाविषयी शाब्दिक निषेध वा चर्चा करण्यासाठी धाडीत नाही. या पिढीत हा जातीभेद मोडण्यासाठी हिंदू समाज प्रत्यक्ष कार्य असे कोणते करू इच्छितो याची काही सक्रीय हमी, प्रत्यक्ष पुरावा, मानोवृत्ती पालटल्याची निर्विवाद साक्ष आपणास हवी आहे, असे आपण मसूरकर महाराजांशी झालेल्या भेटीत बोलल्याचे समजते. अस्पृश्यता नि जातीभेद मोडण्याचे दायित्व (Responsibility) स्पृश्यांवरच काय ते नाही. अस्पृश्यांतही अस्पृश्यता नि जातीभेद यांचे प्रस्थ स्पृश्यांइतकेच आहे. भट नि भंगी जातीभेदाच्या पापाचे भागीदार असून मनोवृत्ती पालटल्याची साक्ष दोघांनीही एकमेकांना दिली पाहिजे. दोघांनी मिळून हे पाप निस्तरिले पाहिजे. दोष सगळ्यांचा, प्रमाण काय ते थोडे फार. अर्थात जातीभेद मोडण्याचे प्रत्यक्ष कार्य तिथेच उत्कटपणे नि यथार्थपणे झाले असे म्हणता येईल की, जिथे ब्राह्मण मराठेच महाराबरोबर जेवत नाहीत, तर महारही भंग्याबरोबर जेवतो. जात्यहंकाराच्या प्रपीडक (tyrannical)वृत्तीपासून महारही इतका मुक्त नाही की, त्यांनी केवळ स्पृश्य वर्गापासूनच काय तो मनोवृत्ती पालटण्याविषयी सक्रीय पुरावा मागण्याचा निरपराधी अधिकार गाजवू पाहावा हे माझ्याप्रमाणेच आपल्याही अनुभवास पदोपदी आलेले असेल.

नुसती शाब्दिक सहानुभूती नको. आता सक्रीय हमी काय देता ते रोखठोक ठरवून काय ते करून दाखवा! हे आपले मागणे न्याय्यच नव्हे तर उपयुक्तही आहे. मीही गेल्या पाच-सहा वर्षांपासून रोखठोक हेच काय ते कार्य हे सूत्र हिंदू राष्ट्रापुढे इतर प्रकरणी तसेच सामाजिक क्रांतीविषयीही ठेवीत आहे. ते सूत्र व्यवहारविण्याचा नि जन्मजात जातीभेद प्रत्यहीच्या आचरणात तोडून दाखविण्याचा प्रयोग माझ्या मते रत्नागिरी नगरात मोठ्या प्रमाणात नि त्याखालोखाल मालवण नगरात यशस्वी झाला आहे. प्रयोग हा प्रयोगशाळेतील एका कोपऱ्यात जरी यशस्वी झाला तरी त्यामुळे सिद्ध होणारी शक्यता नि नियम हे सर्वसामान्य असल्याने तो त्या प्रमाणात यशस्वीच समजला पाहिजे. यासाठी आपण मागितलेला सक्रिय पुरावा, 'काय करता ते दाखवा'ची मागणी, रत्नागिरीचा जातीउच्छेदक पक्ष आपल्यापुरती तरी आपणास कृतीनेच देऊ इच्छित आहे. यास्तव त्या पक्षाच्या वतीने हे आमंत्रण मी आपणास धाडीत आहे.

जातीभेद तोडण्याचा बहुतेक व्यावहारिक कार्यक्रम रोटीबंदी तोंडण्यात सामावलेला असतो. जो रोटीबंदी तोंडतो तो वेदोक्तबंदी वा स्पर्शबंदी तोंडतोच तोंडतो. बेटीबंदी तेवढी उरते, पण ती काही प्रत्येकी प्रत्येकाला तोंडण्याची गोष्ट नव्हे. वधुवरांचाच तो पृथक प्रश्न. इतरांनी तसा मिश्रविवाह धर्मबाह्य वा बहिष्कार्य मानला नाही नि त्या जोडप्यास इतर विवाहितांप्रमाणेच संव्यवहार्य मानले, म्हणजे संपले. यास्तव जातीभेद व्यवहारात तोंडीत असल्याचा कोणत्याही वेळी, घाऊक प्रमाणात झटकन देता येईल, अशा निर्विवाद पुरावा म्हणजे त्यातल्या त्यात रोटी बंदी प्रकटपणे (जाहिरपणे) तोडून दाखविणे हाच होय. हे ध्यानात घेऊन आपल्या आगमनाचे प्रसंगी साधारण कार्यक्रम ठेवू.

१) आपण एका पंधरवड्याचे आतबाहेर सवडीप्रमाणे रत्नागिरीस यावे. येण्याचे आधी एक आठवडा आगावू कळविण्याची तसदी घ्यावी.

२) पतितपावनामध्ये देवळाच्या भर सभामंडपात सरासरी एक हजार ब्राह्मण, मराठा, वैश्य, शिंपी, कुळवाडी प्रभृती अनेक स्पृश्य मंडळींचे प्रतिष्ठित प्रमुख नागरिकापासून तो कामकऱ्यापर्यंत सर्व वर्गांचे स्पृश्यांसह ज्यात अस्पृश्य महार, चांभार मंडळी जेवतात इतकेच नव्हे तर, महार-चांभार मंडळी भंगीबंधूसहित सरमिसळ पंगतीत बसतात असे टोलेजंग सहभोजन आपल्या अध्यक्षतेखाली होईल. अशी सहभोजने श्री. राजभोज,पतितपावनदास सकट इत्यादी पूर्वास्पृश्यांचे समक्ष नि सह अनेकवार झाली आहेत.

३) आपली इच्छा असल्यास स्त्रियांचेही एके सहभोजन होईल. त्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यादिक प्रतिष्ठित कुटुंबातील स्त्रिया-प्रौढ नि तरुण - आपल्या महार, चांभार, भंगी प्रभृती धर्मभगिनींच्या पंगतीत सरमिसळ जेवतील.

४) या सहभोजकांची नावे प्रकटपणे (जाहिरपणे) वर्तमानपत्री प्रसिद्धीली जातील. ही अट मान्य असणारासच सहभोजनात घेतले जाईल.

५) येथील भंगी कथेकऱ्यांची किंवा आपणाबरोबर पूर्वास्पृश्य सुयोग्य कथेकरी कोणी येतील तर त्यांची कथा रात्रौ होईल. देवळात इतर कथेकऱ्यांप्रमाणेच त्या भंगी कथेकऱ्यास ओवाळून रीतीप्रमाणे त्याचे पायीही शेकडो आब्राह्मण चांभार मंडळी दंडवत करील. श्री. काजरोळकर यांचा तसा सन्मान गेल्या गणेशोत्सवी केला होता.

६) आपली इच्छा प्रतिकूल नसल्यास आपले एक व्याख्यानही व्हावे असा मानस आहे.

७) कार्यक्रमाची जागा पतितपावन मंदिर, श्रीमंत भागोजीशेट कीरांच्याच सत्तेचे आणि सहभोजनादिक प्रकरणी अनुकूल तेच भाग घेणार. त्यामुळे तिसऱ्या कोणाचाही संबंध तिथे पोचणार नाही आणि म्हणून नैर्बंधिक (कायदेशीर) अशी कोणतीही अडचण येण्याचा संभवसुद्धा नाही.

८) हो, सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की, अशी लहान मोठी दीडशेवर सहभोजने इथे झाली असताही नावे छापून भाग घेणाऱ्या हजारो सहभोजकांपैकी कोणाच्याही जातीने कोणासही जातीबहिष्कार्य ठरविलेले नाही. उलट सहभोजन हवे त्याने केले वा केले नाही, तरी तो प्रश्न

ज्याचा त्याचा, ते जातीबहिष्कार्य कृत्य नव्हेच हेच येथील आजचे धर्मशास्त्र होऊन बसले आहे! ती वस्तुस्थितीही आपण समक्ष अवलोकालच.

हा कार्यक्रम झाला म्हणजे हा राष्ट्रीय प्रश्न सुटला असे मानण्याइतका कोणीही मूर्ख नाही. पण तशाने वाऱ्याची दिशा कळते. आपणास काही सक्रिय आरंभ हवा आणि जर सहा हजार वर्षांच्या बलवत्तर रूढी सहा वर्षात एवढ्या प्रमाणावर जिथे केवळ मन:प्रवर्तनाने मोडता येतात तर इतरत्र येतीलही ही निश्चिती वाटण्यास हरकत नाही. एवढ्यासाठी आम्ही हे आमंत्रण देत आहोत. आम्ही हिंदू आपण हिंदू या पिढ्यान्‌पिढ्यांच्या धर्मबंधुत्वाच्या स्मरणासह हृदयात जे उत्कट ममत्व उत्पन्न होते, त्या ममत्वाने हे अनावृत प्रकट आमंत्रण धाडीत आहे.

आपला माझा काही वैयक्तिक स्नेहही आहेच. त्या स्नेहासाठी म्हणून तरी हे प्रेमपूर्वक आमंत्रण स्वीकारावे.

आमच्या पक्षाच्या दोघातिघा प्रमुख पुढाऱ्यांच्या सह्या ह्या पत्रावर त्यांच्याही उत्कट इच्छेस्तव घेऊन हे पत्र धाडीत आहोत. कळावे लोभ असावा ही विनंती.

आपला

वि. दा. सावरकर

डॉ. शिंदे

रा. वि. चिपळूणकर M.A.LL.A.

दत्तोपंत लिमये, B.A., LL.B.

संपादक, सत्यशोधक

(सकाळ दिनांक २२-११-१९३५)

**१. रत्नागिरीच्या जन्मजात जात्युच्छेदक पक्षाच्या वतीने बॅ. सावरकर, चिपळूणकर वकील, दत्तोपंत लिमये, संपादक सत्यशोधक, डॉ. शिंदे या हिंदू पुढाऱ्यांनी धाडलेल्या आमंत्रणास डॉ. आंबेडकरांनी खालील उत्तर धाडले.**

**'रत्नागिरीला आपण जे कार्य करीत आहात त्याची माहिती वाचून मला आनंद होत आहे. येथील लॉ कॉलेजच्या कामामुळे मला आपल्या आमंत्रणाचा लाभ घेता येत नाही याविषयी खेद वाटतो.'**

**(सकाळ दि. २४-११-१९३५)**

***

# २१ धर्मांतराचे प्रश्नांविषयी महारबंधूंशी मनमोकळा विचारविनियम

## २१.१ लेखांक १ ला

डॉ. आंबेडकरांनी येवल्यास धर्मांतराचा प्रश्न काढल्यापासून अस्पृश्य वर्गाच्या ज्या हालचाली चालल्या आहेत, त्यावरून असे दिसते की आमच्या मातंग प्रभृती धर्मबंधूंच्या पुढाऱ्यांत बहुतेकजणांचे मत धर्मत्यागाच्या अतिरकी चळवळीस विरुद्ध पडत आहे. ही सुदैवाची गोष्ट आहे. हिंदू संघटनवादी जात्युच्छेदक पक्षाशी सहकार्य करून हिंदू समाजातील जन्मजात जातीभेदाची ब्याद हाणून पाडण्यातच आजच्या अस्पृश्यतेच्या रोगापासून अस्पृश्यांची खरी मुक्तता होणारी आहे. धर्मत्यागाने अस्पृश्यांच्या हिताचीच अधिक नासाडी होणारी असून त्यांच्या जातीचे स्वत्व, माणुसकी नि अस्तित्व ही सर्वथा नष्ट होणार आहेत, ही गोष्ट आमच्या मातंग नि चांभारबंधुंच्या लक्षात बहुधा आली आहे. त्यांनी दाखविलेल्या ह्या हिंदूत्वाच्या ममत्वाविषयी हिंदूमात्राने त्यांची अस्पृश्यता नव्हे तर ही जातीभेदाचीच बेडी शक्य तितक्या लवकर तोडून टाकून त्यांचे उतराई होणे अवश्य आहे.

परंतु अस्पृश्यांच्या हिताच्याही दृष्टीने धर्मांतर हे किती घातूक आहे ही गोष्ट लक्षात न आल्यामुळे महारबंधुंतील काही मंडळी बरीच हुल्लड माजवून राहिली आहेत. ही चळवळ आज महाराष्ट्रात थोडी फैलाविली आहे ती मुख्यत्वे करून महार जातीमध्येच होय. यासाठी आम्ही ही लेखमाला आमच्या महारबंधुंनाच संबोधून लिहिणार आहोत. त्यांना ह्या हुल्लडीत आम्हाविषयी धार्मिक ममत्व वा हिंदुत्वाचे नाते जरी वाटेनासे झाले असले तरीही ते जोवर हिंदूच आहेत तोवर आम्हास तरी ते आमचे हिंदू धर्माचे नि राष्ट्राचे बंधूच वाटणार आहेत. आमच्याच नव्हे तर त्यांच्या हिताचीही चिंता वाहणे आमचे कर्तव्यच झालेले आहे. यासाठी धर्मांतरापासून एकंदर हिंदू राष्ट्राचाच नव्हे तर त्यांचा स्वतःचाही ते केवढा तोटा करून घेणार आहेत, याची स्पष्ट रूपरेखा एकदा त्यांच्या समोर मांडावी मग त्यांना जे काय योग्य वाटेल ते ते भले करोत. ह्या हेतूने ही लेखमाला आम्ही लिहीत आहो. अस्पृश्यतेच्या क्रूर रूढीची चीड आम्हास किती आहे, न्यायाच्या नि  माणुसकीच्या दृष्टीनेही अस्पृश्यता नष्ट करणे अवश्य आहे याची जाणीव आम्हास किती तीव्रपणे झालेली आहे हे आम्ही त्या रूढीस निर्दाळिण्यासाठी गेली दहा वर्षे अविश्रान्त खटपट आमच्या स्थलबद्ध कक्षेत करीत आहो त्यावरूनच दिसून येईल. यासाठी आमच्या या लेखमालेस आमच्या महार धर्मबंधूंनी त्यांच्याविषयी ममत्व वाटणाऱ्या त्यांच्याच एका हिंतचिंतकाने नि ज्ञातिबंधूने लिहिलेली आहे अशा विश्वस्त बुद्धीने वाचावी अशी आमची इच्छा आहे. निदान कोणी का लिहिलेली असेना - तीत सांगितले आहे ते किती तथ्य वा अतथ्य आहे हे विवेचिणे झाल्यास आपल्या हिताचेच होईल. त्यात तोटा तरी काही नाही, अशा तिऱ्हाईत बुद्धीने तरी त्यांनी ही लेखमाला वाचावी नि विचारात घ्यावी अशी आमची त्यांना विनंती आहे.

या लेखमालेत आम्ही स्वधर्माभिमान, हिंदूत्वाभिमान, पूर्वजाभिमान प्रभृती हिंदूमात्रांच्या अत्युदार भावनांची ग्वाही देऊन काही एक सिद्ध करू पाहणार नाही. कारण जे महारबंधू धर्मांतराच्या चळवळीत पडलेले आहेत ते आता या भावनांच्या पलीकडे गेलेले आहेत. ह्या

भावना बळी देऊन जे इष्ट ते साधू म्हणतात, ते इष्ट त्यांना आता त्या भावनांपेक्षा अधिक प्रिय वाटते हे उघड आहे. यास्तव आम्ही जर त्यांना असे पटवून देऊ शकलो की, त्या इष्टाला ते ह्या भावनांना बळी देऊन मिळवू शकणार नाहीत, इतकेच नव्हे तर ते इष्ट ह्या भावनांच्या बळेच अधिक लवकर त्यांना प्राप्त करून घेता येईल. हिंदुत्व सोडल्याने त्यांची लाभापेक्षा हानीच हानी अधिक होण्याचा संभव आहे, तरच त्यांचा हा तापट मार्ग सोडल्यास ते सोडतील.

त्यांच्या धर्मांतराच्या चळवळीचे जे जे उद्‌गार बाहेर पडले आहेत त्यावरून असे म्हणता येते की, त्यांचा धर्मांतरातील मुख्य हेतू म्हणजे अस्पृश्यतेच्या ब्यादीपासून तत्काळ मुक्त होता यावे हा होय. कोणता धर्म तत्त्वाचे दृष्टीने चांगला, द्वैत की अद्वैत, ब्रह्म की माया, निराकार की साकार, हिंसक की अहिंसक हा प्रश्नच त्यांच्यापुढे नाही. ज्या धर्मात गेल्याने त्यांची अस्पृश्यता समूळ निघून जाईल आणि ते कोणच्या तरी बलिष्ठ समाजात सामावले जातील तो धर्म त्यांस हवा. हीच त्यांची योग्य नि स्वीकार्य धर्माची कसोटी आहे असे त्यांच्या वतीने वारंवार सांगण्यात येत आहे. आम्ही या कसोटीवर त्यांचा धर्मांतराचा बेत घासून घासून असे दाखवू इच्छितो की त्यांचे हे दोन्हीही हेतू, महार जातीची आजची सर्व प्रकारची परिस्थिती नि अवस्था लक्षात घेता धर्मांतरापेक्षा हिंदुधर्मात नि हिंदू राष्ट्राच्या ध्वजाखाली राहूनच अधिक उत्कटपणे नि निश्चिततेने साधणार आहे. इतकेच नव्हे तर धर्मांतराचे खड्ड्यात हुल्लडीसरशी उडी घेतल्याने त्यांची लाभापेक्षा हानीच शतपट अधिक होणार आहे. ती कशी याचा आता क्रमवार विचार करू.

१) मूठभर व्यक्ती व्यक्तीची नव्हे तर अस्पृश्यता महारजातीच्या जातीचीच गेली तर ती गेली असे म्हणता येईल. काही व्यक्ती बाटल्या तर क्वचित त्यांना एखादी नोकरी मिळू शकेल वा मोठी गव्हर्नरी मिळू शकेल. उलटपक्षी बाटूनही बबर्जीपणापेक्षा अधिक काही एक हाती न आल्यामुळे आणि विशेषत: पूर्वीच्या सग्यासोयऱ्यांना अंतरल्यामुळे अनेकांची ह्या परधर्मात नि परसमाजात फार दुर्दशा उडते. जेव्हा शुद्धी चळवळ नसे तेव्हा असे बाटलेले नि फसलेले किती तरी लोक तसेच खिचपत पडत. आताशा शुद्धी शक्य झाल्यामुळे असे व्यक्तीश: बाटलेले कितीएक महार प्रभृती अस्पृश्य शुद्ध होऊन आपल्या अंतरलेल्या सग्यासोयऱ्यात शक्य तर पुन्हा मिसळू इच्छितात. अशा शुद्धी होत आहेत. शुद्धीकृतांना हिंदू समाज जसजसा संपूर्णपणे संव्यवहार्य मानू लागेल तसतशी बाटलेल्यांपैकी फार मोठी संख्या परत हिंदू होऊ लागेल. हे त्यांच्याच वारंवार निघणाऱ्या उद्‌गारावरून उघड होत आहे. हिंदू समाजाच्या मूर्खपणामूळे आज बाटून परत आलेल्यांना त्यांच्या नुसत्या पूर्वीच्या अस्पृश्य जातीतच तेवढे घेतले जाते. तरीही कितीक महार नि मांगबंधु शुद्ध झालेले आहेत. या प्रत्यक्ष उदाहरणांवरूनच आमचे वरील विधान निर्विवाद ठरते.

तेव्हा व्यक्तीश: जे महार आजवर बाटले त्यांचा त्या बाटण्यामुळे महार जातीच्या वा कोणाच्याही अस्पृश्य जातीच्या अस्पृश्यतेचा प्रश्न सुटत नाही, हे उघड आहे. महारांतील काही व्यक्ती आजवर बाटल्याच नसत्या, असे असते तर ह्या प्रयोगाचे काय परिणाम होतात ते तरी पाहावे असा मोह पडणे सहज होय. पण आजवर शेकडो महारादिक अस्पृश्य व्यक्तीश: नि क्वचित लहान स्थानिक गटांनीही बाटलेले आहेतच. त्यांची स्थिती जवळजवळ मुळीच सुधारलेली नाही. फार काय बहुधा इतर जातीत ते अस्पृश्यच राहिले आहेत, इतकेच नव्हे तर

महार, ख्रिश्चन, मांग ख्रिश्चन, प्रभृती गट तसेच पडून त्यांच्यात्याच्यात देखील ते सहसा रोटी, बेटी, लोटी व्यवहार करीत नाहीत. ज्या बाटलेल्यांची स्थिती बाटल्यामुळे सुधारली आहे, त्यांची व्यक्तीशः अस्पृश्यता गेली असली तरी ते त्यांच्या जातीस नि बहुसंख्य हिंदू राष्ट्रास सर्वस्वी मुकल्याने कोट्यवधी अस्पृश्यांची अस्पृश्यता घालविण्यास त्यांचाही जवळजवळ मुळीच उपयोग झाला नाही ही गोष्ट अनुभवांनी जितकी स्पष्ट नि स्वयंसिद्ध झालेली आहे की अशा मूठभर नि मोटभर अस्पृश्यांच्या व्यक्तीशः धर्मांतराने अस्पृश्य जातीचीच अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्यी काही एक म्हणण्यासारखे सहाय्य मिळणारे नाही. जर अस्पृश्यतेच्या ब्यादीपासून सारा अस्पृश्य समाज मुक्त करणे असेल तर डॉ. आंबेडकरांसारखी पाच पन्नास मोठी माणसे वा एक दोन हजार लहान माणसे बाटून भागणारे नाही हे सत्य महार जातीच्या लक्षात तत्काळ येण्यासारखे आहे. तो प्रयोग होऊन चुकला आहे.

तेव्हा जर महार जातची जात अस्पृश्यतेच्या खोड्यातून नि खड्ड्यातून बाहेर काढावयाची असेल तर प्रत्येक गावच्या महारवाड्यातील दहा पाच माणसांनी धर्मांतर करण्याचा काही मोठासा उपयोग नसून जर महार जातची जात, निदान त्यांच्यातील शेकडा नव्वद माणसे तरी धर्मांतर करू धजली तरच त्या योगाचा काही तरी परिणाम झाल्यास होण्याचा संभव.

– निर्भीड दि. ८-१२-१९३५)

## २१.२ लेखांक २रा

पण आजच्या परिस्थितीत काहिही केले तरी शेकडा दहापेक्षा जास्त महार मंडळी धर्मांतर करण्यास एक तर इच्छिणार नाहीत आणि दुसरे करू इच्छितील तरी धजू शकणार नाहीत! निदानपक्षी महार जातची जात, शेकडा ९० तरी बाटणे सर्वस्वी अशक्य!

ही वस्तुस्थिती महारातील कोणत्याही समंजस अशा माणसास नाकारता येणार नाही. शेकडा नव्वद महार केव्हाही बाटणार नाहीत. कारण त्यांतील बहुतेक बाटू इच्छित नाहीत. याची कारणे अशी-

महारांतही जन्मजात जातीचा अभिमान नि जातगंगेच्या पंचायतीचा प्रभाव, कोणा स्पृश्यास कल्पना नसेल इतका प्रबळ आहे! महार त्याच्या खालच्या भंगी, धेड प्रभृती जातीबरोबर रोटी व्यवहार करण्यास ब्राह्मणाइतकाच ताठ विरुद्ध असतो ही आमच्या स्वतःच्या पदोपदीच्या अनुभवाची गोष्ट. जे तुरळक महार आजवर बाटले त्यांना महार जात अत्यंत नीच समजून धर्माद्रोहीच्या-जातीद्रोहीच्या सारखे जातीबहिष्कृत करतात. बाटलेल्या ब्राह्मणांस शुद्ध केल्यानंतर परत ब्राह्मण जातीत स्थापणे जितके कठीण, जवळजवळ तितकेच बाटलेल्या महारास त्याच्या जातीत शुद्ध करून स्थापणे कठीण. बाटलेल्यांची शुद्धी ही धर्मास धरून आहे हे महार मंडळीस पटविणे कोणच्याही इतर जातीइतकेच कठीण असते. आम्ही महाराबरोबर जेवताना जितक्या तिरस्काराने ब्राह्मण मंडळी बाटगा म्हणून आम्हास झिडकारीत, तितक्याच तिटकाऱ्याने आम्ही भंग्याबरोबर जेवताना पाहून आम्हास महार लोक बाटगा म्हणून झिडकारीत! सहभोजनात अनेक समयी भंगी तर काय पण चांभार पंगतीस बसलेला पाहताच महार उठून जातात. मांगांना आपल्या विहिरीवर महार पाणी भरू देत नाहीत ही गोष्ट मातंग

पुढारी श्री. सकट नेहमीच स्वानुभवाने सांगत असतात. ती प्रत्येक ठिकाणी अनुभवता येते. भंगीकाम महार अगदी जीवावर बेतले तरच एखादा दुसरा करील, महार भंग्यांस, मांगास अस्पृश्यच लेखतात. सारांश असा की, महार जातीतील खेडोपाडी पसरलेल्या हजारो लोकांमध्ये इतर कोणाच्याही त्यांच्याहून ज्यांना ते नीच मानतात त्या जातीशी रोटी, बेटी, भेटी व्यवहार कडकपणे निषधिलेले असून त्या त्यांच्या जातीय भावना, इतर कोणाच्याही स्पृश्य जाती इतक्याच बद्धमूल, अगदी हाडीमासी खिळलेल्या आहेत. तीच गोष्ट त्यांच्या देवदेवता, धर्मविषयक रूढींची.

उदाहरण म्हणून हे कोकण घेऊ. येथील दापोली, गिमवणे, खेड, चिपळूण. संगमेश्वर, देवरुख, रत्नागिरी, राजापूर, खारेपाटण, देवगड, कणकवली, मालवण, वेंगुर्ले या सर्व तालुका नगरातील मोठमोठे महारवाडे आणि अनेक खेडेगावचे महारवाडे आम्ही पुष्कळ वेळा पायी जाऊन घरोघर पाहून त्यांच्या हातचे पाणी बळेबळे मागवून, पिऊन, अन्न वा खाद्य बुद्धया खाऊन आलेली आहोत. त्या महारवाड्यांतून ख्रिस्ती केंद्रे, शाळा, घर प्रचारक प्रार्थना पत्रके - व्याख्याने प्रभृती प्रचारकी उपायांनी सुसज्ज अशी स्थापलेली आहेत. मोठा महारवाडा म्हटला की मोठे मिशनकेंद्र आहेच! ह्या मिशन शाळा नि केंद्रें गेली तीस चाळीस वर्षे त्या महारवाड्यात ठाणबंद प्रचार फार दिवस करीत आहेत. ते फुकट औषधे देतात. मुलांना फुकट चित्रे आणि खाऊ देतात. हिंदू देवी-दैवतांना फुकट शिव्याशाप देतात. महारांनी बाटावे म्हणून चाळीस वर्षे ते प्रत्यही प्रत्येकी उपदेशीत आले आहेत. बाटण्याचे लाभ नि हिंदू धर्मास शिव्या हे प्रत्यही मोजतात. मधून मधून जर एखादा दुसरा महार बाटला तर त्याचा बडेजाव करून त्याला दहा बारा रूपयांची म्हणजेच त्या बापड्या, दीन, दरिद्री मृतमांस खाऊन विटलेल्या इतर महारांना एखाद्या गव्हर्नरसारखी वाटणारी नोकरी देऊन एकदम मास्टरसाहेब किंवा कचेरीत सर्व स्पृश्य ज्यांना समतेने शिवतात असा पट्टेवाला करून ठेवतात. मधे मधे मोठे मोठे गोरे साहेब नि मडम्मा त्या बापड्या महारांना मोटारी उडवीत डामडौलाने भेट देऊन तेच सांगणे सांगतात. टुमचा हिंदू ढर्म खोटा. आमचा येशू ख्रिस्त खरा. टुमी ख्रिस्ती व्हा!'

बाहेर त्या महार मंडळीस स्पृश्य जनता अस्पृश्य म्हणून हेटाळीत आहे. आणि ती महार मंडळी डोम, भंगी इत्यादी त्यांच्या खालच्या जातीचे ब्राह्मण क्षत्रिय बनून तितक्याच ऐटीने त्यांना हेटाळीत आहेत.

पण कोणत्याही महारवाड्यात बाहेरच्या स्पृश्य छळाने, मिशन दाखवीत असलेल्या आमिषाने वा चाळीस पन्नास वर्षे रात्रंदिवस डासासारख्या त्यांच्या कानाशी चावत असलेल्या या टुमी ख्रिस्ती व्हा ने शेकडा १० महारांपेक्षा अधिक बाटलेला महार आम्हांस आढळला नाही!

## २१.३ सामान्यत: महार हा महार धर्मास सोडू इच्छित नाही!

कारण ते ज्या देवी, दैवतांना भजतात, धर्म रूढीस पाळतात तोच धर्म ते त्यांचा स्वत:चाच धर्म समजतात! तो त्यांच्यावर दुसऱ्या कोणी लुच्च्या पंडिताने वा रावाने लादलेला आहे किंवा दुसऱ्या कोणावर उपकार करण्याकरिता ते पाळताहेत ही त्यांची भावना नाही! जसा त्यांचा 'मी' हा त्यांचा स्वत:चा, जशी त्यांची महार जात ही त्यांची स्वत:ची, तसाच त्यांचा

धर्म हा त्यांचा स्वत:चा धर्म आहे. तो महार धर्म आहे - दुसरा कोणचा नव्हे! म्हणूनच पंढरीच्या वारीच्या वेळी महार पुरुष काय, महार बाया काय, मुले काय, म्हातारे कोतारे काय शेकडो महार चोखा-तुक्याचे अभंग गात प्रेमाने डोळ्यांतून टिपे गाळीत, ग्यानबा तुकाराम गरजत पायी पंढरीकडे लोटताना आम्हांस दिसतात. गावच्या पालखीचा, गावच्या देवळाचा, त्यांच्या महार धर्माचा महार हा कट्टर अनुयायी आहे. कट्टर सनातनी आहे.

जी गोष्ट महारांची, तीच चांभार, मांग, बेरड प्रभृती यच्चयावत् अस्पृश्य जातींची. वरील थोड्याशा चर्चेनेही ही गोष्ट उघड होते की, आजच्या आज महारांची जातची जात आपला धर्म सोडू इच्छील ही गोष्ट अशक्य. त्यांच्यातील शेकडा पंचाहत्तर लोक तरी धर्मांतर करू इच्छित नाहीत. कोणी इच्छील तरी धजणार नाही!

पण जरी अनेकांनी इच्छिले तरीही महारांतील बहुसंख्य जनता धर्मांतर करू धजणार नाही. ही दुसरी महत्त्वाची अडचण! कारण जर महार एक गटाने सलग प्रदेशात बहुसंख्येने एकजूट निवसत असते तर कदाचित ते धर्मांतर करू धजते. पण आज त्यांची दहा वीस घरे एकेका गावी असतात. कुठेही ते अत्यंत अल्पसंख्य. सारा गाव महारेतर, बहुसंख्य स्पृश्यांचा. त्यांतही महार दरिद्री, अशिक्षित, पिढ्यान्पिढ्यांचा दलित, कुवत अशी उरलेली नाही. त्यांचे सारे जीवन गावस्कीशी बद्ध. तो हिंदू राहून हिंदूचेच मन प्रवर्तन होऊन स्पृश्य ठरला तर ठरेल. त्यातही ते मनापासूनच गावस्कीच्या कार्यी त्यांचे महारांचे राखून ठेवलेले 'मानपान' सांभाळण्यास तत्पर असतात. त्यांच्या महारवाड्यातील मरीआईचे वा विठोबाचे देवळात जर भंगी वा चांभार वा मांग वा वडारी शिरू लागला तर नाशिकच्या राममंदिरात महार शिरताना जसे ब्राह्मण, मराठे लाठ्या घेऊन धावतात तसेच महार त्या महारेतरांवर धावून त्यांची डोकी फोडतात!

काय चांगले, काय वाईट हा प्रश्न तिथे नाही. वस्तुस्थिती काय हा प्रश्न आहे. वस्तुस्थिती ही अशी आहे. अशा आपल्या जातीस नि जातीधर्मास पिढ्यान्पिढ्या बिलगत राहिलेली ही महार जाती, काही महार जरी परधर्मात गेले तरी, आपल्या पूर्वजांच्या जातीधर्मास एकदम सोडतील नि बाटतील ही गोष्ट अगदी असंभवनीय, चुटकीसरशी एका वा अकरा वर्षात होणे तरी दुरापास्त.

शुद्धी करा, रोटीबंदी तोंडा, साऱ्या जाती मोडा, हा उपदेश महारांच्या गळी उतरविणे आम्हास जवळजवळ तितकेच कठीण जात आहे की, जितके तो ब्राह्मणाच्या गळी उतरविणे! फार काय अस्पृश्यता मोडा हेदेखील महारांना त्यांच्या खालच्या जातीच्या प्रकरणी पटविण स्पृश्यांना पटविण्याइतकेच कठीण जाते. पुन्हा धर्मांतराची इच्छा जरी कोण्या गावच्या साऱ्या महारवाड्यास झाली तरी ती दहावीस कुटुंबे साऱ्या गावाची शत्रू होणार, त्यांची उघड वा आडपडद्याने ते हिंदू गाव पावलोपावली अडवणूक करणार, गावचा महार हिंदू धर्मास लाथाडून देतो हे पाहताच रागावलेला खोत घरे सोडा म्हणणार, सावकार पैसे टाक म्हणणार, गावा देवळांतील त्यांची आहे ती जागा, ती बलुती, ते वेशीचे मानकरीपण, ते सारे गावसंबंध पटापट तुटून तो महार साऱ्या गावचा - आज अस्पृश्य असला तरी वेसकर असलेला, हिंदू असलेला - गावचा बाटगा शत्रू ठरणार! बहुसंख्य हिंदू गावचा गाव एका बाजूस - शत्रू झाले की बाटलेली महारांची दहा पाच घरे दुसऱ्या बाजूस! निर्बंध (कायदा) पुस्तकात काहीही असला तरी उभ्या गावाच्या सोनार, सुतार, भट, राव, पाटील कुळवाड्यांच्या असहकारितेपुढे आणि

आडवाआडवीपुढे निर्बंध काय करणार! पुन्हा महार जे बाटतील ते त्यांच्या मागे हिंदुधर्मात राहिलेल्या सग्यासोयऱ्यांना नित्याचे दुरावणार! बापापासून बेटा, बहिणीपासून बहीण, आईपासून मूल तटातूट होऊन जन्माचे पिढ्यांचे परके होणार, वैरी होणार! जातीची बेजात.

ख्रिस्ती झाले तरी काही ह्या हजारो विखुरलेल्या महारांना वर्षानुवर्षे गांवोगाव कुणी पाटलुणी, टोप्या, नोकऱ्या देऊन साहेब करीत नाही. मडमा देत नाही. असे आज एकेक बाटलेले महार आढळतात तसे त्यांस भटकताही येणार नाही. कारण गावात ते डांबलेले. त्यांची गाठ त्या गावच्या खोत-पाटला- भटा-वाण्यांशी जन्माची पडलेली! मुसलमान झाले तरी तीच गत! खेडेगावी दहा वीस मुसलमानांची घरे- त्यात ही दहा वीस आणखी ! बाटग्या महारांना ते किती नोकऱ्या देणार - किती मुली देणार! नव्हे मुसलमानातही त्यांनी कमीना मुसलमान, कमजात मुसलमान म्हणूनच राहावे लागणार - जसे पंजाबात ते सारेज नावाचे अस्पृश्य मुसलमान राहतात.

- (निर्भीड दि. १५-१२-१९३५)

## २१.४ लेखांक ३रा

मागील दोन लेखांकांतील मुख्य विधेये पुढील चर्चेच्या अनुसंधानार्थ आणि वाचकांच्या चित्तावर ठसठशीतपणे बिंबावी म्हणून पुन्हा एकदा अगदी थोडक्यात सांगू आणि तोच कोटिक्रम पुढे चालवू -

१) धर्मांतराची चळवळ महारांतच फैलावली आहे. इतर चांभार, ढोर, मांग प्रभृती आपल्या अस्पृश्य धर्मबंधूंच्या जातीच्या श्री. राजभोज, श्री. बाळू, डॉ. साळुंकी, श्री. सकट इत्यादी अनेक पुढाऱ्यांनी धर्मांतराची भाषा माणुसकीस शोभत नसून त्यायोगे अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणे शक्य नाही. इतकेच नव्हे तर अशा आततायी घाईने त्या त्या जातीचे स्वत्व नि अस्तित्वच मातीस मिळाल्यावाचून राहणार नाही अशा अर्थाची प्रकट चेतावणीही दिलेली आहे.

२) अर्थातच धर्मांतराने काय साधणार किंवा बिघडणार याची चर्चा मुख्यत्वे करून आपल्या महार धर्मबंधूंशीच करणे भाग आहे. म्हणजे महाराष्ट्रातील महार ज्ञातीची सध्याची एकंदर परिस्थिती नि प्रवृत्ती काय आहे तिचीच या प्रश्नी मुख्यतः छाननी केली पाहिजे आणि तीवरूनच धर्मांतराने त्या महार ज्ञातीची अस्पृश्यता नि दुरवस्था सुधारेल की बिघडेल हे ठरविले पाहिजे.

३) ज्याअर्थी कोणत्याही पारलौकिक वा तत्त्वज्ञानविषयक हेतूने हा धर्मांतराचा विचार महारांतील त्या मताचे पुढारी यांनी मनात आणलेला नाही, ज्याअर्थी धर्मांतर आम्ही एवढ्याचसाठी करतो की, त्यायोगे आमची अस्पृश्यता समूळ नष्ट होऊन कोणच्या तरी अहिंदू अशा बलिष्ठ समाजात आम्ही सामावलो जाऊ. हेच काय ते त्या चळवळीचे सूत्र स्पष्टपणे घोषिले जात आहे आणि वास्तविक पाहता ज्या अर्थी धर्मांतराचे नाव तिला पडले असले, तरी चळवळीपुढे धर्म हा प्रश्नच नसून, आपली सामाजिक स्थिती ऐहिक लाभालाभाच्या दृष्टीने कोणाच्या गटात राहिल्याने सुधारेल हाच खरा प्रश्न त्यांच्या डोळ्यांसमोर आहे, त्याअर्थी ब्रह्म वा माया, आस्तिक्य वा नास्तिक्य, तत्त्वज्ञान वा नीती, स्वर्ग वा नरक, सत्य वा असत्य इत्यादी

दृष्टीनी हिंदुधर्म श्रेष्ठ नि इतर कोणता धर्म श्रेष्ठ हे ठरविण्यासाठी एक अक्षरही लिहिणे निव्वळ विषयांवर होणारे आहे. हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान कितीही श्रेष्ठ असो वा नसो, वेद हे ईश्वरोक्त असोत वा कुराण असो, हा धर्म खरा असो, वा तो पोटापाण्यासाठी पूर्वार्जित धर्म त्यागणे माणुसकीस शोभते की काय याचा खल करण्याने या बाटू पाहणाऱ्यांच्या मनावर काही एक परिणाम होणार नाही. धर्मांतराने त्यांची जातची जात केव्हाही अस्पृश्यतेच्या ब्यादीपासून मुक्त होणार नाही. धर्मांतराने त्यांची ऐहिक लाभापेक्षा शतपटीने हानीच अधिक होणार आहे. आणि हिंदुधर्मात राहिल्यानेच त्यांची अस्पृश्यता जाऊन त्यांची जात सामाजिकदृष्ट्या बलवत्तर होण्याचा अधिक संभव आहे. असे जर रोखठोक रूपये आणि पैच्या भाषेत त्यांना पटविता आले तरच त्याचा त्यांचे मनावर काही परिणाम होईल. ज्या धर्माने अस्पृश्यता सुटून एका बलिष्ठ समाजात सामावले जाता येते तो धर्म खरा, एवढीच त्यांची खऱ्या धर्माची आजची व्याख्या आहे. त्या व्याख्येप्रमाणे देखील हिंदू धर्मच, हिंदुराष्ट्रसंबंधच खऱ्या हिताचा ठरतो असे निर्विवादपणे सिद्ध होत असले तरच आपण त्यांचे समाधान करावयास जावे, नाही तर ते आम्हांस अंतरले असे समजून पुढचा मार्ग चोखाळावा.

४) प्रथमतः महार जातची जात जर अस्पृश्यतेच्या रोगापासून मुक्त करावयाची असेल तर आणि धर्मांतराने ती गोष्ट साध्य होते असे गृहीत धरले तरीही, एक गोष्ट अगदी अपरिहार्य आहे. ती ही की तसे काही पदरात पडावयास महार जातची जात धर्मांतर करून एक गटाने मुसलमान किंवा ख्रिस्ती झाली पाहिजे. दोन चार मोठ्या व्यक्ती - वा दोन चार हजार - नुसत्या फुटकळपणे बाटून काम भागणे अशक्य. जे बाटतील त्या मूठभर महारांना अगदी उच्चवर्णीय अधिकार नि सामर्थ्य जरी प्राप्त झाले तरीही त्या त्या व्यक्तीचे हित काय ते त्यामुळे साधेल - पण ते महार म्हणून नव्हे! त्यांच्या जातीला, जे हजारोहजार महार न बाटता आपल्या वाडवडिलांच्या धर्माशी एकनिष्ठपणे राहतील त्या महार समाजाला, ते थोडे फार बाटलेले महार मेल्यासारखेच होणार! जो जो बाटेल तो तो मुसलमानच होणार, तो महार असा राहणारच नाही. 'महारी मुसलमान' असा काही स्वतंत्र वर्ग असणे वा टिकणे, जर आम्ही जन्मजात जातीभेद मानीत नाही. ही मुसलमानांची शेखी खरी असेल तर, अगदी दुर्घट! सारेच सारे महार एकगटी बाटतील तरीही जे दुर्घट ते मूठभर वा मोटभर महार बाटून घडणे शक्यच नाही म्हणजे जे कोणी बाटतील त्यांना महार जात मेली आणि महार जातीस ते मेले अशीच स्थिती होणार, ही गोष्ट नुसत्या अनुमानाची नाही. प्रत्यक्ष पुराव्याची आहे. शेकडो ब्राह्मण गटचे गट बाटले. ते जसे ब्राह्मण जातीस मेले, ब्राह्मण म्हणून राहिलेच नाहीत. तसेच आजवर जे शेकडो महार व्यक्तीशः नि मुठीमुठीने बाटले ते महार जातीस सर्वथा मेलेले आहेत, ते महार राहिलेेलेच नाहीत. त्यांच्या सुखदुःखाचे तर राहोच काय, ते तिकडे साहेब झाले वा शेख झाले तरी बहुसंख्य महार आपल्या जातीची बेजात करणारे, धर्मांतराचे दुष्कृत्य करणारे नाहीत, त्यांच्या सुखदुःखाशी नि सामाजिक अवस्थेशी त्या बाटग्यांचा काहीही प्रत्यक्ष संबंध राहिलेला नाही. उरलेल्या बहुसंख्य महारांची, महार जातीची खरी उन्नती जर करावयाची असेल तर ती त्या जातीत राहूनच करता येण्यासारखी आहे, करता येणे शक्य आहे. डॉ. आंबेडकर वा त्यांचे अनुयायी हे काही बाटावयास निघालेले पहिले महार नव्हत. तो प्रयोग होऊन चुकला आहे. शेकडो महार आजपर्यंत बाटले ते गल्लोगल्ली भटकताना महार जातीकडूनच बाटगा म्हणून बहुधा धिक्कारलेच जात आहेत. महारांच्या दृष्टीनेही ते पतित, जातीबाहेर टाकलेले असेच

मानले जात आहेत. त्यांचे पाणी महारदेखील पीत नाहीत. सहस्रावधी जातीवंत महार आपल्या 'सोमवंशाचे' कट्टर अभिमानी असतात ही वस्तुस्थिती आहे. ते त्यांच्याबरोबर जेवणार नाहीत, आपल्या कुळधर्मात त्यांच्या वाऱ्याशी देखील उभे राहणार नाहीत. पूर्वी ते बाटगे निदान महारात तरी समान मानाचे अधिकारी असत. बाटल्याने त्यांचे सामाजिक स्थान महारेतरांत उच्च व्हावयाचे स्थली उलट इतके हीन समजले जाते की महारातही ते नीचतर गणले जातात! मग इतर हिंदूंच्या दृष्टीची गोष्टच काढावयास नको! बाटून गेल्यामुळे काही व्यक्तींना पैसे चारले जातील, काही व्यक्तींचा थोडासा उत्कर्ष होईल. पण बाटलेले बहुतेक दुर्दशतेच भटकणार-भटकत आहेत. आणि त्या बाटलेल्यांचे काहीही झाले तरी उरलेल्या बहुसंख्य महारांची म्हणजेच महार जातीची अस्पृश्यता निवारण्यास वा त्यांची स्थिती सुधारण्यास त्या बाटलेल्यांच्या सुस्थितीचा वा दु:स्थितीचा कोणाचाही म्हणण्यासारखा उपयोग होणारा नाही. उलटपक्षी त्या बाटलेल्यांच्या संख्येच्या प्रमाणात महार जातीचे संख्याबळ घटेल, त्यांची शक्ती क्षीणतर होईल. महार जात जात या दृष्टीने अधिक विपन्न, दुर्बळ नि विघटित होईल. या सर्व कारणास्तव हे उघड आहे की महार जातीची अस्पृश्यता घालवायची असेल तर ती सबंध जातची जात निदान शेकडा ९० तरी सांघिकरीत्या एकदम परधर्मात गेली पाहिजे. केवळ एक दोन हजारांच्या वैयक्तिक नि तुटक बाटण्याने महार जातीची अस्पृश्यता नाहीशी होणे शक्य नाही.

५) परंतु संबंध महार जातीची जात एकदम बाटणे असंभवनीय आहे! कारण की महार जातीला त्यांच्या वाडवडिलांच्या धर्माचा, देवतांचा नि कुळाचाराचा आजही इतका चिवट अभिमान नि ममत्व आहे की त्यांच्या शेकडा वीस जणदेखील एकंदरीत एका चार वर्षातच काय पण चाळीस वर्षात देखील महाराचे मुसलमान वा किरिस्ताव होण्यास मान्य होणार नाहीत.

ज्या देवतांना तो भजतो, जे कुळाचार तो पाळतो, त्याची देवस्की, त्याची गावस्की, त्याच्या देवलसी भावना, त्याच्या धर्मभोळ्या समजुतीसुद्धा, त्यांच्या स्वत:च्या जीवनाशी तादात्म्य पावलेल्या आहेत नि त्या पाळण्यातच आपले ऐहिक नि पारलौकिक हित आहे ही महार जातीतील शेकडा ९० लोकांची तरी आजही अत्यंत एकनिष्ठ भावना आहे. ब्राह्मण जसा भंग्याबरोबर जेवण्याच्या, आपले कुळाचार सोडण्याच्या ख्रिस्ती मुसलमानादी परधर्मीयांचे देवतांना मानून स्वत:च्या देवतांना पायाखाली तुडविण्याच्या उपदेशास लाथाडल्यावाचून सहसा राहत नाही, ब्राह्मण जितका धर्मास प्राणपणाने बिलगलेला आहे तितकाच महार हा महार जातीस नि महार धर्मास प्राणपणाने बिलगलेला असून त्याविरुद्ध वागण्यास त्याचे मन मुळी घेतच नाही. हीच खरी वस्तुस्थिती कोणाच्याही महारवाड्यात तुम्हास एकंदरीतला नियम म्हणून आढळेल.

## २१.५ ऐतिहासिक पुरावा पाहा! खुश्रूची वीरगाथा

एक हजार वर्षे हिंदुस्थानभर मुसलमानांच्या बादशहामागून बादशहांनी ब्राह्मण-क्षत्रियांना बाटविण्यासाठी जितके अत्याचार, कत्तली, जाळपोळ, छळ केले तितकेच महारादिक अस्पृश्यांनाही बाटविण्यासाठी त्यांना छळले; पण अपवाद सोडता कोट्यवधी ब्राह्मण क्षत्रियादी स्पृश्य जसे आपापल्या जातीधर्मांना मृत्यूसदेखील न भिता, चिकटून राहिले तसेच चिवट

धर्मवीरत्व ह्या आमच्या महारादिक अस्पृश्य बंधूंनीही गाजविले. त्यांच्या त्यांच्या वाडवडिलांच्या जातीधर्मास, जीवदेखील धोक्यात घालून, त्यांनी रक्षिले, स्वत्वास, स्वकीय जातीस नि स्वकीय धर्मास त्यांनी सोडले नाही. एका बाटलेल्या अस्पृश्याची कथा तर हिंदुस्थानच्या इतिहासात अमर नि अद्‌भूतच आहे. खुश्रू हा अस्पृश्य हिंदू प्रथम बाटला गेला, स्वपराक्रमाने दिल्लीचा बादशहा झाला. यादवांची राजकन्या मुसलमानी बादशहाने बळाने बाटवून विवाहिली होती. तिच्या पक्षाशी खुश्रूने संगनमत करून दिल्लीच्या मुसलमानी तक्तावर चढताच त्याने अकस्मात हिंदू पदपादशाहीचा झेंडा उभारला. स्वतःस हिंदू म्हणवून, दिल्लीला मुसलमानी ग्रंथांचा नि मशिदीचा त्याने केवळ हिंदूंचा सूड उगविण्यासाठी समारंभपूर्वक उच्छेद मांडला! साऱ्या मुसलमानी जगात एका हिंदू अस्पृश्याने केलेल्या त्या अद्‌भूत राज्यक्रांतीने आकांत उडाला! शेवटी जेव्हा पंजाबपासूनचा सारा मुसलमानी सत्ताधीश त्याच्यावर चालून आला तेव्हा तो वीर ससैन्य रणांगणात झुंजत मेला - हिंदू म्हणून!! इतका चिवट स्वधर्माभिमान, परिस्थितीने बाटावे लागलेल्या अस्पृश्यांच्या अंतरंगात, रक्तात, चित्तातदेखील मुरलेला असतो! मुसलमानंचे ते पाचपन्नास बादशहा, त्या हिंदूंना मुसलमान करण्यासाठी उपसलेल्या लाखो तलवारी, ती मुसलमानी बादशाहीची बादशाही धुळीस मिळाली - पण आमची महार जात अजूनही जातीधर्मास चिकटून आहे. महारची महार आहे. आपल्या जातीचे स्वतंत्र अस्तित्त्व आणि स्वत्व संरक्षून आहे! त्यांच्या जातीचे नि जातीधर्माचे त्यांना इतके अढळ प्रेम वाटत आहे! उगीच काही त्या जातीत चोखामोळ्यासारखे भगवद्‌भक्त निपजले नाहीत. हजारो महार वारकरी चंद्रभागेच्या वाळवंटी भजनात शतकानुशतके विठ्ठल विठ्ठल च्या नामघोषाने वातावरण दुमदुमून टाकीत आले नाहीत!

मुसलमानांच्या तक्ताचे नि तरवारीचे मराठ्यांनी तुकडे तुकडे उडवून हिंदुस्थानास बळाने बाटविण्याच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेचे मस्तक उडविल्यानंतर मिशन आले! त्या मिशनने ब्राह्मण क्षत्रियवाडे सोडून सारी शक्ती महारवाड्यातच एकवटली. दीडशे वर्षे त्यांनी पैसे, नोकऱ्या, निंदा, औषधे, शाळा यांची नुसती उधळपट्टी केली. पुतनेच्या स्तनातील सारे दूध महारवाड्यात सांडले. पण त्या पुतनेची पूर्वी गोकुळात जी गत झाली तीच आमच्या महारवाड्यात आजही झाली. कोकणातील महारवाड्यातून तर मिशने उठून चालली. एकंदर महार जातीत महाराष्ट्रात गेल्या दीडशे वर्षांच्या अव्याहत श्रमांच्या अंती साऱ्या मिशन मडमा नि सारे मिळून शेकडा १ महार बाटवू शकले असतील नसतील. महारांची त्यांच्या जातीधर्मावरची निष्ठा अशी अढळ आहे! भाकरीच्या बाजारभावी दरावारी देण्याघेण्याची ती वस्तू नसून महारांचा जातीधर्म महारांच्या जीवनाचाच एक घटक आहे.

६) आणि त्यातही अगदी दुर्लंघ्य अडचण ही आहे की जरी क्वचित फार मोठ्या संख्येने महार जनता धर्मांतर करावयास दोन चार वर्षांत सिद्ध होऊ शकेल, तशी इच्छा करील, ही दुर्घट गोष्ट वादासाठी गृहीत धरली तरीही महारांची बहुसंख्या धर्मांतर करू धजणार नाही. कारण त्यायोगे गावोगाव नि खेडोपाडी विस्कळीतपणे पसरलेले त्यांच्या मूठ मूठ वसतीचे जीवन अतिशय दुःसह होऊन जाईल. धर्मांतराच्या लाभापेक्षा त्यांची आर्थिक, कौटुंबिक नि सामाजिक हानी शतपट अधिकच होणार आहे. हे त्यांना धडधडीत दिसत असल्याने धर्मांतर करण्याची बहुसंख्य महारांना हिंमतही होणार नाही. जर महार जात एक गटाने सलग वसलेली

असती वा काही काही तालुक्यातून तरी बहुसंख्य असती तर क्वचित त्याचे सांघिक धर्मांतर त्यांना कमी जाचक झाले असते असे गृहीत धरता येते. पण आजची स्थिती अशी आहे की, महार ते बहुतेक खेडोपाडी वसणारे. प्रत्येक खेड्यात नि गावात त्यांची बहुधा दहा-वीस घरे, शंभर घरांचा महारवाडादेखील अगदी विरळा. इतर अस्पृश्यांशी त्यांचा काही संबंध नाही. इतकेच नव्हे तर महार त्यांशी नि ती चांभार भंगी प्रभृती जातीची जनता महारांशी प्रतिस्पर्धी उच्चनीचपणाच्या तुच्छतेनेच फटकून वागतात. अशा स्थितीत केवळ अस्पृश्यता घालविण्यासाठी म्हणून हिंदू समाजाच्या छातीवर नि केवळ हिंदूंना चिडविण्यासाठी हिंदू धर्मास महारांनी उघडउघड लाथाडले तर त्यायोगे स्पृश्य हिंदूंच्याच नव्हे तर चांभार प्रभृती हिंदूत्वाच्याच अभिमानी असणाऱ्या आमच्या तथाकथित अस्पृश्य हिंदू बांधवांच्या भयंकर रोषास त्यांस तोंड देणे भाग पडेल. गावचा हा रोष अगदी नैर्बंधिक कक्षेत (कायदेशीर कक्षेत) जरी व्यक्त झाला तरीदेखील सबंध गावचे गाव जर अडवून घेऊ लागले तर त्या मूठभर दरिद्री निराधार महार वसतीचे काय चालणार! महाराष्ट्रात तरी आज हिंदूंच हिंदू प्रत्येक गावी वसलेला. त्यामुळे त्या बाटलेल्या मूठभर महारवाड्यास कोणाचाही पाठिंबा नसणार.

## २१.६ सग्यासोयऱ्यांची दु:खद ताटातूट

फार काय त्यांच्याच जातीचे जे महार आप्त त्यांच्यासारखे बाटगे झालेले नसतील नि महार जातीस नि महार धर्मास वाडवडिलांच्या परंपरेप्रमाणे मर्दासारखे संरक्षून राहतील ते महारदेखील, त्या बाटलेल्या महारांचे शत्रू होऊन उठतील, बाप लेकास घराबाहेर काढील. आई मुलास पारखी होईल, प्रियकरीण प्रेमिकास सोडून जाईल. मामा, मावशी, आत्या, भाऊ, मित्र एकमेकांना जन्माचे अंतरून नाते गोते साफ तुटून हिंदू महार त्या बाटण्यापूर्वीच्या नातलगाचे पाणी पिणार नाहीत. घरबंदी होणार, सोयरीक तुटणार. हा महार तो मुसलमान! जातीची बेजात!!! ह्या घोटाळ्यात जिव्हाळ्याच्या वियोगदु:खाने सारी महार जात घरोघर विव्हळेल. फुटून फाटून तिचे आहे तेही संख्याबल नष्टेल. कौटुंबिक ताटातुटीने घरोघरी वैर नि यादवी माजेल!

बरे, धर्मांतराच्या ह्या प्लेगाची साथ पसरताच महार जातीची ही जी कौटुंबिक, आर्थिक, धार्मिक नि सामाजिक वाताहत होईल तीत गावगन्ना वसलेल्या ह्यांच्या फुटकळ हजारोहजार माणसांना मुसलमान काय साहाय्य देऊ शकेल? प्रत्येक गावी महाराष्ट्रात तरी मुसलमानांनी वीस तीस घरे आहेत! मुसलमान लोकही गावगन्ना दरिद्री, कुछ रोटी, कुछ लंगोटी! त्यांनाच बहुश: ना खायला, ना शिक्षण, ना सत्ता! ती प्रत्येक गावची दहा-वीस मुसलमान घरे त्यात ही बाटग्या महारांची दहा-वीस भर पडेल. ह्या बाटग्या महारांना ते स्वत:च कसेबसे जगणारे मुसलमान किती जमिनी वा पैसे वा नोकऱ्या देऊ शकणार ते दिसतच आहे. पुन्हा मुसलमनाही फार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील प्रत्येक गावी अस्पृश्यच आहे. हिंदू देवळात, उपाहारागृहात, घरी, विहिरीवर, सार्वजनिक जागा सोडल्या असता मुसलमानही गावोगावी अस्पृश्यच आहे! मुसलमान झाले तरी अशा प्रकारे गावगाड्यातील घरगुती अस्पृश्यता समूळपणे जाणार नाही. उलट महारी अस्पृश्यता गेली असे घटकाभर मानले तरी मुसलमानी अस्पृश्यता बोकांडी बसणार! कारण मागे पुराव्यानिशी दाखविलेच आहे की, पंजाब, बंगाल,

मद्रास प्रभृती सर्व प्रांतांतून बाटलेल्या अस्पृश्यांच्या अस्पृश्य ख्रिश्चन, कमीना, रंगरेज प्रभृती 'हीन मुसलमान' म्हणून निराळ्या जाती पडलेल्या आहेत. 'अस्सल' मुस्लिम वा ख्रिश्चन त्या बाटग्यांना असंव्यवहार्यच मानतात!!

## २१.७ आर्थिक दुर्दशाही तीच राहणार

कारण धर्मांतर केलेल्या, ते धर्मांतर फार मोठ्या संख्येने महारांनी केले तरी मुळातच मुठीमुठीने गावगन्ना पसरलेल्या त्या हजारोहजार बाटग्या महारांना महिन्याचे महिन्याला आणि जन्मभर काय शौकत अल्ली वा मि. गौबा मनीऑर्डरी धाडू शकणार आहे? मुस्लिमांचे पिढीजात बादशहा ती गोष्ट करू शकले नाहीत! स्वतः एवढे श्रीमान् मिशन पण त्यांना आज जे मूठभर बाटले आहेत त्या बाटलेल्या महारांनाच जन्मभर पोसता येत नाही - मग मोठाल्या नोकऱ्यांचे नावच दूर. गावच्या बहुसंख्य धन, बुद्धी, सत्ता हाती असलेल्या हिंदूंना धर्मांतराने चिडविल्यानंतर मूठ मूठ महार घरांची किती दुर्दशा होईल त्याची कल्पना प्रत्येक गावच्या महारवाड्याने आपल्यापुरती करावी!

तेव्हा धर्मांतराने महारांच्या सबंध जातीची अस्पृश्यता जाईल हे शक्य नसून उलट त्यांच्या जातीची भयंकर कौटुंबिक, आर्थिक नि सामाजिक दुर्दशा उडण्याचा उत्कट संभव आहे. जर कधी अस्पृश्यता जाऊनही वरील दुर्दशा पण टाळता येणारी असेल तर ती हिंदूतत्त्वाच्या ध्वजाखाली राहूनच आणि हिंदूसमाजाचे मनप्रवर्तन करूनच होय. त्याला दुसरा मार्ग नाही. जो दुसरा एक मार्ग धर्मांतर हा आंबेडकर सुचवीत आहेत त्याने अस्पृश्यता जाऊन महार जातीची उन्नती तर होणे नाहीच पण उलट महार जातीच नामशेष होणारी आहे! सोमवंशी महार असा जगात उरणार नाही!!!

मुसलमान होणे म्हणजे महार जातीचा मृत्यू! महार राहून अस्पृश्यता जाईल तर ती शोभा! जातच मरून, महारांचे स्वत्वच मारून, वाडवडिलांचा महारवंश असा जगातून नाहीसा करून, निर्वंश करून, जी अस्पृश्यता जाणार ती गेली काय, न गेली काय, सोमवंशी महार ज्ञातीचे दृष्टीने सारखीच! मनुष्य मेल्यावर त्याला अलंकार घातले काय नि न घातले काय, सारखेच!

## २१.८ पण महार राहून, हिंदू राहून, अस्पृश्यता जाणे शक्य आहे काय?

होय! होय! होय!

जर काही शक्य असेल तर तेच काय ते शक्य आहे. इष्ट आहे. सापेक्षतः सुसाध्य आहे. त्यातही आजच्यासारखी सुसंधी पूर्वी केव्हाही आलेली नव्हती. कारण आज लक्षावधी स्पृश्य हिंदूच त्या अस्पृश्यतेच्या समूळ उच्चाटनासाठी प्रामाणिकपणे झटत आहेत. आर्यसमाज, देवसमाज, हिंदू महासभा, राष्ट्रीय सभा अशा प्रमुखांतील प्रमुख नि कर्त्यांतील कर्त्या भारतव्यापी संस्था आमच्या आजवरच्या अस्पृश्य धर्मबंधूंना आणि राष्ट्रबंधूंना, पूर्वास्पृश्य म्हणजे पूर्वी जे अस्पृश्य होते पण आता स्पृश्य झालेले आहेत असे 'पूर्वास्पृश्य' करून सोडण्यासाठी या अस्पृश्यतेच्या विषवृक्षाच्या मुळावर कुऱ्हाडीचे घाव घालीत आहेत. अशा वेळी

ह्या हिंदू स्पृश्यांच्याच खांद्याशी खांदा भिडवून जर हिंदू अस्पृश्य त्यांच्याही कुऱ्हाडीचे घाव संगनमताने या विषवृक्षाचे मुळावर घालू लागतील; दोष सर्वांचा, सर्वजण मिळून तो सुधारू या, अशा मनमिळावू वृत्तीने ही सुधारणा करतील तर ही सुधारणा दहा-वीस वर्षांचे आता निश्चितपणे होऊ शकेल, हा विषवृक्ष उन्मलून पडू शकेल. जर आमच्या चांभार, मांग, वडारी, प्रभृती तथाकथित 'अस्पृश्य' धर्मबंधूंना परिस्थिती पाहून अस्पृश्यता उखडून टाकूच टाकू, हिंदूचे हिंदू राहून, धर्मांतराचे दुष्कृत्य प्राण गेला तरी न करता हिंदूंचे हिंदू राहूनच अस्पृश्यतेला गाडून टाकू म्हणून पूर्ण विश्वास वाटत आहे. त्यांनी तसे करण्याचा कृतनिश्चय केला आहे. तर केवळ महारबंधुनीच असा कुलद्रोह, जातीद्रोह नि धर्मद्रोह करण्याचा पापी विचार मनात का आणावा? अस्पृश्यता मारण्याचा महामंत्र आता सापडला आहे! तो मंत्र म्हणजे हिंदू संघटन! जन्मजात जातीभेदोच्छेदक हिंदू संघटन! आता वीस-पंचवीस वर्षांचे आत अस्पृश्यतेचा नायनाट आम्ही करून दाखवू, तरच आम्ही खरे हिंदू!

- (निर्भिड दि. २९-१२-१९३५)

## २१.९ रत्नागिरीने अस्पृश्यतेची आणि रोटीबंदीची बेडी कशी तोडली?

हिंदू राष्ट्राच्या उद्धारासाठी आणि जगातील प्रबळात प्रबळ राष्ट्रांच्या मालिकेत त्याची गणना व्हावी इतके सामर्थ्य त्यात आणण्यासाठी काय काय कार्ये केली पाहिजेत ह्यांचे टिपण करणे, ही गो ेष्ट कितीही आवश्यक असली तरी त्या कार्यापैकी लहानातील लहान कार्यही पार पाडण्यापेक्षा ते किती तरी सोपे असते! हिंदुस्थान हे पहिल्या प्रतीचे राष्ट्र कसे होईल, असा प्रश्न एखाद्या परीक्षेत घातला तर मराठी पाचवीतील मुलेही एका अर्ध्या तासात एकेक फक्कड योजना कागदाच्या चिठोऱ्यावर भराभर लिहून देतील. पण त्या योजनेपैकी अगदी सोप्यातील सोपी गोष्टही करण्याची धमक नि चिकाटी अंगी बाणण्यास नि ते कार्य करून दाखविण्यास शतके लोटली तरी अपुरीच पडतात. कारण योजना आखणे हे नेहमीच सापेक्षतः सोपे असते. ती पार पाडणे, योजनेतील कृत्ये करून दाखविणे, हे शतपटीने अवघड असते. भक्कम घर कसे बांधावे याची फक्कड रूपरेखा कोणाही शिल्पज्ञास दस रूपडी देताच आखून घेता येते. पण त्या रूपरेखेप्रमाणे ते भवन बांधून पुरे करण्यास लागणारी हजारो रूपयांची रक्कम, श्रम नि नेट यांची जुळवाजुळव करून ते भवन उभारण्याचे कार्य पार पाडणे हे त्या कागदी योजनेपेक्षा किती दुर्घट असते! पण खरा उपयोग त्या घर बांधून पुरे करण्याचाच असतो. घराची नुसती रूपरेखा कितीही परिपूर्ण नि सोयीस्कर भासली तरी त्या घराच्या रूपरेखेत काही कोणास राहता येत नाही, थंडी वाऱ्यापासून स्वतःचे रक्षण करता येत नाही!

असे असताही आज जो तो आपल्या हिंदू राष्ट्राच्या उत्थापनाच्या नुसत्या रूपरेखा आखीत बसलेला आहे. योजना आखणेही अवश्य असते पण योजना म्हणजे पूर्ती नव्हे. खरे काम म्हणजे काय काम करावे हे नुसते सांगत बसणे नसून ते काम करून दाखविणे, निदान ते काम करू लागणे हे होय! पण ते दुर्घट! यास्तव काम करून दाखविण्यापेक्षा हे केले पाहिजे, ते केले पाहिजे याच्या सोप्या चर्चेतच माणसे आपला वेळ घालवितात. अशी टिपणे करण्यातच

आपण जे करावयाचे ते देशकार्य करीत आहो अशा खोट्या समाधानाने आम्ही बहुतेकजण स्वत:ची फसवणूक करून घेत आहो. जर हे आपले राष्ट्र उद्धारावयाचे असेल तर यंव केले पाहिजे नि त्यंव केले पाहिजे, असे आम्ही तुम्हास सांगावे नि तुम्ही आम्हांस सांगावे यात सारा काळ नि शक्ती सध्या खर्चिली जात आहे. वृत्तपत्रे, मासिके, परिषदा, उत्सव ह्यांच्यातील सारे लिखाण नि चर्चा पाहा. योजना, मनोरथ, परोपदेशपाडित्यम्यांनी भरलेल्या! काय काय केले पाहिजे याची टिपणवार टिपणे लाखावारी, पुनः पुन्हा तेच तेच दळलेले दळताहेत! हे अमूक केले असे सांगणारा लेख, केलेल्या कामाचे प्रतिवृत्त (Report) अगदी विरळा!

अमुक अमुक केले पाहिजे हे जे रानड्यांच्या पिढीने सांगितले, तेच टिळकांच्या, तेच आमच्या पिढ्या सांगत आहेत. योजना लाखो लोकांच्या आता तोंडपाठ झाल्या आहेत.

पण अमुक केले, त्या योजनेपैकी अमुक काम झाले, हे सांगणारा लाखात एक आढळणेही दुर्घट! काम करण्याचे साहस नि नेट नि उरक हीच आमची मुख्य उणीव! शेकडो कामे ज्यांची त्याने आपल्यापुरती केली तरी होणारी आहेत. पण जो तो दुसऱ्याने कार्य करावे हेच सांगण्यात आपले काम संपलेसे मानतो!

तोच दोष अस्पृश्यता निवारण्याच्या कामीही आढळून येतो. अस्पृश्यता निवारणा करावे या मताचे हजारो लोकही त्या प्रश्नाचा शास्त्रार्थ, मथितार्थ, अर्थ ह्याचाच काथ्याकूट करीत बसले आहेत. तेही अवश्यच आहे, पण मुख्य काम म्हणजे ज्याने त्याने निदान आपल्यापुरती तरी अस्पृश्यता प्रकटपणे झिडकारून आपल्या घरीदारी सर्व व्यवहारात अस्पृश्यांना स्पृश्यांसमान वागविणे हेच असता त्या तत्त्वाच्या व्यवहाराचा प्रश्न आला की स्वत:च मागे मागे घेतो! अपवाद असा लाखांत एखाद्याचाच! व्यक्तीची ही गोष्ट, मग एखादे मोठे नगरच्या नगर अस्पृश्यता तोडून मोकळे झालेले सापडण्याचा योग सबंध हिंदुस्थानात दहा-पाच ठिकाणीही आढळणे कठीण! तीच गोष्ट रोटीबंदी तोंडण्याची.

यास्तव रत्नागिरी नि पुष्कळ अंशी मालवण या दोन नगरांनी अस्पृश्यतेचा आणि रोटीबंदीचा नायनाट करून जे एक राष्ट्रकार्य आपापल्या कक्षेत पार पाडले आहे, त्याचे प्रतिवृत्त (Report) त्या नगरांना भूषणावह नि इतरांस जसे उत्तेजक तसेच अनुकरणीयही होणारे आहे. इत्यर्थ या लेखात मुख्यतः रत्नागिरी, नगरी अशी (as a city) त्या स्पर्शबंदी, रोटीबंदीच्या ब्यादीपासून किती मुक्त झाली आहे आणि कशा कशा साधनांनी नि पायऱ्यांनी तशी मुक्त होऊ शकली ते थोडक्यात आम्ही या लेखात दाखवू इच्छितो.

किर्लोस्कर मासिकात ‘अमुक केले पाहिजे’ अशा नुसत्या योजनांचे आमचे प्रसिद्ध झालेले अनेक लेख पंजाबपर्यंत हजारो वाचकांना फार आवडले असे वारंवार स्पष्ट झाले आहे. ते आमच्या कार्याच्या दृष्टीने आम्हाला समाधानकारक वाटणारच, परंतु ‘अमुक एक काम, लहान म्हणा मोठे म्हणा, पण नुसते, करावयास हव्या त्या कामाच्या टिपणीतच न ठेवता करून टाकले, असे सांगणारा आणि ते कसे करता येते याचा यशस्वी झालेला प्रयोग लोकांपुढे मांडणारा हा लेख नुसत्या तात्त्विक वा टीकात्मक लेखापेक्षा कमी मनोरंजक वाटला तरी अधिक उपयुक्त नि हितावह आहे असे जाणून जर वाचकांनी लक्षपूर्वक वाचला आणि त्याप्रमाणे स्वत:च्या नगरातून किंवा निदान स्वत:च्या व्यवहारातून तरी अस्पृश्यतेचा नायनाट केला तर

आम्हास शतपटीने अधिक समाधान आणि आपल्या हिंदू राष्ट्राची शतपटीने अधिक सेवा होणारी आहे.

रत्नागिरीत दहा वर्षांपूर्वी महारांच्या सावलीचा विटाळ खरोखरीच मानीत. महार शिवला तर सचैल म्हणजे कपड्यांसुद्धा स्नान करणारे हजारो लोक असत. कर्मठ ब्राह्मणांच्या घरी महार हा शब्दसुद्धा उच्चारणे अशुभ समजून 'बाहेरचा' म्हणत. मग शाळांतून त्यांची मुले सरमिसळ बसवणे केव्हाही अशक्यच!

जिल्ह्यात तर अस्पृश्यता याहूनही कडक. चांभार, महार, भंगी यांची आपसातही तशीच कडक अस्पृश्यता. कोणी कोणास शिवणार नाही. जवळ घेणार नाही, घरी जाणार नाही. महार, चांभार, भंगी ही नावे स्पृश्य लोकांमध्ये शिवी म्हणून वापरली जात. महारही भंगी कुठला! म्हणून दुसऱ्या महारास शिवी देत.

अशा स्थितीत सन १९२५ च्या गणेशोत्सवात आम्ही अस्पृश्यतेच्या घातुक रूढीस उच्चाटण्यासाठी चळवळ आरंभिली. तिच्यापासून हिंदू राष्ट्राच्या संघटनेस केवढा अडथळा होत आहे, ती किती अन्याय्य नि अधर्म्यही आहे, प्रभृती विषयांवर व्याख्यानांची, लेखांची, संवादांची झोड उडवून दिली. इतर काही मोठे कार्य होत नाही तर निदान हे एवढे एक तरी राष्ट्रकार्य तुमच्यापुरते करून टाका, हे कार्य करणे सर्वस्वी तुमच्या, ज्याच्या त्याच्या हाती आहे, इत्यादी प्रकारे बुद्धिवाद करून लोकमत बऱ्याच मोठ्या प्रमाणात अनुकूल करून घेतले. पण ते केवळ तत्त्वापुरते. प्रत्यक्ष कार्य करण्यास, ते स्वतः आचरून दाखविण्यास मूठभर माणसेही पुढे येईनात. तरीही जी काही माणसे अस्पृश्यता स्वतः पाळणार नाही असे म्हणाली, त्यांस घेऊन सोप्यातली सोपी गोष्ट म्हणून महारवाड्यात भजने करण्यास जाऊ लागलो.

१) महारवाड्यात भजने नि पाहणी करण्याच्या कामास आरंभिले. महारांस गावात आणून भजनास मंडळीत बसविणे त्या काळी इतके कठीण होते की, ही पुढे आलेली स्वयंसेवक मंडळीही ते करू धजेनात. यास्तव स्पृश्यांनीच महारवाड्यात जाण्याचा कार्यक्रम आखला. पण प्रथम प्रथम महारवाड्यात वा चांभारवाड्यात आम्ही पांढरपेशी लोक गेलो की, महार-चांभारच घराबाहेर येईनात. हाका मारल्या तर घरात नाय म्हणून आतूनच कोणी तरी सांगावे. आम्ही स्वतः सतरंजी बरोबर नेऊन अंथरली नि बसलो तरी ते बैठकीवर बसेनात, त्यांनाही ते संकट वाटे. कधी सात जन्मी न घडलेली गोष्ट. कित्येक महार-चांभारांना 'बामणावाण्यांनी' त्यांच्या वाड्यात यावे याचा तितकाच तिटकारा वाटे, अधर्म घडलासे वाटे, की जितका भटाभिक्षुकादी स्पृश्यांना वाटत असे. बळेबळे भजन करून मंडळी घरी परतत तेव्हा घरोघर एकच गंमत उडे. कोणाची आजी कोणास घरातच घेईना. कपडे बदलण्याच्या अटीवर काय ते कुणी घरात जाऊ शके. भजनाला येणाऱ्या मंडळीतच काहीजण ती गोष्ट आपद्धर्म म्हणून करीत. सद्धर्म म्हणून नव्हे, यास्तव ते घरी जाताना स्वतःच होऊन स्नान करीत, मग घरात शिवत. इतक्यावरच गोष्ट थांबली नाही. दहा पाच वेळा महारवाड्यात रात्री भजनास आणि नंतर दसरा, संक्रात प्रभृती प्रसंगी सोने वा तिळगूळ वाटण्यास अस्पृश्य वस्तीत जाऊन परत येऊन आम्ही मंडळी गावभर तशीच शिवाशीव पद्धतशीरपणे कालवितो हे पाहून त्यास संघटित विरोध होऊ लागला. महारवाड्यात जाऊन स्नान न करता घरात येणाऱ्या आम्हा मंडळीवर त्या पापासाठी बहिष्कार टाकण्याच्या भयाने प्रायश्चित्त घेणे भाग पाडण्याची धमकी मिळाली. श्री. आप्पाराव पटवर्धन

यांना त्यांच्या गावी बहिष्कार पडला होता ते प्रसिद्धच आहे. पण या विरोधास न जुमानता हिंदू सभेची बरीच मंडळी वारंवार महार-चांभार वाड्यात जाऊन त्यांचे पाणवठे निरीक्षित, औषधे टाकून निरोगी करीत, झाडझूड करीत, तुळशी, फुलझाडे लावीत, भजने करीत, साबण वाटून कपडे धुववीत आणि घरोघर परत जात. होता होता केवळ सवयीमुळे लोकांस ते मानवले. तेवढा विटाळ ढिलावला.

पण तिथेच जर चळवळ थांबती तर तिथेच ती खुरटून जाती. पुढची पायरी घेतल्यावाचून मागची मागे पडत नाही. यासाठी महारवाड्यातून जाऊन भजने करणे समाजाच्या सवयीचे होते न होते तोच महारचांभारांना गावात आणून संमिश्र भजने करण्यास आरंभिले.

२) अस्पृश्यांसच गावात आणून संमिश्र भजने, व्याख्याने इत्यादी समारंभ यातही प्रथम तीच अडचण, तीच खळबळ. भरवस्तीत स्पृश्य मंडळी चांभार महारांस भजनात वा सभेत सरमिसळ घेण्यास जितका तिटकारा करीत तितकाच हे महार-चांभारही तिथे बसण्याचा तिटकारा करीत, त्यासही ते आवडेना. ज्यांस आवडे ते भीत. मोठ्या कष्टाने, पैसे देऊन देखील दहा-पाच मंडळींना गावात प्रकटपणे आमच्या संघटक स्पृश्य मंडळींना एका बैठकीवर बसून भजन करण्यास वा एखाद्या सभेत एकाच टोळक्यात उभे राहण्यास मान्य करून आणावे. गावात चालताना सर्वांसमक्ष त्यांच्या खांद्यावर हात टाकावा, हातातील वस्तू उघड उघड द्यावी घ्यावी, की ज्यायोगे अस्पृश्यांस शिवून घेण्याची नि नागरिकांना त्यांना शिवताना वारंवार बघण्याची सवय लागावी. हळूहळू लोकांची मने वळवून काही पालख्यांच्या मिरवणुकीत नि दिंड्यात अस्पृश्यांस जागा मिळू लागली. काही हिंदू संघटनाभिमानी दुकानदारांनी आपल्या दुकानांच्या पायऱ्यांवर उभे राहू दिले. काहींनी नंतर इतरांप्रमाणे त्यांच्या हातात स्वहस्ते सामान देण्याचा, दुरून न टाकण्याचा परिपाठ पाडला.

३) शाळांतून मुले सरमिसळ बसविण्याचे आंदोलन सन १९२५ पासूनच हिंदुसभेने हाती घेतले. अस्पृश्यांच्या शैक्षणिक उन्नतीस्तवच नव्हे तर अस्पृश्यतेच्या भावनेवरच्या मुळावरच कुऱ्हाड घालण्यासाठी शाळेतील मुलांना सरमिसळ बसविण्याची सवय लावणे हा सर्वोत्तम उपाय होता. पण तो जितका दूरवर परिणामकारक नि मूलग्राही तितकाच दुर्घटही होता. साऱ्या जिल्ह्यात शाळाशाळांतून अस्पृश्य मुले कुठे गडग्याच्या, कुंपणाच्या भिंतीपाशी, उघड्यावर तर कुठे बाहेरच्या ओट्यावर किंवा पडवीच्या कोपऱ्यात दडपलेली. त्यांच्या पाट्या पेन्सिलीस मास्तरही शिवत नसत. काही मास्तर त्या मुलांना मारावयाचे तरी छडी फेकून मारीत! दोन-चार अपवाद सोडले तर कुठेही सरमिसळ मुले बसविण्याचे नावही काढण्याची सोय नव्हती. स्वतः रत्नागिरी नि मालवणला एकही शाळा सरमिसळ नसे. सरकारी एक अर्धी कच्ची आज्ञा - मुलांत भेदभाव न करण्याची १९२३ सालची होती. पण तिला स्कूल बोर्डानेही कुठल्या टाचणाला टाचून टाकली होती ती सापडणेही कठीण गेले. अशा स्थितीत हिंदुसभेने तो प्रश्न सन १९२५ त हाती घेतला. दापोली, खेड, चिपळूण, देवरुख, संगमेश्वर, खारेपाटण, देवगड, मालवण प्रभृती यच्चयावत मोठमोठ्या नगरातून दौऱ्यावर दौरे काढून, व्याख्यानांची झोड उठवून लोकमत वळवून, अनेक शाळांतून मुले सरमिसळ बसविली. रत्नागिरी नगरात तर प्रत्येक शाळेचे प्रकरण स्वतंत्र लढवावे लागले. या कामी वाणी, ब्राह्मण वर्गापेक्षाही मोठा त्रासदायक विरोध मराठा, कुळवाडी, भंडारी प्रभृती अशिक्षित नि वृत्तपत्रीय वाचनाच्या अभावी ज्यांना हिंदू राष्ट्राच्या

संघटित आकांक्षांची आच अशी लागलेलीच नव्हती; त्या वर्गाचाच जिल्हाभर गावोगाव झाला. कोतवडे, फोंडा, कणकवली, शिपोशी, कांदळगाव, आडिवरे प्रभृती साठ-सत्तर गावी सं ंप, विरोध, मारामाऱ्या, प्रसंगी जाळपोळ, यांची नुसती धुमश्चक्री उडली. स्कुल बोर्ड डगमगले. जिल्हा बोर्डाने तर १९२९ मध्ये सरमिसळ बसविणे अवश्य नसावे म्हणून विरुद्ध ठराव केला! पण हिंदुसभेने चिकाटी सोडली नाही. इकडे लोकमत वळवीत, तिकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नि विधीमंडळापर्यंत सारखी चळवळ चालविली. त्यातही ज्यांच्या मुलांसाठी ही धडपड ते अस्पृश्यच मुले धाडण्यास सिद्ध नसत. भीतीने काही, पण पुष्कळसे भीती नव्हती तिथेही मुले शाळेत धाडीनात. कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्वच कळेना. आईबापांस तीन तीन रूपये पगार देऊन, पाट्या पेन्सिली फुकट देऊन, कपडे देऊन, महार, चांभार, भंगी मुले शाळांतून बळेबळे बसवावी लागत. पावसाळ्यात त्यांनी म्हणावे. 'छत्र्या द्या, शाळेत मुले धाडतो.' त्याप्रमाणे सभेने छत्र्या द्याव्या, त्या हातात पडल्या की, लगेच त्या अस्पृश्य मुलांनी गुंगारा द्यावा! पण हळुहळू त्यांच्यातही शिक्षणाची बरीचशी आवड उत्पन्न झाली. मालवण, रत्नागिरी प्रभृती ठिकाणी त्यांच्या मोठमोठ्या परिषदा, सभा भरविल्या. हजारो रूपयांचा व्यय नि सात वर्षे सारखी चळवळ करता करता शेवटी रत्नागिरी नगरातीलच नव्हे, तर जिल्हाभर बहुतेक शाळा सरमिसळ बसू लागल्या. सरकारी आज्ञाही नि:शंक भाषेत 'सरमिसळ बसवा' म्हणून कडकपणाच्या निघाल्या. स्कूल बोर्डही धीटपणे त्या वर्तवू लागले. हिंदुसभेने प्रत्येक गाव टिपून टिपून वरचेवर पाहण्या केल्या. चोरून मारून अनेक शाळांतून मुले निराळीच बसत. पण प्रतिवृत्त तेवढे वर खोटेच धाडीत की मुले सरमिसळ बसतात! ते सर्व प्रकार उघडीकीस आणून आणून काही मास्तरांना दंड करविले. दोन-चार शाळा बंद झाल्या. अशा अनेक उपायांनी शेवटी शाळांतून आज अस्पृश्यता उखडली गेली आहे. मुले जिल्हाभर सरमिसळ आहेत. पुढील पिढीची अस्पृश्यतेची भावना लहानपणाच्या सवयीनेच नष्टल्यामुळे शाळांतून मुले सरमिसळ बसविण्यात अस्पृश्यतेच्या मुळावरच कुऱ्हाड पडली आहे. शाळांतून मुले सरमिसळ बसविल्याने एका बाजूस अस्पृश्यांचे शिक्षण नि राहणी सुधारून ती उन्नत होतात नि दुसऱ्या बाजूस अस्पृश्यांतील अनेक विद्यार्थी आपल्या बरोबरीने नि प्रसंगी अधिकही बुद्धीमानही नि चलाख असू शकतात, या अनुभवाने स्पृश्यांचा खोटा अहंकार नाहीसा होतो. लहानपणाच्या समतेच्या सोबतीने शिवाशिवीची नि विटाळाची जाणीवच उखडली जाते. यासाठी अस्पृश्यता-निवारणाच्या सर्व साधनात शाळांतून मुले सरमिसळ बसविण्याचे साधन हे फार परिणामकारक आहे, असा हिंदूसभेचा ठाम सिद्धांत होता. तिने सहा-सात वर्षे यापायी किती कष्ट सोसले ते तिच्या पंचवार्षिक प्रतिवृत्ताच्या दोन भागात प्रत्येक कार्यकर्त्याने अवश्य वाचावे असा आमचा अनुरोध (शिफारस) आहे.

## २१.१० गृहप्रवेश

शाळांतून मुले सरमिसळ बसण्याची चळवळ जिल्हाभर चालूच असता रत्नागिरी नगरात अस्पृश्यतेची हकालपट्टी घरातूनही व्हावी म्हणून सन १९२७ पासूनच हिंदुसभेने गृहप्रवेशाचा उपक्रम केला. दसरा नि संक्रांत ह्या दोन दिवशी सोने नि तिळगूळ वाटावयासाठी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य प्रभृती जातींच्या मंडळीसहच महार, चांभार, भंगी ह्यांचेही दोन दोन लोक घेऊन

हिंदूसभेच्या वतीने घरोघर जावे नि अंगणातूनच विनवावे की, 'आम्ही सोने द्यावयास आलो आहो, आपण आपल्या घरी ख्रिश्चन मुसलमानादिक अहिंदूस जिथपर्यंत येऊ देता तिथपर्यंत तरी आम्हा हिंदूस येऊ द्यावे! अहिंदूहून देखील तुमच्या हिंदुधर्मबंधूस अस्पृश्य लेखणे म्हणजे हिंदूधर्मासच अपमानिणे नि उपमर्दिणे नव्हे काय? ह्या विनंतीसरशी काही हिंदूंचे हृदय कळवळावे, त्यांनी महारादिकांसह सर्वांस ओटीवर, कुणी तर बंगल्यातही नेऊन तिळगूळ नि सोने द्यावे-घ्यावे. हिंदुधर्मकी जय च्या जयजयकारात मंडळींनी परतावे. परंतु पहिली दोन वर्षे अनेकांनी अंगणातच येऊन तिळगूळ नि सोने द्यावे-घ्यावे, घरात येऊ देऊ नये! काहींनी तर रागावून, अपशब्द बोलून, अंगणातूनदेखील बाहेर चालते व्हा म्हणून सांगावे! पण तरीही न रागावता सभेच्या स्वयंसेवकांनी त्यांस समजावीत परतावे. दोन-चार वर्षे हा उपक्रम सारखा चालू ठेवला. तीच रूढी होत गेली. शेवटी सन १९३० वर्षीच्या दसऱ्यास गावभर सरसकट सोने वाटल्यानंतर घरी येणाऱ्यांची वर्तमानपत्रांत नावे छापली जातात हे माहित असताही, शेकडा ९० टक्के घरांनी अस्पृश्यांसह सर्वांस घराघरांमध्ये अहिंदू येतात तेथवर नेले, कोणी पानसुपाऱ्या बंगल्यात केल्या, तर कोणी पेढे वाटले! अंगणातून परतवून देणारा एकही निघाला नाही. बाजारातील बहुतेक दुकानातून (उपाहारगृहे सोडून)अस्पृश्यांना मिळू लागला तेव्हा तो उपक्रम पुढे अनावश्यक म्हणून संपविला.

## २१.११ स्त्रियांचे हळदी कुंकू समारंभ

सुधारणेचे नि स्त्रीचे विशेषच वाकडे अशी समज आहे. त्यातही त्यांना एखादी सुधारणा पटली वा आवडली तरी ती आचरण्याची किंवा बोलून दाखविण्याचीही स्वतंत्रता नसावयाची. अशाही स्थितीत त्यांच्यातूनही अस्पृश्यतेची भावना काढून टाकण्यासाठी व्याख्यानादी बुद्धिवादांनी मनोभूमिका साधारणपणे अनुकूल करून घेतल्यानंतर संमिश्र हळदीकुंकवाचे समारंभ चालू केले. सन १९२५ मध्ये पहिल्या हळदीकुंकवात अस्पृष्य स्त्रियासुद्धा काही केल्या स्पृश्य स्त्रियांत मिसळेनात आणि उलटपक्षी त्या महारचांभारणीस स्वहस्ते कुंकू लावण्यास साऱ्या रत्नागिरीमध्ये मोठ्या प्रयासाने अवघ्या पाच स्पृश्य स्त्रिया सिद्ध झाल्या. पुढे उसाच्या गाड्या लुटण्याचे किंवा पेढे वाटण्याचे आमिष अशा वेळी दाखवावे. अस्पृश्य स्त्रिया त्यामुळे पुष्कळ येत चालल्या आणि बुद्धिवादाच्या बळे स्पृश्य स्त्रियांची मनेही निवळत जाऊन त्या हळदीकुंकू समारंभातून शेकडो स्त्रिया कर्तव्य म्हणून मनमोकळेपणे परस्पर हळदीकुंकू देऊ घेऊ लागल्या. पुढे यात्रा, सभा, संमेलनातून गावात प्रतिप्रसंगी स्त्रिया वा पुरुष स्पृश्यास्पृश्य भेदभाव विसरून सरमिसळ बसण्याफिरण्याची रीतच पडली नि पुरुषांच्या प्रमाणे स्त्रियांतही अस्पृश्य स्त्रियांचा सार्वजनिक प्रसंगी तरी विशेष विटाळ वाटेनासा झाला.

## २१.१२ गाड्या, सभा, नाटकगृहे

पूर्वी नाटकगृहातूनही अस्पृश्य स्त्रिया नि पुरुष स्पृश्यांपासून निराळे बसत. सभेने ती रूढी मोडण्यासाठी प्रयत्न करू लागताच प्रथम प्रथम मोठी बाचाबाची होई. एकदा बॅ. सावरकरांच्या उःशाप नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी फुकट खुर्चीची तिकिटे देऊन अस्पृश्य मंडळीस बुद्ध्या सरमिसळ असे प्रमुखस्थानी बसविले. आणि स्त्रियंासही तिकिटाप्रमाणे सरमिसळ बसविले.

तेव्हा खुर्चीवर महारांना पाहून एवढा गोंधळ झाला की, मॅजिस्ट्रेटलादेखील शांतताभंगाची भीती वाटून मध्ये पडावे लागले पण बॅ. सावरकरांनी स्वत:ची हमी देऊन, सर्वांचीच समजूत घालून महारांचा सरमिसळ बसण्याचा हक्क प्रस्थापिला. हळूहळू ती रीतही समाजाच्या अंगवळणी पडली. तसेच गावातील गाडीवाले पूर्वी अस्पृश्यांस आत घेत नसत. यासाठी त्यांच्याशी अनेक वेळा चर्चा करून 'मुसलमानास घेता, अस्पृश्य आपले हिंदू! त्यांना कसे टाकता?' अशी समज पाडण्यात आली. काही वळले पण काहिंनी 'नोकरी सोडू पण महार चांभारांना गाडीत बसविणार नाही' असाही त्रागा केला! जे वळले त्यांच्या गाड्यांतून महारांना स्वखर्चाने घेऊन हिंदूसभेची मंडळी काही दिवस उगीच गावात बंदरावर फिरावयास जात. हेतू हा की, लोकांच्या दृष्टीने ते दृश्य पाहण्याची सवय व्हावी! हळूहळू तीही रीत अंगवळणी पडून गाड्यांतून अस्पृश्यतेची हकालपट्टी झाली.

## २१.१३ हिंदू बँड

पूर्वास्पृश्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास्तव त्यांना भांडवल देऊन बँड घेतला नि शिकवीला. पूर्वी बँडवाले मुसलमान असत. ते हिंदूंची इच्छा नसली तरी मशिदीवरून हिंदूंच्या मिरवणुकी जाताना वाद्ये बंद ठेवीत. ती रूढी पाडीत. यास्तव सर्व हिंदूंनी हाच पूर्वास्पृश्यांचा बँड लावावा असा प्रचार केला नि रत्नागिरीच्या हिंदूत्वाभिमानी समाजाने कसोशीने तो नियम पाळला. त्यामुळे दुसरा महत्त्वाचा लाभ अस्पृश्यता संस्कारातही नष्ट झाली हा झाला. लग्नामुंजीतून सनईवाल्यासारखेच हे अस्पृश्य बँडवाले ब्राह्मणादिकांच्या व्याहीविहिणींच्या दाटीत सरमिसळ मिरवू लागले, वावरू लागले. अस्पृश्यांचे पूर्वास्पृश्य झाले! आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कोर्ट कचेऱ्यांतून अनेक पूर्वास्पृश्यांना नोकऱ्या लावून दिल्या.

## २१.१४ पुर्वास्पृश्य मेळा नि देवालय प्रवेश

सन १९२६ पासूनच देवालय प्रवेशाचा प्रश्नही हाती धरला होता... गणपत्युत्सवासाठी एक महार-चांभार-भंग्याचा मेळा काढला. पण ती अस्पृश्य मुलेही आपसात शिवेनात, येईनात, चणे, खावू वाटला तर येत, पण महार हा चांभाराचे चणे खाईना, तो भंग्याचे! ते सारे जमविले तर त्या मेळ्यास शिकवीण्यास जाग मिळेना, अंगण मिळेना! पुढे त्यास शिकवून सार्वजनिक गणपती विठ्ठलमंदिरात असे, तिथे मोठ्या सायासाने बाहेर अंगणात दूर उभे राहण्याच्या करारावर अनुज्ञा मिळवून नेले. तेथे मेळ्याने एकच खळबळ उडाली! शेकडो लोक ते अद्‌भुत बघावयाला भोवती दाटली - पण दहा दहा हात अंतरावर! दुसऱ्या वर्षापर्यंत एकंदरीत अस्पृश्यता वरील नाना बाजूंनी केलेल्या आघातांमुळे इतकी घायाळ झाली होती की, तो पूर्वास्पृश्य मेळा देवळाच्या अंगणातून पायरीवर लोकांनीच आपल्या आग्रहाने नेला आणि शेकडो लोक त्याला शिवून तसेच देवळातल्या सभेत जाऊन बसले. हे कृत्यदेखील अनेक जुन्या लोकांस भ्रष्टाकारी वाटले. पण आणखी दोन वर्षांच्या आत सन १९२९ ला त्या पूर्वास्पृश्य मेळ्याचाच अखिल हिंदूमेळा झाला. मॅट्रिक वा कॉलेजपर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यांपासून तो स्वतंत्र धंदे करणाऱ्यांपर्यंत शंभर निवडक स्पृश्य तरुण त्या पूर्वास्पृश्य मेळ्यात मिसळले आणि हजारो लोकांसमक्ष नि त्यांच्या टाळ्यांच्या अनुमोदनात त्या विठ्ठल मंदिराच्या भर

सभामंडपात प्रवेश केला. पूर्वास्पृश्यांसह अर्धा तास टोलेजंग अखिल हिंदू मेळ्याचा कार्यक्रम सभामंडपात झाला! त्या दिवसापासून म्हणजे १९२९ पासून विठ्ठलमंदिरात गोकुळअष्टमी प्रभृती उत्सवात, अधूनमधून कीर्तनात, सभांत देवालयप्रवेशास अनुकूल असलेल्या शेकडो लोकांच्या साहाय्याने पूर्वास्पृश्य मंडळी आजवर प्रकटपणे जात आहेत. देवालयप्रवेशास असमंत असणारा वर्ग त्या कृत्यास निषेधीत आहे. देवळात पुढे पूर्वास्पृश्यांसह एका एकादशीस दोनशे तीनशे हिंदू तरुणांनी सभामंडपात प्रकटपणे एक तासभर भजन करून त्याचे छायाचित्रही घेतले. सारांश विठ्ठलाचे मंदिर पूर्वास्पृश्य तरुणवर्गाने सरसहा उघडे केले. समाजाच्या दुसऱ्या जुन्या मताच्या वर्गाने ते सरसहा सम्मातीले नाही. अशा समाजस्थितीतच पतितपावनाच्या अखिल हिंदू मंदिराची स्थापना होऊन देवालयप्रवेशाचा प्रश्न निराळ्याच रीतीने, पण अत्यंत यशस्वीपणे निकालात निघाला.

## २१.१५ पतितपावनाची स्थापना

जुन्या देवळास यच्चयावत हिंदूस उघडण्याची खरी किल्ली जुन्या पंचांपाशी सापडणारी नसून नव्या अखिल हिंदू देवालयांच्या पंचापाशीच मिळू शकते. हे तत्त्व ओळखून हिंदुसभेने एक अखिल हिंदू देवालय बांधण्याची ठरविले. जुन्या देवळास उघडण्याचे समाजाच्या मनात आले तरी नैर्बंधिक (Legal) अडचणीही मार्गात आडव्या येतात. परंतु अखिल हिंदू नव्या देवळात स्पृश्यास्पृश्य समाज बेखटक एकत्र पूजा प्रार्थना करण्यास शिकला, ती सवय लागली की, जुन्या देवळाचे एक तर महत्त्वच कमी होत किंवा तेथे स्पृश्यास्पृश्य हिंदू जाऊ-येऊ लागण्यात अनिष्ट असे काहीच वाटेनासे होते. यास्तव हिंदूसभेच्या विनंतीवरून दानशूर श्रीमंत भागोजीशेठ कीर यांनी दोन-अडीच लक्ष रूपये खर्चून पतितपावनाचे अखिल हिंदू मंदिर नि संस्था स्थापून आजवर चालविली आहे. ह्या अखिल हिंदू मंदिराची कीर्ती भरतखंडभर इतकी दुमदुमली आहे की, तिचे वर्णन इथे देणे अनावश्यक व्हावे. रत्नागिरीस अस्पृश्यतेच्या दुष्ट रूढीत वरील सर्व प्रकारच्या आघातांतूनही जो थोडा दम उरला होता तो ह्या श्री पतितपावन संस्थेच्या स्थापनेसरशी उखडून गेला. हजारो स्पृश्यास्पृश्य स्त्रीपुरुष आज चार वर्षे सरमिसळ दाटताहेत. पोथीजात जातीभेदाच्या मानीव उच्चनीचतेस थारा न देता हिंदूमात्र तितका जिथे एकमुखाने सांघिक पूजाप्रार्थना करू शकतो आणि करतो असे हिंदू जातीचे हे एक राष्ट्रीय केंद्र होऊन बसले आहे. तेथे चाळीतून ब्राह्मण क्षत्रियादी कुटुंबासहच पूर्वास्पृश्य कुटुंबही समानतेने शेजारी शेजारी राहतात. विहिरी, बाग, मंडप सर्व हिंदूमात्रास समतेने वापरता येतात. स्वच्छता प्रभृती प्रत्यक्ष गुणांचा तेवढाच भेद मानला जातो. अमक्याच जातीत जन्मला एवढ्याचसाठी कोणी जन्माचा उच्च वा नीच, स्पृश्य वा अस्पृश्य मानला जात नाही. रत्नागिरीच्या हिंदू समाजानेही ह्या नियमांनी ह्या संस्थेस आत्मसात करून तिला राष्ट्रीय स्वरूप आणून दिले. किल्ल्यावरील शेठजीचे भागेश्वराचे मंदिरही पूर्वास्पृश्यांस उघडे झाले.

## २१.१६ अखिल हिंदू उपाहारगृह

दहा वर्षांपूर्वी रत्नागिरीस उपाहारगृहादी जागी अस्पृश्यांस चहा प्रभृती पदार्थ मार्गावर उभे राहून स्वत:च्या कपात वा नरोटीत दुरून ओतले जात. मुसलमानांदिकांस बाके, कप देऊन

स्वागतिले जाई! अस्पृश्यता निवारणाची चळवळ बळावता बळावता जेव्हा रोटीबंदीच तोंडण्यापर्यंत सामाजिक क्रांतीच्या चळवळीची धुमश्चक्री पोचली, तेव्हा अखिल हिंदू उपाहारगृहाची संस्था स्थापून तीत यच्चयावत पोथीजात भेदभावास तिलांजली देण्यात आली. महार, मराठे, ब्राह्मण, भंगी साऱ्या जातीचे शेकडो लोक प्रकटपणे तीत सरमिसळ चहापाणी नि उपाहार करीत आहेत. उपाहार करणाऱ्यांची उघडपणे नावे टिपून प्रसिद्धण्यात येतील असा स्पष्ट नियम आहे. तरीही शेकडो स्पृश्यास्पृश्य जातीने कोणासही जातीबहिष्कारार्ह मानले नाही.

## २१.१७ साऱ्या जिल्हाभर प्रचार नि मालवणलाही अस्पृश्यतेस मुठमाती!

रत्नागिरीच्या ह्या सामाजिक सुधारणेच्या आंदोलनाचे धक्के साऱ्या जिल्हाभर देऊन व्याख्याने, दौरे, परिषदा, सहभोजने यांचा धुमाकूळ चहूकडे घालून जिल्ह्यातही अस्पृश्यतेची नि पुढे रोटीबंदीची पाळेमुळे ढिली करून सोडली गेली. त्यातही सभेच्या प्रचारास अनुकूल अशी भूमी मालवणाच्या प्रगत समाजात सापडली. तिकडच्या अप्पाराव पटवर्धन प्रभृती कार्यकर्त्यांच्या सहकाऱ्याने नि समाजाच्या प्रगत पाठिंब्याने आज मालवणला अस्पृश्यतेचा नायनाट झाला आहे. तीन चार मोठी देवळेही निर्विवादपणे पूर्वास्पृश्यांस उघडी आहेत.

## २१.१८ अस्पृश्यतेच्या मृत्यूदिन! स्पर्शबंदीचा पुतळा जाळून रोटीबंदीवर चढाई!

अस्पृश्यतानिवारणाचा हा एक राष्ट्रीय प्रश्न तरी रत्नागिरीने नि मालवणने आपल्या कक्षेपुरता असा पूर्णपणे सोडवून अस्पृश्यांचे पूर्वास्पृश्य करून सोडले! ह्या नगरांच्या सीमेत पाऊल टाकताच पाच हजार वर्षांची जन्मजात अस्पृश्यतेची बेडी अस्पृश्य बंधूंच्या पायातून खळकन तुटून पडते! व्यक्तीव्यक्तीचा मतभेद कितीही असला, तरी ही नगरे अशी (as cities) सामुदायिक नात्याने अस्पृश्यतेच्या पापापासून मुक्त झालेली आहेत आणि तीही केवळ बुद्धिवादाच्या बळे, सामाजिक मन:क्रांतीच्याच आधारे! ही सुधारणा प्रकटपणे उद्‌घोषविण्यास्तव दि. २२ फेब्रुवारी सन १९३३ ला रत्नागिरीस मोठ्या गाजावाजात हजारो अब्राह्मण भंगी हिंदूबंधूंच्या समक्ष नि अनुमतीने जाळण्यात आला. तो दिवस अस्पृश्यतेचा मृत्यूदिन म्हणून साजरा करण्यात आला.

या दिवसापासून स्पृश्यबंदीच्या पुढारी पायरी चढून रत्नागिरीने रोटीबंदीच्या ठाण्यावर हल्ले चढविले. हजारो स्त्रीपुरुषांनी जातपातीचे खुळचट भेदभाव झिडकारून सहभोजनाची धुमश्चक्री उडवून दिली. सकाळी दहा वाजता भंग्याचा मैला साफ करण्याच्या उपयुक्त कार्यात गढलेली भंगीण स्नान करून स्वच्छ वेषात बारा वाजता सुवासिनी म्हणून पतितपावनात जेवावयास येते नि नगरातील मोठमोठ्या प्रतिष्ठित ब्राह्मणादिक घराण्यातील शेकडो महिला तिच्यासह पंगतीत प्रकटपणे नाव छापून सहभोजने करतात! रोटी बंदीची बेडी ही अशी तोडून टाकल्यामुळे गेल्या गणोशोेत्सवात ता. ११ सप्टेंबर १९३५ ला रत्नागिरीने रोटीबंदीचा राक्षसी पुतळाही जाळून टाकला!

आज रत्नागिरीत बहुश: प्रत्येक हिंदू नागरिक एक तर सहभोजनात तरी जेवलेला आहे, नाही तर संपर्कित सहभोजकाबरोबर तरी जेवलेला आहे. म्हणजे सहभोजन हे जातीबहिष्कारार्ह

कृत्य मानले जात नाही. याचाच अर्थ असा की रत्नागिरीने स्पर्शबंदीचीच नव्हे तर रोटीबंदीचीही बेडी तोडून टाकली आहे! अवघ्या दहा वर्षांच्या आत घडलेली ही सामाजिक क्रांती एका अर्थी आश्चर्यकारक नि भूषणावह आहे खरी. पण ती 'अकरणान्मदंकरणं श्रेय:' याच नात्याने काय ती होय, हे मात्र विसरता कामा नये! या दहा वर्षात जग किती पुढारले - तो झारशाहीतला रशिया वैमानिक वेगाने लेनिनशाही झाला! आणि आम्ही पांगुळगाड्यावर चालू शकलो! पण तरीही मृतवत्होतो ते चालू लागलो, एवढेच विशेष! हे न विसरता केले याहून सहस्रपट करून दाखवू तर खरे!

***

# २२ महाराष्ट्रभर सहभोजनांचा धूमधडाका! (१९३६)

किर्लोस्कर मासिकाच्या सन १९३५ च्या फेब्रुवारी अंकात 'जातीभेद मोडावयाचा म्हणजे काय करावयाचे?' हा लेख लिहिला होता. त्यात आम्ही असे दाखविले होते की, जन्मजात म्हणविणाऱ्या परंतु वास्तविकपणे केवळ पोथीजात असणाऱ्या या आजच्या जातीभेदास उच्चाटिण्याच्या कार्यी सहभोजन हेच अमोघ साधन आहे. रोटीबंदीची बेडी तुटली की, जातीभेदाची नांगीच गळली म्हणून समजावे! जातीभेद तोंडणे म्हणजे दुसरे तिसरे काही करावयाचे नसून जातीभेदांचे पूर्वीचे जे एक महत्त्वाचे उपांग असे, त्या व्यवसाय बंदीची आज जी गत झालेली आहे, तशीच रोटीबंदीची गत करून सोडली पाहिजे.

पूर्वी जातीभेदाचे एक अत्यंत महत्त्वाचे लक्षण म्हणजे व्यवसायबंदी हेच होते. ब्राह्मणांनी धोब्याचा, सुताराचा, लोहाराचा, धंदा करणे निषिद्ध, लोहाराने मासोळीचा निषिद्ध, सुताराने भटपणाचा निषिद्ध. पण आज काय आहे? धंद्याचा जातीशी काही एक संबंध राहिला नाही. जातीचा प्रश्न निराळा, धंद्याचा निराळा. वाटेल त्याने वाटेल तो धंदा केला तरी त्याची जात जात नाही, हीच आज इतकी ठाम समजूत झालेली आहे की, जणू काय तेच मूळचे श्रुतिस्मृतीपुराणोक्त सनातन शास्त्र होय! अगदी वेदशाळेतील गुरुजीस जरी म्हटले की, 'अहो, ते गोडबोले किराण्याचे दुकान घालून बसले आहेत, शामभट म्हशी ठेवून दूध विकतात आणि मवांडेकर विविध विक्रेत्याचे (जनरल मर्चंटचे) दुकान घालून त्यात विलायती बूट विकताहेत, त्यांना ब्राह्मणांनी जातीच्युत ठरवावे तर ते वेदशास्त्रसंपन्न गुरुजीसुद्धा आज अगदी ठामपणे म्हणतील, 'ते काय म्हणून? दुकानाचा वा दूध विकण्याचा ब्राह्मणपणाशी काय संबंध? दुकान घातले म्हणून काय ब्राह्मणाची जात बदलते वाटते? खुळा कुठला! धंदा हा पोटापाण्याचा प्रश्न. जातीचा नव्हे!' धंदा लोहाराचा, वैद्याचा, डॉक्टराचा, गाडी वाल्याचा, मोटारीचा, गवळ्याचा कसलाही केला तरी शिंपी जातीत जन्मला तो जात शिंपीच लावतो. अपवाद अस्पृश्य धंद्याचा तेवढा काहीसा आहे. पण यांत्रिक साहाय्याने केल्यास त्याही धंद्याने जात जात नाही. मराठा, ब्राह्मण, वाणी जात न गमावता बुटांचा यांत्रिक कारखानदार होऊ शकतो. चामड्याने केलेले पदार्थ तर बेखटक शेकडो ब्राह्मण, मराठा, वाणी दुकानदार प्रत्यही विकताहेत. म्हणजे प्रत्येक ब्राह्मण जरी मूळचे शूद्राचे म्हणून ठरलेले धंदे करतो असे नाही तरी वाटेल त्या ब्राह्मणाने त्याला वाटेल तो धंदा केला तरी त्याची जात जात नाही. तीच स्थिती सर्व जातींची, धंदा सुताराचा, जात गवळी, धंदा लोहाराचा, जात कऱ्हाडे ब्राह्मण, धंदा गवळ्याचा, जात शिंपी, धंदा शिंप्याचा, जात गवळी अशी नुसती खिचडी होऊन जातीची नावे म्हणजे धंद्यापुरती तरी नुसती आडनावे झालेली आहेत. धंद्याने जात जाते ही समजूत आज ठार झाली आहे. व्यवसायबंदी या अर्थी एकंदरीत तुटली आहे.

तशी रोटीबंदीची गत झाली की जातीभेद मरणाच्या दारी बसलाच म्हणून समजा. 'धंद्याचा हो जातीशी काय संबंध?' असे जसे आज अगदी भटभिक्षुकदेखील तावातावाने विचारतो आणि वाटेल तो धंदा केला तरी जात तशीच राहते म्हणून जशी ठाम समज सर्वांची झालेली आहे, तशीच जेवल्याने जात जात नाही अशी ठाम समजूत सर्वत्र फैलावली की, रोटीबंदीची बेडी तुटली. इतकेच नव्हे तर जातीभेदाचीही शंभर वर्षे भरत आली असे समजण्यास हरकत नाही.

प्रत्येक ब्राह्मणाने वा मराठ्याने इतर जातींबरोबर जेवलेच पाहिजे, सहभोजन केलेच पाहिजे असा काही रोटीबंदीची रूढी तोडण्याचा अर्थ नाही. जर कोणी ब्राह्मण वा मराठा, वाणी कोणत्याही इतर जातीबरोबर जेवला, सहभोजनात भाग घेता झाला, तरी त्यामुळे त्याची जात जाण्याचे काही एक कारण नाही अशी समज रूढावली की रोटीबंदीची बेडी तुटली. आज जसे भिक्षुकसुद्धा विचारतो की, 'धंद्याचा हो जातीशी काय संबंध? तसेच उद्या तो विस्मयाने विचारील की, जेवण्याचा हो जातीशी काय संबंध? सहभोजनात कुणी जेवला तर तो त्याच्या व्यक्तीच्या आवडी निवडीचा प्रश्न आहे. ज्याला जो परवडेल तो धंदा त्याने करावा, ज्याला जिथे परवडेल तिथे त्याने जेवावे! त्यामुळे जात हो कशी जाणार?' असे आश्चर्य ज्यालात्याला वाटू लागले की, रोटीबंदीची बेडी तुटली! कोणी म्हणले, 'अहो हे शब्द झाले, व्याख्या ठीक आहे, पण गेल्या दोन तीन हजार वर्षांची रूढी, शास्त्र, शिष्टाचार, ह्यांही अत्यंत बळावलेली नि लहानपणीच रक्तमांसात मुरत जाणारी ही रोटीबंदीची भावना इतकी साफ बोलता बोलता उखडली जाणार कशी? महादुर्घट!'

त्यास उत्तर असे की, 'बोलता बोलता' ही रोटीबंदीची रूढी उखडली जाणार नाही हे अगदी खरे. पण 'करता करता' मात्र ती रूढी नामशेष करता येते. अगदी मोजक्या दहा वर्षाच्या आत रोटीबंदीची बेडी तोडून जातीभेदाचे कंबरडेच मोडता येते. हा नुसता आशावाद नाही, तर करून दाखविलेला प्रयोग आहे. कारण रत्नागिरीस आज रोटीबंदी हा जातीपातीचा जिवंत भाग राहिलेला नसून व्यवसायबंदीसारखीच बव्हंशी तरी पांगुळली आहे.

## २२.१ सहा वर्षात रत्नागिरीने रोटीबंदीची बेडी तोडून टाकलीच की नाही?

सन १९३० च्या गणेशोत्सवात रत्नागिरीच्या संघटक पक्षाच्या वतीने रोटीबंदीची बेडी तोंडण्याची चळवळ हाती घेण्याचा संकल्प आम्ही प्रकटपणे सोडला. लगेच मतप्रसाराची धुमश्चक्री चालू झाली. परंतु मुख्य भर सहभोजनात ती रोटीबंदी प्रत्यक्षपणे तोडून दाखविणाऱ्या कृतीवरच संघटक पक्षाने दिला. सहभोजनाची संतत धार धरली. संघटक पक्षाचे शेकडो स्त्रीपुरुष नावे छापून छापून, बहिष्कारांना तोंड देऊन प्रकटपणे 'जात्युच्छेदनार्थ अखिल हिंदू सहभोजनं करिष्ये' असे चक्क संकल्प सोडून सहभोजनांमागून सहभोजने वर्षानुवर्षे ठोठावीत राहिले. भंगी ते भटापर्यंत कोणासही आज असे म्हणता येत नाही की, मी सहभोजनात जेवलेलो नाही! ब्राह्मण, मराठे, महार, भंगी स्त्रीपुरुष हजार हजार पाने सरमिसळ सहभोजनात सारखी जेवत राहिली. त्यामुळे शेवटी जेवण्याचा जातीशी संबंध असा रत्नागिरीत उरला नाही. घरोघर बहुश: प्रत्यक हिंदू सहभोजनात तरी जेवत आहे किंवा सहभोजकाबरोबर तरी जेवत आहे. कोणच्याही जातीने जात म्हणून त्यांच्या जातीतील कोणीही सहभोजकावर जातीबहिष्कार टाकलेला नाही. रत्नागिरीस तो प्रश्नच मिटला आहे. धंद्याने जात जात नाही. तशीच जेवल्यानेही जात जात नाही. हाच आजचा रत्नागिरीचा सामाजिक दंडक, व्यवहाराचे शास्त्र, चालू रूढी होऊन बसली आहे. म्हणूनच गेल्या १९३५ च्या गणेशोत्सवी हिंदूसभेच्या दशवार्षिक वाढदिवसानिमित्त रोटीबंदीचा पुतळा हजारो लोकांच्या जयजयकारात नि वाद्यांच्या निनादात जाळून भस्म केला गेला!

रत्नागिरीने पाच वर्षात जर रोटीबंदी तोडली तर इतर नगरासही ती तशीच तोंडणे का शक्य नसावे? नुसत्या बोलण्याची, नुसत्या तात्त्विक चर्वितचर्वणाची, नुसते अमुक केले पाहिजे हे मी तुम्हास नि तुम्ही मला केवळ सांगत सुटण्याची खोड सोडून जो तो जात्युच्छेदक सुधारक जे करावयाचे ते करू लागला पाहिजे. ज्याने त्याने स्वतः नावे देऊन प्रकटपणे नि पुण्यकर्तव्य म्हणून सहभोजनात प्रकटपणे जेवत राहिले पाहिजे! केली, आचरली, स्वतः करून सोडली की, सुधारणा होतेच होते, रूढी त्या प्रमाणात तुटतेच तुटते. इतर बहुतेक क्रांतीस जे लागू पडते तेच समर्थांचे सूत्र सामाजिक क्रांतीसही लागू पडते की -

**वन्हि तो चेतवावा रे! चेतविताचि चेततो!!**

**केल्याने होत आहे रे! आधी केलेचि पाहिजे**

ह्या कारणासाठीच आम्हास आजचा हा ‘सहभोजनांचा धुमधडाका’ हा लेख लिहिण्यात विशेष आनंद वाटत आहे. कारण की, रोटीबंदी तोंडण्याचे हे लाभ आहेत नि ते आहेत, जातीभेद असा तोंडावा नि तसा, सहभोजने कशी करावी नि का करावी, या नुसत्या काथ्याकुटीमध्ये, नुसत्या शाब्दिक योजना चर्चिण्यामध्ये हा लेख दवडण्यात येणारा नाही. तर रोटीबंदी ही अमुक अमुक ठिकाणी अमक्या अमक्यांनी तोडून दाखविली आहे. काही तरी काम करून दाखविले आहे हे सांगण्याचा योग या लेखात जुळून येत आहे.

नुसत्या योजनांचा आणि शब्दांचा आम्हांस आता अगदी तिटकारा आला आहे. त्याच त्या योजना खलीत नि तेच ते शास्त्रार्थ चघळीत बसण्यात तीन पिढ्या गेल्या! रानड्यांनी ज्या योजना आखल्या, टिळकांनी ज्या प्रतिपादिल्या त्याच पुन्हा पुन्हा ही पिढीसुद्धा लिहीत, आखीत, सांगत बसली आहे. पण त्या योजनांपैकी शतांश कामाचासुद्धा उरक म्हणून झाला नाही. जो तो दुसऱ्याने काय करावे हे सांगतो. दर दिवशी मासिक, साप्ताहिक, दैनिकांचे भारेच्या भारे, नुसत्या त्याच त्या शाब्दिक योजना, नुसती तीच ती तात्त्विक चर्चा, तीच ती अमुक करावे ची रडकथा गात बाहेर पडत आहेत. पण काडीचे कामसुद्धा स्वतः करून दाखविणारा, ही अमुक योजना पार पाडली म्हणून सांगू शकणारा, हजारात एक आढळत नाही! अशा स्थितीत रोटीबंदी तोंडण्याच्या कार्यी तरी ‘ही पाहा अमुक सहभोजने घडवून प्रकटपणे तोडून टाकली, त्या प्रकरणी काही तरी काम करून दाखविले’ हे सांगण्याचे समाधान आम्हास हा लेख लिहीताना लाभत आहे. यासाठी या लेखाचे आम्हांस विशेष महत्त्व वाटते.

रोटीबंदी का तोडावी नि कशी तोडावी या विषयाची नुसती शाब्दिक चर्चा करणाऱ्या पाचशे लेखांपेक्षा पूर्वास्पृश्यांसुद्धा सरमिसळ पंगतीत जेवून ती प्रत्यक्ष नि प्रकटपणे तोडून टाकणारे पाचजणांचे एक सहभोजन हे अधिक महत्त्वाचे आहे!

रोटीबंदी तोंडणे शक्य आहे हे रत्नागिरीने स्वतःच्या कृतीने सिद्ध करून दाखविले. ही घोषणा करण्यासाठी जेव्हा गेल्या सन १९३५ च्या गणेशेत्सवी रोटीबंदीच्या पुतळ्यास समारंभपूर्वक एका ब्राह्मण नि महार तरुणाच्या हस्ते आग लावून दिली, तेव्हा आम्ही केलेल्या भाषणात असे सांगितले होते की जी आग तुम्ही आज साऱ्या महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात चेतवीत आहा, तिच्या ठिणग्या साऱ्या महाराष्ट्रभर उडतील! आणि रोटीबंदीची राखरांगोळी करून टाकतील! ते आमचे भविष्य एका वर्षाच्या आत इतक्या वेगाने खरे ठरू पाहत आहे की, ही

समाजक्रांती घडवून आणण्यासाठी उतावीळ झालेल्या रत्नागिरीच्या जात्युच्छेदक पक्षाससुद्धा थोडेफार साश्चर्य समाधान वाटावे! रत्नागिरीच्या जात्युच्छेदक आंदोलनाचे लोण पर्वतापलीकडे नेऊन महाराष्ट्रात पोचविण्याचे हे श्रेय मुख्यतः ज्यांच्याकडे आहे, रत्नागिरीच्या समाजक्रांतीच्या होमकुंडातुन उडून जी पहिली ठिणगी महाराष्ट्रात पडली, ती म्हणजे श्री. अनंतराव गद्रे हेच होत. हिंदूसभेच्या दशवार्षिक महोत्सवात गणेशेत्सवी डॉ. मुंजे महाशयादिक महाराष्ट्रातील थोर थोर पुढारी, संपादक नि कार्यकर्ते रत्नागिरीस आमंत्रिले गेले, त्यातच मुंबईचे श्री. अनंतराव गद्रे हे रत्नागिरीस आले होते. त्यांनी ह्या पोथीजात जातीभेदोच्छेदक आंदोलनाचे चाललेले रत्नागिरीतील कार्य स्वतः पाहिले. हजारावर स्त्रीपुरुषांची झडणारी आब्राह्मणभंग्यांची सहभोजने त्यात स्वतः भाग घेऊन निरीक्षिली आणि तेच कार्य महाराष्ट्रभर फैलावण्याचा यथाशक्ती यत्न करीन असे प्रतिज्ञापून त्यांनी त्या दिवसापासून त्यांच्या निर्भीड साप्ताहिकासह आंदोलनास वाहून घेतले. दुसऱ्यांनी रोटीबंदी सोडण्याच्या कार्यी यंव करावे नि त्यंव करावे असा बोलघेवडेपणा करूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी ते कार्य प्रत्यक्षपणे व्यवहारून टाकण्यासाठी एक कार्यकर्ती संस्थाही काढली.

## २२.२ झुणकाभाकर सहभोजन संघ

श्री. गद्रे यांच्या डोक्यातून निघालेली 'झुणकाभाकर सहभोजनाची' क्लृप्ति ही त्यांच्या आजवरच्या अनेक क्लृप्त्यांप्रमाणे एक नुसती चटकदार क्लृप्तीचा काय ती राहिलेली नसून एक दूरवर परिणाम करणारे राष्ट्रीय कार्य होऊन बसलेले आहे. आपला नावाचा तेवढा एक भपकेबाज संघ पण कामाच्या नावाने मात्र पूज्य अशी त्या संस्थेची स्थिती नाही. अगदी प्रथमपासून अनंतराव गद्रे यांनी त्या संघाच्या नावाप्रमाणे कार्यही करून दाखविण्यासाठी अंगी कष्ट केले आहेत. त्यांना श्री. अत्रे, श्री. खांडेकर आदीकरून अनेक उत्साही हिंदू संघटनी गृहस्थांचा मन:पूर्वक पाठिंबा नि सहकार्य लाभले. त्यायोगे ह्या झुणका भाकर सहभोजन संघाने ह्या एका वर्षाच्या आत जितकी मोठमोठी सहभोजने घडवून आणली आहेत की, रोटीबंदीची बेडी त्यांच्या घणाघावाखाली अल्पावधीतच करकरू लागली! कारण त्या संघाच्या वतीने म्हणून घडलेल्या सहभोजनांच्या योगे रोटीबंदी प्रकटपणे तोडून टाकण्याच एक प्रबळ प्रवृत्ती इकडे तिकडे उद्भवू लागली आहे. किंबहूना तो संघ म्हणजेच ही प्रवृत्ती! ती काही संस्था नव्हे, घटना नव्हे, सभासदांची टिपणी नव्हे, विशिष्ट नावदेखील नव्हे तर झुणकाभाकर सहभोजन संघ ही प्रवृत्ती आहे! जो कोणी येथे वा तेथे कोणत्याही नावाखाली वा नावावाचून पण जात्युच्छेदनार्थ म्हणून प्रकटपणे अखिल हिंदू सहभोजनात भाग घेतो आणि नाव छापून रोटीबंदीची बेडी तोडून टाकतो, तो झुणकाभाकर सहभोजन संघाचा सभासद, हीच त्याची घटना!

## २२.३ सात वर्षांपूर्वी रत्नागिरीने समाजक्रांतीची केलेली उठावणी आज महाराष्ट्र व्यापीत चालली आहे!

झुणकाभाकर सहभोजन संघाप्रमाणेच, अनेक मंडळ्या, संघ, हिंदू सहभोजनांची झोड कशी उडवीत आहेत, हजारो प्रामाणिक स्वयंसेवक नि स्वयंसेविका प्रकटपणे रोटीबंदीची बेडी तोडून टाकून जातीभेदाचे कंबरडेच मोडून टाकण्यास पुढे सरसावत आहेत ह्याची जाणीव एकएकट्या

सहभोजनाची यत्रतत्र छापलेली स्फुट बातमी केव्हा तरी वाचून जितकी व्हावी तशी होत नाही. पण त्या सर्वांची संकलित टिपणी पुढे ठेवताच जो सहज परिणाम मनावर होतो, त्यामुळे मात्र ह्या चळवळीचे खरे बळ नीट रीतीने मापता येते. यासाठी आम्ही गेल्या सहा महिन्यात रत्नागिरीने केलेल्या उठावणीचा फैलाव महाराष्ट्रभर कसा होत चालला आहे हे ठिकठिकाणी झालेल्या सहभोजनातील काही प्रमुख सहभोजनांची एक टिपणी या लेखात खाली देत आहोत. ती दिग्दर्शनापूरतीच असल्याने काही सहभोजनांची नावे त्यात गळली तर कोणी विषाद मानू नये. आठवतात त्यातून थोडी फार उदाहरणे देणेच काय ते अशा संक्षिप्त प्रतिवृत्तात स्थलाभावी शक्य असते.

गेल्या डिसेंबर १९३५ पासून -

१) झुणकाभाकर सहभोजन संघाचे पुणे येथे श्री. राजभोज यांच्या घरी झालेले प्रकट सहभोजन

श्री. बापूराव राजभोज हे चांभार पुढारी. हे सहभोजन चांभारवाड्यात झाले. चांभार भगिनींनी स्वयंपाक करून त्यात वाढले आणि अध्यक्ष केशवराव जेधे हे होते. सहभोजनात श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. वैशंपायन, श्री. अ. ह. गद्रे प्रभृती गृहस्थ आणि ब्राह्मण मराठे प्रभृती ‘उच्च’ जातीची अनेक मंडळी होती. त्यातही विशेष की, चांभाराहून खालचे समजल्या जाणाऱ्या मांग अस्पृश्य बंधूंचे पुढारी श्री. सकट हेही राजभोजांच्या पंगतीस जेवले. नावे छापली होती. सर्व दृष्टीने हे सहभोजन रोटीबंदीचा पुरता खुर्दा उडविणारे होते. (डिसेंबर १९३५)

२) भेलसा, ग्वाल्हेर येथे सहभोजन - हरिजन सेवक संघाचे श्री. दाते, सुरेंद्रजी मास्तर, मन्नुलालजी, पंडित काशीनाथ प्रभृती अनेक स्पृश्यास्पृश्य मंडळींनी भाग घेतला. स्वयंपाक करणाऱ्यांत नि वाढणाऱ्यांत चांभार मंडळीही होती. नावे छापली. (ता. २४-१२-१९३५ - स्वराज्य खांडवा)

३) राष्ट्रसभा सुवर्ण महोत्सव सहभोजन - हे मुंबईस झाले. श्री. नरिमान प्रभृती थोर थोर पुढारी पंगतीत होते. सोळाशेवर पान झाले. त्यात पाचसहाशे पूर्वास्पृश्य मंडळी होती. पण उणीव एवढीच एक राहून गेली की, समग्र नावे छापली गेली नाहीत. नावे छापल्यावाचून सहभोजनाचा मुख्य उद्देश जो रूढी प्रकटपणे तोंडणे तो साधत नाही.

४) नायगाव (वसई) - येथे शुद्धीकृत कोळ्यांशी आजवर रोटीव्यवहार बंद असे. तो करावा या मताच्या काही जुन्या कोळी मंडळींनी त्या शुद्धीकृतांशी सहभोजन केले. इतकेच नव्हे, तर शरीरसंबंधही घडवून आणले. जोवर आपण शुद्धीकृतांशी रोटीबंदी नि बेटीबंदीची बेडी तोडून संव्यवहार करीत नाही तोवर शुद्धी कधीही प्रबळ होणार नाही. शुद्धी हवी तर रोटीबंदीची बेडी तोडलीच पाहिजे! पुण्याच्या शुद्धीसभेत श्री. मसुरकर महाराज, श्रीमत्शंकराचार्य कूर्तकोटी, पाचलेगावकर महाराज यांच्या अनुमतीने शुद्धीकृतांशी पूर्ववत् रोटीव्यवहार करावा हा ठराव झाला. ह्या थोर पुढाऱ्यांनाही ही सुधारणा शेवटी पटली हे चांगले झाले.

५) राजपुताना 'प्रगत हिंदूबंधू' यांचे सहभोजन - जात्युच्छेदक संकल्पपूर्वक चारशेवर स्पृश्यास्पृश्य मंडळींनी भाग घेतला. परंतु सर्व नावे तिकडेच्या पत्रांतून छापली की नाही ते कळले नाही.

६) झुणकाभाकर संघाचे मुंबईचे पहिले दांडगे सहभोजन - तिकीट विकत घेऊन सहाशेवर मंडळी जेवली. रोटीबंदी तोडण्याचा तोडण्याचा जात्युच्छेदक संकल्प स्पष्टपणे सोडूनच हेतूतः हिंदूसंघटनार्थ घडलेले अशा प्रकारचे मुंबईचे हेच पहिले सहभोजन होय. पूर्वी प्रार्थना समाजाची सहभोजने कै. चंदावरकरादिकांच्या खटपटीने काही झाली. त्या काळी आपल्या हाती होता तो तो यत्न त्या त्या आद्य सुधारक मंडळींनी केला हे त्यांना विशेषच भूषणास्पद होते हेही खरेच. त्यांनी पेरलेली बीजे व्यर्थही गेली नाहीत हेही खरे. पण सहभोजनांची जात्युच्छेदक सतत नि संघटित चळवळ अशी उठावणी, जी रत्नागिरीने केली, तिच्या हिंदू संघटनाच्या व्यापक तत्त्वांवर अधिष्ठिलेले असे स्पृश्यास्पृश्यांचे इतके मोठे सहभोजन म्हटले म्हणजे मुंबईला हेच पहिले होय! प्रो. गजेंद्रगडकर, डॉ. वेलकर प्रभृती अनेक पुढारी आणि ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, महार, चांभार प्रभृती सर्व जातीचे स्त्रीपुरुष पंगतीत सरमिसळ बसले होते. ! 'निर्भीड' मध्ये नावे प्रसिद्धीली होती. हे सहभोजन सर्व दृष्टींनी महत्त्वाचे होते.

७) इंदूर साहित्यसंमेलनात सहभोजने - तेथे जमलेल्या मंडळीत त्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्रीमंत पंतप्रतिनिधी औंधकर हेही होते. समाभसदांदिक सर्वांचा स्वयंपाक ज्या पाकशाळेत होई तीत 'शारदाराजे होळकर वसतिगृहा'तील पूर्वास्पृश्य मुली इतर स्वयंसेविकांसह सरमिसळपणे स्वयंपाक, वाढणे, चहापाणी इत्यादी कामे करीत होत्या. साहित्यिकांनी जातीनिर्विशेषपणे, सरमिसळ पंगतीत बसून सहभोजने झोडली. त्या स्वयंपाकादी अन्नपाणी व्यवस्थेत खपणाऱ्या कुमारिकांची नावे मंजुळा, चंद्रभागा, लक्ष्मी, सौ. नगिना राजा. पण या सहभोजनात एक व्यंग राहिलेच. ते म्हणजे त्यातील नावे छापली नाहीत! कारण ती नावे गुप्त राहिल्यामुळे तिथे चापून स्पृश्यास्पृश्यांसह पक्वान्नावर हात मारलेले 'सुवर्ण मध्यमी' अनेक साहित्यिक परत पुण्यामुंबईस आपापल्या घरी येताच सोवळ्या गोष्टी बोलतात. 'नाव छापून जे सहभोजन होते तेवढेच काय ते चुकीचे!' हीच एका सोनेरी टोळीची सुवर्णमध्याची व्याख्या आजकाल ठरली आहे! त्या सोनेरी टोळीचा हा मिथ्याचार उघडकीस आणणे अवश्य असल्यामुळे कोणाच्याही सहभोजनात ते भाग घेतातसे दिसले की त्यांची नावे चापून छापीत चलावे! (डिसेंबर १९३५)

८) पुण्याच्या हिंदूमहासभेच्या स्वा. म. च्या वतीने दिलेले सहभोजन - यात शेकडो मोठमोठी स्पृश्यास्पृश्य मंडळी, निरनिराळ्या प्रांतातली, सरमिसळ पंगतीत जेवली. पण व्यंग जे राहून गेले ते हेच की त्यांची नावे छापली गेली नाहीत. त्यातल्या त्यात निर्भीडकारांनी श्री. शिखरे, श्री. तात्याराव केळकर प्रभृती काहींची नावे पूर्वास्पृश्यांसह सरमिसळ सहभोजन करणारात छापली हे बरे झाले. तशीच जर का सर्वांची छापली जाती तर सुवर्णमध्यमिकांची एक मोठी सोनेरी टोळी पाडाव होऊन सहभोजक संप्रदायाच्या छावणीत आणता आली असती. पण तसे न झाल्यामुळे त्या सहभोजनात पुख्खा झोडलेले कित्येकजण अजूनही सहभोजनास एक अतिरेकी चळवळ म्हणून साळसूद लबाडी करण्यास मोकळे राहिले आहे. (डिसेंबर १९३५)

९) भावसार मंडळींचे शहाबाद येथील सहभोजन - भावसार मंडळी श्री. हंचाटे यांच्या कन्येच्या लग्नानिमित्त आली असता शहाबादचे श्री. सुलाखे यांनी पूर्वास्पृश्य मंडळीस जेवावयास बोलावले. सर्व मंडळींच्या अनुमतीने मुख्य पंगतीच्या समोरच पूर्वास्पृश्यांसह बसणाऱ्यांची सहभोजक पंगत बसली. दावणगिरीचे नरसिंगराव आंबेकर, शहाबादचे हंचाटे, श्री. सुलाखे प्रभृती मंडळींनी त्या सहभोजनात भाग घेतला. इतर लग्नमंडपी मंडळींनीही ते सहभोजनकृत्य जातीबहिष्कार्य मानले नाही. भावसार मंडळींची ही प्रगतीप्रियता विशेष उल्लेखनीय आहे. (भावसार क्षत्रिय दि. १५-२-१९३६)

१०) चिंचोली (जि. पुणे) येथील सहभोजन - ह्या सहभोजनाचा विशेष हा की, यात निमगाव, देहू, भोसरी, केंपूर, जांभूळ प्रभृती वीसएक खेड्यांतील पूर्वास्पृश्य मंडळी आली होती. महार, मांग, चांभार इतर अस्पृश्यांतील रोटीबंद जातींनीसुद्धा रोटीबंदी तोडली. पाचशेवर पान झाले. (दि. १-३-३६) या सहभोजनास १८ ते २० रूपये खर्च आला! कारण श्री. गायकवाड यांनी बाजरी आणली आणि ती अनेक घरांत वाटून दिली. त्या प्रत्येकाने ती घरी दळून, भाकरी त्यांच्या राशी भोजनस्थळी पोचविल्या. त्यामुळे कोणालाच त्रास न पडता थोड्या खर्चात भागले! ही सांगण्यासारखी युक्ती खरीच! (निर्भीड)

११) कराचीचे ‘मित्रमंडळ’ सहभोजन - रावबहादूर मुजुमदार यांच्या प्रयत्ने पार पडले. तीनशे पाने झाली. स्पृश्यास्पृश्य सरमिसळ पंगतीत जेवले. प्रोफेसर जुन्नरकर, डॉ. तांबे, बाबुराव गद्रे, अणावकर, ‘सिंधमराठा कर्ते’, डॉ. मुजुमदार, रावबहादुर ज. वा. मुजुमदार, व्हाईसरॉय कँपच्या उड्डार स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावणारे प्रसिद्ध वैमानिक गाडगीळ इत्यादी थोरथोर मंडळी होती. नावे छापली. हे एक महत्त्वाचे सहभोजन होते. (२५-२-३६)

१२) मुंबईचे झुणकाभाकर संघाचे दुसरे दांडगे सहभोजन - अनंतराव गद्रे, श्रीमती वागळे, कोल्हापूरचे ‘सत्यवादीकार’ पाटील इत्यादी मंडळींच्या परिश्रमे तिकिटे लावून घडवून आणलेले हे मुंबईचे दुसरे सहभोजन पहिल्याहून दांडगे झाले. एक हजार पाने उठली! महार, मांग, ब्राह्मण, मराठा, चांभार, वाणी, भंगी, प्रभू, भंडारी प्रभृती अनेक जातींचे स्त्रीपुरुष सरमिसळ पंगतीत जेवले. ‘जन्मजातजात्युच्छेदनार्थं अखिल हिंदू सहभोजनं करिष्ये’ हा संकल्प!! शेकडो नावे स्तंभचे स्तंभ भरून छापली. प्रोफेसर, वकील, डॉक्टर, संपादक इत्यादी सुशिक्षित पुढाऱ्यांची अशी दाटी उडाली होती की कोणास इथे दिग्दर्शनार्थ उल्लेखावे हेच आम्हास कळत नाही.

१३) सांताक्रूझचे ‘हिंदूसंघ’ सहभोजन - अध्यक्ष डॉ. उदगांवकर हे हिंदू संघटनाचे प्रसिद्ध पुढारी होते. श्री. वर्दे (विहारकर्ते), मानकर (वसुंधराकर्ते), श्री. नानाराव चाफेकर महाशय, श्रीमती वागळे, इंदिराबाई शिर्के, नाथीबाई सावंत, लक्ष्मीबाई साने, श्री. काळे, मोहिते, माने इत्यादी लिंगायत, मराठा, ब्राह्मण, महार, चांभार, प्रभू, भंगी वैश्यादी जातीची मंडळी सरमिसळ होती. तीन मोठ्या पंक्ती उठल्या. नावे छापली. (१५ मार्च १९३६)

१४) इंदूरचे चटणीरोटी सहभोजन - पूर्वास्पृश्य महिला स्वयंपाकातही होत्या. जात्युच्छेदक संकल्प प्रकटपणे सोडून पंगती बसल्या. रावबहादूर भांडारकर, प्रो. पाटील, सौ. भांडारकर, कर्णिक इत्यादी प्रमुख मंडळी जेवली. नावे छापली. (दि. २४-३-१९३६)

१५) सांगली मांगवाडा सहभोजन - मांगांनी स्वयंपाक केला. महार प्रभृती अस्पृश्यांनी रोटीबंदी जातीभेद पायाखाली तुडवून सहभोजन केले. नावे छापली. (२४-३-१९३६)

१६) पुणे लष्कर पूर्वास्पृश्य सहभोजन - महारांच्या लग्नसमारंभात महार, मांग, मोची एकत्र जेवले. (१७-३-१९३६)

१७) पुण्याचे टोलेबाज झुणकाभाकर संघ सहभोजन - पुण्याच्या या अत्यंंत यशस्वी सहभोजनाने तर सहभोजनाचा उच्चांक पटकावला! एक हजारावर पाने उठली. तिकिटे होती. जन्मजात जात्युच्छेदनाचा चक्क संकल्प सोडून सहभोजन झाले. प्रो. अण्णाराव कर्वे, प्रि. आठवले, सर गोविंदराव माडगावकर, रा. ब. सहस्रबुद्धे, बालगंधर्व प्रभृती सर्व जातींचे अनेक सुप्रसिद्ध पुढारी, विद्यार्थी, महिला शेकडो स्पृश्यास्पृश्य मंडळींच्या पंगतीमागून पंगती उठल्या. ज्ञानप्रकाश, निर्भीड पत्रांतून शेकडो नावे छापली गेली. कोल्हापूरच्या सत्यवादीचे संपादक पाटील, निर्भीडचे गद्रे होतेच. प्रि. प्र. के. अत्रे, खांडेकर हे साहित्यिक नि काकाराव लिमये ह्यांनी आटोकाट मेहनत करून हे आजवरच्या संमेलनातील अगदी उच्चांक पटकावणारे सहभोजन घडवून आणले! (२२-३-३६)

१८) अमरावतीचे झुणकाभाकर सहभोजन संघटनपुढारी शेठ पन्नालाल सिंघई, वऱ्हाड देशपांडे, श्री. कुऱ्हाडे या सर्वांनी मेहनत केली. रोटीबंदी तोंडण्यासाठी म्हणूनच स्पृश्यास्पृश्यांची चारशेवर मंडळी सरमिसळ जेवली. वाढणे स्वयंपाकसुद्धा स्पृश्यास्पृश मंडळींनी सरममिसळपणे केला. (७-४-३६)

१९-२०) कोल्हापूरची दोन झुणकाभाकर सहभोजने - सत्यवादीचे संपादक पाटील ह्यांच्या मेहनतीने अल्पावधीत कोल्हापूरला दोन मोठमोठी सहभोजने जात्युच्छेदनाचा संकल्प सोडून झडली. महारवाड्यात मध्येच दुसरे दांडगे सहभोजन झाले. पाचशेवर स्त्री-पुरुषांनी भाग घेतला. मुंबईचे गद्रे, प्रभातचे संपादक विजयकर, डॉ. कांबळे, सत्तूर, लालनाथजी इत्यादी अनेक ब्राह्मण-ब्राह्मणेतर मंडळींनी भाग घेतला, स्थलाभावास्तव इथे प्रमुख नावेसुद्धा देता येत नाहीत. (सत्यवादी दि. १०-४-१९३६)

२१) कऱ्हाड येथील झुणकाभाकर संघाचे सहभोजन - जात्युच्छेदनाच्या चक्क संकल्पाने अनेक स्पृश्यास्पृश्य मंडळींनी सहभोजनात भाग घेतला. श्री. सत्तूर, श्री खानोलकर, श्री. गद्रे, बुद्ध्या गेले होते. पवार महाशयांनी फार कष्ट घेतले. (एप्रिल)

२२) कल्याणचे झुणकाभाकर संघाचे सहभोजन - पेठे बंधू यांनी मेहनतीचा पुढाकार घेतला. ॲ. खंडेराव मुळे, भाई गोडेबोले, अ. ह. गद्रे, डॉ. फडके, भिवंडीचे भागवत, उकिडवे, डॉ. सबनीस, करंदीकर, भोसेकर, श्री. म. वर्दे, डॉ. भालेराव, जगताप, डेव्हिड (ख्रिश्चन), गांगल, बी. एस. सी., डॉ. कुळकर्णी इत्यादी शंभर एक मंडळी स्पृश्यास्पृश्यांसह सरमिसळ जेवली. तिकीटे होती. नावे छापली. (२५-४-३६)

२३) सावंतवाडीचे सहभोजन - हरिजन सेवक संघ रत्नागिरी यांच्या विद्यमाने एक मोठे सहभोजन सावंतवाडीस झाले. सावंतवाडीचे कारभारी महाशय हे स्वतः शंभरसव्वाशे महार चांभारादिक पूर्वास्पृश्यांसह सरमिसळ पंगतीत बसले होते. अनेक ब्राह्मण, मराठा, वाणी प्रभृती

मंडळींनी त्यात भाग घेतला. रोटीबंदी प्रकटपणे तोडण्याचाच संकल्प सुटला. नावे प्रसिद्धीली होती.

या मुख्य मुख्य सहभोजनांवरून ही रोटीबंदीची बेडी तोडून टाकण्याची सक्रिय चळवळ गेल्या सहा महिन्यात कशी झपाट्याने महाराष्ट्रभर फैलावत चालली आहे हे निर्विवादपणे कळून येईल. तरी या सहभोजनामध्ये रत्नागिरीतील गेल्या सहा महिन्यांतील सहभोजने आम्ही मोजली नाहीत. गंधर्व नाटक मंडळीचे श्री. बापूराव राजहंस यांनी दिलेले सहभोजन, रत्नागिरीस दर पंधरवाड्यास एक तरी सहभोजन नावे छापून, जन्मजात जातीभेदोच्छेदनार्थ घडतच आले आहे! पण स्थलाभावास्तव त्यांची टिपणी इथे देता येत नाही.

पण हा नुसता आरंभ आहे. ह्याच्या शतपटीने बलशाली असा सहभोजनांचा भडिमार चालू झाला पाहिजे. आणखी पाच वर्षे तरी ती सहभोजने त्याच त्या ठिकाणी पुन्हा पुन्हा झडत राहिली पाहिजेत आणि तो संप्रदाय फैलावत प्रत्येक खेडेगावात सुद्धा सहभोजने ही प्रत्यहीची एक घटना होऊन बसली पाहिजे.

## २२.४ शाळा कॉलेज-संमेलने यांच्यातील सहभोजकांची नावे छापा!

या कामी आता विद्यार्थ्यांना सहजासहजी एक महत्त्वाचे साहाय्य देता येण्यासारखे आहे. शाळांतून नगरोनगरी विद्यार्थ्यांची संमेलने प्रतिवर्षी होतात. त्यामध्ये बहुतेक विद्यार्थी सहभोजनी पंगतीतच सरमिसळ बसतात. पण नावे छापली जात नसल्यामुळे तेच विद्यार्थी घरी गेले की पुन्हा सोवळे ओवळे होतात! सहभोजनात उघडपणे बसत नाहीत आणि शाळा-कॉलेजे सोडून ते उद्योगास लागले की, सनातनी पुढारी, अमुक वकील वा अमुक डॉक्टर वा अमुक संपादक म्हणूनही मिरवू लागतात. सहभोजने हा अतिरेक आहे म्हणून लोकांत तोंडदेखली पाटिलकी करू लागतात. या मिथ्याचारी लोकांना असे दुटप्पी वर्तन करू देता कामा नये. यासाठी शाळा-कॉलेजांतील प्रत्येक संमेलनामध्ये जो जो विद्यार्थी सहभोजनाच्या सरमिसळ पंगतीस जेवील त्याचे नाव छापून टाकले जावे.

संमेलनातील व्याख्याने, नकला, पारितोषिक प्रभृती सारी माहिती जर वृत्तपत्री ते संमेलनकर्ते छापतात, तर तेथे उघड पंगतीत जेवणारात सरमिसळ कोण कोण बसले हेही छापण्याचा वृत्तपत्रांना अधिकार पोचतो. ही संमेलने घरगुती गृह्य संस्कार नव्हेत - ते जनिक (Public) नि प्रकट (जाहिर) समारंभ होत. तेव्हा जात्युच्छेदक पक्षाचे अभिमानी असणाऱ्या शेकडो सहभोजक विद्यार्थ्यांनी यापुढे त्यांच्या समक्ष सरमिसळ पंगतीत जे जे जेवतील त्यांची त्यांची नावे छापून प्रसिद्धीसाठी निर्भीडकडे वा इतरत्र धाडावी. अशी नावे छापत जातील तर ही शेकडो शाळा-कॉलेजातील संमेलने म्हणजे रोटीबंदी बेडी तोंडून टाकणारे बिनखर्ची झुणकाभाकर सहभोजन संघच होऊन बसतील. पण नावे छापली पाहिजेत. तरी यापुढे प्रत्येक संमेलनात विद्यार्थ्यांनी सहभोजन थाटून नावे छापून द्यावीत आणि त्या समाजक्रांतीस एक महत्त्वाचे साहाय्य देण्याची संधी गमावू नये!

## २३ जातीभेदोच्छेदक पक्षाचे जातीसंघविषयक धोरण कोणते असावे?

आजच्या जन्मजात जातीभेदाचा उच्छेद केल्यावाचून हिंदुराष्ट्राचे सामुदायिक ऐक्य, पराक्रमशक्ती नि प्रगतीक्षमता वाढणे आता दुर्घट झालेले आहे, ही गोष्ट ज्यांना पूर्णपणे पटली आहे आणि त्या जातीभेदास उच्चाटण्यासाठी ज्यांनी व्यक्तीशः वा संघटितपणे सक्रीय प्रयत्न चालविले आहेत, त्यांच्यापुढे हा प्रश्न नेहमी दत्त म्हणून उभा राहतो की आजच्या जन्मजात जातीभेदाची संस्था जर आमूलात् मोडायची, तर ती मोडण्याच्या प्रयत्नांच्या मार्गात उभ्या असलेल्या ह्या जातीसंघाच्या प्रचंड अडथळ्याचे उच्चाटन करण्याचे सुलभातील सुलभ, अगदी व्यवहार्य असे आणि न्यूनात न्यून हानीकारक असे कोणचे धोरण स्वीकारणे इष्ट आहे? जात्युच्छेदक पक्षाने ह्या जातीसंघाशी कसलाही संबंध ठेवू नये, किंवा ठेवायचा तर कसा ठेवावा? त्यांच्यापासून काही तरी उपयोग आहेत काय? आणि असतील तर त्यांच्या पासून होणारी अत्यंत विघटक हानी टाळून त्यांचा तो तात्कालिक होत असलेला तेवढा पदरात पाडून घेता येईल काय? ह्या जातीसंघांना चुटकीसरशी नाहीसे करणे शक्य आहे काय? आणि नसल्यास ते नाहीसे होईतो त्या दीर्घ संक्रमणकालात त्या जातीसंघाच्या उपद्रवी पाहाडांना कुठे वळसे घेऊन, कुठे बगल देऊन, किंवा कुठे लग्गा लागेल तर तिथे त्यांच्या मधूनच बोगदे पाडून न्यूनतम प्रतिकाराच्या धोरणाने आपल्या जात्युच्छेदक आंदोलनाची वाट कशी मोकळी करून घेता येईल? जात्युच्छेदक पक्षाचे जातीसंघाविषयक धोरण काय असावे?

या हिंदू संघटनातील अत्यंत महत्त्वाच्या विषयासंबंधी एक सुनिश्चित कार्यक्रम आमच्या जात्युच्छेदक पक्षापुढे असणे अत्यंत अवश्य आहे. एवढ्यासाठी त्या विषयीचे आमचे मत आम्ही या लेखात विशदपणे एकदा सांगून टाकणार आहोत.

आमची जात 'हिंदू' इतर कोणतीही पोटजात आम्ही मानीत नाही किंवा आम्ही कोणत्याही जातीसंघाचे सभासद झालेलो नाही!

या लेखाच्या आरंभीच या विषयासंबंधी आमच्या विषयी कोणताही गैरसमज होऊ नये म्हणून, हे स्पष्टपणे कळविणे अवश्य आहे की, आम्ही स्वतः हिंदू जाती हीच काय ती आमची अनन्य जाती मानतो. स्पृश्य वा ब्राह्मण वा चित्पावन प्रभृती कोणचीही पोटजात आम्ही मानीत नाही किंवा तशा कोणत्याही जातीसंघाचे आम्ही सभासद झालेलो नाही. रत्नागिरीच्या चित्पावन संघाचे आम्ही सभासद झालेलो आहो अशी भूमिका गेली दोन-तीन वर्षे महाराष्ट्रात जी पसरलेली आहे, ती अगदीर निराधार आहे. राष्ट्रवीर प्रभृती काही पत्रांनी ती जेव्हा प्रसिद्धीली आणि तीवर टीकात्मक लेख लिहिले की, जात्युच्छेदनाचा एकीकडे पुरस्कार करीत असता दुसरीकडे आम्ही चित्पावन संघाचे सभासद होण्याचे कपटी वर्तन चालविले आहे, तेव्हा आम्ही त्याचा प्रतिवाद केला होता. पण तिकडे काही लोकांनी, त्यांना सोयीस्कर पडले म्हणून दुर्लक्ष करण्याचे कपटी वर्तन अद्यापही स्वतःच चालविले आहे. त्यावाचून आमच्या काही प्रामाणिक सहकाऱ्यांच्या ध्यानातच तो प्रतिवाद न आल्याने त्यांनाही बुचकळ्यात पडलेसे होऊन 'निर्भीड' प्रभृती वृत्तपत्रांतही मधूनमधून त्यांना वाटलेल्या त्या आमच्या विसंगतीविषयी शंकाकुल पण सदिच्छ लेख येत आहेत. परंतु ती आमच्या विरोधकांची टीका नि सहकाऱ्यांची शंका मुळातच निराधार आहे. हे आम्ही या लेखात प्रथमारंभीच प्रकटपणे पुन्हा सांगून टाकीत आहो. आम्ही

चित्पावन संघाच्या दोन अधिवेशनात आमंत्रणावरून उपस्थित होतो नि आग्रहावरून दोन व्याख्यानेही दिली. पण त्यातच आम्ही हिंदू हीच काय ती जात मानतो नि आजचा जन्मजात म्हणविणारा पण वस्तूत: निव्वळ पोथीजात असलेला आणि हिंदूसंघटनास सर्वतोपरी विघातक ठरणारा जातीभेद मानीत नाही, हेच अगदी स्पष्टपणे उद्घोषिले.

आम्ही एकदा मुंबई इलाखा महार जातीपरिषदेचे अध्यक्ष होतो. मालवणला रत्नागिरी अस्पृश्य परिषदेचेही एकदा अध्यक्ष होतो. रत्नागिरी येथे भरलेल्या जिल्हा महार परिषदेचेही एकदा अध्यक्ष होतो. संगमेश्वरच्या वैश्य परिषदेत आमंत्रित म्हणून उपस्थित होतो. इथे अलीकडेच स्थापलेल्या मराठा शिक्षण परिषदेच्या अनेक चालकांशी आम्ही विचारविनिमय केला. पण त्यायोगे जसे आम्ही महार वा चांभार वा वाणी, मराठा जातीचे ठरत नाही किंवा त्या जाती मानतो असे होत नाही, त्याप्रमाणे त्या चित्पावन संघात आमंत्रणावरून गेलो, त्यांच्याशी विचारविनिमय केला, म्हणून चित्पानव जात तेवढी आम्ही मानतो किंवा जात्युच्छेदक कार्यी ती जात तेवढी अपवाद म्हणून तशीच रोटीबंद, बेटीबंद ठेवावी असे समजतो असा निष्कर्ष काढणे हे अगदी चुकीचे होणारे आहे.

त्यातही रत्नागिरीच्या चित्पावन संघाने इतर सर्व जातीसंघांना जे अतिशय अनुकरणीय उदाहरण घालून देण्याची प्रगतीप्रीयता नि राष्ट्रीय जाणीव व्यक्तविली आहे, त्यायोगे तर विघटकपणाच्या आक्षेपातून तो पुष्कळ अंशी मुक्त झालेला आहे. किंबहुना त्याच्या मूळ घटनेतच हे तत्त्व ग्रथिले जावे हा आमच्या पक्षाच्या वतीने आग्रहच केला गेला. ते तत्त्व असे आहे की, रत्नागिरीच्या चित्पावन संघाच्या कार्यक्रमातील -

'...None of the activities of this society shall have any connections with any movement for the creation and furtherence of disparity based on birth alone.''

म्हणजे केवळ जन्मावरच अवलंबणारी कोणत्याही मानीव उच्चनीचतेची भावना हा संघ संमतीणार नाही आणि तशा जातीजातीतीलच केवळ गृहीत धरलेल्या अशा जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठपणास पुरस्कारिणाऱ्या कोणत्याही चळवळशी संबंध ठेवणार नाही. ज्या जातीची वा ज्या व्यक्तीची प्रकट गुणांवरूनच काय ती जी योग्यता ठरेल तीप्रमाणे काय ते तिला वागविले जावे आणि या सूत्रानूरूप चित्पावनांची त्यांच्या प्रकट गुणाप्रमाणे जी ठरेल तेवढीच त्यांची पात्रता आणि त्या मानानेच इतर कोणत्याही जातीच्या तशाच योग्य व्यक्तींना जे मिळावयाचे तेवढेच त्यांचे अधिकार! ते चित्पावन कुळाचे किंवा ब्राह्मण जातीचे म्हणूनच काय ते त्यांचे जन्मजात श्रेष्ठत्व गृहीत धरले जावे, किंवा जन्मजात असे विशिष्टाधिकार त्यांना मिळावे, असे केवळ बापाच्या नावावर विकले जाण्याचे भिकारडे मागणे न मागता दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्अशी बाणेदार महत्त्वाकांक्षा त्यांनी धरावी आणि तशी प्रकट गुणाधिष्ठित योग्यता संपादिण्यास्तव संघटिपणे यत्न करणारे जातीसंघ स्थापावयाचेच असेल तर स्थापावे. म्हणजे ते हिंदूसंघटनाच्या राष्ट्रीय दृष्टीने न्यूनात न्यून आक्षेपार्ह ठरतील. असाच आग्रह आम्ही आमच्या भाषणात त्या संघास केला आणि त्या संघानेही आपल्या घटनेच्या मुखबंधातच (मेमोरॅंडममध्येच) त्या आशयाची वरील प्रतिज्ञा गोवून टाकली. आपल्या हिंदुराष्ट्रात आज जे सहस्रावधी जातीसंघ आहेत त्या सर्वांनी जर हेच धोरण स्वीकारले, तर अखिल हिंदूसंघटनांच्या

कार्यी ते आज होत आहेत तितके तरी हानीकारक होणार नाहीत. ते कसे हे या लेखात आम्ही यापुढे दाखविणारच आहोत.

## २३.१ जातीभेदाच्या विषारी सर्पाचा मुख्य विषारी दात कोणता?

जातीभेद तोडायचा म्हणजे काय करावयाचे याविषयीचा सविस्तर विचार आम्ही आजवर काही लेखात जो केलेला आहे, त्यातील या जातीसंघासंबंधी जी विधेये (point) प्रथमतः लक्षात घेतली पाहिजेत, ती थोडक्यात अशी -

१) आजच्या जातीभेदात जे अत्यंत विघटक असे मूळ तत्त्व आहे, ते म्हणजे हेच होय की, प्रकट गुणांवरून कोणत्याही व्यक्तीची उच्चनीचता न ठरविता ती, ती व्यक्ती कोणत्या जातीत जन्मली किंवा ती जाती एका ठराविक पोथीच्या कोष्टकात कोणत्या स्थानी सहस्रावधी वर्षांपूर्वी नोंदविली गेली, या एका गोष्टी वरूनच काय ती ठरविली जाते. केवळ जन्मानेच काय ती, प्रकट गुणांचा मुळीच विचार न करता, मनुष्याची उच्चनीचता ठरविली जाते, आणि या निव्वळ मानीव नि पोथीजात उच्चनीचतेच्या आधारे मनुष्यास जन्मतःच काही विशिष्ट अधिकार वा व्यंगे तो स्वतःच्या गुणाने त्यास पात्र आहे की नाही ते मुळीच न पाहता, भोगता येतात वा भोगावी लागतात. जातीजातीत जी वैमनस्ये नि बेकी उत्पन्न होते, त्या साऱ्याचे मूळ या प्रत्यक्ष पात्रापात्रतेचा विचार न करता गृहीत धरल्या जाणाऱ्या, जन्मजात मानल्या जाणाऱ्या जन्मजात उच्चनीचतेत नि दिल्या जाणाऱ्या विशिष्टाधिकारातच साठविलेले आहे. जातीभेदाच्या प्राणघातक सर्पाचा मुख्य विषारी दात तो हाच!

२) जातीभेदामुळे हिंदूसंघटनास अत्यंत मारक झालेल्या सर्व रूढी नि वैमनस्ये ह्या केवळ मानीव अशा जन्मजात उच्चनीचतेवर कशा अवलंबतात त्याची दहा-पाच उदाहरणे पाहा - व्यवसायबंदी ही उच्च कुलात जन्मला त्याला, पात्रापात्रता न पाहाता, उच्च धंद्याचा, आणि पोथीजात नीच छापाच्या कुळात जन्मला त्याला नीच धंद्याचा राखीव अधिकार देते. भटाचा मुलगा मूर्ख असला तरी भट, मराठ्याचा मुलगा चोर, भ्याड असला तरी लढवय्या स्पृश्य, भंग्याचा मुलगा बुद्धीमान असला तरी भंगी, महाराहूनही नीच! आज व्यवसायबंदी तुटलेली असली तरी भट नि भंगी ह्यांची कामे त्या त्या पोथीजात छापाच्या उच्चनीचपणावर जन्मतः वाटलेली आहेत. दुसरे उदाहरण स्पर्शबंदीचे. काही जातीत महार म्हणूनच तो अस्पृश्य, मग राजभोज, काजरोळकर वा आंबेडकर का असेना! आणि ब्राह्मणात वा वाण्यात जन्मला म्हणूनच भटजी, शेटजी स्पृश्य! मग तो स्वतः क्षयी, पापी, दिवाळखोर, दुरात्मा का असेना! तिसरे उदाहरण, वेदोक्त बंदीचे, शिवाजी महाराज शूद्रकुलात जन्मले, तुकाराम वाणी म्हणूनच त्यांनी वेद सांगता कामा नयेत! अरविंद, श्रद्धानंद, विवेकानंद अब्राह्मण म्हणून संन्यासाचे वा वेदपठनाचे अनधिकारी! आणि निरक्षर, वेदविक्या वा वेडसर, सैपाकी असला तरी ब्राह्मण कुलातला म्हणून उपनिषदांचा अधिकारी! संन्यासाची वस्त्रे त्याची पैतृक संपदा! चौथे उदाहरण रोटीबंदीचे. गलिच्छ ब्राह्मण असला, देशद्रोही बाळाजी नातू किंवा सूऱ्याजी पिसाळ असला तरी त्याच्यासह जेवल्याने इतर ब्राह्मणांची वा मराठ्यांची जात जाणार नाही, तो पाङ्‌त; पण अगदी स्वच्छ शाकाहारी वारकरी, देवलसी चोखामेळा असला तरी त्याच्यासह जेवताच ब्राह्मण-मराठ्याची जात जाते, धर्म बुडतो. गांधीसहे जेवणे ब्राह्मणास वर्ज्य, मराठ्यास निषिद्ध, पण

गदळ अशा कोणत्याही ब्राह्मण-मराठ्याच्या खाणावळीत जेवल्याने ती जात जात नाही! महार हा अगदी मृत मांस खावू असला तरी उच्चतर महार कुळात जन्मला म्हणूनच, माळकरी शाकाहारी, साधू अशा सूरदासाच्या किंवा भंग्याच्या घरी जेवला की पतित, जात जाते! महाराहून भंग्याचे कुल जन्मजात नीच! बेटीबंदीची गोष्टच बोलणे नको. लुळा, पांगळा, पापी ब्राह्मण वरला तरी ब्राह्मण वधु पतित नाही. पण तिने सुविद्य, सभ्य, प्रभू गृहस्थाशी विवाह केला की ती पतित! दारुडा, मोळीवाला मराठा वरला तरी मराठीण पतित नव्हे, पण तिने राजभोजासारख्या शाकाहारी, लोकसेवक, सुविद्य चांभाराशी प्रीतिविवाह केला तर ती बहिष्कार्य, नीच, तिचे तोंड पाहू नये! खरा संकर म्हणजे, संतती उत्तरोत्तर उत्कर्ष पावत नाही ते लग्न. हा सुजनिविज्ञानाचा (Eugenicsचा) नियम कशाशी खावा ह्याचाही पत्ता नाही. या आजच्या जातीभेदाचा संकर म्हणजे पोथीछाप उच्च वा नीच जातीजातीतील विवाह! मग त्या वधुवरात कोणी क्षयी असो वा त्यांची संतती प्रकटपणे अधोध: जाणारी दिसो! अगदी महाराची गोष्ट घ्या. त्यांच्या मुलीला जर एखादा पाच पिढ्यांचा निरोगी, सुविद्य, सुरेख, सधन असा काठेवाडी भंगी मुलगा वरण्यास सजला, तर तो महार कधीही देणार नाही. पण काळा, घाणेरडा, रोगट, अडाणी, निर्धन का असेना, पण महार मुलगा पाहील. सुजनिशास्त्राच्या दृष्टीने उत्कृष्ट संतती होण्यास तो भंगी वरच युक्त. त्या महार मुलाला ती मुलगी देणे म्हणजे निकृष्ट संततीला आमंत्रिणे, तो खरा संकर! पण ती दृष्टीच नाही. कारण ब्राह्मण-मराठ्यांप्रमाणेच तो महार मुलगाही महार जातीत जन्मला म्हणूनच त्या भंगी मुलापेक्षा उच्च मानला जाणार - महाराकडून सुद्धा! आपल्या जातीला भंगी जातीहून उच्चतर समजणार!

आज त्रावणकोर येथे मंदिरे अस्पृश्यांना उघडी केली ती एझुवा अस्पृश्यांना काय ती! पण पालुवा नि परिया जातींना त्यात प्रवेश दिलेला नाही. परियात काहीजण एझुवाइतकेच सुधारलेले आहेत. पण त्यांना मंदिरात येऊदेण्यास एझुवा अस्पृश्यांचाही विरोध आहे! एझुवा स्वत: इतरांचे अस्पृश्य असले नि इतरांचा त्यांना तो घोर अन्याय वाटत असला, तरी तेच एझुवा जेव्हा पालुवा नि परिया यांना अस्पृश्य मानतात तेव्हा तो मात्र त्यांना अन्याय न वाटता सनातन धर्म वाटतो, नि तेच अस्पृश्य एझुवा पालुवांना नि परियांना अस्पृश्य मानतात. पालुवा ज्या मंदिरात शिरेल ते मात्र खरेच बाटेल असे समजतात! कारण एखाद्या एझुवाइतकाच परिया व्यक्तीश: सुधारलेला असला, तरी तो नीच जातीत जन्मलेला! स्पृश्यांच्या पोथीत एझुवा जन्मत: नीच! एझुवांच्या पोथीत पालुवा, परिया जन्मत: नीच!

यद्यपी आपल्या राज्यातील राज्यमंदिरे एझुवा अस्पृश्यांना अगदी सताड मोकळी करण्यात त्रावणकोरच्या महाराजांनी आणि त्यांचे कारभारी श्री. रामस्वामी अय्यर ह्यांनी अत्यंत अभिनंदनीय सुधारणा केली आहे, तरीही रत्नागिरीच्या पतितपावनादी मंदिराप्रमाणे महारांनाच नव्हे, तर भंग्यादिक यच्चयावत्‌हिंदूंना मंदिर प्रवेश समानतेने देण्यात जातीभेदाचे कंबरडेच जसे पुरतेपणी मोडले गेले आहे, तसे तिथे अद्याप झालेले नाही हे विसरता कामा नये. दुसरीही एक विषमता त्रावणकोर मंदिरात आहे ती वेदोक्त पूजेची. पतितपावनात पूर्वास्पृश्य मूर्तीचीसुद्धा नि वेदोक्तानेसुद्धा पूजा करू शकतो. तो अधिकार एझुवांनादेखील अद्याप मिळालेला नाही, तिसरी गोष्ट ही ध्यानात ठेवण्यासारखी आहे की, हा मंदिरप्रवेश सबंध राज्यात व्यवहारून दाखविण्याचे दायित्व त्रावणकोरच्या कारभारीपदावर मुसलमान कारभारी होते तोवर कोणीही अंगावर घेऊ

धजला नाही. पण शेवटी ती दुर्घट सुधारणा व्यवहारावून घडवून आणण्याचे दायित्व श्री. अय्यरसारख्या एका ब्राह्मण कारभाऱ्यानेच अंगावर घेऊन पार पाडले! उच्चवर्णीय स्पृश्य, अस्पृश्यतानिवारण्यास कधीही अनुकूल होणार नाहीत म्हणून बाष्कळ हाकाटी करणाऱ्या हिंदूद्वेष्ट्यांनी ही गोष्ट ध्यानात ठेवावी की, एक क्षत्रिय महाराजा नि एक ब्राह्मण प्रधान अस्पृश्यांना शेकडो राजमंदिरे उघडतो. पण एझुवा अस्पृश्य हा मात्र पालुवा, परियाला आपल्याहून जन्मतःच नीचतर, अस्पृश्यतर समजण्यास सोडीत नाही, त्यांना शिवत नाही! म्हणजे जातीभेदातील मानीव अशी जन्मजात उच्चनीचता अद्यापही उचलून धरण्याच्या पापांतला साराच वाटा उच्चवणीय स्पृश्यांचा नसून त्यांनाच काय त्या भरसमाट शिव्या मोजणाऱ्या आंबेडकरांच्या, भंग्याला न शिवणाऱ्या महार जातीचा नि परियाला न शिवणाऱ्या एझुवा अस्पृश्यांचाही त्या शिव्यांत नि पापात प्राप्तीचा अर्धा वाटा राखून ठेवलेला आहे!

३) वरील सर्व विवेचनावरून हे ध्यानात येईल की, जन्मजात जातीभेदातील सर्व हानीकारक प्रवृत्तीचे मूळ मानीव नि पोथीछाप जन्मतः लटकावल्या जाणाऱ्या उच्चनीचतेत आहे. पूर्वी केव्हा तरी ही जातीजातीच्या वाट्यास आलेली उच्चनीचता आणि त्यापासून प्रसवलेल्या ह्या स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृती रूढी ह्या पुष्कळ अंशी उपयुक्त नि अपरिहार्यही ठरलेल्या असतील, जातीभेद हा बऱ्याच अंशी लाभकारकही झालेला असेल, पण आपल्यापुढे आज तो पूर्वीचा प्रश्न नाही. जातीजातीत मानली जाणारी ही जन्मजात उच्चनीचता आज प्रकट गुणांच्या कसोटीने सपशेल खोटी नि हानीकारक ठरत आहे आणि तज्जन्य स्पर्शबंदी, वेदोक्तबंदी, रोटीबंदी, प्रभृती रूढी हिंदुसंघटनास आज अत्यंत घातक ठरत आहेत. प्रकट गुणांवरूनच उच्चनीचता आज ठरविणे न्याय्य नि हितकारक झालेले आहे. आजच्या जातीभेदातील सर्व अनिष्टांचे मूळच असलेली मानीव उच्चनीचतेची भावना तेवढी उच्चाटून टाकली की ह्या जातीभेदाचा विषारी दातच उपटल्यासारखे होणारे आहे.

४) जर हे जन्मजात उच्चनीचतेचे खूळ उखडले आणि स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी ह्या ज्या आज जातीभेदाच्या आधारभूत रूढी आहेत त्या तोंडल्या तर मग जो जातीभेद उरेल तो विषारी दात पाडलेल्या सापासारखा बहुतांशी निर्जीव नि निरूपद्रवी होऊन पडलेला असेल. आज जशी कुळाकुळांची उपनावे निराळी आहेत, तशीच ही जातीची नावे नि त्यांचे गट जिवंत राहिले तरी उपद्रवी राहणार नाहीत. कारण ब्राह्मण जातीचे नाव जरी ब्राह्मण राहिले तरी जर त्याच्या प्रकट गुणापलीकडे त्यास जन्मजात श्रेष्ठत्व किंवा जन्मजात विशेषाधिकार उरले नाहीत, तर त्या गटाने स्वतःस जुन्या ऐतिहासिक परंपरेपुरते ब्राह्मण म्हणविले काय नि न म्हणविले काय जवळ जवळ सारखेच. महाराची जन्मजात अस्पृश्यता निघाली, तो आपल्या गुणाप्रमाणे कोणताही धंदा करू शकला, समाजात इतरांप्रमाणेच वावरू लागला, त्याला इष्ट त्याच्यासह जेवू लागला, मनात आले तर वेदविद्येपासून वाटेल त्या विद्येपर्यंत शिकण्याची आडकाठी त्याच्या प्रकरणी उरली नाही, जात म्हणून कोणताही कमीपणा त्याला भोगावा लागला नाही, तर त्या जातीने स्वतःस महार जातच म्हणविले तरी आणि त्यांच्या जातीचे संघ करून त्यांच्या पात्रतेप्रमाणे इतर कोणत्याही नागरिकाच्या समानतेने मिळावयास हवेत ते आपले अधिकार मिळविण्यासाठी किंवा त्या जातीतील शिक्षणादिक सुधारणा नि त्यांचा विकास करण्यासाठी त्या संघाने प्रत्यत्न केले तरी त्यात हिंदूसंघटनास आजच्या मानाने विघातक असे फारसे काही

ठरणार नाही. असे केवळ नावापुरतेच, कोणताही जन्मजात अधिकार नसलेले, पण जात मानणारे जातीसंघ म्हणजे जवळजवळ वर्गसंघच होत.

आमचे उपनाव सावरकर, किर्लोस्करांचे किर्लोस्कर. नुसती उपनावे भिन्न आहेत म्हणून आमच्या कुळांचा काही वाद होत नाही. पण सावरकरांच्या कुळात जन्मलेला मनुष्य म्हटला की तो ती परीक्षा उतरो वा न उतरो, बॅरिस्टर समजून ते अधिकार त्याला मिळालेच पाहिजेत आणि किर्लोस्कर कुळातील प्रत्येकाने त्याला त्या धंद्याची आवड वा पात्रता असो वा नसो, त्याने लोखंडी नांगरांचाच कारखाना काढला पाहिजे, असा जन्मजात नियम केला की भांडणाला आरंभ झालाच, समाजाची हानी झालीच म्हणून समजावे! आज जातीभेदाने जी हानी नि वैमनस्ये माजतात, ती अशा केवळ मानीव जन्मजात उच्चनीचतेच्या विशिष्टाधिकारांनी आणि विशिष्ट व्यंगांनीच काय ती माजतात. कोणत्याही जातीला तिच्या प्रकट गुणांपलीकडे कोणतीही विशिष्ट उच्चता वा नीचता चिकटविणे बंद झाले की मग स्वतःस कोणी ब्राह्मण म्हणविले काय किंवा महार म्हणविले काय, ब्राह्मणसंघ स्थापला काय, महारसंघ स्थापला काय, कोण्या कुळाने स्वतःला सावरकर म्हणविले काय किंवा किर्लोस्कर म्हणविले काय, हे जितके निरूपद्रवी, जवळ जवळ तितकेच निरूपद्रवी होणार आहे.

इतके विवेचन एकदा ध्यानात ठेवले, की मग ह्या संक्रमणकालापुरते जात्युच्छेदक पक्षाने जातीसंघाविषयी काय धोरण ठेवावयाचे ते ठरविणे पुष्कळच सुलभ होते. ते कसे हे आता थोडक्यात पाहू.

## २३.२संक्रमणकालात जातीसंघ हे एक अपरिहार्य अनिष्ट आहे.

जात्युच्छेदकांनी एक मुख्य गोष्ट जी ध्यानी ठेवली पाहिजे, ती ही की या संक्रमणकालात आणखी शंभर वर्षे तरी जातीसंघही मोड म्हणताच मोडून जाणारे नाहीत. ती आपल्या मार्गातील एक अनिष्ट नि प्रचंड धोंड आहे. आणि तो पाहाड कुदळीच्या घावासरशी उन्मळणे दुर्घट. त्याला बोगदे पाडणे मात्र त्यातल्या त्यात सुलभ. ते एक अपरिहार्य अनिष्ट (Necessary evil) कसे, ते सविस्तरपणे या लेखाच्या अवकाशात सांगणे अशक्य. पण काही मुख्य कारणे उल्लेखू.

**पहिले कारण** - जोवर बहुतेक जातींचे जातीसंघ आहेत तोवर उरलेल्यांना ते टाळणे दुर्घट नि हानीकारक होते. उदाहरणार्थ, वैश्यसंघ घ्या. ब्राह्मणसंघ ब्राह्मण विद्यार्थ्यांना साहाय्य देणार. सारस्वत संघ, भावसार संघ, प्रभू संघ, कायस्थ संघ हे त्या त्या विद्यार्थ्यांना सहाय्य देणार. आता वाणी जातीच्या तरुणांनी अगदी शिक्षणासाठीदेखील कोणाच्या दारी जावे? जिथे जातील तिथे तो संघ म्हणणार 'आमच्या जातीपुरती ही शिष्यवृत्ती! अशा स्थितीत वाणी विद्यार्थ्यांची कुचंबणा जर टाळणे तर त्यांच्या जातीचा संघटित संघ अपरिहार्य होतो. चित्पावनांचा संघ आजवर म्हणण्यासारखा नव्हता. पण कऱ्हाडे, सारस्वत, देवरुखे, वैश्य, शिंपी, न्हावी, मराठा प्रभृती इतर बहुतेक जातींचे संघ असल्याने चित्पावनांच्या विशिष्ट उणिवा नि प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनाही, निदान शिक्षण साहाय्यकादिक स्वरूपाचा तरी, संघ काढणे अपरिहार्यच होऊन बसले!

**दुसरे कारण** - आज तरी जातीसंस्था अगदी बद्धमूल नि जिवंत. प्रत्येक जातीला जन्मतः क्रमबद्ध उच्चनीचता लटकलेली. त्यामुळे त्यांच्या हिताहितांचे प्रश्न त्यांच्यापुरतेच असे काही ठरतात. उदाहरणार्थ महारादिक अस्पृश्यांचे. अस्पृश्यतेचा बट्टा त्यांनाच नडणार. तो उच्चाटणे तर त्या विशिष्ट व्यंगाच्या निराकरणार्थ त्यांचाच संघटित संघ जो यत्न करू शकेल तो दुसरे संघ कसा करणार? गाडीवाल्यांची विशिष्ट दुःखे जशी गाडीवाला संघच व्यक्तवू नि प्रतिकारू शकतो, तसे दूधवाला संघ करू शकणे दुर्घट. महारांच्या मुलांना सरमिसळ बसविणे व निःशुल्क घेणे ही सोय जर करायची तर त्या प्रश्नापुरती 'महार जात' मानावीच लागणार! अस्पृश्यांतही चांभारांची दुःखे त्यातही निराळी! कारण त्यांचा धंदा, स्थिती, स्थान (Position) ही निराळी! भंग्यांची जातीविषयक दुःखे नि उणीवा निराळ्या. वेदोक्ताचा अधिकार मिळविणे हा मराठ्यांपुढील न्याय्य प्रश्न, त्याला मराठा संघच हवा. मनुष्यस्वभाव पाहिला तर ब्राह्मणसंघ तो प्रश्न सहसा कशास नि कसा सोडवील? स्त्रियांच्या अडचणी सोडवायच्या तर स्त्रीसंघ हवा! जातीची जातवार अशीच काही विशिष्ट दुःखे, उणीवा नि आवश्यकता जोवर विद्यमान आहेत तोवर त्या त्या विशेष प्रश्नापुरते तरी ते ते ज्ञातिसंघ काढून झटणे अपरिहार्यच ठरते. जातीविषयक अशी कोणतीही विशिष्ट उणिवा, अन्याय वा आवश्यकता जसजशी नाहीशी होत जाईल, साऱ्या जाती एका पातळीत जसजशा येतील, म्हणजेच ज्या मानाने जातीविशिष्ट विषमता घटून जातीभेद ढिलावेल त्यामानानेच काय ते ते संघ स्वयमेवच अनावश्यक ठरत ठरत मरणाच्या दारी बसू लागतील, तोवर नाही.

**तिसरे विशेष महत्त्वाचे कारण** - या अपरिहार्य अनिष्टातही सुदैवाने जी एक इष्ट प्रवृत्ती बीजरूपाने वसते तिचा, विषाचा औषधास तसा, चाणाक्षपणे करता आल्यास संघटनासही पुष्कळ उपयोग करून घेता येतो. वाईट जर मुळातच टाळवत नसेल तर त्यातूनच जे काही काढता येईल ते चांगले निवडून काढणे भाग. या न्यायाने जातीसंघांच्या नावे आज आपल्या हिंदू समाजात निदान त्या त्या गटांची तरी जी संघटना होऊ शकते तशी सबळ, सहज नि सत्वर इतर कोणत्याही नावाने अजून होऊ शकत नाही. आम्ही एका राष्ट्राचे वा एका धर्माचे, ह्या भावनेपेक्षा आम्ही अमुक एक जातीचे हीच भावना आज आपल्या कोट्यवधी सामान्य जनतेस अत्यंत चिवट, जाज्वल्य, लोकसंग्राहक आहे. जन्मापासून उठल्याबसल्या, खातापिता, नात्यागोत्यात बारसे ते बाराव्या पर्यंतच्या सर्व धर्मकाऱ्यात जातीचा संबंध पदोपदी, जातीची जाणीव क्षणोक्षणी धार्मिक अर्थीच येत राहिल्यामुळे हिंदूंच्या अर्भकापासून तो अतिवृद्धापर्यंत आपण ब्राह्मण, वाणी वा महार हीच काय ती लोकसंग्रहात भावना अत्यंत प्रबळ नि सवयीने रोमारोमांत भिनलेली आज तरी आढळते. त्यामुळेच वाणी जातीचा संघ म्हटला की अगदी खेडेगावातील मागासलेल्या वाण्यालादेखील त्यांचे ममत्व - आपला त्यात हितसंबंध आलाच आला की तीव्र जाणीव कोणताही प्रचार, प्रयत्न न करता आज आपोआप जागून उठते. तसे ममत्व अद्याप कोट्यवधी सामान्य जनतेत हिंदूसंघ वा राष्ट्रसंघ या नावाने झोपडीझोपडीतून चेतविले तरी चेतविले जात नाही. ही धडधडीत वस्तुस्थिती नाकारणे मूर्खपणाचे होईल. आंबेडकर म्हणताच गावोगावचा महार त्यांना पाहावयास येतो, तो ते बॅरिस्टर म्हणून नव्हे, तर महारांतले बॅरिस्टर म्हणून - 'आमच्या जातीचे' म्हणून! हीच प्रवृत्ती ब्राह्मण ते भंग्यापर्यंत. आम्ही वैश्य परिषदेला संगमेश्वरास गेलो. पाहतो तो अगदी अडाणी खेडवळ म्हातारे वाणीसुद्धा

तिथे सोपस्काराने भाडे स्वतः खर्चून आलेले! पण हिंदू परिषद वा हिंदी परिषद म्हणून जर ती भरती तर त्यातील शेकडा पाउणशे खेडवळ वाणी भाडे दिले असेत तरी येते ना, असेच होते!!

ब्राह्मणांच्या अगदी शेजारी असणाऱ्या मराठ्यांचे एकमेकांना, आजच्या स्थितीतही लाक्षणिकपणे नव्हे तर अक्षरशः, सोयरसुतक नसते. पण दोन पिढ्यांपूर्वी कलकत्त्यास गेलेल्या नि तोंडही न पाहिलेल्या ब्राह्मण-मराठ्यांशी त्यांचे रक्तबीज सोयरसुतक - प्रभृती निकटचे हितसंबंध असतात. अशा स्थितीत व्यक्ती जातीशी रोटीबेटी संबंधे घट्ट बांधलेली, पण प्रत्येक जात दुसऱ्या जातीपासून रोटीबंदी-बेटीबंदी प्रभृती खंदकांनी दुरावलेली. काही प्रकरणी एकमेकांचा स्पर्श देखील, मद्राससारख्या प्रांती दर्शनसुद्धा वर्ज्य!! अशा परिस्थितीत हिंदुराष्ट्र संघटित करणे तर एकदम व्यक्ती व्यक्तीशी जोडणे महादुर्घट, जात जातीशी जोडण्यापुरते नवे दुवे पाडणे त्यातल्या त्यात प्रारंभी सुलभ. लोकसंग्रह प्रथम जातीसंघानीच सहज साधणार. नव्या पद्धतीचे जातीसंघ जे आज पटापट नको म्हटले तरी आपोआप उपजत चालले आहेत आणि हिंदूसंघ बळेबळे उभारावे लागत आहेत त्याचे हेच कारण.

उपजातीसंघ म्हटला तरी काही पोटभेदांना आळा पडणारच. महाजातीसंघ म्हटला की, उपजातींना एकजीव करण्याची प्रवृत्ती वाढणारच. कारण संघ म्हणजे आकुंचितपणास नाशणारी प्रवृत्ती, ब्राह्मण महासभा वा अखिल ब्राह्मणसंघ निघाला की ब्राह्मणांतील पोटभेद नाशू पाहतो, तितक्या मानाने संघटन वाढवितो. भावसार क्षत्रियसंघ निघाला की, नामदेव, कोकणस्थ, देशस्थ, शाक्त, वैष्णव, शिंपी, रंगारी पोटभेदांची एकीकरणक्रिया चालू करतो, त्या मानाने संघटन वाढवितो. वैश्यसंघ निघाला की, संगमेश्वरी, पाटरे, नार्वेकरी, वाणी कोणत्या तरी एका सूत्रात गोवून तितक्या पोटजाती एकजीव करू पाहतो. त्यामानाने संघटन वाढवितो. या दृष्टीने पाहिले असता ह्या जातीजातींच्या महासंघांनीच जर त्यांचा योग्य उपयोग करून घेण्याची दक्षता ठेवली तर हिंदुसंघटनाच्या राष्ट्रमंदिराकडे चढत जाण्याच्या पायऱ्या करून सोडणे फारसे दुर्घट नाही. पोटजातीभेदांची आकुंचित वृत्ती नाश करीत करीत हे जातीमहासंघ ज्या संघटक प्रवृत्तीला लक्षावधी हिंदूंमध्ये उत्पादन करतात, त्याच व्यापकपणाच्या प्रवृत्तीबळे हिंदूसंघटनाची क्षमता नि शक्यता अधिकाधिक वाढत गेल्यावाचून राहणार नाही - जर त्या त्या जाती यांचे सुकाणू त्याच हिंदूसंघटक ध्येयाच्या दिशेने प्रथमपासूनच बळकट रोखून धरण्याच्या यत्नात आम्ही ढिलाई केली नाही तर!

चौथे कारण - ज्या योगे हे जातीसंघ संक्रमणकालात अपरिहार्य होऊन बसतात ते हे की त्यांच्या द्वारेच सुलभतरपणे साधू शकणारी काही उपयुक्त कार्ये आहेत. उदा. जातीतील शिक्षण हिंदू विद्यार्थीसाहाय्यक संघ काढला तर किंवा राष्ट्रीय शिक्षणसंघ काढला तर राष्ट्राची तळमळ लागलेल्या अशा गावोगावच्या दहा-पाच व्यक्ती काय त्या ते साहाय्य देण्यास पुढे येतात. कारण इतर शतावधी खेडवळांना राष्ट्राची जाणीव नाही सारखीच. पण महार विद्यार्थी संघ, कुणबी विद्यार्थी संघ किंवा भंडारी जातीच्या शिक्षणार्थ संघ काढा, की मागसलेल्या असल्या तरी त्या त्या जातीच्या बायाबापड्यादेखील त्याला साहाय्य देण्यास अधिक तत्परतेने पुढे येतात! हा रोखठोक अनुभव. कारणही स्पष्टच. त्यांच्यात जातीधर्माची शिकवण जशी आईच्या दुधासहच पाजलेली असते, तशी अजून राष्ट्रधर्माची नसते. ती राष्ट्रधर्माची शिकवण त्यांच्या रोमरोमी भिनेतो, शिक्षणवृद्धी, आरोग्य, दारूला आळा इत्यादी कित्येक सुधारणांना लागणारे

श्रम नि पैसे - जे राष्ट्रसभेच्या वा हिंदू सभेच्या नावाने कधीही अद्याप उकळता येत नाहीत, ते सुद्धा सहजी मिळतात. पोटजातीतील रोटीबंदी मोडण्यातही या जातीमहासंघांचा उपयोग अत्याधिक होतो. भावसार महासभेने शिंप्यातील पोटजातीत लग्ने करण्याचे ठराव करता करता ती ती लग्ने होऊ लागली हे प्रत्यक्ष आजचेच उदाहरण पाहा. तसे हिंदूमहासभेच्या वा जात्युच्छेदक संघाच्या ठरावाने झटपट बेटीबंदी तोंडणे शक्य झाले नसते. कारण हिंदू महासभा काय असते हे ज्या शतावधी अडाणी शिंप्यांना माहित नाही, त्यांनाही शिंपी जातीचा संघ काय ते चटकन कळते, म्हणूनच त्याने ममत्व वाटते. महारांनी ढोरे ओढू नयेत, असा महार परिषदांतून ठराव झाला, तेव्हा गावोगावी कोकणात त्यांची पैशाची हानी होत असताही नि पुष्कळ छळ झाला तरी, शेकडो महारांनी ढोरे ओढणे नि मृतमांस खाणे सोडले आहे. राष्ट्रसभेच्या ठरावाने तो परिणाम आज तितक्या झपाट्याने झाला नसता. सारांश शिक्षणाची वाढ होऊन शतावधी पोटजातीतील रोटीबंदी, बेटीबंदी तुटून, गदळ चाली सुटून, कोट्यवधी हिंदूंना त्या त्या मर्यादित प्रमाणात का होईना, पण संघटित नि सुधारलेले करण्याच्या कार्यी या जातीमहासंघांचा उपयोग त्यातल्या त्यात आज अधिक होतो आणि त्या दृष्टीने समाज अखिल हिंदूसंघटनाच्या जवळजवळ आणून सोडला जातो. यास्तव सुद्धा हे जातीसंघ आज अपरिहार्यच ठरतात.

अर्थात् जातीसंघ हे जात्युच्छेदनाच्या मार्गातील सुरुंग असले तरी, कुशलपणे उपयोग करून घेतला तर आणि दुसरे तसे साधन जवळ नाही तोवर त्यांचाच जो काय होईल तो उपयोग करून घेणे अपरिहार्य असल्यामुळे, त्याच जातीसंघांच्या सुरुंगांनी जातीभेदाचाही पाया खिळाखिळा करण्याचे कार्य पुष्कळ प्रमाणात साधता येण्यासारखे आहे - साधून घेणे भाग आहे.

## २३.३ जात्युच्छेदकांचे जातीसंघाविषयीचे धोरण कसे असावे?

येथपर्यंत केलेल्या विवेचनानंतर आता शेवटी दिग्दर्शनापुरते जातीसंघाविषयीचे धोरण ठरविताना कोणचा कार्यक्रम अनुसरावा ते दाखविले असता, तसेच का करावे ते समजून येईल.

१) पहिली आवश्यक गोष्ट ही की, कोणत्याही जातीसंघाशी कसलाही संबंध न ठेवणारे असे जात्युच्छेदक मंडळ शक्य त्या त्या नगरग्रामी स्थापावे. यातील सभासदांनी प्रकटपणे आपली हिंदू हीच काय ती यापुढची जात नोंदवावी. शिरगणतीत सरकारी कागदातही पोटजात मानू नये. लिहू नये. आम्ही असेच करतो. स्पर्शबंदी, रोटीबंदी प्रकटपणे नावे छापून तोडावी. सहभोजनांचा सारखा धुमधडाका उडवावा. पूर्वास्पृश्यांच्या घरी प्रकटपणे नावे देऊन जेवावे. स्वच्छतेचे बंधन तेवढे पाळणे आवश्यक.

२) आपण कोणताही जातीसंघ स्थापू नये. कोणतीही जात आजची आपली जात म्हणूनच मानू नये - सांगू नये. परंतु आपण जन्मलो अमक्या कुळात हे जसे सांगणे अनाक्षेपार्ह, तसेच आपण जन्मलो अमक्या जातीत हे सांगणेही अनाक्षेपार्ह. हे नाकारणेच हास्यास्पद! मी राष्ट्रवादी असलो तरी कोणत्या गावी जन्मलो हे विचारता 'हिंदुस्थानात' हे सांगणे हास्यास्पद. भगूरगावी जन्मलो हेच सांगणे युक्त, सत्य, अनाक्षेपार्ह. तसेच जन्मलो चित्पावन कुळात हेही सांगितलेच

पाहिजे. तो इतिहासच आहे. कारण माझे वाडवडील चित्पावनात मोडत हे नाकारणेच अशक्य! मी स्वतः चित्पावन जात मानीत नाही, पण वडील मानीत, तेव्हा मी जन्मलो चित्पावन जातीत, पण आता मनाने आहे हिंदू जातीचाच काय तो, हेच ठाण घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे मी जरी स्वतः जातीसंघ न काढला तरीही जोवर काही प्रश्न निव्वळ विशिष्ट जातीपुरतेच सोडविणे हिंदूसंघटनाच्या दृष्टीनेच अपरिहार्य आहे, तोवर त्या प्रश्नांपुरती जातीपातीची जाणीव मला ठेवलीच पाहिजे. संक्रमणकालापुरता जातीभेदाचा नि जातीजातीचा उल्लेख करीत गेलेच पाहिजे. अस्पृश्यता काढणे तर अस्पृश्य जातींचा उल्लेख केलाच पाहिजे. सहभोजनात सर्व जाती सरमिसळ बसल्या हे सिद्ध करण्यासाठीच, जाती मोडण्यासाठीच, सहभोजकांना स्वतःची सध्याची जात नसली तरीही त्यांची नावे छापताना त्यांची जन्माची मानीव जात कोणती ते 'ब्राह्मण', 'मराठा', 'महार' इत्यादी नाव त्यापुढे कंसात घातलेच पाहिजे, ते विसंगत नाही, इतकेच नव्हे तर तसे आपल्या जन्माच्या मानीव जातीचे नाव न सांगणे हा निव्वळ शब्दच्छल होणारा आहे. त्याच कारणासाठी आणि वर केलेल्या जातीसंघाच्या अनिष्टतेतही जो इष्ट घटक आहे. त्याचा जात्युच्छेदाकडेच उपयोग करून घेण्यासाठी जात्युच्छेदकांनी सर्वच जातीसंघाशी सर्वातोपरी असहकार करणे चुकीचे, निरर्थक नि अनर्थकही होणार आहे.

३) सर्वच जातीसंघांशी सर्वतोपरी असहकार करू नये, असे जे वर म्हटले त्याचाच अर्थ असा की, काही जातीसंघांशी सर्वतोपरी असहकार नि काहींशी काही अंशी सहकार केला पाहिजे. ती निवड कशी करायची? तर त्याची अगदी चोख कसोटी अशी-

४) आज असलेल्या जातीसंघात काही स्वतःच्या जातीचे जन्मजात उच्चत्व गाजविण्यासाठीच निर्मिलेले. त्यामध्ये जातीभेदोच्छेदक मताचा उघड पुरस्कार करणाऱ्यांना नि सहभोजनादिक आचारांनी प्रत्यक्षपणे जातीभेद प्रकट वर्तनात तोडणाऱ्यांना, ते त्यांच्या जातीचे असले तरी, ते वर्तनस्वातंत्र्य गमावल्यावाचून जाता येणार नाही. असे असले तर मात्र अशा त्या जातीसंघाशी जात्युच्छेदकांनी कोणताही संबंध ठेवू नये. उदाहरणार्थ एखाद्या लिंगायत संघाने भंग्यांसह वा ब्राह्मणांसह असो, पण भिन्न जातीशी जेवलेल्यांना बहिष्कार घालणे, अस्पृश्यांना न शिवणे, मंदिरप्रवेश न करू देणे, इत्यादी नियम केले असले आणि ते स्वतः न पाळणारांना तसे पाळणे भाग पाडण्याचा, नाही तर सभासदत्व रद्द करण्याचा हट्ट धरला असला तर अशा जातिसंघाशी जात्युच्छेदकांना केव्हाही नि कसलाही संबंध ठेवता येणार नाही!

५) पण सुदैवाने जातीसंघाचा दुसरा एक वर्ग आहे. उदाहरणार्थ गेल्या दहा वर्षांच्या हिंदूसभेच्या प्रचाराने उत्पन्न झालेल्या संघटक वातावरणात वावरणाऱ्या या रत्नागिरी जिल्ह्यात जे अलीकडेच निघालेल्या वैश्यसभा नि मराठा शिक्षणसंघ ह्या दोन जातीसंघांना घेऊ. प्रथमतः या दोन्ही संघांमध्ये सहभोजनांतून भंग्यांसहसुद्धा प्रकटपणे जेवणारे नि जातीभेद तोडण्याचा नि प्रत्यक्ष वैयक्तिक आचारांना कोणतीही मुरड घालण्याची आवश्यकता न पडता किंवा त्यांच्यावर वा कोणावरच तसे बंधनही संघाकडून घातले न जाता, त्या जातीसंघाचे सभासद होता येते. कार्यकारी मंडळातही असे जात्युच्छेदक निवडून येतात. दुसरे की, ह्या संघाची सभासदपणाची प्रगत व्याख्या इतकीच आहे की, जो वाणी कुळात वा मराठा कुळात जन्मला, तो, मग तो आज आता जातीभेद मानीत असो वा नसो किंवा वाणी वा मराठा ही जात लावीत असो वा नसो- तो तो सभासद होऊ शकतो. तितकी अट मानणे जात्युच्छेदक वाणी वा मराठा

संघटकास विसंगतपणाचे वाटण्याचे काहीच कारण का नाही, हे मागे या लेखात सांगितलेच आहे. तिसरे की, हे संघ अनेक पोटजाती मोडून त्यांच्यातील रोटीबंदी बेटीबंदी तोंडण्यास अनुकूल तेच. त्या त्या जातीत शिक्षण प्रसरविणे, व्यसने, खर्चिकपणादिक दुर्गुण घालवणे, त्या त्या जातीला तिच्या प्रकट गुणानुरूप अधिकार जर इतर जातींच्या वा सरकारच्या दुराग्रहाने वा उपेक्षेने मिळत नसतील तर ते मिळविणे, जातीवर जात म्हणून होणारे विशिष्ट अन्याय रोखणे, इत्यादी अनेक उपयुक्त, न्याय्य नि हिंदूसंघटनानुकूल कार्येच ते संघ बहुतांशी करीत आहेत. इतर जातींवर कुरघोडी करण्याचे वा स्वतःला आपल्या प्रकट गुणांहून अधिक असे कोणतेही विशिष्टाधिकार न मानणारे असेच त्यांचे बहुतांशी धोरण आहे.

अशा जातीसंघाशी जात्युच्छेदकांनी सहकार्य करणेच उपयुक्त. आपल्या जात्युच्छेदक मतांना, प्रचाराला नि प्रकटपणे केलेल्या सहभोजनादिक जात्युच्छेदक आचारांना कोणतीही मुरड घालावी न लागता, जर केवळ जन्मलो त्या जातीत एवढ्याच एका कसोटीने त्या जातीसंघात त्या जातीच्या जात्युच्छेदकास जाता येत असेल, तर त्या जातीसंघाचे सभासद होण्यासही जात्युच्छेदकांना काही हरकत नाही. इतकेच नव्हे तर त्या जातीसंघात असल्या जात्युच्छेदक सभासदांची जितकी संख्या होईल तितके उलट चांगले.

उदाहरणार्थ रोटीबंदी तोडण्याचीच गोष्ट घ्या. वर वानगीसाठी दिलेल्या वा जिल्ह्यातील वैश्य परिषदेत वा मराठा परिषदेतच नव्हे तर चित्पावन संघ परिषदेतही जेवणावळीमध्ये त्या जातीसंघाचे सर्व सभासद नि पाहुणे सरमिसळ बसविण्यात येतात. आता, त्यात अगदी उघडपणे अनेक वेळा महार-भंग्यासहसुद्धा जेवलेले पन्नास-पाउणशे तरी वाणी वा मराठे वा चित्पावन नेहमी असतात. पण त्या वेळी त्याविषयी कोणताही अडथळा येत नाही. म्हणजे अस्पृश्यांनासुद्धा इतर कोणत्याही जातीसह जेवला असता वाणी वा मराठा वा ब्राह्मण जातीबहिष्कार्य होत नाही. रोटीबंदी ही काही जातीचे लक्षण वा कर्तव्य राहिले नाही, असेच सिद्ध झाले. जात्युच्छेदनाच्या मार्गातील इतर जातींसह जेवण्यापायी पडणाऱ्या बहिष्काराच्या घातक रूढीस अप्रत्यक्षपणे मरू घातले - त्या मानाने ती ती जात हिंदूसंघटनाच्या ध्येयाकडे अग्रेसरली. हे कार्य त्या अर्थी काय थोडे झाले? तीच गोष्ट शुद्धीची. शुद्धीकृत वाणी वा मराठे वा ब्राह्मण त्या त्या जातीतच नव्हेत, तर जातीपंगतीत सामावून घेण्यास या परिषदेतून मुळीच आडकाठी करण्यात येत नाही. शुद्धीकृतांना पंगतिपावन करून घेता येते. आता जातीभेदाने रोटीबंदी, शुद्धीबंदीसारख्या बेड्याही ह्या प्रगत नि सुज्ञ ज्ञातिसंघांनी तोंडल्या त्या अर्थातच त्यांच्यात जात्युच्छेदक मताच्या जातभाईंची महत्त्वाची संख्या होती, ते संघटक वाणी वा मराठे वा ब्राह्मण त्या त्या संघात सभासद होऊन गेले म्हणूनच काय ते होय. या जातीसंघांशी तापट असहकार पुकारून गेलेच नसते तर जातीसंघ जगता तो जगताच, पण उघड तो असा प्रगतही न होता, हे अगदी उघड आहे. तेव्हा अशा दुसऱ्या प्रकारच्या जातीसंघात आपली शक्य तो बहुसंख्या करावी. आपल्या जातभाईंना केवळ मानीव अशा जन्मजात म्हणविणाऱ्या उच्चनीचतेच्या घातक भावनांपासून नि जातीभेदांतर्गत स्पर्शबंदी, रोटीबंदी, प्रभृती दुष्ट रूढीपासून मुक्त करविण्याचा यत्न जातीसंघांतही घुसून करावा आणि अशा रीतीने स्वतंत्र जात्युच्छेदक संघाने बाहेरून नि जातीसंघातही घुसून आतून असा दुहेरी मारा जातीभेदावर चालवावा हेच इष्ट. विशेषतः आज जे प्रगतीप्रिय ज्ञातिसंघ आहेत, त्या त्या संघात बहुमताचे

मन अशी एक प्रतिज्ञा मुखबंदावर (मेमोरँडममध्येच) घालण्यास वळवावे की 'हा ज्ञातिसंघ, केवळ जन्मानेच काय ती कोणतीही जात उच्च वा नीच ठरते असे मानीत नाही. प्रत्येक जातीची वा व्यक्तीची योग्यता तिच्या तिच्या प्रकट गुणावरूनच ठरली जावी आणि आपला गुणविकास करण्यास प्रत्येक जातीस समसमान संधी देण्यात यावी.'

रत्नागिरीच्या चित्पावनसंघाने जसे आपले वरील प्रकारचे धोरण स्पष्टपणे निर्देशिले आहे तसेच प्रत्येक प्रगत जातीसंघाने प्रसिद्धपणे मुखबंदात नोंदून टाकावे. त्या त्या ज्ञातिसंघाचे मन वरील प्रतिज्ञेस अनुकूल करण्यासाठीच आणि त्या त्या ज्ञातिसंघाकडूनच पोटजाती मोडून स्पर्शबंदी, रोटीबंदी प्रभृती रूढींची जाणीव नाहीशी करून, शिक्षणादी उपयुक्त कार्येच तेवढी करवून घेण्यासाठीच अशा प्रगत ज्ञातिसंघातून त्या त्या जातीत जन्मलेल्या आमच्या जात्युच्छेदक पक्षाच्या हिंदू बंधुंनी अवश्यमेव जावे, इतकेच नव्हे तर बहुमत होईल तितक्या संख्येने जावे आणि आपल्या अन्य जातीभाअींचे मन जात्युच्छेदनास अनुकूल करून घ्यावे.

आज विधीमंडळातून जातवार जागा राखलेल्या आहेत, त्या नसत्या तर बरे झाले असते. पण ज्या अर्थी आहेत त्या अर्थी महारांच्या जागी कुणी अजागळ प्रतिनिधी जाऊन बसू देण्यापेक्षा, राखीव मराठ्यांच्या जागी एखादा अडमुठा घुसू देण्यापेक्षा दौंडकर, जाधवराव, काजरोळकर, बाळू, राजभोज प्रभृती जातीभेदांना न मानणाऱ्या मंडळींपैकीच कोणी तरी असणे ह्या जातीभेदोच्छेदनाच्या दृष्टीपुरते अधिक हितावह आहे हे उघडच आहे. पण महारांसाठी जागा, मराठ्यांसाठी जागा, ह्या शब्दांना स्वीकारून उभे राहणे म्हणजे जातीभेद काही अंशी तरी मानणे आहे, अशा शाब्दिक बागुलबोवाला भिऊन जर जात्युच्छेदक म्हणविणारे आंबेडकर, राजभोज, जाधवराव, दौंडकर त्या जागांवर बहिष्कार टाकू लागले, तर त्या जागा अगदी कट्टर, अयोग्य नि अडमुठे ज्ञातिनिष्ठ बळकावतील! आणि शब्दासाठी आपण अर्थाचाच गळा कापल्यासारखे होईल! अशा वेळी जातींच्याच नावे विधीमंडळात जात्युच्छेदाकांनी घुसावे नि त्या राखीव जातीनिष्ठतेची प्रथा नवीन घटनेत तोडून टाकवावी - विधीमंडळाच्याच हाताने! हेच इष्ट नि बुद्धीमानपणाचे नव्हे काय? तीच नीती जातीसंघाच्या प्रकरणी तंतोतंत लागू आहे!

ज्ञातिसंघातून जात्युच्छेदक बहुमत होत राहिले की, स्पर्शबंदी, बेटीबंदी प्रभृती आजची जातीपातची लक्षणे नष्ट होतील. कुणी काही खावो, कुणासंगेही खावो, त्याची जात जात नाही ही नवी भावना जातीसंघातच रुढावेल. कोणतीही जाती जन्मत:च केवळ उच्च वा नीच नव्हा ही प्रत्येक संघाची प्रतिज्ञा होईल, म्हणजेच जातीभेदाचा विषारी दात उपटला जाऊन साऱ्या जाती एकत्र शिवणे, बसणे, उठणे, खाणे, पिणे, राहणे करू लागल्यामुळे शेवटी नावानेच काय त्या ह्या जाती, उपनावाप्रमाणे काही काळ चालू राहतील आणि अखिल हिंदू संघाच्या संघटक शाखा होऊन पडतील.

- (किर्लोस्कर, मार्च १९३७)

* * *

# २४ चित्पावन शिक्षण साहाय्यक संघ नि बॅ. सावरकर

रत्नागिरीस चित्पावन विद्यार्थ्यास शिक्षणाचे कार्यी साहाय्य देण्यास्तव एक संघ गेल्या पाडव्यास स्थापन झाला आहे. वास्तविक पाहता या जिल्ह्यातच, देवरुखे संघ, कऱ्हाडे संघ, मराठा समाज वगैरे जातीपातीचे अनेक संघ आहेत. हिंदुस्थानभर द्रविड संघ, सारस्वत संघ, रजपूत सभा, जाट सभा, महार मंडळे, चर्मकार मंडळे, ब्राह्मण सभा, क्षत्रिय महासभा, वैश्यसभा, शिंपी सभा, न्हावी मंडळ, मातंग महामंडळ अशी, जाती अनंत तशी जातीमंडळेही अनंत पसरलेली आहेत, त्यातच हा लहानसा चित्पावन संघ रत्नागिरीसारख्या कोपऱ्यातील एका नगरात स्थापला गेला असता तर या नगराबाहेर क्वचित त्याची फारशी विचारपूसही आज तरी कोणी केली नसती. परंतु रत्नागिरीचे नाव आज साऱ्या देशभर जात्युच्छेदक सामाजिक क्रांतीचे केंद्र म्हणून दुमदुमत असल्यामुळे आणि त्या आंदोलनाचा देशभर नावाजलेला बॅ. सावरकरांसारखा पुढारी त्या दिवशीच्या सभेस उपस्थित असल्यामुळे त्या लहान सभेचा बराच मोठा गाजावाजा महाराष्ट्रभर होण्याचा संभव होता. या सभेचे अध्यक्षही आपल्या प्रत्यहीच्या व्यवहारात प्रकटपणे जन्मजात जातीभेदाचे सक्रिय उच्चाटन करणारे येथील लोकप्रिय नि प्रमुख अधिकारी सिव्हिल सर्जन डॉ. साठे महाशय हे होते आणि सुधारक पक्षातील इतरही नामांकित संपादक, वकील, प्रसारक अशी कित्येक ठळक मंडळीही तिथे उपस्थित होती. त्यामुळे जन्मजात जातीभेदाच्या उच्छेदाचे व्रत घेतलेल्या ह्या पक्षाने चित्पावन संघासारख्या एका जातीनिष्ठ संघात भाग घेतला तरी कसा? अशा बुचकळ्यात महाराष्ट्रातील बऱ्याच मंडळींनी पडावे हे अगदी साहजिकच आहे. यास्तवच दे. भ. बॅ. सावरकरांनी त्या दिवशीच्या आपल्या भाषणात अशा ज्ञातिविशिष्ट संघांनी, सर्व जाती मोडून एक संघटित हिंदू जातच तेवढी उरेतो आणि जन्मजातपणाच्या उच्चनीचतेचा सर्वस्वी नायनाट होऊन व्यक्तीच्या प्रकट गुणांवरच काय ती तिची योग्यता अवलंबितो, मधल्या संक्रमणकालात काय धोरण स्वीकारावे आणि त्या संघाशी काय अटीने जात्युच्छेदक सुधारकांना सहकारिता करिता येईल ह्याचेच तात्त्विक विवेचन केले होते. ते त्यांचे भाषण इतके निर्भीड, तत्त्वनिष्ठ आणि वक्तृत्वशाली झाले की सनातनी आणि सुधारकांच्या अशा उभय पक्षातील प्रत्येक सुबुद्ध ब्राह्मण 'साधु! साधु!' म्हणता त्या भाषणाची वाखाणणी करताना आढळत होता. त्या भाषणाचा सारांश महाराष्ट्रासही कळावा म्हणून आम्ही तो येथे प्रसिद्ध करीत आहोत. ते म्हणाले -

आम्ही जन्मजात जातीभेदाचा उच्छेद करू म्हणतो म्हणजे काय म्हणतो हे नीट लक्षात घ्या. प्रस्तुतच्या जातीभेदात जन्मजातपणा हा, इतका हानीकारक नाही की जितका त्या जन्मासहच अंगी गुण नसताही त्या त्या व्यक्तींवर बसणारा उच्चनीचतेचा छाप आणि तिला त्याप्रमाणे विशिष्ट अधिकार किंवा अवहेलना आहे. कित्येक गोष्टीत जन्मजातपणा टाळता येणे शक्यच नाही, अवश्यही नाही. मी सावरकर कुळात जन्मलो, माझे हे मित्र जोशी कुळात जन्मले, हे मला नाकारता येणेच शक्य नाही. सावरकर वा जोशी कुळ चित्पावनात जमा, ही इतिहाससिद्ध गोष्ट. म्हणूनच मी अमक्या घरात जन्मलो म्हणतात ते घर अथवा विशिष्ट गाव हे जसे नाकारता येत नाही तसेच आम्ही जन्माने चित्पावन आहो हेही नाकारणे अशक्य आहे.

परंतु म्हणून सावरकर कुळात वा चित्पावन जातीत मी जन्मलो हा माझा मोठा गुण आहे किंवा म्हणून मी जन्मतःच इतर कुळांहून वा जातींहून श्रेष्ठ आहे अशी शेखी मी मिरवू लागलो तर मात्र मी अन्यायी असून इतरांशी नसता कलह होण्यास कारणीभूत होईन, कुळाचा अभिमान म्हणजे त्या कुळातील थोर वा न्यायी पुरुषांचा अभिमान होय. मी माझ्या गुणाने श्रेष्ठ व्हावे, वडिलांच्या वशिल्याने माझ्या अंगी ते गुण नसताही त्या भावाने विकला जाऊ नये. लेनिन म्हणे, 'मी ज्यूत जन्मलो हा माझा गुणही नव्हे, दोषही नव्हे.' मी जन्माने चित्पावन जातीचा असलो तरी मनाने मी हिंदू जातीचा आहे. मी महार जातीत जन्मतो तरी मला लाज वाटती ना. चित्पावनात जन्मलो म्हणून मला लवलेश अभिमान वाटत नाही. मला अभिमान वाटतो तो चित्पावन जातीत जन्मलेल्या थोर थोर विभूतींचाच काय तो होय. बाळाजी विश्वनाथाने ज्या दिवशी एकाच वेळी लेखणी नि कृपाण उचलले त्या दिवसापासून हिंदू राष्ट्राचा दिग्विजयी दुंदुभी आसिंधुसिंधु निनादत नेणारे ते पहिले बाजीराव, नानासाहेब, भाऊ, विश्वासराव, माधवराव, फडणीस, पेठे, पटवर्धन, मेहेंदळे, गोखले, ते सत्तावनचे नानासाहेब ते बुद्धीसागर न्यायमूर्ती रानडे ते चिळूणकर, ते आगरकर, ते वासुदेव बळवंत, ते गोखले, ते टिळक आणि ज्यांची नावे अनुल्लेखाने विशेष लिखित होणारी आहेत असे इतरही जे शतशः वीरात्मे, हुतात्मे नि धुरंदर पुरुष या तुमच्या चित्पावन जातीत उत्पन्न होऊन राजकीय क्रांतीत वा सामाजिक क्रांतीत हिंदुस्थानचा इतिहासचा इतिहास बदलीत आज दोेनशे वर्षे राष्ट्राची धुरा धरीत आले त्यांच्या नुसत्या नामावलीसरशी माझ्या रक्तात ते थोर पुरुष चित्पावन जातीत जन्मले म्हणून थोर नव्हे तर ते हिंदुराष्ट्राच्या गौरवाचे केवळ मुकुटमणीच शोभावे असे गुणांनी थोर होते म्हणून! शेवटचे बाजीरावही चित्पावन त्याच पेशवे कुळातील- पण मला महादजी शिंद्यांचा अभिमान त्यांच्याहून शतपट अधिक वाटतो. महादजी दुसऱ्या बाजीराव जागी पेशवे होते तर किती बरे होते असे वाटते!

यावरून आपल्या हे ध्यानात आले असेल की आम्ही मुख्यत्वे जन्मजात म्हणून जी उच्चनीचता व्यक्तीस तिच्या अंगी ते गुण नसताही चिकटविली जाते तिचे उच्चाटन करू इच्छितो. जन्मजात उपनावाचा भेद, जन्मजात गोत्रांचा भेद, हे भेद निरूपद्रवी आहेत. तसेच नुसत्या जातींना भिन्न नावे असली काय नि नसली काय, जर केवळ त्यांच्या योगे कोणासही उच्च वा नीच मानले जाणार नाही, नि वेदोक्तासारखे किंवा स्पृश्यतेसारखे विशिष्ट अधिकार बळकावले जाणारे नाहीत- तर ऐतिहासिक स्मृतीचिन्हांप्रमाणे किंवा भौगर्भिक सांगाड्याप्रमाणे ती नावे आणखी काही काळ राहिली आणि त्या त्या जातींच्या नावाचे संघ चालले तर ती गोष्ट एक अनुकरणीय इष्ट म्हणून नव्हे तर तर एक अपरिहार्य अनिष्ट म्हणून काही दिवस सहन करणे भाग आहे. सहन करताही येईल. रोटीबंदीच्या आणि बेटीबंदीच्या बेड्या तुटून सारा हिंदू एका हिंदू जातीत एकजीव होईतो जो संक्रमणकाल जाणार त्यात हे जातीजातींचे संघ चालणारच असतील तर निदान त्याच एका अटीवर चालले पाहिजेत की, त्या प्रत्येक जातीच्या संघाने आम्ही कोणतीही जात केवळ जन्मानेच उच्च वा नीच मानीत नाही, व्यक्तीच्या गुणाप्रमाणेच तिला जे स्थान मिळले ते मिळले! अशी घोषणा करावी. त्या गुणांचा विकास होण्यास त्या त्या जातीतील व्यक्तीस योग्य ती संधी नि साहाय्य देण्याचे कार्यी आणि कोणत्याही जातीवर विशिष्ट अन्याय होतील तर त्यांचे निवारण करण्याचे कार्यी तेवढे ते ते जातीसंघ झटतील तर ते हानीकारक होण्याचा संभव पुष्कळ अंशाने कमी होईल.

हा तुमचा संघ चित्पावन विद्यार्थ्यास शुल्कादिक साहाय्यासाठीच काय तो निघाला आहे. देवरुखे, सारस्वत, कऱ्हाडे वगैरे जातींचे संघ त्या त्या विद्यार्थ्यास साहाय्य देत असता जर चित्पावन विद्यार्थ्यास कुठले सांघिक साहाय्य नसेल, तर ते देणे हे तुम्हा आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे. किंबहुना आम्हा जात्युच्छेदक पक्षाचे तर असले कर्तव्य ब्रीदच असले पाहिजे. महारादिक पूर्वास्पृश्य विद्यार्थ्यास ते महारादिक जातीचे म्हणून जेव्हा हेटाळले जाते तेव्हा आम्ही जन्मजात जात्युच्छेदक म्हणूनच तो अन्याय दूर करण्यास जसे झटतो, त्यास शाळांतून फ्री घ्यावे म्हणून म्हणतो, महार परिषदेतून भाग घेतो तसेच जर काही विद्यार्थ्यास वा व्यक्तीस ते केवळ चित्पावन जातीचे म्हणूनच साहाय्य मिळत नेसल, त्यांच्या गुणानुरूप जागा त्यांना दिली जात नसेल, त्यांची अवहेलना होत असेल, तर जात्युच्छेदक आणि गुणकर्मविभागशः उच्चनीचता ठरविणाऱ्या आमच्या ब्रीदानेच ते साहाय्य देण्यात, तो अन्याय दूर करण्यात तशा कार्यासाठीच स्थापलेल्या चित्पावन वा सारस्वत वा मराठा वा वाणी संघाशी सहकार्य करण्यास आम्ही बांधलेले आहो. जात्युच्छेदक डॉ. आंबेडकर हे महार जातीची मंडळे स्थापतात. महारांच्या हक्काविषयी झटतात. जात्युच्छेदक विठ्ठलराव शिंदे पूर्वास्पृश्य 'जाती'च्या विद्यार्थ्यांचे आश्रम स्थापतात. जात्युच्छेदक सयाजीराव मराठा जातसमाजाचे मानपत्र स्वीकारतात ते ह्या संक्रमणकालाच्या परिस्थितीतील एक अपरिहार्य अनिष्ट म्हणूनच होय. त्यातही ह्या तुमच्या संघाने रोटीबंदी प्रभृती बेड्या तोंडण्याच्या आम्हां सुधारकांच्या किंवा ठेवण्याच्या तुमच्यातील सनातन्यांच्या कोणाच्याही मतास बांधून वा वाहून घेतलेले नाही. म्हणून केवळ विद्यार्थ्यास साहाय्य देणारे वसतिगृह वगैरे कार्यासाठीच निघालेल्या संघात दोन्ही पक्षांनी सहकार्य करण्यास काही हरकत नाही. इतकेच नव्हे तर या संघाच्या सुज्ञ चालकांनी दोन्ही पक्षांस एकत्र करण्यासाठी, असल्या ज्ञातिनिष्ठ संघांनी हिंदू संघटनांचे प्रगतीस होणारा अडथळा दूर व्हावा म्हणून जी अट मानली पाहिजे म्हणून मी वर उल्लेख केला आहे ती, अट म्हणूनच नव्हे तर न्याय्य कर्तव्य म्हणून, आपल्या उद्देशात स्पष्ट शब्दात ग्रथिली आहे आणि आज ती येथे सर्वसमंत होत आहे ही गोष्ट मी विशेष महत्त्वाची समजतो. आम्ही कोणत्याही जातीस जन्मतः उच्च वा नीच मानीत नाही अशी जी घोषणा या मूळ उद्देशात आपण केली आहे ती तुम्हास जितकी भूषणावह आहे तितकी आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटित प्रगतीस साहाय्यकही होणारी आहे.

रत्नागिरीच्या ब्राह्मणांतील, इतक्या थोर, सुविद्य, सुप्रतिष्ठित आणि प्रमुखातील प्रमुख नागरिकांनी गजबजलेल्या या सभेत 'आम्ही जातीविषयक उच्चनीचता मानीत नाही' अशी लेखी घोषणा दोन्ही पक्षांनी एकमताने करावी ही लहानसहान गोष्ट नाही. जरी तो ब्राह्मण झालासे पतित तरीही तो श्रेष्ठ तिही लोकी, निरक्षर नि नीच असला तरी कोणाही ब्राह्मणास वेदोक्ताचा अधिकार आहे, पण गांधी, विवेकानंदांनी ते शूद्र म्हणून वेद ऐकता देखील कामा नये. ते जन्माचेच नीच! आंबेडकर कितीही स्वच्छ नि विद्वान असले तरी त्यांची सावलीदेखील आमच्या स्पृश्य दारुड्यांनासुद्धा बाटविते, कारण ते अस्पृश्य जातीचेच, नीचतम!!! इत्यादी बाष्कळ अहंकारी हिंदूहितघातक वल्गनांस तिलांजली देण्यास ब्राह्मणांनीच पुढे सरसावावे आणि 'आम्ही केवळ जन्मानेच कोणतीही जाती उच्च वा नीच मानीत नाही' अशी घोषणा करावी हे मी खरे ब्राह्मण्य समजतो. ही घोषणा नवीन नाही. ही सनातनच आहे. कारण 'जन्मना जायते शूद्रः संस्काराद्द्विज उच्यते।' या सनातन संस्कृत सूत्राचेच हे प्राकृत सुधारकीय भाषांतर आहे

की, जन्माने कोणतीही जात उच्च वा नीच मानली जाऊ नये. ज्याच्या त्याच्या प्रकट गुणानुसार उच्चनीचता ठरवावी! मी व्यक्त केलेली इतर मते ही माझी आहेत - आपण त्याने बांधले जात नाही. पण या संघाच्या मूळ उद्देशातील ही जी घोषणा आपण सर्वांनी एकमताने केलेली आहे ती नि त्या शब्दापुरतीच आम्हा सर्वांची एकमुखी घोषणा आहे. यास्तव या संघाचा उद्देशांस मी संमती देत आहे. रत्नागिरीचा हिंदूसमाज हिंदू राष्ट्राच्या महान हितार्थ आकुंचित जात्याहंकारास कसा बळी देत चालला आहे त्याचे हेही एक नवे प्रत्यंतर आहे. इतर ज्ञातिनिष्ठ संघही ही घोषणा आपापल्या उद्देशांतून करतील नि तसे वागतील तर या संक्रमणकालापुरते त्यांचे अस्तित्व फारसे असहनीय वाटणार नाही, हानीकारक होणार नाही.

शेवटी मी आपणास असे आश्वासन देतो की, गुणांवरच ज्याची त्याची उच्चनीचता ठरविणारी समाजव्यवस्था चालू झाल्यास कोणत्याही जातीस आणि विशेषतः तुम्हा ब्राह्मणजातीस - भिण्याचे काही कारण नाही. ब्राह्मणहो! तुम्ही आजवर आपल्या ज्या बुद्धिबळाने श्रेष्ठत्व संपादिलेत असे म्हणता ती बुद्धी नि तो पराक्रम तुमच्यात अजूनही आहे की नाही? जर तुमच्यात बुद्धी नि पराक्रम असेल तर मग गुणांवरच श्रेष्ठता मिळणाऱ्या घटनेत तुम्ही अधिक सुलभतेने श्रेष्ठच ठराल! एखादे पहिले बाजी आपल्या गुणाने ह्या व्यवस्थेतही पेशवेच नव्हेत तर छत्रपतीदेखील होतील! कारण गुणांनी ते त्यांच्या पिढीत छत्रपतीच व्हावयास योग्य होते! पण जर तुमच्यातील ती बुद्धी नि पराक्रम विझला असेल तर दुसऱ्या अधिक क्षमतर वर्गाचे हाती ह्या आपल्या हिंदुराष्ट्राचे नि हिंदुधर्माचे भवितव्य सोपवून तुमच्या त्या पूर्वीच्या श्रेष्ठतेने राष्ट्रहितार्थ जोहार करावा आणि दधीचीप्रमाणे ब्राह्मणजातीने आपल्या अस्तित्त्वाचे देवकार्यी बलिदान करावे हेच खऱ्या ब्राह्मणास शोभणारे तुमचे अंतिम कर्तव्य नाही काय? केवळ गुणांवरूनच उच्चता ठरविण्यास वा संपादिण्यास तोच काय तो भितो की, ज्याला आपल्यात ते उच्च गुण नाहीत हे कळते! माझ्यात बुद्धी नाही पण मला बापाच्या भिडेसाठी सुबुद्ध म्हणा, मी भ्याड आहे. पण मला माझ्या वडिलांच्या धाकासाठी शूर म्हणा - असे सांगण्याची भिकारडी पाळी येण्यापेक्षा यथार्थत्वाने जो खरा ब्राह्मण असेल तो कोणच्या तरी देवकार्यी झुंजत मरणी मरून जाईल! हाच संदेश मला माझ्या हिंदू राष्ट्रातील प्रत्येक ज्ञातीस देणे आहे! जन्मजात जातीचा म्हणजेच जन्मजात खोट्या उच्चनीचतेचा उच्छेद करून गुणजात उच्चतेचा पुनरुद्धार करा! शेवटच्या बाजीरावासारखा मोठेपणा नि भिकारडा अहंकार सांगू नका तर कर्णासारखे गर्जून उठा, 'सुतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम्। दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्।।'

संक्रमण कालातील एक अपरिहार्य अनिष्ट म्हणून अशा संघाचे हे बारसे करताना ह्या साऱ्या पोथीजात जाती-बेटीबंदी नि रोटीबंदीच्या बेड्या तोंडीत शक्य तितक्या त्वरेने एका महान हिंदूजातीत अंतर्धान पावताच त्यांचा बारावा साजरा करण्याचा शुभयोग लवकरच येवो असा माझा ह्या संघास उत्कट आशीर्वाद आहे!!!

# २५ जन्मजात अस्पृश्यतेचा मृत्यूलेख

## २५.१अस्पृश्यता मेली, पण तिचे और्ध्वदेहिक अजून उरले आहे!

२५.१.१ (पूर्वार्ध)

'Untouchability is abolished and its practice in any form is forbidden. The enforcement of any disability shall be an offence punishable in accordance with law.'(The Constitution of India, Article १७)

'अस्पृश्यता नष्ट केली जात आहे. कोणत्याही प्रकारे ती आचारली जाता कामा नये. अस्पृश्यताजन्य अशी कोणचीही हीनता कोणावरही लादणे हा निर्बंधानुसार एक दंडनीय अपराध समजला जाईल.' (भारतीय राज्यघटना छेदक १७)

ही घोषणा ज्या दिवशी आपल्या भारतीय राज्यघटना समितीने एकमुखाने संमतीली तो दिवस सुवर्णदिन समजला गेला पाहिजे. अशोकस्तंभासारख्या एखाद्या चिरंतन स्तंभावर कोरून ठेवण्या इतक्या महत्त्वाची आहे ही महोदार घोषणा.

गेली कित्येक शतके ज्या शतावधी साधुसंतांनी, समाजसुधारकांनी नि राजकारणधुरंधरांनी ही जन्मजात अस्पृश्यतेची बेडी तोडून टाकण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले त्यांच्या त्या साऱ्या प्रयत्नांचे, ही घोषणा ज्या दिवशी केली गेली त्या दिवशी साफल्य झाले. आता ही अस्पृश्यता पाळणे हे नुसते एक निंदनीय पाप राहिलेले नसून तो एक दंडनीय अपराध (गुन्हा) ठरलेला आहे. अस्पृश्यता पाळू नये हा नुसता एक विध्यर्थी नीतिनियम असा एक आज्ञार्थी निर्बंध (कायदा) झाला आहे.

वर उल्लेखिलेल्या भारतीय राज्यघटनेच्या सतराव्या छेदकात अस्पृश्यता असा एकेरी शब्दच काय तो वापरला आहे. तथापी नैर्बंधिक काटेकोरपणाच्या दृष्टीने त्या शब्दाचे स्पष्टीकरण करणारी एखादी टीप तरी तिथे देण्यास हवी होती. वैद्यकीय, वैयक्तिक नि प्रासंगिक अशी अस्पृश्यता समाजहितासाठीच केव्हा केव्हा निषिद्ध मानता येणार नाही. अर्थात ह्या छेदकात ज्या अस्पृश्यतेचा अंत करण्यात आला आहे ती अस्पृश्यता म्हणजे एका जातीत जन्म झाला एवढ्याच एका कारणाकरिता तशा सर्व स्त्रीपुरुषांवर लादली जाते ती, 'जन्मजात अस्पृश्यता' होय. म्हणजे अस्पृश्यतेत जो विशेष घटक निषेधार्ह ठरविलेला आहे, तो मानीव जन्मजातपणा हा होय. हे मर्म ध्यानात घेतले असता हे स्पष्ट होईल की, असल्या केवळ मानीव जन्मजातपणामुळे ज्या हीनता, उच्चनीचता नि अक्षमता जातीभेदाच्या आजच्या दुष्ट रूढीमुळे आपल्या हिंदूसमाजातील जातीजातींना चिकटविलेल्या आहेत, त्यापैकी जन्मजात अस्पृश्यतेची हीनता नि अक्षमता आजच्या रूढीप्रमाणे अत्यंत असमर्थनीय नि दुष्ट असल्यामुळे यद्यपी ती अस्पृश्यताच काय ती वरील छेदकाने निर्बंधाविरुद्ध (बेकायदेशीर) आणि दंडनीय ठरविली असली तथापी त्यायोगे नि त्याच न्यायाने तसल्या इतर जन्मजात म्हणून गणल्या गेलेल्या मानीव हीनता, उच्चनीचता वा अक्षमता ह्याही न्यूनाधिकपणे असमर्थनीय नि निषेधार्ह आहेत हेही सूचीत केलेले आहे. जातीभेदातील ही अस्पृश्यता सोडता, उरलेल्या आणि जातीजातींवर

लादलेल्या इतर हीनता नि उच्चनीचपणाची कोष्टके ही अगदी अनैर्बधिक ठरविलेली नसली तरी ती अवैध आहेत. दंडनीय नसली तरी खंडनीय होत. ह्या छेदकातील हा जो गर्भितार्थ, ह्या राज्यघटनेत भारतीय नागरिकांच्या मूलभूत समतेची जी ग्वाही मुखबंधातच (प्रिअँबलमध्येच) दिलेली आहे आणि पुढे नागरिकांच्या मूलाधिकारांच्या प्रकरणी जी स्पष्ट विधाने केलेली आहेत की भारतीय राज्य कोणत्याही नागरिकाविरुद्ध केवळ धर्म, वंश, जाती, लिंग, जन्मस्थान, ह्यांपैकी कोणत्याही कारणासाठी कोणताही भेदभाव बाळगणार नाही आणि सर्वांना नैर्बंधिक समतेने वागविले जाईल. (छेदक १४-१५) त्या विधानावरून तो गर्भितार्थ स्पष्टपणेच समर्थिला जात आहे.

अशा रितीने केवळ मानीव असणाऱ्या जन्मजात अस्पृश्यतेचाच नव्हे तर जन्मजात म्हणविणाऱ्या परंतु केवळ पोथीजात असणाऱ्या ह्या जातीभेदाच्या आजच्या दुष्ट रूढीप्रमाणे जातीजातीवर लादलेल्या इतर सर्व प्रकारच्या मानीव हीनतांच्या नि अक्षमतांच्या पायावरही ह्या राज्यघटनेने नैर्बंधिक कुऱ्हाड घातलेली आहे. आता कोणच्याही हिंदू स्त्रीपुरुषास तो अमक्या जातीत जन्मला एवढ्याच एका कारणासाठी कोणतीही हीनता वा अक्षमता सोसावी लागणार नाही किंवा कोणताही उपजत विशिष्टाधिकार वा विशिष्ट उच्चता उपभोगिता येणार नाही. निर्बंधाच्या (कायद्याच्या) क्षेत्रात जात कोणती हा प्रश्नच उरलेला नाही.

दुर्दैवाने याला एक अपवाद मात्र राहून गेला तो म्हणजे दलित वर्गांना काही वर्षांपुरत्या दिलेल्या विशिष्ट सवलती. सध्याच्या परिस्थितीत अमक्या जाती म्हणून नव्हे तर दलित वर्ग म्हणून अशा सवलती देणे हे योग्यच होते, अपरिहार्यही होते. परंतु त्या दलित वर्गाच्या परिगणनात 'वर्गीकृत जाती' असा जातींच्या पायावर जो विभाग पाडला आहे तो तसा पाडावयास नको होता. त्यायोगे काही केवळ जन्मजातपणावर मिळविले जाणारे विशिष्टाधिकार - राखीव जागा, चाकऱ्या इत्यादी - काही जातींना जात म्हणून मिळणार आहेत. म्हणजे त्या प्रमाणात जन्मजात जातीभेद घटनेत मानला गेला. हे त्या घटनेच्याच वर उल्लेखिलेल्या नागरिकांच्या मूलभूत समानतेच्या अधिकारांशी विसंगत आहे. हा अपवाद टाळूनही त्या दलितांची सोय लावता आली असती. परंतु ह्या लेखात केवळ अस्पृश्यतेचा अंत करणाऱ्या घोषणेचाच विचार कर्तव्य असल्याने इतकाच उल्लेख पुरे आहे की, वरील एक फारसे महत्त्व नसलेला अपवाद वजा घातला तर ह्या अस्पृश्यतेविषयीच्या घोषणेने नि इतर विधानांनुसार या राज्यघटनेने जन्मजात जातीभेदाच्या दुष्ट रूढींचाही कणाच मोडून टाकला आहे.

अस्पृश्यता हा दंडनीय अपराध ठरविणाऱ्या या घोषणेचे खरे महत्त्व, मर्म आणि दूरवर होणारे परिणाम हे साकल्याने जनतेच्या ध्यानात यावे ह्यास्तव ज्या परिस्थितीत नि ज्या प्रकारे ती घोषणा करण्यात आली त्यांचीही सूक्ष्म छाननी करणे अवश्य आहे. अशी छाननी अद्याप सुसंगतपणे झालेली नाही. आणि दुसरे असे की तशी छाननी झाल्यावाचून ह्या घोषणेप्रमाणे आपल्या अफाट भारतीय समाजात रोमारोमात भिनलेली ही जन्मजात अस्पृश्यतेची भावना आमूलात्समाजाच्या खालच्या थरापर्यंत उन्मळून टाकण्याचे दुष्कर कार्य केवळ निर्बंधबळाने (कायद्याच्या जोरावर) सुकर केले जाणार नाही. जेव्हा निर्बंधबळाला जनतेच्या उत्कट इच्छेचेही पाठबळ मिळते तेव्हा काय ते कोटी कोटी लोकांच्या अगदी हाडीमासी खिळलेल्या अशा शतकानुशतकांच्या रूढींच्या उच्चाटनाचे कार्य सहज साध्य होते. ह्या

घोषणषची ह्या कारणासाठी अशी छाननी करू जाता तिच्यातील खाली दिलेली मुख्यमुख्य विधेये स्पष्ट होतील.

ही सुधारणा आमच्या हिंदुराष्ट्रावर कोण्या अहिंदू शक्तीने बळाने लादलेली नाही.

अस्पृश्यतेचा नायनाट करणारी ही घोषणा मोगली किंवा इंग्रजी राजवटीसारखी कोण्या परकीय राष्ट्राने आमच्यावर लादलेली नाही किंवा आम्हास तलवारीच्या धारेवर धरून आमच्या मनात नसता आम्हांकडून कोणीही शरणागती लिहवून घेतलेली नाही. स्वतंत्र भारताच्या लोकप्रतिनिधींनी स्वतंत्रपणे, स्वेच्छापूर्वक नि एकमुखाने आमच्या राज्यघटना परिषदेत ही घोषणा केलेली आहे. अर्थात्‌ही निरूपायाची शरणागती नसून स्वयंस्फुर्तीची सत्कृती आहे. राष्ट्रकल्याणार्थ, पश्चात्तापी स्पृश्य हिंदूंनी घेतलेले हे स्वयंस्फूर्त प्रायश्चित्त आहे!

ज्या घटना परिषदेने ही घोषणा केली त्यामध्ये अत्यधिक बहुमत स्पृश्य हिंदूंच्याच प्रतिनिधींचे होते. त्यांनी जर विरोध केला असता तर ही घोषणा सर्वसंमत तर नव्हेच, पण संमतही होऊ न शकती. अस्पृश्यतेचा उगम केव्हा झाला, इतिहासाच्या कोणत्या प्राचीन परिस्थितीत जीवनकलहातील एक अपरिहार्य उपाय म्हणून ती स्वीकारली गेली त्या वेळेस तो मूळ दोष कोणाचा होता, का सर्वांचाच होता. का कोणाचाच नसून त्या वेळच्या परिस्थितीचाच तो एक दुष्ट विपाक होता ह्या प्रश्नाची चर्चा येथे अप्रस्तुत असल्यामुळे इतके सांगणे पुरे आहे की, निदान गेल्या नऊ-दहा शतकांपासून तरी जन्मजात अस्पृश्यतेची रूढी अन्याय्य असताही, अधर्म्य असताही, राष्ट्रघातक असताही न्याय्य म्हणून, धर्माचरण म्हणून पाळीत राहण्यात चातुर्वणिक स्पृश्यांच्या हातून एक राष्ट्रघातक पाप घडत आलेले होते. ती तीव्र जाणीव त्या राज्यघटना परिषदेत असलेल्या लक्षावधी स्पृश्यांनी निवडून दिलेल्या स्पृश्य प्रतिनिधींना होती. त्या घडलेल्या पापाविषयी त्यांना मन:पूर्वक पश्र्चात्ताप वाटत होता आणि आता यापुढे हे राष्ट्रीय पाप घडू द्यावयाचे नाही असा त्यांचा दृढ संकल्प झाला होता म्हणूनच त्या बहुसंख्याक स्पृश्य प्रतिनिधींनी आपले चिरकालीन विशिष्ट हितसंबंधी वर्णाहंकार नि जात्यहंकार या सर्वांवर राष्ट्रहितार्थ आपण होऊन पाणी सोडून त्या पापाचे स्वेच्छापूर्वक प्रायश्चित्त घेतले आणि एकमुखाने उद्‌घोषिले, की यापुढे या भारतीय राज्यात जन्मजात अस्पृश्यता कोणत्याही स्वरूपात पाळणे हा एक दंडनीय अपराध गणला जाईल!

घटना परिषदेतील स्पृश्य हिंदूंच्या या प्रतिनिधींत चारी वर्णाचे, भिन्न भिन्न उपजातींचे आणि सर्व प्रांतांचे प्रतिनिधी होते ही दुसरी गोष्टही ध्यानात धरली पाहिजे. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अस्पृश्यतेचा अंत करणाऱ्या घोषणेच्या प्रश्र्नी तरी या तथाकथित स्पृश्य प्रतिनिधींना प्रबुद्ध, प्रमुख नि प्रतिष्ठित अशा लक्षावधी स्पृश्य जनतेचा भारतव्यापी पाठिंबा होता. याचा अप्रतिविधेय पुरावा हाच की, एखाददुसरा अपवाद सोडता झाडून साऱ्या अखिल भारतीय संघटनांनी नि संस्थांनी या सुधारणेचा कित्येक वर्षांपासून सक्रिय पाठपुरावा केलेला आहे आणि या घोषणेला लवलेशही विरोध केलेला नाही. अखिल भारतीय संस्थांपैकी लाखो स्पृश्य हिंदू जिचे सभासद आहेत त्या कॉंग्रेसच्या प्रमुख संस्थेने जन्मजात अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी कित्येक वर्षांपूर्वीपासून दृढ प्रतिज्ञा नि अखंड प्रयत्न केलेले आहेत. घटना परिषदेतील प्रतिनिधींमध्ये कॉंग्रेसचेच बहुमत होते हे सांगावयास नकोच. अखिल हिंदूमहासभेच्या तर मूलभूत उद्देशातच अस्पृश्यतानिवारणाचा उद्देश प्रमुखपणे गोविलेला आहे.

रत्नागिरी हिंदूसभेसारख्या तिच्या उपांगभूत संस्थांनी आणि तिच्या अध्यक्षीय पदावर आरुढलेल्या कित्येक प्रमुख पुढाऱ्यांनी केवळ जन्मजात अस्पृश्यतेच्याच नव्हे तर जन्मजात जातीभेदाच्याही उच्चाटनार्थ प्रकट सहभोजनांचे भारतव्यापी आंदोलन केलेले आहे. काही सनातनी संस्थांतून काय तो अस्पृश्यता निवारण्यास प्रतिकूल असा थोडाफार सूर वाहतो. तेवढा अपवाद सोडल्यास इतर हिंदुत्वनिष्ठ अशा आर्यसमाज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रभृती अखिल भारतीय संस्थांतून अस्पृश्यतेला केव्हाही थारा मिळालेला नाही. प्रागतिक पक्ष, प्रार्थनासमाज, ब्राह्मोसमाज इत्यादी जुन्या संस्थाही अस्पृश्यतेचा नायनाट करण्यास सर्वतोपरी अनुकूल होत्या. मुख्यतः आर्थिक प्रश्नांनाच सोडविण्यात सध्या व्यग्र असणाऱ्या सोशालिस्ट नि कम्युनिस्ट पक्षांच्या अखिल भारतीय संघटनांत जे सहस्रावधी स्पृश्य हिंदू आहेत तेही त्या पक्षांच्या विशिष्ट तत्त्वज्ञानानुसारच जन्मजात अस्पृश्यतेच्या उच्चाटनाच्या कार्यी रेसभरही मागे रेंगाळणारे नाहीत. हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, ह्या आजच्या घोषणेच्या वीस पंचवीस वर्षांपूर्वीपासून कित्येक लहान मोठ्या हिंदू संस्थानिकांनी त्यांच्या त्यांच्या हिंदू राज्यांतून जन्मजात अस्पृश्यता नष्ट करणाऱ्या अशाच नैर्बंधिक घोषणा त्यांच्या स्पृश्य हिंदूच बहुसंख्याक असलेल्या विधीमंडळाच्या संमतीने केलेल्या होत्या आणि व्यवहारिल्याही होत्या. या सर्व गोष्टींवरून हे उघड होत आहे की, स्पृश्य हिंदूच्या प्रचंड संख्येतील विचारशील, मुखर, कर्ता नि महत्त्वाचा जो भाग आहे त्याचा या घोषणेला भारतव्यापी पाठिंबा आधीपासूनच होता. किंबहुना लक्षावधी स्पृश्य हिंदूंच्या मनात जर ही विचारक्रांती आधीपासूनच झालेली नसती आणि अस्पृश्यतेचा नायनाट करावयाचा कृतसंकल्प त्यांनी केलेला नसता, तर ही घोषणा करणे मुळातच दुर्घट झाले असते. आणि जर स्पृश्यांच्या मताला न जुमानता एवढा भूकंपीय पालट हिंदू समाजरचनेत करण्याचे धाडस कोणी केले असते, तर तशा धाडसाची जी गत अमेरिकेत झाली तीच इकडे झाल्याविना बहुधा राहती ना.

## २५.१.२ अमेरिकेतील गुलामगिरीचे उच्चाटन आणि हिंदुस्थानात अस्पृश्यतेचे उच्चाटन

मुसलमानी धर्मशास्त्रात दासप्रथा- गुलामगिरी- ही संमतीलेली आहे. इतकेच नव्हे तर युद्धात पाडाव केलेल्या काफराच्या प्रकरणाप्रमाणे 'प्रसंगविशेषी त्यांना गुलाम करा' म्हणून आज्ञापिलेले आहे. ख्रिश्चन धर्मात दासप्रथा आज्ञापिलेली नाही तथापी अनुज्ञापिलेली आहे. 'स्लेव्हस्, ओबे युवर मास्टर्स' हे ख्रिस्ती शास्त्रीय वचन प्रसिद्धच आहे. मुसलमानांनी गुलामगिरी नष्ट करण्याची घोषणा कधी केलेलीच नाही. परंतु ख्रिश्चन राष्ट्रांपैकी अमेरिकेने तेवढे ते सत्साहस करून तिच्या कॉंग्रेसद्वारा, 'स्लेव्हरी इज अबॉलिश्ड' अशी मानवाच्या दृष्टीने महनीय असलेली घोषणा केली. गुलामगिरी आणि अस्पृश्यता या दोन दुष्ट रूढीत दुष्टतर कोणती याची चर्चा इथे अप्रस्तृत असल्यामुळे इतके सांगणे पुरे आहे की, आमच्या भारतीय राज्यघटनेने अलीकडेच केलेल्या 'अनटचेबिलिटी इज अबॉलिश्ड' या घोषणेशी महनीयतेत तुलना करण्यासारखीच अमेरिकन कॉंग्रेसने पूर्वी केलेली 'स्लेव्हरी इज अबॉलिश्ड' ही घोषणा होती. परंतु गुलामगिरी चालू ठेवण्यातच विशिष्ट हितसंबंध, वर्णाहंकार, जन्मजात श्रेष्ठत्वाची भावना इत्यादी ज्या गोष्टी निगडित झालेल्या होत्या त्या सर्वांवर आपण होऊन अकस्मात पाणी सोडणे हे अमेरिकनांनाही इतके असह्य वाटले की, त्या राष्ट्रात गुलामगिरी नष्ट करण्याची आज्ञा सोडणाऱ्या कॉंग्रेसच्या संयुक्त राज्यसत्तेविरुद्धच लक्षावधी नागरिकांनी शेवटी शस्त्र उपसले!

यादवी युद्ध माजून सारे अमेरिकन राष्ट्र भ्रातृहत्येच्या रक्तात न्हाहून निघाले. अनेक लढाया लढल्यानंतर शेवटी कॉंग्रेसच्या उत्तर अमेरिकन सैन्याचा संपूर्ण विजय झाला. तेव्हा त्या शस्त्रबळानेच काय ती शरणागतीची अट म्हणून दक्षिण अमेरिकेवर गुलामगिरी नष्ट करण्याची प्रथा लादता आली. न्यायदेवतेची आज्ञा रणदेवतेच्या पाठिंब्यानेच काय ती व्यवहारविता आली! परंतु आजच्या भारतात? अस्पृश्यता पाळणे हे कर्तव्य आहे.- नव्हे, तो एक धर्माचार आहे अशी विकृत असली तरी प्रामाणिक भावना ज्या कोट्यनुकोटी स्पृश्यांच्या हाडीमांसा आज शतकानुशतके रुळत आली आहे. त्यांना अस्पृश्यता पाळणे हा निर्बंधानुसार एक दंडनीय अपराध समजला जाईल. असे दरडावून सांगणारी ही घोषणा झाली असताही ती उलथून पाडण्यासाठी त्या स्पृश्यांच्या गोटात आपापसामध्ये तसे अमेरिकेसारखे भ्रातृहत्यारी, रक्तपाती नि सशस्त्र यादवी युद्ध जुंपण्याचा आज लेशमात्रही संभव उरलेला नाही. उलट पक्षी वर दाखविल्याप्रमाणे ज्या प्रत्येकीत लक्षावधी स्पृश्य सभासद आहेत अशा बहुते अखिल भारतीय संस्था आमच्या राज्यघटना परिषदेने केलेल्या त्या अस्पृश्यता निर्दालनाच्या घोषणेस मन:पूर्वक आसेतुहिमाचलपर्यंत स्वागतीत आहेत!या संतोषजनक वस्तुस्थितीचे मुख्य कारण हेच की, अखिल भारतातील स्पृश्य हिंदूंमधील विचारशील, न्यायप्रिय आणि मुखर अशा लक्षावधी स्पृश्यांना अस्पृश्यता पाळण्यात आपल्या हातून घडत आलेल्या पापाविषयी मन:पूर्वक पश्र्चाताप वाटला आणि त्यांनी आपण होऊन ती दुष्ट रूढी उखडून टाकली- त्या पापाचे हे राष्ट्रीय प्रायश्चित स्वेच्छापूर्वक घेतले.

अशा राष्ट्रीय प्रायश्चित्तात आपल्या हातून मागे पाप घडल्याची जी जाणीव अनुस्यूत असते त्यामुळे ती प्रायश्चित्ते अपमानास्पद ठरत नाहीत, तर उलटपक्षी भूतकालीन अन्यायास लोककल्याणार्थ आपल्या आकुंचित अहंकाराचा नि स्वार्थाचा बळी देऊन स्वेच्छेने परिमार्जिण्यात जे महनीय नीतिधैर्य प्रकटविले जाते त्यायोगे ती प्रायश्चित्ते त्या राष्ट्रांची गौरवास्पद विभूषणेच ठरतात.

२५.१.३ 'स्पृश्य' हिंदूंप्रमाणेच 'अस्पृश्य' हिंदूंनीही त्यांच्या पापाचे स्वयंस्फूर्तीने प्रायश्चित घेतले!

वरील उपमथळा वाचून पुष्कळांना आपाततः असा अचंबा वाटेल की, 'हे काय! इतर हिंदूंवर चातुवर्णीय स्पृश्यांनी अस्पृश्यता लादली हे स्पृश्यांचे पाप होय, परंतु ज्यांच्यावर ती दुष्ट हीनता लादली गेली त्या बिचाऱ्या अस्पृश्यांनी ह्या प्रकरणी कोणते पाप केले? ' ते पाप हे होय की, चातुर्वर्णीय स्पृश्य हे ज्या जातींना अस्पृश्य मानीत आले त्या अस्पृश्यतांतील कित्येक जातीही स्वत:स उच्च समजून त्यांच्या खालच्या समजल्या गेलेल्या जातींना अस्पृश्य मानीत आल्या आहेत! महार, चांभार, मांग, ढोर, भंगी हे आपापल्या देवळात त्यांच्या 'खालच्या' समजल्या गेलेल्या अस्पृश्य जातींना येऊ देत नाहीत. आपसात जेवत नाहीत, शाळेत महारांची मुले भंग्यांच्या मुलांसह सरमिसळ बसत नसत. त्यांचा त्यांना विटाळ होई! अशी कित्येक प्रकरणे आम्ही स्वतः सोडविली आहेत. काश्मीरपासून त्रावणकोरपर्यंत जात्युच्छेदनासाठी आमच्या झालेल्या दौऱ्यातून, हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांतून, अस्पृश्या-अस्पृश्यांतही अस्पृश्यता पाळाली जाते हा आमचा स्वत:चा अनुभव आहे. चातुर्वर्णीय स्पृश्य चेरुमांना अस्पृश्य समजतात. पण त्या अन्यायासाठी स्पृश्यांना लाखोली वाहणारे चेरुमा अस्पृश्य स्वतः तोच

अन्याय पुलादी, परिया प्रभृती खालच्या जातीवर लादून त्यांना अस्पृश्य मानतात! जी जी निंदा कोणी अस्पृश्य अस्पृश्यतेसाठी करतो, त्या त्या निंदेच्या प्राप्तीचा अर्धा वाटा त्या अस्पृश्यांच्याही वाट्यास येतो. कारण तो अस्पृश्य त्याच्या खालच्या जातीवर तीच अस्पृश्यता लादीत असतो! हा सर्वसाधारण प्रकार आहे. दहा-बारा वर्षांपूर्वी त्रावणकोरच्या क्षत्रिय महाराजांनी त्यांचे सचिवोत्तम रामस्वामी अय्यर ह्या ब्राह्मण प्रधानाच्या पुरस्कारत्वाने आपली सर्व राजमंदिरे तथाकथित अस्पृश्यांना उघडल्याची अभिनंदनीय घोषणा जेव्हा केली, तेव्हा तिकडच्या अस्पृश्यांनीच 'उच्च अस्पृश्य' जे एझुया त्यांच्यातील बहुजनांनी ते ज्यांना अस्पृश्य समजतात त्या पालुवा अस्पृश्यांना त्यांच्या मंदिरात प्रवेश करून देण्यास विरोध केला! अस्पृश्यही अस्पृश्यतेच्या पापाचे अशा रीतीने भागीदार आहेत ह्या गोष्टीची जाणीव पुष्कळांना नसते. ही दुष्ट रूढी अस्पृश्यवर्गही आपापसात किती कट्टरपणे पाळीत आला आहे - फार काय, वरवर समतेचा डंका पिटणाऱ्या मुस्लिमात नि ख्रिश्चनातही अस्पृश्यता नि जातीभेद कसा पाळला जात आहे ही सविस्तर चर्चा ज्यांना वाचावयाची असेल त्यांनी आमचे 'जात्युच्छेदक निबंध' नि विशेषतः त्यातील 'मद्रास प्रांतातील काही अस्पृश्य जाती', 'महारबंधूंशी मनमोकळा विचारविनिमय', 'मुसलमानी पंथोपंथांचा परिचय' नि 'मुसलमानी धर्मातील समतेचा टेंभा' हे निबंध तरी अवश्य वाचावेत.

परंतु आमच्या भारतीय राज्यघटनेत जेव्हा 'अस्पृश्यता नष्ट करण्याची' ही घोषणा करण्याचा बेत ठरत होता, तेव्हा हे उघडच झालेले होते की, केवळ चातुर्वर्णीय स्पृश्यांनाच काय ती अस्पृश्यांवर अस्पृश्यता 'गाजविण्याची' बंदी त्या घोषणेमुळे होणारी नव्हती, तर अस्पृश्यांतील तथाकथित उच्च अस्पृश्यांनाही त्यांच्या 'खालच्या' अस्पृश्यांना अस्पृश्य मानण्याची बंदी होणार होती. अस्पृश्य हिंदूंतील उच्च जातीचे जन्मजात उच्च-नीचपणाचे पिढीजात अहंकार, हाडीमासी खिळलेले भ्रामक धर्माचार नि तज्जन्य विशिष्ट हितसंबंध हेही त्या घोषणेप्रमाणे नष्ट होणारे होते. परंतु एवढ्यासाठी अस्पृश्य हिंदूंचे त्या त्या जातीचे जे प्रतिनिधी राज्यघटना परिषदेत होते, त्यांनी अस्पृश्यता आमूलात्नि सर्व प्रकारे नष्ट करणाऱ्या त्या घोषणेस विरोधले होते की काय! आनंदाची नि अभिमानाची गोष्ट ही की तसे काहीही न करता अस्पृश्य हिंदूंच्या प्रतिनिधींनाही या प्रकरणापुरते आपापल्या जात्यहंकारावर नि विशिष्टाधिकारांवर स्वेच्छेने पाणी सोडून अस्पृश्य हिंदूसमाज आपापसात जी अस्पृश्यता आजवर पाळीत आला त्या पापाचे राष्ट्रकल्याणार्थ प्रायश्चित्त घेतले आणि त्या घोषणेस सर्वतोपरी पाठिंबा दिला. अस्पृश्य हिंदूंच्या अखिल भारतीय संस्थांनीही त्यांच्या प्रतिनिधींच्या या सत्कृत्यास उचलून धरले.

स्पृश्य काय, अस्पृश्य काय, हिंदूमात्र तेवढा साराच्या सारा या जन्मजात अस्पृश्यतेच्या पापाचा भागीदार होता. दोष न्यूनाधिक प्रमाणात सर्वांच्या हातून घडला. त्या सामाजिक पापाचे सामाजिक परिमार्जन करण्यासाठी आमच्या भारतीय महाराज्याच्या मूल घटनेत जी नैर्बंधिक प्रतिज्ञा केली की, 'आजपासून कोणाही नागरिकावर जन्मजात अस्पृश्य म्हणून कोणतीही हीनता वा अक्षमता लादणे हा निर्बंधानुसार एक दंडनीय अपराध समजला जाईल.' ती घोषणा आपल्या अखिल हिंदुराष्ट्रास जितकी हितावह तितकीच भूषणास्पदही ठरणारी आहे.

ही घोषणा हिंदुराष्ट्रास किती भूषणास्पद आहे हे स्पष्टविणारी आणखी एक गो्ष्ट उल्लेखनीय आहे. ज्या राज्यघटनेत हा अस्पृश्यता नष्ट करण्याचा निर्बंध गोविला गेला त्या राज्यघटनेत रचनामंडळाचा अध्वर्यू कोण होता? ह्या नव्या स्मृतीचा स्मृतीकार कोण होता? तो अध्वर्यू, तो स्मृतीकार होता एक 'जन्मजात अस्पृश्य'! विद्वानांतील विद्वान, स्मृतीशास्त्रपारंगत, पट्टीचा निर्बंधपंडित डॉ. आंबेडकर! एक महाराष्ट्र कुलभूषण महार! बरे, त्यांनी तरी ते रचना मंडळाचे अध्वर्युपद एखादे अस्पृश्यांचे बंड उभारून नि स्पृश्यांना तरवारीच्या धारेवर धरून बळकावले होते की काय? नव्हे! आमच्या हिंदूराष्ट्रातील जातीपाती प्रांतनिर्विशेष अशा सर्व प्रतिनिधींनी स्वेच्छेने दिलेल्या मतानुसार त्यांना नियुक्त केलेले होते त्या अध्वर्युपदी! पुन्हा, अशा घटना रचना मंडळाच्या अध्वर्युपदी त्या जन्मजात 'अस्पृश्यची' नियुक्ती करणाऱ्या मतांमध्ये बहुसंख्य अस्पृश्यांचीच होती की काय? नव्हे, ती बहुसंख्य होती स्पृश्यांची!

२५.१.४ प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारा कायापालट करण्याची हिंदुराष्ट्राची क्षमता

वरील एकंदर स्फुट विवरणावरून एक अत्यंत आश्वासक निश्चिती बाळगता येते की, प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊन टिकण्याची जी क्षमता सृष्टीतील जीवनकलहात जगण्यासाठी अवश्य असते, ती क्षमता हिंदुराष्ट्राच्या अंगात आजही उत्कटपणाने बसत आहे. कधी वेळीच, कधी विलंबाने परंतु नेहमी अतिसमय होण्याच्या आधीच प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊनू तिच्यावर मात करण्यास अवश्य तो कायापालट आपल्या समाजरचनेत नि आचारविचारात घडविण्याची उज्जीवक शक्ती हिंदू राष्ट्राने प्राचीन काळापासून वेळोवेळी प्रकटविली आहे. आमच्या अनेक स्मृतीत अमुक आचरण वा रूढी धर्म्य म्हणून वा विहित म्हणून सांगितलेल्या असतात, तर दुसऱ्या स्मृतीत अथवा केव्हा केव्हा तर त्याच स्मृतीच्या दुसऱ्या भागात अधर्म्य नि निषिद्ध म्हणून सांगणारी वचने आढळतात. अशा वचनातील तो विरोध ऐतिहासिक दृष्टीने पाहता बहुधा केवळ विरोधाभासच असतो. नव्यानव्या प्रतिकूल परिस्थितीशी नि संकटांशी यशस्वी झुंज घेता यावी म्हणूनच त्या त्या काळी अहितकारक ते ते जुने आचार निषेधून अथवा हितकारक ते नवे आचार, नवी साधने, नवी ध्येये, नि नवे निर्बंध स्वीकारून नि आज्ञापून, राष्ट्ररक्षण करण्याचे जे सर्व ऐहिक धर्माधर्माचे मुख्य कर्तव्य तेच ह्या भिन्नकालीन स्मृतीतील ह्या वरवर विरोधी दिसणाऱ्या वचनांनी अविरोधपणे शतकानुशतके पार पाडले आहे. कलिवर्ज्य, युगऱ्हास, आपद्धर्म प्रभृती अनेक स्मार्त संकेत, (लीगल मॅक्झिम्स) उद्भवून ह्या आमच्या स्मृतीकारांनी हिंदुराष्ट्राच्या स्वत्वास, एकात्मकत्वास नि वर्धनक्षमतेस धक्का न लावता, समाजरचनेचा कालोचित कायापालट केलेला आहे. नाग जसा वेळ येताच जीर्ण कात टाकून देऊन पुन्हा एकदा नव्या तेजाने तळपू लागतो तसेच हे आमचे हिंदुराष्ट्र जीर्णशीर्ण आचारांची नि आजारांची कात वेळोवेळी टाकून देऊन कायाकल्प करून, शंभर संकटांतून शंभर वेळा निभावून जयिष्णू नि वर्धिष्णू तेजाने तळपत आलेले आहे. त्याच्यात अंतर्हित असलेली ही उज्जीवनशक्ती आजही धगधगलेली आहे. जन्मजात अस्पृश्यतेची ही दुष्ट रूढी एका फटकाऱ्यासरशी नष्ट करून टाकणारी ही उदात्त घोषणा हेही ह्याचेच एक अखंडनीय नि आश्वासक प्रत्यंतर होय.

आज ह्या तीस कोटी हिंदुराष्ट्रात निर्बंधान्वये जन्मजात अस्पृश्य असा कोणीही उरलेला नाही. अग्निहोत्रं गवालम्भं नियोगः पलपैतृकम्। देवराच्च सुतोत्पत्तिः।। प्रभृती कालच्या अनेक रूढीप्रमाणे आजच्या स्मृतीत अस्पृश्यता ही लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी कलिवर्ज्यात ढकलली गेली. आता ती पाळणे हेच पाप होय. स्पृश्य, अस्पृश्य इत्यादी शब्द आणखी काही काळ वस्तुस्थितीचा उलगडा करण्यापुरते काय ते वापरले जातील, वळवळत राहतील, पण नांगी छाटून टाकलेल्या विंचवाप्रमाणे त्यांच्यातील हीनार्थाचा दंश होण्याचे भय कोणासही उरू नये अशा निरूपद्रवीपणाने. आता अस्पृश्यतेची रूढी प्रथम का पडली, केव्हा पडली, कोणी पाडली, का टिकली इत्यादी प्रश्नांची चर्चा ही केवळ ऐतिहासिक संशोधनाचा, पंडिती वादाचा किंवा वितंडवादाचा विषय. ती कालची कथा. आजला त्याचे काहीच सोयरसुतक उरलेले नाही. कारण, जन्मजात अस्पृश्यता आज मेली! आज हिंदुस्थानातील प्रत्येक हिंदूला स्पृश्य नागरिकत्वाचे समसमान अधिकार नि प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. आता कोणी कोणाला हिणविण्यासाठी जन्मजात अस्पृश्य म्हणून म्हणणे हासुद्धा निर्बंधान्वये दंडनीय अपराध ठरेल. यापुढे कोणत्याही महंमदअल्लींना - मुसलमान ख्रिश्चनातही जन्मजात अस्पृश्यता पाळली जाते ही गोष्ट छपवून ठेवून - भर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून अशी भोंदूपणाची मागणी करण्यास तोंड उरले नाही की, 'हिंदू-मुसलमानांच्या एकीसाठी हिंदूंतील आठ कोटी अस्पृश्यांची अर्धी वाटणी करू या!' कारण अर्ध्या वाटणीसाठी हिंदूंत आठ कोटी अस्पृश्य तर काय, पण एकसुद्धा अस्पृश्य आज उरलेला नाही! आता मुसलमान-ख्रिश्चनांतच जे अस्पृश्य आहेत त्यांनीच हवे तर हिंदू व्हावे! कारण आता जो जो जन्मजात अस्पृश्य हिंदुधर्मात पाय टाकील, त्याच्या त्याच्या पायांतील, अस्पृश्यतेची जन्मजात बेडी आपोआप ताडकन तुटून जाते!

पूर्वी एकदम 'हिंदू आहोत तोपर्यंत अस्पृश्यता कालत्रयीही नष्ट होणार नाही!' अशा काहीशा आततायी भविष्यवादाने भिऊन एका अस्पृश्य गटाने 'आम्ही मुसलमान होणार' म्हणून त्रागा केला होता. तेव्हा सन १९३६ च्या आगेमागे आम्ही 'महारबंधूंशी मनमोकळा विचारविनियम' ही लेखमाला लिहिली होती. त्यात आमच्या महार धर्मबंधूंना आम्ही तर्कागत निश्चितीने आश्वासिले होते की, जर चालू वेगाने हिंदू संघटनाचे आंदोलन आपण सर्वजण मिळून रेटीत गेलो, आम्ही अस्पृश्यतेच्या मुळावर असेच घाव घालीत गेलो, तर धर्मांतराचा निष्फळ नि आत्मघातक आततायीपणा न करताही दहावीस वर्षांच्या आत हा अस्पृश्यतेचा विषवृक्ष उन्मळून पडू शकेल! आज ते आश्वासन बहुतांशी सत्य ठरलेले आहे. आता 'हिंदुधर्मात वा समाजात अस्पृश्यता आहे, म्हणून आम्ही धर्मांतर करणार' अशा भ्रामक त्राग्याचा किंवा पोकळ धमकीचा कणाच मोडून पडला आहे. नांगीच छाटली गेली आहे! ह्याउपरही ज्या मूठभर वा मोटभर मंडळींना धर्मांतर येनकेन प्रकारेण करावयाचेच असेल त्यांनी ते सुखेनैव करावे, आम्हास आता त्याची क्षिती वाटण्याचे कारण नाही. त्याने मोठीशी क्षती होणार आहे असेही नाही.

एकंदरीत, मानव्याच्या दृष्टीने काय किंवा आपल्या हिंदुराष्ट्राच्या दृष्टीने काय, झाले हे फार चांगले झाले. आमच्या स्वतंत्र भारतीय महाराज्यास शोभेल अशीच तिच्या घटना परिषदेची ही भव्य घोषणा महनीय आहे. उदात्त आहे, उदार आहे. शस्त्राच्या धारेचा ओरखडाही न ओढला जाता केवळ मानवी मूल्यांच्या शास्त्राधारानेच मिळविलेला हिंदुराष्ट्राच्या सत्प्रवृत्तीचा हा एक राष्ट्रीय विजय होय.

म्हणूनच अशी एक दुर्घट समाजक्रांतिकारक सुधारणा घडून आल्याचे शुभ वर्तमान आमच्या लेखणीस रक्तांश्रूत लिहावे न लागता आनंदाश्रूत उद्घोषिता येत आहे की, 'जन्मजात अस्पृश्यतेचा अंत झाला!' आमच्या चार कोटी हिंदू बांधवांची त्या दुष्ट शापापासून मुक्तता झाली, स्वतंत्र होताच भारतीय राष्ट्रदेवीने त्यांना केवळ नैतिकच नव्हे तर नैर्बंधिक समानतेचा उ:शाप दिला!

म्हणूनच, 'अस्पृश्यतेचे उच्चाटन करा! जन्मजात जातीभेदाचेच उच्चाटन करा!' म्हणून गेली पंचवीस वर्षे प्रचार करता करता झिजून मोडत आलेल्या ह्या आमच्या लेखणीस ती झिजून मोडून जाण्याच्या आधीच आज हा जन्मजात अस्पृश्यतेचा मृत्यूलेख तरी लिहिण्याचा सुयोग आला याविषयी त्या प्रकरणापुरती किती तरी कृतार्थता वाटत आहे!

जवळजवळ पंधरा वर्षांपूर्वी रत्नागिरीच्या जातीभेदोच्छेदक आंदोलनाने शाळांतून स्पृश्यास्पृश्य मुले सरमिसळ बसविण्यापासून तो थेट प्रकट सहभोजनापर्यंतच्या प्रत्यक्ष व्यवहारातूनसुद्धा जन्मजात अस्पृश्यतेचा नायनाट करून टाकण्यात आलेला होता. अस्पृश्यांचे 'पूर्वास्पृश्य' करून सोडले होते तेव्हा त्या स्थानिक कार्यसिद्धीची कृतार्थता ज्या गीतात व्यक्तविली होती तेच गीत आज आपल्या भारतीय महाराज्यातून त्या अस्पृश्यतेचा नायनाट झालेला पाहून जी कृतार्थता आज वाटत आहे तीही अखिल भारतीय प्रमाणात व्यक्तवू शकते की, आज आम्ही तीस कोटी हिंदूहिंदूतील अस्पृश्यतेचे - हे सुतक युगांचे सुटले.

विधीलिखित विटाळहि फिटले

जन्माचे भांडण मिटले

शत्रूचे जाळे तुटले

जे ग्रामबहिष्कार्य! आत त्या आणी

बाहेर गांव जावोनी ।।१।।

पण! अस्पृश्यता कोणत्याही स्वरूपात पाळणे हे निर्बंधान्वये निषिद्ध ठरले तरी व्यक्तींच्या जीवनात आणि पळापळाच्या व्यवहारात त्या निर्बंधाची कार्यवाही अजून व्हावयाची आहे. निर्बंध स्वीकृत झाला. पण - पण तो अजून कृतकार्य व्हावयाचा आहे! अस्पृश्यता मेली- पण तिचे और्ध्वदेहिक अजून उरकायचे आहे!

त्यांचे काय? ती चर्चा आता या लेखाच्या उत्तरार्धात करू.

## २५.२ *(उत्तरार्ध)*

आपल्या भारतीय महाराज्याच्या घटना समितीने नि लोकसभेने अस्पृश्यतेला दंडनीय अपराध ठरविण्याची जी घोषणा नि जो निर्बंध केला आहे त्याचे महत्त्वमापन आम्ही या लेखाच्या पूर्वार्धात केले. आता दैनंदिन व्यवहारात त्या निर्बंधाच्या प्रत्यक्ष बजावणीचे कार्य कसे पार पाडता येईल याची चर्चा करू.

शतकानुशतके समाजाच्या वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत धर्माचार म्हणून रोमरोमात भिनून राहिलेल्या अस्पृश्यतेसारख्या रूढीला अकस्मात दंडनीय ठरविणारा हा असला निर्बंध जोवर केवळ निर्बंधसंहितेतच अंकिलेला राहतो तोवर तो तत्त्वतः कितीही उदात्त असला तरी व्यवहारतः निष्फळच ठरणार. त्यांचे खरे साफल्य त्याच्या तात्त्विक बडेजावीत नसून त्याच्या व्यावहारिक बजावणीत सामावलेले असते. अस्पृश्यता पाळणे हे दंडनीय ठरविलेले आहे या नुसत्या बातमीसरशी यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणे उभ्या राष्ट्राच्या दैनंदिन व्यवहारातून अस्पृश्यता आपण होऊन झटपट नाहीशी होईल असे समजण्याइतका आशाळभूत कोणी असेल असे वाटत नाही. आपण हे विसरता कामा नये की अशा निर्बंधाच्या प्रश्नी लोकमत किती प्रतिकूल किंवा अनुकूल आहे याची खरी कसोटी त्या निर्बंधाला तात्त्विक मान्यता देण्याप्रसंगी पारखता येत नाही, तर ती खरी कसोटी त्या निर्बंधाची जेव्हा स्फुटशः नि व्यक्तीशः प्रत्यक्ष बजावणी चालू हो‍ेते तेव्हाच काय ती पारखता येते. आम्ही पूर्वार्धात सांगितलेच आहे की, स्पृश्यांतील नि अस्पृश्यांतील सुधारक, राष्ट्रहितैषी, सुविद्य नि मुखर असा जो भाग आहे, त्याच्या सहानुभूतीच्या पाठिंब्यामुळेच अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचा हा निर्बंध संमत होऊ शकला. परंतु या अफाट हिंदू समाजातील जो कोट्यवधी लोकांचा अबोल भाग आहे नि जो भागच ह्या रूढीला धर्माचार म्हणून कट्टरपणे कवटाळून बसलेला आहे. त्यांचे मत ह्या निर्बंधाला किती अनुकूल वा प्रतिकूल पडते ते ह्या निर्बंधाची प्रत्यक्ष बजावणी होतानाच काय ते नक्की पारखता येईल. त्यातही ह्या निर्बंधाच्या प्रत्यक्ष बजावणीचे चटके त्या अविद्य, रूढीग्रस्त नि अबोल भागालाच अधिक तीव्रतेने बसणारे आहेत. कारण, अस्पृश्यांना स्पृश्यांचे सर्व अधिकार समानतेने देणाऱ्या या निर्बंधाची कडक बजावणी चालू होताच घाटावर, विहिरीवर, मार्गात, मंदिरात, दुकानात, देवघेवीत ऐका बाजूने पूर्वास्पृश्य आपले समानतेचे नवे अधिकार गाजवू निघतील, तर दुसऱ्या बाजूने यामुळे स्पृश्यांतील वर्णाहंकाराला आणि रूढीसिद्ध अधिकारांना प्रत्यक्षपणे नि पदोपदी धक्के बसू लागताच त्यांच्याही न्याय्य नसल्या तरी प्रामाणिक असलेल्या भावना भडकू लागतील. अशा वेळी काही काळ नि काही ठिकाणी तरी संघर्ष होण्याचा उत्कट संभव आहे. केवळ स्पृश्य नि अस्पृश्य यांच्यातच नव्हे, तर अस्पृश्यांतील तथाकथित उच्च अस्पृश्य आणि तथाकथित हीन जातीचे अस्पृश्य यांच्यातही अशी तेढ माजणे अगदी संभवनीय आहे. गुजराथी भंगी नि काठेवाडी धेड ह्यांना एका चाळीतल्या स्वतंत्र खोल्यांतूनसुद्धा राहावयास सांगणे हे साध्या नगरपालिकांनाच नव्हे तर मुंबईच्या महापालिकेलासुद्धा (कार्पोरेशनला) अवघड जाते!

उलटपक्षी ज्या निर्बंधामुळे वरील प्रकारच्या संघर्षाचा संभव जरी उत्पन्न झालेला असला, तरीही अस्पृश्यता निवारण्याचे कार्य लोकांची मने वळवूनच करण्याचे प्रयत्नही पूर्वीपेक्षा या निर्बंधामुळे अनेक पटीने अधिक यशस्वी होणारे आहेत. हा निर्बंध होण्यापूर्वी अस्पृश्यता निवारक आंदोलनाला नैतिक बळावर काय ते अवलंबावे लागे. अस्पृश्यता पाळणे दूषणीय आहे, इतके सांगूनच काय जे घडेल ते मतपरिवर्तन घडविता येते होते. पण आता अस्पृश्यतानिवारक आंदोलनाला केवळ नैतिक नव्हे, तर नैर्बंधिक (कायद्याचे) पाठबळही मिळाले आहे. आता अस्पृश्यता पाळणे हे केवळ दूषणीयच नसून दंडनीयही आहे असे सुधारक प्रचारकांना ठासून सांगता येईल. नैतिक उपदेशाने अस्पृश्यता पाळू नये असे कोणाला जरी पटले तरी आजवर त्यांना ही भीती वाटे की, आपण जर आपल्या मताप्रमाणे प्रत्यक्ष आचारात अस्पृश्यता

पाळीनासे झालो, तर आपले भाईबंद नि जात आपल्याला वाळीत टाकतील, जात पंचायत दंडही करील. यांचे उदाहरण म्हणून न्हावी, धोबी अशा जातीचे देता येईल. यांच्यातील कित्येकजण व्यक्तीशः अस्पृश्यांची दाढी करावयास किंवा कपडे धुण्यास सिद्ध असताही आजपर्यंत त्यांना त्यांच्या भाईबंदांच्या भीतीमुळे तसे करता येत नसे. पण आता ह्या निर्बंधामुळे त्यांना आजवर वाळीत टाकण्याचा किंवा दंड करण्याचा धाक दाखविणाऱ्या जात पंचायतींनाच तसे काही केले तर स्वतःलाच दंड होईल ही भीति पडेल. ' भीक नको पण कुत्रा आवर' ह्या मनुष्याच्या नि विशेषतः समाजसंस्थाच्या स्वभावाप्रमाणे ज्या ज्या न्हाव्याधोब्यांना अस्पृश्यता पाळू नये असे केवळ न्यायतःच वाटेल, त्यांना तसे आचरण निर्भयपणे करता येईल. या निर्बंधाच्या केवळ अस्तित्वानेच त्यांच्या दंडशक्तीचा प्रत्यक्ष उपयोग न करताही नुसत्या उपदेशाने अस्पृश्यता निवारणाचे कार्य असे अधिक सुसाध्य होणारे आहे.

प्रतिकूल नि अनुकूल अशा या दोन्ही बाजू ध्यानात घेऊन निर्बंधाची बजावणी कशी करावयाची त्या कार्यक्रमाची रूपरेषा आपणांस आखली पाहिजे. परंतु काही झाले तरी आता या निर्बंधाची बजावणी तडकाफडकी, अगदी काटेकोरपणे, न डगमगता आणि निर्धाराने केलीच पाहिजे. जर आता ह्या प्रत्यक्ष बजावणीत आपण चुकारपणा करू किंवा क्वचित प्रसंगी होणाऱ्या संघर्षास बगल देण्यासाठी आजचा प्रश्न उद्यावर ढकलू, तर तो संघर्ष उणा न होता अधिक धिटावेल-बळावेल! अस्पृश्यतेचे उच्चाटन अशा भोरू कालापहरणाने दहा वर्षात काय, पण आणखी शंभर वर्षातही होणार नाही आणि 'अस्पृश्यता आज नष्ट झाली! ती पाळणे एक दंडनीय अपराध समजला जाईल!' ही आपल्या राज्यघटनेतील घोषणाही एक नुसती राणा भीमदेवी गर्जना काय ती उरेल! त्या घोषणेची खरी प्रतिष्ठा तिच्या बजावणीत आहे. येत्या दहा वर्षांच्या आत उभ्या भारतीय महाराज्याच्या कानाकोपऱ्यातून अस्पृश्यतेची पाळेमुळे उखडून टाकली पाहिजेत. तरच त्या घोषणेची शोभा! अशी दृढ प्रतिज्ञा केलेला, एका बाजूस शक्यतोवर समोपचाराने प्रत्येकाच्या हृदयातील माणुसकीला, सत्प्रवृत्तींना नि राष्ट्रप्रेमाला आळवून जन्मजात नि व्यक्ती-व्यक्तींत नैतिक प्रवृत्ती उत्पन्न करणारा, परंतु  तरीही अन्यायप्रवण दुराग्रह ऐकेनासा झाला तर प्रसंगी या नैर्बंधिक (कायदेशीर) बळाचाही न्यायालयाकडून किंवा राज्याधिकाराकडून प्रयोग करविण्यास न कचरणारा असा कार्यक्रम स्पृश्यास्पृश्यांतील सर्व सुबुद्ध, सुविद्य नि स्वराष्ट्रहितैषी कार्यकर्त्यांनी आखला पाहिजे. आणि त्याप्रमाणे या निर्बंधाच्या प्रत्यक्ष बजावणीचे एक अखिल भारतीय आंदोलनच उभारले पाहिजे.

अशा कार्यक्रमाची प्राथमिक रूपरेषा आखण्याच्या आधी आणि ती उचितपणे आखता  यावी म्हणूनच अस्पृश्यतेसंबंधीची आजची वस्तुस्थिती काय आहे, तिची उडती पाहणी तरी करणे अवश्य आहे. अस्पृश्यतेला दंडनीय ठरविणारा निर्बंध संमत होऊन आता आठ-दहा महिने होत आले. कित्येक प्रांतिक सरकारांनी मंदिरप्रवेशादी निर्बंध पूर्वीच संमतीलेले होते. त्यांचा उपयोग लोकांनी किती करून घेतला, अस्पृश्यांना आजही काय काय प्रकरणी जाच होत आहे. या निर्बंधाची बजावणी करण्यासाठी कोणी झटत आहे की नाही, कुठे संघर्ष लहान वा मोठ्या प्रमाणावर घडला की काय, अशा या प्रश्नांच्या शक्य तितक्या पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या काही थोड्याशा प्रतिकात्मक घटना ज्या एवढ्या आठ-दहा महिन्यात घडल्या तशा - खाली देत आहो. त्यांना अगदी उकरून काढलेले नाही, तर चालू वृत्तपत्रांतून त्या सहजासहजी जशा

सापडल्या तशा टाचून ठेवल्या. वृत्तपत्रांवरूनच त्या घेतलेल्या असल्यामुळे त्यात कुठे न्यूनोक्ती वा अधिकोक्ती असू शकेल. तथापी एकंदरीत त्या अस्पृश्यतेसंबंधीच्या आजच्या परिस्थितीवर यथावत्प्रकाश टाकण्यास पुरेशा आहेत. त्याविना ह्या एकेक घटनेच्या प्रकारच्या अनेक घटना देशभर घडताहेत हेही खरे. ह्या घटना देताना काही स्थली अवश्य ते चर्चात्मक स्पष्टीकरणही देत जाऊ. त्या घटना अशा -

२५.२.१ आजच्या वस्तुस्थितीची उडती पाहाणी

इंदूर येथे चांभाराची दाढी करण्यास नकार दिल्यामुळे मध्य भारतातील गारोथ गावच्या एका न्हाव्याला मॅजिस्ट्रेटने पंचवीस रूपये दंड ठोकल्याचे समजते. आणखी असेच दोन खटले कोर्टात चालू आहेत.

अक्कलकोट येथून तीन मैलांवर असलेल्या नणसगोळ या गावी स्पृश्य नि अस्पृश्य वर्गामध्ये दुफळी पडली आहे. हरिजन बंधूंना पिण्यास पाणीसुद्धा मिळू न देण्याचे यत्न स्पृश्य करीत आहेत. काही स्पृश्य प्रमुखांनी अस्पृश्यांना 'तुम्ही गाव सोडा, नाही तर ठार मारू' अशी धमकी दिल्याचे समजते. बैल चोरल्याच्या आरोपावरून पोलिस इन्स्पेक्टरने तीन हरिजनांना अटक केली आहे. हरिजन म्हणतात की, आमच्यावर खोटे आरोप करून स्पृश्य त्रास देत आहेत. या तालुक्यात इतरत्रही असे प्रकार घडत आहेत.

अशा प्रकरणी केवळ स्पृश्य किंवा केवळ अस्पृश्य सर्वतोपरी दोषी असतात असे नाही. तरी अशा ठिकाणी सरकारी अधिकाऱ्यांनी तत्काळ जाऊन नीट चौकशी करावी. कोणत्याही दोन गटात तंटेबखेडे होणे निराळे. त्यांचा बंदोबस्त त्या दृष्टीने व्हावा. पण अस्पृश्य म्हणून त्यांना स्पृश्य लोक समान अधिकार देत नसतील, तर मात्र ते अधिकार नि विशेषतः नदी-विहिरीवरील समान उपभोगाचे अधिकार अस्पृश्यांना तत्काळ देववून त्यांना काही दिवस रक्षण द्यावे. ते अधिकार नाकारणाऱ्या स्पृश्यांना नैर्बंधिक शासन करावे. म्हणजे तशा कडक शासनाच्या वचकामुळे इतरत्र होणारे अशा प्रकारचे अन्याय स्पृश्य करू धजणार नाहीत. अस्पृश्यांचा अतिरेक असला तर त्यांनाही शासन व्हावे.

अमुरखेड (नागपुर) या बाजूचे एक प्रसिद्ध कॉंग्रेस पुढारी, पावसाडा येथील मथुराप्रसाद तिवारी ह्यांनी गावच्या विहिरीवर पाणी भरता कामा नये असा अस्पृश्यांना धाकदपटशा दिला. त्यायोगे हरिजन खवळले. तेव्हा तिवारी ह्यांनी आपल्या अनुयायांकरवी हरिजनावर लाठीहल्ला चढविला. पोलिस सब इन्स्पेक्टरने तिवारीजींना आता पकडले आहे. हे प्रकरण आपसांत दाबून टाकण्याचा प्रयत्न होत आहे.

कोकणात काही ठिकाणी महार लोकांनी मेलेली गुरे-ढोरे ओढण्याचा आपला पूर्वापार व्यवसाय हीन होय म्हणून करण्याचे नाकारले. तेव्हा गावकऱ्यांनी रागावून रूढीप्रमाणे महारांना जे बलुते द्यावयाचे ते बंद केले. त्यामुळे बलुते मिळण्याचा आपला 'हक्क' बजाऊन घेण्यासाठी गावकऱ्यांवर महार लोक कोर्टात दावा लावण्याचा बेत करीत आहेत.

ढोरे फाडण्याचा धंदा रूढीप्रमाणे जे करीत नाहीत अशा अस्पृश्य जातीच्या काही मंडळींनी आपण ढोरे फाडण्याचा धंदा करावा म्हणून ठराव केला हे कळताच मुंबईच्या त्यांच्या

जातभाईंनी सभा घेऊन असा धंदा रूढीविरुद्ध केल्यास जातीबहिष्कार घालू म्हणून त्यांना धाक घातला!

रामपूर (संयुक्त प्रांत) येथे न्हाव्यांनी आमच्या दाढ्या कराव्यात, धोब्यांनी कपडे धुवावेत आणि नगरपालिकेने आमचा पगार वाढवावा, अशी मागणी एक हजार भंग्यांनी केली आहे.

कोल्हापूरकडील शिरोळे येथे हरिजन दिवशी हरिजनांनी उपाहारगृहात प्रवेशाचा प्रयत्न केला म्हणून लोकांनी काही दिवसांपासून त्यांच्यावर आर्थिक बहिष्कार घातला आहे. हरिजनांनी मामलेदाराकडे मोर्चा नेऊन गाऱ्हाणे केले, प्रकरण वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मामलेदारांनी धाडले. (अशा ठिकाणी लाल फितीच्या द्राविडी प्राणायामात कालहरण न करता, स्थानिक अधिकाऱ्यांनी पूर्वास्पृश्यांना तत्काळ संरक्षण देऊन आगळीकवाल्यांना शासन केले पाहिजे.)

लोणंदकडील शेरीवाडी येथे ज्या आडावर हरिजनांनी पाणी भरले त्या आडावर गावाने बहिष्कार घातल्याचे कळते.

अकोला येथील गुलझारपुऱ्यातील एक हरिजन स्त्री नदीवर पाणी भरण्यास गेली असता तिला स्पृश्य जातीच्या महिलांनी बंदी करून ती बेशुद्ध होईपर्यंत मारहाण केली. त्या अस्पृश्य स्त्रीने दावा भरला असून पोलिस तपास चालू आहे. (अशा प्रकरणांची माहिती सरकारने प्रसिद्धावी, चौकशीत आगळीक खरी कोणाची ठरली, त्यासाठी कोणास काय शासन झाले, ही अधिकृत बातमी वृत्तपत्रांतून सरकारने प्रसिद्धीली असता तिच्यामुळे इतरत्रही तशी आगळीक करू पाहाणाऱ्यांना वचक बसेल. अशी प्रकरणे झटपट निकालात काढली पाहिजेत.)

साकुर्ली (जि. ठाणे) या गावी गेल्या हरिजनदिवसापासून स्पृश्यास्पृश्यांत वैमनस्य येऊन हरिजनांची गुरे कोंडवाड्यात घालणे, शेतीकामाला अडथळा करणे, हरिजन स्त्रियांना धमक्या देणे असा त्रास होत आहे. हे प्रतिवृत्त ना. तपासे ह्यांच्या कानावर घातले गेल्यामुळे पोलिस इन्स्पेक्टरना बंदोबस्तासाठी सरकारी आज्ञा झाली आहे.

फलटणला हरिजन दिवसानिमित्त तिकडचे कॉंग्रेस अध्यक्ष श्री. भगत यांच्या प्रमुखत्वाखाली जी सभा झाली तीत काही हरिजन वक्त्यांनी त्यांना विचारले की, ‘तुम्हाला वर्षाकाठी एक दिवस तेवढा हरिजनप्रेमाचा पुळका का येतो? कॉंग्रेस अधिवेशनाकरिता तुम्ही बावीस हजार रूपये इकडून जमविलेत. पण सार्वजनिक संडास नि दिव्यासाठी चाललेली आमची आबाळ दूर करण्यास पैसे नाहीत म्हणून म्हणता! आमच्या साऱ्या अडीअडचणी दूर न करता होणारे हे हरिजन दिवसाचे समारंभ आम्हांस दांभिकपणाचेच वाटणार.’

अशाच प्रकारची भाषणे कित्येक ठिकाणी हरिजनांनी त्या दिवशीच्या सभांतून केलेली आहेत. आम्हांस नोकऱ्या द्या, राखीव जागा द्या, विशेष सवलती द्या, तर आम्ही अस्पृश्यता गेली असे समजू, असा त्यांचा सूर होता. काही ठिकाणी तर स्पृश्यास्पृश्यांची संमिश्र स्नेहसंमेलने करण्याच्या स्तुत्य हेतूने भरविलेल्या सभांवरही काही अस्पृश्य गटांनी बहिष्कार घालण्याचे अविचारी कृत्य केले.

इतकेच नव्हे, तर दोन-तीन ठिकाणी हरिजनदिनी पूर्वास्पृश्यांच्या काही गटांनी मिरवणुका काढून ‘लढके लेंगे दलितस्थान’ अशा अर्थशून्य, अविवेकी नि अहितकारक घोषणा करण्यासही मागे पुढे पाहिले नाही!

मुंबईस ‘कोकण मित्र मंडळ’ नावाची एक लहानशी पण कार्यकर्ती संस्था आहे. तिच्या ताज्या प्रतिवृत्तावरून दिसते की, काही खेडेगावी टपालवाले अस्पृश्य वस्तीत त्यांनी पत्रे वाटण्यास जात नाहीत. तर त्या बिचाऱ्या अस्पृश्यांनाच हे टपालवाले जिथे असतील तिथे जाऊन आपली पत्रे आणावी लागतात! इतकी पायपीट केली तरी अस्पृश्यांचे द्रव्यटपाल (मनीऑर्डर) असल्यास त्यावर कोण्या स्पृश्याने सही केल्यावाचून ते शिक्षित अस्पृश्याला सुद्धा द्रव्य देत नाहीत. वरील ‘कोकण मित्र मंडळाने’ असे काही अन्याय दूर केलेले आहेत.

### २५.२.२ महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघ

ही संस्था महाराष्ट्रात प्रथमपासून अस्पृश्यता निवारणास्तव भरीव काम करीत आलेली आहे. या लेखात अस्पृश्यता दंडनीय ठरविली गेल्यानंतरच्या घटनांचा उल्लेख करणे असल्यामुळे वरील संस्थेचे गेल्या पाचसहा महिन्यांचेच काय ते कार्य पाहू. या संस्थेचे सध्याचे अध्यक्ष आहेत श्री. विनायक बर्वे, विधीज्ञ, धुळे. ते ‘दलित सेवक’ नावाचे एक वृत्तपत्र चालवितात. आज कित्येक वर्षांपासून मुख्यतः कान्हदेशामध्ये अस्पृश्यता निवारणाच्या कार्यी ते अविरत परिश्रम करीत आलेले आहेत. त्यांच्या अध्यक्षत्वाखाली म. प्रा. हरिजन सेवक संघ अस्पृश्यतेला दंडनीय ठरविणाऱ्या निर्बंधाची बजावणी महाराष्ट्रात ठिकठिकाणी परिणामकारक रीतीने करीत चाललेला आहे, ही समाधानाची गोष्ट होय. शक्य तितक्या मनमिळावूपणे वागत असताही दुराराध्य अन्यायाचे उच्चाटन करण्यास भागच पडेल तेथे वरील निर्बंधानुसार खटले करून, ज्याची आगळीक त्यास दंड करविण्याचे त्यांचे धोरण अगदी समर्थनीय आहे. त्यांच्या काऱ्याची माहिती व्हावी नि ती इतरांना मार्गदर्शक व्हावी या हेतूने त्या संघाच्या ऑगस्ट १९५० च्या प्रतिवृत्तातील काही कार्यांना येथे उल्लेखीत आहोत.

(१) केल्या ऑगस्ट महिन्यात त्या संस्थेचे एक प्रचारक, श्री. मोरे यांनी पुणे जिल्ह्यातील फुरसुंगी, महंमदवाडी, लोणी काळभोर, थेऊर, वाडे, दापोडी, उंडी, केसनंद वाघोली, मांजरी, कोलवाडी, साष्टे, विवरी, सिरसवाडी, सहजपूर ह्या गावी जाऊन पूर्वास्पृश्य वस्तीची पाहणी करून त्यांना वरील निर्बंधाची माहिती दिली, आणि त्यांना त्या निर्बंधान्वये काय अधिकार नि सवलती मिळाल्या आहेत ते समजाऊन दिले. (२) ठाणे जिल्ह्यातील प्रचारक श्री. मोईर ह्यांनी अनेक गावी जाऊन असाच प्रचार केला. पूर्णा येथील तिन्ही देवमंदिरात स्पृश्यास्पृश्यांसह प्रवेशून दर्शन घेतले. सरकगाव, वसई, उमरोली नि आंबेल या गावी उपाहारगृहांतून हरिजनांना प्रवेश मिळवून दिला. कांबरा नि भिवंडी येथील हरिजनांची गाऱ्हाणी अधिकाऱ्यांच्या कानावर घातली. (३) सातारा जिल्हा प्रचारक श्री. शिवदास यांनी शिवथर, वाटे, कामाठीपुरा, कोलवडी, सोनके प्रभृती पंधरावीस गावांना भेट देऊन पूर्वास्पृश्य वस्तीतून वरील निर्बंध समजाऊन दिला. ह्या सर्व गावी पूर्वास्पृश्यांसह उपाहारगृहात प्रवेशून सरमिसळ चहा घेतला. केशकर्तनालयांतून हरिजनांना नेऊन स्पृश्यांप्रमाणेच काही भेदाभेद न होऊ देता त्यांच्या दाढ्या करविण्यात आल्या, केस कापण्यात आले. या गावांपैकी चौदा ठिकाणी हरिजनांकडून सार्वजनिक विहिरीचे

पाणी काढून घेतले. आठ ठिकाणी त्यांना देवळात नेऊन देवदर्शन करविले. कान्हदेश जिल्ह्यात ह्या हरिजन सेवक संघाचे मुख्य केंद्रच असल्यामुळे तेथील गावागावातून अस्पृश्यता निवारक निर्बंधाची बजावणी सतत चालू आहे. अशा आखीव नि रेखीव पद्धतीने निर्बंधाच्या प्रत्यक्ष बजाविण्याचे जे कार्य म. प्रा. हरिजन सेवक संघाकडून चालू आहे त्याविषयी त्यांचे नि अध्यक्ष श्री. बर्वे यांचे आम्ही मन:पूर्वक अभिनंदन करतो. पक्षनिरपेक्षपणे सर्व नागरिकांनी या कामी ह्या संघाशी शक्य ते ते सहकार्य करावे.

२५.२.३ अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेस लीग

ही पूर्वास्पृश्यांची एक प्रतिनिधीक नि प्रमुख संस्था आहे. अनेक प्रांतिक मंत्री आणि इतर राज्याधिकारी हिच्या चालकांत आहेत, ही विशेष महत्त्वाची गोष्ट होय. या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक गेल्या सप्टेंबरमध्ये झाली. भारतीय लोकसभेचे सदस्य डॉ. धर्मप्रकाश त्या बैठकीचे अध्यक्ष होते. पंजाबचे श्रमिक मंत्री श्री. पृथ्वीसिंग, उत्तर प्रदेशचे मंत्री गिरीधारीलालजी, मध्य प्रदेशचे मंत्री अग्निभोज, मद्रासचे मंत्री परमेश्वरम्, मुंबईचे मंत्री गणपतराव तपासे, नारायणराव काजरोळकर, एम.एल.ए. सोनावणे एम.पी. इत्यादी पूर्वास्पृश्यांचे अखिल भारतीय पुढारी नि प्रमुख अधिकारी उपस्थित होते. त्या बैठकीच्या ठरावात म्हटले आहे की, 'सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक उन्नतीच्या क्षेत्रात पूर्वास्पृश्यांची प्रगती नि जागृती होत आहे हे नि:संशय. तथापी नगरांतून नि खेड्यांतून त्यांना पाशविक पद्धतीने दडपण्यात येत आहे. याची पाहणी करण्यासाठी सरकारने एक समिती नेमावी आणि घटनेप्रमाणे मागासलेल्या वर्गाच्या हितरक्षणार्थ जो अधिकारी नेमावयाचा तो स्वतः हरिजनच असावा. पूर्वास्पृश्यांचे स्वतःचे मनोगत कळावे यासाठी हा ठराव आम्ही हेतूतः इथे दिलेला आहे. तथापी ह्या अ.भा.डि.क्ला. लीगचा सर्वात महत्त्वाचा दूरदर्शी, हिंदुत्वनिष्ठ, निडर नि खणखणीत असा जो ठराव होता त्यात कार्यकारिणी म्हणते -

आमच्या (पूर्वास्पृश्य) बंधूभगिनींना आमची अशी विनंती आहे की, त्यांनी कोणत्याही कारणासाठी आपला प्राचीन धर्म सोडू नये. प्रसंगपरत्वे ज्यांनी धर्म सोडला असेल, त्यांनी शक्य तितक्या लवकर आपल्या प्राचीन स्वधर्मात परत यावे.

या देशाच्या बऱ्याच भागात काही काही जमाती आपली लोकसंख्या वाढविण्यासाठी इतरांना बाटविण्याचा प्रयत्न करीत असतात. ही कार्यकारिणी अशा कारवायांविषयी अत्यंत तीव्र विषाद व्यक्तवीत आहे.

आपल्या धर्मातून बाटून परधर्मात गेलेल्यांना स्वधर्मात पुन्हा परत घेण्यासाठी आमच्या हिंदू बांधवांनीही शक्य ते ते साहाय्य करावे, अशी आमची यच्चयावत हिंदूमात्राला विनंती आहे.

आमच्या पूर्वास्पृश्यबंधूंच्या ह्या कळकळीच्या विनंतीविषयी आम्हास इतके तरी सांगितल्यावाचून पुढे जाववत नाही की, 'धर्मबंधूंनो नि देशबंधूंनो, तुम्ही अशा हिंदुत्वरक्षणाच्या पवित्र कार्यी इतर हिंदूंना तुम्हास साहाय्य देण्याची विनंती कशी करता?' हे तुमचे स्वधर्मप्रेम नि शालीनता पाहून आम्हांस लज्जेने मान खाली घालावीशी वाटते! विनंती नव्हे! हिंदुधर्म रक्षणाच्या कार्यी तुम्हास साहाय्यच नव्हे, तर तुमच्या खांद्याशी खांदा लावून झुंजण्याची,

सहकार्य करण्याची तुमच्या इतर हिंदूबांधवांना 'आज्ञा' करण्याचा तुम्हास अधिकार आहे. ती पाळण्याचे त्यांचे कर्तव्य आहे. पुन्हा हेही ध्यानी असावे की, जे आपले धर्मबंधू बळाने वा छळाने, अनिच्छेने वा भ्रांत इच्छेने पूर्वी परधर्मात गेले त्यांना आपल्या हिंदुधर्मात परत येण्यास आता त्यांच्या एका इच्छेविना दुसरी कोणतीही आडकाठी उरलेली नाही. गेल्या तीनचार वर्षात क्रांतीकालीन धुमाळीत आपल्या हिंदू राष्ट्राला उपोद्बलक अशा ज्या काही असाध्य गोष्टी साध्य झाल्या, त्यात जशी जन्मजात अस्पृश्यता दंडनीय ठरवली ही एक गोष्ट आहे, तशीच शुद्धी स्वयमेव मंडनीय ठरली ही दुसरी गोष्ट आहे! ह्या वा त्या उनष्टुपाच्या आधारे नव्हे, ह्या वा त्या पीठाच्या प्रेरणेने नव्हे, तर हे स्वयमेव हिंदू राष्ट्रच्या राष्ट्र कोण्या दैवी उन्मादाच्या झटक्यात झपाटले जाऊन, मध्यंतरी काही शतके वज्रकठीण अडसरांनी गच्च बंद केले गेलेले ते शुद्धीचे महाद्वार सताड उघडऊन देते झाले! शक-हुणांच्या काळात एकेका यज्ञासरशी परकीयांच्या जातींच्या जाती शुद्ध करून स्वधर्मात आम्ही सामावून घेतल्याचे जे चमत्कार आम्ही हिंदू राष्ट्राच्या पुराणेतिहासात वाचतो तसे काही चमत्कार गेल्या तीन चार वर्षाच्या क्रांतीकाळात डोळ्यांदेखत घडले आहेत. शत्रूने बळाने बाटविलेल्या हिंदू स्त्रीपुरुषांचे तांडेच्या तांडे लढत, पडत-झडत शत्रूच्या हातून सुटून आपल्या ह्या पितृभू - पुण्यभू भारताच्या आजच्या तात्कालिक सीमांच्या आत शिरताच आपोआप शुद्ध होऊन हिंदुराष्ट्रात सामावून गेले. ह्या पुण्यभूमीचा स्पृश्य हाच आजचा अनन्य शुद्धीसंस्कार ठरला! बळाने भ्रष्टविलेल्या हिंदू स्त्रीपुरुषांचीच गोष्ट कशाला? अगदी जन्मजात अशा सहस्रावधी मुसलमानांना सुद्धा त्यांनी 'आम्ही हिंदू होऊ इच्छितो' असे म्हणताच रजपूत जाटांसारख्या कट्टर हिंदूंनीसुद्धा नुसत्या शेंडीवारी शुद्ध करून घेतले, समाजात सामावून टाकले. ही डोळ्यादेखत घडत असलेली उदाहरणे आहेत! पूर्वी बाटलेल्या पूर्वास्पृश्य हिंदू बांधवांना आपल्या पूर्वजार्जित हिंदुधर्मात येण्याची इच्छा होण्याचा काय तो अवकाश आहे! आता अस्पृश्यतेची बेडी तुटली आहे, शुद्धीचे महाद्वार सताड उघडलेले आहे. गंगामाईचे पाणीसुद्धा शुद्धीसाठी शिंपडणे अवश्य नाही. आपल्या घरी परत येऊन आपल्या अंतरलेल्या धर्मबंधूंना, मायलेकरांना भेटताच जे प्रेमाचे नि राष्ट्रीय आनंदाचे अश्रू तुमच्या आमच्या डोळ्यातून वाहतील त्यांचे जे सिंचन तीच शुद्धी! तेवढाच काय तो संस्कार.

### २५.२.४ जात्युच्छेदक हिंदू महामंडळ

केरळ प्रांतातील त्रावणकोर-कोचीनकडील मोठमोठ्या पंचवीसतीस स्पृश्यास्पृश्यांच्या जातीसंस्थांनी आपापले विसर्जन करून हे महामंडळ स्थापिले आहे. त्या त्या संस्थेची लक्षावधी रूपयांची मत्ता नि निधीही महामंडळाच्या हाती दिली आहे. केवळ अस्पृश्यतेचेच नव्हे तर जन्मजात जातीभेदांचेच उच्चाटन करून जातीपातिनिर्विशेष अशा हिंदू समाजाची (ए कास्टलेस हिंदू सोसायटी) निर्मिती करण्याचा ह्या महामंडळाचा एक प्रमुख उद्देश आहे. विधीमंडळातील अनेक हिंदू सभासद या महामंडळास मिळालेले असून हिंदूपक्षाच्या नावावर एक चुरशीची निवडणूकही त्यांनी गेल्या महिन्यातच जिंकली आहे. त्यांच्या राजकीय कार्यक्रमाची बाजू या लेखाच्या कक्षेबाहेरची आहे. परंतु जन्मजात अस्पृश्यता नि जातीभेद ह्यांच्या उच्चाटनाचे जे प्रकट प्रयत्न जितक्या मोठ्या प्रमाणावर ह्या प्रमुख संस्थेकडून होताहेत त्याविषयी सद्य:परिस्थितीच्या या पाहणीत अभिनंदनपूर्वक उल्लेख करणे कर्तव्यच होते.

वरील मोठमोठ्या संस्थांच्या मानाने पुष्कळच लहान असलेल्या; परंतु, जातीभेदोच्छेदनास्तव आपल्या शक्तीप्रमाणे, शक्य ते ते कार्य प्रत्यक्षपणे करून दाखविणाऱ्या एका एकमुखी संस्थेचा तेवढा, जाताजाता, उल्लेख करू. त्या संस्थेचे नाव आहे श्रीयुत अनंत हरि गद्रे! वीस वर्षांपूर्वी, त्यांच्या झुणका भाकर सहभोजन संघाने, महाराष्ट्रात केवढी तरी खळबळ उडवून दिली. सध्या फारसे साहाय्य नाही; साधने नाहीत. तरीही तुटपुंज्या परिस्थितीतसुद्धा, तितकेच परिणामकारक कार्य करणारा एक डोकेबाज तोंडगा त्यांनी काढला आहे. तो, म्हणजे, 'झुणका भाकर सत्यनारायण.' जीत जमेल त्या चाळीत, जावयाचे; एका पूर्वास्पृश्य जोडप्याच्या हातून, एका टुमदार सत्यनारायणाची प्रकटपणे पूजा करावयाची; आणि एका टीचभर भाकरीच्या तुकड्यावर चिमुटभर, खमंग झुणका ठेवून, तो प्रसाद, अवतीभोवती गोळा झालेल्या लोकांना त्या पूर्वास्पृश्य महार, भंगी, धेड धर्मबंधूंच्या हाताने, सांगूनसवरून वाटावयाचा; हा साधा खाक्या, पण, सत्यानारायणाची कृपा अशी की, चाळीचाळीतून आब्राह्मणचांडाळ स्त्रीपुरुष, मुलेबाळे, सुशिक्षित-अशिक्षित शेकड्यांनी त्या पूजेभोवती गोळा होतात; नि पूर्वास्पृश्यांच्या हातचा तो प्रसाद, समजून घेऊन उभ्याउभ्याच खाऊन चट्टामट्टा करून टाकतात. जंतुघ्न औषधांचा फवारा मारताच, सूक्ष्म रोगजंतू, जसे न दिसताच, पटापट मरून जातात; तसेच, ह्या झुणका भाकरीच्या प्रसादाच्या घासासरशी, समाजमानसातील जन्मजात जातीभेदाच्या भ्रांत भावनेचे, जंतू नकळत मरून जातात. एखाद्या दहा हजार रूपये खर्चून भरविलेल्या अस्पृश्यतानिवारणाच्या व्याख्यानबाज अधिवेशनापेक्षा अवघ्या दहा रूपयांनी होणारा हा झुणका भाकर सत्यनारायणाचा सक्रिय समारंभ अस्पृश्यतानिवारणाचे नव्हे; तर, जात्युच्छेदनाचेही कार्य अधिक परिणामकारकपणे करीत आहे आणि तेही केवळ सामोपचाराने!

श्री. गद्रे हे वरील कार्य, जवळजवळ एकट्याच्याच बळावर करीत आहेत हे खरे असले तरी असे म्हणता येईल की, त्यांच्या एकटेपणाच्यामागे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव, हात देत उभा आहे. ते प्रसिद्ध संपादक आहेत. मुंबई प्रांतिक हिंदूसभेचे ते अध्यक्ष होते; परंतु, तशी पूर्वीची प्रसिद्धी वा सार्वजनिक पुण्याई गाठी नसलेल्या, कोणाही सामान्य पण सत्प्रवृत्त नि निर्धाराच्या, नागरिकाला सुद्धा, तो अगदी एकटा असला तरी, अस्पृश्यतानिवारणाचो कार्य, ह्या निर्बंधाची प्रत्यक्ष बजावणी, पुष्कळशी कशी करता येते; त्याचेही एक उदाहरण देऊन ही सद्य:स्थितीची पाहणी संपवू. इतर जिल्ह्यांप्रमाणेच, ठाणे जिल्ह्यातही, न्हावी लोक पूर्वास्पृश्यांची, श्मश्रू करीत नसत. स्वत:सच तो अधर्म वाटे; किंवा लोकनिंदेची धास्ती किंवा जातगोत वाळीत टाकतील म्हणून. पण हा निर्बंध संमत होऊन सात-आठ महिने झाले तरी, न्हावी असा, पूर्वास्पृश्यांची श्मश्रू काही करीना! हे पाहून अनगाव येथील श्रीयुत यशवंतराव लेले ह्या गृहस्थांनी, ह्या प्रकरणापुरती तरी ह्या निर्बंधाची प्रत्यक्ष बजावणी करण्याचे ठरविले. आजुबाजूच्या खेड्यातील न्हावी मंडळींना, नव्या निर्बंधाप्रमाणे, जन्मजात अस्पृश्य असे कोणालाही उल्लेखून केवळ त्यासाठीच त्याची श्मश्रू करण्यास नाकारणे हा दंडनीय अपराध आहे, हे त्यांनी बजाऊन सांगितले; दुसरीकडे पूर्वास्पृश्यांना आपला नवा अधिकार बजावण्यास उद्युक्त केले. शेवटी, त्या गावच्या न्हाव्यांकडून प्रत्येकी दोन पूर्वास्पृश्यांची दाढी करवून किंवा केस कापवून घेतले. पहिल्या दिवशी, 'जातीवंत' न्हावी, जेव्हा 'जातीवंत' अस्पृश्यांची श्मश्रू करू लागले; तेव्हा ते कौतुक पाहण्यास गारुड्याच्या खेळाभोवती जमतात तसे, अशिक्षित

सुशिक्षितांचे संमिश्र थवे, भोवती जमले होेते. निदान आणखी दोन एक महिने तरी हा कार्यक्रम चालविण्याचा श्री. लेले यांचा बेत आहे.

वरील उडत्या पाहणीतील घटना नि प्रयत्न हे शितावरून भाताची परीक्षा करता यावी; ह्यापुरतेच उल्लेखिलेले असल्यामुळे, त्यावरून उभ्या भारतातील आजची, अस्पृश्यतेच्या संबंधीची परिस्थिती कशी आहे ते स्पष्ट होईल. तशा प्रकारचे अनेक प्रसंग हिंदुस्थानावर घडताहेत. ह्या अस्पृश्यतोच्छेदक निर्बंधाची, बजावणी करण्याचे असे सांस्थिक किंवा वैयक्तिक प्रयत्नही अनेक ठिकाणी चालू आहेत.

अस्पृश्यता दंडनीय ठरविणाऱ्या, ह्या निर्बंधाची बजावणी कशी करावी त्याविषयी काही सूचना वरील पाहणी करतानाच, ठिकठिकाणी केल्या आहेत. ह्या एका लेखात, निर्बंधबजावणीच्या देशव्यापी कार्यक्रमाची स्फुटशः (तपशीलवार) फोड करणे; अशक्य नि अनावश्यक आहे. तथापी त्या कार्यक्रमाच्या सर्वसाधारण स्वरूपाविषयी नि धोरणाविषयी, काही मूलभूत सूचना तेवढ्या खाली देत आहोत.

### २५.२.५ अस्पृश्यतोच्छेदक, निर्बंधाच्या बजावणीच्या कार्यक्रमाची रूपरेषा

वरील प्रस्तुत परिस्थितीच्या पाहणीवरून, हे उघड होत आहे; की, अस्पृश्यतेचा नायनाट करण्यासाठी, जे प्रयत्न होत आहेत; ते अगदी तुटपुंजे आहेत. दुखणे डोंगरास नि औषध शिंपीत! दोन चार वर्षात जर ह्या दुष्ट रूढीची राष्ट्रीय मानसाच्या पाताळापर्यंत खोल गेलेली चिवट पाळेमुळे खणून काढावयाची असतील; तर, ते कार्य पार पाडण्यास एक देशव्यापी नि झंझावती आंदोलनच उभारले पाहिजे!

### २५.२.६ अस्पृश्यतानिवारक आंदोलनाचे क्षेत्र

आजपर्यंत ज्यांना जन्मजात अस्पृश्य म्हणून मानले गेले त्यांना स्पृश्यांच्या श्रेणीत आणून सोडणे स्पृश्य नागरिकांचे जे सामान्य अधिकार, उत्तरदायित्वे (जबाबदाऱ्या) नि कर्तव्ये आहेत त्या सर्वांचे, त्या पूर्वास्पृश्यांना समान भागीदार करणे, अस्पृश्य म्हणनू कोणतीही हीनता त्यांच्यावर न लादणे, थोडक्यात म्हणज 'अस्पृश्य' शब्दातील 'अ' तेवढा पुसून टाकून त्यांचे स्पृश्य करून सोडणे, इतकेच काय ते या अस्पृश्यतोच्छेदक आंदोलनाचे क्षेत्र आहे. म्हणूनच, अस्पृश्यतानिवारण आणि दलितोद्वार किंवा अस्पृश्यतानिवारण आणि जन्मजात जातीभेदोच्छेदन ही दोन निरनिराळी कार्ये समजली पाहिजेत. ती सर्वच कार्ये सत्कार्ये असली आणि त्यांना पार पाडण्यासाठी आम्ही कितीही सोत्कंठ असलो तरीही त्यंाची नसती सांगड अस्पृश्यता निवारणाच्या आंदोलनाशी घातली असता, नसती गुंतागुंत नि असंतोष निर्माण होऊन ती दोन्ही कार्ये अधिक अवघड होती. उदाहरणार्थ शाळा, महाशाळातून, पूर्वास्पृश्य विद्यार्थ्यांना स्पृश्यांप्रमाणेच समानतेने प्रवेश मिळाला की त्यापुरते अस्पृश्यता निवारण्याचे कार्य संपले. मग, त्या पूर्वास्पृश्य विद्यार्थ्यांना शुल्क, पाट्या, पुस्तके, शिष्यवृत्त्या प्रभृती प्रकरणी विशेष सवलती मिळालेल्या असोत वा नसोत. कारण हा दुसरा प्रश्न दलितोद्धाराचा वा शिक्षणप्रसारक चळवळीचा आहे. काही स्पृश्य जातींची मुलेही, आजच्या काही अस्पृश्य मुलांसारखीच शिक्षणात मागासलेली, नि शाळेचा व्यय न झेपण्याइतकी दरिद्री. मुलाला शाळेत

मज्जाव न होता तो स्पृश्य म्हणूनच शाळेत घेतला गेला की, पुढे त्याला जी सवलत वा साहाय्य मिळेल, ते त्या दलित वा दरिद्री स्पृश्य मुलासच मिळेल. एक स्पृश्य मुलगा म्हणूनच मिळेल. तसेच सार्वजनिक विहिरींवर, पाणवठ्यांवर कोणत्याही नागरिकास, तो, जन्मजात अस्पृश्य एवढ्याच कारणासाठी, पाणी भरण्यास मज्जाव झाला नाही की, अस्पृश्यतेचा प्रश्न मिटला. पण, ''जोवर त्याच्या हातचे पाणी इतर सर्व लोक पीत नाहीत तोवर अस्पृश्यता गेली'' असे, आम्ही समजणार नाही. असा अडाणीपणाचा त्रागा कोणी करू लागला, तर तो त्रागाच काय तो ठरेल. स्पृश्यही, एकमेकांच्या हस्ते जातपातींच्या समजुतीमुळे पाणी पीत नाहीत. तो प्रश्न जातीभेदोच्छेदनाच्या कक्षेत पडतो. अस्पृश्यतानिवारणाच्या कक्षेत नव्हे.

अशीच एक मूलभूत चूक घटनेत झालेली आहे. ''आज अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे.'' म्हणून आरंभीच घोषणा केल्यानंतर पुढे जे राज्यघटनेत सांगितले आहे की, आणखी दहा वर्षेपर्यंत, 'अस्पृश्य जातींना' अशा सवलती देण्यात येतील, तो वदतो व्याघात होतो. जर 'आज अस्पृश्यता नष्ट झाली' तर उद्यापासूनसुद्धा 'अस्पृश्य जात' अशी उरणार कशी? १० वर्षे, त्या 'अस्पृश्य जातींना', अस्पृश्यच लेखून, वरच्या शापाला उःशाप द्यावयाचा की काय? स्पृश्यांतही तशाच मागासलेल्या, दरिद्री, अशिक्षित, जाती आहेत. त्यांनाही सवलती हव्यात. त्यांच्यातच ह्या अस्पृश्यतेपासून आज मुक्त झालेल्या जातींचे परिगणन करून, त्यांच्या सवलती त्यांना देण्यात याव्या. त्यांना सवलती द्याच; पण स्पृश्य म्हणून द्या. अस्पृश्य म्हणून नव्हे. अर्थात, ह्या सवलती मिळोत ना मिळोत, आजच्या अस्पृश्यांना स्पृश्यत्वाचे अधिकार मिळाले की, अस्पृश्यतानिवारणाचे कार्य उरकले.

### २५.२.७ सरकारी स्वतंत्र विभाग

अस्पृश्यतोच्छेदक आंदोलनाचे कार्यक्षेत्र वर दिल्याप्रमाणे, आखून घेऊन ह्या निर्बंधाची त्याप्रमाणे कडक बजावणी करण्यासाठी प्रमुख नि अधिकृत प्रयत्न असा सरकारनेच केला पाहिजे. बिहार सरकारने, असा उपक्रम केल्याची बातमी प्रसिद्ध झालेली आहे. त्या सरकारने घटनेप्रमाणे, ह्या अस्पृश्यतानिवारक कार्यासाठी एक स्वतंत्र अधिकारी तर नेमलाच आहे. परंतु एक स्वतंत्र विभागही उघडून त्याच्या हाती दिला आहे. त्या विभागात शंभर प्रचारक पगारी नेमून दिले. त्यांना सेवक म्हणावयाचे. साधारणतः एक दोन तालुक्यांएवढा भाग त्या प्रत्येक सेवकाकडे देऊन त्या भागात अस्पृश्यतोच्छेदक निर्बंधाची प्रत्यक्ष बजावणी करण्याचे आणि अवश्य तेव्हा पूर्वास्पृश्यांना संरक्षण देण्याचे दायित्व सोपविलेले आहे. जर ही बातमी खरी असेल तर, प्रत्येक प्रांतिक सरकारने असा अस्पृश्यतोच्छेदक निर्बंधाची कार्यवाही करणारा विशेष विभाग तत्काल काढावा. अस्पृश्यांना स्पृश्यांकडून स्पृश्यत्वाचे अधिकार देण्यासाठी ह्या सरकारी प्रचारकांनी आपण होऊन प्रयत्न करावा. त्यातही त्यांचे विशेष कर्तव्य म्हणून त्यांनी अस्पृश्यांमध्येही जे खालच्या जातीचे अस्पृश्य असतील - जसे आपल्याकडे धेड, भंगी, ढोर इ.- त्यांना सांगाती घेऊन जे 'वरच्या जातीचे' अस्पृश्य समजले जातात त्या महारचांभारांच्या वस्तीतील उपाहारगृहात, देवालयात, शाळांत त्यांच्या पाणवठ्यावर नेऊन त्यांच्या त्यांच्यातील अस्पृश्यता मोडून काढावी. कुठेही अशा प्रकरणी, स्पृश्यास्पृश्यात संघर्ष होण्याचा संभव दिसताच या सरकारी प्रचारांनी आपण होऊन तिथे जावे. आगळीक स्पृश्यांची असो की

अस्पृश्यांची असो त्याविषयी त्या पक्षास शासन करावे; आणि न्याय्य पक्षास संरक्षण द्यावे. पण काही झाले तरी, अस्पृश्यांना स्पृश्यत्वाचे अधिकार, उपभोगु देण्यात अडचण म्हणून देऊ नये. प्रत्येक जिल्ह्यात अशी न्याय्य पण कडक बजाबणीची दोन तीन उदाहरणे घडताच त्या बातमीमुळेच इतरत्र सामोपचाराने हे प्रश्न आपोआप सुटू लागतील. प्रसिद्धी विभागाने अशा चळवळीच्या बातम्यांना प्रसिद्धी द्यावी.

आमच्या सनातनी बंधूंची एखाददुसरी संस्था सोडली तर इतर बहुतेक मोठमोठ्या राजकीय वा सामाजिक संस्था ह्या अस्पृश्यतेचा नायनाट करण्यास उत्कंठित आहेत. विशिष्ट अशी राजकारणादिक कार्ये करीत असताही त्यांना अस्पृश्यतोच्छेदक निर्बंधाची बजावणी करण्याचे हे कार्यही हिरिरीने करीत राहणे सहज साध्य आहे. इतकेच नव्हे तर इतक्या सहजपणे पार पाडता येणारे असताही इतक्या राष्ट्रीय महत्त्वाचे असलेले हे विधायक कार्य पार पाडण्यासाठी देशव्यापी आंदोलन करणे हे त्यांचे एक कर्तव्यच आहे. कॉंग्रेस, हिंदूमहासभा, रा. स्व. संघ, आर्यसमाज, शेड्युल्डकास्टस फेडेरेशन, डिप्रेस्ड क्लासेस लीग, समाजवादी पक्ष प्रभृती पक्षांच्या शाखा हिंदुस्थानभर पसरलेल्या आहेत. त्यांच्या प्रत्येक शाखेला त्यांनी आज्ञा सोडावी की, त्या त्या शाखेच्या टापूत इतर पक्षांच्या सहकाऱ्याने, नाही तर ज्याच्या त्याच्या दायित्वावर अस्पृश्यांना स्पृश्यतेचे अधिकार देण्यासाठी त्यांनी संघटित नि सक्रिय ठाव द्यावा. त्याचा सर्वसाधारण कार्यक्रम म्हणजे याच लेखात वर दिग्दर्शिलेला महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघाचा जो आहे तो. ह्या सर्व संस्थांच्या शाखांनी तेवढा नि तसा कार्यक्रम जरी गावोगाव आपापल्या टापूत एक वर्षभर सतत नि धडाडीने आचरिला तरी हिंदुस्थानभर अस्पृश्यतेची पाळेमुळेसुद्धा उखडली जाऊ  शकतील. त्यासाठी नवीन एखादी संस्था वा संघटना उभारण्यात शक्तीचा नि धनाचा व्यर्थ व्यय करण्याची काही एक आवश्यकता नाही. आहेत ह्याच संस्थांनी हे कार्य पार पाडले पाहिजे. त्यांनीही हे कार्य करताना अस्पृश्यांतील आज पुढारलेल्या जातींनाच तेवढे हाताशी धरून चालणार नाही हे विसरू नये. विशेषतः मद्रास प्रांतातील चेरुमा, पलिया प्रभृती जे अस्पृश्य आहेत त्यांना भंगी, डोम, ढोर प्रभृती आपल्या इकडील जे आहेत त्यांना म्हणजे प्रत्येक ठिकाणी ‘खालच्यातील खालची’ म्हणून जी अस्पृश्य जात असेल तिला हात देऊन, वर उचलून, स्पृश्यत्वाचे अधिकार जो देववील तोच खरा समदर्शी नि दूरदर्शी सुधारक!

२५.२.८ समाजहितकारक कोणताही धंदा हीन नाही; पण तो सोडलात तरी राग नाही.

अस्पृश्यता निवारण्याच्या ह्या कार्यी संघर्ष घडण्याची जी कारणे आहेत त्यात अस्पृश्य जाती आपला धंदा ‘हीन’ म्हणून कधी कधी तो अकस्मात सोडू पाहतात हे एक कारण असते. कुठे कुठे महार ढोरे न ओढण्याचा संप करतात. गावकरी चिडतात आणि महारांची बलुते बंद करतात, की उलट महार चिडतात! अशा ठिकाणी नवीन निर्बंधाप्रमाणे असे समजाऊन द्यावे की, समाजहितकारक असणारे धंदे कोणीही ‘हीन’ मानू नयेत. ते धंदे न सोडताही आता कोणाला अस्पृश्य समजले जाण्याची भीती उरलेली नाही. पण जर कोणाला आपला धंदा सोडायचा असलाच, तर ते व्यवसायस्वातंत्र्य त्याला मिळालेले आहे. जर महाराला ढोरे ओढायची नसली, तर त्याने तो धंदा सोडावा, पण मग जर त्या धंद्यासाठी म्हणूनच त्या गावची बलुती त्याला मिळत होती असे ठरले, सिद्ध झाले, तर गावच्या लोकांनी ती बंद केली म्हणून चिडण्याचा

हक्कही त्याला उरत नाही. रत्नागिरीस पूर्वी महारांनी एकदोन ठिकाणी असाच संप केला असता हिंदूसभेच्या स्वयंसेवकांसह आम्ही स्वतः गावची ढोरे ओढण्याचे नि सोलण्याचे काम करावयाला आनंदाने सिद्ध झालो होतो. तीच गोष्ट भंग्यांची. त्यांनी भंगीकामात कोणतीच हीनता मानू नये. ते काम करूनही ते आता स्पृश्यत्वाचे अधिकार उपभोगू शकतील. त्यांना कोणीही उपमर्दाने अस्पृश्य वा हीन म्हणेल तर ते दंडनीय होईल. पण जर कुठे भंग्यांनी कामे सोडलीच, तर समाजाने ती स्वतः करण्याची धमक धरावी, रागावू नये. म्हणजे संघर्ष पुष्कळ प्रमाणात टळतो. श्री. अप्पाराव पटवर्धन नि सेनापती बापट यांसारखी थोर मनाची माणसे नगराचे मार्ग झाडणे नि संडास साफ करणे हे मन:शुद्धीचे एक साधन म्हणून नित्यनियमाने ती कामे हौसेने करतात. गेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात स्पृश्य स्वयंसेवकांनी स्वेच्छेने सारे भंगीकाम कर्तव्य म्हणून केले.

२५.२.९ शेवटी, व्यक्तीच्या मन:क्षेत्रातून या अस्पृश्यतेच्या दुष्ट भावनेचे उच्चाटन करा!

हे काम तरी ज्याच्या त्याच्या हातचे आहे ना? स्वधर्महितासाठी, स्वराष्ट्रहितासाठी, माणुसकीसाठी प्रत्येक हिंदू स्त्रीपुरुषाने 'मी माझ्यापुरती तरी जन्मजात अस्पृश्यता पाळणार नाही' असे व्रत घेतले, नि त्याप्रमाणे आपल्या आचरणात ते आणून सोडले तरी केवढे काम होणारे आहे. या निर्बंधामुळे जातीविषयक बहिष्काराचे भय नष्ट झाले आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीला या प्रकरणी कितीतरी काम करता येईल. परवा येथील दादर भगिनी समाजाच्या एका कुटुंबवत्सल, प्रतिष्ठित नि पुढारी महिलेने आपल्या घरी सवाष्ण बोलवायची होती तेव्हा एका पूर्वास्पृश्य महिलेलाच बोलावून सपंक्त भोजन केले. अशा वैयक्तिक कृत्याचाही किती दूरवर परिणाम होतो! हिंदुसभेने महाराष्ट्रभर प्रचलविलेल्या अखिल हिंदू हळदीकुंकवाच्या समारंभाची पद्धतीही फार उपयुक्त आहे.

अशा अनेक प्रकारांनी, अनेक बाजूंनी, अनेक संस्थांनी नि असंख्य व्यक्तींनी मिळून असे देशव्यापी आंदोलन जर उभारले, तर अवघ्या दोन-तीन वर्षात भारताच्या कोनाकोपऱ्यातूनही जन्मजात अस्पृश्यतेचा मागमूस उरणार नाही. पण हे केले पाहिजे! 'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे.'

इतक्या निकराने हे सहजसाध्य काम आपण उरकून टाकले पाहिजे की, आपल्या पूर्वास्पृश्य बंधूंच्या मनात आत्मविश्वासाची नि आत्मोद्वारक्षमतेची उदंड स्फूर्ती संचरावी. त्या स्फूर्तीमुळे त्यांनी होऊनच सांगावे की, 'अस्पृश्य जाती'ला म्हणून ज्या सवलती नि विशिष्टाधिकार राज्यघटनेत आणखी दहा वर्षेपर्यंत तरी आम्हास दिलेले आहेत, ते आम्हांस नको आहेत. कारण आम्ही अस्पृश्य नाहीच. अस्पृश्य म्हणून दिलेली प्रत्येक सवलत म्हणजे आमच्या हीनतेचे एकेक प्रमाणपत्र आहे! अस्पृश्य म्हणजे मिळणारा एकेक विशिष्टधिकार म्हणजे आमची अस्पृश्यतेची दुबळी भावना आमच्यात सतत जिवंत ठेवणारे एक स्मृतिपदक आहे! आमच्या आत्मसन्मानाला बट्टा लावणारा तो विशिष्टाधिकाराचा बिल्ला आमच्या छातीवर लटकावण्यास आम्ही सिद्ध नाही. त्या कुबड्यांवाचून आम्ही आमच्या इतर स्पृश्य बांधवांप्रमाणेच स्पृश्य म्हणून प्रगती करू शकू!' हे आम्ही रागाने म्हणत नाही, तर राष्ट्रप्रेमाने, राष्ट्रहितार्थ!

अशी धीरोदात्त वृत्ती आजही आमच्या पूर्वास्पृश्य धर्मबंधूपैकी काही पुढाऱ्यांच्या मनात स्फुरत आहे हे आम्हास ठाऊक आहे. पुरावा म्हणून हा घ्या. गेल्या २१ सप्टेंबरला वऱ्हाडमधील दलित वर्गातील पुढाऱ्यांची सभा परतवाडा येथे भरली होती. वऱ्हाडातीलच नव्हे तर भारतातील दलित वर्गाच्या पुढाऱ्यांमध्येही ज्यांचे स्थान प्रथम श्रेणीत असते ते श्री. गवई हे या सभेच्या अध्यक्षपदी होते. नव्या घटनेप्रमाणे मिळणाऱ्या सवलतीसंबंधी दलित वर्गाचे धोरण काय असावे ह्याविषयी विचार चालू होता. तेव्हा अध्यक्षपदावरून श्री. गवई ह्यांनी जे भाषण केले, त्यातील एकेक शब्द लाखाचा होता. त्यांच्याच वाक्यात या लेखाचा समारोप करू. ते म्हणाले -

‘मला स्वत:ला तरी राखीव जागा नि सवलती यासंबंधी मोठासा आनंद वाटत नाही. कारण त्यामुळे आमच्या लोकांत (पूर्वास्पृश्यात) हीनपणाची भावना, न्यूनगंड उत्पन्न होतो आणि उरलेल्या हिंदू समाजापासून तुटकपणाची जाणीव कायम राहण्याला मदत होते. राष्ट्राच्या वाढीसाठी ही गोष्ट विघातक आहे. आम्ही अस्पृश्य आहोत हेच मुळात आता सर्वांनी विसरावे आणि सवलतीवर फारसा भर देऊ नये. तथापी, आपली शक्ती आपण सर्वसाधारण अशा राजकीय नि सामाजिक कार्यासाठी संघटित करावी.’

***

## २६ बौद्धधर्मस्वीकाराने तुम्हीच असाह्य व्हाल!

वर्तमानपत्रात असे प्रसिद्ध झाले आहे की, डॉ. आंबेडकर येत्या दसऱ्याच्या मुहूर्तावर नागपूरला समारंभपूर्वक बौद्ध धर्माची दीक्षा घेणार आहेत. ही बातमी खरी ठरो! कारण डॉ. आंबेडकरांनी आजपर्यंत असले अनेक निश्चय अनेक वेळा गाजावाजाने प्रसिद्ध केलेले आहेत. परंतु त्यांचा आजचा निश्चय उद्याला टिकतोच असे काही बहुधा घडलेले नाही. आता तरी हा त्यांचा आजचा निश्चय खरा ठरेल अशी आशा आहे. डॉक्टर महाशय बौद्ध संप्रदायातील नुसत्या गृहस्थी उपासकाची दीक्षा घेणार आहेत की बुद्ध भिक्षूचीच दीक्षा घेऊन मंडनादिक संस्कारपूर्वक गृहदारादी संसाराला विटल्यामुळे गृहस्थजीवन सोडून आणि कोण्या बुद्धमठात जाऊन भिक्षुव्रतास आचरणार आहेत ते काही स्पष्ट झालेले नाही, तथापी कोणच्याही प्रकारे का होईना ते बौद्ध धर्माचा अंगीकार करणार असल्यास तो निश्चय त्यांनी आता पार पाडावा. शुभस्य शीघ्रम!

हिंदुसमाजाच्या द्वेषाने सदोदित भडकत राहिलेल्या डॉ. आंबेडकरांच्या हृदयास त्यांच्या मताप्रमाणे केवळ प्रेममय असलेल्या बुद्धधर्माच्या उपदेशाने तरी शांतता मिळो, आराम पडो हीच आमची सदिच्छा आहे. म्हणून शुभस्य शीघ्रम! यापेक्षा हिंदुजगताने या वैयक्तिक गोष्टीस कोणचेही महत्त्व देण्याचे काही एक कारण नाही. अहो, जेथे प्रत्यक्ष बुद्धाने वयाची चाळीस वर्षे स्वतः त्याचा धर्मोपदेश दिला आणि त्याच्यानंतर आज २५०० वर्षे म्हणजे अक्षरी दोनसहस्र पाचशे वर्षे बौद्ध धर्माच्या गाथा, जातके, पुराणे, पीटिका ही बौद्धांची जी काही विशिष्ट मते म्हणून समजली जातात त्यांचा उपदेश करीत आली आहेत, तेथे आता भिक्षू आंबेडकरांनी त्या बौद्धमतांविषयी अधिक सांगावयाचे असे उरले आहे तरी काय? आणि त्या गेल्या २५०० वर्षांपूर्वीच्या जुनाट वचनांच्या त्यातील अर्थांना पिळून पिळून नि:सार झालेल्या अक्षरांना नि वाक्यांना भिक्षू आंबेडकरांच्या चरकातून पुन्हा एकदा पिळले तरी आणखी नवे सार असे ते काय निघणार आहे? जे काही अमृत वा विष त्या बुद्धकालीन वचनात होते ते सारे आधीच पिऊन नि पचवून हा हिंदूधर्माचा प्रचंड हिमालय अढळचा अढळपणे, विशिष्टपणे नि गरिष्ठपणे पाताळापर्यंत खोल गेलेल्या आपल्या पक्क्या पायावर आकाशापर्यंत उंच उभारलेल्या आपल्या शिखरांना मिरवीत आजही उभाचे उभा आहे.

जेथे एकदा कोटी कोटी मानव बौद्ध धर्माचे अनुयायी म्हणून म्हणवीत होते, त्या भारतात आज त्या बौद्ध धर्माचा मागमूसही जो उरला नाही तो का? त्या कारणांचा अभ्यास जोवर डॉ. आंबेडकर प्रांजलपणे करीत नाहीत तोवर पुन्हा एकदा साऱ्या भारतावर मी बुद्धाचा ध्वज हिंदूधर्माचे नावसुद्धा पुसून टाकून फडकवीणार आहे अशा ज्या वल्गना आंबेडकर करीत आहेत, त्यांच्यामुळे कोण्याही मर्मज्ञ हिंदूस लवलेश भीती वाटण्याचे ठायी हसू मात्र कोसळल्यावाचून राहत नाही.

तेव्हा डॉ. आंबेडकर ही व्यक्ती भिक्षू आंबेडकर झाली तरी त्यांचे कोणाही हिंदूस कोणचेही विशेष सोयरसुतक बाळगण्याचे कारण नाही. ना हर्ष, ना विमर्ष, जेथे बुद्धाने हात टेकले तेथे आंबेडकर कोणच्या झाडाचा पाला!

परंतु डॉ. आंबेडकर हे त्यांना बुद्धाप्रमाणे संसाराचा उबग आल्यामुळे किंवा निर्वाणपदाची सात्त्विक ओढ लागल्यामुळे बौद्धधर्म स्वीकारू पाहताहेत असे मुळीच नाही. तसे असते तर ते कोणच्याही वडाच्या झाडाखाली बसून बुद्धाप्रमाणे एकांतात तत्त्वचिंतनाने ते निर्वाणपद संपादिण्याचा यत्न करते. परंतु ते जो बौद्धधर्म स्वीकारणार आहेत ते हिंदूधर्माचे समूळ उच्चाटन करण्यासाठीच काय ते होय असे गर्जून गर्जून ते स्वतः सांगताहेत.

ह्या आपल्या उद्दिष्टासाठी आंबेडकरांनी यद्यपी साऱ्या जगास निमंत्रिले आहे की, तुम्ही सारे मानवप्राणी माझ्या मागे या नि बुद्ध व्हा. तथापी साऱ्या मानव जातीला त्यांचे ते आवाहन ऐकू जाण्याचासुद्धा लवलेश संभव नाही. फार काय त्यांची महार जातसुद्धा सारीच्या सारी त्यांच्यामागे जाण्याचाही संभव नाही. तथापी त्या महार जातीतील शक्य तितके लोक आपल्यामागे यावेत आणि त्यांच्या वाडवडिलांनी पुजलेल्या हिंदू देवदेवतांना आणि संत महंतांना पाखंड म्हणून धिक्कारून आणि त्यांच्या भजनी लागलेल्या त्या स्वतःच्या वाडवडिलांनाही मूर्खात काढून त्यांनी बौद्धधर्म स्वीकारावा यास्तव डॉ. आंबेडकर त्यांच्या वृत्तपत्रांतून नि व्याख्यानातून हिंदुधर्माची खोट्या आणि हलकट भाषेतसुद्धा निंदा करीत आहेत. आणि त्या महारांना सांगत आहेत की तुम्ही बौद्ध होताच तुमची अस्पृश्यता नाहीशी होईल. तुमच्या पायातील जातीभेदाच्या बेड्या जादूप्रमाणे गळून पडतील. तुम्ही महारांचे माणूस व्हाल. माणसांचे देव व्हाल. नियती नि निर्वाण तुमच्या घरी पाणी भरू लागेल. पण जर का तुम्ही हिंदू राहाल तर तुमची अस्पृश्यता कधीही जाणार नाही. तुम्ही ऐहिक आणि पारलौकिक नरकात पडल्यावाचून कधीही राहणार नाही. ह्या त्यांच्या गर्हणीय, अन्याय्य, असत्य नि हिंदूद्वेषी भुलभुलावणीला आज आमचे धर्मबांधव असलेले अनेक महारबंधू बळी पडण्याचा मात्र काही संभव आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या ह्या धर्मांतराला केवळ व्यक्तीविषयक स्वरूप राहिलेले नसून त्याला काहीसे सार्वजनिक स्वरूप आलेले आहे. आणि म्हणूनच आमच्या आजवरच्या महार जातीतील हिंदुधर्मबांधवांना ह्या धर्मांतराच्या धोक्यापासून सावध करण्यासाठी आणि शक्यतो रोखण्यासाठी या लेखाची चेतावणी देणे हे हिंदू आपले धर्मकर्तव्य समजत आहे.

जन्मजात अस्पृश्यतेचे आणि जातीभेदाचे उच्चाटन करण्याचे ब्रीद आम्ही प्रथमपासूनच धारण केलेले आहे. हिंदू संघटनेचे ते एक अनिवार्य उपांग आहे. पण हिंदूराष्ट्राला पोषक असणाऱ्या ह्या सुधारणा हिंदू राहूनच काय त्या शक्य होणाऱ्या आहेत आणि त्या तशा झाल्या तरच त्या सुधारणांना सुधारणा म्हणता येईल. आज अस्पृश्यता जी मरू घातली आहे ती हिंदूत्वाभिमानी सुधारकांच्या निःसीम प्रयत्नानेच होय. नगरांतून नि सुशिक्षित वर्गातून आज अस्पृश्यता बव्हंशी उखडली गेली आहे. नैर्बंधिक दृष्ट्या घटनेनेच ती निषिद्ध केलेली आहे. स्वतःस कट्टर हिंदू समजणारे सहस्रावधी हिंदुत्वनिष्ठ नेते आणि अनुयायी आज जातीभेद किंवा अस्पृश्यता मानीत नाहीत. इतकेच नव्हे तर रोटीबंदीच्या आणि बेटीबंदीच्या बेड्या प्रत्यक्ष आचरणातही तोडून टाकीत आहेत. हिंदू जगतातील आर्य समाजासारखे लक्षावधी अनुयायी असलेले अनेक मोठमोठे संप्रदाय अस्पृश्यता आणि जातीभेद मूलतःच मानीत नाहीत. अर्थात्‌हिंदू म्हटला की तो जातिभेद पाळणारा किंवा मानणारा असलाच पाहिजे किंवा हिंदूधर्माचा त्याग केल्यावाचून अस्पृश्यता कधीही जाणार नाही ही जी वटवट डॉ. आंबेडकर आजन्म करीत आलेले आहेत ती जितकी खोडसाळ तितकीच खोटी आहे. म्हणूनच

पूर्वास्पृश्यांपैकी चांभार, मांग, ढोर इत्यादी कोणत्याही जातीचा हिंदुधर्म सोडण्याचे दुष्कर्मी आंबेडकरांस पाठिंबा मिळालेला नाही आणि ज्या काही भांबावलेल्या आणि हुरळलेल्या महारांचा पाठिंबा आज त्यांना मिळू पाहत आहे तोही हे वरील सत्य त्यांच्यापुढे ठामपणे मांडले असता ढासळल्यावाचून राहणार नाही. आमच्या महारबंधूंनी हे पक्के ध्यानात ठेवावे की जर ते हिंदू राहतील तरच त्यांची अस्पृश्यता अधिक सुलभपणे नाहीशी होईल आणि त्यांना त्यांच्या ह्या हिंदुबांधवांच्या सहनशक्तीस पारखे होऊन पडावे लागणार नाही. त्यामुळे त्यांची ही शक्ती राष्ट्रशक्तीच्या उपांगभूत अक्षलीच्या बळाने वाढणारी आहे. हिंदुराष्ट्रावर आज त्यांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. हिंदू धर्मातून डॉ. आंबेडकरांच्या मागे लागून आमचे महार बंधू जर बौद्ध होऊन फुटून निघाले तर त्यांच्या आज आधीच मूठभर असलेल्या महार जातीचेही तुकडे होतील. ते महार डॉ. आंबेडकरांच्या सांगण्यावरून बौद्ध झाले तरी ते होणार होणार म्हणजे किती? सरड्याची धाव कुंपणापर्यंत. फार फार तर एक लक्ष महार बौद्ध झाला असे समजा. तेही गावगन्ना दहा पाच विखुरलेले. त्यामुळे ह्या कोटी कोटी जनसंभूत हिंदू राष्ट्राला कोणचीही घातक दुर्बलता येण्याचा लवलेश संभव नाही. परंतु जे ह्या हिंदू राष्ट्रातून फुटून निघतील आणि बुद्ध होतील ते मात्र इतके अल्पसंख्य नि तिरस्कृत होऊन पडतील की मागे बौद्धांची संख्या कोटीकोटींनी मोजता येणारी असूनही पूर्वीप्रमाणे त्यांची दुर्गती झाल्यावाचून राहणार नाही. गोमीचे दोन पाय गळले तरी गोम लंगडी होत नाही पण ते गळून गेलेले दोन पाय मात्र निर्जीव होऊन पडतात.

हिंदू राहून अस्पृश्यता आणि जातीभेद कधी नष्ट होणार नाही ही आंबेडकरांची थाप वर दाखविल्याप्रमाणे जशी खोटी आहे, तशीच तुम्ही बौद्ध झालात की तुमची अस्पृश्यता खेड्यापाड्यातूनसुद्धा तत्काळ नाहीशी होईल, जातीभेद मरून जातील. ही डॉ. आंबेडकर मारीत असलेली दुसरी थापही समूळ खोटी आहे. त्यांच्या कोणच्याही अनुयायाने क्षणभर शांतपणे विचार करावा की, आज ज्या खेड्यात काही अस्पृश्यता उरलेली आहे त्या खेड्यात जर मी गेलो आणि त्या अडाणी लोकांच्या शाळेत जाऊन म्हणालो की आता मी बौद्ध झालेलो आहे. माझ्या मुलाला शाळेत सरमिसळ बसू द्या. तर ते खेडवळ माझ्या मुलाला तेवढ्यासाठीच काय ते शाळेत सरमिसळ बसू देतील का? किंवा मी गावच्या विहिरीवर गेलो आणि म्हटले की मी आता बौद्ध झालो आहे. मी आत्म्याला मानीत नाही, मी ईश्वराला मानीत नाही, मी हिंदू धर्मही मानीत नाही. तर तेवढ्यामुळे ते गांवकरी मला विहिरीवर पाणी भरून देतील का? ते इतकेच विचारतील की तू महार आहेसच ना. तर मग विहीर बाटवू नकोस! पुष्कळ महर ख्रिस्ती झाले. मुसलमान झाले. त्यांची काय स्थिती झाली? खेड्यापाड्यातून ख्रिस्ती महार, मुसलमान महार म्हणून त्यांना नवीन नाव काय ते मिळाले. उलट हिंदू महारांनीसुद्धा त्यांच्यावर बहिष्कार घातला. त्रावणकोरसारख्या ठिकाणी ख्रिस्ती अस्पृश्यांना शाळेत सरमिसळ बसू देत नाहीत. चर्चमध्येसुद्धा त्यांना निरनिराळ्या कोपऱ्यात बसविण्यात येते. फार काय स्वत:ला बौद्ध म्हणवून घेणाऱ्या सिंहलद्वीपातील खेडेगावातही बौद्ध अस्पृश्यांना शाळेत नि विहिरीवर बहुधा बहिष्कृत म्हणूनच आजही मानण्यात येते. प्रत्यक्ष तेथे जाऊन पाहा.

पण त्याहूनही विशेष हे की बौद्ध झाले तरी स्वतः महारांच्या मनातील ते ज्या चांभार, मांग, ढोर इत्यादी लोकांना आज अस्पृश्य मानीत आहेत त्यांना खालच्या जाती म्हणून

समजत आहेत, तो जातीविषयक अहंकार एका दिवसात गळून जाईल असे ह्या बौद्ध होणाऱ्या महारांना तरी शपथेवर सांगता येईल का? मुळीच नाही. ख्रिस्ती झालेले महार ख्रिस्ती झालेल्या चांभारांना किंवा ढोरांना आपल्या मुली देत नाहीत. त्यांच्या घेत नाहीत. केवळ धर्मांतराने, हिंदूचा बौद्ध झाल्याने महारांची अस्पृश्यता जाणार नाही, किंवा स्वतः ते महार ज्यांना अस्पृश्य समजतात त्या मांग, ढोरांना समव्यवहार्य समजू लागणार नाहीत.

अहो, प्रत्यक्ष बौद्धांच्या अशोक नि हर्षासारख्या बौद्ध सम्राटांच्या काळातसुद्धा चांडालादिकांना त्या बौद्ध सम्राटांनीच अस्पृश्य म्हणून गावाबाहेर हुसकून दिलेले असे. पण ते ऐतिहासिक विवरण आम्ही सध्यापुरते बाजूस सारतो.

सारांश असा की आजच्या डॉक्टर आंबेडकरांच्या किंवा होऊ घातलेल्या उद्याच्या भिक्षू आंबेडकरांच्या जाणीव थापांना किंवा प्रामाणिक वल्गनांना बळी पडून आमच्या महार धर्मबांधवांनी आपला हिंदुधर्म सोडून ये. आपल्या स्वतःच्या पन्नास पिढ्यांच्या हिंदू पूर्वजांना स्वतःच पाखंड्यात, पतितांत किंवा मूर्खात काढू नये. आज कोणचाही महार बौद्ध झाला तरी त्या दिवसाची ती गाजावाजाची उर्मी तो दिवस मावळताच ओसरून जाईल.

उद्या तो त्याच्या झोपडीत जसा पूर्वी होता तसाच बसलेला त्याला स्वतःला आढळेल. तो बौद्ध झाला म्हणून त्याच्या अर्ध्या भाकरीची पूर्ण भाकरी झालेली त्याला आढळणार नाही. जी तुकारामसारख्या साधुसंतांची नीतिवचने त्याचे वारकरी बंधू गात आहेत, त्यापेक्षा एकही नवे नीतिवचन त्याला बैाद्धांच्या भारुडात शिकण्यासारखे आढळणार नाही. किंवा जे हिंदू त्यास काल अस्पृश्य समजत होते ते त्याला स्पृश्य समजणार नाहीत. उलट आज अस्पृश्य असले तरी ते आपले हिंदूधर्माचे बांधव आहेत, त्यांना आपण समानतेने आणि स्वधर्मप्रेमाने धर्मबंधू म्हणून अहिंदूपेक्षा जवळ केले पाहिजे ही जी लज्जा आज हिंदूसंघटनाच्या नि मानव्याच्या उपदेशाने हिंदूजगतात बळावत चालली आहे आणि जीमुळे आज अस्पृश्यता पूर्वीपेक्षा शतपटीने उणावत आहे, रोटीबेटी बंदीसुद्धा तोंडण्याइतका जातीभेद मरू घातला आहे - ही जाणीव मात्र दुखावल्यावाचून राहणार नाही. महार हिंदू आहेत तोवरच त्यांची अस्पृश्यता स्पृश्यांच्या नि त्यांच्याही मनातून अधिक सुलभतेने आणि अधिक शीघ्रतेने नाहीशी होण्याचा उत्कट संभव आहे, नाहीशी होतच आहे. हिंदू समाजातून अस्पृश्यतेचाच काय पण जन्मजात जातीभेदाचाही संपूर्ण नायनाट करण्याची आम्ही संघटनी हिंदूनी प्रतिज्ञा केलेली आहे. हिंदूत्वाच्या ध्वजाखाली आपण सारे उभे आहोत तोवर धर्मप्रेमाच्या ममतेने आपण अधिक संघटित होऊ, बलिष्ट होऊ. पण आपल्यापैकी जर कोणी त्या धर्मप्रेमास लाथाडून धर्मांतराच्या खड्ड्यात उडी टाकू पाहील तर तो ह्या सामूहिक हिंदू राष्ट्रशक्तीला आचवून स्वतःच लुळापांगळा झाल्यावाचून राहणार नाही.

- (हिंदू दि. १-१०-५६)

***

## २७बौद्धधर्मातही भाकडकथा, भाबडेपणा, भंगड आचार नि अनाचार इत्यादींचा बुजबुजाट झालेला आहे

होतकरू भिक्षू आंबेडकरांनी बौद्ध धर्म हा साऱ्या जगातील श्रेष्ठ धर्म आहे नि त्यात कोणत्याही भाकडकथांचा पूर्वजन्म, पुनर्जन्म, देव, ईश्वर, आत्मा, इत्यादी ब्रह्मजालाचा पसारा लवलेशही आढळत नसून तो निर्भेळ नि प्रखर प्रत्यक्षावलंबी बुद्धिवादावरच काय तो आधारलेला आहे, अशा वल्गना त्यांच्या जनता प्रबुद्ध करण्याचा नि त्याच्या शिष्यांकडून करविण्याचा सपाटा चालविला आहे. जर ते त्याचे सारे म्हणणे खरे असते तर आम्हासही आनंदच वाटला असता. कारण कोणच्याही धर्मातील अनुयायांमध्ये भाबडेपणा, धर्मभोळेपणा, तर्कशून्यता, बुवाबाजी, असमानता इत्यादी दोष जेथे जेथे आढळतात त्या त्या दोषाचा निषेध करण्यास - मग ते हिंदू लोकांमध्येही आढळत असले तरी - आम्ही केव्हाही मागे-पुढे पाहिलेले नाही. परंतु आज तरी अशी वस्तुस्थिती आहे की आम्ही हिंदुधर्मीय काय, ख्रिश्चन धर्मीय काय, मुसलमान धर्मीय काय, बौद्ध धर्मीय काय किंवा वरील कोटी कोटी लोक ज्यास अनुसरत आहेत त्या मोठमोठ्या धर्मांवाचून जे इतर अल्पसंख्य धर्म आज जगात प्रचलित आहेत त्यांच्या अनुयायांतही त्या त्या धर्मातील उदात्त नि मनुष्य जातीस हितावह असलेल्या तत्त्वांप्रमाणे किवा आचारांप्रमाणे अनेक भाकडकथा नि भाबड्या समजुती रूढ झालेल्या आढळतात. सर्वसामान्य लोकच नव्हेत तर त्या धर्मातील आचार्यही अनेक तर्कशून्य भाकडकथांना अगदी गृहीत सत्याप्रमाणेच (Axioms) चिकटून राहिलेले असतात. मुस्लिम धर्मासारख्या काही धर्माच्या अनुयायात तर धर्मभोळेपणाच नव्हे तर अनेक प्रसंगी धर्मवेडेपणही पराकोटीला पोचलेला आढळतो. जर ह्या दोषांचा निषेध करायचा तर आमच्या होतकरू भिक्षू आंबेडकरांनी बौद्ध धर्मसुद्धा सगळ्याच धर्मातील धर्मभोळेपणाचा, धर्मवेडेपणाचा नि भाकडकथांचा निर्भेळ बुद्धिवादाच्या दृष्टीने निषेध करावयास हवा होता. तसे त्यांनी केले असते तर त्यांच्या तशा नि:पक्षपाती टीकेचा आम्ही योग्य तो गौरवच केला असता.

परंतु हिंदूधर्माच्या द्वेषाने पछाडलेल्या डॉक्टर आंबेडकरांनी येता-जाता केवळ हिंदुधर्मावरच काय तो शिव्याशापाचा वर्षाव चालविलेला आहे. जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे बौद्ध धर्म हाच इतर सर्व धर्मापेक्षा निर्दोष, बुद्धिनिष्ठ आणि सर्वतोपरी श्रेष्ठ आहे तर त्यांनी ख्रिस्ती नि मुसलमान धर्माच्या अनुयायांतही ज्यांना ते हिंदूधर्मातील भाकडकथा किंवा दुष्ट आचार म्हणून निंदिताहेत तशाच प्रकारच्या चालू असलेल्या दोषांसाठी तसेच कडाडून आक्रमण करावयास हवे होते. उदाहरणार्थ मुस्लिम आणि ख्रिश्चन या दोन्ही धर्मात गुलामगिरी मनुष्याला पशूहूनही हीनतम लेखणारी क्रूर प्रथा त्या त्या धर्माच्या संस्थापकांनीही त्यांच्या धर्मग्रंथात धर्म्य मानलेली आहे. पण अशा दोषांविषयीही मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्मास एका शब्दानेही दोष देण्यास त्यांची लेखणी किंवा जीभ सहसा धजत नाही. ती तेथे एकदम लुळी पडते. कारण उघडच आहे, भीती! तशा त्या समर्थनीय निंदेसाठीसुद्धा ते ते समाज आंबेडकरांची धिंड काढण्यास सोडते ना! परंतु हिंदूधर्माच्या अनुयायांत जी धार्मिक सहिष्णुता केव्हा केव्हा तर सोसाळूपणाच्या दोषार्ह मऱ्यादेपर्यंत आढळून येते त्यामुळे हिंदू जगतातील धर्मतत्त्वांविरुद्ध, धर्माचारांविरुद्ध कोणीही वाटेल तशी जीभ सैल सोडली तरी तिकडे हिंदू लोक सहसा लक्ष देत

नाहीत. 'कुत्ता भुंकता है भुंकने दो' या म्हणीप्रमाणे तशा निर्लज्ज आक्षेपकांकडे उपेक्षाबुद्धीने पाहण्याची हिंदूंची साधारणतः प्रवृत्ती असते. तिचा अन्याय्य लाभ घेता येत असल्यामुळे आंबेडकरांच्या वृत्तपत्रातून नि त्यांच्या भाषणांतनू केवळ हिंदुधर्माची हवी तशी कुचाळकी ते करीत आले आहेत. आणि आमच्या बौद्धधर्मात मात्र ह्या हिंदूंच्या पुराणातील, आचारातील, धर्मभोळेपणातील लवलेशही सापडत नसल्याने तो बौद्धधर्म महारांनी स्वीकारावा, सगळ्या मानव जातीने स्वीकारावा म्हणून दवंडी पिटीत आहेत.

हिंदुधर्मातच नि समाजात तेवढ्या भाकडकथा, भाबडेपणा नि अनाचार यांचा बुजबुजाट झालेला आहे आणि बौद्ध धर्म आणि समाज मात्र त्यांच्यापासून अगदी अलिप्त आहे असा असत्य प्रचार आंबेडकरी पक्षाने एकसारखा चालविला असता आणि रामकृष्णादिकांची निंदा हलकट भाषेतसुद्धा करण्यास मागे-पुढे पाहिले नसता त्यांच्या त्या अपप्रचाराचा कडक समाचार घेण्यास आज चालू असलेल्या शेकडो मोठमोठ्या हिंदुपत्रांतून जे कोणी पुढे आले नाही त्याचे कारण बहुसंख्य हिंदू समाजाच्या अंगात मुरलेली ही सोसाळू वृत्तीच होय. शिव्या देणाऱ्याला उलट अरे कारे करणे हे असभ्यपणाचे लक्षण असून सभ्यपणा म्हणजे खाली मान घालून शिव्या ऐकत शांतपणे बसणे होय असे हिंदूतील अनेक शिष्टांना वाटते. परंतु आम्हांस हा असला सभ्यपणा हा बुळगेपणाचा नि दुबळेपणाचाच काय तो प्रतिशब्द वाटतो. आम्ही ज्या गुरूचे शिष्य आहोत त्या श्रीकृष्णाच्या '**ये यथा मां प्रपद्यन्ते ताम्स्तथैव भजाम्यहम् ।**' ह्य नीतिसूत्रासच आम्ही न्याय्य नि धर्म्यही समजतो.' **यथा यक्षस्तथा बलिः।**' या न्यायाने आंबेडकरी पक्षाच्या वरील खोडसाळ टीकांचा समाचार घेण्यात आणि त्यांच्या बौद्धस्तुतीतील भोंदूपणा उघडकीस आणण्यास आम्ही कचरणार नाही. बौद्धधर्म हा केवळ बुद्धिनिष्ठेवर आधारलेला आहे, या आंबेडकरांच्या थापेबाजीला बळी पडणाऱ्यांना म्हणजे विशेषतः आमच्या आजही हिंदू असलेल्या महार बंधुंना बौद्ध धर्माची आणि बौद्ध जगताची माहिती जवळजवळ नाहीच म्हटले तरी चालेल. शेळ्यात लंगडी गाय प्रधान तसेच बऱ्याच अशिक्षित नि मागासलेल्या लोकांना आंबेडकर दाखवितील तसेच बौद्ध धर्माचे रूप आहे असे वाटणे साहजिक आहे. ह्यासाठी आम्ही जगातील लाखो बौद्धांच्या धार्मिक समजुती, आचार, बौद्ध पुराणातील नि पीटिकांतील बुद्धीहीनपणा इत्यादी उपांगांपैकी केवळ वानगीसाठी काही मोजक्या गोष्टी खाली देत आहो. आंबेडकरांच्या पाठी हुरळून धावण्याच्या आधी आमच्या महार प्रमुख हिंदू बांधवांनी प्रथमतः बौद्ध धर्माची ही दुसरी ओंगळ बाजूही अवश्य अभ्यासावी. होतकरू भिक्षू आंबेडकरांनाही आम्ही असे हटकून विचारतो की ज्या गोष्टीसाठी तुम्ही हिंदुधर्माची खोटीनाटी निंदा सतत करीत आला आहात तशाच प्रकारच्या खाली दिलेल्या बौद्ध धर्माच्या भाकडकथा नि तुमची कृत्ये ज्या बुद्धीनिष्ठतेचा तुम्ही डौल मिरविता त्या बुद्धिनिष्ठेच्या कसोटीवर कशी समर्थिता ते सांगा पाहू.

१) कर्ण हा कुंतीच्या कानातून जन्म पावला ही दंतकथा सांगून आंबेडकरी प्रचारक हिंदूंच्या गुणांची टिंगल करतात. परंतु बौद्धपुराणात स्वतः बुद्धाच्याच जन्मासंबंधी जी खालील कथा दिलेली आहे ती मात्र ते का दडवून ठेवतात? बौद्धांतील लाखो लोकांची अशी श्रद्धा आहे की, गौतम बुद्धाचा जन्म अतिमानुष रीतीने झाला. बौद्ध पुराणे सांगतात की बुद्धाच्या आईला म्हणजे राणी मायादेवीला तिच्या पंचेचाळिसाव्या वर्षी कोणाच्याही पुरुषाचा संपर्क झाला

नसताही गर्भ राहिला. जगत कल्याणार्थ तुझ्या पोटी दैवी तेजाने हा गर्भ राहिलेला आहे, अशी आकाशवाणी तिने ऐकली. तिला कोणतीही प्रसुतिवेदना वा क्लेश न होता या दैवी गर्भापासून जो पुत्र झाला तोच गौतम हा होय. गौतमाच्या जन्माच्या वेळी अनेक चमत्कार घडले. आंधळ्यांना दिव्यदृष्टी प्राप्त झाली. त्याचे दर्शनास जावे म्हणून लंगड्या लोकांचे पाय खडखडीत बरे झाले. एका दिव्य ऋषीने राजगृही येऊन भविष्य काळविले की हे मूल एक अलौकिक पुरुष होईल.

बुद्धीनिष्ठेचा टेंभा मिरविणारे आंबेडकर नि त्यांचे अनुयायी ह्या भाकडकथेवरही विश्वास ठेवणार आहेत का? आणि अशा काही भाकडकथा बौद्ध लोकांतही धार्मिक कथा म्हणून विश्वासिल्या जात आहेत एवढ्यासाठी बौद्धधर्म म्हणजेच एक भाकडकथा आहे असे म्हणतील काय?

२) स्वतः डॉ. आंबेडकर येता जाता मोठ्या डौलाने सांगतात आणि त्यांचे अनुयायी ते एक मोठे शतकृत्य समजतात की, त्यांनी एकदा हिंदूंचा जो एक अभिजात धर्मग्रंथ ती मनूस्मृती जाळली होती. कोणत्याही धर्मपुस्तकाची एखादी प्रत जाळून टाकणे ही वस्तूतः बर्बरता आहे. ते अपकृत्य होय. शतकृत्य नव्हे. परंतु आंबेडकर ज्या अर्थी त्याला एक शतकृत्य म्हणून स्वतःच मिरवीत असतात त्याअर्थी त्यांना हेही मानावे लागेल की जेव्हा मागे मुसलमानांनी बौद्धांचा एकच ग्रंथ नव्हे तर सहस्रावधी ग्रंथ, नालंदा विहारातील बौद्धधर्मीय ग्रंथालयेच्या ग्रंथालये जाळली, धम्मपदांना नि त्रिपीटकांना पायाखाली तुडवून, फाडून, जाळून राखरांगोळी करून टाकली आणि तीही एकदा नव्हे तर सिंधकाबूलपासून पूर्व बंगालपर्यंत. बौद्ध विहार दिसला की लाव आग नि जाळ ग्रंथ असा प्रलय मांडला होता तेव्हा मुसलमानांची ती कृत्ये आसुरी अपकृत्ये नसून, शतशत कृत्येच होती! आणि जर बौद्ध ग्रंथ जाळण्याचे हे मुसलमानी अत्याचार-आम्ही त्याला अत्याचारच म्हणतो - शतकृत्ये म्हणून गौरवार्ह नसतील तर आंबेडकरानी मनूस्मृतीची एक प्रत जाळली, ह्यात कोणतेही शतकृत्य केले नसून एक अत्याचार केला हेही त्यास मानावे लागेल.

३) बुद्धधर्म देव-देवता, आत्मा, पुनर्जन्म आदी मानीत नाही असे आंबेडकर महराबंधूंना सांगतात आणि म्हणून तो धर्म स्वीकारा असे उपदेशितात. परंतु जगतात आज मांचुरियापासून ते हिंदूचीन (Indochina) पर्यंत महायान पंथाचे जे कोटी कोटी बौद्ध लोक आहेत ते देव मानतात. इतकेच नव्हे तर त्यांनी बुद्धालाच देवाधिदेव बनवून ठेवलेले आहे. आणि हिंदू धर्मातील िअंद्र, वरुण, लक्ष्मी सरस्वती, यक्ष, किन्नर इत्यादी सर्व देवदेवतांनाही ते कोटी कोटी बौद्ध मानतात आणि गौतम बुद्धाला त्या सर्व देवदेवतांचा अधीश्वर म्हणून मानून त्याची प्रत्यही पूजाअर्चा आज बौद्ध जगतात चालू आहे. हे सत्य आंबेडकर पक्षीय का दडपून ठेवतात?

४) स्वतः बुद्धही पूर्वजन्म मानीत होते. कारण आपण पूर्वजन्मी माणसाचेच नव्हे तर पशूपक्ष्यांचेही जन्म घेतलेले आहेत असे स्वतः गौतम बुद्ध सांगत आणि त्यांचे त्या त्या योनीतील त्या पूर्वजन्माचे इसापनीतीतील गोष्टीप्रमाणे वर्णन केलेले अनुभवही सांगत. बौद्धांच्या पवित्र धर्मग्रंथामध्ये बुद्धांनी सांगितलेल्या ह्या त्यांच्या पूर्वजन्मांच्या गोष्टी जातके म्हणून ध्येय मानली जातात ही गोष्ट खोटी आहे काय?

बौद्धांच्या ह्या भाकड धर्मकथांचे नि कर्मकथांचे गुऱ्हाळ सांगण्यापूर्वी जात जाता एवढे सुचवून ठेवतो की, हिंदुत्वाच्या खऱ्या नि तर्कशुद्ध व्याख्येप्रमाणे कोणाही बौद्धेतर हिंदूने बौद्धमत स्वीकारले असता त्यास धर्मांतर म्हणणे हीच मुळात चूक आहे. ते धर्मांतर नसून संप्रदायांतर काय ते होईल. पण ते विधेय पुढे यथास्थली विशदविले जाईल. सध्या आंबेडकरपक्षीय वृत्तपत्रांतून नि भाषणांतून योजिला जाणारा धर्मांतर हा चालचलावू बाजारी शब्दच त्यांना सहज समजावा एवढ्यासाठी काय तो ह्या लेखातून आम्ही योजीत आलो आहोत.

५) बुद्धाचा मोठ्यातला मोठा पराक्रम म्हणून जो हे बौद्धधर्माचे पक्षपाती भाट येता जाता सांगत सुटले आहेत तो म्हणजे हा की यज्ञयागात ब्राह्मण क्षत्रियादी वैदिक धर्मीय जी पशूहत्या करीत असत ती बुद्धाने बंद पाडली. प्राणिमात्राची हत्या करू नका, देवाच्या नावाने यज्ञामध्ये तुम्ही पशूंना मारता पण त्या पशुंच्या मांसावर मात्र आपणच ताव मारता हे कृत्य किती दुष्ट, निर्दय नि ढोंगीपणाचे आहे, असा कडक निषेध यज्ञातील पशूहत्येविरुद्ध स्वतः बुद्ध आणि नंतर त्याचे पीठाचार्य जो सतत करीत गेले त्यामुळे बुद्धानंतर मोठमोठाले यज्ञ असे झालेच नाहीत. पशूहत्या बंद पडली. प्राणिमात्रांना बुद्धांनी जीवदान दिले! आणि म्हणून हा हिंदुधर्म सोडा आणि अहिंसाप्रधान बौद्ध धर्मात या असा टाहो हे पक्षपाती भाट आजही फोडीत आहेत. परंतु या प्रश्नाची दुसरी बाजू ते चुकूनसुद्धा उल्लेखीत नाहीत! यज्ञयाग हे प्रस्तुतकाळी आचरणीय आहेत किंवा नाहीत हा प्रश्न अगदी स्वतंत्र आहे. त्याची चर्चा इथे अप्रस्तुत म्हणून सोडून देतो. परंतु प्रस्तुत असलेल्या वरील पक्षपाती बुद्धस्तोमात्रांच्या दयेने द्रवून बौद्धधर्माच्या वरील विरोधापुढे देवाच्या नावाने यज्ञातून पशूहत्या बंद झाली असे क्षणभर गृहीत धरले तरी बुद्धाच्या नावाने भिक्षुसंघातून चाललेल्या पोटपुजेपायी लक्षावधी पशू, पक्षी मत्स्यादी प्राणिमात्रांची जी हिंसा बुद्धाच्या काळापासून तो अगदी आजच्या क्षणापर्यंत सहस्रावधी वर्षे चाललेली आहे त्याविषयी आंबेडकरपक्षीय जे अगदी मूग गिळून बसतात ते का?

बुद्धाच्या पूर्वीपासूनही यज्ञयाग, पशूहत्या आणि मांसाशन यांचा निषेध करणारे आणि देवही न मानणारे पन्नास-साठ पंथ तरी भारतात प्रचलित होते. हे बौद्धग्रंथातही उल्लेखलेले आहे. ‘अहिंसा परमो धर्मः’ हे ब्रीद प्रत्यक्ष आचरणात आणून सोडण्याचा प्रयत्न जैन धर्मीयांनी बुद्धाच्याही पूर्वीपासून चालविला होता. तो किती साधला ते पाहण्याचे हे स्थल नव्हे. मांसाशनाच्या, प्राणिहत्याविरोधक निषेधापुरते पाहावयाचे तर जैनधर्माने ते व्रत आपल्या आचरणातही पाळलेले आहे हे मान्य केले पाहिजे. त्याविषयीच्या त्यांच्या उपदेशात आणि आचरणातही सुसंगती तरी होती. परंतु यज्ञात देवाचे नावे पशूहत्या करणे निंद्य आहे असे सांगणाऱ्या बुद्धाने पोटाच्या नावाने पशूपक्षी मत्स्यादिकांची हत्या करण्यास अप्रत्यक्षपणे का होईना पण विरोध केला नाही ही केवढी दांभिक विसंगती आहे पाहा! प्रत्यक्ष बुद्धाचा उपदेश असे की कोणीही बौद्धाने स्वतः प्राणिहिंसा करू नये. पण जर इतर कोणी पशूपक्षीमत्स्यादिक खाद्यप्राण्याला मारून त्यांचे मांस शिजवून आणून वाढले तर बौद्ध गृहस्थांनीच काय पण भिक्षूंनीही ते रुचीर अन्न खाण्यास कोणचाही धार्मिक प्रत्यवाय नाही! सहस्रावधी भिक्षूंसह स्वतः बुद्ध इतस्ततः प्रवास करीत तेव्हा गावागावातील लोक त्यांच्या आहारासाठी अनेक प्रकारच्या रुचीर मांसान्नांच्या राशीच्या राशी वाढीत आणि बुद्धासह त्यांचे ते भिक्षुभिक्षुणीसंघ ते मांसाशन मिटक्या मारून खात. प्राणिमात्रांच्या दयेने द्रवलेल्या बुद्धांची धर्माज्ञा इतकीच आहे

की, प्राण्यांना अन्नासाठी मारा म्हणून तुम्ही होऊन सांगू नका, ते कोणी मारले हेही विचारू नका; पण मांस कोणी आपणहून आणून दिले तर ते निःशंकपणे खात जा. त्यात काही अधर्म्य नाही. स्वतः चोरी करू नका. परंतु चोरी करून आणलेल्या वस्तूंना त्या चोरी करून आणल्या आहेत हे धडधडीत दिसत असताही त्यांना निःशंकपणे हडपण्यास नि दडपण्यास काही एक प्रत्यवाय नाही असा उपदेश देण्याइतकाच हा बुद्धाच्या मांसाशनाचा उपदेश अपराधी नाही काय? पोटबाबूपणाचा नाही काय? प्राणिमात्रांच्या दयेसाठी यज्ञातील होणारी हिंसा बुद्धधर्माने बंद केली म्हणून डांगोरा पिटण्याऱ्या बुद्धाच्या पूजकांनी हेही सत्य सांगावयास हवे होते की ज्या यज्ञान्तर्गत पशूहिंसेची बुद्धांनी निंदा केली त्याच बुद्धाच्या सहस्रावधी भिक्षुसंघातील आयातोबा भिक्षुंची पोटे भरण्यासाठी यज्ञात मारल्या जाणाऱ्या प्राण्यांहून दसपट पशू, पक्षी, मत्स्य, बुद्ध जिवंत असताही मारले जात असत आणि हे सहस्त्रावधी भिक्षुंचे तांडे त्या पशुंचे ताजे ताजे मांसान्न मिटक्या मारीत खाण्याची प्राणिमात्रावर दया करीत असत. स्वतः बुद्ध भगवानांचाच अंत कोणत्या रोगाने झाला? अजीर्णाने! आणि ते अजीर्ण कशाने झाले? तर अत्यंत वृद्धापकाळी आपल्या अनेक भिक्षुंसह एका मोठ्या शिष्याकडे बुद्ध भोजनास गेले असता ताजे ताजे मटन म्हणजे डुकराच्या मांसाचे पक्वान्न जे त्यांना सांगून सवरून करण्यात आले होते ते त्यांनी नको इतके खाल्ले. त्यामुळे अजीर्णाने असह्य व्यथा होऊन त्यातच बुद्धांना मृत्यू आला! त्या प्राचीन कालच्या गोष्टी सोडल्या तर अगदी आजही प्राणिमात्रावर दया करणाऱ्या आणि त्या दयेच्या नावे यज्ञसंस्थेची निंदा करणाऱ्या ह्या बौद्धधर्माचे चीन, जपान, मांचुरियापासून तो हिंदचीनपर्यंत पसरलेले कोटी कोटी अनुयायी, विशेषतः महायान पंथी अगदी उघड उघड खाटकांची दुकाने स्वतः थाटून प्रकटपणे लक्षावधी पशू, पक्षी, मत्स्य स्वतः मारून घरोघरी त्यांचे ताजे मांसान्न खाताहेत, आणि त्यात आपण बौद्धधर्माविरुद्ध काही आचरण करीत आहोत याची शंकासुद्धा त्यांना येत नाही. ते स्वतःला कट्टर बौद्धपंथीच समजतात. आजच्या ह्या बौद्धांच्या प्राणिमात्रांच्या दयेच्या कचाट्यातून पशू, पक्षी, मासे तर काय, पण खेकडे आणि उंदीरसुद्धा सुटलेले नाहीत. खेकड्यांची लोणची, उंदरांच्या पिल्लांची लोणची ही उपाहारगृहागृहातुन इतर स्वादिष्ट पदार्थाप्रमाणेच ह्या बौद्ध देशातून विक्रीस ठेवलेली असतात आणि आवडीने पंक्तीत खाल्ली जातात. आमचे वारकरी महारबंधू अशा ह्या बौद्धधर्मात जाऊन प्राणिमात्रावर अशीच 'दया' करणार आहेत काय? आज हिंदुधर्मात असलेले आमचे वारकरी महार नि वारकरी डोंबसुद्धा मांसाशनाच्या प्रकरणी, खऱ्या खऱ्या प्राणिमात्रावर दया करण्याच्या प्रकरणी असल्या ढोंगधत्तुरी अहिंसेच्या भ्रष्टाकारापासून इतके अलिप्त आहेत की ते कोणच्याही प्रकारचे आणि दुसऱ्याने मारलेल्या पशूपक्ष्यांचेसुद्धा मांस असे खात नाहीत! इतकेच नव्हे तर वारकरी पंथाप्रमाणे कांदा नि लसूणसुद्धा खात नाहीत. मांसाशन निषिद्ध आहे हे गृहीत धरले तर आमच्या ह्या हिंदू वारकऱ्यांचेच आचरण अहिंसेचा डांगोरा पिटणाऱ्या बैद्धभिक्षूंपेक्षा शतपटीने अधिक सुसंगत, प्रामाणिक नि सोज्जवळ आहे.

६) बुद्धानंतर त्याच्या उपदेशाच्या प्रभावाने पुन्हा मोठमोठे यज्ञ असे झाले नाहीत ही आंबेडकर पक्षीयांची विधानेही निव्वळ थापेबाजी आहे. बुद्धानंतरच काय पण यज्ञयाग बंद पाडण्यासाठी अशोकाने आपली सारी साम्राज्यशक्ती पणास लावून तो निधन पावल्यानंतरही मोठमोठे यज्ञयाग शतशत वर्षे भरतखंडभर धुमधडाक्याने चालू होते. अशोकाच्या राजधानीत त्याच्या निधनाच्या मागोमाग ग्रीकांना जिंकून आपले साम्राज्य स्थापन करणाऱ्या

ब्राह्मणकुलोत्पन्न सम्राट पुष्यमित्राने एक सोडून दोन यज्ञ साजरे केले. कलिंगात आणि आंध्रात, राजसूयादिक महायज्ञ होतच होते. शकांच्या परकीय आक्रमणापासून भारताला मुक्त करणाऱ्या क्षत्रियकुलावंतस गुप्त सम्राटांनी असोकाच्या राजधानीत अश्वमेधामागून अश्वमेध गाजविलेले आहेत. सम्राट चंद्रगुप्त, सम्राट समुद्रगुप्त, चंद्रगुप्त विक्रमादित्य, हुणांना पायबंद घालणारा सम्राट स्कंदगुप्त ह्या प्रत्येक सम्राटाने पाटलीपुत्रात परकीय शत्रूंवर मिळविलेले आपले दिग्विजय अनेक अश्वमेध यज्ञ करून उद्घोषित केलेले आहेत. हूणांतक यशोधर्मन्‌प्रभृती अनेकानेक क्षत्रिय वीर अगदी सातव्या शतकापर्यंत म्हणजे बुद्धानंतर उण्यापुऱ्या एक सहस्र वर्षापर्यंत अश्वमेधादिक अनेक महायज्ञ करीत आले हे इतिहासप्रसिद्ध आहे. यज्ञयागाची प्रथा ही आता लुप्त झालेली आहे. ती केवळ बुद्धाच्या उपदेशामुळे झालेली नसून ती कालप्राप्त अशा अनेक राजकीय नि धार्मिक कारणांमुळे झालेली आहे. बुद्धाच्या आधी वैदिकांतच यज्ञसंस्थेविषयी दोन मते असत. 'प्लवाः हयेत अदृढाः यज्ञरूपा' हे बुद्धपूर्व वैदिकांचेच वचन आहे. प्राचीन काळापासून भागवत धर्माची आणि भक्तिमार्गाची तशीच प्रवृत्ती होती. मुसलमानांच्या स्वाऱ्यानंतरचा अराजकीय प्रलय हेही यज्ञप्रथा लुप्त होण्याचे बलवत्तर कारण होते. तथापी येथे तो विषय प्रस्तुत नाही म्हणून सोडून देऊ. येथे इतकेच सांगणे पुरे आहे की बुद्धानंतर महायज्ञ  असा झालाच नाही, अशी विधाने डॉ. आंबेडकरांचा पक्ष जो ठोकीत आहे ती बौद्धधर्माचे नसते स्तोम माजविताना इतर प्रकरणी जी त्यांनी थापेबाजी चालविली आहे तिचीच एक निंदनीय वानगी आहे. ब्राह्मण लोकांनी केवळ दक्षिणा उपटण्यासाठी आणि लाडू जिलब्या झोडण्यासाठी वास्तुपूजा, सत्यानारायणादिक व्रतवैकल्यांच्या पोथ्या खरडल्या म्हणून तुम्ही हा पौराणिक हिंदुधर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारावा अशी दौंडी जी आंबेडकर त्यांच्या प्रचारकांकडून आमच्या पूर्वास्पृश्य हिंदू समाजात सारखी पिटीत आहेत, त्यांना आमचे आव्हान आहे की ब्राह्मणांनी केवळ स्वतःच्या पोटपूजेसाठी असल्या पोथ्या खरडल्या हे वादासाठी गृहीत धरले तरी भाबड्या लोकांची होणारी ही लुबाडणी बौद्ध धर्मात जाऊन कशी टळणार? कारण बौद्ध धर्मात ब्राह्मणांच्या दक्षिणेची निंदा करताच त्या ब्राह्मण दक्षिणेहून आपल्या लक्षावधी आयतोबा आणि भीकमाग्या भिक्षूच्या उदरभरणाचा जो बोजा समाजावर बौद्धांनी टाकला त्यापायी होणारी समाजाची लुबाडणी ही शतपटीने अधिक होती. एकवेळ दक्षणा पुरवली पण ही ह्या भिक्षुकांच्या टोळधाडीची भिक्षणा नको असे शेतकरी, व्यवसायी, व्यापारी इत्यादी समाजातील कष्टाळू वर्गाला होऊन गेले होते. कारण हे सहस्रावधी लक्षावधी बौद्धभिक्षुभिक्षुणी आपआपल्या टोळ्या करून देशभर भिक्षा मागत हिंडत. भिक्षूंना दान देण, त्यांना मोठमोठे विहार बांधून देणे, उत्तमोत्तम वस्त्रे देणे हा निर्वाणपदप्राप्तीचा एकमेव राजपथ आहे अशा थापेबाजीने बौद्धांच्या पोथ्या नि प्रवचने काठोकाठ भरलेली असत नि आहेत. ज्यांना कष्टावाचून पोट फुगेतो भरावयास हवे त्याने सरळ भिक्षू व्हावे असा धुमधडाका बौद्धकाळी ह्या राष्ट्रात उडालेला नव्हता का? जर म्हणाल की त्या भिक्षुंच्या ताड्यात सज्जन नि समाजसेवक भिक्षूही नव्हते की काय तर मग आम्ही विचारतो की यच्चयावत्‌ब्राह्मणवर्ग हा दक्षिणेसाठीच काय तो समाजास लुबाडीत आलेला आहे अशा उलट्या काळजाचा सरसकट शिवराळपणा करणारे तुम्ही बौद्धभिक्षूंचे म्होरके तरी तो प्रश्न कोणत्या तोंडाने विचारू शकता? स्वतःच्या डोळ्यात मुसळ असताना दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळासाठी जेव्हा तुम्ही त्याची टवाळी करू जाता, तेव्हा तुम्हाला कशी लज्जा वाटत नाही?

७) वृक्षपूजेसंबंधी तुम्ही हिंदूस हसता. पण तुम्हा बौद्धांनी बोधिवृक्षाचे जे प्रस्थ माजविलेले आहे त्याचे काय? बोधिवृक्षाखाली बुद्ध तत्त्वचिंतन करीत जेव्हा बसले तेव्हा त्या वृक्षाखाली अनेक पशूही रवंथ करीत बसलेले असतील आणि त्याच्या शाखांवर कावळे नि घुबडे राहत असतील पण त्यांना काही तत्त्वज्ञान झाले नाही. बुद्धाला तेवढे झाले. अर्थात्‌तत्त्वज्ञानबोध प्राप्त करून देण्याचा कोणताही दिव्यगुण त्या झाडात नव्हता. ते झाड कोणत्याही इतर वडासारखे एक झाड होते. मग त्याला भंपक नाव देऊन ते झाड दहादा सुकून निर्जीव होत आले असता त्याखाली शेकडो दुधाच्या घागरी ज्या तुम्ही बौद्ध ओतीत आहात, त्याच्या फांद्या देशोदेशी नेऊन लावून तो पवित्र वृक्ष म्हणून जे तुम्ही पुजीत आलात आणि तो मूळ वृक्ष कधीच वठून गेला असता त्याची कोणची तरी फांदी पुन्हा तेथेच लावून बुद्धाने तपस्या केली तोच हा बोधिवृक्ष म्हणून यात्रेकरूंना तुमचे तेथील पुजारी भिक्षू जे शतकोशतके सांगत आले आहेत त्यापेक्षा वृक्षपुजेच्या अधिक धर्मभोळेपणाचे उदाहरण जगात तरी दुसरे कोठे सापडेल का?

८) तीच गोष्ट पुनर्जन्मादिक निष्ठेची. अशा धर्मभोळ्या नि तर्कातीत निष्ठा आमच्या बौद्ध धर्मात नाहीत अशा थापा तुम्ही ह्याविषयी अगदी अज्ञानी असलेल्या आमच्या महारादिक हिंदूबंधूत जाऊन मारीत आहात. पण बौद्ध धर्मातही अशा निष्ठांचा किती बुजबुजाट झालेला आहे हे सिद्ध करण्यासाठी हे उदाहरणही देणे पुरे आहे.

तिबेटातील बौद्ध समाजाचे जे आद्य धर्मगुरूपीठ आहे त्याच्या धर्मप्रमुखास दलाई लामा म्हणतात. तोच तिबेटचा राज्यप्रमुखही असतो. त्याची निवड कशी करतात ते ठाऊक आहे का? एक दलाई लामा मरताच तिबेटात तो कोठे तरी तत्काळ जन्माला येतो अशी त्या बुद्धसंप्रदायाची निष्ठा आहे. म्हणजे पुनर्जन्म मानणारे बौद्ध संप्रदायही आहेत. नाहीत असे जे डॉ. आंबेडकरवादी म्हणतात ते त्यांचे अज्ञान तरी आहे, नाही तर थाप तरी आहे. दलाई लामा मरताच तो तत्काळ कोठे जन्माला आला ते हुडकून काढून त्या स्थानी आपल्या गटाच्या मुलालाच निवडले जावे म्हणून तंटे-बखेडेही होतात. कारण नवीन दलाई लामा म्हणून जे मूल निवडले जाते ते वयात येण्याच्या आधीची दहावीस वर्षे त्या सर्व धर्मराज्याचा कारभार पालक म्हणून ह्या भिक्षूंच्या कारभारी मंडळाच्या हातीच असतो. धर्मगुरू निवडण्याची ह्याहून भाबडी, आंधळी आणि बहुतेक समयी भोंदूपणाने बुजबुजाटलेली पद्धती ती कोणती असणार? म्हणूनच आम्ही म्हणतो की बौद्ध धर्माचारातही धर्मभोळेपणाचा नि धार्मिक भोंदूगिरीचा बुजबुजाट झालेला आहे.

- (हिंदू दि. ८ नि १५ ऑक्टो. १९५६)

***

# २८ सीमोल्लंघन केले, पण हिंदूत्वाच्या सीमाक्षेत्रातच!

गेल्या विजयादशमीला नागपूर येथे डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या उण्यापुऱ्या एक लक्ष अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. बौद्ध धर्मात जाण्याची सिद्धता डॉ. आंबेडकर यांनी गेली सात-आठ वर्षे तरी विशेषतः महाराष्ट्रातील महारवाड्यांतून आणि त्यांच्या अनेक प्रचारकांकडून पद्धतशीरपणे चालविली होती. ही वस्तुस्थिती ज्यांना माहित आहे त्यांना आंबेडकरांचे बौद्ध धर्माची दीक्षा घेण्यासाठी एकगटी एक लक्ष अनुयायी नागपूरला एकत्र झाले याचे तितकेसे आश्चर्य वाटणार नाही. इतकेच काय, पण काही बौद्धधर्मीय परदेशातून आणि विशेषतः आज भारतीय शासनाच्या कारभाराची सूत्रे ज्यांच्या हाती पडलेली आहेत त्यातील पंतप्रधान नेहरू प्रभृती काहीजणांकडून प्रत्यक्ष नि अप्रत्यक्षपणे धनादिक सर्व प्रकरणी सक्रिय पाठिंबा या बौद्धधर्मप्रचाराच्या अभियानास मिळालेला असल्यामुळे दोन एक वर्षाच्या आत भारतात दहा लक्ष लोकही बौद्ध धर्म स्वीकारतील असे आपण समजून चालले पाहिजे.

## २८.१ चिंतनीय पण चिंताजनक नव्हे

काही लाख लोकांनी हिंदूधर्मातील सनातन किंवा वैदिक संप्रदाय सोडून बौद्ध संप्रदायाचा स्वीकार करावा आणि तोही इतक्या गाजावाजाने नि संघटितपणे करावा ही गोष्ट चिंतनीय आहेच आहे. परंतु त्यामुळे हिंदुराष्ट्रावर किंवा समाजावर कोणता एखादा चिंताजनक प्रलय ओढवणार आहे, अशी काहीशी जी भीती कित्येकांना आतून वाटते ती मात्र निराधार आहे. डॉ. आंबेडकरांनी कितीही मोठमोठ्याने गर्जून सांगितले की ते साऱ्या भारतातून हिंदूधर्माचे आमूलात्उच्चाटन करून सर्व धर्मात श्रेष्ठ असा जो बुद्ध धर्म, त्याची प्रस्थापना करणार आहेत तरी, त्या त्यांच्या गरजण्याला क्रोधविष्ट वल्गनांपेक्षा अधिक महत्त्व देण्याचे काही एक कारण नाही. स्वतः बुद्ध भगवान हे त्यांचा धर्म स्थापल्यानंतर चाळीस वर्षे स्वतःच्या धर्माचा अखंड उपदेश करीत गेले असताही जेथे त्यांना सनातन धर्माचे उच्चाटन करता आले नाही आणि अशोकासारख्या सम्राटाच्या राजशक्तीने त्या उच्चाटनासाठी सर्वस्व पणास लावले असताही शेवटी जेथे त्यांनाही थकून जाऊन हात टेकावे लागले तेथे डॉ. आंबेडकरांची कथा काय? परंतु अशा चळवळीत जो राष्ट्रीय फुटीरपणा शिरण्याचा पुढे पुढे संभव असतो त्यास मात्र आपण प्रथमपासूनच कटाक्षाने पायबंद घालीत गेले पाहिजे.

## २८.२ आंबेडकर ख्रिस्ती किंवा मुसलमान झाले नाहीत, ते काही आमच्यावर उपकार करण्यासाठी नव्हे

आज डॉ. आंबेडकर त्यांच्या वृत्तपत्रांतून नि भाषणांतून सारखी घोषणा करीत आहेत की, जगातील सर्व धर्मांत बौद्ध धर्म हाच श्रेष्ठ. परंतु त्याच डॉक्टर महाशयांनी मागे एकदा मुस्लिम धर्माचे गोडवे गाऊन, 'मी श्रेष्ठ अशा इस्लाम धर्मास अंगीकारणार आहे.' असा आपला दृढ निश्चय प्रकटविला नव्हता काय? एकदा 'श्रेष्ठ अशा ख्रिस्ती धर्मास मी स्वीकारणार आहे.' अशीही प्रसिद्धी त्यांनी केली नव्हती काय? त्यानंतर, 'मी शीख धर्मासच स्वीकारणार आहे.'

अशीही हूल त्यांनी उठविली नव्हती काय? त्यावेळी डॉ. आंबेडकर काही शाळेत शिक्षण घेणारे एखादे अपक्व वयाचे मूल नव्हते. तेव्हाही ते डॉक्टर या पदवीनेच मिरवत होते. तेव्हा त्यांना बौद्ध धर्म हा जगातील सर्व धर्मात श्रेष्ठ आहे हे कळले नव्हते की काय? आणि नव्हते कळले असे ते म्हणतील तर त्यांच्या त्या वेळच्या घोषणा या धर्माधर्माच्या गाढ व्यासंगाच्या द्योतक नसून अपरिपक्व बुद्धीच्या किंवा निव्वळ दिशाभुलीच्या घोषणा होत्या, हे उघड होत नाही काय? मुसलमानी धर्मात वा ख्रिस्ती धर्मात आणि त्यांच्या व्यवहारात म्हणे अस्पृश्यता नाही! क्षणभर हे गृहीत धरले तरी त्या धर्माची नुसती तोंडओळख असणाऱ्यांनाही हे ठाऊक आहे की, अस्पृश्यतेहूनही भयंकर असणारी दासतेची - गुलामगिरीची, मनुष्याला जन्मतःच पशूप्रमाणे लेखणारी नि वागवणारी - प्रथा त्या त्या दोन्ही धर्माच्या संस्थापकांनी आणि प्रचारकांनी अधर्म्य समजलेली नाही असे बायबलच म्हणते. (Slaves, obey your masters). खरी गोष्ट अशी आहे की, डॉ. आंबेडकरांना वरील अहिंदू धर्मातील ही सर्व व्यंगे ठाऊक आहेत. त्यांना हेही ठाऊक होते की, त्यांच्या आधीच शेकडो वर्षापासून शतावधी अस्पृश्य लोकांना स्वेच्छेने वा सक्तीने ख्रिश्चन नि मुस्लिम धर्मात बाटवून नेलेले होते. अगदी आमच्या महार बांधवांची फुटकळ गोेष्ट घेतली तरी अनेक महारांना आंबेडकरांच्या जन्मापूर्वीपासून ख्रिश्चन आणि मुसलमान करण्यात येत आहे. पण जे अस्पृश्य असे बाटले गेले त्यांची अस्पृश्यता, सामुदायिक प्रमाणात बोलावयाचे म्हणजे, ख्रिस्ती आणि मुस्लिम समाजाने जशीच्या तशीच ठेवली. त्रावणकोरमध्येच पाहा. शंभर शंभर वर्षांपूर्वी ख्रिस्ती झालेल्या अस्पृश्यांना नुसत्या वसतीतून नि शाळातूनच नव्हे तर ख्रिस्ती प्रार्थनामंदिरातून सुद्धा इतर ख्रिस्त्यांत एकत्र बसू देस नाहीत. त्यांची बाके एका कोपऱ्यात दूर ठेवण्यात येतात आणि त्यांना प्रार्थनाही त्याच अस्पृश्य कोपऱ्यात करावी लागते. अगदी महाराष्ट्रात बाटलेल्या महार, चांभार, मांग इत्यादी अस्पृश्य ख्रिस्त्यांना अस्पृश्यच मानले जाते. दुसऱ्या ख्रिस्त्यांकडूनच नव्हे तर ते स्वतः आपापसातही एकमेकांस अस्पृश्य मानतात. त्यांची लग्ने तर बाटग्या पण त्यांच्या त्यांच्या जातीत होतात. मुसलमानात तर बळाने बाटविलेल्या अस्पृश्यांना इतके दडपले जाते की मागे एकदा बंगाल विधीमंडळात 'अस्पृश्य मुसलमानांच्या' नावे गाऱ्हाणे करण्यात आले होते, की मुसलमानांसाठी ठेवलेल्या राखीव जागा आम्हा अस्पृश्य मुसलमानांच्या वाट्यास स्पृश्य मुसलमान येऊच देत नाहीत! शिखांत जे अस्पृश्य गेले त्यांचा वर्ग 'महजबी शीख' म्हणून स्वतंत्रच ठेवण्यात येतो. ही वस्तुस्थिती आंबेडकरांच्या डोळ्यांपुढे होती. अशा अनेक अडचणींमुळे आणि इतर काही अंतःस्थ कारणांमुळे डॉ. आंबेडकरांचा आणि ख्रिश्चन, मुस्लिम नि शिख पुढाऱ्यांचा आंबेडकरांच्या त्या त्या धर्मांतराविषयीचा सौदा त्या त्या वेळी पटला नाही. ही अंतःस्थ कारणे ज्यांना ठाऊक आहेत ते हे जाणून आहेत की, हिंदू समाजाची अधिकात अधिक हानी नि मानभंग करण्यासाठी मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्मात जाण्याची इच्छा असूनही डॉ. आंबेडकरांना ते दुष्कृत्य करवले नाही. करताच आले नाही. परंतु ही वस्तुस्थिती ध्यानात न आल्यामुळे काही सदिच्छ परंतु सर्वसाधारण हिंदूप्रमाणेच भाबड्या स्वभावाच्या हिंदू पुढाऱ्यांना वाटते की, डॉ. आंबेडकर जे मुसलमान किंवा ख्रिश्चन झाले नाहीत ते हिंदूंवर उपकार करण्यासाठी, त्यांच्या मनात हिंदूविषयी काही अंतःस्थ ओलावा होता म्हणूनच होय. पण तसा कोणताही प्रकार नाही. डॉ. आंबेडकरांना दुसरा 'काळा पाहाड' होण्याची मनासारखी संधीच मिळाली नाही. नाही तर ते सवाई 'काळा पाहाड' होण्यास सोडते ना.

## २८.३ हिंदूंनी बाटग्यांचे कौतुक करणे हा कोडगेपणा होय

याचे प्रत्यंतर म्हणजे गेल्या दोन तीन वर्षात त्यांनी बौद्ध धर्माचा प्रचार करण्याच्या ढालीखाली त्यांच्या वृत्तपत्रांतून नि भाषणांतून ज्याला ते 'हिंदुधर्म' म्हणतात, त्या हिंदू धर्माविरुद्ध आणि हिंदू समाजाविरुद्ध जी सारखी शिवीगाळ चालविली आहे, तीच होय. त्यांचे वृत्तपत्र आम्ही हेतूतः वाचीत असतो. त्यात ते नि त्यांचे प्रचारक हिंदूच्या वेद, पुराणे इत्यादी धर्मग्रंथांवर, श्रीरामकृष्णादिक अवतारांवर, हिंदूंच्या धार्मिक आचारांवर आणि रूढींवर इतकी बाष्कळ, अन्याय्य आणि प्रसंगी अगदी हीन भाषेतही वर्षानुवर्षे टीका करीत आले आहेत की, सहिष्णुतेची व्याधी जडलेल्या हिंदू समाजावाचून कोणत्याही अहिंदू समाजाने तशी टीका ऐकून घेतली नसती. म्हणूनच बौद्ध धर्माचे सर्व धर्मापेक्षा श्रेष्ठत्व पटवितानाही, हे आंबेडकरी प्रचारक, मुसलमान किंवा ख्रिस्ती धर्मग्रंथाविरुद्ध किंवा रूढीविरुद्ध एक चकार शब्दही तसल्या भाषेत उच्चारण्याचे धाडस करीत नाहीत. कारण डॉ. आंबेडकरांनी त्या अहिंदू धर्मग्रंथांविरुद्ध ब्रही काढला असता तर त्या अहिंदू समाजाने डॉ. आंबेडकरांचा दुसरा कन्हय्यालाल मुनशी करून टाकला असता आणि ह्याही पुढे जाऊन हिंदू धर्मातील नि रूढीतील व्यंगे दाखविताना त्यांनी बौद्ध धर्मातील तशाच व्यंगाविषयी चकार शब्दसुद्धा कधी काढलेला नाही. बुद्धाची दहापाच उदात्त वचने - जी बहुतेक बुद्धपूर्व सनातन ऋषिमुनींनी नि साधुसंतांनी उपदेशिलेल्या संस्कृत वचनांची केवळ पाली भाषांतरेच काय ती आहेत - ती तेवढी हे आंबेडकरी प्रचारक सारखी छापीत नि घोळीत असतात आणि ओरडत असतात की हा पाहा बौद्धधर्म कसा सर्व धर्मांत श्रेष्ठ आहे तो! त्यांना केव्हा तरी सणसणीत बजावले पाहिजे की बौद्ध धर्मात, बौद्ध पुराणात आणि नाना देशांतील त्यांच्या रूढ आचारातही भ्रामक मते, भाकड कथा, भाबडेपणा, भंगड आचार आणि अनाचार इत्यादींचा इतर कोणत्याही जागतिक धर्माप्रमाणेच बुजबुजाट झालेला आहे. पण हे ठाऊक असूनही आंबेडकरांच्या हिंदूद्वेषाने अंध झालेल्या डोळ्यांत ते खुपत नाहीत. ते आता आवर्जून सांगतात की, लहानपणीच त्यांच्या वाचनात एक बुद्धचरित्राचे पुस्तक आले होते. तेव्हापासनूच त्यांचा बौद्ध धर्माकडे ओढा होता. पण जर लहानपणापासूनच त्यांना बौद्ध धर्म आवडत आलेला होता, तर मध्यंतरी त्यांना बुद्धास 'कफर दि हीदन' मानणाऱ्या मुस्लिम धर्माचा नि ख्रिस्ती धर्माचा अंगीकार करण्याइतका पुळका कसा झाला?

अर्थात बौद्ध धर्मास अंगीकारण्यावाचून त्यांना जेव्हा गत्यंतर उरले नाही तेव्हा त्यांनी तो अंगीकारला. त्यात हिंदूंनीच अशा गृहस्थाचे कोडकौतुक ते काय म्हणून करावयाचे?

## २८.४ पण बौद्ध होताच डॉ. आंबेडकरांची भंगड प्रतिज्ञाही भंग पावली

डॉ. आंबेडकर गेली २०-२५ वर्षे पुन्हा पुन्हा गर्जत आले होते की, हिंदुधर्मात माझा जन्म झाला ह्याला माझा उपाय नव्हता. पण मी प्रतिज्ञा करतो की, मी हिंदुधर्मात मरणार मात्र नाही. नागपुरास झालेल्या समारंभात बुद्धधर्माची दीक्षा घेतल्यानंतरसुद्धा हिंदूद्वेषाने जळफळणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी पुन्हा एकदा हिंदुधर्माची निंदा करण्यास आणि मी हिंदू म्हणून मरणार नाही म्हणून केलेल्या वरील भंगड प्रतिज्ञेची पुनरुक्ती करण्यास सोडले नाही. पण ते आता अशा पेचात सापडले आहे की, जर यापुढे ते धर्मांतराची पुन्हा एखादी कोलांटी उडी मारणार नसतील व बौद्ध धर्मातच उरलेले आयुष्य घालवणार असतील तर त्यांना हिंदू

म्हणूनच मेले पाहिजे. कारण हिंदूत्वाच्या क्षेत्राबाहेर जाण्यासाठी जी उडी त्यांनी मारली, ती सर्वतोपरी फसून हिंदूत्वाच्या सीमाक्षेत्राच्या आतच पडलेली आहे. हिंदूत्वाच्या सीमाक्षेत्राची आज बहुमान्य झालेली, स्वर्गीय लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, रामानंद चटर्जी, भाई परमानंद प्रभृती हिंदू धुरंधरांनी स्वीकारलेली, हिंदू महासभेसारख्या अखिल हिंदू संस्थेच्या घटनेत गेली वीस वर्षे समाविष्ट झालेली आणि ती ऐतिहासिक दृष्ट्या इतकी सत्य, तितकीच प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे काटेकोरपणे मोजमाप करून अतिव्याप्ती आणि अव्याप्ती या दोन्ही दोषांपासून शक्यतो अलिप्त असलेली अशी जी अनन्य व्याख्या आहे, ती ही की, 'ज्याची ज्याची पितृभू भरतखंडच आहे तो तो हिंदू'. डॉ. आंबेडकर जर कोणी भरतखंडाबाहेरच्या परदेशात जन्मलेले गृहस्थ असते आणि ते बौद्ध झाले असते तर त्यांना या हिंदूत्वाच्या व्याख्येतून एक लहानशी पळवाट काढता आली असती. परंतु आंबेडकर आणि त्यांचे नागपुरास बौद्ध झालेले सर्व महार अनुयायी हे आता निर्भेळ भारतीय बौद्ध आहेत. अर्थातत्यांची पितृभूमी त्यांच्या परंपरागत सहस्रावधी पूर्वजांच्या पिढ्या जेथे नांदत आल्या अशी पितृभूमी, आसिंधुसिंधु भारतच आहे हे त्यांना नाकारता येणे शक्यच नाही. त्याचप्रमाणे त्यांनी स्वीकारलेल्या बौद्ध धर्माचा संस्थापक, जो 'गौतम बुद्ध' त्याची जन्मभूमी नि कर्मभूमीही भरतखंडच आहे हेही कोणाला नाकारता येणे शक्य नाही. म्हणूनच जगातील 'हीनयानी' असो किंवा 'महायानी' असो किंवा 'वज्रयानी' असो, यच्चयावत बौद्ध भरतखंडालाच आपली पुण्यभूमी मानतात. अर्थातच्जोवर आंबेडकर हे भारतीय बौद्ध आहेत, तोवर त्यांची पितृभूमी आणि पुण्यभूमीही अपरिहार्यपणे 'असिंधुसिंधु भारतच' असल्यामुळे हिंदूत्वाच्या सीमाक्षेत्रातच त्यांना समावेश अटळपणे होणारा आहे. ते सीमाक्षेत्र उल्लंघन करणे हे आंबेडकर बौद्ध आहेत तोपर्यंत तरी त्यांना शक्यच नाही. इश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो. परंतु आपण सगळेच मर्त्य आहोत. त्यायोगे जेव्हा केव्हा आंबेडकरांचा अंतकाल येईल तेव्हा ते बौद्ध आहेत यामुळेच त्यांना हिंदू म्हणूनच मरावे लागेल. मी हिंदू म्हणून मरणार नाही ही त्यांची प्रतिज्ञा शेवटी अशी एक वल्गनाच काय ती ठरणार! त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे जो काही कायापालट झाला तो इतकाच की, हिंदूतील वैदिक पंथाचा त्याग करून ते हिंदूत्वाच्या कक्षेतीलच जे अवैदिक पंथ आहेत, त्यांना पाहिजे तर धर्म म्हणा, त्या धर्मापैकी बौद्ध धर्माचा त्यांनी स्वीकार केला आहे इतकाच काय ते. आपली सीमोल्लंघनाची उडी तोटकी पडून ती हिंदूत्वाच्या सीमाक्षेत्रातच पडली आहेे. 'प्रांशुलभ्ये फले लोभादुद्वाहुरिव वामन:' अशी आपली स्थिती झाली आहे याची टोचणी डॉ. आंबेडकरांनाही मनातल्या मनात लागलेली आहे. यातही काही शंका नाही. म्हणूनच बौद्ध धर्माच्या परंपरागत दीक्षा विधीत नसलेली वाक्ये आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षाविधीत घुसडून 'मी हिंदूधर्माचा त्याग करीत आहे, मी विष्णूला मानीत नाही. बुद्ध हा विष्णूचा अवतार नाही असे पुन्हा पुन्हा घोळून सांगितले. पण ज्या मातापिरांच्या पोटी जन्म झाला त्यांना वैतागाच्या किंवा वायूच्या झटक्यात कोण्या हेकट मुलाने हे माझे पितरच नव्हेत म्हणून नाकारले तरी त्याला त्याचे मातापितर पालटता येणे जसे शक्य नाही, तसेच डॉ. आंबेडकर हिंदूद्वेषाच्या झटक्यात 'मी हिंदू नाही मी हिंदू नाही' असे जरी बरळत राहिले तरी ते जोवर भारतीय बौद्ध आहेत तोवर त्यांना हिंदुत्वाचे बंधनही तोडू म्हटले तरी तोंडता येणे अशक्य आहे.

त्याचप्रमाणे केवळ बौद्ध झाल्याने अस्पृश्यतेची बेडी तुटणार नाही. अस्पृश्यतेची दुष्ट रूढीच नव्हे, पण केवळ जन्मावरूनच मानला जात असलेला जातीभेद नष्ट करण्यासाठी इतर

कोणत्याही त्या मताच्या हिंदुत्वहितचिंतकाप्रमाणे आम्हीही जन्मभर तनमनधनाने कष्ट करीत आलो आहो. हिंदूधर्मातील सहस्रावधी तथाकथित स्पृश्यास्पृश्य संतमहात्म्यांपासून तो सामान्य नागरिकांपर्यंत अस्पृश्यतेची रूढी उच्छेदिण्यासाठी आजवर जे प्रयत्न झाले - आणि त्या प्रयत्नात आंबेडकरांचाही महत्त्वाचा भाग आहे - त्यांच्यायोगे आज अस्पृश्यता व्यवहारातही अक्षरशः मरू घातलेली आहे. आजच्या भारतीय शासनानेही नैर्बंधिक दृष्ट्याच जन्मजात अस्पृश्यता पाळणे हा दंडनीय अपराध ठरविला आहे. आज नगरानगरातून तरी जन्मजात जातीभेदीय रूढीचे उच्चाटन ब्हवंशी झाले असून रोटीबंदीची बेडीसुद्धा तुटत आलेली आहे. अद्यापी दूरवरच्या खेड्यांपाड्यांतून जरी विशेषतः अशिक्षित आणि अडाणी वर्गात अस्पृश्यता उच्चाटली गेलेली नाही हे खरे असले, तरी तिचे उच्चाटन ज्या मार्गाने नगरानगरांतून होत आलेले आहे त्याच मार्गाने खेड्यांतूनही निश्चितपणे होणार आहे. पण केवळ आम्ही बौद्ध धर्म स्वीकारला, आता आम्ही अस्पृश्यच राहिलो नाही.' अशा शाब्दिक घोषणेने खेड्यापाड्यांतून ती अस्पृश्यता चुटकीसरशी नाहीशी होईल ही गोष्ट असंभाव्य आहे, हे जे लाखो विशेषतः आमचे महारबंधू नागपुरास बौद्ध धर्माची दीक्षा घेते झाले, ते त्या समारंभाचा गाजावाजा संपताच आपापल्या खेड्यापाड्यात फुटकळपणे जेव्हा परततील आणि आपल्या दहा-दहा, पाच-पाच झोपड्यांत राहू लागतील. तेव्हा त्यांना त्या समारंभाचा तात्कालिक आवेश उतरताच आढळून येईल की केवळ बौद्ध झाल्याने त्यांची अस्पृश्यता लवलेश उणावली नाही. प्रत्यक्ष हर्षासारख्या बौद्धधर्मीय सम्राटाच्या कालीही बौद्धलोक सुद्धा चांडालांना अस्पृश्यच मानीत होते. त्यांना गावाबाहेर राहावे लागे. आणि गावात यावयाचे तर खुळखुळ्या काठ्या वाजवीत मार्गाच्या कडेकडेने दुसऱ्यास न शिवता चालावे लागे. सिलोनसारख्या बौद्ध देशात आजही बौद्ध लोक ह्या ना त्या प्रकारची अस्पृश्यता खेड्यापाड्यांतून पाळतात. जेथे बौद्धधर्मीयांची ही मनोवृत्ती आहे तेथे बहुसंख्य सनातन हिंदूंची वस्ती असलेल्या आमच्या खेड्यापाड्यांतून हे आज नागपूरला बौद्ध झालेले आमचे महार 'अस्पृश्य' बंधू जेव्हा परततील तेव्हा ते बौद्ध झाले एवढ्यासाठीच काय ते त्यांना तत्काल स्पृश्य मानले जाईल हे असंभवनीय आहे. तशा खेडेगावात हे चारदोन बौद्ध महार विहिरीवर गेले आणि स्पृश्यांना म्हणाले की, आम्ही आता बौद्ध झालो आहोत, आम्ही ईश्वर मानीत नाही, आम्ही हिंदू नाही म्हणून आम्हांस आता ह्या विहीरीवर पाणी भरण्याच्या तुमच्या इतकाच अधिकार आहे!' तर तेवढ्याचसाठी त्या खेड्यातील स्पृश्य लोक त्यांना पाणी भरू देतील का? उलट, हिंदुधर्मबंधूतत्त्वाच्या ओलाव्यामुळे जे 'स्पृश्य' गावकरी पूर्वी त्या महारांचा कैवार घेणारे होते, तेसुद्धा तो धर्मबंधूत्वाचा ओलावा नष्ट झाल्यामुळे त्या मूठभर बौद्ध महारांना परकीयांसारखे पाहू लागतील. आर्थिक दृष्ट्याही केवळ बौद्ध झाल्याने त्या बौद्ध झालेल्या महारांच्या झोपड्यांचे अकस्मात वाडे झालेले आहेत किंवा त्यांच्या अर्ध्या भाकरीचा चमत्कारासरशी भाकऱ्यांचा ढीग झालेला आहे, असे तत्काल थोडेच आढळून येणार आहे?

ह्या नि इतर अशाच कारणांसाठी आमची सर्व तथाकथित अस्पृश्य धर्मबंधूंना अशी कळकळीची विनंती आहे की, त्यांनी ह्या धर्मांतराच्या खड्ड्यात बळेच होऊन उडी टाकू नये. ह्यासाठीच 'अस्पृश्यां'चे इतर मोठमोठे पुढारी ह्या आंबेडकरी धर्मांतराच्या जाळ्यात सापडू इच्छीत नाहीत. श्री. जगजीवनराम, श्री. तपासे, श्री. काजरोळकर, श्री. राजभोज प्रभृती पूर्वास्पृश्य पुढाऱ्यांनी ह्या आंबेडकरी उपद्व्यापाचा आधीच स्पष्टपणे निषेध केलेला आहे. उरली आहे ती अस्पृश्यताही ह्या पुढाऱ्यांनी अवलंबिलेल्या मार्गानेच अधिक त्वरेने नाहीशी होईल.

## २८.५ एक सावधानतेची सूचना - बौद्धस्थान नि नागराज्य

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या काही लाख अनुयायांसह जे संप्रदायान्तर - किंवा पाहिजे तर त्यास धर्मांतर म्हणा- केलेले आहे ते बौद्ध धर्माविषयी त्यांच्या मनात प्रगाढ भक्ती उत्पन्न झाली म्हणून काही केवळ केलेले नाही. त्यांच्या मनाच्या एका अंधारी कप्प्यात आणखी एक हिंदुराष्ट्रघातक राजकीय महत्त्वाकांक्षा दडून बसलेली आहे. ती हीच की, त्यांना स्वतःच्या पीठाचार्यत्वाखाली जर भारतात अवश्य तितके बौद्धांचे संख्याबल वाढविता आले तर झारखंडादिक इतर फुटीर प्रवृत्तींच्या समूळाशी हातमिळवणी करून शक्य होताच एक स्वतंत्र बौद्धस्थान, एक स्वतंत्र नागराज्य स्थापन करावयाचे आहे. ह्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेची शंका येण्याचे कारण त्यांची स्वतःचीच त्यांच्या अनुयायांपुढे दिलेली जी भाषणे त्यांच्या स्वतःच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्यात त्यांनी व्यक्तविलेले विचार हेच होय. ह्या प्रकरणी सध्या आम्ही इतकीच चेतावणी आमच्या हिंदुराष्ट्रास देऊ इच्छितो की, ह्या आंबेडकरी धर्मांतराचे कोणीही आंधळे कौतुक करू नये. प्रथम बॅ. जिना ह्यांना राष्ट्रीय मुसलमान म्हणून कॉंग्रेसने कवटाळले नव्हते का? पाकिस्तानची योजना पहिल्याने पुढे आली तेव्हा याच नेहरूंनी तिला Fantastic Nonsense म्हणून हेटाळले नव्हती का? तसल्या भाबडटपणाच्या नि आंधळेपणाच्या चुका पुन्हा तरी घडू नयेत म्हणून अशा धर्मांतरासारख्या कोणत्याही फुटीर चळवळीविषयी प्रथमपासूनच ‘ढिलेपणाच्या संभ्रमे राहोचि नये.’ संदेहात्मक संकट असे समजून तिचा विरोधच केला पाहिजे. त्यातही जेव्हा बुद्धाच्या अस्थि उकरून काढून परदेशाहून आणून काही राज्यधुरंधर लोकही त्यांना डोक्यावर घेऊन मिरवू लागले आहेत. तेव्हा त्या वाढत्या बुद्धप्रस्थांची धार्मिक नि राष्ट्रीय दृष्टीने आम्हाला चिकित्सा केलीच पाहिजे. त्यांनीच पुन्हा उघडलेल्या त्या बुद्धकाळात इतिहासात पुन्हा एकदा वाचले पाहिजे. आणि ध्यानी घेतले पाहिजे की, अगदी यवन, शक, कुशाण, हूणादिक परकीय आक्रमणापासून तो मुसलमानांच्या स्वाऱ्यांपर्यंत, कुलांगार जयचंदासारख्या फुटकळ व्यक्तींनी किंवा वैयक्तिक स्वार्थाच्या लोभापायी नव्हे तर समूहशः धार्मिक कर्तव्य समजून भारतीय बौद्धांनी त्या परकीय म्लेंच्छ शक्तीशी हातमिळवणी करण्याचा, नि ती, ती म्लेंच्छ राज्ये भारतात स्थापण्याचा हिंदुराज्यद्रोह नि हिंदुराष्ट्रद्रोह पुन्हा पुन्हा केलेला आहे. त्याच त्यांच्या पापाने पेटलेल्या भारतीय क्रोधाच्या प्रचंड यज्ञाग्नीत मागच्या बुद्धप्रस्थाचा बळी पडून भारतातून बुद्ध पूर्वी नामशेष झाला होता.

पुढे मागे तसे काही घडण्याचा संभव आज जरी निश्चितार्थी दिसत नसला तरी हिंदुराष्ट्राच्या या हितशत्रूंच्या या बौद्ध उठावाविषयी अखंड सावधान असावे हेच उत्तम. विष पिऊन मग त्याची परीक्षा पाहात बसण्यापेक्षा ते मुळातच न प्यालेले बरे!

- (केसरी, ऑक्टो. ३० सन १९५६)

## २८.६ हिंदूच्या देवळात अहिंदूंना प्रवेशाचा अधिकार नाही!

पंढरपूरला काही महिन्यांपूर्वी आचार्य विनोबाजी भावे यांच्या वैयक्तिक असत्याग्रहामुळे पंढरपूरच्या काही बडव्यांनी श्री विठ्ठल मंदिरात विनोबांच्या समवेत असलेल्या मुसलमान खिश्चनादिक काही अहिंदू व्यक्तींनाही प्रवेश दिला. इतकेच नव्हे तर हिंदूप्रमाणेच गाभाऱ्यापर्यंतही

ते स्वेच्छासंचार आणि वर्तन करीत असता त्यांना कोणताही अडथळा केला नाही. वृत्तपत्रांतून या घटनेविषयी वरील त्रोटक माहितीपेक्षा काही अधिक विस्तृत माहिती आमच्या तरी वाचनात आलेली नाही. हिंदूंच्या देवळात अहिंदूंना अशा प्रकारचा अनधिकृत प्रवेश दिला गेला या घटनेविरुद्ध हिंदू समाजाच्या वतीने सामुदायिक प्रमाणावर किंवा व्यक्तिशः व्हावा तसा विरोध झाल्याचेही आढळण्यात आले नाही. बहुतेक वृत्तपत्रांनी नि हिंदुत्वनिष्ठ संस्थांनीही थोड्याफार प्रमाणात या प्रकरणाची उपेक्षाच केलेली आढळते.

नाही म्हणावयास, हिंदूंच्या न्याय्य अधिकारास यथाशक्ती संरक्षिण्यासाठी डोळ्यात तेल घालून त्यांना करवेल तितका तरी प्रतिकार बहुधा करीत आलेले हिंदूराज्य पक्षाचे पुढारी, श्री. ल. ग. थत्ते यांनी पंढरपूरास जाऊन या घटनेस विरोध केला होता असे वाचण्यात आले. त्याचे मागोमागच अशीही बातमी वाचली की, पंढरपूरच्या कोणातरी हिंदू सद्‌गृहस्थाने, अहिंदूंना अशा अनधिकृतपणे हिंदूच्या पंढरपूर येथील, 'श्री विठ्ठल मंदिरासारख्या' प्रख्यात देवालयात प्रवेश देऊन ते भ्रष्टविल्याविषयी न्यायालयात बडवे, विनोबा भावे इत्यादी मंडळीवर खटला भरलेला आहे. त्या बातमीतही कितपत तथ्य आहे आणि त्या विषयाचे पुढे काय झाले त्याचीसुद्धा चर्चा झालेली पुढे आढळली नाही. तथापी जर ही गोष्ट खरी असेल, तर पंढरपूरच्या देवळात अहिंदूंनी जो हा प्रवेश केला ती विशिष्ट घटना आता न्यायप्रविष्ट असल्याकारणाने तिच्याविषयी काही चर्चा आम्ही इथे करू शकत नाही. ह्या प्रकरणाचा न्यायालयीन असा जो निकाल लागावयाचा तो लागेपर्यंत आम्ही यासंबंधी काहीही विचार क्वचित प्रदर्शितही केले नसते.

परंतु पंढरपूरच्या ह्या न्यायप्रविष्ट झालेल्या विशिष्ट घटनेचा प्रश्न सोडला असताही 'हिंदूंच्या देवळात अहिंदूंना प्रवेश करण्याचा अधिकार आहे की नाही' ह्या यच्चयावत हिंदू जगताशी संबद्ध असलेल्या प्रश्नाची चर्चा सर्वसामान्यपणे करण्यास कोणचाही प्रत्यवाय नाही. त्यातही अशी चर्चा प्रकटपणे करून या विषयावर आम्ही आमचे मत प्रसिद्ध करावे अशी अत्याग्रहाची पत्रे ठिकठिकाणच्या नामवंत हिंदू कार्यकर्त्यांकडून नि हिंदू पुढाऱ्यांकडून आली. इतकेच नव्हे तर काही वृत्तपत्रातून नि प्रकट सभांतून, रत्नागिरीच्या अखिल भारतीय प्रसिद्धी पावलेल्या श्री पतितपावन मंदिराचा नि आमचा स्पष्टपणे उल्लेख करून त्या मंदिरात आम्ही स्वतः अहिंदूंना आणि त्यातही विशेषतः मुसलमानांनाही प्रवेशाचा अधिकार आहे असे प्रतिपादीत असू आणि तसा प्रवेश देत असू अशी अर्धवट किंवदंतीही निःशंकपणे प्रसृत करण्यात येत होती.

अशा प्रकारे ज्या अर्थी या वादात आमच्या नावाचा आणि मतांचा दुरूपयोग किंवा विपर्यास होत असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत, त्या अर्थी ह्या प्रश्नांविषयी आमचे मत आम्ही स्पष्टपणे पुन्हा एकदा सांगून टाकावे असे आम्हांस वाटते. यासाठी ते मत त्रोटकपणे खाली देत आहो.

## २८.७ श्री पतितपावन मंदिराची परंपरा

रत्नागिरीचे आता सुप्रसिद्ध असलेले 'श्री पतितपावन मंदिर' हे कै. दानवीर श्री. भागोजीशेठ कीर यांनी जेव्हा ई. सन १९२९ च्या आगेमागे आमच्या विनंतीवरून बांधावयाचा संकल्प सोडला, तेव्हा त्या मंदिराचा विशिष्ट हेतू आणि नियोजिलेली परंपरा यांचा स्पष्ट उल्लेख त्या

वेळेसच लिहून काढलेल्या हस्तलिखितात केलेला आहे. ते सर्व वृत्त आणि ती हस्तलिखिते 'रत्नागिरी हिंदूसभेचे प्रतिवृत्त भाग दोन' ह्यामध्ये प्रसिद्धीलेली आहेत. त्यावरून हे स्पष्ट होईल की 'पतितपावन मंदिर' बांधण्यातील मुख्य उद्देश हा सर्व हिंदूमात्रांना जातिनिर्विशेषपणे जेथे समानतेने वागविले जाईल, हिंदू म्हणून वेदोक्ताने सुद्धा पूजा करता येईल असे एक मंदिर असावे हाच होता. त्यामुळे त्या मंदिराचे नाव अखिल हिंदू मंदिर असेच प्रचलित झाले. तेथील त्या वेळच्या प्रत्यक्ष आचारांविषयीची काही कल्पना यावी म्हणून एक गोष्ट सांगितली असताही पुरे आहे. आपल्या पूर्वास्पृश्य धर्मबंधूंतील काही महार, अनुवाक्नि इतर काही संस्कृत मंत्र ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यादिक मुलांसहच शिकवून त्या सर्व मुलांकरवी त्या वेदोक्त मंत्रांच्या सामुदायिक घोषात पतित पावनाच्या मूर्तीवर अखिल हिंदू वेदोक्त अभिषेक सरमिसळपणे उत्सवप्रसंगी केला जाई. अशा त्या काळी अगदी अपूर्व वाटणाऱ्या उपक्रमासारशी दूरदूरच्या वृत्तपत्रंतून अनुकूल नि प्रतिकूल अशी मोठी खळबळ उडून जात असे. त्या काळी तरी एवढ्या मोठ्या प्रमाणात लक्षावधी रूपये खर्चून बांधलेल्या आणि ज्यात पूर्वास्पृष्यांसह सर्व हिंदूमात्रांना अशा समतेने प्रवेशाचा नि पूजा अर्चनाचा अधिकार आचरिता येत असे. इतकेच नव्हे तर जातीनिर्विशेषपणे सहस्र सहस्र पात्रांच्या हिंदू स्त्रीपुरुषांच्या सहभोजनांच्या पंगती प्रकटपणे उठत असत. असे अखिल हिंदू मंदिर साऱ्या भारतात हे रत्नागिरीचे 'श्री पतितपावन मंदिर' हेच काय ते अस्तित्त्वात होते.

ह्या नावलौकिकामुळे अनेक नव्या नि जुन्या मतांचे पुढारी लांबलांबून येऊन रत्नागिरीसारख्या आडवळणी ठिकाणी वसलेल्या नगरासही भेट देत. ते 'पतितपावन मंदिर' आणि तेथील हिंदूसभेच्या वतीने हे समाजक्रांतिकारक जन्मजात जात्युच्छेदनाचे चाललेले अनेक उपक्रम स्वतः पाहून जात. मुंबईच्या टाइम्ससारख्या पत्रातूनसुद्धा पतितपावन मंदिराविषयी चर्चा आणि वृत्त अधूनमधून प्रसिद्ध होत असल्यामुळे ह्या दूरवरून येणाऱ्या पुढाऱ्यांत केव्हा केव्हा ख्रिश्चन मिशनचे पुढारीही असत. कारण रत्नागिरीतील ह्या शुद्धी सहभोजनादिक जात्युच्छेदक चळवळीमुळे हिंदूंना बाटविण्याच्या त्यांच्या चळवळीला चांगलाच खो बसण्याची भीती, ख्रिश्चन मिशनरी मंडळींनाही वाटू लागली होती. त्याचप्रमाणे मुसलमानातीलही काही नेते येत. अर्थातच अशा वेळी श्री पतितपावनाच्या अखिल हिंदू मंदिरात अहिंदूंना प्रवेशाचा अधिकार आहे की नाही हा प्रश्न प्रामुख्याने पुढे येई. तो आम्ही तेथे कसा सोडवीत होतो त्याचे उदाहरण म्हणून खालील एक फुटकळ घटना थोडी सविस्तरपणे देत आहे.

## २८.८मृत्युंगत युसुफ मेहेरअल्ली यांनी श्रीपतितपावन मंदिरास दिलेली भेट

त्याकाळी आम्ही ब्रिटीश शासनाकडून रत्नागिरीस स्थलबद्ध (Interned) झालेले होतो आणि विषयबंदीचीही अट आमच्यावर लादलेली असल्यामुळे राजकारणात आम्ही भाग घेऊ शकत नव्हतो. तथापी वर दिलेल्या शुद्धीसंघटन प्रभृती ज्या समाजक्रांतीच्या चळवळीत आम्ही प्रत्यक्षपणे भाग घेत होतो तीविषयी आमची भेट घेण्यासाठी, मुंबईच्या कॉंग्रेसमध्ये असलेले एक मुस्लिम तरुण पुढारी मृत्यूगत (पैगंबरवासी) युसुफ मेहेरअल्ली हे सन १९३७ मध्ये स्थलबद्धतेतून आमची मुक्तता होण्याचे आधी, रत्नागिरीस आलेले होते. मुसलमान असताही

कॉंग्रेसमध्ये असणे हे त्या दिवसात एका अर्थी थोडेबहुत अलौकिकपणाचे कृत्य समजले जात असल्यामुळे मेहेरअल्लीचा भाव मुंबईच्या कॉंग्रेसीय हिंदू समाजामध्ये बराच वधारलेला असे. आमच्याशी झालेल्या भेटीत त्यांचे वर्तनही आमच्याविषयी आदर दर्शविणारे नि सौजन्यशील होते. राजकारणाची चर्चा आम्हाला विषयबंदीच्या अटीमुळे करता येत नाही हे त्यांना आधीच माहित असल्यामुळे तो विषय थोडक्यात आटोपला. नंतर हिंदू-मुसलमानंाच्या ऐक्याविषयी, त्यांनी आमच्याशी बरीच चर्चा केली. त्या चर्चेचा सविस्तर उल्लेख करण्याचे येथे काही कारण नाही. येथे इतके सांगणे पुरे आहे की ह्या हिंदू- मुस्लिम ऐक्याच्या चर्चेतूनच श्रीपतित पावन मंदिराच्या अखिल हिंदू देवालयात मुसलमानांनाही प्रवेशाचा अधिकार दिलेला आहे की नाही हा प्रश्न निघाला. हिंदूंची देवळे मुसलमानांनाही उघडी केली गेली तर हिंदू-मुस्लिम ऐक्याला फार बळकटी येईल असे मत आमच्या मुंबईच्या कॉंग्रेसमधील राष्ट्रीय दृष्टी बाणलेल्या अनेक हिंदू देशभक्तांचे आहे असे मेहेरअल्ली आणि त्यांचेसमवेत मुंबईहून आलेले त्यांचे काही हिंदू स्नेही म्हणाले, ‘आम्हांला मुंबईला अशी बातमी कळली की, अस्पृश्यांना आपण हे पतितपावनांचे नवीन देऊळ उघडे केलेले आहे. त्याचप्रमाणे मुसलमानांनाही त्या देवळात हिंदुंप्रमाणेच प्रवेश, प्रार्थनादी सर्व अधिकार दिलेले आहेत, हिंदू काय, मुसलमान काय एकाच देवाची लेकरे आहेत या उदात्त तत्त्वावरच उभारलेले हे पतितपावनाचे मंदिर हे नुसते अखिल हिंदू देवालयाच काय ते नसून ते अखिल भारतीय देवालय आहे अशी आम्हा मुंबईकरांची वृत्तपत्रांतील बातम्यांवरून समजून झालेली आहे. त्यामुळे आम्हास हिंदू-मुस्लिम ऐक्याचा हा प्रयत्न इतका महत्त्वाचा वाटला की रत्नागिरीस येण्यात आपले दर्शन घेण्याचा उत्कट हेतू इतका कारणीभूत झाला तितकाच पतितपावनाचे देवालयही स्वतः जाऊन पाहून यावे हा हेतूही कारणीभूत झाला. त्यांने देवालयही स्वतः जाऊन पाहून यावे. परंतु आम्ही आमच्या रत्नागिरीच्या मित्राकडे उतरलो आहोत त्याने पतितपावनाविषयीची ही आमची कल्पना चुकीची आहे असे सांगितले आणि आम्हांस आपणाकडे आणताना आधीच वाटेत लागलेल्या त्या पतितपावन मंदिरापुढेच नेऊन उभे केले. परंतु एकदम आत न जाता पुजाऱ्यास बोलावून घेऊन आमच्या ह्या रत्नागिरीस मित्रोन देवळाच्या प्रवेशद्वारी त्याला विचारले की हे आमचे मुंबईचे काही मुसलमान राष्ट्रभक्त देऊळ पाहण्यास आलेले आहेत. तेव्हा आम्हांस आत नेऊन गाभाऱ्यापर्यंत सर्व देऊळ दाखवावे आणि देवाचे दर्शनही करवावे. पण अशा अर्थाची आमची विनंती ऐकताच त्या पुजाऱ्यांनी आम्हास सांगितले की, ‘छे छे! मला मुसलमानांना देवळात प्रवेश देता येणार नाही! हे हिंदूंचे देऊळ आहे. मुसलमानांची मशीद नव्हे. त्याने असा चक्क नकार दिल्यामुळे आम्ही देवळात प्रवेश केला नाही आणि सरळ आपल्याकडेच आलो.’

आम्ही म्हणालो, ‘आपल्याला हा त्रास पडला ह्याचे आम्हास वाईट वाटते. पण हा घोटाळा तुम्ही आता सांगितलीत अशी कंडी मुंबईला कॉंग्रेसीय वर्तुळाला जी उठली आहे तीमुळे झाला. येथील वस्तुस्थिती त्या पुजाऱ्याने जी सांगितली तीच खरी आहे. हिंदूंच्या इतर सर्व देवळांप्रमाणेच पतितपावन मंदिरातही प्रवेश करण्याचा अहिंदूंना अधिकार नाही. जगातील अन्य धर्मातही असाच प्रघात असतो. मुस्लिम काय, ख्रिश्चन काय कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थानांतून, देवालयातून वा मंदिरातून त्या त्या धर्माच्या श्रद्धावंत अनुयायांवाचून त्या धर्मावर श्रद्धा नसणाऱ्या इतर धर्मीयांना प्रवेश करण्याचा अधिकार नसतोच. तरीही ह्या अखिल हिंदू पतितपावन मंदिराचे संबंधी एक पुरोगामी वैशिष्ट्य आहेच आहे; ते हे की कोणताही

अहिंदू सद्गृहस्थ निरीक्षण, दर्शन, पूजनादिक प्रकरणी अधिकाराने नसला तरी अनुज्ञेने त्या मंदिरात प्रवेश करू शकतो. आमच्या शुद्धी, सहभोजन, संघटनादिक येथील सध्या अपूर्व वाटणाऱ्या कार्यक्रमांना पाहण्यासाठी अधून मधून काही पार्शी, ख्रिश्चन इतकेच काय पण त्यातील मिशनरी पुढारीही वरील अनुज्ञेच्या सवलतीमुळेच या मंदिरात येऊन गेलेले आहेत. व्यवस्थापक म्हणून त्यांच्या समवेत मी किंवा आमचे डॉ. शिंदेही स्वतः जाऊन मंदिरांत त्यांचे यथोचित स्वागत करीत असतो. अशाच घटनांच्या काही बातम्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यामुळे त्या ऐकून जनतेत पसरतात. बरे, आता ते राहू द्या. आपणा मंडळीची इच्छा असल्यास पतितपावन मंदिरात आपणास नेऊन थेट सभामंडपात आपले स्वागत करण्याची माझी सिद्धता आहे.' त्यांनी आनंदाने संमती देताच त्या दिवशी संध्याकाळी श्री. मेहेरअल्ली आणि त्यांच्या मुंबईकर मंडळींना घेऊन मी पतितपावन मंदिराकडे गेलो. संध्याकाळच्या वेळी देवदर्शनास येणारी अनेक स्थानिक मंडळी देवळात जात येत होतीच. मंदिराच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर थोड्याच अंतरावर एक पाटी ठळकपणे लावलेली होती. ती आम्ही मेहेरअल्लीस दाखविली. तीवर लिहिले होते की, 'व्यवस्थापकांच्या विशेष अनुज्ञेवाचून अहिंदूना ह्या मंदिरात प्रवेशाचा अधिकार नाही.'

त्या पाटीविषयी आणि एकंदरीत हिंदूमुसलमानांच्या ऐक्याला अशा सामाजिक देवळाची किंवा मशिदींची अप्रतिहार्य आवश्यकता आहे का आणि असली तरी त्याची शक्यता आहे का इत्यादी प्रश्नांची चर्चा करीत आम्ही मंदिरात पुढे गेलो. कोणी मुसलमान गृहस्थ माझ्या समवेत मंदिरास भेट देणार आहेत हे गावात माहित झाले असताही त्यावेळी दर्शनासाठी येणाऱ्या जाणाऱ्या त्या मंदिरातील लोकांनी आमची कुतूहलानेसुद्धा फारशी विचारपूस केलेली आढळली नाही. ही गोष्ट मेहेरअल्लीच्यासुद्धा ध्यानात आली. त्याचे कारणही आम्ही सांगितले की असे प्रसंग नेहमी येतात. जेथे गोरे अमेरिकन मिशनरीसुद्धा या मंदिरात येऊन जाताना येथील जनतेने पाहिलेले आहेत तेथे त्यांना ह्यात नवीन काहीच वाटत नाही. 'अहिंदूच्या स्पर्शाने देऊळ बाटते असे नाही का आताशा इकडे हिंदू जनतेला वाटत?' मेहेरअल्ली मध्येच म्हणाले. 'छे! छे!' आम्ही विनोदाने उत्तरलो, 'आमच्या या पतितपावनाच्या देवळात येणारा पतितच पावन होतो अशी इकडील हिंदू उलटी बढाई मारण्यास आताशा शिकले आहेत.'

श्री. मेहेरअल्लींना आम्ही जाता जाता तेथे देवळात येणाऱ्या-जाणाऱ्या हिंदू ब्राह्मणांपासून भंग्यापर्यंत सर्व जातीचे हिंदू समतेने कसे मिसळलेले असतात ते वानगी म्हणून जात्या-येत्या व्यक्तींकडे निर्देश करून हळू आपसात सांगत होतो. आता ह्या प्रस्तुत लेखात वरील चर्चेचा किंवा मेहेरअल्लींना सभामंडपात लहानशी पानसुपारी देऊन त्यांची बोळवण करताना झालेल्या लहानसहान भाषणांचा उल्लेख करण्याचे काही एक कारण नसल्याने ते वृत्त गाळून टाकतो. वर दिलेले सर्वच वृत्त मुख्यतः आठवणीवरून दिलेले असल्यामुळे त्यात आलेल्या संवादांतल्या शब्दात काही मागेपुढे झाले असण्याचा संभव आहे. तथापी वर दिल्याप्रमाणेच त्याचा एकंदर आशय हा अगदी यथावत्आहे याची आम्हास शंका वाटत नाही. आणि रत्नागिरीच्या व मुंबईच्या त्या वेळच्या वृत्तपत्रांतील ह्याविषयीच्या कात्रणांचाही पुरावा ज्याला हवा त्याला हुडकून काढता येईल.

वरील वृत्तांतावरून हे उघड होईल की पतितपावनाच्या अखिल हिंदू मंदिरामध्ये अहिंदूंनाही प्रवेशाचा आम्ही अधिकार दिला होता ही अनेकांची झालेली समजूत मुळातच अतथ्य नि निराधार आहे. त्याचप्रमाणे पतितपावन मंदिर ज्या विशेष हेतूने नि परिस्थितीत बांधले गेले ती लक्षात घेता 'व्यवस्थापकांच्या अनुज्ञेने' अहिंदूंना त्या हिंदूमंदिरात नेण्याची जी विशेष सवलत तेथे ठेवलेली असे ती हिंदू हिताच्या दृष्टीने उपयुक्तच होती. परंतु त्या सवलतीचासुद्धा संबंध त्या एका स्थानिक देवळाशीच काय तो होता. त्या एका नवीन देवळाच्या नवीन घटनेसच काय ती सवलत बंधनकारक होती. संबंध हिंदुस्थानात जी आम्हा हिंदूंची सहस्रावधी देवस्थाने शतावधी वर्षांपासून आपापल्या प्राचीन नि भिन्न भिन्न श्रद्धांना आणि परंपरांना धरून चालत आलेली आहेत त्यांच्या त्या प्राचीन परंपरांना ह्या श्री पतितपावनाच्या एका स्थानिक नि नवीन देवळातील परंपरा - आजच्या परिस्थितीत आमच्या हिंदुराष्ट्राच्या संघटनास त्या कितीही अवश्य असल्या तरी - कोणत्याही प्रकारे बंधनकारक होऊ शकत नाहीत.

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात आचार्य विनोबांसमवेत अहिंदू गेले त्या विषयीचा जो हा वादविवाद गेले कित्येक महिने चाललेला आहे त्यात आम्हाला उद्देशून वर्तमानपत्रांतून आणि वैयक्तिक पत्रांतून अनेकांनी प्रामाणिक जिज्ञासाने विनविले आहे की ह्याविषयी आमचे स्वत:चे आजचे मत काय आहे ते पून्हा एकदा आम्ही सविस्तर सांगावे. परंतु ह्या मंदिरप्रवेशाच्याच नव्हे तर ह्या एकंदर हिंदूंच्या आणि अहिंदूंच्या संघर्षाच्या प्रश्नाविषयी हिंदू संघटनाच्या दृष्टीने आम्ही गेल्या तीस-चाळीस वर्षात इतकेकाही लिहिले आहे की आता पुन्हा त्याच त्याच प्रश्नाविषयीची तीच तीच मते सविस्तर - म्हणजे साधक बाधक चर्चा करून सांगत बसण्याचा आम्हांस अगदी कंटाळा आलेला आहे. त्यातही आमच्या कित्येक ग्रंथांतूनही ती मते समावेशिली गेली असल्यामुळे जिज्ञासूंनी आता त्या त्या ग्रंथांतूनच ती वाचावीत हे इष्टतर आहे. तथापी आमचे 'आजचे' मत काय आहे असे जे जिज्ञासू धर्मबांधव 'आजचे' ह्या शब्दावर कटाक्ष रोखून विचारतात त्यांना मात्र थोडे उत्तर देणे अवश्य इष्ट आहे. कारण त्यांच्या प्रश्नात नाविन्य आहे. त्यांना आम्ही पुन्हा एकदा निक्षून सांगतो की ह्याविषयी आम्ही कालपर्यंत जे मत सविस्तरपणे सांगत आलो तेच आमचे मत आजही आम्हास अभिप्रेत वाटत आहे. ते हेच की,

## २८.९ हिंदूंच्या देवालयातून आणि देवस्थानांतून अहिंदूंना मुक्त प्रवेश असता कामा नये!

ख्रिश्चन, यहुदी, मुस्लिम इत्यादी जे अहिंदू धर्म आहेत त्यांच्यावर त्यांच्या कोटी कोटी अनुयांयाची श्रद्धा असो; ते त्यांना प्रिय नि पूज्य वाटोत, त्याचा हिंदूंना काही विषाद वाटण्याचे तेवढ्यापुरते कारण नाही. परंतु त्यांच्या त्यांच्या पुजास्थानात ते ते धर्मीय लोक इतक्या श्रद्धेने ख्रिश्चन, यहुदी वा मुस्लिम संप्रदायानुसार प्रार्थना, पुजाअर्चा करतील तितक्याच श्रद्धेने, हिंदू देवालयातून त्यांच्या त्या अहिंदू समाजाला विनाअट प्रवेशाचा अधिकार दिला असता, ते त्या हिंदू देवस्थानातील पूजा प्रार्थनादिक धर्मकृत्यांना केव्हाही सन्मानू शकणार नाहीत, साहू शकणार नाहीत, इतकेच नव्हे तर सर्वोदयपंथी किंवा जय जगत्पंथी किंवा अशीच इतर गोंडस नावे धारण करणाऱ्या पंथापैकी जी मंडळी हिंदूंनाच काय ते सारखे सांगत नि सतावित राहतात

की, 'तुम्ही तुमच्या देवळातून यच्चयावत अहिंदूंनाही मुक्तद्वार प्रवेशाचा नि संचाराचा अधिकार द्या. हे हिंदूचे देवालय, ही मुस्लिमांची मशीद असा भिन्नभाव मनात आणणे हे अविद्येचे लक्षण आहे. तमोपहत दानवीपणाचे द्योतक आहे. साऱ्या मानवांचा जो देव तोच एकटा खरा देव! अशा मानवतावादी धर्माचा विकास करण्यासाठी सर्व धर्मातील पूजास्थाने सर्व मानवांना उघडी असावीत. निदान तसा आरंभ करण्यासाठी हिंदूंनीतरी आपल्या सर्व देवस्थानांतून हिंदू वा अहिंदू अशा सर्व मानवांना प्रवेश पूजनाचे संचार आचाराचे, समसमान नि मुक्तद्वार अधिकार द्यावेत, मग इतर मुस्लिमादिक अहिंदू त्यांची पुजास्थाने त्यांची सर्व मानवांना मुक्तद्वार करोत वा न करोत!' - त्या जयजगत मंडळींच्या ह्या वेडपट वेदान्तास अनुसरुन जर हिंदूंनी आपली मोठमोठी देवस्थाने अहिंदूंना विशेषतः सर्व मुसलमानांना सताड उघडी करून दिली तर तसा प्रवेशाचा अधिकार मिळताच जे शेकडो मुस्लिम त्या हिंदू देवालयात शिरतील ते मानव म्हणून नव्हेत तर मुस्लिम म्हणूनच शिरतील. त्या देवालयातील मूर्तीस हात जोडण्यासाठी नव्हे तर तिला हातोंड्याने फोडण्याची पहिली संधी केव्हा मिळते ती साधण्यासाठी! हिंदूंच्या देवालयातील मूर्ती पाहताच मुस्लिम समाज, आपले पहिले धर्मकर्तव्य कोणते समजतो ते मुस्लिमांनी हिंदूंपासून काही लपवून ठेविलेले नाही. आठवत नाही का, की जेव्हा मुस्लिमांची सैन्ये प्रथमतःच पंजाब ओलांडून सौराष्ट्र पर्यंत भिडली तेव्हा म्हणजे उण्यापुऱ्या एक सहस्र वर्षांपूर्वीच सुलतान महंमद गझनवी या इस्लामचा धुरंधर सेनापतीने श्रीसोमनाथाची मूर्ती फोडताच शतकाशतकांच्या बोलघुमटातून प्रतिध्वनत जाईल इतक्या मोठ्याने राक्षसी गर्जना केली होती की 'मूर्तीपूजक म्हणून नव्हे तर मूर्तीध्वंसक - बुत्शिकन् असे म्हणवून घेण्यात मी धन्यता मानतो! ही काफराची बुद्धप्रस्थी (मूर्तीपूजा) उखडून टाकण्याची प्रतिज्ञा करूनच मी ह्या इस्लामी तख्तावर चढलो आहे! त्या दिवसापासून तशाच पिसाळलेल्या प्रतिज्ञा करून सुलतानामागून सुलतान रामेश्वरपर्यंत युद्धाचा हलकल्लोळ माजवीत गेले. हिंदुच्या सहस्रावधी मूर्तींचे तोडून-फोडून पीठ करून टाकले, देवस्थाने मातीस मिळवून दिली. असे वाटले की, 'हिंदू देवळांत अहिंदूंना प्रवेशाचा अधिकार द्या की,' अशी कळकळीची विनंती करण्याचा प्रसंगच पुढे निघणाऱ्या कोण्या मानवतावादावर आता येणार नाही. कारण हिंदू देऊळ असे आता ह्या ईस्लामी हातोंड्याच्या आघातातून उरणेच अशक्य आहे! पण!

- पण पुढे उदय पावणाऱ्या सर्वोदय पंथादिक मानवतावाद्यांच्या दुर्दैवाने त्या युद्धकालाच्या मध्यंतरीच त्या दुष्ट नि दंडम मराठ्यांनी तो इस्लामचा हात अकस्मात पकडला आणि उखडून टाकला. प्रत्यक्ष औरंगजेबालाच महाराष्ट्रात गाडून मुठमाती दिली आणि त्याच्या हातातून तो बुत्शिकन्हातोंडा हिसकावून घेऊन त्याच्याच प्रत्याघाताखाली ती सुलतानामागून सुलतानाची तख्ते हिंदूंनी चूर्ण करून टाकली.

परिणामतः गेल्या सहस्र वर्षांपूर्वी हिंदूंचे आणि अहिंदूचे म्हणजे विशेषतः मुसलमानांचे जे धार्मिक सिद्धांतविषयक, धर्माचरणविषयक वैर होते ते आजही तसेच धुमसत राहिले आहे. विनोबांच्या हट्टाग्रहाने पंढरपुरच्या हिंदूंनी अहिंदूंना विठ्ठल मंदिरात येऊ दिले हे वृत्त एकताच मुसलमानांना मात्र तसा आग्रह कोणी विनोबा करावयास आला तर त्याची डाळ येथे शिजायची नाही हे खडसावून सांगण्यासाठीच की काय त्याच आठवड्या- दोन आठवड्यात कोल्हापूरच्या कित्येक मशिदींवर अशा लेखी सूचना फडकल्या की, जे नमाज पढतात त्यांनाच काय तो

मशिदींवर प्रवेश मिळू शकतो! ही मुस्लिम धमकी मात्र या जय जगत्वादी मंडळींनी अलगद गिळून टाकली. तोंडसुद्धा वाकडे केले नाही. इतकेच काय पण त्याच महिन्यात जेव्हा विनोबांना वाटेत असलेल्या एका दर्ग्यात जावेसे वाटले तेव्हा तेथील मुस्लिम प्रमुखाने दटावले की, ह्या दर्ग्यात कोणी स्त्री येऊ शकत नाही. तुमच्या घोळक्यात आलेल्या या बायांना काढून टाका!' ती दटावणी होती मुसलमानांची! अर्थात् तिथे समतेचे वा मानवतावादाचे अवाक्षरही न काढता विनोबांनी त्यांच्या सहचारी मंडळीतील स्त्रीयांना बाजूस काढले आणि दर्ग्यात जाऊन स्वतःस पावन करून घेतले! अगदी आजही पाकिस्तानात सहस्रावधी हिंदू देवालयांचा केवढा भयंकर विध्वंस नि विटबंना झाली! अर्थात जोवर मूर्तीभंजन हे इस्लामचे एक अपरिहार्य कर्तव्य होय ही आजच्या मुसलमानांचीही अढळ निष्ठा आहे आणि त्या परस्परांच्या मनात धर्मशत्रूत्वाची सक्रिय भावना पेटलेली आहे तोवर गेल्या सहस्र वर्षांच्या वर उल्लेखिलेल्या मुसलमानांच्या मूर्तीभंजक अत्याचारांची भयंकर आठवण विसरून हिंदूंनी आपल्या देवालयांतून त्याच मुसलमानांना मुक्तद्वार प्रवेशाचा, संचाराचा नि आचाराचा अधिकार द्यावा असे तुम्ही हिंदूंना कोणत्या तोंडाने सांगू शकता?

२८.९.१ ?

त्यांच्या अहिंसक मानवतावादी धर्माची शिकवण विशेषतः हिंदूंनाच काय ती ही सर्वोदयवादी मानवधर्मीय मंडळी इतकी वर्षे देत आली आहेत की त्याचे उपकार मानावे तितके थोडे आहेत! तथापी हिंदूंनी आपली सर्व देवळे अहिंदूंना विनाअट अजून उघडी केली नाहीत. त्याची खरी कारणे जी वर दिलेली आहेत ती नाहीशी करण्यासाठी आता तरी विनोबाजींनी मुसलमानावरही त्यांच्या अमृततुल्य उपदेशाचा वर्षाव करण्यासाठी आणि त्यांनाही त्यांनी केलेल्या विभागणीच्या वेळच्या हिंदू देवालयांच्या विध्वंसाविषयी नि विटंबनेविषयी पश्चात्ताप वाटावा असा उपक्रम करण्यासाठी पाकिस्तानातच एक अगदी सत्याग्रहाचे दृढव्रत घेतलेली पदयात्रा काढावी हे उपदेश समतेच्या दृष्टीनेही अत्यंत अवश्य आहे. कारण विनोबाजींचा सत्याग्रहावर, आत्मिक बलावर, हृदयपरिवर्तनावर पूर्ण विश्वास आहे. मुसलमानावर तर त्यांचे स्वबांधवांपेक्षाही अधिक प्रेम आहे. परंतु अजून पर्यंत हिंदूची आत्मिक उन्नती करण्यासाठीच काय ती गेली तीच चाळीस वर्षे त्यांनी उदंड श्रम घेतले असताही आता स्थापन झालेल्या पाकिस्तानात अद्याप मुसलमानांच्या आत्मिक उन्नतीसाठी एकही पदयात्रा निदान एक वर्षभर तरी टिकेल इतकी दीर्घ का काढली नाही? मुसलमानांची त्यांनी यामुळे थोडी पक्षपाती उपेक्षाच केली आहे. तरी त्या सर्व जयजगत्वादी मंडळींनी जर पाकिस्तानात एक पदयात्रा तत्काल काढून आणि आयुबखान आणि सिकंदर मिर्झा यांचे हृदयपरिवर्तन करून, विभागणीच्या वेळी उद्ध्वस्त केलेल्या महत्त्वाच्या हिंदू देवालयांचा जरी पुनरुद्धार करविला आणि त्यात हिंदूंना निर्विघ्नपणे पुन्हा मूर्तीपूजा इत्यादी धार्मिक कार्ये करता येऊ लागली तर अर्थातच त्याची अनुकूल प्रतिक्रिया हिंदुस्थानातही होईल. पाकिस्तानात अनेक मशिदीत हिंदू बांधवांच्यासाठी राखून ठेवलेल्या एका तरी विभागात त्यांना त्यांच्यापुरती देवमूर्तीची पूजा-अर्चा करता येऊ लागली आणि हिंदुस्थानात हिंदू मंदिरांतून अहिंदूंना मुक्तद्वार प्रवेश मिळून देवळातच मुसलमान निमाज निर्विघ्नपणे पढू लागले, ख्रिश्चन ख्रिस्तमस पाळू लागले तर! मानवधर्माचा केवढा विजय होईल. आम्हीसुद्धा जयजगतची घोषणा करीत विनोबाजींचे अभिनंदन करू शकू. म्हणून

विनोबाजींनी पाकिस्तानात एकदा तरी पदयात्रा अवश्यमेव करून पाहावी. तेवढे धाडस तरी आता केलेच पाहिजे.

पण -

पण सध्या तरी विनोबाजी ते पाकिस्तानात पदयात्रा करण्याचे धाडस करतील असे दिसत नाही. तोपर्यंत हिंदूंची देवळे, हिंदूंची पुजास्थळे म्हणूनच काय ती आणि मुसलमांनाच्या मशिदी, मुसलमानांची प्रार्थनास्थाने आज आहेत तशीच निरनिराळी राहणार. आम्हास वाटते या परिस्थितीत सर्व मनुष्यमात्रांनी कोणताही अंतर्गत अपमानास्पद विभेद न मानता केवळ मानव म्हणूनच समसमानपणे पूजाप्रार्थना स्थापावी हीच काय ती एक तोंड आहे. अशा पूजाकेंद्रास आमची खरोखरच प्रतिकूलता नाही.

जय जगत!

***

# २९ हिंदू नागलोक ख्रिश्चन का होतात ?

यास कारण हा आत्मघातकी-सनातन-दुराग्रह!!

आसामच्या आसपासच्या पाहाडांतून लक्षावधी नाग जातीचे लोक राहात आहेत. महाभारतात अर्जुनाने बारा वर्षे ब्रह्मचर्यांचे व्रत घेऊन तीर्थाटन करीत असता ज्या नाग राजाच्या उलुपी नामक राजकन्येशी स्वयंवर केल्याची कथा आहे ते नाग लोक हेच होत असे सनातनी हिंदूदेखील मानतात. नाग लोक तर क्षत्रिय कुलावंतस अर्जुनाने आपली राजकन्या जी उलुपी, तिच्याशी स्वयंवर केले होते, ही आपल्या नागकुलाच्या गौरवाची कथा पाळण्यातील गाण्यापासून शिकत, ऐकत आणि आळवीत असतात. ही सुंदर कथा महाभारतातील आदी पर्वात २१४ व्या अध्यायात वर्णिली आहे. ती संक्षेपतः अशी -

त्या अभिजात अशा पुरुष अर्जुनाला पाहून राजकन्या उलुपी आपल्या मुग्ध भावनांनी त्याची  हार्दिक पूजा करू लागली. तेव्हा साहजिकच अर्जुनाने प्रारंभीचे प्रश्न तिला केले -

‘हे सुभगे! हा देश कोणता? तू कोण, कुणाची मुलगी?’

उलुपीचे किंचित मुग्ध अंत:करण शब्दायमान झाले - ऐरावत कुलात कौरव्य नावाचा जो पन्नग, त्याची मी उलुपी मुलगी. हे पुरुषसिंहा अभिषेकार्थ तू अवतीर्ण झालेला पाहून मी काममूर्छित झाल्ये आहे. तेव्हा आज तू मला आत्मभोग देऊन शांतराग कर.’

भावमुग्धा उलुपीच्या ह्या राजवृत्तीच्या अतिलंपट शब्दांवर अर्जुन म्हणाला - हे कल्याणी! मी कधीही कोणतेही असत्य बोलत नाही. बारा वर्षांचे ब्रह्मचर्यव्रत मी घेतले आहे. धर्मराजाने मला तशी आज्ञा केली आहे. मी स्वतंत्र नाही.

तेव्हा उलुपी म्हणाली -

‘द्रौपदीच्या सहवास हेतूसाठी तुम्ही तो पारस्परिक संधी केला होता. त्याची वनवासाची अट तू पाळली आहेस. त्या संधीचा जो हेतू तो तुझ्या त्या वनवासाने पूर्ण झालेला आहे. आता धर्माचे बुजगावणे दाखवून अधर्माला प्रवृत्त होऊ नकोस. का की तू अंगीकार न केलास तर माझा प्राण जाईल. आर्ताचे परित्राण करणे, हे तुझे कर्तव्य त्वा केले पाहिजेस. ह्या कर्तव्याचरणाने तुझ्या ह्या धर्माला दोष लागत नाही.’ उलुपीच्या भावभावनांचे तात्त्विक अर्थरहस्य समजून आणि उमजून आल्यामुळे अर्जुनाने त्या धर्मकारणासाठी नागप्रासादात ती रात्र उलुपीसह व्यतीत केली. सकाळी उठून ती दोघे पुनश्च गंगाद्वारी आली. ती साध्वी उलुपी त्याला तेथे सोडून पुनरपी आपल्या मंदिराकडे निघून गेली. ‘परित्यज्य गता साध्वी चोलुपी निजमंदिरम्!’

या भारतातील उल्लेखावरून आणि या लोकांच्या परंपरागत दंतकथेवरून हे लोक भारतात आज प्राचीन कालापासून निवसत आलेले आहेत ते स्पष्ट होते. आज या लोकांना तेथील इतर हिंदू लोकांकडून एक अस्पृश्य जात मानण्यात येत आहे. परंतु या नागजातीच्या राजकन्येशी उलुपीशी, क्षत्रिय कुलावंतास अर्जुनाने स्वंयवर केले असताही त्याचेवर बहिष्कार पडल्याचा उल्लेख महाभारतात नाही. कदाचित श्रीकृष्णाच्या काळचे आमचे पूर्वज आम्हा आजच्या

हिंदूंइतके सनातन धर्माभिमानी नसावेत! आर्य कुलात आणि नागकुलात त्यावेळी जरी असे अनेक संबंध होत, तरी आज त्या यच्चयावत नाग लोकांसच सनातन हिंदू अस्पृश्य मानतात.

कोणत्याही आचारात स्वयंसिद्ध आणि त्रिकालाबाधित धार्मिकता नसून ज्या परिस्थितीत ज्या समाजास तो आचार जोवर हितावह होतो, त्या परिस्थितीत त्या समाजात तो आचारच सदाचार, धार्मिक आचार मानला जाणे इष्ट आहे. पण जेव्हा तो आचार समाजहितघातक होऊ लागले तेव्हा तो त्याज्यच ठरला पाहिजे. जर आचार हा स्वयंसिद्धच सदाचार असता, सर्व मनुष्य जातीस तो सर्वत्र तसाच लोकहितकारक ठरला असता. पण तसे होत नाही ही गोष्ट इतर अनेक जातीतींल सदाचारांच्या परस्परविरुद्ध कल्पनांवरून आणि रूढींवरून जशी सिद्ध होते, तशीच ती या नागलोकांतील चालीरीतीवरूनही होते. हे नाग त्यांच्या मुली प्रौढ होईतो विवाह करीत नाहीत. विवाह होईतो सर्व कुमार आणि कुमारी एकत्र राहतात. त्या कौमार्यावस्थेत त्यांचे संबंध घडले तरी ते विचारात घेण्यात येत नाहीत. मुली प्रौढपणी जेव्हा विवाह करण्याचे मनात आणतात, तेव्हा उलुपीप्रमाणेच बहुधा स्वयंवर करतात. विवाहाची बंधने दृढ असतात. तथापी घटस्फोटचा आणि पुनर्विवाहाचा अधिकार स्त्रीपुरुषांस उभयतांसही असतो. ही जाती फार लढवय्यी. यांच्यावर ब्रिटिशांनादेखील शंभरावर लहानमोठ्या चढाया कराव्या लागल्या. त्यांच्या आपसातही कठोर चढाया होत. तेव्हा शत्रूंची उडविलेली शिरे दोन्ही पक्ष आपल्या गावच्या सीमेवरील झाडांवर ठेवीत आणि संधी होताना ज्याची त्यांची शिरे परत देणे, ही दोन्ही पक्षांतील एक प्रमुख अट असे. धनुष्यबाण घेऊन ते मृगया करतात.

नागांचा रंग तांबुस, मुद्रा प्रसन्न, कपाळ विशाल आणि अंगकाठी उंच असते. नाग लोक उल्लिंग (नागडे) राहतात. त्यांची राजधानी जी कोहिमा, त्या भर राजधानीतही बाजारांतून, घरांतून, दुकानातून नागनागिणी स्त्रिया आणि पुरुष नि:संकोचपणे अगदी नागव्या वावरत असतात. जरी त्यांना सूत कातणे आणि विणणे येते आणि तसे कापड विणून ते विकतातही, तथापी नग्न राहणे हा ते आपला जातीय धर्म समजतात. आपल्या इकडे कोणी नागवा नाचू लागला तर जशी ती निर्लज्जपणाची पराकाष्ठा समजली जाते, तशीच नाचताना नागवे न नाचणे, ही तिकडे निलाजरेपणाची सीमाच समजली जाते. लाज वाटल्यावाचून कोणी काही छपवीत नाही. पाप, न्यूनता वाटल्यावाचून लाज वाटत नाही. नागांच्या मनात शरीराच्या नैसर्गिक रचनेत काही पाप आहे अशी जाणीवच नसल्याने त्यांस त्यात छपविण्यासारखे काहीच वाटत नाही. आणि म्हणून मिल्टनचा तो Honour dishonourable त्यांच्यात अजून शिरला नाही.

ही गोष्ट आम्ही काही वर्षांपूर्वी अशी अगदी निर्भयपणे प्रसिद्ध करण्यास क्वचित कचरलो असतो. कारण युरोपमध्ये सदैव अत्यंत थंडी असल्याने कपड्यांच्या कफनीत देह गुदमरेतो गुंडाळून ठेवावा लागतो आणि युरोपमध्ये जे करावे लागते तसे करणे म्हणजे सभ्यता, सुधारणा अशी आज सुधारणेची व्याख्या पडली. त्यामुळे हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशातही कपड्यांत शरीरास युरोपप्रमाणे मढवून टाकण्याची सभ्यता सोडून नाग लोक नागवे नाचतात असे सांगताच एखादी मिस मेयो आमच्या हिंदी लोकांच्या रानटीपणाचे हे प्रत्यंतर म्हणून तेही आम्हा पाप्यांचे बिंग बाहेर फोडती, पण आता नाग लोक अगदी नागवे राहण्यास सदाचार समजतात. हे प्रकटपणे सांगण्यास आम्हास रानटी म्हणविले जाण्याची ती भीती फारशी उरली

नाही. कारण पूर्वी ख्रिश्चन लोकांतच नागवे राहण्यास धर्माचार समजणारा आणि तसे आचरण करणारा एक पंथ होता, ही गोष्ट जरी सोडली तरी अगदी आजही जर्मनी, फ्रान्स प्रभती युरोपियन देशांतून अगदी उल्लिंग राहणे, हेच सदाचारी जीवन मानणाऱ्या सुशिक्षित लोकांच्या लहान लहान वसाहतीच स्थापन होत आहेत. आई, बायको, मुले, पाहुणे रावळे सर्व अगदी नागवेपणे संमीलित होऊन वावरणारी कुटुंबेची कुटुंबे नांदताहेत आणि इग्लंडमध्येही असा एक संघ अलीकडेच निघाला आहे. तेव्हा आता तरी नागवे नाचणे हा या नागलोकांचा फारसा रानटीपणा होणारा नाही. कारण युरोपमध्ये नागवे नाचतात आणि जे युरोपियन असते ते रानटी नसते हा त्रिकालाबाधित सिद्धांतच पडला आहे! नव्हे का?

सनातनी हिंदूप्रमाणे हे नागही पर्जन्याची, विजेची, भूमीची अशा देवता मानतात. त्यांचा पुनर्जन्मावरही विश्वास आहे. इतकेच नव्हे तर शुभाशुभ कार्याप्रमाणे मनुष्यास मेल्यानंतर काय गती मिळते, याचाही शोध त्यांनी लावला आहे. तो असा की पुण्यवान पुरुष मेल्यानंतर नक्षत्र होतो आणि पापी मधुमक्षिका होतो. मेल्यानंतरच्या स्थितीचे, स्मशानाच्या पल्याडच्या त्या अनोळखी प्रदेशाचे वर्णन पुष्कळ पारलौकिक भूगोलज्ञांनी आजवर इतक्या परस्परविरुद्ध भाषेत केले आहे की, लंडनहून आलेल्या चार माणसांपैकी एकाने ते नगर आहे, दुसऱ्याने ते सरोवर आहे, तिसऱ्याने ते झाड आहे आणि चौथ्याने ते काहीच नाही असे सांगितले. आणि पुन्हा प्रत्येकाने ते लंडन मी समग्र प्रत्यक्ष पाहिले म्हणून शपथ घेतली, तरी त्याचे काहीही आश्चर्य वाटण्याची आवश्यकताच भासू नये. पण त्या सर्व शोधात नाग लोकांचाच शोध जर खरा असेल आणि जर मरणानंतर पुण्यासाठी नक्षत्र व्हावे लागेल आणि पापासाठी मधमाशी, तर आपण तर बुवा पुण्याहून पापच बरे मानू! कारण नक्षत्र होऊन स्वतःच सारखे जळत राहण्यापेक्षा मधमाशी होऊन फुलांच्या सुंदर रंगीबेरंगी ताटव्यांतून गुंजारव करीत पोटभर मध खात राहण्याची सोयच अधिक सोईस्कर आहे, असे कोणताही व्यवहारज्ञ मनुष्य म्हणेल! तथापी जोवर कोणच्याही मध खाऊन मस्त झालेल्या मधमाशीने ही मध खाण्याची चैन आपणास आपल्या गेल्या जन्मीच्या पापामुळे संपादिता आली म्हणून प्रत्यक्ष येऊन कोणास सांगितले नाही, तोवर केवळ नागलोकांच्या सांगण्यामुळेच कोणी हुरळून जाऊन आजच्या आजच पाप करू लागू नये! तसा प्रत्यक्ष पुरावा मिळताच आम्ही तो तत्काळ कळवू. तोवर दम धरावा!

या नागलोकांच्या रूपरंगादी वरील वर्णनाची अमेरिकेतील रेड इडियन लोकांचे रूप, रंग, वर्ण इतके मिळते जुळते आहेत की ह्या दोघांची मूळची जात एकच असावी असे अनुमान काढण्याचा मोह कोणासही पडावा. दोघेही मृगयाशील, रंगाने तांबूस, शरीराने बळकट, मुद्रा समसमान. त्यातही पुराणांतून नागलोक पाताळात राहतात आणि ते पाण्यातून वर येत, असे वर्णन वरचेवर येते. अमेरिकेशी उत्तरेच्या टोकाकडून आणि दक्षिण अमेरिकेतून, आशियाच्या लोकांचे दळणवळण फार पूर्वापार चालू असे हेही आता सर्वमान्यच झालेले आहे. तेव्हा ह्या नागलोकांची समुद्रमार्गे भारतातून पाताळात भारतात सारखी ये जा सुरू असे. ह्यांचे वास्तव्य अमेरिकेपर्यंत पसरलेले असे आणि ह्यांच्या अनेक टोळ्या इकडेही प्राचीन कालापासून निवसत असत, असे अनुमान त्या दिशेने पुढील संशोधनाची आवश्यकता भासविण्याइतके तरी विचारार्ह आहेच आहे.

हे नाग लोक स्वतःस हिंदू वंशधर मानतात. हिंदूंची आख्याने, पुराणे, इतिहास ऐकण्यासाठी ते स्वतः अत्यंत उत्कंठित असतात. इतकेच नव्हे तर, जर कोणी अहिंदू त्यांच्यात जाऊन त्यांना हिंदू धर्माविरुद्ध उपदेशू लागला, तर हे अजूनही त्याचा घोर विरोध करतात. पण स्वतःस हिंदू मानणाऱ्या या शूर, धाडसी, प्रामाणिक, उद्योगी लाखो नाग लोकांस आमचे सनातनी हिंदू काय मानतात? तर अस्पृश्य! नाग लोकांची एक स्वतंत्र भाषा आहे. बाजारात ते मोडकी तोंडकी हिंदीही बोलतात. आताशी विद्या शिकण्याची त्यांना फार हौस आली आहे. त्यांची स्वतःची लिपी नाही. म्हणून ते हिंदूंची लिपी आपल्या मुलांस शिकवीण्यासाठी धडपडत आहेत. पण त्यांस ती लिपी शिकवून त्यांची ती ज्ञानलिप्सा आणि धर्मलिप्सा पुरविण्यासाठी, आमचे पंडित किंवा शंकराचार्य मंडळी काय करताहेत? तर त्यांची मुले ते नाग लोक दारासी घेऊन आले तर त्यास 'दूर हो, सावली पडेल!' म्हणून धुडकावून देतात! अगदी क्वचितच नाग लोकांत कोणी संघटनाभिमानी हिंदू जाऊन बसला आणि त्यांस शिकावू लागला तर हे सनातनी हिंदू उलट त्या हिंदूवर बहिष्कार घालतात! गेल्या वर्षी हिंदूसभेच्या स्वामी दर्शनानंदजी नामक एका कार्यकर्त्यास नाग लोकांच्या काही सभासदांनी नाग लोकांवर सध्या मिशनरी मंडळाच्या कोसळलेल्या अरिष्टास नष्ट करण्यास्तव नाग मुलास हिंदूधर्मीय परंपरेचे शिक्षण देण्यासाठी एक वसतिगृह स्थापावे, म्हणून आपण होऊन विनंती केली. पण त्याकामी या आमच्या सनातनी, या आमच्या शंकराचार्यी, मध्वाचार्यी प्रभृती सनातन हिंदूंनी द्रव्यसाहाय्य न देता उलट अस्पृश्यांस देवनागरी लिपी, सांस्कृतादिक पूजापाठ, पौराणिक श्लोक इत्यादी शिकवीण्याच्या या पाखंड योजनेस कसून विरोध केला! नाग लोकांसाठी कोणी शाळा घालीत नाही, कोणी कथा सांगत नाही, पुराणे सांगत नाही, कीर्तने करीत नाहीत - ते हिंदू आहेत, आपण हिंदू आहोत. असा ममत्वाचा स्पर्श या सनातनी हिंदूत कोणाच्याही हृदयास स्पर्शत नाही! आज दहाबारा शंकराचार्य आपसात भांडण्यात गर्क झालेले आहेत. पण त्यांपैकी बहुतेकांस याची चिंता तर राहोच पण माहितीदेखील नाही. पण तरीही नाग लोकांसाठी आता शेकडो शाळा उघडल्या जात आहेत. त्यांच्यात कीर्तने चालली आहेत. पुराणे चालू आहेत - पण ती कोणाची?

कोण्या सनातनी शंकराचार्यांची? हिंदू महंत मठपतींची? नव्हे, नव्हे! - ख्रिस्ती मिशनऱ्यांची! नाग लोकांस अस्पृश्य समजून जे आम्ही केले नाही ते करण्यास प्रारंभ त्यांनी केला आहे. नाग भाषेतील अनेक पुस्तके त्यांनी रोमन लिपीतच लिहून ती रोमन लिपी नागांस दिली आहे! हे मात्र सनातन धर्माच्या विरुद्ध नसल्याने त्याचा कोणाही सनातन्यास विषाद वाटण्याचे कारण नाही! पाद्री लोक नागनागिणींच्या धर्मशिक्षणासाठी पारितोषिके, औषधे प्रभृती प्रकारे लाखो रूपये व्यव करीत आले आहेत. आणि त्यांच्या ह्या सततोद्योगाने आणि आकर्षक प्रवचनांनी जे पूर्वी मिशनऱ्यांना पाहताच शत्रू दिसल्यासारखे कपाळाला आठ्या घालीत तेच नाग लोक आता झटाझट मिशनऱ्याच्या जाळ्यात उड्या घेत आहेत. सध्याच दहा हजारांवर नागा ख्रिस्ती झाले आहेत! इतकेच नव्हे तर एकदा एक गोष्ट स्वीकारली की तिचा प्राणांतही अभिमान न सोडण्याच्या त्यांच्या जातीप्रवृत्तीनुसार ते ख्रिश्चन धर्माचे उत्कट अभिमानी होताहेत आणि आता या बाटलेल्यांच्या विलासी जीवनास पाहून त्या बाट्यांच्याच प्रयत्नाने ते उरलेले लोकही अधिकच त्वरेने ख्रिश्चन धर्मात शिरण्याचा उत्कट संभव आहे.

उभ्या भारतात भांडणतंटे होता होता, कमीत कमी पंधरा वीस तरी शंकराचार्य, आमच्या धर्माच्या प्रचारकांचे पोप महाराज, नांदताहेत. पण नागजातीसारखी एक शूर, प्रामाणिक, पुरातन आणि स्वतःस अत्यंत अभिमानाने आजवर हिंदू मानीत आलेली, लाखो लोकांची जात, आपल्या हिंदू राष्ट्रास आमच्याच सैतानी दुराग्रहाने अंतरून, मिशनऱ्यांच्या भक्षस्थानी पडते आहे, हरिद्वेष्ट्यांचा पक्ष प्रबळ करीत आहे, याची त्यापैकी किती शंकराचार्यांना माहिती तरी आहे? त्यांच्या कोणाच्या तरी मठात मिशनरी आणि मुल्ला लोक हिंदुस्थानच्या किती भागात हिंदूतील कोणच्या जातीत काय कारणासाठी धर्मांतराचा प्रलय मांडीत आहेत, याची आकडेवारी किंवा नुसती नोंद तरी आहे का? एका बिघ्यातला आपला पाचवा वाटा आपणास मिळावा म्हणून, हायकोर्टापर्यंत लढणाऱ्या एखाद्या भांडखोर क्षुद्र भाउबंदकीची क्षुद्र भांडणे भांडण्यात इकडे गर्क आहेत. युरोप, अमेरिकेतून इकडे येऊन स्वतःचे लाखो रूपये पाण्यासारखे ओतून, आसामच्या दुर्गम पाहाडात, उन्हातान्हात, रात्रंदिवस, त्या कडव्या नाग लोकांसही मायामोहाने माणसाळून ख्रिश्चन धर्मात आणणारे कुठे ते ख्रिस्त प्रचारक मिशनरी! आणि मुसलमान लोक किंवा ख्रिश्चन लोक यांच्यात हिंदुधर्म प्रचाराचे कार्य करून त्यांस हिंदू करून घेण्याचा प्रश्न तर राहोच, परंतु ते तिकडचे लाखो नाग किंवा हे इकडचे सत्पंथी लोक, आम्ही हिंदू! आम्ही हिंदू! आम्हांस स्वीकारा! म्हणून पायाशी लोटांगणे घालीत असता, त्यास लाथाडून तुम्ही हिंदूच नाही! म्हणून त्यास दूर ढकलणारे कुठे हे आमचे हिंदू धर्मप्रचारक शंकराचार्य, वल्लभाचार्य नि इतर संत महंत, मठपती!

- (श्रद्धानंद दि. ९-८-१९३१)

***

# ३० ही खिलाफत म्हणजे आहे तरी काय?

केव्हा केव्हा एखादी व्यक्ती जिवंत असताना ती जितकी उपद्व्यापी किंवा उपद्रवी नसते तितकी ती मेल्यावर तिचे उठलेले भूत असते हे भुताखेतावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचे म्हणणे पुष्कळ वेळा काही काही संस्थांसही लागू पडते यात शंका नाही. मुसलमानी जगताची काही काळ अधिष्ठात्री असलेली जी सार्वभौम संस्था खिलाफत, तिच्या प्रकरणाचाही असाच अनुभव सध्या येऊ लागला आहे. ती खिलाफत संस्था या शतकात ज्यांच्या हातात सर्वस्वी सापडलेली होती त्या तुर्कराष्ट्राने शेवटचा सुलतान अगदी शेवटचा खलीफा झालेल्या त्यांच्या काजीस महायुद्धानंतर पदच्युत केल्यानंतर मुस्तफा केमल पाशाच्या उभारणीने त्या खिलाफत संस्थेचाही अंत करून तिला मूठमाती दिली. परंतु मुसलमानी जगताच्या आजमितीस तरी अगदी शिरोभागी असलेल्या बलवान, बुद्धीमान, कर्तृत्ववान अशा तुर्क राष्ट्राने त्या खिलाफतीस आपल्या राष्ट्रात जरी नामशेष करून टाकली असली तरी तिचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न हिंदुस्थानातील मुसलमानांनी आरंभला आहे. त्यातही विशेष आश्चर्याची गोष्ट ही की त्या खलीफा पदाचा उपभोग ज्या तुर्कस्थानच्या मुसलमानी राष्ट्राने आज शतकोशतके घेतला त्यांना ती संस्था नकोशी होऊन हानीकारक वाटून एखादी ब्याद टाळावी तशा तिरस्काराने त्यांनी ती गाडून टाकली असता हिंदुस्थानातील ज्या हिंदूंचा त्या संस्थेशी लेशमात्र हितसंबंध नाही, असलाच तर जुना अहित संबंध मात्र आहे, त्या हिंदूतीलच काही जणास तिच्या प्रेमाचा पान्हा फुटू लागला. खिलाफत चळवळ हिंदुस्थानात दहाबारा वर्षापूर्वी खूप गाजत होती तेव्हा त्या चळवळीचा प्रसार करण्यासाठी हिंदूप्रचारक हिंदू कार्यवाह आणि हिंदू पुढारी झटत होते आणि लक्षावधी रूपये त्या हिंदू खिलाफतवाल्यांनी हिंदू लोकांच्या खिशातून काढून खिलाफत ऑफिसच्या खिशात ओतले. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष मुस्तफा कमालने खलिफास पदच्युत करून त्याची सुलतानगिरी आणि खलिफागिरी काढून घेऊन ती खिलाफत संस्था आमूलाग्र बंद केली, तेव्हा त्या खलिफास खलिफा ह्याच पदवीने हिंदुस्थानात राहावयास येण्याचे प्रेमळ आमंत्रणही काही हिंदू पुढाऱ्यांनी दिले! आणि त्या कार्यी मुसलमानांशी मुसलमानांइतक्याच ममतेने सहकार्य केले! पण खलिफास आणि खिलाफतीस हिंदुस्थानात हिंदूंनी स्थापन करण्याची खटपट करणे म्हणजे काय याची थोडी चर्चा करण्याची देखील बुद्धी कोणास झाली नाही, शुद्ध कोणास राहिली नाही. हिंदुस्थानातील हिंदूनी शंकराचार्य पीठ बंद केले असता ते पुनः स्थापण्यासाठी तुर्कस्थानच्या मुसलमानांनी जर लाखोे रूपयांची वर्गणी जमवून चळवळ करून युद्ध पुकारले असते आणि त्यानेही काही भागत नाही असे पाहून हिंदूनी पीठावरून काढून टाकलेल्या शंकराचार्यांनी आपल्या पुजेच्या बाणासह आणि देवदेवतांच्या मूर्तीसह तुर्कस्थानात येऊन मठ बांधून राहावे म्हणून आमंत्रण दिले असते तरी देखील इतके आश्चर्यकारक झाले नसते. कारण शंकराचार्य जाणून बुजून एक साधू, तुर्कस्थानात हिंदूचा असा प्रबळ समाजही नाही की ज्याला उभारून ते तुर्कीसत्तेस तुर्कस्थानातच पायबंद घालू शकते! पण खलिफा म्हणजे साधू नव्हे, खिलाफत म्हणजे सुलतानी आहे, राजसत्ता आहे आणि तिचे हिंदुस्थानात आगमन व्हावे, संस्थापन व्हावे असे इच्छीणाऱ्या कोट्यवधी हिंदी मुसलमानांचा अंतःस्थ हेतू हिंदुस्थानातच असा इस्लामी केंद्र स्थापण्याचा की त्यायोगे हिंदू संघटनाचे गळ्यात आणखी एक भयंकर धोंड अडकवीली जावी हा आहे; याची उघडपणे मनमोकळी

चर्चादेखील करण्याचे हिंदुराष्ट्रास अवश्य वाटले नाही. हिंदू संघटनाचे तत्त्वज्ञ आणि दूरदर्शी असे दोनचार पुढारी आणि पत्रे सोडली तर आणि त्यांनी प्रथमपासूनच या भाबड्या मूर्खपणाचा जो तीव्र निषेध केला तो अपवादिला तर हिंदू जनतेने आणि हिंदू पुढाऱ्यांनी असा या प्रश्नाचा विचार केला नाही. आपण करतो काय आणि त्याचे परिणाम काय होतील, हे त्यास समजलेच नाही.

पण मुसलमान पुढाऱ्यांस मात्र ते समजले होते. एका बुद्धीपुरस्सर आखलेल्या धोरणाने ते या प्रकरणाचा पिच्छा पुरवीत आले आहेत. खलिफा पदच्युत झाला, ते पदही पदच्युत झाले तरी त्यांनी खिलाफत कार्यालये चालूच ठेवली, खिलाफत आंदोलन जिवंतच ठेवले. आता तर निजामच्या मुलाचा विगत नि पदच्युत खलिफा कन्येशी विवाह करून आणि त्या खलिफास निजाम भोपाळ प्रभृती मुसलमानी संस्थानिकांनी आजवर हिंदूप्रजेच्या पैशातून जे लाखो रूपये चोरले ते पुढेही त्या चळवळीप्रीत्यर्थ तसेच चोरीत राहण्याचे ठरवून तुर्कस्थानात पडलेल्या खिलाफत संस्थेच्या प्रेमास हिंदुस्थानात आणून त्यावर हैद्राबादेस एक टुमदार कबर बांधण्याचा चंग बांधला आहे. मुसलमानी कबरेच्या परिपाठाप्रमाणे हिंदुस्थानात खिलाफतीची बांधली जाणारी ही कबर हिंदूंच्या प्रगतीची मिरवणूक राजमार्गावरून वाजत गाजत जाऊ देण्यास लवकरच अडथळा केल्यावाचून राहणार नाही. निजामापासून तो शौकतअल्लीपर्यंत शेकडो मुसलमान धुरीण आज या कार्यी व्यग्र झालेले असता हिंदूंना मात्र त्याचे अजूनही काहीच गम्य नाही. 'वेडे आहेत झाले हे मौलाना' असे म्हणून यापुढे भागणार नाही. आता या पुढे निदान दहावीस वर्षे तरी या खिलाफतीच्या आफतीचा काटा हिंदू संघटनाचे मर्मी बोचत राहणार आहे याची त्यास अजूनही जाणीव नाही.

हिंदूंच्या या उदासीनतेचे आत्मघातक ढसराईचे एक कारण असे आहे की खिलाफत म्हणजे आहे तरी काय ह्याचे हिंदुस्थानात अजून कोणास फारसे ज्ञानच नाही. पंजाबातील उर्दूशिक्षित हिंदू सोडले तर बाकी उरलेल्या हिंदू जनतेस मुसलमानांच्या हिंदूस्थानाबाहेरील इतिहासाचे, परंपरेचे, धर्मसमजुतीचे स्वरूप माहित नसते. वास्तविक ह्याची फारशी आवश्यकता नाही. नसावयास पाहिजे होती. पण हिंदू मुसलमानात गेल्या खिलाफत चळवळीपासून परत इस्लामी वारे जोराने खेळू लागल्यामुळे ह्या इतिहासाचा, अखिल इस्लामी संस्थाचां आणि आकांक्षाचा थोडाफार परिचय करून घेतल्यावाचून आता गत्यंतरच उरलेले नाही. जर आमच्या हिंदू पत्रकारास, पुढाऱ्यास आणि जनतेस खिलाफत म्हणजे काय याचे ऐतिहासिक आणि पारंपरिक ज्ञान असते तर मागच्या खिलाफत चळवळीचे वेळी हिंदूंनी हिंदूचेच लाखो रूपये खर्चून त्या मुसलमानी धर्मवेडास आपण होऊन हिंदुस्थानात पसरविले, पसरू दिले तसे सहसा झाले नसते. निदान ह्याविषयी जे धोरण धरणे ते बुद्धिपूर्वक आणि युक्तीसंगत असेच ठरविले गेले असते. हुल्लडीसरशी हुरळली शेळी नि लागली लांडग्यापाठी असे झाले नसते. यास्तव यापुढे तरी ज्या अर्थी या खिलाफत चळवळीचा हिंदुस्थानात आणखी काही वर्षे तरी उपसर्ग टळत नाही असे दिसू लागले आहे त्या अर्थी हिंदूतील पत्रकारांनी, पुढाऱ्यांनी आणि हिंदू जनतेने या संस्थेच्या इतिहासाचा, स्वरूपाचा नि तिचे पुनरुज्जीवन करू पाहाणाऱ्या मुसलमानी पुढाऱ्यांच्या आकांक्षांचा बराचसा परिचय करून घेतलाच पाहिजे. म्हणजे तिच्या योगे हिदूंचे काय हिताहित होणारे आहे, अहितकारक अशा तिच्या परिणामास कसे तोंड देता येणार आहे आणि तिच्या

शक्तीची वा शक्यतेची मर्यादा नि जोम किती हे मापता येऊन त्याप्रमाणे त्या प्रकरणी हिंदूंनी संघटनदृष्ट्या काय धोरण ठेवले पाहिजे हे ठरविता येणारे आहे.

खिलाफतीचे पुनरुज्जीवन करण्याच्या हिंदी मुसलमानंच्या खटपटीचे अंतस्थ हेतू हिंदुस्थानातील मुसलमानी समाजाचे धार्मिक हिंदी लोकात संघटित आणि प्रबळ प्रचार करणे हाच केवळ नसून प्रस्तुतच्या राजकरणात ही एक महत्त्वाची उलाढाल घडवून आणणे हेही आहे. परंतु खिलाफतीच्या विषयाची राजकीय गुंतागुंत आम्हास बाजूस सारणे आमच्यावरील विषयबंदीच्या अटीमुळे, भाग आहे. येवढ्यासाठी प्रचलित राजकारणात खिलापतीशी येणारा सबंध सोडून देऊन तिच्या केवळ ऐतिहासिक, धार्मिक आणि संास्कृतिक बाजूचाच काय तो विचार आम्ही या लेखमालेत करू इच्छितो. खलिफा म्हणजे नुसता शंकराचार्य किंवा पोप नव्हे. मुसलमानांचा खलिफा हे शब्द ऐकताच सामन्यतः हिंदू वाचकास हिंदूंच्या शंकराचार्य पीठाची, ख्रिश्चनांच्या पोपची उपमा सुचून खलिफा हा मुसलमानी धर्मपीठाचा तो पोप किंवा शंकराचार्य होय अशी समजूत होते. परंतु ही समजूतच भ्रामक असल्याने खिलाफत प्रकरणी मोठमोठ्या हिंदू पुढाऱ्यांनी आणि हिंदू जनतेने आजवर चालविलेले धोरण चुकत आले. ख्रिश्चनांचा पोप हा केवळ त्यांचा धर्माधिरक्षक होय. त्यास राजशक्ती नसते. इतकेच नव्हे तर तो राजा होऊच शकत नाही. तो संन्यस्तच असावा लागतो. त्याने लग्न करता कामा नये, त्याचा औरस पुत्र त्याचा वारस नसणार. त्याने शस्त्र धरणे अनुचित असणार. जो धर्मदंडाचा तेवढा अधिकारी राजदंडाचा नव्हे, त्याची सत्ता केवळ नैतिक केवळ धार्मिक. युरोपातील मोठमोठे बलाढ्य राजे त्यास एकाएकी चळवळ कापत पण ते त्याच्या शापशक्तीमुळे - दंडशक्तीमुळे नव्हे. कारण येशू ख्रिस्तच मुळी कोणी राज्यसंस्थापक नव्हता. ‘‘मी ऐहिक राज्याची गोष्ट बोलत नाही. तर ‘My kingdom is heaven’ म्हणून येशू ख्रिस्त स्पष्टच म्हणाले. अर्थात त्यांचा उत्तराधिकारी जो पोप तोही त्या स्वर्गातील धर्मसत्तेचा तेवढा अधिकारी! ऐहिक राजसत्तेचा नव्हे. तीच स्थिती हिंदूंच्या आचार्यपीठाची होय. भगवान बुद्धांच्या मागे त्यांचे वसन त्यांनी महाकाश्यपास दिले नि त्यास बुद्धाचा उत्तराधिकारी म्हणजे कर्तुमकर्तुमपेक्षादेखील बुद्धधर्मीयावरील त्याची सत्ता अगदी नाममात्र असे. कारण वास्तविकपणे बुद्धांचा खरा उत्तराधिकारी अशी कोणीही एक व्यक्ती नसून तो ‘संघ’ होय अशी व्यवस्था स्वतः बुद्धदेवांनीच लावून दिली होती. आणि त्यामुळे बुद्धसंघ हाच बुद्धधर्मीयांचा खरा पोप वा पीठाध्यक्ष असे. परंतु त्या संघाचे हातीदेखील केवळ धर्मदंडच होता राजदंड नव्हे. परंतु खिलाफतच्या तत्त्वाप्रमाणे खलिफा हा धर्मदंडाचाच नव्हे तर राजदंडाचाही अप्रतिस्पर्धी, अप्रतिम आणि अनन्य अधिकारी असला पाहिजे, इस्लामी जगताचा तो केवळ धर्माध्यक्षच नव्हे तर सेनाध्यक्ष आणि राजाध्यक्षही असणार. तेव्हा हिंदुस्थानात खलिफास बोलावणे म्हणजे आपल्या कोणा शंकराचार्यांसारख्या एखाद्या महासंन्याशास बोलावून एखाद्या विस्तृत निरूपद्रवी मठात त्याची स्थापना करावयाची अशी काहीशी जी साधीभोळी कल्पना आमच्या हिंदू जनतेच्या डोळ्यासमोर उभी राहते ती मूलतःच चूकीची आहे. खलिफा कोणी केवळ माळ जपणारा सन्यस्त पोप वा शंकराचार्य नसून इस्लामी सैन्याचा अग्रभागी खड्ग उपसून लढणारा सेनापती आणि उभ्या जगावर सम्राटपदाचा अधिकार सांगणारा विजिगीषु नेता होय! निदान असलाच पाहिजे!! आपल्या इकडे खलिफाच्या ह्या धर्मसत्तेच्या आणि राजसत्तेच्या अधिपतित्त्वाची दुहेरी सत्ता सांगणारे जर कोणचे एखादे धर्मपीठ असेल तर ते शिखांच्या दहाव्या गुरूचेच होय. गुरू

हरगोविंदसिंह आणि त्याचा महापराक्रमी वंशज गुरू गोविंद सिंह शिखांचा तो दहावा गुरू. त्यांनी शिखांच्या धर्माध्यक्षत्वासहच त्याचे राज्याध्यक्षत्वही आपल्या हातात केंद्रित केले होते. गुरू गोविंद आपल्या कटीस दोन खड्ग बांधीत. एक योगाचा एक भोगाचा. एक धर्माचा एक राज्याचा. ते शीख राष्ट्राचे शंकराचार्यही होते आणि सरसेनापतीही होते. मुसलमानी खलिफामध्ये मुसलमानी जगतावरील ही दुहेरी सत्ता एकीकृत झालेली असे. या प्रकरणी शिखांच्या दशम गुरूत आणि मुसलमानी खलिफात भेद असा हाच होता की शिखांच्या आद्यगुरूपासून ही दुहेरी सत्ता गुरुपीठांत एकत्र नव्हती. कारण गुरू नानक हे एक साधू तेवढे असत. परंतु मुसलमानी धर्मछळापासून शीख पंथाचे रक्षण करण्याची कामगिरी अंगावर असल्यामुळे त्यांच्या गुरूसही तलवार उपसणे भाग पडले आणि शीख राष्ट्राच्या राजकीय संघटनेच्याही अध्यक्षत्वाची धुरा आपल्या खांद्यावर घ्यावी लागली. परंतु मुसलमानी खलिफात ह्या दोनही सत्ता मूळ उगमापासूनच सहजगत्या एकत्रित झालेल्या होत्या कारण की त्याचा मूळ धर्मसंस्थापकच त्यांचा मूळ राज्यसंस्थापकच होता, महंमद पैगंबर!

## ३०.१ शिया धर्मशास्त्री

म्हणतात की महंमदापासून धर्मस्फूर्तीची दिव्य परंपरा अल्लीच्या घराण्यात आलेली आहे. महंमदाला मुलगा नसल्याने अल्लीलाच त्याने पुत्र मानल्याने वा ह्या मानलेल्या पुत्रासच आपली मुलगी फातिमा हीहीं दिल्याने अल्ली नि त्याचे वंशज महंमदाच्या दिव्य स्फूर्तीचे अंश म्हणूनच धर्माचार्यत्वाचे औरस अधिकारी म्हटले पाहिजेत. लोकांनी खलिफा निवडावा हे तत्त्वच त्यास मुळी मान्य नाही. जमात (लोक) हे खलिफास कसे ओळखतील? खलिफास जी ईश्वरी शक्ती आहे ती ईश्वरच देऊ शकतो. ती त्याने महंमदास दिली ती बीजानुपरंपरेने अल्लीचे वंशात स्थिर झाली. ती ईश्वरी नि जन्मसिद्ध शक्ती आहे. ती लोकांचे इच्छानिच्छेवर अवलंबून नाही. दुसरे असे की त्या शक्तीच्या वास्तव्याने इमाम हा सहजच सद्‌गुणी नि जन्मतः निष्पाप असतो. तिसरी गोष्ट की त्यांचा शेवटचा इमाम-जे मूल या वंशाचे असता नाफ्त झाले- तो फातम म्हणजे सत्‌जिवंत असल्याने ते शेकडो वर्षे झाली असताही नि आणखी शेकडो वर्षे गेली तरी पुन्हा परत येणार हे निश्चितच असल्याने धर्मशास्त्रानुसार दुसरा इमाम वा खलीफा निवडणेच शक्य नाही हे शिया लोकांतील मुख्य तत्त्व झाले, पण या विषयावर,

## ३०.२ सुनी धर्मशास्त्री

म्हणतात की खलिफा महंमदाचे वंशातीलच असावा हे तत्त्वच मुळी चुकीचे आहे. तथापी इतके मात्र खरे की तो महंमदाचे जातीतील म्हणजे कोरेश जातीतील मात्र असला पाहिजे!! कोरेश वर्गाबाहेर खलिफा उत्पन्न होणे शक्य नाही. त्या कोरेश जातीलाच ईश्वराने पैगंबर धाडून पवित्र केलेली आहे. एतदर्थ जो मनुष्य कोरेश जातीतील आहे, स्वतंत्र आहे, शुद्धीवर आहे नि मुसलमानी राज्य हाकण्याची ज्यास शक्ती आहे असा कोणताही मनुष्य खलिफाच्या पदावर नियुक्त करता येईल. परंतु या इमाम पीठावर एकदा कोणा खलिफाची नेमणूक झाली म्हणजे मग मात्र त्याच्या अंगात किती दुर्गुण शिरले किंवा तो कितीही छळ करू लागला तरी त्यास इमामपीठावरून पदच्युत करता येत नाही. इतकेच नव्हे तर तशा पापी दुर्व्यसनी परंतु तो

कोरेश मात्र असला पाहिजे त्या पीठाच्या धर्माचार्यत्वाखाली केलेल्या नि त्याने चालविलेल्या सार्वजनिक प्रार्थना परमेश्वरास पोचतात नि त्यास यथाशास्त्र मान्यही होतात.

शिया व सुनी यांतील नि बहुतेक धर्मशास्त्राची खलिफा कोण असावा या विषयावरची ही मते इतकी परस्पर विरुद्ध आहेत की ह्या दोघांचा मिळून एक इमाम वा खलिफा होणे असंभवनीय आहे. ते जर बहुश: एक मशिदीत प्रार्थनाही करू शकत नाहीत तर ते एकमताने एक खलिफा वा इमाम निवडतील नि त्याचे अध्यक्षत्व मान्य करीत राहतील हे अशक्य आहे.

पुढे जाताजाता येथे हेही सांगणे अवश्य आहे की मुसलमान धर्माची माहिती नसलेल्या एखाद्या भोळ्या हिंदूस एखादा मौलवी जेव्हा जातिभेदाचे व्यंग दाखवून म्हणतो की आमच्यात जातिभेद मुळीच नाही, आम्ही सर्व मनुष्य समान मानतो नि गुणकर्माप्रमाणे त्याची संभावना करतो तेव्हा तो शिया असल्यास त्यास विचारावे की हजरत अंधेखान! तर मग अल्लीच्या वंशाबाहेरच्या मनुष्यास आपण इमाम का बरे मानीत नाही नि सुनी खालिफा का बरे असावा? किंवा प्रार्थना अरबी भाषेतच का बरे चालविली जावी? परमेश्वरही काय कोरेश जातीचा कोणी अरब आहे की काय? की त्यास आपल्या जातीविना इतरांचे हाती अधिकार देणे आवडत नाही?

मुसलमानी पंथातील दोन मुख्य पंथांची खलिफाच्या विषयावर एकवाक्यता होणे किती कठीण आहे हे वर दाखविलेच आहे. परंतु त्यांच्यातील इतर पोटभेदाकडे पाहिले असता हा प्रश्न त्याहूनही कठीणतर आहे हे उघड होईल. कारण हे पंथ बहाई पंथी इतर कित्येक उपपंथी मुसलमानास मुसलमानच म्हणण्यास सिद्ध नाहीत. मग इमामाची गोष्ट दूर. त्याचप्रमाणे बाबी पंथ-नि महंमदानंतर अन्य पैगंबर नि ईश्वरांश उत्पन्न झाले वा होतील हे तर ज्यास मान्य आहे नि त्याप्रमाणे झालेल्या अन्य पैगंबरास महंमदाप्रमाणेच जे मानतात ते एका खलिफाचे छत्राखाली येऊ शकणार नाहीत. कारण की त्यास अन्य मुसलमान मुसलमानच समजत नाहीत. महंमदाचे कट्टे अनुयायी क्रोडो शिया नि सुनी महंमदानंतर अन्य पैगंबर आला होता किंवा येऊ शकतो हे वाक्यप्रयोग ऐकणेही पाप समजतात. तेव्हा ते बहाई इत्यादी लोकांसह प्रार्थना कशी करू शकणार? ते उभयता एका खलिफाचे आचार्यपदाखाली नांदणे म्हणजे हिंदी मुसलमानही एकाच शंकराचार्य धर्माचार्यत्वाखाली एक होणे होय. त्या विरहित बाबी इत्यादी पंथाचे आचार्यपद महंमदाच्या मागून आलेल्या त्यांच्या विशिष्ट पैगंबराच्या वंशातच असावे हा त्यांचाही सिद्धांत आहोच. धर्मशास्त्राच्या दृष्टीने सर्व मुसलमानांचा एकच खलिफा होणे हे याप्रमाणे जवळ जवळ अशक्य असून त्यातही पंथभेदात राष्ट्रभेदाची भर घातली तर हा प्रश्न कधीही न सुटणाराच होणार आहे. आम्ही दिलेल्या त्रोटक इतिहासावरून हे आमच्या हिंदू वाचकांच्या ध्यानात आलेच आलेच असेल की मागे प्रत्येक राष्ट्राचीच नव्हे तर प्रत्येक जातीची-कुळाची देखील प्रवृत्ती खिलाफत आपले हाती ठेवण्याची होती. इजिप्तमध्ये इजिप्शियन, तुर्कात तुर्क, स्पेनात स्प्यानिश ओमियाड याप्रमाणे ज्या त्या मुसलमान देशात तटस्थ मुसलमानच खलिफा असावा किंवा निदान खलिफा तेथे त्यांच्याच हातात आणून ठेवावा असे राज्यलोभाने नेहमीच वाटत होते नि वाटत राहणार.

सर्व जगातील मुलसमानांची परिषद भरवून आम्ही एक खलिफा निवडणार ही केवळ एक इच्छा असू शकली तरी तशी शक्यता मुळीच दिसत नाही हे मुसलमान धर्मशास्त्री जाणून आहेत. पण क्वचित हिंदूंच्या मनावर आपल्या मुसलमानी ऐक्याचे एक आढ्यताखोर दडपण

टाकण्याकरिता ती एक थाप मारण्यात येत असावी. याहून त्यात आम्हास काहीच तथ्य दिसत नाही. असंभवनीय होऊन सर्व मुसलमानांनी एखादा खलिफा निवडला तरी दोन दिवसात पुन्हा -

## ३०.३ ध्राता यथापूर्वमकल्पयत

या न्यायाने एकाच एकवीस खलिफा होण्यास मुळीच विलंब लागणार नाही. आता सर्व मुसलमानांचा नसला तरी निदान सर्व सुनी लोकांचा एक खलिफा वा इमाम होणे हे तत्त्वतः जर संभवनीय आहे तरी आजच्या परिस्थितीत तेही जवळ जवळ संभवनीय नाही. कारण जसे तत्त्वास भीक न घालता आजपर्यंत राज्यलोभ वंशभ्रष्टतेची घमेंड इत्यादी विकारांनी सुनी लोकांस कधीही एकत्र होऊ दिले नाही तसेच यापुढेही त्यांचे एकाच खलिफाचे सत्तेखाली एकत्र होणे अशक्य आहे. खलिफा हा केवळ निष्क्रीय धर्माचार्य वा शांतिरस्तु पुष्टिरस्तु म्हणणारा कोणी पोप असता तर गोष्ट निराळी होती. पण खलिफा धर्माचार्य नव्हे तर मुसलमानी जगताचा स्वामी नि राष्ट्रमुख्य होय. निदान असला पाहिजे अशी समज असल्याने मुसलमानातील कोणतेही जिवंत राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या पुरुषाचे हाती आपले स्वामित्व नाममात्रही जाऊ देण्यास सिद्ध होणार नाही. हिंदूस्थानाचे मुसलमानांची गोष्ट निराळी आहे. त्यांना नाही स्वतःचे घर वा दार. कोणचेही दारी तुकडे मोडण्यास त्यांनी काही अपमान वाटण्याचे कारण नाही. उलट हिंदुस्थानातील हिंदूंची जोपर्यंत अधिक संख्या आहे तोपर्यंत ते वाटेल त्या बाहेरच्या मुसलमानी राष्ट्राशी बादरायण संबंध जोडून, यापुढे मुसलमानी ऐक्याची, प्यानइस्लामिझमची, वा खिलाफतच्या प्रेमाची लाळ घोटून, त्याच्या सहाय्याने आपल्या पक्षाचे सामर्थ्य वाढविण्याचे मनाचे मांडे खात राहणारच. पण तुर्कस्थानने त्यांचा जो अध्यक्ष तोच इमाम वा खलिफा नियुक्त कालावधीत राहणार हे ठरविल्याने नि हा ठराव त्या राष्ट्राच्या नवजीवनास, सामर्थ्यास, नि प्रगतीशीलतेस साजेसा नि सहाय्यकच असल्याने तुर्क लोक बाहेरच्या कोणत्याही राष्ट्राच्या अधिपतीस आपला राजकीय अधिकारी तर राहोच धार्मिक अधिपती तरी समजतील हे अशक्य आहे. उद्या वाटेत तितक्या मौलवींनी वा मुल्लांनी सह्या करून फार तर काय पण इथल्या जमायत उलउलेमा या संस्थेने कळकळीच्या अश्रूंत स्नान करून कुराणाच्या आयताची जपमाळ करून नि केमाल पाशाच्या पायावर अक्षरशः डोके ठेवून जरी त्यास विनविले की आम्ही भरवलेल्या अखिल मुसलमानांच्या सभेत कोणा एकास खलिफा निवडले आहे तर आता तुम्ही त्याचे अंकितपण मान्य करून त्याचे पुढे गुडघे टेका, तर त्या विनंतीस केमाल पाशा काय उत्तर देतील हे सांगावयास पाहिजे असे नाही. ''प्रत्यक्ष परमेश्वर आला तरी त्याला आम्ही हा अधिकार देणार नाही!'' परवाच तुर्की पार्लमेंटमध्ये हे उत्तर जेथे स्वतःच तुर्क अध्यक्षास तुर्कांनी दिले आहे, तिथे बिचाऱ्या महंमद अल्लीसारख्या अस्वतंत्र गुलामगिरीत रखडत असणाऱ्या हिंदुस्थानच्या मुसलमानास तो किती जरी आक्रोश करीत राहील की मी 'प्रथम मुसलमान नि मग हिंदी आहे' तरी कोण भीक घालणार! तीच स्थिती इजिप्तची, अरबांची, इराणची मोरोक्कोची! इराण नि मोरोक्काचा सुलतान हे तर कधीच तुर्कस्थानचे खलिफास मानीत नसून त्यांचे खलिफा जसेचे तसेच पदाधिष्ठित आहेत. महंमदाचे मृत्यूपासून आजपर्यंत ज्या अरबांनी खिलाफत आपले हाती ठेवण्यासाठी एकसारखे बंडे, लढाया,

कत्तली, खून यांनी गर्दी उसळवून दिली आहे ती आज की जेव्हा त्यांच्याच धार्मिक ऐक्यतेचे स्थली राष्ट्रीय ऐक्यतेची कल्पना उद्भत झालेली आहे तेव्हा कोण्या विदेशी दुढ्ढाचाऱ्यास आपण होऊन आपले राष्ट्राध्यक्षत्व किंवा धर्माध्यक्षत्व अर्पितील अशी आशा करणे मूर्खपणाचे आहे. तेव्हा सर्व सुनी मुसलमानांचाही एकच खलिफा होणे हेही खलिफाच्या आजपर्यंतच्या व्याख्येप्रमाणे पुष्कळच कठीण आहे. केवळ अखिल मुसलमानांच्या परिषदा भरवून एक खलिफा निश्चित होणे नि त्याची आज्ञा पाळली जाणे हेही तितकेच अशक्य आहे की जितके लीग ऑफ नेशन्सच्या हुकुमाप्रमाणे सर्व जगातील पार्लमेंटांनी आपली मान तुकवीणे हे असंभवनीय आहे.

मागेदेखील बहुधा एक खलिफा असा झालाच नाही. नि जेव्हा जेव्हा बऱ्याच मोठ्या भागावर जरी एकछत्री खिलाफत झालेली दिसली तरी तेव्हा त्या छत्राचा दंड हा कोणा उलेमांच्या ठरावांच्या कागदाची पुरचुंडी नसून तो रणांगणांत प्रबळतर ठरलेल्या पोलादाची तीक्ष्ण तलवार होती.

सारांश जोवर खिलाफत अधिकार आपले हाती कैंद्रित करण्यासाठी वा नियुक्त केलेल्या खलिफाची सत्ता सर्वत्र मानली जावी म्हणून मुसलमान लोक पूर्वीप्रमाणे आज रणसंग्राम करण्यास सिद्ध नाही - तोपर्यंत खिलाफतीच्या गप्पा हिंदुस्थानातील भाबड्या नि अज्ञानी मुसलमानात नि गयाळ हिंदूत कितीही मारल्या गेल्या तरी सर्व मुसलमानांचा अनन्य साधारण नि एकछत्री खलिफा वा इमाम होणे संभवनीय दिसत नाही. जे संभवनीय दिसते ते इतकेच की प्रत्येक मुसलमानी राष्ट्र आपआपल्या जातीतील नि राष्ट्रातील राज्याध्यक्षासच खलिफाचे अधिकार देतील.

पण सुनी लोकांत केवळ धार्मिक एकाधिपत्यही स्थापित होणे फारसे संभवनीय नाही. जे काही संभवनीय दिसते आहे ते इतकेच की निरनिराळ्या मुसलमानी राष्ट्रातील सुनी लोक आपापले राज्याध्यक्ष खलिफा करतील. शिया नि तदितर मुलसमानी अनेक पंथांचे भिन्न भिन्न धर्मगुरू नि सुनी लोकांत राष्ट्रविभिन्नतेनुसार दहापाच खलिफा अशी बहुतेक पूर्वीप्रमाणेच नव्हे तर त्याहून दुगणी बाचाबाची मुसलमानांत चालू रहाणार हे उघड आहे.

आता या बाचाबाचीत हिंदुस्थानातील मुसलमानांचा कार्यक्रम कसा ठरण्याचा संभव आहे वा त्यांना अभिप्रेत असणाऱ्या कार्यक्रमास कितपत यश मिळण्यास संभव आहे हे पाहू. प्रथमतः हे सांगून टाकले पाहिजे की ज्याला सुनीचा खलिफा कोण असावा या विषयावरील मूलत्वाची ओळख आहे तो मनुष्य सुनी मुसलमान खलिफास हिंदुस्थानात सध्या आणतील किंवा हिंदुस्थानातील कोणा मुसलमानास खलिफा करतील असे म्हणणे किती भ्रामक आहे हे तेव्हाच ओळखून टाकतील, सुनी लोकांचे प्रथम तत्त्वच खलिफा स्वतंत्र असला पाहिजे, हे असल्याने हिंदी सुनी मुसलमान आपण होऊन गुलामगिरीच्या बेड्या आपल्या खलिफास हिंदूस्थानातील नागरिक बनवून त्याचे पायात ठोकतील तर त्यांच्या बुद्धीची प्रसंशा करावी तेवढी थोडीच होणार आहे! खलिफा हा स्वतंत्र असून त्यास मुसलमानी राजसत्ता चालविण्याची पात्रता पाहिजे ह्या तत्त्वांतून तदनुगामी हेही तत्त्व निष्पन्न होते की सत्ता चालविण्याची पात्रता दाखविण्यास त्याला प्रथम राजकीय सत्ता पाहिजे आहे! ती हिंदुस्थानातील परतंत्र मुसलमानात नसल्याने त्यांच्यातील कोणीही खलिफा होऊ शकणार नाही. केवळ काही सुनी पोटभेदाच्या

म्हणण्याप्रमाणे केवळ धर्माचार्यपदाची नैतिक सत्ता खलिफा होण्यास पुरे असे समजले असताही हिंदी मुसलमानांस ही नैतिक सत्तादेखील तुर्क, पठाण, अरब इत्यादी कडव्या जाती चालू देणार नाहीत हे उघड आहे. हिंदी मुसलमानांनी त्यांच्या असहाय्य स्थितीत पठाण, तुर्कांच्या गळ्यात मिठी मारण्यासाठी हात कितीही लांब केले तरी ते आढ्यतेने नि सामर्थ्याने ताठ असणाऱ्या तुर्कादिकांच्या गळ्यापर्यंत पोचणे शक्य नाही. आज दोन-तीन वर्षे हिंदू मुसलमानांच्या लाखो रूपयांचा धूप जाळून अखेर तुर्कांनी त्यांच्या त्या सहाय्यांची नि कळकळीची काय शोभा केली नि 'बोलघेवड्या' हिंदी मुसलमानांस वेळेवर एका शब्दानेही कसे विचारले नाही हे विश्रुतच आहे. तेव्हा हिंदी मुसलमानांतील एखाद्या पुरुषास ते खलिफा नुसत्या धर्माचार्यपदापुरतादेखील कधी तरी मानतील असे समजणे हे मूर्खपणाचे आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करता हिंदी मुसलमानांविषयी इतके निश्चित सांगता येते की प्रस्तुतच्या परतंत्र स्थितीत बाहेरील कोणा नामधारी खलिफास आत आणवून ठेवल्याने किंवा आतील कोणा हिंदी मुसलमानास नामधारी खलिफा निवडून दिल्याने त्यांच्या 'इस्लामी गौरवाच्या' नि भावी सामर्थ्याच्या आकांक्षा कधीही पूर्ण होणार नाहीत ही गोष्ट हिंदी मुसलमान खूप जाणून आहेत. जेव्हा एखादा हिंदू त्यास डोळ्यात आसवे आणून म्हणतो, 'अरेरे! काय शोचनीय गोष्ट आहे! खलिफास तुर्कस्थानातून हाकून दिलेना! बरे तर त्यास आपण आता हिंदुस्थानात आपल्या घरी आणवून ठेवू म्हणजे तर झाले ना?' तेव्हा ते तोंडातल्या तोंडात हासून म्हणत असतील 'वारे वा! एका पायाने लंगडा झालेल्यास दोन्ही पायांनी लुळा झालेला आपले खांद्यावर वाहून नेण्यास सिद्ध होतो!' गादीवरून गडगडत भुईवर पडलेल्यास चितेवर चढून पुन्हा निजवण्याचा हा प्रेमपूर्वक आग्रह करण्याइतके मुसलमान अजून वेडे झाले नाहीत!

सारांश हिंदी मुसलमानांचा सर्व मिळून एक खलिफा वा इमाम होणे हे पांथिक परंपरेने अशक्य आहे. केवळ हिंदी सुनी मुसलमान घेतले तर तेही बाहेरून कोणी निष्क्रीय नि निर्बळ खलिफास आत आणणार नाहीत किंवा त्याच्या त्या परतंत्रावस्थेत आतीलही कोणास स्वत:पुरतादेखील खलिफा निवडणार नाहीत. कारण खलिफास सत्ता हवी नि ती स्वतंत्र सत्ता हवी. या दोन्ही गोष्टींचा हिंदुस्थानातील मुसलमानापाशी पूर्ण अभाव आहे. नि म्हणूनच तिसऱ्या एका मार्गाने जाण्याची हिंदी मुसलमान रात्रंदिवस खटपट करीत आहे. तोच मार्ग हिंदी सुनी मुसलमानांचे पुढारी आज तीन-चार वर्षे गुप्तपणे नि उघडपणे आक्रमित आहेत नि तोच मार्ग हिंदू लोेकांस जितका शीघ्र नि जितका स्पष्टपणे दिसू लागेल तितके त्यास भावी संकटास तोंड देण्याचे सामर्थ्य संपादन करता येईल. खिलाफतीच्या आजपर्यंतच्या सर्व चळवळीचा फलित परिणाम म्हणजे हाच होय की हिंदुस्थानातील निदान सुनी मुसलमानांनी हिंदुस्थानचे बाहेरील कोणा तरी त्यातले त्यात प्रबळ नि सत्ताधीश असणाऱ्या मुसलमानी राष्ट्राध्यक्षास आपला खलिफा मानावे नि त्याचे सहाय्याने आज नाही उद्या पण हिंदुस्थानातही स्वतंत्र मुसलमानी राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करावा असे आज तीन वर्षे त्यांच्यातील पुढाऱ्यांचे बेत चाललेले आहेत. आज तीन वर्षांपर्यंत हिंदूच्या डोळ्यावर अंधतेची झापड पडल्याने त्यांचे हे बेत स्पष्टपणे उर्दू पत्रातून व सरकारी खटल्यातून उघडकीस येत असताही हिंदूंनी तिकडे लक्ष दिले नाही. सुशिक्षित काय, अशिक्षित काय, खिलाफतीच्या चळवळीने जागृत झालेला सर्व मुसलमानी समाज आतल्या आत मनोराज्य करीत बसलेला आहे. त्यातही तुर्कांनी त्यांचे

तोंडास पाने पुसल्याने नि बाहेरचा असा सत्ताधीश नि त्यातलेत्यात प्रबळ मुसलमानी राष्ट्राध्यक्ष अफगाणिस्थानाविना दुसरा कोणी हिंदी मुसलमानांना अधिक सान्निध्य असा उरला नसल्याने अफगाणिस्थानचे अमीरासच आपला खलिफा करण्याचा बेत आज नाही उद्या परिपक्व होईल असा रंग दिसत आहे. हा प्रयत्न आज तीन वर्षे चाललेला आहे, हे विश्रुतच आहे. अफगाणिस्थानातील मागच्या अमिरास ठार मारून जेव्हा ही नवी राज्यक्रांती झाली नि प्रस्तुतचा अमीर गादीवर आला तेव्हा ती राज्यक्रांतीही अफगाणिस्थानच्या या गुप्त आकांक्षेचीच उडालेली एक ठिणगी होती. तेव्हा पासून आजपर्यंत हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठी अफगाणी ठाणबंद घोडे थयथयाट करीत आहेत. अफगाणी पत्रे उघड उघड या चढाईची चर्चा करतात. जर्मन युद्ध चालू असताना अफगाणिस्थानच्या अमीरांशी संगनमत करून त्यास हिंदुस्थानचे सिंहासनावर बसविण्यासाठी येथील मुसलमानांचे सहाय्य देण्यात येईल अशी अभिवचने नि पत्रे नेण्या-आणण्याचे कार्यासाठी काही मुसलमान पकडले गेले होते नि त्यांनी ही गोष्ट मान्यही केली होती. ज्या वेळेला हिंदुस्थानात खिलाफत चळवळ खूप गाजत होती त्याच वेळेस तिकडे सैबेरियाचे किनाऱ्यावर हिंदुस्थानावर मोहजरीन होऊन निघून गेलेल्या अनेक मुसलमानांस सैनिक शिक्षण देण्यात येत होते. त्याविरहित त्याच वेळेला काही मुसलमानी धर्मशास्त्री सभा भरवून अफगाणिस्थानचे अमीरास खलिफा करावे की काय या विषयाची चर्चा करून तदनुकूल लोकमतही सज्ज करू लागले होते. इकडे हिंदुस्थानात ''मुसलमानी धर्माचे गौरवासाठी'' जर एखाद्या इस्लामी राष्ट्राने हिंदुस्थानावर स्वारी केली तर आपण तिचा प्रतिकार करणार नाही - तसा प्रतिकार करणे हे मुसलमानी धर्माविरुद्ध आहे! - असे खिलाफतीचे पुढारी ठासून सांगत होते. त्या प्रमाणे उपदेश देत होते. आजची तीच स्थिती आहे. नव्हे आता आम्ही वर दाखविल्याप्रमाणे खिलाफतीचा प्रश्न अगदी निकडीस आल्या कारणाने अमिराच्या ध्वजाभोवती गोळा होऊन त्यासच आपला खलिफा करावा याहून हिंदी मुसलमानांस त्यांच्या भयंकर महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा दुसरा मार्गच उरला नाही. नुकतेच शौकत अलीने अध्यक्षपदावरून खिलाफत परिषदेत सांगितले की अफगणिस्थानाची नि हिंदुस्थान सरकारची लढाई जुंपल्यास मुसलमानांस सत्याग्रह करणे भाग पडेल. ते इंग्रजास सहाय्य देणार नाहीत. तसे साहाय्य करणे हे ते आपल्या धर्माविरुद्ध समजतील. याहून स्पष्टपणे सांगितल्याविना जर त्यांचे हेतू हिंदी जनतेस कळणार नाहीत तर त्यांच्या बुद्धीभ्रंशांची कीव करावी तेवढी थोडीच आहे. म्हणून आता तरी हिंदूंनी हे निश्चित नि स्पष्टपणे ओळखून ठेवावे की सुशिक्षित काय अशिक्षित काय हिंदी मुसलमानांत हिंदुस्थानवर कोणतीही इस्लामी स्वारी झाल्यास तीविषयी भयंकर सहानुभूती वाटल्याविना राहणार नाही. झोपडी झोपडीपर्यंत 'मुसलमानी अमीर हिंदूस्थानांत उतरला' ह्या एकाच वाक्याने या अज्ञानी नि धर्मवेड्या समाजातील सुप्त 'इस्लामी गौरवाच्या' आकांक्षा भडकून उठतील नि इस्लामी गौरवाच्या दृष्टीने पाहिले असता हिंदुस्थानात पुन्हा इस्लामी पातशाही स्थापन होण्याहून अधिक गौरवाची गोेष्ट या जगात कोणतीही नाही ही गोष्ट केवळ त्यांचे पुढाऱ्यातील काहींचे मनातच नव्हे तर खेड्यापाड्यापर्यंत बिंबलेली आहे. मलबारात मोपल्यांनी 'स्वराज्य'साठी बंड केल्याबरोबर 'तुर्की' निशाण उभारले हे ध्यानात धरा. अलि मुसेलियर नावाच्या त्यांच्या पुढाऱ्यांनी 'स्वराज्य'ची नि 'एकी'ची जी व्याख्या केली ती एखाद्या ब्रीदवाक्याप्रमाणे सर्व हिंदूंनी चित्तात बाळगून ठेवावी, तो आपल्या अनुयायांनी बंड भरभराटीत असता एका सभेत म्हणाला की -

'स्वराज्य म्हणजे मुसलमान राज्य' होय! आणि अलिमुसेलीयर हा मोपल्यांतील कुणी य:कश्चित उडाणटप्पू नसून एक प्रख्यात कुलीन, धार्मिक नि वर्चस्वी गृहस्थ होता. स्वराज्य म्हणजे मुसलमानी राज्य असे त्यांनी कुराणातील आयते वाचून सांगितल्यावर तो म्हणाला आणि 'हिंदू-मुसलमानांची एकी म्हणजे सर्व हिंदूंनी मुसलमान व्हावे' ही होय! हे त्याचेच शब्द आहेत. या शब्दावर शेकडो टाळ्या पडल्या आहेत. या शब्दाचे उतारे अनेक उर्दू पत्रांनी देऊन त्यावर सहानुभूतिपूर्वक होकार भरलेले आहेत. तेव्हा मलबाराच्या अशिक्षित मोपल्यापासून तो इस्लामच्या गौरवासाठी हिंदुस्थानावर स्वारी करणाऱ्या इस्लामी राष्ट्राचा प्रतिकार करणे पाप आहे - हराम - असे समजणाऱ्या सुशिक्षितांच्या अध्यक्षापर्यंत सर्व मुसलमान अफगाणिस्थानातून हिंदुस्थानावर स्वारी झाली असता काय करतील ते हिंदूंनी नीट विचार करून पाहावे. झोपड्यातून 'अल्ला हो अकबर' म्हणून आरोळी उठून अमीराचे सक्रिय अभीष्ट चिंतन होईल नि जर हिंदू त्या वेळी असंघटित सापडतील तर घरोघर मलबार घडणार नाहीच असे सांगता येत नाही. मागे खिलाफताच्या फंडाचे हिशोबात काही घोटाळा झाला हे आपण वाचले आहे. तेव्हा अंती असे सांगण्यात आले नि नेमलेल्या कमेटीने ते सांगणे बरोबर आहे असे आपले मत दिले- की लाखो रूपये अफगाणिस्थानात खिलाफतीच्या नि इस्लामच्या कार्यासाठी खर्चिले आहेत- पण ते कार्य म्हणजे काय हे सांगण्यात इस्लामी चळवळीची हानी असल्यामुळे गुप्तच ठेवणे इष्ट आहे! अफगाणिस्थानात हे गुप्त कार्य कोणते की ज्यासाठी लाखो रूपये खर्च व्हावेत? आणि हिंदूंनी ह्या खिलाफतीच्या फंडास जे सहाय्य केले त्याचे प्रायश्चित्त मिळाले हे योग्य नाही असे तरी का म्हणावे? तेव्हा तुर्कांनी खिलाफत ही संस्था उलथून पाडली म्हणून ती हिंदुस्थानातही उलथून पडली असे हिंदूंनीं समजू नये. इतर देशात राष्ट्रीय भाव जसजसा जागृत होत जाईल नि शिक्षण आणि शाळा यांच्या बौद्धिक प्रकाशात जसजशी ही धार्मिक अंधता हटत जाईल तसतसे खिलाफतीचे महत्त्व मशीदीच्या दाराबाहेर उरणार नाही हे जरी खरे आहे तरी हिंदी मुसलमानांत तरी अशी स्थिती येणे ह्या शतकात असंभवनीय आहे. कारण हिंदुस्थानात शक्य तर मुसलमानी सत्ता स्थापित करावयाची ही त्यांची राजकीय आकांक्षा आहे. हिंदूंनी हे नेहमी ध्यानात बाळगावे की इंग्लीश लोक एखाद्या महायुद्धात गुंतले नि हिंदुस्थानात इंग्रजी सेना फार थोडी उरली की अफगाणिस्थानाकडून हिंदुस्थानावर स्वारी होण्याचा संभव नव्हे जवळ जवळ निश्चय असून त्या वेळेस आतून हिंदी मुसलमन त्यास सक्रिय सहानुभूती दाखविण्यास केव्हाही सोडणार नाहीत कारण मुसलमानी सत्ता हिंदुस्थानात स्थापित करण्याची महत्वाकांक्षा पुरी करण्याचा तोच एक मार्ग आहे. अशा स्थितीत त्यांच्या या राजकीय आकांक्षेस खिलाफतीच्या धार्मिक भावनेच्या पाठिंब्याची अत्यंत आवश्यक असल्याने जगातील इतर मुसलमानांनी खिलाफतीचे उच्चाटन केले तरी हिंदी मुसलमान त्या कल्पनेस धर्मनिष्ठेने म्हणा, राजनीती म्हणून म्हणा किंवा हिंदूंवर आपल्या ऐक्याच्या देखाव्याचे दडपण टाकण्यासाठी म्हणून म्हणा पण खिलाफतीची चळवळ नि भावना सोडणार नाहीत. ते अमीरासच खलिफा करतील. यद्यपी सुनी खलिफा कोरेश वंशीय पाहिजे तथापी पूर्वीपासूनच सुनी समाजात ही अट अवास्तव मानणारा एक पंथ आहे नि आज सुशिक्षित राजनैतिक मुसलमान तिकडे दुर्लक्ष करतील. त्या विरहित शास्त्राधाराने नियुक्त केलेल्या खलिफास शस्त्राधार मिळतोच असे जरी नाही तरी शस्त्राधाराने पुढे आलेल्या खलिफास मात्र शास्त्राधार सहज मिळू शकतो! म्हणून एखाद्या कोरेश वंशीय मुलीशी अमीराचे लग्न लावून वा एखादी

नवी वंशावळ समजून त्यास खलिफा होण्यास योग्य समजण्यात येईल. आजकालचे अमीरासारख्या महत्त्वाकांक्षी पुरूषास हिंदी सुनी मुसलमानांचे पाठबळ हिंदुस्थानापासून असता, नि मागून रशिया उत्तेजन देत असता इंग्लिशास एखाद्या जगयद्धात फसलेले गाठून इंग्रजी सेना ज्यात संपुष्टात आली आहे अशा हिंदुस्थानावर स्वारी करणे काही अशक्य नाही! नव्हे, नव्हे, हा मुसलमानांचा स्पष्ट कार्यक्रम आहे. त्यांच्या चळवळी या एकाच दिशेने प्रेरीत झालेल्या आहेत. इतकेच नव्हे तर या कान्यास हिंदूंची सहानुभूती संपादन करण्याचे प्रयत्नही अफगाणिस्थानात नि हिंदुस्थानात एकसारखे नि उघड उघड चाललेले आहेत. अफगाणिस्थानास समुद्रकिनारा नसल्यामुळे कराचीपर्यंत सर्व (हिंदुस्थान) हिंदूप्रदेश अफगाणिस्थानात मोडण्यात यावा असे प्रयत्न हिंदी मुसलमानांचे संमतीने अफगाणिस्थानात आज दहा वर्षे होत होते. पण आता तर ते सर्व बाजूस राहून हिंदुस्थानावर अमीराची राज्यसत्ता स्थापित झाली व त्याच्या राजवंशात हिंदुस्थानचा मुकुट राहिला तर तोही हिंदुस्थानातील हिंदूस पार्लमेंटचे हक्क देण्यास संमत आहे अशा सूचना उर्दू पत्रांतून नि मुसलमानी पुढाऱ्यांकडून हिंदूस अनेक वेळा होऊ लागल्या आहेत. पण मुसलमांनास तो जसा व्यवहार्य नि जिवंत प्रश्न वाटतो तसा तो हिंदूंच्या बहुतेक पुढाऱ्यांच्या नि क्रोडो अनुयायांच्या शिथील नि अंध बुद्धीस वाटत नाही. मुसलमानांना हा प्रश्न जिवंत व्यवहार्य नि तातडीचा वाटत असल्याने त्यांच्या आशा आकांक्षा उत्तेजित झालेल्या आहेत नि आज नाही उद्या हा प्रसंग ते े ओढून आणवितील अशी त्यास धमक आहे. म्हणून खिलाफत मेली नसून क्वचित, नव्हे बहुतांशी हिंदूस्थानाचे जवळ आली आहे. तुर्कस्थानातून आज नाही उद्या ती अफगाणिस्थानात येऊ शकेल. जर हिंदू असेच शिथील, असंशयी, भोळसट नि असंघटीत राहतील तर एखादे दिवशी ती खिलाफत हिंदुस्थानात येऊन हिंदुस्थानात अफगाणिस्थानचा अमीर हा खलिफा नि सुलतान म्हणून पून्हा राज्य करू लागेल. आम्ही लिहीत आहो ही गोष्ट प्रत्येक शिक्षीत नि धार्मिक मुसलमान जाणीत आहे. तो ही आकांक्षा नाकारू शकणार नाही की तो यासाठी साक्रिय अभिष्टचिंतन करील, करीत आहे. प्रत्येक समंजस मुसलमान हे जाणून आहे. केवळ दुःखाची गोष्ट ही की ही इतकी महत्त्वाची गोष्ट समंजस म्हणविणाऱ्या क्रोडो हिंदूंत मात्र प्रत्येक हिंदू जाणत नाही! ही गोष्ट, हा बेत, ही मुसलमानांची केवळ आकांक्षा हिंदुत्वाचे दृष्टीने किती भयंकर आहे हे त्यास अजून समजत नाही! इतकेच नव्हे तर या आकांक्षेची धार तो न कळत लाखो रूपये देऊन, लाखो लेख लिहून खिलाफतीचे सहाणेवर स्वतः घाशीत आहे, तीक्ष्ण करीत आहे!

तर मग काय हे नवीन संकट पाहून हिंदूंनी आपल्या राष्ट्राच्या भावी सामर्थ्याच्या आशा सर्व विफल समजावयाच्या? छे! छे! मुळीच नाही. असली दहा संकटे एकसमयावच्छेदे करून जरी आली तरी हिंदुराष्ट्राच्या भावी सामर्थ्याच्या नि उत्कर्षाच्या नि गौरवाच्या आकांक्षा सफल झाल्यावाचून राहणार नाहीत. मात्र आपण राजकारणातील सांप्रतचा भोळसटपणा नि 'आत्मिक बळ'' 'सत्यमेव जयते'' 'विश्वास'' इत्यादी फोल शब्द भरीव पोलादापासून आपले सरंक्षण करू शकतील हा भाबडेपणा सोडला पाहिजे! मग काय मुसलमानास शिव्या-शापाची लाखोली वहावयाची? आपले संघटन सामर्थ्याच्या भरीव पायावर नि पोलादाच्या तीक्ष्ण शस्त्रावर उभारले जाईल तर हिंदू-स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या आकांक्षाचा उलट आपले पथ्यावर पडतील. सुंदोपसुंदाच्या झटापटी जशा देवांच्या पथ्यावर पडल्या. पण त्या झटापटींचा लाभ घेण्याची आपणास चाणाक्षता, नितीपटुता नि सामर्थ्य पाहिजे. ते हिंदुसंघटनाविना येणार नाही.

खिलाफतीची चळवळ क्वचित त्या रूपाने व नावाने हिंदुस्थानात अस्तंगतहि होईल. पण ती अन्यरूपाने अमिराचे ध्वजाभोवती केंद्रीभूत होऊन हिंदुस्थानचे स्वामित्वावर झडप घालण्यासाठी टपत राहणार हे एकदा हिंदूंस स्पष्टपणे कळून चुकले म्हणजे मग संकटाची नांगी अर्धी ढिली झाली असे म्हणावयास हरकत नाही. पण आधीच आपण ज्या चळवळीच्या गर्तेत पडलेले आहोत त्यातून वर येण्यासाठी मुसलमानांचा सहाय्यक हात धरण्याचा प्रेमाने प्रयत्न करणे हे अधिक लाभकारक नाही काय? यास हेच उत्तर की बंधूंनो तो हात सहाय्यक हात नाही! हेच तर मूळ सिद्ध करावयाचे विधेय आहे. तो मलबारातील मोपल्याचा हात आहे. तो हसन-इ-झामीचा हात आहे. हैद्राबादेस हिंदूंस सळो की पळो करणाऱ्या परंतु वऱ्हाडास मात्र स्वराज्य देतो असे म्हणणाऱ्या, निजामशाहीचा तो हात आहे - एखादा दारूडा, पापी असला तरी मुसलमान म्हणून तो मला गांधीपेक्षाही प्रिय नि पवित्र असणार असे म्हणणाऱ्यां राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचा तो हात आहे - प्रथम मुसलमान नि मग हिंदी अशी धार्मिक निष्ठा बाळगणाऱ्या क्रोडो मुसलमानांचा तो हात आहे. म्हणून या प्रस्तुतच्या गर्तेतून वर निघण्यास तो हात धरण्यास जाताना सावधपणे नि संभाळून जा! किंबहूना ज्या हाताने एक कोटी रूपये एकत्र करून हिंदुस्थानात हिंदुत्व उरू नये यासाठी धडपड करताहेत त्यात त्यांचा इतका दोष नाही! हा तर बोलून चालून जीवनकलह आहे. आज हिंदूत्वाच्या मार्गात जर सर्वात मोठी कोणची अडचण उभी असेल तर ती हे अमीराचे संकट नव्हे ही खिलाफतीची आफत (संकट) नव्हे. सिंगापुरचे ठाणे ही नव्हे, प्रस्तुतची असाहायताही नव्हे. तर एकी, सरलता, आत्मिक बल, अप्रतिकार इत्यादी साधुत्वाच्या भोंदू गप्पाची अफू खात राहिल्याने आम्हावर आलेली निष्क्रीयतेची मुर्दाड धुंदी हेच मोठे संकट होय? ही धुंदी सोडली पाहिजे. आपण एकी म्हणून दुसऱ्याचे गळ्यात मिठी मारली म्हणजे एकी होतेच असे नाही हे कळले पाहिजे. पाहिजे असेल तुला, तर एक कर. नसेल तर जा. तुझ्याच्याने जे वाकडे होईल ते करून घे असा सणसणीत निस्पृहपणा नि धमक अंगात बाणली पाहिजे. संकट आहे हे कळले पाहिजे. संकट निवारण्याची शक्ती उरली नाही. पण संकट आले आहे ते हे इकडून आले आहे हे विश्वासाळूपणाच्या झोपेत न कळल्याने मात्र हे राष्ट्र कधीकाळी गोत्यात आले तर येऊ शकेल! म्हणून प्रथम गोष्ट ही की ही मुसलमानी आकांक्षा हे आपल्या हिंदू राष्ट्राच्या जीवीतावर येणारे एक नवे संकट जुन्या इतकेच भयंकर आहे हे कळले पाहिजे. जर इतके कळले नि त्यास तोंड देण्यासाठी आताचे आता हिंदूचे संघटन आरंभ होइल तर त्या संकटाचा अर्धनाश झाला असे समजण्यास हरकत नाही. या संकटास तोंड देण्यानेच नव्हे पण जमेल तर नवीन संकटाचे तोंडावर पूर्वीचे जुने संकट उभे करून त्यांचा लठ्ठालठ्ठित आपले कार्य अलगत साधता येईल. पण ते तेव्हा की जेव्हा प्रबळ हिंदूसंघटन एका मनुष्यासारखे एकात्मता पाऊन आखाड्यात उतरून चाणक्यांनी शिकवीलेल्या पेचाचा पुन्हा प्रयोग करू शकेल. ज्यांनी आपण संघटीत होणार नाही म्हणून प्रतिज्ञा केल्या त्यांचा हात धरता तरी का? एका गर्तेतून निघण्यासाठी भलत्याचाच हात धराल तर त्याहूनहि भयंकर गर्तेत पाडले जाल हे विसरू नका!

हिंदूनो! त्याचे स्थळी संघटनाचा हात धरणे श्रेयस्कर नाही काय? अरे सामर्थ्याचा हात धरा! आपल्या स्वत:चा हात धरा! त्या भगवंताचा हात धरा! त्या भगवंताचा हात धरा!!

प्रस्तुत ज्या गर्तेत आपण पडलो आहोत ती नि:संशय खोल आहे. ज्याचा हात संशयास्पद आहे तो हात धरणे नि:संशय धोक्याचे आहे, पण म्हणून काय झाले? चाणक्याचे पेच, चंद्रगुप्ताचे पराक्रम, समर्थांचे सामर्थ्य हे तुमचे सहाय्यक आहेत! हिंदूंनो तुम्ही प्रयत्न कराल तर काहिही भय नाही. हे राष्ट्र हिंदूचे आहे. हे राष्ट्र मारणे - आपण प्रयत्न केला म्हणून - जगतात दशमुखी रावणासही शक्य झाले नाही.

हे राष्ट्रजननि! कितीही झाले तथापी

।। सारथी जिचा अभिमनी कृष्णजी, आणि राम सेनानी ।।

।। अशी वीस कोटी तव सेना ।।

।। ती तयाविना थांबेना ।।

।। परि करूनि विद्धदलदमना ।।

।। रोविलची स्वकरी, जननि, रोविलची स्वकरी ।।

।। स्वातंत्र्याच्या हिमालयावरि झेंडा जरतारि ।।

तरीही हिंदी मुसलमानांच्या खिलाफती कार्यालयातून हिंदुस्थानभर परत निजामच्या पुत्राचे तुर्कस्थानच्या खलिफाच्या कुलातील वधूशी लग्न झाल्यामुळे त्यालाच खलिफा बनविण्याचे घाट चाललेले आहेत. मागे काबूलच्या अमीराने हिंदुस्थानवर स्वारी करावी, दिल्लीचे बादशहा बनावे, आणि त्यालाच मुसलमानांचा खलिफा म्हणून उद्घोषावे असेही आटोकाट प्रयत्न हिंदुस्थानातील मुसलमानांनी केले होतेच. इतकेच नव्हे, तर काही आत्मविसराळू हिंदू पुढाऱ्यांनीही 'खिलाफत म्हणजेच स्वराज्य' अशा आत्मघातक घोषणा करीत मुसलमानांच्या त्या देशद्रोही कटात भाग घेतला होता हे स्वामी श्रद्धानंदासारख्या प्रमाणभूत नेत्यानेच उघडकीस आणले होते. त्या कटाची जी वाताहत झाली तीच या निजामाला खलिफा बनविण्याच्या कटाची होणार! परंतु असल्या कटामागे हिंदुस्थानात मुस्लिमाची राजकीय नि धार्मिक सुलतानशाही पुनरपी प्रस्थापण्याची जी गुप्त महत्त्वाकांक्षा हिंदी मुसलमानांच्या रोमारोमात भिनलेली आहे तीच या 'खिलाफत आंदोलनाचे' मुळाशी आहे हे भयंकर सत्य यापुढे तरी हिंदू समाजाने ओळखून या खिलाफती कार्यालयाच्या पेट्यात एक दमडीही सहाय्य म्हणून टाकू नये. लवलेश सहानुभूती दाखवू नये. खिलाफती संस्थेचा अर्थ मुळात मुस्लिमांचे राजकीय नि धार्मिक अधिराज्य! ह्या लेखात दिलेल्या तिच्या त्रोटक इतिहासावरून इतके जरी हिंदू वाचकांच्या ध्यानात आले तरी पुरे. मुसलमान त्यांच्या वर्चस्वासाठी झटोत. त्यात त्यांचा काय दोष! दोष असेल तर तो मुस्लिमांचा इतिहास, धर्मशास्त्र, जातीप्रवृत्ती यांचा मुळातच अभ्यास न करता त्यांच्या हाताचे बाहुले बनणाऱ्या हिंदूंचा! मागे जो तिरस्करणीय मूर्खपणा झाला तो झाला, पण यापुढे तरी या संस्थेला हिंदुस्थानात पाय रोवू देण्यास हिंदूनी सतत विरोधच केला पाहिजे. मुस्लिमांची ती जरी असली खिलाफत तरी हिंदूंवर कोसळणारी ती आहे निव्वळ आफत. केवळ आपत्ती.

त्या वीतभर कुराणाच्या दोन पुठ्ठ्यांचे आत त्या अरबी पैगंबरने आपल्या ज्वालाग्राही विचारांची दारू ठासलेला जो कालध्वम भरून ठेवला त्यात इतकी प्रचंड शक्ती साठलेली होती की त्या लहानशा हातबॉबचा स्फोट होताच त्या भयंकर धडाक्यासरशी पॅरिस पासून पेकींगपर्यंत आणि

हंगेरीपासून हिंदुस्थानपर्यंत असणारे यच्चयावत् राजवाडे आणि मठमंदिरे धडाधड कोसळून त्यांच्या ठिकऱ्या उडून गेल्या! अणि त्या विनाशाच्या भयंकर काळोखात अरबांचा अर्धचंद्र प्रकाशू देण्यापुरता तरी त्याचा उपयोग ही झाला असलाच पाहिजे. परंतु त्याचबरोबर हेही खरेच होते की कुराणाच्या त्या दोन पुठ्ठ्यांचे आतच अरब संस्कृतीच्या आरंभाप्रमाणे अंतही समाविष्ट असल्याने जेव्हा जग त्या दोन पुठ्ठ्यात न मावण्याइतके विस्तीर्ण, उंच, रूंद आणि खोल विकास पावू लागले तेव्हा त्यास समावण्यास ती असमर्थ होत चालली. कुराणांतर्गत अरब संस्कृतीचीच ही गत झाली असे नव्हे तर अपरिवर्तनीय अशा कोणत्याही धर्मग्रंथाच्या दोन पुठ्ठ्यातच सारे जग आणि सर्व काळ डांबून ठेवू पाहणाऱ्या कोणत्याही संस्कृतीची आज ना उद्या अशीच गत होणारी असते. त्या धर्मग्रंथाच्या पहिल्या पानात आविर्भूत होणारी नवशक्ती त्याच्या शेवटच्या पानापर्यंत कार्य करीत आली की त्या पुढे नित्य बाहेर जाणे तिला निषिद्ध असल्याने तिला तिथे आळा पडलाच पाहिजे.

* * *